म. ग्रं. सं. ठाणं
विषय 1181
सं. क्र. 1109

मी आणि माझे गुरू

— गो. ग. आगरकर

REFBK-0003555

2nd

१०१

संपूर्ण आगरकर

ले.


आगरकर

१.००

१९२८

सर्वेषां अधिकारः

अधिकारः अर्पणम्



REFBK-000355

अनुक्रमणिका.

विषय.		पृष्ठ.
१	लोकांशिक्षणावर गद्दा.	१
२	देवता.	७
३	देवतोत्पत्ति.	१२
४	अथ आचार प्रकरणं.	२२
५	विजयलांछनें.	२२
६	व्यवच्छेदन.	४१
७	उपायन, कर व बलिदान.	५३
८	भेटी, देवदर्शनें व यात्रा.	६१
९	पुण्याचे लोकांनो, सावध व्हा सावध व्हा.	६९
१०	आमची एक दुष्ट खोड: आळस.	७३
११	ही दगलबाजी नव्हे काय ?	८०
१२	शनीदेव ऊर्फ साडेसातीचा देव.	८३
१३	स्वयंवर.	९०
१४	सामाजिक सुधारणा आणि कायदा.	९६
१५	सामाजिक सुधारणा परिषदेचे निंदक.	११२
१६	अजून तरी सावध व्हा.	११५
१७	अनाथाचा वाली कोणी नाही.	११८
१८	न करण्याचा वार शनवार.	१२४
१९	हलवायाचे दुकानावर ग्रहार्पण.	१२२
२०	राजकीय संविधानाचें अपायकारकत्व.	१२५

विषय.			पृष्ठ.
२१ सामाजिक वडामोड.			१४२
२२ भारतीय कलांचें पुराणत्व.			१५०
,,	,,	नं. २	१५८
,,	,,	नं. ३	१६४
,,	,,	नं. ४	१७०
२३ वेदार्थ यत्न.			१७३
२४ हा कलंक कसा जाणार ?			१७८
२५ समजत नाहीं तें हें.			१८२
२६ आमच्या स्त्रियांचा पेहराव.			१९१
,,	,,	नं. १	१९९
२७ अलंकारमीमांसा.			२०६
२८ म्हणण्यासारखा उपयोग नाहीं.			२१५
२९ कायदा मागतां ते जात कां करीत नाहीं ?			२२४
३० हिच्या नांवानेंही तीच रड.			२३३
३१ मूळ पाया चांगला पाहिजे.			२३७
३२ हे तुमचे पुढारी नव्हत.			२४४
३३ तर मग जुन्यांचे पुढारी असावे तरी कसे ?			२५१
३४ आम्हांला हलकट कां म्हटलें ?			२५३
३५ बोलके सुधारक, वागते सुधारक व सुधारणा निंदक.			२५५
३६ मि. अशबर्नर आणि अनाथ हिंदू विधवा.			२६१
३७ आणखी एक शहाण्याचा कांदा.			२६८
३८ संमतीचे वय आणि जुन्या लोकांचा खोटेपणा.			२७६
३९ यातां मात्र खचित होणार काय ? संमतीचा कायदा !!			२८२

विषय.

४० विवाहकाल व संभोग काल.
४१ संमतिविलास धर्मशास्त्र बाधक नाहीं.
४२ महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र.
४३ इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचें घोर दारिद्र्य.
४४ हिंदुस्थानास क्षय लागला.
४५ बाचाल तर चकित व्हाल.
४६ यांत कांहीं फायदा नाहीं.
४७ इंग्लिश राज्यांत पोटभर अन्न मिळत नाहीं.
४८ हिंदुस्थानांतील अन्नान्नदशेचे दुष्परिणाम.
४९ यांना कोणी विचारता नाहीं काय ?
५० भांडवल गेलें; व्यापार गेला !
५१ खुळेरे खुळे ! अथवा बहिष्काराचें शुष्क अवडंबर.
५२ बंधनें कोण व कोणतीं घालणार ?
५३ आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा.
५४ बहिष्कृतांनीं बहिष्कार घालावा हा चमत्कार नव्हे काय ?
५५ यामण्य प्रकरण.
५६ पांचजन्याचा हंगाम.
५७ धर्माचा सुकाळ व बकऱ्यांचा काळ.
५८ इति श्री चहा यामण्य प्रकरणं समाप्तं ?
५९ तीन अर्थशास्त्रें.
" "
६० यांत दोषी कोणीच नाहीं.

विषय.	पृष्ठ.
आम्हां पुरुषांचा पेहराव.	४४६
,, ,, ,,	४५२
,, ,, ,,	४६०
,, ,, ,,	४६६
,, ,, ,,	४७३
,, ,, ,,	४७८
,, ,, ,,	४८५
२ सुधारकालाच दोष कां ?	४८५
३ ही सुधारणेची दिशा नव्हे.	४९०
४ आतां धर्माभिमानी स्वतःच वेगळी जात करणार म्हणतात !	४९५
राज्यकर्त्यांनों ! लोभ मूलानि पापानि !	
हें वचन नित्य लक्षांत ठेवा.	५०१
आनि तृष्णा न कर्तव्या चक्रं भ्रमति मस्तके.	५०७
शेळी जाते जिवानिशीं खाणार म्हणतो बातड !	५१४
जांवई पाहुणा आंला म्हणून टोणगा पान्हवेल काय ?	५१८
क्या, पण त्वाला कांहीं धरबंद असूं द्या.	५२४
पुण्याची प्रकृती व गवताच्या गंजी.	५३०
मराठींत चांगले ग्रंथ कां होत नाहींत ?	५३८
द्राक्ष विरुद्ध अफू अथवा हलवायाचे दुकानावर ब्राम्हार्पण !	५४३
अंडीं खाण्यास काय हरकत आहे ?	५४९
आमचा अफूचा व्यापार.	५५४
हिंदुस्थानचें राज्य कोणासाठीं ? अथवा पोंहेल साहेबसमाठीं समकालीन परीक्षा	५६२

विषय

७६ धर्मकल्पना आली कोठून ?
आत्मा व पिशाच.
मृतात्म्यांची दिनचर्या.
७७ थडगीं व देवळें.
मूर्तिपूजेचा उद्भव.
मूर्तिपूजेचा प्रकार.
देवोत्पत्तीविषयीं शेवटचे चार शब्द.
७७ हिंदुस्थानची तिजोरी आणि घाटत
असलेला अन्याय.
७८ पुजारी व पंचाक्षरी.
७९ पहिले पुजारी मृतांचे आत.

लोकशिक्षणावर गदा.

" तुमच्या हायस्कुलावर होत असलेल्या खर्चापैकीं दोन० तृतीयांश खर्च तुह्मी देण्यास तयार व्हा, नाहींतर तुमचें हायस्कूल बंद केलें जाईल. " अशा अर्थाचीं पत्रें शाळाखात्याचे डायरेक्टर यांजकडून प्रत्येक जिल्ह्याचे म्युनिसिपालिटीस गेलीं आहेत; तसेंच येथील डेक्कन कॉलेजाची फी दहा रुपये केली आहे, असें ह्मणतात. हा सर्व प्रकार खरा असेल, व त्याप्रमाणें आचरण करावयाचेंच, असा सरकारचा निश्चय झाला असेल, तर येथील लोकशिक्षणाची काय अवस्था होईल हें सांगतां येत नाहीं. आजपर्यंत आमच्या सरकारचा गर्व काय असे कीं, आह्मीं हिंदू लोकांसाठीं साऱ्या देशभर रस्ते केले, तारायंत्रें केलीं, आगगाड्या केल्या, न्यायाच्या कचेऱ्या स्थापिल्या, लोकांच्या मालमत्तेचें आणि जिवांचें उत्तम रीतीनें संरक्षण होईल अशा प्रकारचा पोलिसाचा बंदोबस्त केला; सैन्याची उत्तम व्यवस्था ठेऊन परचक्राची भीति दूर केली; व्यापारास उत्तेजन दिलें; नाना तऱ्हेच्या धंद्यांची लोकांस ओळख करून दिली; सारांश, हिंदुस्थानास आजपर्यंत अनबगत अशी सुधारणा व शांतता त्यास दिली. पण या सर्वापेक्षा सरकारास ज्या गोष्टीविषयीं विशेष अभिमान वाटत असे; जीमुळें आमचें पार-

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ७५

लाल्हा ऑफिस, सदाशिव पेठ, पुणें.

तंच्य आह्मांस सह्य होऊन इंग्लिश लोकांचें प्रभुत्व येथें चिरकाल असावें, असें वाटत असें; व जिच्या मदतीनें कधीं तरी आह्मांस स्वातंच्याचा सुदिन प्राप्त होईल, अशी आशा आमच्या अंतःकरणांत कधीं कधीं उद्भवत असे; त्या गोष्टींतून सरकार आज आपलें अंग काढून घेऊं पाहात आहे ! लोकशिक्षणाच्या कामाचा बोजा ब्रिटिश सरकारनें झुगारून दिल्यास, ब्रिटिश लोकांस आपल्या अंमलाचे पवाडे गाण्यास काय राहिलें, हें आम्हांस समजत नाहीं. " आम्हीं तुमचें स्वातंत्र्य नाहींसें केलें, पण त्याबद्दल पाश्चिमात्य ज्ञानाचें सारें भांडार तुम्हीं आम्हांस अर्पण केलें " ही जी इंग्लिश लोकांची आजपर्यंतची गर्वोक्ति तिचे आतां काय होईल ? हिंदुस्थानांत आजमितीस बरेच लोक शिकून तयार झाले आहेत, व त्यांना शिक्षणाचें महत्व समजून आलें आहे; तेव्हां येथून पुढें जो विद्याप्रसार व्हावयाचा त्याचें काम त्यांच्या हातुन करविण्याचा सरकारानें निश्चय केला असता, तर त्याबद्दल सरकारास विशेष दोष देण्यास जागा न सापडती. लोकशिक्षणावर रुप्यां हांत असलेला खर्च कायम ठेऊन शाळा व कालेजें चालविण्याची जबाबदारी सरकार लोकांवर टाकतें, आणि त्यांची देखरेख फक्त आपणांकडे ठेवतें, तर ' तुम्ही सर्वथैव वाघगी गोष्ट करता, ' असें आम्हांस म्हणतां न येतें. पण सध्यां सरकारानें जो क्रम आरंभिला आहे तो आमच्या मतें फारच दूषणीय आहे. ज्याप्रमाणें व्यसनी लोक आपल्या व्यसनांत तदनभिज्ञास घेरावयाचें असतां, कांहीं दिवस आपली पदरमोड करून त्यास आपल्या व्यसनाची चटक लावतात, व ती त्याच्या अंगीं पक्की खिळली असें दिसून येऊं लागलें, म्हणजे आपला हात आखडून धरतात इतकेंच नाहीं, तर आपल्या खर्चाचा बोजाही त्यावर लादूं लागतात, तसा सरकार या विद्याव्यसनाच्या संबंधानें सरकारानें आरंभिला आहे. प्रथम मोठ्या खर्चाची शाळाखानीं प्रत्येक इलाख्यांत स्थापलीं;

कानिष्ट, मध्यम, व वरिष्ठ प्रतीच्या शाळा घातल्या; त्यांत लोकांनीं आपलीं मुलें धाडावीं ह्मणून कोठें त्यांस अगदीं फुकट व कोठें क्षुल्लक फीवर शिकविण्याचा प्रघात घातला; पगारी विद्यार्थ्यांच्या जागा निर्माण केल्या; बक्षिसें लाविलीं; परीक्षा घेण्यासाठीं युनिव्हर्सिट्या स्थापिल्या; ठिकठिकाणीं लहान लहान पुस्तकालयें केलीं;—याप्रमाणें लोकशिक्षणाची लोकांस गोडी लागण्यास्तव होण्यासारखे सारे उपाय करून ते त्याचा आस्वाद चाखूं लागताहेत नाहीं तों त्यांतून आमचें सुधारलेलें सरकार आपलें अंग सर्वांशीं काढूं पहात आहे इतकेंच नाहीं, तर त्याकडे होत असलेला बराच खर्चही कमी करूं पहात आहे, हें आमचें केवढें दुर्भाग्य होय ? व यामुळें सरकारास तरी केवढा धोका बसण्याचा संभव आहे ? वाचकहो, ही सर्व चलबिचल ब्रह्म. देशांत चालूं असलेल्या लढाईमुळें व वायव्यप्रांतावर अफगाणि-स्थानाच्या बाजूनें परचक्र येऊं नये, म्हणून ब्रिटिश सैन्य वाढविण्यांत आल्यामुळें जो खर्च वाढला आहे, त्यामुळें होत आहे, असें समजणें जरूर आहे. कोणत्याही खात्याचा खर्च कमी न करतां वरील गोष्टी करता याव्या, म्हणून लॉर्ड **डफरीन** यांनीं **इन्कमट्याक्स** (प्राप्तीवरील कर) पुनः बसविला, मिठावरील कर वाढविला, व दुष्काळ निवारणार्थ बसविलेल्या कराचें सारें उत्पन्न वरील कृत्याकडे लावून दिलें, तरी त्यांचा खर्च भागत नसल्यामुळें, ही काटकसरीची धाड शाळाखात्यावर येऊं पहात आहे, हें उघड आहे. ब्रह्मदेशावर स्वारी करून तो खालसा करण्याचा निश्चय झाला, तेव्हां सरकारानें जे लेख प्रसिद्ध केले त्यांत असें दाखविण्याचा प्रयत्न केला होता कीं, ब्रह्मदेश जिंकण्यास व खालसा करण्यास फार झाले तर तीस लाख रुपये लागतील ! पण तो एकदां खालसा होऊन ब्रिटिश राज्याचा घटकावयव झाला, म्हणजे त्यासंबंधानें हिंदुस्थानावर खर्चाचा भार पडणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर उलट हिंदुस्था-

नच्या खजिन्यास ब्रह्मदेशापासून मदत होऊं लागेल ! हीं गोष्ट घडून येण्याची आशा आतां उरली नाहीं ! ब्रम्हदेशाशीं आरंभिलेला संग्राम, वायव्यादिशेचा बंदोबस्त, आणि रुप्याचा उतरलेला भाव—यांमुळें हिंदुस्थानचा खर्च सहा कोटींनीं वाढला आहे. पैकीं सुमारें तीन साडेतीन कोटी रुपये **इनकमटयाक्स**, मिठावरील वाढलेला कर, व इतर किरकोळ बाबी यांतून भागाविला जात आहे. बाकी उरलेले दोन अडीच कोटी रुपये कोढून काढावे, अशी पंचाईत पडल्यामुळें, प्रत्येक इलाख्यावर नवीन खंडणी बसवावी असा बेत करून, हिंदुस्थान सरकारानें मुंबई सरकारास असें पत्र लिहिलें आहे कीं, चालूं वर्षांत 'तुम्हांकडून मुख्य सरकारास एकोणीस लाख रुपये मिळाले पाहिजेत. हे उभे करण्यासाठीं तुह्मी पाहिजे ती काटकसर करा, नवीन कर बसवा, शाळांची फी वाढवा; सारांश तुम्हांस वाटेल तें करा; पण तुमच्याकडून एकोणीस लाखांची कुमक झालीच पाहिजे ! व तेथून पुढं इलाख्याच्या उत्पन्नाचा विवक्षित भाग तुम्हांकडे ठेऊन बाकीचें सारें उत्पन्न मुख्यसरकार आपले ताब्यांत घेईल; व तुमच्याकडे जो भाग ठेवायाचा तो कमी अधिक करण्याचा अधिकारही मुख्य सरकाराकडे राहील. **इंपीरीअल** उत्पन्न व **इंपीरीअल** खर्च आणि **प्रांतिक** उत्पन्न व प्रांतिक खर्च–असा विभाग करणें बरोबर नाहीं. कसेंही झालें तरी ज्या गोष्टींबद्दल मुख्य सरकार जबाबदार आहे त्यांचा खर्च कसा तरा भागविलाच पाहिजे. त्या अर्थी तो खर्च भागविल्यानंतर उरेल तेवढा पैसा प्रांतिक खर्चाकडे लावणें योग्य आहे. ज्या प्रांतिक सरकारांस आपापल्या प्रांतांत विशेष सुधारणा कराविशी वाटत असेल त्यांनीं ती करण्याकरितां हवेतितके पैसे उत्पन्न करावे. पण त्या सर्वांनीं ही गोष्ट लक्षांत धरावी कीं, मुख्य सरकारास लागेल तेवढा पैसा पुरविणें, हें त्यांचें मुख्य कर्तव्य आहे. हिंदुस्थानामुळें इंग्लंडांत होणारा

"सात आठ कोटींचा खर्च, सैन्याचा खर्च, मोठमोठ्या व्यापारी कंपन्यांस जें व्याज पोहोंचविण्याचा सरकारानें पत्कर घेतला आहे त्याचा खर्च, आणि अशाच प्रकारचे इतर खर्च मुख्यसरकाराकडून होतात; आणि ते केल्या शिवाय राज्यशकट सुराळित चालण्याचा संभव नाहीं. सबब हे खर्च भागविल्यावर जेवढी शिल्लक उरेल तेवढीच प्रांतिक सरकारांच्या ताब्यांत ठेवतां येणार आहे." या नवीन तत्वाचा अर्थ असा होतो कीं, मुख्य सरकारानें पाहिजे तसा खर्च करावा; तो पुरविण्याचा मक्ता प्रांतिक सरकारांनीं आपणांकडे घ्यावा; आणि तो निभण्यास्तव लोकांवर इवे तेवढे कर बसवून त्यांस असंतुष्ट करण्याचें अपयश मुख्य सरकाराकडे न जाऊं देतां आपल्याकडे घेण्यास तयार असावें! या अनियंत्रित व अप्रशस्त व्यवस्थेचा अथवा अव्यवस्थेचा आरंभ झाला नाहींतोंच प्रांतिक सरकारांवर खर्चाच्या जबरदस्त गोष्या पडूं लागून अत्युपयोगी खात्यांचा खर्च कमी करण्यास सुरवात झाली आहे. दुर्दैवानें ही व्यवस्था कायम होईल तर पुढें काय काय प्रकार पहावे लागतील, त्यांची आज कल्पना सुद्धां करवत नाहीं! राज्यविस्तार शक्ती बाहेर गेला, आणि उत्पन्नाचा बहुतेक भाग लष्करीखात्याकडे अडला जाऊन, न्याय, लोकशिक्षण वगैरे अत्यावश्यक कामांकडें दुर्लक्ष होऊं लागलें म्हणजे राज्यास उतरती कळा लागल्याचीं चिन्हे दिसूं लागलीं असें आजपर्यंतच्या इतिहासावरून सिद्ध झालें आहे. अलीकडे सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत लोकशिक्षणाविषयीं पराकाष्ठेची आस्था दाखविली जाऊन, त्याच्यासाठीं अधिक अधिक खर्च करण्याची प्रवृत्ति

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.
सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्चर ८१० पौंड.
मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.
याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

नच्या खजिन्यास ब्रह्मदेशापासून मदत होऊं लागेल ! हीं गोष्ट घडून येण्याची आशा आतां उरली नाहीं ! ब्रम्हदेशाशीं आरंभिलेला संग्राम, वायव्यादिशेचा बंदोबस्त, आणि रुप्याचा उतरलेला भाव—यांमुळें हिंदुस्थानचा खर्च सहा कोटींनीं वाढला आहे. पैकीं सुमारें तीन साडेतीन कोटी रुपये **इनकमटॅक्स**, मिठावरील वाढलेला कर, व इतर किरकोळ चाबी यांतून भागविला जात आहे. बाकी उरलेले दोन अडीच कोटी रुपये कोठून काढावे, अशी पंचाईत पडल्यामुळें, प्रत्येक इलाख्यावर नवीन खंडणी बसवावी असा बेत करून, हिंदुस्थान सरकारानें मुंबई सरकारास असें पत्र लिहिलें आहे कीं, चालू वर्षांत ' तुम्हांकडून मुख्य सरकारास एकोणीस लाख रुपये मिळाले पाहिजेत. हे उभे करण्यासाठीं तुह्मी पाहिजे ती काटकसर करा, नवीन कर बसवा, शाळांची फी वाढवा; सारांश तुम्हांस वाटेल तें करा; पण तुमच्याकडून एकोणीस लाखांची कुमक झालीच पाहिजे ! व तेथून पुढें इलाख्याच्या उत्पन्नाचा विवक्षित भाग तुम्हांकडे ठेऊन बाकीचें सारें उत्पन्न मुख्यसरकार आपले ताब्यांत घेईल; व तुमच्याकडे जो भाग ठेवायाचा तो कमी अधिक करण्याचा अधिकारही मुख्य सरकाराकडे राहील. **इंपीरीअल** उत्पन्न व **इंपीरीअल** खर्च आणि प्रांतिक उत्पन्न व प्रांतिक खर्च-असा विभाग करणें बरोबर नाहीं. कसेंही झालें तरी ज्या गोष्टींबद्दल मुख्य सरकार जबाबदार आहे त्यांचा खर्च कसा तरी भागविलाच पाहिजे. त्या अर्थी तो खर्च भागविल्यानंतर उरेल तेवढा पैसा प्रांतिक खर्चाकडे लावणें योग्य आहे. ज्या प्रांतिक सरकारांस आपापल्या प्रांतांत विशेष सुधारणा कराविशा वाटत असेल त्यांनीं ती करण्यास्तव वेगेतितके पैसे उत्पन्न करावे. पण त्या सर्वांनीं ही गोष्ट लक्षांत धरावी कीं, मुख्य सरकारास लागेल तेवढा पैसा पुरविणें, हें त्यांचें मुख्य कर्तव्य आहे. हिंदुस्थानामुळें इंग्लंडांत होणारा

सात आठ कोटींचा खर्च, सैन्याचा खर्च, मोठमोठ्या व्यापारी कंपन्यांस जें व्याज पोहोंचविण्याचा सरकारानें पत्करा घेतला आहे त्याचा खर्च, आणि अशाच प्रकारचे इतर खर्च मुख्यसरकाराकडून होतात; आणि ते केल्या शिवाय राज्यशकट सुराळित चालण्याचा संभव नाहीं. सबब हे खर्च भागाविल्यावर जेवढी शिल्लक उरेल तेवढीच प्रांतिक सरकारांच्या ताब्यांत ठेवतां येणार आहे. '' या नवीन तत्वाचा अर्थ असा होतो कीं, मुख्य सरकारानें पाहिजे तसा खर्च करावा; तो पुरविण्याचा मक्ता प्रांतिक सरकारांनीं आपणांकडे घ्यावा; आणि तो निभण्यास्तव लोकांवर इवे तेवढे कर बसवून त्यांस असंतुष्ट करण्याचें अपयश मुख्य सरकाराकडे न जाऊं देतां आपल्याकडे घेण्यास तयार असावें ! या अनियंत्रित व अप्रशस्त व्यवस्थेचा अथवा अव्यवस्थेचा आरंभ झाला नाहींतोंच प्रांतिक सरकारांवर खर्चाच्या जबरदस्त गोण्या पडूं लागून अत्युपयोगी खात्यांचा खर्च कमी करण्यास सुरवात झाली आहे. दुर्दैवानें ही व्यवस्था कायम होईल तर पुढें काय काय प्रकार पहावे लागतील, त्यांची आज कल्पना सुद्धां करवत नाहीं ! राज्यविस्तार शक्ती बाहेर गेला, आणि उत्पन्नाचा बहुतेक भाग लष्करीखात्याकडे अडला जाऊन, न्याय, लोकशिक्षण वगैरे अत्यावश्यक कामांकडें दुर्लक्ष होऊं लागलें म्हणजे राज्यास उतरती कळा लागल्याचीं चिन्हे दिसूं लागलीं असें आजपर्यंतच्या इतिहासावरून सिद्ध झालें आहे. अलीकडे सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत लोकशिक्षणाविषयीं पराकाष्ठेची आस्था दाखविली जाऊन, त्याच्यासाठीं अधिक अधिक खर्च करण्याची प्रवृत्ति

दि रिलाअन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.
सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्चर ८१० पौंड.
मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.
याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

पडूं लागली आहे. कनिष्ठ प्रतीचें शिक्षण तर सर्वांस फुकटच मिळावें, म्हणजे त्याचा सारा खर्च सरकारी उत्पन्नांतून व्हावा, असा वाद चालू आहे, आणि तो करणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ज्या देशांतील बहुतेक लोकांस लिहितां वाचतां येत आहे, त्या देशांत त्या संबंधानें अशा हालचाली सुरूं आहेत. आमच्या देशांत दाट अज्ञानतिमिर जिकडे तिकडे पसरलें आहे, कांग्रेस ही लोकांची प्रतिनिधीसभा नव्हे, असें प्रतिपादणाऱ्यांचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, ज्या देशांतील शेंकडा पंचाण्णव लोकांस लिहितां वाचतां येत नाहीं, त्यांना कॉंग्रेससारख्या सभांचें महत्व समजण्याचा मुळींच संभव नाहीं; म्हणून लोकांत शिक्षणाचा बराच प्रसार होईतोंपर्यंत असल्या कॉंग्रेसांपासून फायदा न होतां नुकसान होण्याचा संभव आहे. तसेंच प्रांतिक कौन्सिलांत व गव्हर्नर-जनरलाच्या कौंसिलांत लोकनियुक्त सभासद असूं नयेत, असें ज्यांचे म्हणणें आहे तेहीं तसें न करण्यास लोकांचे अज्ञान हेंच कारण दाखवितात. असें असून गरीब बिचाऱ्या शाळाखात्याचा खर्च अविचारानें कमी करणें हें अगदीं उचित नाहीं. या खात्याचा खर्च कमी करणे म्हणजे उत्पन्नाचा झरा बंद करण्यासारखें होय, याचा सरकारानें नीट विचार करावा. काटकसर करणें जरूर असेल तर ती दुसऱ्या खात्यांत करावी. ती शाळाखात्यांत केल्यानें लोकांचें आणि सरकाराचें पुढें पराकाष्ठेचें नुकसान होणार आहे यासंबंधाचा ओरड थेट पार्लमेंटपर्यंत पोंचवून सरकारी उत्पन्नाचा विवक्षित भाग लोकशिक्षणाकडे अव्याहत लाविला जाईल, असें पार्लमेंटानें हिंदुस्थान सरकाराकडून बंधन करून घेतलें पाहिजे.

— ——

देवता.

" व्याघ्रादि हिंस्र पशूंस देवतांची कल्पना आहे किंवा नाहीं हें सांगवत नाहीं. पण असलीच तर त्यांच्या देवता पर्वतांच्या गुहांत दिवसां पडून राहणाऱ्या, रात्रीं भक्ष्य मिळविण्यासाठीं गोठ्यांवर, मेंढवाड्यांवर, व कळपांतून चुकून मागें राहिलेल्या व इकडे तिकडे भटकणाऱ्या गेरसावध हरणावर व गाईम्हशींवर हल्ला करणाऱ्या तीव्र दाढांच्या, प्रचंड सामर्थ्याच्या, व प्रखरनखायुधाच्या स्वप्रतिमा असतील, " असें एका ग्रीस देशांतील मूर्तिपूजेचा तिरस्कार करणाऱ्या ग्रीक तत्ववेत्याचें म्हणणें आहे. प्रस्तुत लेखांत या तत्ववेत्याप्रमाणें या देशांतील विचित्र मूर्तिपूजेवर टीका करण्याचा इरादा नाहीं. मनुष्यास देवतांच्या कल्पना प्रथम कशा सुचूं लागतात, पुढें त्यांचीं अभिवृद्धि कशी होत जाते; आणि अखेरीस त्यांचा लय कसा होतो, हें मात्र येथें सांगावयाचें आहे. ज्याप्रमाणें व्यक्तिमात्रास बाल्यावस्थेंत कित्येक विलक्षण कल्पना खऱ्याशा भासत असून, पुढें जसा त्यांचा लोप होत जातो, त्याप्रमाणें मनुष्यजातीच्या बाल्यावस्थेंत कित्येक विलक्षण कल्पनांचा उद्भव होऊन, पुढें ज्याप्रमाणें तींत ज्ञान आणि अनुभव यांची वृद्धि होत जाते, त्याप्रमाणें त्या मागें पडत जाऊन त्यांच्या ठिकाणीं शुद्धतर कल्पनांचा संभव होतो. तात्पर्य, मनुष्यांच्या विवक्षित स्थितींत त्याला विवक्षित कल्पना सुचल्या पाहिजेत, हें तत्वदृष्ट्या कबूल करणें भाग आहे. आणि म्हणून जे एका स्थितींतून पार पडून दुसऱ्या स्थितींत गेले असतील, त्यांनीं आपल्या पहिल्या स्थितींत असलेल्या व्यक्तीस मूढ म्हणणें किंवा त्यांच्या कल्पनांची विटंबना करणें बरोबर नाहीं. एखाद्या वाटोळ्या दगडास शेंदूर फासून त्यापुढें बकरीं मारणें; किंवा संगमरवरी पाषाणाची सुंदर मनुष्याकृति करून

तिला पीतांबर नेसविणें, दागिने घालणें, पंच पक्वान्नांचे प्रति-
दिवशीं नैवेद्य दाखविणें, व रात्रीं निजण्यासाठीं शय्या करून
ठेवणें; अथवा ज्या मंदिरांत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष प्रार्थ-
नाविषयीं पुढें ठेवण्यांत येत नाहीं अशा मंदिरांत मांड्या घालून
किंवा गुडघे टेंकून आणि डोळे मिटून साक्षात् किंवा परंपरेनें
निर्विकार व निर्गुढ अशा परब्रम्हाची उपासना व चिंतन करणें;
अथवा कोणत्याही मंदिरांत पाय न ठेवतां घरच्या घरीं एकांत
स्थानीं विचारमग्न होऊन, विश्वाचा अफाट पसारा आणि आपलें
संकुचित बुद्धिसामर्थ्य हीं पुढें उभीं राहणें आणि आपणास
विश्वाच्या दृश्यस्वरूपापलीकडे कधींही जातां येण्याचा संभव
नाहीं, विश्वाचें आदिकारण कांहीं तरी असलें पाहिजे अशी
खात्री झाली तरी जोंपर्यंत ज्ञानप्राप्ति इंद्रियावलंबी आहे तोपर्यंत
त्यांच्याद्वारें जेवढें व जसलें ज्ञान मिळेल तेवढ्यांतच समाधान
करून घेतलें पाहिजे; त्यापलीकडे भरारी मारणें, व मला जगदा-
दिकारणाचें खरें ज्ञान झालें आहे, असें म्हणणें हा बुद्धीचा भ्रम
किंवा आभद्र आहे असें वाटणें;—हे सारे निरानिराळ्या स्थितींत
मनुष्यांच्या हातून घडणारे धर्माचार आणि त्याला सुचणारे
धर्मविचार आहेत. कोणतीही लहान मोठी जड वस्तु, वनस्पति,
प्राणि, किंवा निराकार देवता यांपैकीं कोणाचेंही पूजन मनुष्य
करीत असला तरी त्याच्या सर्व प्रकारच्या पूजनांत एक गोष्ट
साधारण असते ती ही कीं, ज्या वस्तूची तो पूजा करीत असतो,
ती वस्तु निदान त्यावेळीं तरी त्यास आपणाहून विशेष प्रबळ.
आणि आपलें हित किंवा अहित करण्यास समर्थ अशी आहे,
असें तो मानीत असतो, यांत शंका नाहीं. कोणत्याही वस्तूस
देवता कल्पून तिचें पूजन करण्यांत, तिनें केलेल्या उपकाराबद्दल
आभारप्रदर्शित करावे, असा एक हेतू असावा, व अमुक अप-
कार करूं नये, अशासाठीं तिची प्रार्थना करावी, असा दुसरा
हेतु असावा. याहून कोणत्याही पूजकास आपल्या उपास्य

आधारभूत तिसरा हेतु दाखवितां येईल असें वाटत नाहीं. सारांश, 'देवता' आणि 'पूजा' या शब्दांबरोबर एका बाजूस सामर्थ्याधिक्य आणि दुसऱ्या बाजूस बलहीनता; एका पक्षीं मनोरथ परिपूर्ण करण्याची शक्ति आणि दुसऱ्यापक्षीं उपकार करून घेण्याचें आणि अपकार टाळण्याचें औत्सुक्य दिसून येतात. हा सिद्धांत ज्यांनीं या संबंधानें विशेष विचार केला नसेल त्यास सहसा मान्य होण्यासारखा नाहीं. तथापि तो खरा अशी खात्री पुढील विस्तृत विवेचनावरून झाल्याशिवाय राहणार नाहीं.

देवता अनेक प्रकारच्या आहेत. जळीं, काष्ठीं, व पाषाणीं देवता भरल्या आहेत. जिवंत झाडांत व जनावरांच्या शरीरांत अनेक देवतांचा संचार होत आहे. सारांश, अशी कोणतीही वस्तु नाहीं कीं जी देवता होऊं शकणार नाहीं, किंवा जिला कोणींतरी देवता करून सोडिलेलें नाहीं. सृष्टींतील सचेतन व अचेतन पदार्थांचेठाईं प्रबल पुरुषांचे गुण कल्पून त्यांस देवता मानूं लागणें हा देवतोत्पत्तीचा एक प्रकार; व प्रबल पुरुषांसच जिवंतपणीं आणि मरणोत्तर देव कल्पून त्यांचें पूजार्चन करणें हा देवतोत्पत्तीचा दुसरा प्रकार. नद्या, पर्वत, ग्रह, तारे, धान्यें, हत्यारें वगैरेंची पूजा; तसेंच बेल, वड, उंबर, तुळस यांची पूजा; पुनः गाय, बैल, साप, हनुमंत, व गरुड यांची पूजा या देवतोत्पत्तीच्या पहिल्या प्रकारांत येतात; राम, कृष्ण, गणपति, ज्ञानदेव, देव मामलेदार, अक्कलकोटचे स्वामी, यांच्या पूजा-देवतो-

---

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

त्पत्तीच्या दुसऱ्या प्रकारांत येतात. या दोन देवतोत्पत्ती एका पाठीमागून एक होतात, असा नियम नाहीं, त्या समकालीनही असतात. त्यांत मुख्य भेद हा आहे कीं, पहिल्या प्रकारच्या देवतोत्पत्तींत मनुष्यांच्या गुणाचा आरोप मनुष्येतर वस्तूंवर होत असतो; दुसऱ्या प्रकारच्या देवतोत्पत्तींत मनुष्यच देव बनून जातो ! प्रस्तुत निबंधांत मनुष्यास देव बनविण्याची प्रवृत्ति कशी पडते, हें सांगावयाचें आहे. हें सांगतांना हिंदुस्थानांतलि लोकांशिवाय इतर लोकांचीं उदाहरणेंही देण्यांत येणार अहेत. त्यांवरून असें दिसून येईल कीं, धर्मसंबंधानें आमच्या लोकांत जशा विचित्र कल्पना आहेत तशा इतर लोकांतही आहेत; व ज्याप्रमाणें उत्तरोत्तर आमच्या धर्मकल्पना शुद्ध होत गेल्या त्याप्रमाणें इतरांच्याही होत गेल्या, व चालल्या आहेत.

प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, कीं मनुष्य आपल्या वन्यावस्थेंत किंवा प्रथमावस्थेंत बऱ्याच अंशीं अप्रबुद्ध पशूसारखा असतो. ज्याप्रमाणें परिचयांत नसलेली एखादी विलक्षण वस्तू या पशूंनीं पाहिली म्हणजे ते बुजतात, आणि घाबरून जातात, त्याप्रमाणेंच असाधारण वस्तूच्या दर्शनानें वन्यमनुष्याची स्थिति होते. त्याला ती वस्तू अमानुष किंवा दैविक वाटूं लागते. रानटी लोक आपल्याहून बुद्धीनें, चातुर्यानें, व बलानें श्रेष्ठ अशा मनुष्यासच देव म्हणतात असें नाहीं; अपरिचित पण विलक्षण निर्जीव वस्तूसही देव मानणें हा त्यांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असते. उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांनीं कांहीं विलक्षण वस्तु किंवा पुरुष पाहिला, कीं तिला किंवा त्याला ते देव, किंवा पिशाच्च म्हणतात ! बेचुआना जातीच्या लोकांनीं जहाज कधीं पाहिलें नसल्यामुळें, जेव्हां त्यांपैकीं दोघांस कांहीं इंग्रजांनीं आपल्या गलबतावर नेलें, तेव्हां ते आश्चर्यानें थक्क होऊन अगीं म्हणूं लागले कीं, ' हें

वस्तु मनुष्यकृत नसावी, ही स्वयंभू असावी, ही खचित देव आहे ' ! रानटी लोकांत ' देव ही संज्ञा त्यांस न समजणाऱ्या वस्तूस, व ज्या पुरुषाच्या शक्तीचा त्यांस तर्क होऊं शकत नाहीं अशा पुरुषास, लावण्यांत येते. **फिजियन** लोकांचा आणि **युरोपिअन** लोकांचा प्रथम समागम झाला तेव्हां **फिजियन** लोक छापण्याच्या यंत्रांस आणि तीं चालविणाऱ्या युरोपीअन लोकांस देव म्हणूं लागले ! राजाला देव ह्मणणें हा प्रघात सर्वत्र अवगत आहेच. **शिवाजी** शिवावतार होता असें मानणारे गृहस्थ अपणांस या क्षणीं पाहिजे तितके सांपडतील ! **मालगासकी** लोकांस जी नवीन व उपयोगी गोष्ट दिसेल तीस ते देव ह्मणतात. रेशीम, तांदूळ, नाणीं, गडगडाट, बीज भूकंम हे सारे त्यांचे देव होत ! पूर्वज व नुकताच मेलेला राजा हेही त्याच कोटींत येतात ! पोथ्यांला नमस्कार घालण्याच मक्ता आमच्याकडेच आहे असें नाहीं; हे लोकहीं पुस्तकांस देवाप्रमाणें भजतात ! मखमालीस हे लोक ईश्वरनय मानतात याप्रमाणें असाधारण वस्तूस व मनुष्यास देव मानणाऱ्या लोकांचीं अनेक उदाहरणें देतां येतील, पण तसें करण्यास येथें जागा नाहीं. ज्यांना तीं हवीं असतील त्यांनीं प्रसिद्ध इंग्लिश तत्ववेत्ता जो हर्बर्ट स्पेन्सर त्याचा **प्रिन्सिपल्स ऑफ सोशिऑलजी** नामक ग्रंथ पहावा. या तत्ववेत्याच्या इतर ग्रंथाप्रमाणें हा ग्रंथही विद्वत्तेची आणि विचाराची अनुपम खाण आहे, व **सुधारकाच्या** द्वारें त्याची ओळख आमच्या लोकांस करून द्यावी, असा आपचा मानस आहे प्रस्तुत निबंध वरील ग्रंथाच्या एका अध्यायाच्या आधारानें लिहिण्यास आरंभ केला आहे.

असो; वर जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून कायदिसून येईल कीं, रानटी लोक आपल्याहून श्रेष्ठ असा मनुष्य दिसला कीं त्याला देव ह्मणूं लागतात. हें (अगदीं स्वल्प असलें तरी

चालू ठेवावी, आणि पोराचाळांस त्रास देऊं नये, हें सारें श्राद्ध-विधीच्या आणि पितृतर्पणाच्या चऱ्याच भागाचें गुह्य आहे. तेव्हां आजच्या निबंधापासून ही गोष्ट लक्षांत ठेवायाची कीं देवतात्वाचें पाहिलें पितृकत्व श्रेष्ठ मनुष्याकडे येतें; म्हणजे श्रेष्ठ मनुष्य देवता बनतो.

देवतोत्पत्ति.

तेविसाव्या अंकांत-प्रबल मनुष्य हयातींत असतां व मरणोत्तर देवतात्वाप्रत कसा पावतो, हें दाखविलें आहे. आज सामान्य प्रबल मनुष्याशिवाय दुसऱ्या कोणत्या प्रकारचे पुरुष जिवंत असतां व मेल्यावर देवाप्रमाणें गणले जातात, हें दाखवावयाचा आहे.

हा किंवा अशा प्रकारचे दुसरे लेख वाचतांना वाचकांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आजमित्तीस सुधारलेल्या राष्ट्रांतील अत्यंत बुद्धिवान् व सुशिक्षित मनुष्यांमध्यें परमेश्वराविषयीं जी कल्पना दृढ होऊन बसली आहे ती मनुष्यांच्या सर्व प्रकारच्या स्थितींत त्यांना असते, किंवा होती, असें निःसंशय करून देण्यास पुरावा नाहीं. उलट ही कल्पना हळूं हळूं आस्तित्वांत आली आहे, असें दाखविण्यास पुष्कळ प्रमाणें आहेत. जो अनादि, जो अनंत, जो सृष्टीचें आदिकारण, जो सर्वग व सर्वज्ञ, जो निर्गुण व निराकार, ज्याच्या इच्छामात्रेंकरून कोट्यावधि ब्रह्मांडें उत्पन्न होतात आणि लयास जातात; जो

मांशिअनचीं बक्षिसें.

सुधारकांत प्रसिद्ध झालेली बोधप्रद लेखमाला. किं.

सुधारक ऑफीस पुणें

सूक्ष्म वस्तूंहून सूक्ष्म व स्थूल वस्तूंहून स्थूल; जो अग्नीनें जळत नाहीं, शस्त्रानें तुटत नाहीं, वायूनें शोषत नाहीं आणि बुद्धीस ज्याचें खरें स्वरूप गम्य होण्याचा संभव नाहीं–अशा एका सृष्टिचालक जगदात्म्याची कल्पना मनुष्यास फार काळानें व पुष्कळ विचारांतर प्राप्त झाली आहे. व अजुनही ज्या देशांत व ज्या लोकांत जगदादिकारणाचें अशा प्रकारचें स्वरूप माहित्य झालें आहे, त्या देशांत व त्या लोकांतही अशा देवास देवाधिदेव किंवा अशा ईशास परमेश मानण्याचा प्रघात आहे. तात्पर्य काय कीं, जे आपणास एकेश्वरवादी म्हणवितात त्यांच्या मनांतून अद्यां अनेक देवतांची कल्पना अद्यापि समूळ नाहींशी झालेली नाहीं. विचारदृष्ट्या ज्यांना अशा प्रकारचें एकेश्वरी मत पसंत पडलें आहे, पण देशांतील अनेक देवतांवरील ज्यांचा भरंवसा उडलेला नाहीं, व मूर्तिपूजेचें वैरुप्य ज्यांच्या मनांत पूर्णपणें ठसलेलें नाहीं, ते असें म्हणतात कीं ज्या अनेक देवतांचें सामान्य लोक पूजार्चन व उपासना करतात त्या देवता मुख्य देवाच्या किंवा परमेश्वराच्या विभूति किंवा अंश होत. ज्याप्रमाणें नद्यांचें उदक परंपरेनें समुद्रास जाऊन मिळतें, त्याप्रमाणें अनेक देवतांची उपासना मुख्य देवाप्रत जाऊन पोहोंचते. यहुना चंचल मनास स्थैर्य उत्पन्न करण्यासाठीं निर्गुण परमेश्वराचीं हीं सगुण रूपें कल्पून त्यांची आराधना करण्याचा प्रघात पडला आहे. ही व्यवस्था मूढ जनासाठीं आहे पण ज्या मतांत दूषणीय असें कांहीं नाहीं त्या अर्थी विद्वानांनीं सुद्धां तिचें अवलंबन करण्यास कांहीं हरकत नाहीं. कदाचित् तसें न केलें तरी चालणार आहे; कारण खऱ्या ईश्वरज्ञानें ज्ञान त्यांना झालेलें असतें. पण तसें असलें तरी पूजेनें त्यांस कोणत्याही प्रकारचा कमीपणा येतो असें नाहीं. मनास प्रसन्न असेल तेव्हां निर्गुण परमेश्वराची आराधना करावी; त्याही कारणानें नी व्यग्र झाली असेल तेव्हां, किंवा सा-

मान्य लोकांस उदाहरण घालून द्यावयाचें असेल तेव्हां, नि परमेश्वराची एखादी सगुण मूर्ति पुढें ठेऊन तिची उपासना कर या प्रकारें विद्वानांनीं द्विप्रकारक उपासनाक्रम ठेविला अ अविद्वानांस चांगलें वळण लागत राहून विद्वानांची धर्मश्र क्षीण होण्याचा संभव राहणार नाहीं. अशा प्रकारचें मूर्तिपू मंडन अनेकांस नापसंत होऊन, त्यांनीं थेट निराकार परमे राशिवाय दुसऱ्या कोणासही भजावयाचें नाहीं, व अन्य तांच्या अंगीं देवतात्व मानायाचें नाहीं, असा निर्धार क तदनुरूप धर्मस्थापना करण्याचा यत्न केला आहे, पण अद्य तो कोणत्याही देशांत पूर्णपणें तडीस गेलेला नाहीं, असें म ण्यास अनेक आधार आहेत. ख्रिस्ती धर्मांत, मुसलमानी र्मांत, बौद्ध धर्मांत सारांश एकेश्वरीमतापर्यंत जाऊन धड ल्या कोणत्याही प्राचीन किंवा आर्वाचीन लोकांच्या ध कशा तरी प्रकारची मूर्तिपूजा अद्यापि थोडीबहूत तरी पडते ! तात्पर्य काय कीं, पुष्कळांचा विचार जरी निरा परमेश्वरापर्यंत जाऊन पोहोंचला आहे, तरी तो अद्यापि तितका दृढ झाला नसल्यामुळें, त्यांच्या धर्माचारांतून मूर्ति पुरतेपणीं निघत नाहीं ! यावरून काय सिद्ध होतें कीं, मनुष्य साकार देवाची कल्पना आधीं सुचते, आणि निराकार दे कल्पना मागून येते; अगोदर पुष्कळ देवतांवर विश्वास अ पुढें तो एकीवर गोळा होतो; प्रथम जड पूजाद्रव्यांनींच प्रसन्न करून घेतां येतील असें वाटत असतें. पुढें मान पूजा पुरे आहे असें वाटूं लागतें. सारांश, अनेकत्वानंतर त्वाची, स्थूलानंतर सूक्ष्माची, जडानंतर चिद्रूपाची, साका तर निराकाराची, इंद्रियगोचरानंतर अतींद्रियज्ञानाची, ग नंतर अव्यक्ताची, व गम्यानंतर अगम्याची कल्पना मनुष्य अधिकाधिक विकास पावत जाणाऱ्या बुद्धीस येणें, हेंच स्वाभाविक आहें. ज्याप्रमाणें लहानमोठ्या भोंकांच्या च

धान्य पुनः पुनः चाळलें असतां, अगदीं निवडक दाणे शेवटच्या चाळणींत राहतात; किंवा सोन्यारुप्याची अगदीं क तार काढावयाची असली तर ती एकाहून एक लहान भोंकांतून निघते, त्याप्रमाणें मनुष्याच्या विचाररूप चाळ-तेहतीस कोटी देव आणि त्यांविषयीं अगणित कल्पना ाँ वर्षें चाळण्यास घातल्या असल्यामुळें, त्याचा अखेर परि-असा झाला आहे कीं, तेहतीस कोटी देवता आणि त्या च्या वर्गाइतक्या त्याविषयीं कल्पना यापैकीं फक्त एकीशि-चाकीच्या साऱ्या चाळांत सांपडून गेल्या आहेत ! ज्या ची अशी दुर्दशा झाली नाहीं ती निर्गुणनिराकारादि विशेष-वर वर्णिलेली परमेश्वराची कल्पना होय. विचारवृद्धीबरो-ुष्यांच्या धर्मकल्पना जशा बदलत जातात तशा त्यांच्या ेषयक कल्पनाही फिरत जातात. पदार्थविज्ञान, रसायन, वनस्पतिशारीरक, प्राणिशारीरक, न्याय वगैरे सर्व शास्त्रांत फेरफार होत गेले आहेत. मनुष्यांची विचारशक्ति विकास पावलेली नसते तोंपर्यंत त्यांस कार्यकारणांचा क निश्चय करतां येत नाहीं. कोणत्याही दोन संलग्न र्वोत्तर गोष्टींपैकीं पहिलीस दुसरीचें कारण आणि दुसरीस चें कार्य, असें मानण्याची त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति , पालीचें कुचकुचणें, घुबडांचें रडणें, मांजरांचें आडवें वेधवांचें दर्शन होणें, ताऱ्यांचें पडणें, चंद्राभोंवतीं खळें इंद्रधनुष्य दिसणें वगैरे गोष्टीं अनिष्टत्व, आणि स्वप्नांत सणें, सवत्स स्त्री किंवा गाय समोर येणें, भारद्वाजाचें होणें, व्यक्तिभेदाप्रमाणें उजवा किंवा डावा डोळा लवणें, आकस्मिक येणें आणि त्याचवेळीं येणाराचें नांव नि-सणें वगैरे गोष्टींचें इष्टत्व–हीं मोठ्या विचारानें स्थापित आहेत, असें कोणासही म्हणता येणार नाहीं. तथापि सर्व च्या अज्ञान लोकांत अशा प्रकारचे चांगलेवाईट मह

विशेष स्थितींत होत असतात, आणि अनेक वर्षें त्यांचा अंमल चालत असतो. अशा प्रकारचे खोटें कार्य-कारणसंबंध नाहींसे होऊन त्यांच्या जागीं खरे संबंध स्थापित होणें हें ज्ञानवृद्धीचें फल होय. **न्यूटननें** यच्चावत् परमाणूंस लागणारा गुरुत्वाकर्षणाचा धर्म स्थापित केल्याबरोबर सर्व ज्योतिःशास्त्रावर एकदम उजेड पडल्यासारखा झाला. घन, द्रव, आणि वायु या तिन्ही स्थिति प्रत्येक जड पदार्थास भार आणि शीतोष्ण यांच्या योगानें आणितां येणार आहेत, येवढा सिद्धांत प्रस्थापित झाल्यापासून पदार्थविज्ञानांत केवढी क्रांति झाली आहे ? रसशोषक असे एक प्रकारचे अत्यंत सूक्ष्म कोष प्रत्येक वनस्पतींचे प्राण्याचे आद्य घटक आहेत, असें दिसून आल्यापासून वनस्पतिशारीरकांत व प्राणिशारीरकांत केवढा फेरफार झाला आणि आपल्या जुन्या वैद्यांनीं सर्व रोगांची कारणें त्रिदोषांपासून उत्पन्न होतात, असें सिद्ध करण्याचा केलेला प्रयत्नही अशा प्रकारचाच होता. या सर्व उदाहरणांवरून काय दिसतें कीं, प्रत्येक शास्त्रांत कारणें निश्चित करून त्यांचीं संख्या होईल तितकी कमी करावी, व त्यांपासून पुढील सर्व कार्यें ठरीव नियमाप्रमाणें घडून येतात, असें स्थापित करावें—अशा व्यासंगी मनुष्यांची बुद्धि आज हजारों वर्षें गढून गेली आहे; अशा या परिश्रमाचें फळ जसें इतर विषयांत तसें धर्माविषयांतही दिसून आलें आहे. ज्याप्रमाणें अलीकडे जड सृष्टीच्या शास्त्रीय वि

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र,

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रु

' संदेश ' एजंट, पुणें सिटी

गुरुत्वाकर्षण ठाम होऊन गेलें आहे, त्याप्रमाणें धर्मविचा-
सर्व शक्तिमान् व सर्वज्ञ अशा एका परमेश्वराची कल्पना
होऊन गेली आहे किंवा जात आहे.

यावरून असें दिसून येईल कीं, अनादि कालापासून मनुष्य-
स अशा प्रकारच्या ईशशक्तीचें यथार्थ ज्ञान आहे, असें
नेक श्रद्धालूंचें फार जुनें व आग्रहाचें म्हणणें आहे तें
र नाहीं. मनुष्यांनीं निरनिराळ्या स्थितींत अनेक प्रका-
देवतांवर भरंवसा ठेविला आहे, आणि सर्वज्ञ व सर्वशक्ति-
परमेश्वराची जी कल्पना त्यांनीं केली आहे, ती अखेरची

ही कल्पना त्यांच्या मनांत येण्यापूर्वी ज्या अनेक देव-
ते भजत होते त्यांपैकी कांहींची कल्पना त्यांना पराक्रमी
पासून करतां आली. या पराक्रमी पुरुषांत पूर्वकाळीं राजे

विशेष पराक्रमी असत. रानटी लोकांचें धुरीणत्व किंवा
त्व ज्याच्या अंगीं असाधारण धैर्य, निश्चय, चातुर्य, व
त्व असतें त्यासच प्राप्त होऊं शकतें. यामुळें, व एकदां
द प्राप्त होऊन बरीच सत्ता हातीं आल्यामुळें, अशा
तिला राजा इतरापेक्षां हरएक गुणांनीं फारच मोठा दिसूं
ो. असें होऊन एकदां एका पक्षास प्रतिष्ठा मिरविण्याची,

दुसऱ्या पक्षास लीनतेनें वागण्याची,
लागली म्हणजे पहिला पक्ष कोणत्या गुणास हक्क सांगेल,
रा कोणत्या प्रकारच्या दास्याचरणास तयार होईल, हें
ा येणार नाहीं. अज्ञान, अविचारी, व भेकड लोकांनीं
मातापितरांहून अधिक मान द्यावा यांत कांहींच नवल

आजमितीस युरोपांतील सुधारलेल्या कांहीं देशांत
प्रकार घडत आहे. राजास मातापितराहूनका मान देणें
न लोकांच्या राजनिष्ठेचें अगदीं पहिलें कलम होय!
त्यांची मजल फार जाते. अज्ञान लोक आणि स्वार्थ-
तुतिपाठक राजासारख्या अद्वितीय व्यक्तीची स्तुति करूं

लागले म्हणजे कोठपर्यंत जातील, हें सहसा सांगतां येणा
नाहीं. हे लोक राजास देवाचा अंश, देवाचा मुलगा, देवाच
लाडका आप्त, देवाचा पिता, आणि साक्षात् देव करून टाकतात
राजा पाऊस पाडतो, राजा विजा चमकवितो, राजा समु
आटवितो, राजा चंद्रसूर्यांस ग्रहण लावतो, राजा रोगांच्य
साथी आणतो आणि त्या नाहींशा करतो; राज
सांगेल तें केलें पाहिजे व मागेल तें दिलें पाहिजे
राजाबरोबर सती जाणें यांतच जीवितसाफल्य व परमार्थसाध
आहे; राजासाठीं आत्महत्या करून घेतली असतां देवयोनि प्रा
होऊन स्वर्गलोकीं देवसमुदायांत देवांगनांबरोबर निरंतर विहा
करतां येतो, व अमृतसेवनानें अमरत्व संपादितां येतें—अश
प्रकारच्या विलक्षण कल्पना अल्प काळांत रूढ होऊन जातात
जिवंतपणीं राजास नवस करूं लागतात; त्याच्या दर्शनास ये
लागतात; रोग दूर होण्यासाठीं त्याच्या पादांघ्रिस्पर्शाविषयीं
तुर होतात; त्याला कौल लावतात; त्याला देवऋषी समजत
आणि त्याचें स्नानोदक तीर्थ समजून शुद्ध होण्यासाठीं तें प्रा
करण्याविषयीं उत्कंठ होतात! जिवंत राजाविषयीं अशा कल्
झाल्या असल्या, आणि त्यांतल्या त्यांत तो बराच परा
असला म्हणजे मग तो मेल्यावर त्याला किती भ्यावें, त्याविष
आपली दृढ निष्ठा प्रदर्शित करण्याबद्दल काय कर
आणि त्याला किती भजावें, असें मुग्ध लोकांस हो
जातें! त्यांच्या समजुतीप्रमाणें जो जिवंतपणींच देव अस
तो मरणोत्तर महादेव होतो! मग काय विचारता? जि
राजापेक्षां मेलेल्या राजाची विशेष आराधना करण्याचा प्र
पडूं लागतो! वरिष्ठ योनिप्रत पावलेल्या राजांचीं देवळें च
लींच पाहिजेत; प्रत्येक दिवशीं त्यांची पूजा करून त्यांस नै
अर्पण केलेच पाहिजेत; कोणतेही महत्कृत्य करणें झालें
त्यांचें स्मरण केलेंच पाहिजे; विवाहादि मंगलकार्यें निर्वि

ाडीस जाण्यासाठीं त्यांची प्रार्थना करून त्यांस खुष राखण्या-
ाठीं आपल्या समजुतीप्रमाणें मनुष्याचे, जनावराचे, शिजवि-
ल्या अन्नाचें, किंवा कोरड्या धान्याचे आणि नारळाचे तरी
ळी दिलेच पाहिजेत; सारांश कोणतेंहीं महत्कृत्य करावयाचें
ालें तरी अशारीतीनें अस्तित्वांत आलेल्या देवांचें साहाय्य
ागितल्याशिवाय व त्यांची प्रार्थना केल्याशिवाय तें करूं लाग-
ाचा संभव नाहींसा होतो ! पुढें जों जों श्रद्धा अधिकाधिक
त जाते तों तों बारिक सारिक गोष्टींतही देवाचें स्मरण व चिं-
न करण्याचा प्रघात पडूं लागतो. निजतांना, उठतांना, बस-
ांना, जेवतांना, ढेकर आली असतां, शिंक आली असतां
ोंभई आली असतां, पायांटें पडलें तर, कांस सुटली तर, ठेंच,
ागली तर, मुलें उपजल्यावर, स्त्रिया उपवर झाल्यावर, लहान
वा थोर पुरुष अथवा स्त्री मेल्यावर, शेताची कापणी करणें झा-
ल्यास, मुलास पाटीवर बसाविणें झाल्यास, घरांतून बाहेर पडावयाचें
ालसल्यास-सारांश कांहींही झालें असतां किंवा करावयाचें अस-
ल त्या भाविकाला देवास नमस्कार करून त्याची कृपा संपा-
दिल्याखेरीज पाऊल टाकण्याचा सोय नाहींशी होते ! अशा प्र-
कारच्या देवांच्या प्रकृतींत आणि मनुष्याच्या प्रकृतींत क्षण
भरसुद्धां अंतर नसतें ! मनुष्यास सुख दुःख होत असतें, का-
मक्रोधादि वासनांचा मनुष्याप्रमाणें त्यांचेठाईंही वास असतो.
मनुष्याप्रमाणें तेही युद्धें करतात, स्त्रीआसक्त असतात, विश्वासघात
करतात, खून करतात, ऐषआराम भोगतात, सोमरस पितात,
मद्यें नेसतात. नथा घालतात; दुखणेकरी होतात, वैद्याचे घरीं
जातात आणि काढे घेतात; त्यांना जखमा लागतात; आणि
मार असुन कधीं कधीं ते मरतात, किंवा निजधामास जातात !
कांहीं कांहीं उदार, कांहीं परोकारी, कांही दांडगे, कांहीं क्रूर,
कांहीं खोडकर, कांहीं 'शिनळ' कांहीं एकस्त्रीव्रत, कांहीं बहुपत्नीक,
कांहीं दासीपुत्र आणि कांहीं कोष्टी, सोनार, सुतार, शिल्पी, चितारी,

गवयी, झाडू, मोतद्दार, गाडीवान व बागवान असतात ! सारां ज्याप्रमाणें या मर्त्य लोकांत त्याप्रमाणें देवलोकांत थाट आहे कांहीं कमी नाहीं ! आणि कां कमी असेल ? या आमच्य पृथ्वीवरचेच प्रबल पुरुष, राजे, वैद्य, सुवर्णकार, चित्रका शिल्पज्ञ, विद्वान, योद्धे, भविष्यज्ञ, हेच मरणोत्तर देव होऊ जात असल्यामुळें त्यांनीं आपला ऐहिक स्वभाव किंवा प्रकृ सर्वथैव टाकावी हें कांहीं संभवत नाहीं; किंवा तसें करणेंही शक्य असलें तरी ज्या आह्मीं अत्रस्थ मर्त्यांनीं त्यांच्या आयुष्यक्र माची कल्पना करावयाची त्या आह्मीं आमच्या इंद्रियांचे मनाचे जे धर्म आहेत त्यांच्या बाहेर कसें जावें ? आमच्य देवांच्या आणि महादेवांच्या कल्पना, आमचे आचार, आम विकार, आणि आमचे विचार यांवरच अवलंबून असल्या पाहि जेत. कल्पनातुरगावर आरोहण करून तिला कितीही भरधा सोडिली तरी आंतर्बाह्येंद्रियविषयांस सोडून ती कोठें जाणार ज्ञानेंद्रियांनीं व कर्मेंद्रियांनीं ज्या विषयांचें ज्ञान होतें त्या विषय पैकीं लहानांस थोर करणें, तुटलेल्यांस जोडणें, दूरांस जवळ क कुरूपांस सुरूप व सुरूपांस कुरूप करणें, सचेतनांचा व अ तनांचा अन्योन्यांशीं किंवा ज्यांचा त्यांशी मिलाफ करून न तिरस्करणीय किंवा रमणीय सृष्टि निर्माण करणें हें काय कल्पनेचें काम होय. कल्पना झाली तरी फक्त इंद्रियांच्य द्वारें ज्या विषयांचें ज्ञान होत असतें त्यांच्या बाहेर जाऊं श नाहीं. तिनें पाहिजे तेवढी घडामोड करावी; पण नवीन वि उत्पन्न करणें हें तिचें काम नव्हे. सारांश, धार्मिक लोक पा

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांचीं निर्भीड च करणारें महाराष्ट्रांतील एकटेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १०

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी

ं म्हणोत, आमच्या देवता येथील प्रबल पुरुषांच्या, राजांच्या
धांच्या, कारागिरांच्या, किंवा योद्धयांच्या कल्पनेनें काढलेल्या
ूलाहून कदाचित् कांहींशा श्रेष्ठ अशा प्रतिमा आहेत, व अशा
तिमा काढण्याची संवय तिला लागण्यास मनुष्यांतील स्वकुलां
लि पूर्वजपूजेचा प्रघात कारण झाला आहे, असें कबूल करणें
ाग=आहे. आणि म्हणून सर्व धर्मकल्पनांच्या आणि देवतांच्या
ळास स्थूलमानानें पूर्वजपूजा आहे, असें म्हटल्याशिवाय
ोणाही विचारी पुरुषास राहवणार नाहीं.

अथ आचारप्रकरणं.

पूर्ण एकांताशिवाय स्वेच्छाचार नाहीं. दोन मनुष्य एकत्र
ले कीं एकानें दुसऱ्याशीं कसें वागावें, असा प्रश्न उत्पन्न
तो; आणि ह्या दोहोंत ज्या प्रकारचा संबंध असेल तदनुसार
चें एकमेकाशीं वर्तन होतें. पण कसेंही झालें तरी मनुष्य ए-
ा असतां तो ज्याप्रमाणें वागूं शकेल त्याप्रमाणें त्याला दुस-
समक्ष कधींही वागतां येत नाहीं. दुसऱ्याच्या सानिध्यामुळें
वर्तनांत जो भेद करावा लागतो, त्यास येथें सामान्यपणें आ-
र किंवा आचारपद्धती म्हटलें तरी चालेल. समाजांत अनेक
गरच्या व्यक्तींशीं व्यवहार करावयाचा असल्यामुळें, या आ-
रपद्धतीस विलक्षण प्रकारचें बहुविधत्व आलें आहे. राजाप्रजा;
पत्नी; बहिणभाऊ; स्वामिसेवक; गुरुशिष्य; आज्ञाअनुयायी;
ेकाधिकेता; अनुकनिष्ठ—असे समाजघटकांत अनेक प्रकारचे
ध असतात; आणि यासंबंधानुरोधानें स्थापित झालेल्या
चारनियमांप्रमाणें आजपर्यंत एकाचें दुसऱ्याशीं वर्तन
आलें आहे. हे आचारनियम केवळ चिरस्थाई

असतात असें नाहीं. देशकालमानाप्रमाणें त्यांत फ़ेरफार हो जातात तथापि ते कशातरी प्रकारचे असल्याखेरीज कोणतीही समाज चालावयाचा नाहीं. समाज म्हणजे एकाहून अधिक व्यक्तींचा समुदाय. असा समुदाय चालू राहण्यास्तव त्याच्या घट कांचें अन्योन्यांशीं जें वर्तन व्हावयाचें त्याचे कसले तरी नि यम असलेच पाहिजेत. अशा नियमांशिवाय समाजाची कल्प नाच अशक्य आहे. हें म्हणणें केवळ मनुष्यसमुदायासच ला आहे असें नाहीं. मनुष्याहून बुद्धीनें, शरीरानें, व सामर्थ्या बऱ्याच अंशीं कमी अशा समाज करून राहणाऱ्या चतुष्पाद पक्षांत, व सूक्ष्म कीटकांत सुद्धां हे आचारनियम दिसून येता श्रेष्ठाला वचकणें, बरोबरीच्यांशीं सामना करणें, कनिष्ठावर चा लून जाणें, आवडत्याला कुरवाळणें, संकटावस्थेंत शरण जा व कोणी उपकार केला असतां कृतज्ञता प्रदर्शित करणें— आचाराचे प्रकार खालच्या प्रतीच्या प्राण्यांतसुद्धां कमी अधि प्रमाणानें सांपडतात हें सर्वांस ठाऊक असेलच. तेव्हां ते म नुष्यसमाजांत सांपडतात, यांत कांहीं नवल नाहीं. ज्याप्रमाणें सल्यातरी दोऱ्याशिवाय निरनिराळे मणि एकत्र होऊन ह व्हावयाची नाहीं, त्याप्रमा कसल्यातरी समाजबंधनांशिवा साज चालावयाचा नाहीं. कशा तरी प्रकारची समाजाचार नें स्थापित झाल्यानंतर त्यांपासून समाजास विशेष वळण णारीं धर्मबंधनें व राज्यबंधनें उत्पन्न होतात, व या तिहींनीं ळून समाजास पुष्कळच घळकटी येते. म्हणून धर्मबंधनांशि किंवा राज्यबंधनांशिवाय वेडावाकडा होऊन अस्तित्वांत याव पा नाहीं असें नाहीं. आफ्रिका, अमेरिका, व ऑस्ट्रेलिआ च्या कांहीं भागांत असे समाज पहाण्यांत आले आहेत त्यांत सामान्य आचारबंधनांशिवाय समाजघटकांस एकत्र ण्यास दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचीं बंधनें नाहींत. जुन्या रा राहणाऱ्या आम्हा जुन्या लोकांचा अशी समजूत आहे की

ाजिक, धार्मिक, व राजकीय या तीन प्रकारच्या बंधनांशिवाय माजघटना होऊं शकणारच नाहीं. पण ही आमची चूक आहे. यांना कोणत्याही प्रकारचे धर्माचार आणि राज्याचार बिलकुल ऊक नाहींत, असें या क्षणीं पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ रानटी क आहेत. पण हें मात्र खरें आहे कीं, ज्या समाजांत धर्मबंधनें राज्यबंधनें दिसूं लागलीं आहेत, त्या समाजांत आचारबंधनें सत नाहींत, असें मात्र कधींहि होत नाहीं. ' यत्र यत्र धूमः म तत्र वन्हिः ' या न्यायाप्रमाणें जेथें धर्म व राज्य दृष्टीस नात, त्या ठिकाणीं सामाजिक आचारपद्धति दृष्टीस पडलीच हिजे. परंतु ज्याप्रमाणे अग्नि असेल तेथें धूर असलाच पाहिजे ें म्हणतां येणार नाहीं, त्याप्रमाणें सामाजिक आचारपद्धति-पित झाली असेल तेथें धर्म आणि राज्य या संस्था अस्ति-त आल्या असल्याच पाहिजेत असें म्हणतां येणार नाहीं. ाशिवाय आईबापें असतील, पण जनकजननाशिवाय संतानो-ीचा संभव नाहीं, धर्माचार आणि राज्याचार यांचा सामान्य ारांपासून उत्पत्ति होते, आणे ज्याप्रमाणें सृष्ट्यनुक्रमानु-नें प्राण्यांच्या जाती होत असतां, ज्यांच्या शरीरांत पृष्ठवं-य (पाठीचा कणा) अस्तित्वांत आणण्यासारखे पदार्थ ात त्यांस कमलींहि रूपें येत गेलीं तरी, त्यांत पाठीचा क-ा दृष्टीस पडावयाचाच असे मासे, साप, पाखरें, व गायी वगैरे प्राण्यांच्या शरीररचनेंवरून स्पष्ट दिसतें, त्याप्रमाणें जास कोणत्याहि प्रकारचीं स्थित्यंतरें प्राप्त झालीं तरी त्यांत ाजिक आचारांची छाया पडल्याशिवाय रहात नाहीं. ामाजिक आचाराहून आद्यतर किंवा पुराणतर असा दु-कोणताही आचार नाहीं; व यांपासून उत्पन्न झालेले इतर ार कितीहि मंदावत किंवा क्षीण होत गेले तरी सामाजिक ार नाहींसे होत जाण्याचा संभव नाहीं. उलट यापासून ेल्या आचारांस क्षीणता येत जाईल तसतशी यांची वृ-

द्धिच होत जाण्याचा संभव आहे; आणि आजपर्यंत असेंच होत आलें आहे. समाजास जसजशी उन्नतावस्था येत जाते, तसतशी त्यांतील धर्माचारांस आणि राज्याचारांस शिथिलता येत जाते; हें अनेक देशांच्या व समाजांच्या इतिहासांवरून सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे. पण कोणत्याही देशाच्या इतिहासावरून असें दाखवितां येणार नाहीं कीं, धर्माचार आणि राज्याचार शिथिल होत गेले म्हणून त्यांच्याबरोबर सामाजिक आचारांचीहि तीच वाट झाली. फार झालें तर येवढेंच दाखवितां येईल कीं, ज्ञानवृद्धीनें व ज्ञानप्रसारानें कोणत्याही समाजास उन्नतावस्था प्राप्त होऊन त्यांतील वेडेपणाच्या धर्माचारांचा व राज्याचारांचा लोप होत चालला, तर त्याबरोबर सामाजिक आचारांस सुस्वरूप येऊं लागतें. व ते विशेष सभ्य आणि सुखावह असे होतात.

मनुष्यांची वन्यावस्था सुटत जाऊन त्यांची सुधारणा होऊं लागणें म्हणजेच त्यांमध्यें धर्म आणि राज्य या संस्थांची स्थापना होणें होय. या संस्थांची प्रथमावस्था केवळ आचारमय असते; म्हणजे मनुष्यांच्या आद्य धर्मपद्धतींत व राज्यपद्धतींत विवक्षित आचारांशिवाय दुसरें कांहीं नसतें. समाजांत जो पुरुष चातुर्यानें, धैर्यानें, व शरीरसामर्थ्यानें इतरांहून श्रेष्ठ असतो तो प्रथम त्यांचा राजा होतो, आणि पुढें देव होतो, हें मागें एकदां सांगितलेंच आहे. अशा रीतीनें राजत्वाप्रत व देवत्वाप्रत पावलेल्या व्यक्तीच्या हयातींत किंवा त्याच्या मरणोत्तर त्याशी वागण्याच्या ज्या पद्धति त्यास राज्याचार व धर्माचार म्हणतात. अनेक युगें जो राजा असतो तोच देव असतो, पण कालांतराने

राजेपणापासून देवपण वेगळें होतें, आणि राजपूजा व देवपूजा निराळ्या होतात. परंतु प्रथम राजत्व आणि देवत्व एकाच व्यक्तींत असल्यामुळें, तीं निराळीं झाली तरी राजास आणि देवास भजण्याच्या पद्धति किंवा आचार एकसारखेच असतात. ज्याप्रमाणें राजाला राजवाडा त्याप्रमाणें देवाला देऊळ; राजाला वंदन त्याप्रमाणें देवाला वंदन; राजाला करभार द्यावयाचा; तसा देवाला करभार द्यावयाचा; शेतांतील उत्पन्नाचा पहिला भाग ज्याप्रमाणें राजपदीं अर्पण करावयाचा त्याप्रमाणें तो देवपदीं अर्पण करावयाचा; राजाला चोपदार तसे देवाला चोपदार, राजाला पालखी तशी देवाला पालखी; राजाला मुकूट, दागिने चौऱ्या, तसें देवालाही; राजाभोंवतीं मंत्रिगण तसा देवाभोंवतीं पूजकगण; ज्याप्रमाणें राजास स्तुतिपाठक असावयाचे त्याप्रमाणें देवासही असावयाचे ज्याप्रमाणें; राजाच्या संतोषासाठीं बळी पडण्याची हौस त्याप्रमाणें देवाच्या संतोषासाठींही प्राणत्याग करण्याची हौस:—सारांश, पूर्वावस्थेंतील मनुष्यें राज आणि देव यांच्यांत फारसा भेद समजत नाहींत, आणि ह्मणून त्यासंबंधानें त्यांचें जें वर्तन असतें त्यांतही फारसा भेद असत नाहीं. राजांच्या स्वाऱ्यांचा थाट आणि देवांचे छबिने यांत ह्मणण्यासारखा भेद दिसत नाहीं. वाद्यें वाजताहेत, भाट गुण गाताहेत, लोक नमस्कार घालताहेत, घायकी खिडक्यांतून लाह्या व रेवड्या फेंकताहेत-वगैरे प्रकार-ज्याप्रमाणें राजाची स्वारी निघाली असतां होतात, त्याप्रमाणें कोणत्याही देवाची पालखी निघाली असतां होतात; आणि हा प्रकार ज्याप्रमाणें या देशांत दृष्टीस पडतो, त्याप्रमाणें याच्याच तोडीचे जे जपान, चीन, तुर्कस्थान वगैरे देश आहेत त्यांतही दृष्टीस पडतो, आणि पूर्वी ग्रीस, इताली, स्पेन, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतही दृष्टीस पडत असे, अर्थात् देशपरत्वें राजास आणि देवास पूज्यता दाखविण्याची ही

पद्धति किंचित् निराळी असते व आहे, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं , पण सर्वत्र तिचें तत्व एकच आहे. ज्याप्रमाणें देवाच्या देवळांत पाहिजे त्याला प्रवेश करण्याची परवानगी नाहीं त्याप्रमाणें राजवाड्यांतही पाहिजे त्याचा प्रवेश होण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें देव गुरवांच्या ताब्यांत, त्याप्रमाणें राजा मंत्र्यांच्या ताब्यांत. अद्यापि कित्येक ठिकाणीं कांहीं राजे आहेत ते असे कीं त्यांचें दर्शन लोकांस सहसा व्हावयाचें नाहीं. आमच्या इकडील पडद्यानशीन स्त्रियांप्रमाणें आफ्रिकेंतील कांहीं राजे पडद्याच्या आड बसून , किंवा जुन्या शिवालयाच्या गाभाऱ्या-सारख्या एखाद्या आंधाऱ्या कोठडींत आपणास कोंडून घेऊन, तेथून भेटण्यास आलेल्या लोकांशीं मंदस्वरानें स्वतः किंवा दुभाषाच्या द्वारें थोडेंसे बोलतात ! देवळांत गेलें असतां देवास जी प्रार्थना करावयाची असेल ती साष्टांग प्रणीपात केल्या-शिवाय जशी करण्याची सोय नाहीं , त्याप्रमाणें पूर्वपद्धतीच्या राजास भेटण्यास गेलें असतां जमीनीपर्यंत लवून दहापाच मुजरे ठोकल्याशिवाय आणि गुडघे टेंकून तोंडाला पदर लावि-ल्याशिवाय ' त्र ' काढण्याची सोय नाहीं ! जीं जाड प्रकरणें असतात त्यांना मर्त्यांस स्वतः उत्तर देण्यांत कमीपणा वाटत असल्यामुळें, भेटणाऱ्यानें दुभाषाकडे तोंड करून बोलावें, त्यानें ' जी जी ' करीत ' सरकाराकडे ' तोंड करून त्याचा प्रतिध्वनि उठवावा, आणि मग सरकारांनीं तोंडांतल्या तोंडांत कांहींतरी गुरमुळावें, आणि मग दुभाषेच्योवांनीं त्यांतील धरवतील तेवढे शब्द व वाक्यें धरून तीं भेटीस आलेल्या गृहस्थांपुढें वठवावी ! ही राजेपणाची ऐट आणि हा राजकीय आचारांचा थाट ! यांचेंच अनुकरण राजाच्या सरदारांनीं आपल्या खालच्या लोकांशीं, आणि त्यांनीं त्यांहून खालच्या लोकांशीं करावयाचें निकडे धर्मसंबंधानेंही तसाच प्रकार. जो कोणी धर्मगुरु किंवा शंकराचार्य, किंवा परमहंस असेल तो एखाद्या देवतेचा कायते

राजेपणापासून देवपण वेगळें होतें, आणि राजपूजा व देवपूजा निराळ्या होतात. परंतु प्रथम राजत्व आणि देवत्व एकाच व्यक्तींस असल्यामुळें, तीं निराळीं झाली तरी राजास आणि देवास भजण्याच्या पद्धति किंवा आचार एकसारखेच असतात. ज्याप्रमाणें राजाला राजवाडा त्याप्रमाणें देवाला देऊळ; राजाला वंदन त्याप्रमाणें देवाला वंदन; राजाला करभार द्यावयाचा; तसा देवाला करभार द्यावयाचा; शेतांतील उत्पन्नाचा पहिला भाग ज्याप्रमाणें राजपदीं अर्पण करावयाचा त्याप्रमाणें तो देवपदीं अर्पण करावयाचा; राजाला चोपदार तसे देवाला चोपदार, राजाला पालखी तशी देवाला पालखी; राजाला मुकूट, दागिने चौऱ्या, तसें देवालाही; राजाभोंवतीं मंत्रिगण तसा देवाभोंवतीं पूजकगण; ज्याप्रमाणें राजास स्तुतिपाठक असावयाचे त्याप्रमाणें देवासही असावयाचे ज्याप्रमाणें; राजाच्या संतोषासाठीं बळी पडण्याची हौस त्याप्रमाणें देवाच्या संतोषासाठींही माणसें त्याग करण्याची हौस:—सारांश, पूर्वावस्थेंतील मनुष्यें राज आणि देव यांच्यांत फारसा भेद समजत नाहींत, आणि म्हणून त्यासंबंधानें त्यांचें जें वर्तन असेंत त्यांतही फारसा भेद असत नाहीं. राजांच्या स्वाऱ्यांचा थाट आणि देवांचे छबिने यांत म्हणण्यासारखा भेद दिसत नाहीं. वाद्ये वाजताहेत, भाट गुण गाताहेत, लोक नमस्कार घालताहेत गायका खिडक्यांतून लाह्या व रेवड्या फेंकताहेत-वगैरे प्रकार-ज्याप्रमाणें राजाची स्वारी निघाली असतां होतात, त्याप्रमाणें कोणत्याही देवाची पालखी निघाली असतां होतात; आणि हा प्रकार ज्याप्रमाणें या देशांत दृष्टीस पडतो, त्याप्रमाणें याच्याच लोंढीचे जे जपान, चीन, तुर्कस्थान वगैरे देश आहेत त्यांतही दृष्टीस पडतो, आणि पूर्वी ग्रीस, इताली, स्पेन, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतही दृष्टीस पडत असे, अर्थात् देशपरत्वें राजास आणि देवास पूज्यता दाखविण्याची ही

पद्धति किंचित् निराळी असते व आहे, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं , पण सर्वत्र तिचें तत्व एकच आहे. ज्याप्रमाणें देवाच्या देवळांत पाहिजे त्याला प्रवेश करण्याची परवानगी नाहीं त्याप्रमाणें राजवाडयांतही पाहिजे त्याचा प्रवेश होण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें देव गुरवांच्या ताब्यांत, त्याप्रमाणें राजा मंत्र्यांच्या ताब्यांत. अद्यापि कित्येक ठिकाणीं कांहीं राजे आहेत ते असे कीं त्यांचें दर्शन लोकांस सहसा व्हावयाचें नाहीं. आमच्या इकडील पडद्यानशीन स्त्रियांप्रमाणें आफ्रिकेंतील कांहीं राजे पडद्याच्या आड बसून , किंवा जुन्या शिवालयाच्या गाभाऱ्या-सारख्या एखाद्या आंधाऱ्या कोठडींत आपणास कोंडून घेऊन, तेथून भेटण्यास आलेल्या लोकांशीं मंदस्वरानें स्वतः किंवा दुभाषाच्या द्वारें थोडेंसे बोलतात । देवळांत गेलें असतां देवास जी प्रार्थना करावयाची असेल ती साष्टांग प्रणीपात केल्या-शिवाय जशी करण्याची सोय नाहीं , त्याप्रमाणें पूर्वपद्धतीच्या राजास भेटण्यास गेलें असतां जमीनीपर्यंत लवून दहापाच मुजरे ठोकल्याशिवाय आणि गुडघे टेंकून तोंडाला पदर लावि-ल्याशिवाय ' ब्र ' काढण्याची सोय नाहीं । जीं जाड प्रकरणें असतात त्यांना मत्र्यांस स्वतः उत्तर देण्यांत कमीपणा वाटत असल्यामुळें, भेटणाऱ्यानें दुभाषाकडे तोंड करून बोलावें, त्यानें ' जी जी ' करीत ' सरकाराकडे ' तोंड करून त्याचा प्रतिध्वनि उठवावा, आणि मग सरकारांनीं तोंडांतल्या तोंडांत कांहींतरी गुरमुळावें, आणि मग दुभाषेबोवांनीं त्यांतील धरवतील तेवढे शब्द व वाक्यें धरून तीं भेटीस आलेल्या गृहस्थांपुढें वठवावी ! ही राजेपणाची ऐट आणि हा राजकीय आचारांचा थाट ! यांचेंच अनुकरण राजाच्या सरदारांनीं आपल्या खालच्या लोकांशीं, आणि त्यांनीं त्यांहून खालच्या लोकांशीं करावयाचें ! तिकडे धर्मसंबंधानेंही तसाच प्रकार. जो कोणी धर्मगुरु किंवा शंकराचार्य, किंवा परमहंस असेल तो एखाद्या देवतेचा कायमचा

दास; इतरांस तो साक्षात् देव आणि अशी अधिकारपरंपरा पंचांगसांग्या गांवजोशापर्यंत किंवा श्राद्धभटापर्यंत असावयाची !

अशा प्रकारें राज्य आणि धर्म या संस्थांच्या पूर्वावस्थेंत आचारांस कायतें प्राधान्य असतें. जो त्याप्रमाणें वागेल तो राजनिष्ठ आणि धर्मनिष्ठ, आणि त्यावरच राजा आणि देव प्रसन्न ! ज्याचें तदनुसार वर्तन नसेल त्यास जबर दंड ! ज्यांनीं एकदोन पिढ्यांच्या मागील राजदरबारें पाहिली असतील, त्यांना वरील लेखांत किती तथ्य आहे, हें दिसून येणार आहे. धर्मसंबंधीं या प्रकारची यातायात जे आमच्यासारखे पाश्चिमात्य शिक्षणानें बरेच निगरगट्ट झाले आहेत त्यांना फारशी पीडा देत नाहीं; पण जे पहिल्या पद्धतीचे आहेत त्यांचा श्रावणीसारख्या कवायतीपासून होणारा जाच अद्याप चिलकुल कमी झालेला नाहीं, व त्यांस तो 'जाच' असें वाटतही नाहीं ! येथल्याप्रमाणेंच पूर्वी युरोपियन लोकांतहीं धर्माचारांची अशीच गर्दी व सक्ती असे; आणि आतांही आफ्रिकेंतील व अमेरिकेंतील कांहीं अर्धवट सुधारलेल्या लोकांत ती दृष्टीस पडते. हावई बेटांत टाबू नांवाचा उत्सव कांहीं दिवस होत असतो. त्या प्रसंगीं पुढें लिहिल्याप्रमाणें व्यवस्था होत असते.

"हा उत्सव सुरू असतां या बेटांत किंवा त्याच्या आसमंतांतील प्रदेशांत कोठेंही चूल पेटविण्याची किंवा दिवा लावण्याची सक्त मनाई असते. तसेंच कोणीही पाण्यांत होडी घालतां कामा नये, किंवा स्नान करतां कामा नये, असा प्रतिबंध असतो. तसेंच ज्या मनुष्यास देवळांत जावयाचें असेल त्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही मनुष्यास आपल्या घराच्या दाराबाहेर पडण्याची मनाई असते. तसेंच कोठेंही कुत्रें भोंकतां कामां नये, कीं डुकर डुरकतां कामां नये, कीं कोंबडा आरवतां कामां नये असा प्रतिबंध असतो. याप्रसंगीं या बेटांतील लोक कुत्र्यांचीं आणि डुकरांचीं तोंडें बांधतात, आणि कोंबड्यां वगैरे घरगुती पा-

त्यांच्या बुद्धीस भ्रंश होऊन " इतोभ्रष्टस्ततोभ्रष्टः " अशी त्यांची स्थिती होते, आणि तीमुळें समाजांत अनवस्था उत्पन्न होऊन त्याचें फार नुकसान होतें. आमच्या मतें या आक्षेपांत बराच अर्थ आहे. पण तेवढ्यावरून तो निरुत्तर आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. एक तर हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, एक स्थिति जाऊन दुसरी स्थिति येण्यापूर्वी जो काळ जातो त्यांत विशेष अव्यवस्था दृष्टीस पडणें हें साहजिक आहे. तसेंच हेंही लक्षांत बागविलें पाहिजे कीं, बुद्धीस चरे दिसण्यासारखे विचार पुढें आल्याबरोबर मनुष्य एका क्षणांत आपलें फार दिवस चालत आलेलें वर्तन टाकून देऊन त्या विचारांप्रमाणें नवीन वर्तन एकदम करूं लागला असें बहुशः घडत नाहीं. अशा गोष्टींत लिहिणारांनीं लिहावें आणि वाचणारांनीं वाचावें, असें कांहीं वेळ झाल्यावर प्रथम लिहिणारांच्या वर्तनांत थोडाबहुत फेरफार होऊं लागतो, व त्यांचें उदाहरण वारंवार डोळ्यापुढें येऊं लागलें म्हणजे वाचणारांच्या मनांतही, खात्री झाली असल्यास, लिहिणारांचे अनुकरण करावें असें येऊं लागतें. सारांश, समाजांची सुधारणा मुंगीच्या पायानें होत असतें. म्हणून या पत्रासारख्या पत्रांत येणारे असामान्य विचार नवीन मंडळीच्या हातांत पडल्याबरोबर ती आपले फार दिवसांपासून चालत आलेले धर्माचार, राज्याचार, किंवा सामाजिक आचार एकदम टाकील, अशी भीति क्षणभरसुद्धां बाळगण्याची गरज नाहीं. असें होण्याचा संभव असेल तर आह्मांस त्यापासून फार आनंद होणार आहे. पण तसें मुळींच नाहीं. तथापि कर्तव्य तें केलेंच पाहिजे. असें समजून हा व्यवसाय आरंभिला आहे, आणि म्हणून, कोणास कांहीं वाटलें, तरी अशा विषयाविषयीं जें सत्य व योग्य दिसेल तें लिहिणें भाग आहे.

त्यांच्या बुद्धीस भ्रंश होऊन " इतोभ्रष्टस्ततोभ्रष्टः " अशी त्यांची स्थिती होते, आणि तीमुळें समाजांत अनवस्था उत्पन्न होऊन त्याचें फार नुकसान होतें. आमच्या मतें या आक्षेपांत बराच अर्थ आहे. पण तेवढ्यावरून तो निरुत्तर आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. एक तर हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, एक स्थिति जाऊन दुसरी स्थिति येण्यापूर्वी जो काळ जातो त्यांत विशेष अव्यवस्था दृष्टीस पडणें हें साहजिक आहे. तसेंच हेंही लक्षांत बागविलें पाहिजे कीं, बुद्धीस चरे दिसण्यासारखे विचार पुढें आल्याबरोबर मनुष्य एका क्षणांत आपलें फार दिवस चालत आलेलें वर्तन टाकून देऊन त्या विचारांप्रमाणें नवीन वर्तन एकदम करूं लागला असें बहुशः घडत नाहीं. अशा गोष्टींत लिहिणारांनीं लिहावें आणि वाचणारांनीं वाचावें, असें कांहीं वेळ झाल्यावर प्रथम लिहिणारांच्या वर्तनांत थोडाबहुत फेरफार होऊं लागतो, व त्यांचें उदाहरण वारंवार डोळ्यापुढें येऊं लागलें म्हणजे वाचणारांच्या मनांतही, खात्री झाली असल्यास लिहिणारांचे अनुकरण करावें असें येऊं लागतें. सारांश, समाजांची सुधारणा मुंगीच्या पायानें होत असतें. म्हणून या पत्रासारख्या पत्रांत येणारे असामान्य विचार नवीन मंडळीच्या हातांत पडल्याबरोबर ती आपले फार दिवसांपासून चालत आलेले धर्माचार, राज्याचार, किंवा सामाजिक आचार एकदम टाकील, अशी भीति क्षणभरसुद्धां बाळगण्याची गरज नाहीं. असे होण्याचा संभव असेल तर आह्मांस त्यापासून फार आनंद होणार आहे. पण तसें मुळींच नाहीं. तथापि कर्तव्य तें केलेंच पाहिजे. असें समजून हा व्यवसाय आरंभिला आहे, आणि म्हणून कोणास कांहीं वाटलें, तरी अशा विषयाविषयीं जें सत्य व योग्य दिसेल तें लिहिणें भाग आहे.

त्यीं माहिती मिळवून त्यांचा शांतपणें विचार केला असतां याच्यायोगानें आपल्या मनावर दोन प्रकारचे परिणाम होतात. एक, आपली अशी खात्री होऊन जाते कीं, सामान्यपणें कोणतेही लोक घेतले तरी त्यांना विवक्षित स्थिति प्राप्त झाली असतां त्यांच्या राजकीय, धार्मिक आणि सामाजिक कल्पना व आचार धारणपणें सारख्या तऱ्हेचे असतात; दुसरें, जसजशी त्यांची सुधारणा होत जाते तसतसा त्या कल्पनांत व आचारांत पालट होत जाऊन त्यांस विशुद्धत्व येत जातें. हें अवस्थांतर होण्यास ज्ञानवृद्धि व ज्ञानप्रसार कारण होतात. ज्यांना दुर्दैवानें सुशिक्षण मिळालें नसल्यामुळें अशा गोष्टींविषयीं शांतपणें विचार करण्याची सवय लागलेली नाहीं, व कोणत्या स्थितीपुढें कोणती स्थिति येते हें समजलेलें नाहीं, अशांनीं असलेली स्थिती अत्युत्तम मानून वरिष्ठ स्थितीचें ज्ञान करून देणाऱ्याचा उपहास करावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. पण त्याच्या मनावर सुविद्येचा चांगला परिणाम झाला असेल तो अशा अप्रबुद्धांनीं केलल्या दुःशब्दाच्या पुष्पवृष्टीवद्दल त्यांचा राग न करतां, उलट त्याविषयीं अनुकंपा किंवा कींव च दर्शित करील. " सोंवळ्या ओंव्याची मीमांसा, " किंवा ' देवतोत्पत्ति ' अशा विषयावरील आमच्या लेखांसारखे लेख वाचून पूर्वपद्धतीच्या सामान्य वाचकांचें पित्त खवळून जात असेल याविषयीं आम्हांस तिलप्राय शंका नाहीं. पण या गोष्टीस आमचा इलाज नाहीं. पण हितावह परंतु कडु न लागणारें असें भाषण नेहमीं करणें केवळ दुरापास्त आहे. ज्याला आसमंतांतील स्थिति वाईट वाटत असेल, व ती बरी व्हावी अशी इच्छा असेल त्याचें, ती वाईट म्हटल्या खेरीज व तींतील चुका दाखवल्याखेरीज न, कसें चालेल ? यावर कित्येक असा आक्षेप घेतात कीं, अशिक्षित लोकांपुढें अशा प्रकारचा बुद्धिवाद मांडल्यानें

त्यांच्या बुद्धीस भ्रंश होऊन " इतोभ्रष्टस्ततोभ्रष्टः " अशी त्यांची स्थिती होते, आणि तीमुळें समाजांत अनवस्था उत्पन्न होऊन त्याचें फार नुकसान होतें. आमच्या मतें या आक्षेपांत बराच अर्थ आहे. पण तेवढ्यावरून तो निरुत्तर आहे असें म्हणतां येणार नाहीं. एक तर हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, एक स्थिति जाऊन दुसरी स्थिति येण्यापूर्वी जो काळ जातो, त्यांत विशेष अव्यवस्था दृष्टीस पडणें हें साहजिक आहे. तसेंच हेंही लक्षांत बागविलें पाहिजे कीं, बुद्धीस चरे दिसण्यासारखे विचार पुढें आल्याबरोबर मनुष्य एका क्षणांत आपलें फार दिवस चालत आलेलें वर्तन टाकून देऊन त्या विचारांप्रमाणें नवीन वर्तन एकदम करूं लागला असें बहुशः घडत नाहीं. अशा गोष्टींत लिहिणारांनीं लिहावें आणि वाचणारांनीं वाचावें, असें कांहीं वेळ झाल्यावर प्रथम लिहिणारांच्या वर्तनांत थोडाबहुत फेरफार होऊं लागतो, व त्यांचें उदाहरण वारंवार डोळ्यापुढें येऊं लागलें म्हणजे वाचणारांच्या मनांतही, खात्री झाली असल्यास, लिहिणारांचे अनुकरण करावें असें येऊं लागतें. सारांश, समाजांची सुधारणा मुंगीच्या पायानें होत असतें. म्हणून या पत्रासारख्या पत्रांत येणारे असामान्य विचार नवीन मंडळीच्या हातांत पडल्याबरोबर ती आपले फार दिवसांपासून चालत आलेले धर्माचार, राज्याचार, किंवा सामाजिक आचार एकदम टाकील, अशी भीति क्षणभरसुद्धां बाळगण्याची गरज नाहीं. असें होण्याचा संभव असेल तर आह्मांस त्यापासून फार आनंद होणार आहे. पण तसें मुळींच नाहीं. तथापि कर्तव्य तें केलेंच पाहिजे. असें समजून हा व्यवसाय आरंभिला आहे, आणि म्हणून कोणास कांहीं वाटलें, तरी अशा विपर्यावियीं जें सत्य व योग्य दिसेल तें लिहिणें भाग आहे.

विजय लांछनें.

मनुष्याच्या उपजत मनोवृत्तींपैकीं सामर्थ्य प्रदर्शनाची हौस ही एक असावी असें वाटतें. बहुशः जगाच्या आरंभापासून पुरुष स्त्रियांपुढें, विद्वान अविद्वानांपुढें, धनवान निर्धनांपुढें, स्वतंत्र परतंत्रांपुढें, प्रबुद्ध अप्रबुद्धांपुढे, जेते जितांपुढें, व शास्ते शासितांपुढें आपल्या सामर्थ्याची प्रतिष्ठा मिरवून तीपासून आनंद करून घेत आहेत. प्राणिमात्रास, व विशेषतः मनुष्यास दुसऱ्यावर सत्ता, अधिकार किंवा अंमल गाजविण्यांत इतका आनंद का होतो, याची मीमांसा येथें करीत बसण्याचें प्रयोजन नाहीं. सर्व स्थितींत व सर्व वर्गांत ही मनोवृत्ति दृष्टीस पडते, येवढ्यावरून ती जन्मागत आहे, असें येथें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. या एका वृत्तीमुळें मनुष्यसमाजांत अनेक आचार अस्तित्वांत आले आहेत. आज ज्या आचारांचा विशेष उहापोह करावयाचा आहे ते याच वृत्तीपासून उत्पन्न झाले आहेत.

ज्याच्या अंगांत विशेष रग असते त्याला आपल्या शत्रूचा पराभव केल्यापासून तात्कालिक समाधान तर होतेंच पण त्याच विजयाची कांहीं खूण जवळ बाळगून तिजकडे पुनःपुनः पहाण्यापासून, किंवा ती आपल्या आप्तास किंवा मित्रास दाखविण्यापासूनही पुष्कळ समाधान होतें. इंग्लंडसारख्या बेटांतील धीवरांनीं फार कष्टानें एखादा प्रचंड किंवा असामान्य मासा पकडला असतां तो ते विकून न टाकतां बाळगून ठेवतात, आणि अभिमानपूर्वक तो इतरांस दाखवितात. परराज्यामुळें, रानें फस्त झाल्यामुळें, हत्याराच्या प्रतिबंधक कायद्यामुळें, आणि कदाचित् भूतदयेच्या प्रसारामुळें आमच्या लोकांचा मृगयेचा नाद अगदीं सुटल्यासारखा झाला आहे, व--

मिथ्यैवव्यसनं वदंति मृगयां ईदृग् विनोदः कुत ॥

अशा प्रकारें पारधीची तारीफ करणारे राजे, सरदार, किं व

सामान्य लोक येथें अगदींच दिसेनासे झाले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण इंग्लंडसारख्या देशांत या चिनोदाचा नाद अद्यापि अनेकांच्या ठाईं दृष्टीस पडतो. मृगया करून जी लूट कमाविली असेल तिच्यापैकीं टिकण्यासारखा भाग आपल्या बसण्याउठण्याचा खोलींत प्रमुखस्थलीं मांडून ठेवण्याची चाल साहेब लोकांत आहे, हे ज्यांनीं शिकारी साहेबाच्या बंगल्यांत एक दोन वेळां प्रवेश केला असेल त्यांच्या नजरेस आलेंच असेल. खुर्च्यांवर व बैठकीवर हरणांचीं मोठमोठीं कांतडीं टांगलेलीं असतात, व कोठें कोठें शृंगाविस्ताराम्ुळें भव्य दिसणारीं काळविटांचीं शिरें पेंढा भरून भिंतीवर किंवा द्वारांवर अडकवलेलीं असतात. त्यांतल्या त्यांत ज्याला वाघाच्या किंवा अस्वलाच्या शिकारीचा नाद असेल त्याला वाघांची आणि अस्वलांची कांतडीं ठिकठिकाणीं पसरून ठेवण्यांत मोठा पुरुषार्थ वाटतो.

अशा प्रकारें मृगयेंत संपादिलेल्या विजयाची लांछनें वापरण्याचा नाद सुधारलेल्या लोकांसच असतो असें नाहीं. रानटी लोकांस तर हा नाद सुधारलेल्या लोकांहूनही अधिक असतो. त्या लोकांत ज्यापाशीं विशेष अस्थिसंग्रह किंवा चर्मसंग्रह असतो तो विशेष शूर गणला जातो, आणि इतरांस त्याच्या पराक्रमांचा धाक वाटतो. यामुळें अशा लोकांच्या झोंपड्यांत जिकडे तिकडे हाडांची व कातड्यांचीं एकच गर्दी झालेली असते. आपण ज्याप्रमाणें कडीपाटास हांड्याझुंबरें लटकवून

वैद्यकपत्रिका:— हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

देतों त्याप्रमाणें : हे लोक आडव्या तुळवटास किंवा वाशांस मोठमोठ्या वाघांचे आणि अस्वलांचे सांगाडे व कांतडीं अडकवून ठेवितात ! कित्येक रानटी लोकांच्या सरदारांची संपत्ति व भूषणें केवळ असल्या जनावरांच्या शिरांचीं व हाडांची झालेली असते. ही संपत्ति व भूषणें बापाकडून मुलास येतात, व त्यांचा त्याला मोठा अभिमान वाटतो. शोधून लोकांतील योद्ध्याच्या अंगावर अस्वलाचे पंजे आणि पाय दृष्टीस पडतात ! फक्त राजाच्याच आढ्यावर सिंहाचें अथवा चित्त्याचें शेंपूट लोंबत असावें, असा **कोसास** लोकांत प्रतिबंध आहे !

याप्रमाणें भक्ष्य किंवा हिंस्र पशूंवर आपला किती अंमल चालतो हें दाखविण्यासाठीं सुधारलेले आणि रानटी लोक काय करतात, हें वर सांगितलें. पण हें सर्व प्रस्तावनारूप आहे. मनुष्यांच्या अन्योन्य व्यवहारांत कशा प्रकारचे आचार पडत जातात हें या निबंधांत दाखविण्याचा मुख्य उद्देश आहे. तो उद्देश चांगल्या रीतीनें सिद्धीस जाण्यासाठीं, म्हणजे पुढें जें सांगावयाचें आहे तें वाचकांच्या मनांत बरोबर रीतीनें उतरून देण्यासाठीं अशी प्रस्तावना केली आहे. रानटी, अर्धवट सुधारलेल्या व पूर्ण सुधारलेल्या लोकांचे हिंस्र पशूंशीं ज्या प्रकारचें वर्तन होत असतें, त्याच प्रकारचें वर्तन आपआपसांतही होत असतें. रानटी लोकांतील एखादा वीर युद्धाला गेला आणि त्यानें परत येतांना आपल्या बरोबर कांहीं विजयचिन्ह आणिलें नाहीं तर त्यास विजयशाली कोण म्हणणार व त्याला कोण बचकणार ? तेव्हां अशा लोकांतील जे योद्धे कांहीं पराक्रम करून येतात ते त्या पराक्रमाची कांहीं तरी पक्की खूण आणण्यास कधींही चुकत नाहींत ! लढाईंत जिंकलेल्या शत्रूकडील बायका, पुरुष व मुलें यांस कैद करून आणण्याचा फार जुना प्रघात आहे. ज्या रानटी लोकांत नरमांससेवनाचा प्रकार चालू असतो त्यास अशा रीतीनें आणिलेली लूट नासूं न देतां उरवून पुरवून

बरेच दिवस चारितार्थाकडे लाविलां येते. पण अशा प्रकारची लूट संभाळणें फार कठीण असते. एक तर कैद केलेले इसम स्वजीवितरक्षणासाठीं तुटून पडतील अशी भीति असते. शिवाय कैद्यांच्या मोठ्या समुदायाचें संरक्षण करण्यासही मोठी पंचाई पडते. अशा अनेक अडचणांमुळें अनेक कैदी पकडून आणिले तर त्यांपैकीं जेवढ्या बायका व पोरें हवी असतील तेवढ्यांशिवा बाकीच्यांस मारून टाकण्याचा प्रघात असतो. जुने ग्रीक लोक असेंच करीत असत. सध्यांचे सर्व ठिकाणचे रानटी लोक असेच करतात, तेमूरलंगादि ज्या दुष्ट पराक्रमी लोकांनीं हिंदु स्थानावर व युरोपावर अनेक स्वाऱ्या करून लाखों लोक गुलाम केले त्यांची त्यांनीं अशीच वाट लाविली ! शत्रूच्या अंतःकरणांत दहशत उत्पन्न करण्याचा व स्वजातीपुढें शौर्याची प्रतिष्ठा मिरविण्याचा हा अगदीं जुना व रानटी प्रकार होय. याच्या खालोखाल युद्धांत जिंकलेल्या शत्रूच्या शरीराचे कांहीं भाग कांपून काढून त्यांचे प्रदर्शन करावयाचें हा दुसरा प्रकार. हा अद्यापि बऱ्याच ठिकाणीं दृष्टीस पडतो, व आमच्या राज्याचारावर धर्माचारांवर याचा बराच परिणाम झाला आहे. मनुष्याच्या अनेक अवयवांत डोक्यास जें मुख्यांगत्व आलें आहे तें अत्यंत स्वाभाविक आहे, हें कोणासही समजणार आहे. प्रतिपक्ष्याचें शिर कापून आणण्याहून त्याचा पराभव केल्याचा दुसरा सचोट पुरावा तो काय देतां येणार ? एक डोकें आणिल्यानें शत्रू जिवंत राहिला नाहीं, जो मारावयाचा तोच मारला आहे-अशी त्यापासून अनेक प्रमाणें मिळून हंत्याच्या विजयशालित्वाबद्दल आप्तांचे मित्रांची आणि न जिंकलेल्या शत्रूंची पूर्ण खात्री होऊन जाते अशा प्रकारें कापून आणिलेलीं शिरें काठ्यांवर घालून रानटी लोक मोठ्या आनंदानें नाचत सुटतात ! त्यांच्या राजाच्या खोपटापुढें वेळू पुरून त्यांवर असलीं डोकीं घसवून दिलेलीं असतात. **इहोमन** लोकांच्या राजाच्या घरांतील भिंतीं

तीं जनावरें नसल्यामुळें त्यानें पोलिश लोकांच्या उजव्या कानांचीं नऊ पोतीं भरून घेतलीं, आणि त्यांसह स्वदेशास प्रयाण केलें ! आफ्रिकेंतील कांहीं राजांस शत्रूंचीं नाकें फार प्रिय असल्यामुळें त्यांचे लढाऊ सरदार नाकांनीं भरलेलीं ताटें. च्यातार्टें त्यांस नजर करतात ! तथापि कान, नाकें वगैरे कुजणारे भाग असल्यामुळें कित्येक रानटी लोक फक्त दांतच घेऊन जातात, आणि त्यांच्या माळा करून ठेवतात. समारंभाचे वेळ आणि सणाचे दिवशीं त्यांच्या बायका असल्या दातांचे दागिने मोठ्या प्रेमानें वापरतात ! डोकीं, दाढा, दांत, कान, नाखे यांशिवाय शरीराचे दुसरे भागही कांपून नेण्याचा प्रघात आहे कांहीं रानटी लोक काळजें काढून घेतात; कांहीं उजवे किंव डावे हात कांपतात; कांहींस मांसल असे कटिपश्चात्भाग फा आवडतात; कांहींस तोंडाचीं कांतडीं व कांहींस सगळ्या शरीराचीं संबंध कांतडीं सोलून घेणें बरें वाटतें ! तीं सहज निघू यावीं ह्मणून ते जिवंत शत्रूंस वांग्याप्रमाणें निखाऱ्यांत बेता भाजून मग सोलतात ! आणि अशा रीतीनें सोडविले अखंड चोगे वापरण्यांत व त्यांसह राजास व मित्रास भेटण्या जाण्यांत त्यांस मोठी प्रतिष्ठा वाटते ! याप्रमाणें शरीरांती बहुतेक सारे भाग व अवयव विजयलांछनें होऊं शकतात होतात, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. एक मात्र भाग अद्या सांगितला नाहीं, पण मनुष्याची क्रूरता कोणत्या थरास जाते, त्यांस समजावें म्हणून तोही विजयलांछन करण्यांत येतो, येथं सांगणें जरूर आहे. इतर अवयवांप्रमाणें हा गोपनीय अ यवही कांपण्याचा आणि सोलण्याचा प्रघात मागें युरोपांत

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ-प्रकाशन काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

आरियांत रूढ होता, आणि प्रस्तुतकालीं-आफ्रिकेंतील व अमेरिकेंतील कांहीं रानटी लोकांत रूढ आहे. हाच आचार अन्यरूपानें एका मोठ्या सुधारलेल्या लोकांत अद्यापि रूढ आहे, हें पुढील एका निबंधांत विशेष स्पष्ट होणार आहे.

तं राज्याचार व धर्माचार सामाजिक आचारांपासून उत्पन्न झालेले असल्यामुळें, समाजाच्या प्रथमावस्थेंतील धर्म आणि राज्य यांचें स्वरूपही वर निर्दिष्ट केलेल्या रानटी सामाजिक आचारांच्या स्वरूपासारखेंच असतें. सध्यां आपणांस गुलाम, गुन्हेगार, आणि शत्रू यांतील भेद नीट समजतो, व एकाच्या जागीं दुसरा येऊंसमजणें अशक्य वाटतें. पण रानटी लोकांस अशा प्रकारचे अस्तित्वतर समजत नाहीं. ज्याच्याकडून त्यांना कांहीं अप्रिय झालेलं असतें अशी भीति असते त्यास ते शत्रू किंवा गुन्हेगार समजून त्याचा पराभव करण्यास व त्याला गुलाम करण्यास उद्युक्त असतात. साक्षात् पोटच्या पोरांपासून त्यांस त्रास होऊं लागला तर त्यांना मारून टाकण्याची त्यांस शंका वाटत नाहीं, मग इतरांची कथा काय! अशा स्थितींतील राजेही सामान्य मनुष्याप्रमाणेंच क्रूर असतात. व ज्याप्रमाणें सामान्यव्यक्ति आपल्या सामर्थ्याचा संन्यास वचक राहण्यासाठीं वर सांगितल्यासारखें निर्दयपणाचें वर्तन करण्यास प्रवृत्त होतो, त्याप्रमाणें राजेही आपल्या प्रजेस व आपल्या शत्रूस आपली दहशत पडण्यासाठीं अशाच प्रकारचें क्रूर वर्तन करतात. लढाईंत जिंकलेल्या लोकांचीं डोकीं उडविणें, हातपाय तोडणें, त्यांना मिरच्यांच्या धुऱ्या देणें, लिदींत पुरणें, आपल्या तोफांवर बांधणें, कडेलोटकरणें, हात्तीच्या पायाखालीं देणें, त्यांचीं नाकें व कान कापणें, आणि त्यांच्या घशांत शिसें ओतून ओतणें-हे निर्दयपणाचे प्रकार लढाईंत कैद केलेल्या शत्रूकडील लोकांचा छळ करण्याकरतां जसे योजण्यांत येतात, त्याप्रमाणें प्रजेपैकींहीं कोणी मनुष्यानें अपमान केला, हुकूम

तोडला, किंवा चंडाचा घाट घातला तर त्याला शिक्षा करण्य
तहीं योजण्यांत येतात. राजापराधाकरतां सुळावर चढावितें, जे
खून केला असेल तेथें सर्व लोकांसमक्ष फांशीं देणें, भर च
ठ्यावर फटके मारणें–हे सर्व सभ्यांही कित्येक ठिकाणीं अंमल
असलेल्या शिक्षेचे प्रकार सरकारच्या सामर्थ्याची दहशत लोक
असावी, येवढ्यासाठींच आहेत. राजा सिंहासनारूढ हो
म्हणजे तो मनुष्यांचा स्वामी होतो येवढेंच नाहीं, तर सिंहास
रक्ष्या बलवान् हिंस्र पशूंसहां जिंकून त्याच्या पाठीवर बसत
असा या शब्दांत गर्भितार्थ आहे. सारांश काय कीं, अर्ध
सुधारलेल्या स्थितींत सामाजिक आचार जितके क्रूर असत
तितकेच राज्याचारही क्रूर असतात, असें सहज सिद्ध कर
देतां येतें; कारण दुसरे पहिल्यापासूनच निघालेले असतात. ज्य
हे विचार आपल्या समाजाच्या संबंधानें किती खरे आ
हें पहावयाचें असेल त्यांनीं महाभारतांतील कांहीं गोष्टी वा
त्यांचें आपल्या मनाशीं शांतपणें चिंतन करावें. दुःशासना
नरडीचा घोंट घेऊन त्याच्या विदारलेल्या वृक्षःस्थलापा
निघणाऱ्या रुधिरांत भिजविलेल्या हातानें द्रौपदीची वेणी घ
ण्याचा भीमानें केलेला पण आमच्या वाचकांच्या ध्या
असेलच ! कदाचित् रा. ब. नि. ज. कीर्तने यांसारखे
धर्माचे आणि पुराणांचे मंडनकर्ते असें म्हणतील कीं, ही
रूपकात्मक आहे व तिचा गुढार्थ अध्यात्मिक असून तो स
न्य जनास कळण्यासारखा नाहीं ! अशाच रीतीनें वेदाचें
रुपत्व आणि गुढार्थत्व बरींच शतकें रूढ होऊन बसलें
पण पश्चिमेकडून ज्ञानरवि या भरतखंडावर प्रकाशूं लाग
पासून ' वेदार्थयत्न ' होऊ लागले आहेत इतकेंच नाहीं,
त्यांचे पौरुषत्व स्थापण्याचा विडाही कित्येकांनीं उचलला
ही अत्यंत अभिनंदनीय स्थिति आहे.

नुष्यांच्या प्रथमावस्थेंत सामाजिक व राजकीय आचार असतात त्याप्रमाणें धर्माचारही क्रूर असतात, हें दाखविाठीं येथें विशेष खल करीत बसण्याची गरज नाहीं. कारणचीं पुराणें, आमची मूर्तिपूजा, आमचे प्रेतादिकांचें संस्कार ा आमच्यापेक्षां कनिष्ठ वर्गांत सुरू असलेली विलक्षण पूजा यांचा क्षणभर विचार केला तर असें दिसून येईल आमच्या देवतांच्या कल्पना मेलेल्या पूर्वजांपासून ह्मणजे ्या पिशाचांपासून निघाल्या असल्यामुळें, ज्या उपायांनीं व नीं रानटी व अर्धवट सुधारलेलीं माणसें आनंद पावतात, व उपायांनीं व कृतींनीं देवताही आनंद पावत असतील, ा आमचा भरंवसा ठरून गेल्यामुळें आमच्यांतील अज्ञ नांचा पूजाविधि अत्यंत उपहासास्पद झाला आहे ! सांवासाा किंवा महिषासुरमथनीसारख्या देवतेचें रूपवर्णनच लक्षांत ा ह्मणजे आमच्या लिहिण्याचा अर्था प्रत्यय येईल. हत्तीचें ठं कांतडें पांघरून पिशाचगणासह नर्तन करणाऱ्या " पंच नररुंडमालधर अशा पार्वतीशास " आम्ही नमन करणार ! काय विचारतां ? अशा भयंकर देवार्चा पूजाही भयंकरच ल्ली पाहिजे ! सांच हा थेट पिशाचवर्गांतून देववर्गांत आला असळें, त्याचें रूप आणि त्यार्चा पूजाही पिशाचांचें रूप आणि यांसारखी झाली आहेत; व आमच्या पिशाचांच्या स्वरू ा आणि त्यांच्या स्थितीच्या कल्पना आमच्या श्राद्धविधींत गरुडपुराणांत पूर्णपणें नमूद झालेल्या आहेत ! उत्कुंभ, दान, गोप्रदान, लोहदान, कार्पासदान-या सर्वांवरून काय होतें कीं, शरीरास या लोकीं ज्या अडचणी येतात त्याच त्तर आत्म्यास पिशाचयोनींत येतात, असें आमचे लोक ात ! व अशाच प्रकारच्या पिशाचापासून देवतोत्पत्ति असल्यामुळें, त्यांचीं स्वरूपें आणि स्वभावहीं तत्तुल्य

मानिलीं आहेत, आणि म्हणून त्यांच्या पूजाही तत्समान् झाल्या आहेत यांत नवल तें कोणतें ?

व्यवच्छेदन.

आपण संपादिलेली विजयश्री गाजविण्यासाठीं रानटी अर्धवट रानटी लोक जिंकलेल्या शत्रूंस ठार न मारल्यास त्यांच्या शरीरांचे कांहीं भाग कांपून घेऊन त्यांचा संग्रह करतात हें वरील लेखांत सांगितलें. आतां याच आचारापासून उत्पन्न झालेल्या **व्यवच्छेदना**च्या आचाराविषयीं दोन शब्द लिहावयाचे आहेत.

व्यवच्छेदन म्हणजे कापणें. जोंपर्यंत जिंकलेल्या लोकांच्या जिवाची पर्वा नसते तोंपर्यंत हा प्रकार अस्तित्वांत येत नाहीं. डोक्याची नरटी काढणें, जबडा उपटणें, कांडें सोलणें काळीज सोडविणें वगैरे विजय मिरविण्याच्या पद्धति अत्यंत क्रूरपणाच्या आहेत, आणि त्या जेथें रूढ असतात, तेथें मनुष्याचा जीव घेणें ही वाईट गोष्ट आहे असें कोणाच्या स्वप्नांत सुद्धां येत नसतें. पण पुढें आपआपसांत युद्धें होतां होतां उभय पक्षांस असें दिसून येतें कीं, जिंकलेल्या शत्रूकडील लोकांस मारून टाकण्यापेक्षां गुलाम करणें बरें. त्यांस गुलाम करण्यानें त्यांच्याकडून निरंतर सेवा करून घेतां येईल. त्यांच्या वृत्तींत हा बदल होण्यास दोन कारणें होतात. सामान्य लोकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं रानटी लोक मोठे उद्योगी असतील. पण

ब्राह्मी बाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम दिवसा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खेर, लाव्हा ऑफीस, पुणें सि

याची चूक आहे. रानटी लोक पराकाष्ठेचे आळशी असतात. न्याप्रमाणें सिंहव्याघ्रादि हिंस्र पशु भुकेनें कळवळूं लागल्या शिवाय आपल्या गुहा सोडून भक्ष्याच्या शोधासाठीं बाहेर पडत ाहींत, त्याप्रमाणं रानटी लोक चरितार्थास कांहीं नसलें तरच ातपाय हालविण्यास तयार होतात. भूक लागली म्हणजे हवें तें न ती भागवावी, आणि ती भागली ह्मणजे पडून रहावें, शी त्यांना खोड असते. तेव्हा भूक भागविण्यास लागणारे श्रम कोणी आयतेच आणून देईल तर त्यांस ते मनापासून हिजे असतात. लढाईंत पकडलेल्या लोकांस न मारतां गुलाम न ठेविलें, आणि त्यांच्या कडून पारध करवून तिच्यावर रितार्थ करतां आला, तर त्यांस तत्रियत लागेल तेव्हां मात्र डासा उद्योग करून बाकीच्या वेळांत विश्रांति घेण्यास साप-. याच सुमारास गुरें पाळून त्यांच्या दूधदुभत्यावर किंवा ी करून धान्यावर उपजीविका करण्याची कला समजून ली, तर लढाईंतल्या कैद्यांस मारण्यापेक्षां त्यांना गुलाम न ठेवण्याची इच्छा होण्यास विशेष कारण होतें. एक धनगर तकीं गुरें पाळूं शकतो तितक्या गुरांपासून त्याचा निर्वाह न शिवाय आणखीही पुष्कळांचा होण्यासारखा असतो. शेत-याचे श्रम याहींपेक्षां विशेष फायदेशीर असतात यामुळें काय ं कीं, रानटी लोकांस धनगरावस्था व कृषीवलावस्था प्राप्त ल्या असतां त्यांस माणसें मारण्याचा कंटाळा येऊं लागून, ना आपले गुलाम करून ठेवणेंच अधिकाधिक प्रिय वाटूं ला-. अशा स्थितींत समाजांतील व्यक्तींचे दोन स्थूल विभाग त. एक चाकरांचा किंवा गुलामांचा; आणि दुसरा स्वामींचा ा धन्यांचा. पहिल्या वर्गांत चायकांचाही समावेश केला पाहि-घरच्या मालकानें लढण्याचें काम करावें, आणि चायकांनीं वीं कामें करावीं अशा प्रकारचा श्रमविभाग उत्पन्न होतो,

आणि त्यांपासून मिळूं लागलेलीं सुखें अधिकाधिक माह्य वा लागून ज्यांस गुलाम केलें असतें त्यांस चांगल्या रीतीनें वाग विण्याची सहज प्रवृत्ति होते. डोळे काढलेले, हात तोडलेले, लं गडे केलेले अनेक गुलाम पदरीं असून काय फायदा ? गुलाम केलेल्या प्रत्येक इसमापासून जितका फायदा करून घेतां येईल तितका करून घेतां आला पाहिजे. काम करण्याचे अवयव तो डून टाकल्यास त्यांच्यापासून फायदा कसा होणार ? तेव्हां तसें करणें बरोबर नाहीं. पण ते जिंकलेले लोक आहेत असा कांहीं तरी शिक्का त्यांच्या अंगावर नेहमीं दिसत असला पाहिजे, त्या खेरीज आपण विजयशाली आहों असें आपल्या मित्रांस किंव शत्रूंस कसें कळेल, व त्यांवर आपला वचक कसा राहील ? चिंत नाहीं, पण तसें होण्यास गुलामास ठार मारलेंच पाहिजे असें नाहीं. ते लढाईंत जिंकलेले लोक आहेत असें दाखविणारी एखादं कायमची निशाणी त्यांच्या अंगावर करून ठेविली म्हणजे झालें अशा विचारांनीं **विजयलांच्छनास्तव** डोकीं उतरण्याच हातपाय तोडण्याचा, सर्वंध कांतडें सोलण्याचा—सारांश ज्य गोष्टीमुळें तत्क्षणीं जीव जाईल, किंवा स्थाईक लुलेपण अं जडेल, अशा प्रकारचा देहदंड करण्याचा प्रघात मागें पड कोठें पायाचा आंगठा उतरणें, कोठें हाताची करंगळी तोडणें कोठें शेंडी काढणें, कोठें सुंता करणें असे आचार पडतात आणि अशा प्रकारचे सामाजिक आचार एकदां रूढ झा म्हणजे राज्याचारांस व धर्माचारांसही त्यांचें वळण लागतें.

पूर्वी युरोपांत व इतर खंडांत एका गृहस्थास आपली जमी दुसऱ्यास विकावयाची झाली तर तो आपल्या वकिलाकडू विकत घेणाऱ्या मनुष्याच्या वकिलाच्या हातावर त्या जमिनी तलि थोडीशी माती कांहीं साक्षीदारांसमक्ष पाडीत असे. जमी ही उचलून देण्यासारखी वस्तु नसल्यामुळें असा प्रघात पडा

चअसावा हें उघड आहे. आपणांत उदक सोडण्याचा जो रिवाज
प्रआहे तोही अशाच अर्थाचा आहे. ज्या वस्तूवर आपण उदक
ा सोडतों तिवरील आपलें स्वामित्व आपण सोडतों, असा या संप्र-
ोंत्र्दायाचा मूळ आशय आहे. स्थावर वस्तु उचलून देतां येत
पाताहीं तेव्हां तिच्या संबधानें अशा प्रकारचा तोडगा करणें भाग
नाइतें. पुढें ब्राह्मणभोजन घालावयाचें झालें, दक्षिणा द्यावयाची
ी ाली; कन्यादान करावयाचें झालें तरी उदक सोडण्याचाच प्रघा-
र्थ र पडतो; ह्मणजे स्थावरजंगम पदार्थावरील स्वामित्व सोडण्याची
हेंजेकच पद्धत पडते; व असें होणें फार सोईचें आहे. तसेंच
न ुर्वीचे लोक लढाई करावयास निघाले असतां ज्या लोकांवर
ताघालून जावयाचें असेल त्यांच्याशीं प्रत्यक्ष संभ.म करूं लाग-
ासायापूर्वी, माती आणि पाणी मागत; आणि त्या जिनसा त्यां-
. यांच्याकडून आल्या तर लढाई न करतां ते आपले गुलाम होण्यास
ी ियार आहेत असें समजत या आचाराचा अर्थही उघड आहे.
ली, त्यांनीं मागितल्याबरोबर माती आणि पाणी दिलें त्यांनीं आपण
न टोऊन आपला देश ताब्यांत देण्याची कबूली दाखविली, असें
लकींतें. याप्रमाणेंच लढाईकरतां साहाय्य मागावयाचें झालें तर
ून किमेकांकडे भाले पाठवून देण्याची चाल असे; तसेच लढाई
याचे सुरू होऊन कांहीं कैदीही करण्यांत आले आहेत असें दाखवि-
ा कीं,याकरितां या मदतीसाठीं धाडण्यांत येणाऱ्या भाल्यांच्या
ल्या ळांवर कैद केलेल्या लोकांचे हात किंवा बोटें टोंचून ते पाठ-
ना अण्यांत येत असत. तसेंच ' आम्ही शरण आलों ' असें म्हणा-
. अशयाचें असल्यास शस्त्रें उलट धरून किंवा हात बांधून घेऊन
ात. शत्रूच्या छावणींत जाण्याचा प्रघात असे. हात जोडणें, पायां
ा धरणें गुढगे टेकणें, तोंडांत मारून घेणें कान उपटून घेणें, नाक-
घरण्यासणें वगैरे जे प्रकार आपण देवापुढें किंवा राजापुढें करतों
शीं का सर्वांचा इंगितार्थ हाच आहे.

पण कोणी असें म्हणतील कीं मनुष्यांनीं ठरविलेल्या ह्या कांहीं तरी खुणा आहेत. यावरून पूर्वी स्वामिसेवक सबंध, राजाप्रजा सबंध किंवा देवपूजक सबंध दाखविण्यासाठीं ज्या आचारांच्या या खुणा आहेत असें आम्ही म्हणतों, ते आचार अस्तित्वांत असतील असें अनुमान करणें बरोबर नाहीं. त्यावर उत्तर येवढेंच आहे कीं पृथ्वीवर सध्यां जे रानटी किंवा अर्धवन रानटी लोक आहेत त्यांमध्यें असे आचार रूढ आहेत; आम्ही ज्या देशांतून ते नष्ट झाले आहेत, अशा देशांच्या इतिहासांत त्यांची उत्तम माहिती मिळण्यासारखी आहे. आमच्या देशांती निरानिराळ्या वर्गांतले लोक निरनिराळ्या स्थितींत असल्यामु कोठे हे आचार प्रत्यक्ष आढळतात व कोठें त्यांची फक्त कवाई दृष्टीस पडते. **वुइलियम्स** नांवाच्या एका प्रसिद्ध इंग्लि प्रवाशानें असें म्हटलें आहे कीं, एका प्रसंगीं **फिजी** लोकां एक राजा मेला असतां त्याच्या दरबारानें त्याच्या प्रीत्य शंभर करंगळ्या तोडाव्या असा हुकुम फरमाविला; तसेंच र मुलाचा आवडता बाप नुकताच वारला होता तेव्हां त्य गाडण्यापूर्वी त्याच्या मुलानें आपली पितृभक्ति प्रदर्शित ण्यासाठीं आपलीं पांच बोटें तोडून त्यांस आपल्या पित्य शवाबरोबर मूठमाती दिली ! अमेरिकेतही याप्रमाणेंच पि व देवतास अंगुलिच्छेद करून खुष करण्याचा प्रघात **हॉटेंटॉट** लोकांत अशी चाल आहे कीं, एखाद्या बाय नवरा मेला असला आणि तिच्या मनांत दुसरें लग्न करा असलें तर तिनें आपल्या बोटाचें पहिलें कांडें तोडून

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड करणारें महाराष्ट्रांतील एकटेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह

मॅनेजर, सुधारक पुणें सि

पाहिजे. हा दुसरा नवरा मरून तिसरा करावयाचा असल्यास त्याच्या खालचें दुसरें कांडें दुसऱ्याच्या पिशाचास अर्पिलें पाहिजे. याप्रमाणें एका पाठीमागून एक हवे तितके नवरे करावे, प्रत्येका पाठीमागें बोटाचें एकेक कांडें गमविण्याची तयारी असली ह्मणजे झालें ! याप्रमाणें पितृभक्ति किंवा भर्तृप्रेम दाखविण्यासाठीं हाताचीं बोटें गमावणें हें ज्या आमच्या लोकांत सतीचा प्रघात इंग्रजी होईतोंपर्यंत रूढ होता त्यांस हास्यास्पद किंवा क्रूर वाटण्याचा मुळींच संबंध नाहीं. जिनें भर्तृशवाबरोबर अग्निप्रवेश केला तिची काय थोरवी सांगावी ? तिच्या पुण्यप्रतापानें सासरच्या व माहेरच्या मागल्या व पुढल्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार होऊन, शिवाय खुद्द तिला त्याच भर्त्याशीं सात जन्म सहवाससुख ! पण हिंदू लोकांनीं असें समजूं नये कीं, अशा प्रकारच्या प्रेमप्रदर्शनांत आपणांहून श्रेष्ठ असे दुसरे लोक नाहींत ! हिंदुस्थानांत असा कोणताही आचार नाहीं किंवा असूहता, कीं ज्याच्या भीतिमा दुसरीकडे दाखवितां येणार नाहींत. कांहीं बाबतींत तर हिंदुस्थानास लाज आणविणारे असे प्रकार इतर लोकांत रूढ आहेत. दूर कशाला, ही सतीची चाल घेतली पाहिजे तर घ्या. माधवराव पेशव्याबरोबर फक्त रमाबाईच सती गेली. आफ्रिकेंत व अमेरिकेंत कांहीं रानटी लोक आहेत, त्यांचे राजे परलोकवासी झाले असतां त्यांच्या बरोबर त्यांच्या चायकाच तोडून पुरण्याचा प्रघात आहे इतकेंच नव्हें, तर त्यांच्या समवेत त्यांच्या आवडत्या व निवडक भावांस, नोकरांस, मंत्र्यांस, व जनावरांसही सती घालविण्याची चाल आहे ! मेलेल्या पितरांस आंथरुणें पाहिजेत, गाई पाहिजेत, वडे पाहिजेत, तर घोडीं कां नकोत, कुत्रीं कां नकोत, गांजिफाच्या राजा आणि बुद्धिबळांचे आणि सोंगट्यांचें पट व त्या खेळण्यास लागणारे मित्र कां नकोत ? खरी भीतीच दाखवायाची असेल, तीं

आणि मृताकरतां जें जें देण्यांत येतें तें तें त्याला पावतें
त्याचा उपभोग त्याला घेतां येतो हें खरें असेल तर अगोद
घरंदारें जाळून टाकून मग आईबापांनीं मुलांबरोबर, मुलां
आईबापांबरोबर, बहिणींनीं भावांबरोबर व भावांनीं बहिणींबरो
बर, राजानें प्रजेबरोबर आणि प्रजेनें राजाबरोबर, आणि
मित्रांनीं एकमेकांबरोबर सती जावें, आणि येथल्यासारखा
पिशाचयोनींत सारा थाट उठवून द्यावा हें योग्य आहे ! ब
कोनें नवऱ्यासाठीं स्वतःस जाळून घेणें हें उत्तम प्रेमाचें नि
र्शक असेल तर त्याचें अनुकरण इतर सर्व संबंधांत होऊं लाग
यांत मनुष्यतेची केवढी उन्नति व्यक्त होणार आहे बरें ? आ
अशा प्रकारची उन्नति सार्वत्रिक झाल्यास येथील मनुष्यव
नाहींशी होऊन जन्ममरणाचे क्लेश या पृथ्वीतलाबर मनु
मात्रांत तरी न दृष्टीस पडूं लागल्यामुळें तिच्यावरील दुःखा
किती भार कमी होणार आहे ? पण असें होत नाहीं. याव
दिवसेंदिवस आम्ही नीच होत चाललों आहों, व खऱ्या प्रेमा
आम्हांमधून लोप होत आहे, असें म्हणणें जरूर नाहीं का
साक्षात् जाळून घेण्यानें ज्या प्रकारचें निकट प्रेम प्रद
होतें, त्याचा एक कोट्यांश तरी आतां जे आचार रूढ आ
त्यांनीं होत असेल काय ? असो; या सामाजिक आचा
राज्याचारांतही अनुकरण होऊं लागतें, हें पहावयाचें असेल
प्रस्तुतकालीं चीनसारख्या जुन्या पध्दतीच्या देशांत अपरा
कोणत्या प्रकारच्या शिक्षा देण्यांत येतात हें पहावें, व युरो
खंडांतील निरनिराळ्या देशांचे इतिहास वाचावे. कोणा खोटें
तर त्याचे हात तोडावयाचे, कोणीं खोटी साक्ष दिली तर त्
जीभ कापावयाची, कोणी स्त्री चपला निघाली तर तिचें
कापावयाचें किंवा तिच्या शरीराच्या निरनिराळ्या भागांवर
द्यावयाचे: तसेच कांही गुन्ह्याबद्दल कान कापावयाचे, व

बद्दल पाय कलम करावयाचे, कांहींबद्दल डोळे काढावयाचे– अशा अनेक प्रकारच्या शिक्षा सध्यां चिनांत सुरू आहेत, व पुर्वी येथें व युरोपांत अस्तित्वांत होत्या; आणि इंग्रजांचें राज्य येथें न होतें तर त्यापैकीं बऱ्याच येथें सध्यांही अंमलांत असलेल्या दृष्टीस पडत्या. पण उत्तरोत्तर अशा शिक्षा क्रूर वाटूं लागून सौम्य शिक्षा देण्यानें मनुष्यांची नीति लोकर सुधारत जाते, असा अनुभव हळू हळूं येऊं लागतो. आणि असल्या शिक्षा अगदीं मागें पडून सौम्य शिक्षा सर्वत्र अमलांत येतात. हा बदल क्रमाक्रमानें सर्व आचारांच्या संबंधानें होतो, व अखेरीस ज्या प्रकारानें कमींतकमी विकलांगता उत्पन्न होईल, व ती ज्याच्या कपाळीं आली असेल त्याला कमींत कमी वेदना सोसाव्या लागतील, असे प्रकार सामाजिक, धार्मिक व राजकीय आचारांत रूढ होत जातात. अलीकडे लष्करी घोड्यांस खुणेलाठीं डागतात, हें सर्वांस ठाऊक आहेच; पूर्वी गुलामाच्या अंगावर मालकाच्या नांवाचा डाग देत असत. हाच प्रकार धर्मांत शिरला तेव्हां त्याच्या तप्तमुद्रा झाल्या. मग अर्थात् जो स्वामीस अधिक पैसे देईल त्याला ओल्या फडक्यावरच्या मुद्रा, जो पैसा सोडील त्याला लालभडक मुद्रा, जी कोमलांगी असेल तिला गोंझरत्या मुद्रा, जी हेडंबा असेल तिला प्रशस्त मुद्रा, असा रिवाज पडणें किती स्वाभाविक आहे ? या मुद्रांप्रमाणेंच नाकांवर व कानांतील भोकांची गोष्ट होय. कोणी असें म्हणतात कीं स्त्रिया स्वभावतः फार चंचल आहेत, म्हणून त्यांना अल्लड वैलाप्रमाणें किंवा उंटाप्रमाणें थोड्या श्रमानें वागविता येण्यासाठीं स्त्रीरूपी वेसणी त्यांच्या नाकांत घालवयाची चाल पडली ! मुसलमान लोक आपल्या बायकांविषयीं विशेष दक्ष असल्यामुळें ते बायकांच्या नाकपुड्यांतील पडद्यांत खार्शा कडी बसवून देऊन त्याच्या चंद्राकार परिघाचा खळ तोंडावर होऊं देतात. ही नथ

कधीं कधीं इतकी जड असते कीं, तिच्या ओझ्यानें नाकाचा पडदा तुटून जाण्याची भीति पडून ती सांवरण्यासाठीं तिला एक दोरा लाऊन तो मागें बुचडयाला खेचून बांधलेला असतो! कोणी म्हणतात कानानाकांसही विंझें पाडण्याची पद्धत अलंकारशास्त्रप्रणीत आहे! असेल बापडी! येवढयानें अलंकारशास्त्राचें रहस्य पुरतें उमजत नसेल तर खालच्या वरच्या ओठांस चार किंवा पांच भोंकें पाडून त्यांत बाळ्याबुगडयांच्या व नथांच्या नवीन सवती अडकविण्याचा प्रघात पडेल तर किती बहार होईल! तसेंच गुजराथी बायकांप्रमाणें दातांत सोन्यारुप्याच्या चुका मारून त्या ओठांतून बाहेर काढण्याचा प्रचार पडेल तर अलंकारशास्त्रांत एक दोन नवीन उल्लास करून घातल्याचें श्रेय येणार नाहीं काय? असो; व्यवहारांत आह्मी या बायकांच्या नथांतून केव्हां सुटूं तें सुटूं; येथें पाहिजे तेव्हां त्यांतून निसटणें आमच्या ताब्यांत असल्यामुळें तसें करून दुसऱ्या एका अंगवैकल्याकडे वळतों. हें वैकल्य जगत्प्रसिद्ध आहे. याचा आरंभही विजयलांछनापासूनच आहे. लढाईंत धरलेल्या कैद्यांपासून संतानवृद्धी न व्हावी, घरांत ते बावरूं लागले असतां त्यांपासून स्त्रियांस भीति न रहावी या साठीं गुलामांस बैलाप्रमाणें हतपुंस्त्व करण्याचा प्रघात यहुदी, फिनीशियन, मिसर, फ्रिजियन, पारशी, मुसलमान वगैरे अनेक लोकांत फार वर्षें रूढ होता, व अजूनही तो अनेक रानटी लोकांत दृष्टीस पडतो. ज्याप्रमाणें तोडलेले हातपाय त्याप्रमाणें हीं

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

गुह्यांगें राजास नजर करणें हा आचार रानटी लोकांत पूज्य मानल्यामुळें, राजस्वरूप देवासही तो अत्यंत प्रिय होत असेल असा तर्क करून, भक्तांनीं आपापल्या देवतांस आपण होऊन आपली किंवा दुसऱ्यांचीं सबंध गुह्यांगें किंवा त्यांचे कांहीं भाग अर्पण करण्यास तयार होणें हें किती स्वाभाविक आहे ? ज्या इंद्रियामुळें सर्व सुखांत अत्यंत प्रिय सुखाची प्राप्ति होत असून जातिप्रवाह अव्याहत चालतो, त्याहून देवतेला नजर करण्यास विशेष महत्वाची वस्तु कोणती असणार ? आफ्रिकेकडे कोणी सूर्यास हात वाहतात. कोणी पाय वहातात, कोणी दुसरा कांहीं अवयव वहातात, पण सुंतेवाल्यांनीं आम्हा सर्वांस हटविलें आहे असें कबूल केलें पाहिजे ! यूरोपीयन लोकांत जसा बाप्तिस्मा, आमच्या लोकांत जशी मुंज, तसा मुसलमान व इतर लोकांत हा सुंत्याचा संस्कार प्रमुख होऊन बसला आहे. सुंता हा पूर्वीच्या कृत्रिम नपुंसकत्वाचें सौम्य रूप आहे. असो. विषयाच्या ओघांत या अमंगळ आचारांविषयीं आम्हांस इतकें स्पष्टपणें लिहावें लागलें याबद्दल वाचकांची क्षमा मागून दुसरीकडे वळतों.

ज्याला आपण अलीकडे गोंदणें म्हणतों तेंही पराभूत लोकांवर पराभव झाल्याचें एक चिन्ह कायम करण्याचा मार्ग होतें. अलीकडे हें गोंदणें भूषण होऊन बसलें आहे, ही गोष्ट आम्हांस नाकबूल नाहीं पण याची वंशावळ वरील सर्व आचारांच्या वंशावळींसारखीच आहे. शूर लोकांस शरीरावर अनेक वार लागले असून त्यांपासून जे डाग पडलेले असतात त्यांचें मोठें भूषण वाटतें व अशा डागांपासून उत्पन्न झालेली कुरूपता पुरुषांच्या सौंदर्याची परीक्षा करण्याचा ज्यांचा विशेष अधिकार त्या स्त्रियांना ती कुरूपता न वाटतां, उलट ते डाग भूषणांसारखे वाटतात, व वाटणें नीट आहे. कारण त्यांत जो गुण नसेल त्याला त्या

गुणाचें मोठें कौतुक वाटतें. हा प्रकृतिनियम फार पूर्वीच्या तत्ववेत्त्यांच्या नजरेस येऊन गेला होता. स्त्रियांच्या अंगीं शौर्याभाव असल्यामुळें ज्याच्या शरीरावर शौर्याचीं चिन्हें ढळढळीत दिसत असतील त्याकडे स्त्रियांचें मन ओढणें हा नैसर्गिक प्रकृतिधर्म होय. असें नसतें तर **डेसडेमोना** आणि **ऑथेल्लो** हें नाटक आपणांस पराकाष्ठेचें नीरस वाटलें असतें. असो. शरीरावर नानाप्रकारच्या रंगांच्या वेलचुट्या काढण्याचा प्रकार आजमितीस रसिक लोकांत जरी भूषणावह मानिला असला, व ' प्रियाकुचतटीं ' ' पत्रावली ' काढण्याची खोडि भगवान् श्रीकृष्णापासून जरी आम्हांपर्यंत आली असली, तरी गोंदण्याची मूळ पद्धत जिंकलेल्या लोकांवर पराभवाची कांहीं तरी टिकाऊ निशाणी ठेऊन देण्याच्या बुद्धीनें शोधून काढिली असावी, असें मानण्यास विपुल पुरावा आहे. आमचीं उभीं आडवीं गंधें व आमच्या बायकांचीं निरनिराळ्या तऱ्हांचीं कुंकवें, आमच्या गोपीचंदनाचे टिळे, आमच्या वैष्णवांच्या कृष्णरेषा, आणि आमच्या शैवांचें भस्मार्चन—हीं सारीं दास्यसूचक चिन्हें आहेत, असें वाटतें.

आतां आणखी एका आचाराविषयीं अल्प उल्लेख करून हें वरेंच लांबलेलें **व्यवच्छेदनप्रकरण** आटपतों. हा आचार केशवपनाचा. सध्यां या शब्दाचा विशिष्ट अर्थ होऊन गतभर्तृकांचें जें वपन त्यासच केशवपन म्हणण्याची चाल पडली आहे. बाकी पुरुषांच्या वपनास केशवपन कां म्हणूं नये हें समजत नाहीं. तथापि त्याबद्दल आम्ही वाद करित बसत नाहीं. क्षौर

निबंध संग्रह.
भाग १ ला. किं. १। रु.
३५५५. मॅनेजर,
सुधारक ऑफीस, पुणें.

हा दुसरा सामान्य शब्द चालण्यासारखा आहे. मृतपूर्वजांविषयीं व त्यांपासून उत्पन्न झालेल्या देवतांविषयीं, आणि अगदीं जवळचे आप्त मेले असतां त्यांविषयीं आपलें प्रेम प्रगट करण्याकरतां केशांचें मुंडन करण्याचा विधि फार पुरातन व सार्वत्रिक आहे. ग्रीक लोकांत, रोमन लोकांत, अलीकडील ख्रिस्ती लोकांत-सारांश बहुतेक सर्व लोकांत या मुंडनविधींचें लिंगभेदाप्रमाणें व आश्रमभेदाप्रमाणें कमीअधिक वर्चस्व दृष्टीस पडतें. कोठें दर महिन्यास किंवा पंधरवड्यास नखशिखांत वस्तरा चालविण्याची पद्धत आहे; कोठें कांहीं अपराधाबद्दल भिवया व पांपण्या काढण्याचीच चाल आहे; कोठें अर्धें डोकें, एक मिशी, व अर्धी दाढी काढण्यांतच मोठी शिक्षा होतें असें मानतात; कोठें डोक्याच्या मध्यावर एक चंद्र केला म्हणजे काम होतें; कोठें प्रतिपौर्णिमेस व अमावास्येस एक बट ठेऊन बाकीचे सारें डोकें व तोंड साफ करण्याचा प्रघात आहे; एकंदरीनें पहातां असें दिसून येतें कीं, शरीरावर वाढणाऱ्या या चिजेवर हवे ते प्रयोग केले तरी शरीराला म्हणण्यासारखी बाधा होण्याचा संभव नाहीं असें पाहून, तें करण्यास फारशी दगदग व खर्च पडत नाहीं असें मनांत आणून, आणि त्याचें पीक फिरून फिरून येणारें आहे असें जाणून, चर्चाच सुधारणा झाल्या असतां प्रत्येक राष्ट्रांत क्षौराच्या निरनिराळ्या तऱ्हांनीं जेवढें स्वामित्व, जेवढें प्रेम, आणि जेवढी धार्मिकता व्यक्त करतां येईल तेवढी करण्याचा प्रघात पडतो, असें दिसतें. मिशावर ताव देऊन घर्षण करणें, किंवा 'आमच्या मिश्या खालीं' असें म्हणून पड घेणें-या सामाजिक आचारांत पुष्कळच इतिहास आहे! तेव्हां स्त्रियांचा केशकलाप उतरून त्यांना पतिप्रेम प्रगटविण्यास लावणें किंवा पतीसमक्ष उत्तर-हिंदुस्थानांत त्यांच्याकडून वेणीदान करविणें या अज्ञानमूलक पद्धति भरतखंडाविशिष्टच आहेत असें नाहीं!

उपायन, कर, व बलिदान.

लॉर्ड लिटन् यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानच्या खजिन्यांत जी कोटी दीड कोटीची तूट पडली ती अफगाणिस्थानच्य लोकांस दिलेल्या देणग्यांमुळें पडली, असें म्हणतात. जनरल रॉबर्ट्स् यांनीं कंदाहारावर कुच करून जात असतां, अफगाणी लोकांस जितकें आपल्या शौर्यानें तितकेंच आपल्या औदार्यानें जेरीस आणिलें अशी त्या वेळेस लोकवार्ता होती. अफगाणिस्थानच्या डोंगराळ प्रदेशांतील लोक अगदीं निर्धन असल्यामुळें, जेव्हां आमचे कमँडरइन-चीफ कंदाहारच्या वाटेवर दोहों बाजूस तोडे फेंकीत चालले तेव्हां त्या लोभी कडव्या लोकांचें लक्ष तें गोळा करण्यांत व वांटून घेण्यांत व्यग्र होऊन गेलें, आणि आमच्या सेनापतीस अडथळा न होतां आपला मार्ग सुधारतां आला ! या कर्णोपकर्णी आलेल्या वार्तेंत तथ्य असो किंवा नसो, तीवरून एक सामान्य सिद्धांत असा निघतो कीं, उपायनांनीं शत्रूस कांहीं अंशीं वश करून घेतां येतें. आणि असें होणें स्वाभाविक आहे. पारितोषिकें, वायनें, दानें, उपहार आणि नजराहीं सर्व कसल्या तरी उपभोग्य वस्तूंचीं झालेलीं असतात. या उपभोग्य वस्तु प्राप्त झाल्या असतां ज्यांस त्या प्राप्त होतात त्यांनीं त्या देणारांवर सुप्रसन्न किंवा मेहेरबान व्हावें, हें स्वाभाविक आहे. शिवाय, अशा प्रकारच्या देणग्यांपासून आणखी एक गोष्ट व्यक्त होत असते तीं ही कीं, त्या देणारा आपणास बचकते

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंचीं शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं. ०५

खेडकरवैद्य ॲन्ड सन्स्

शनवार पेठ, पुणें.

असें त्या घेणारास वाटूं लागतें, आणि कांहीं अंशीं तें खरेंही असतें. ज्या कुत्र्यास पारध करण्यास शिकवलेली असते त्याला एखादे दिवशीं कांहीं सांपडलें नाहीं, तर तो निदान झाडाचें वाळलेलें पान किंवा एखादें चिपाड तरी तोंडांत धरून शेंपूट हालवीत हालवीत मोठ्या लाडानें धन्यास खुष करण्याचा प्रयत्न करील. यावरून काय दिसतें कीं अप्रबुद्ध प्राण्यांत सुद्धां अशा रीतीनें वरिष्ठाची मर्जी सुप्रसन्न ठेवण्यास आपणाकडून होण्यासारखी खटपट करण्याची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. आह्मीं मनुष्यें एकमेकांस ज्या देणग्या देतों त्या मुख्यतः दोन कारणांसाठीं देतों; तीं कोणती म्हणाल तर कोपशमन आणि स्नेहसंपादन. ज्याला कांहीं द्यावयाचें तो आपला शत्रु असल्यास त्यानें वैर विसरून जाऊन कोणत्याही प्रकारची पीडा देऊं नये अशा हेतूनें, किंवा जो मित्र असेल त्यानें प्रसंगविशेषीं उपयोगीं पडावें म्हणून आपण पदरमोड करून व स्वतःस झीज लाऊन घेऊन कधीं कधीं शत्रूस व मित्रास नझरा पाठवितों. एकदां अशा कारणास्तव नझरा पाठविण्याची चाल रूढ झाली म्हणजे स्या कितीही अल्प मोलाच्या किंवा शुष्क असल्या तरी चालतात. फार काय सांगावें, अशा कामास एखादा खडा, गवताची काडी, तुटलेला कैस, किंवा लांकडाची ढलपी सुद्धां बस होते. पेरू येथील डोंगरावर ओझीं चढवणारे हमाल डोंगराच्या माथ्यावर येऊन पोहोंचले म्हणजे ओझीं उतरून टाकतात, आणि शैलाधिपति **पचकामक** देवास अशी प्रार्थना करितात कीं, " हे प्रभो, त्वां आम्हांस या ओझ्यासकट सुरक्षित पणें वर आणिलें, याबद्दल आम्हीं तुझे फार आभारी आहों, व या तुझ्या उपकारांतून मुक्त होण्यासाठीं हे आम्ही आतल्या भिवईचे कैस तुला अर्पण करतों "—असें म्हणून प्रत्येकजण आपापल्या भिवईचा एकेक कैस उपटून टाकतो ! या देशांतही केल्येक ठिकाणी डोंगर चढून गेल्यावर खडा उचलून टाकण्याची

वहिवाट आहे, व अशा खड्यांचे मोठमोठाले ढीग जमलेले आहेत, हें पुष्कळांच्या पहाण्यांत व ऐकण्यांत आलें असेल. देणग्या देणें आणि त्या घेणें हा आचार प्रथम दोन अथवा अधिक विषम व्यक्तींत सुरू होतो, व पुढें तो समव्यक्तींतही पसरत जातो. कुळांनीं जमीनीच्या मालकांस, प्रजांनीं राजांस, भक्तांनीं देवांस, शिष्यांनीं गुरूंस—अशा रीतीनें दक्षिणा देण्याचा आणि घेण्याचा प्रघात पडतो. पुढें एका दर्जाच्या मित्रामित्रांतही त्या देण्याघेण्याचा प्रचार पडतो. दसऱ्याचें शुष्क सोनें थोर लहानांस व लहान थोरांस देतात व घेतात. संक्रांतीच्या 'शर्करावगुंठित' तिळांचीही तशीच स्थिति आहे. पण वाढणीं पाठविणें, लग्नास किंवा मुंजीस आहेर देणें, दिवाळीस ओंवाळण्या घालणें, आंब्यांच्या डाल्या धाडणें, एकमेकांच्या भुलांस फटाकडुग्याच्या पेट्या आणि गांठ्या पाठवून देणें—हे आचार घरोघरीच्या लोकांत चालतात. **सुधारकाच्या** एडिटरांनीं लॉर्ड रे **साहेबांस** अफुसाचे कांहीं निवडक दाणे पाठविले आणि ते त्यांनीं स्वीकारिले, किंवा **लेडी रीनें मिसेस** आगरकरणीस बाळंतविडा पाठविला, असें होण्याचा संभव नाहीं। अशा प्रकारची देवघेव **सरजेम्स फर्ग्यूसन** आणि **सरदार रा. ब. रास्ते** किंवा **लेडी रे** आणि **अक्कलकोटच्या** किंवा दुसऱ्या एखाद्या संस्थानच्या राणासाहेब—अशांच्या दरम्यानच होऊं शकणार. अशा प्रकारच्या देणग्या ज्यांच्यामध्यें चालतात ते परस्परास एका पदवीचे समजत असून, त्यांचा एकमेकांशीं

रसमंजरी:—यांत ८० रसायनाचे पाठ, बालचिकित्सा व सप्तधातूंचे जारणमारण आणि पाऱ्यावरील संस्कार शास्त्रोक्तरीतीनें दिले आहेत. किं. १। रुपया.

महाराष्ट्र औषधालय,
शनवार पेठ, पुणें.

पुष्कळ घरोबाही झालेला असतो. नहाणाच्या हळदकुंकवाचें बोलावणें भलत्याच घरीं जावयाचें नाहीं, व भलत्याच ठिकाणचें वाढणें यावयाचें नाहीं!

येथपर्यंत या आचाराच्या सामाजिक स्वरूपाचें दिग्दर्शन झालें. आतां याला राज्यप्रकरणांत व धर्मप्रकरणांत कसें वळण लागतें हें थोडक्यांत दाखवूं. वर दर्शाविल्यासारखे सामाजिक आचार रूढ झाले म्हणजे त्यांपासून समाज-स्थितीस अनुसरून राज्याचार व धर्माचार पडूं लागतात. ज्या लोकांची स्थिती पशुतुल्य आहे व ज्यांना देवतांची किंवा पिशाचांची कल्पना नाहीं, अशांत देवतांस किंवा पिशाचांस बलि मिळण्याचा संभव नाहीं, हें उघड आहे. पण त्यांच्या कल्पना येऊं लागल्या कीं त्यांसंबंधानें या आचारांचा प्रादुर्भाव होतो. देवता आणि राजा या दोहोंपैकीं आधीं उपायनें कोणास देण्यांत येऊं लागतात, याचा निश्चय बरोबर करतां येत नाहीं; तथापि केवळ वन्यावस्थेतून पार पडलेल्या उत्तर ध्रुवाजवळच्या एस्किमो लोकांसारख्या लोकांच्या स्थितीवरून असें दिसतें कीं, मनुष्याच्या मनांत राजाच्या आणि राज्याच्या कल्पना येण्यापूर्वी पिशाचांच्या व देवतांच्या कल्पना येऊं लागणें शक्य आहे. म्हणून कर, खंडणी, करभार यांच्या अगोदर बलिप्रदानें अस्तित्वांत येण्याचा संभव आहे. तसेंच हेंही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं, ज्याप्रमाणें देवतांच्या व पिशाचांच्या कल्पना येण्यापूर्वी त्यांस बलि देण्याचा प्रचार पडण्याचा संभव नसतो, त्याप्रमाणें ज्या लोकांत 'राजा' म्हणून कोणी एक इतरांहून कमी अधिक श्रेष्ठ मानिलेला असा व्यक्ति जेथपर्यंत अस्तित्वांत आलेला नसतो तेथपर्यंत त्या लोकांत राजभाग, राजांश, सरकार देणें, कर, खंडणी, सरकारदंड— असल्या कल्पना किंवा तदनुरोधी
र अस्तित्वांत येण्याचा संभव नाहीं. पुनः, याच विचाराच्या

ओघांत असतां वाचकांच्या लक्षांत हेंही येऊन जाईल कीं, ज्या देशांत एकसत्ताक राज्य कधींच स्थापण्यांत आलें नाहीं, किंवा आलें असून जेथें लोकसत्ताक राज्याची लौकरच स्थापना झाली अशा देशांत या राजकीय, देणग्यांची जी पद्धत असते ती ज्या देशांत एकसत्ता फार प्रबल आहे अशा देशांतील राजोपहार पद्धतीहून पराकाष्ठेची भिन्न व क्षीण असते. पाटिलकुळकरण्यांनीं हसे गोळा करून नेमल्या तारखेस तालुक्याच्या मामलेदार कचेरींत पोतें हजर करणें—ही अलीकडील कर घेण्याची पद्धत पुर्वीपासून अंमलांत आहे, असें समजणें फार मोठी चूक आहे; तसेंच असले कर गोळा करण्यासाठीं आतांच्या मामलतदारांसारखे दोन दोनशें रुपये दरमहाचे अधिकारी फार प्राचीन कालापासून आपापल्या राजासाठीं कर गोळा करीत आहेत, असें समजणें हेंही चूक आहे. समाज अत्यंत संकुचित किंवा मर्यादित असला, आणि त्याला नाण्याचा उपयोग ठाऊक नसला, म्हणजे त्यांत अशाप्रकारें राजभाग जमविण्याची चाल कोठून असणार ? समाजाच्या प्रथमावस्थेंत राजा म्हणजे एक विशेष बलवान् व चतुर पुरुष असतो. समाजांतल्या समाजांत जे तंटेबखेडे होतील ते मध्यस्थ होऊन कधीं बुद्धिबलानें व कधीं बाहुबलानें तोडणें, व दुसऱ्या जातीचा हल्ला आला असतां स्वजातीचें पुढारीपण पत्करून त्या अरिष्टांतून तिचा बचाव करणें— हें राजाचें मुख्य कर्तव्य. अशा समाजांत सामान्य प्रजेच्या आणि राजाच्या बाह्य स्थितींत म्हणण्यासारखें अंतर नसतें. राजाला तिन्हाइतीचें व अग्रणीचें काम करावें लागत असल्यामुळें तो इतरांहून थोडासा श्रेष्ठ गणला जात असतो, व

मांथिअनचीं बक्षिसें.

सुधारकांत प्रसिद्ध झालेली बोधप्रद लेखमाला. किं. ०१

सुधारक ऑफीस पुणें.

त्याच्या आणि त्याच्या कुटुंबाच्या चरितार्थासाठीं समाजांतील प्रत्येक घरांतून कांहींना कांहीं तरी पोहोंचवावें लागत असतें. जो जें पिकवीत असेल, किंवा ज्याचा जो धंदा असेल त्यानें त्यानें आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग स्वसंतोषानें राजाला आणून द्यावा, अशी रीत प्रथम पडते, व पुढें या रीतींतील स्वातंत्र्य नाहींसें होऊन सत्ताधीनत्व येतें. तथापि जोंपर्यंत राष्ट्राचें क्षेत्रफल संकुचित असून त्यांतील लोकसंख्या एका जातीचो व मर्यादित असते तोंपर्यंत हें सत्ताधीनत्व फारसें कठिण वाटत नाहीं. परंतु एका जातीचा दुसऱ्या जातीशीं संग्राम होऊन मिश्र समाज उत्पन्न झाला, व राष्ट्राचा विस्तार आणि लोकसंख्या हीं वाढलीं म्हणजे ही सत्ताधीनता जाचूं लागते. अखेरीस जेव्हां हिंदुस्थानासारखा प्रचंड देश मोंगला-सारख्या एखाद्या शूर लोकांच्या अंमलांत येऊन त्यांत जिंक-णारे आणि जिंकलेले असे दोन ढळक वर्ग होतात, तेव्हां राजास करभार देणें हें स्वसंतोषावर बिलकुल अवलंबून राहीं-नासें होतें. बाबरासारख्या किंवा अकबरासारख्या सुद्धां एकट्या बादशहास येवढ्या देशावर राज्य करणें अशक्य असल्यामुळें त्याला ठिकठिकाणीं आपल्या प्रतिनिधींची स्थापना करावी लागते. या प्रतिनिधींनाहीं आपापले मुलूख आवरण्यासारखे नसल्यामुळें पोटप्रतितिधि नेमावे लागतात. याप्रमाणें सार्वभौम बादशहापासून पेठ्याच्यां तहशीलदारापर्यंत एकाहून एक उतरत जाणाऱ्या अधिकाऱ्यांची परंपरा लागत जाते, आणि हे सर्व जिंकणाऱ्या लोकांपैकीं असल्यामुळें त्यांचा अंमल मोठ्या सक्तीनें चालतो. प्रत्येकास आपला व आपल्या तैनातीचा खर्च भागवून शिवाय वरच्या अधिकाऱ्यास बराच ऐवज प्रतिवर्षी भेट किंवा खंडणी म्हणून पोहोंचवायाचा असतो; व ज्याच्याक-डून विशेष खंडणी येईल त्याची बादशहाच्या दरबारांत तारीफ होऊन त्याची विशेष चढती होण्याचा संभव असल्यामुळें, व

ज्याच्याकडून कर्मी खंडणी येईल त्यावर इतराजी होऊन त्याला बडतर्फी मिळण्याचा संभव असल्यामुळें जो तो आपापल्या ताब्यांतील लोकांस जितकें नाडवेल तितकें नाडून आपली व बादशहाची तुंबडी जितकी भरवेल तितकी भरण्याचा प्रयत्न करित असतो; आणि असें करण्यांत त्यास शस्त्रबलाचें भरपूर सहाय्य असल्यामुळें लोकांची पराकाष्ठेची जाचणूक होते. उत्पन्नाचा अमुकच वाटा राजभाग असा निर्बंध अशा स्थितींत बिलकुल चालत नाहीं. राजाकिंकर जितकी माया निघेल तितकी काढीत असतात. अशा प्रकारच्या संमिश्र समाजांत नाणें चालूं असलें म्हणजे राजभाग उत्पन्नरूपानें न घेतां द्रव्यरूपानें घेण्याचा प्रघात पडतो, व या प्रघातामुळेंही प्रजेस फार त्रास होतो. राजाचें मागणें असेल तेवढी रक्कम जिवाच्या व भावी सुखाच्या आशेनें आपला माल जाईल त्या दरानें विकून उभी करावयाची, हें किती कष्टावह आहे बरें ? तथापि अशा स्थितींतही मनुष्यें उत्पन्न करीत असतात व राजदेणें देत असतात ! ब्रिटिश सरकारच्या पदरीं असलेल्या नोकरांचे पगार मोठे असल्यामुळें लांचलुचपतीचा प्रकार बेताबातानें चालतो. पूर्वी यूरोपांत, अमेरिकेंत, व आशियांत सरकारी नौकरांस मुळींच पगार मिळत नसल्यामुळें, किंवा अगदीं लहान मिळत असल्यामुळें, त्यांना आपले पगार काढून शिवाय राजभाग काढावा लागत असे. यामुळें गांवच्या पाटलापासून थेट बादशहापर्यंत ज्याला आपण अलीकडे लांच म्हणतो तो सर्वत्र राजरोस घेण्यांत येत असे. प्रसिद्ध इंग्लिश तत्ववेत्ता लॉर्ड बेकन याची लांचखा-

---

ब्रह्मी बाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

रुपणाचद्दल प्रसिद्धी आहे. त्यावर **स्पेन्सर** साहेबाचें असें म्हणणें आहे कीं, ही त्यावेळची रीतच होती. साऱ्याच न्यायाधीशांस व इतर अधिकाऱ्यांस अशा रीतीनें आपल्या पगाराची भरती करून घ्यावी लागत असे; व ती किती करावी याला कोणत्याही प्रकारची ठरीव इयत्ता न ल ।मुळें, कांहींकडून योग्य मर्यादेचें, उल्लंघन होई यांत कांहीं नवल नाहीं. आमचेकडील कांहीं नेटिव संस्थानांत व कित्येक रेलवे कंपन्यांत आज या स्थितीचें जिवंत उदाहरण सांपडेल. तात्पर्य काय कीं प्रथमावस्थेंत स्वसंतोषानें देण्याचीं जीं स्वल्प राजोपायनें असतात त्यांपासून अखेरीस कर, तिजोरी, आणि नोकरांचे पगार या तीन गोष्टी उत्पन्न होतात.

हें राजकीय जमाबंदीचें प्रकरण नीट समजलें असतां, देवस्थानें आणि त्यांचीं उत्पन्नें कशी अस्तित्वांत येतात, हें समजणें मुळींच कठीण नाहीं. सध्यां पृथ्वीच्या पाठीवर जे रानटी, अर्धवट सुधारलेले व पूर्ण सुधारलेले लोक आहेत त्यांच्या सांप्रत स्थितीचा आणि पूर्वापार इतिहासाचा ।विचार केला असतां स्पष्टपणें असें दिसून येतें कीं, ज्याला आपण सध्यां चालि ह्मणतों, ह्मणजे देवताभाग ह्मणतो, त्याची उत्पत्ति सामान्य उपायनांपासून ह्मणजे सामाजिक देणग्यांपासून झाली आहे. देवतांची कल्पना महापुरुषांच्या पिशाचापासून आली असल्यामुळें व पिशाच्यांचे व्यवहार जिवंत मनुष्याप्रमाणेंच चालतात असा प्राथमीक लोकांचा विश्वास असल्यामुळें ज्याप्रमाणें बैल, घोडा कुत्रा, ससे, कोंबडीं वगैरे जनावरें जिवंत राजास नजर करण्यांत येतात, त्याप्रमाणें तीं त्यांच्या थडग्यावर त्यांच्या पिशाचांच्या चरितार्थासाठीं कापण्यांत येतात; व त्याच पिशाचांपासून निर्माण झालेलें जें महापिशाच ह्मणजे देव त्याच्या मंदिरांत ह्मणजे देवळांतही या प्राण्यांचा संहार करण्यांत येतो. शिजलेल्या अन्नाच्या राजास मेजवान्या देतात; तें त्यांच्या थडग्यांत किंवा चितेंत घालतात,

आणि देवांपुढें नैवेद्यरूपानें मांडतात; सदर्हू प्रमाणें नव्यानवा
ळीची नझर जिवंत राजाला, मृतराजाला, व देवाला करतात
आवळे, चिंचा, मोहोर वगैरे देवास वाहण्याच्या प्रचाराची आठ-
षण वाचकांस दिली पाहिजे असे नाहीं. दूध, तूप, मध, र
ताडी, मादिरा सोम इत्यादिकांचीं वायनें जशीं नृपतीला.
मृतापितरांना त्याप्रमाणेंच देवांनाहीं अर्पण करतात. ज्याप्रमा
जिवंत राजापुढें व मृतपितरांपुढें, त्याप्रमाणेंच देवापुढेंहीं धूपदी
जाळायाचे आणि गंधदान करावयाचें ! सारांश राजा, राजवाड
आणि राजभाग; मेलेले पितर, थडगीं किंवा चिता; आणि श्राद्धा
व देव, देवालयें, आणि बलि अथवा नैवेद्य-या तीन त्रयी
पराकाष्ठेचें साम्य आहे. यांपैकीं पहिलीपासून दुसरीचे, आ
दुसरीपासून तिसरीचे विधि व आचार अनुकरणानें अस्तित्व
आले आहेत. तेव्हां राजवाड्यांत ज्याप्रमाणें राजसेवकांची त्य
प्रमाणें देवांच्या भोंवतीं गुरवांची, चडव्यांची, आणि गयावळां
गर्दी असते, आणि राजस्थानाप्रमाणें देवस्थानांचाही थ
उठून जाऊन तीं शेंकडों वर्षें अव्याहत चालतात, यांत कां
नवल नाहीं.

भेटी, देवदर्शनें व यात्रा.

आपल्या भाषेतील 'भेट' हा शब्द द्व्यर्थी आहे. 'भेट' ह्मण
एकानें दुसऱ्याकडे जाणें, हा एक अर्थ. नसेंच जातांना देण्या
रितां बरोबर घेतलेली, किंवा न जातां एकानें दुसऱ्यास धाड

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें

ठेली जी वस्तु तिलाही ' भेट ' ह्मणतात. मागल्या लेखांत या सऱ्या अर्थाच्या भेटी पाठविण्याचा प्रघात कसा पडत जातो, सांगितलें आहे. आतां 'भेटीच्या' पहिल्या अर्थाच्या संबंधानें डेसें लिहावयाचें आहे.

उपायनें विशेषतः कनिष्ठाकडून वरिष्ठास देण्यांत येतात हें गं सांगण्यांत आलेंच आहे. तेव्हां हीं नेऊन देण्यासाठीं निष्ठांनीं वरिष्ठाचे घरीं जाण्याची चाल पडते हें स्वाभाविक हे. राजाकडे किंवा देवाकडे रिक्त हस्तांनीं जाऊं नये, अशी मान्य शास्त्राज्ञा किंवा फार प्राचीन कालापासून चालत ेला संप्रदाय आहे. यावरून ज्या देशांत किंवा लोकांत सत्ता स्थापन झाली नाहीं, किंवा ज्यांना मेलेल्या आप्तांस वा त्यापासून निर्माण होणाऱ्या देवतांस बलिसमर्पण केलें हेजे, असें वाटूं लागलेलें नाहीं, त्यामध्यें एकानें दुसऱ्याकडे ण्यास जाण्याचा चाल असण्याचा संभव नाहीं. तां भेट घेण्यांत नेहमीं ' मी तुमचा किंकर किंवा ाधारक सेवक आहे ' असें दाखविण्याचाच हेतु असतो ा नाहीं. कनिष्ठांनीं वरिष्ठांविषयीं आपली निष्ठा प्रदर्शित ण्यासाठीं जाणें, हा भेटीचा मुख्य हेतु खरा. परंतु अलीदुसऱ्याही अनेक कारणांसाठीं एकमेकांच्या भेटी घेण्यांत ात. आपणांपैकीं एखादा जिज्ञासु मनुष्य इंग्लंडांत गेला ातां **स्पेन्सर**सारखा तत्ववेत्ता किंवा **ग्लॅडस्टन**सारखा ाम्रणी घरीं बागतो कसा, अभ्यास करतो कसा, सामान्य ांशीं बोलतो कसा, वगैरे गोष्टी प्रत्यक्ष पहाण्याच्या इराद्यानें ठा भेटण्यास जाईल; तसेंच, कोणा एखाद्या मनुष्यास ऱ्याच्या वर्तनांत विशेष दोष दिसल्यास त्याला तो दाखण्यासाठीं त्याची भेट घेणें इष्ट वाटेल ; किंवा एखाद्य परोपी सखवस्तु गृहस्थाला कोणी मनुष्य संकटांत पडला

आहे असें समजल्याबरोबर त्यास मदत करण्याची बुद्धि हो त्याच्या घरीं जावेसें वाटेल. तेव्हां अलीकडील प्रत्येक भे प्रणिपातपूर्वक प्रभुभक्ति प्रदर्शनाचा आशय असतो, म्हणता येणार नाहीं. ' तथापि ' भेट ' घेण्याची मूळ प्रवृ पडण्यास श्रेष्ठाला अभिवंदन करून त्याची मर्जी आपण सुप्रसन्न करून घेण्याची इच्छा कारण झाली असावी दिसतें.

उत्तर ध्रुवाजवळच्या एस्किमो सारख्या ज्या लो राजपुरुष अस्तित्वांत आलेला नाहीं त्यांत भेटीचा संप्रदाय स्वल्प आहे किंवा मुळींच नाहीं, असें त्यांविषयीं चौकस श्यांनीं प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून दिसतें. एकंदरीनें प भेटी घेण्याचा प्रचार मिश्र समाजांत फार दृष्टीस पडतो. ए जातीच्या लोकांनीं आपल्यापैकीं एकास आपला राजा। नायक केलें तरी त्याविषयीं आपली निष्ठा प्रगट करण्यास त्याला वारंवार भेटण्यास जाण्याची चाल पडत नाहीं त्यालाही त्या गोष्टीची इतकी परवा वाटत नाहीं. पण समाजाची तशी गोष्ट नाहीं. एका जातीच्या लोकांनीं दु जातीच्या लोकांस जिंकिलें असतां जिंकणाऱ्या जातं लोकांस, व विशेषतः त्यांचे नायक राजानिष्ठ आहेत नाहींत, हें पहाणें विशेष अगत्याचें असतें. यामुळें समाजांत मुख्य नायकास म्हणजे राजास किंवा बादश उपनायकांनीं म्हणजे मांडलिकांनीं वारंवार भेटण्यास जाण प्रघात पडतो दिल्लीचे मोंगल बादशहा किंवा पेशवे मोठमो

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड करणारें महाराष्ट्रांतलि एकटेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी

ूर भरवून मांडलिकांकडून नजराणें घेत व त्यांना पो-
-दत, हें सर्वांस ठाऊक आहेच. सध्यांही राणीच्या वाढवि सास
व्यांचे गव्हर्नर व हिंदुस्थानचे व्हाइसरॉय दरबार भरवून
ुकांस पोषाख व पदव्या देतात, आणि मधूनमधून नॉनऑफि
ल लोकांच्या भेटी घेण्यासाठीं छोटेखानी दरबार किंवा
करतात, त्यांचें इंगित तरी हेंच आहे. राजदरबारांत हजर
स्वामीस मुजरा करणें आणि नजराणा देणें यांत 'मी
पा दास आंहे; मला तुमचा अंमल मान्य आहे, व मी
याविरुद्ध कोणत्याही प्रकारची फंदफितुरी करण्यांत गुंतलों
असें दाखविण्यासारखें होय; निदान भेटीस येणाऱ्याच्या
वर्तनावरून तरी तसें अनुमान करणें भाग पडतें. त्याच्या
, बोलावणें गेलें असून जो दरबारास आला नाहीं, किंवा
ा नजराणा पाठविला नाहीं अशाच्या मनांत कांहीं तरी
ंद्धि उत्पन्न झाली आहे असा तर्क होऊं लागतो, व सर्व
लोकांस सक्तीनें दरबारांस बोलावून आणून त्यांच्या
ा नजराणे घेण्याचा आणि त्यांस राजधानींत कांहीं
ज्ञाभरहाण्यास लावण्याचा प्रघात पडतो. या कामासाठीं
ठेवा व राजाधिराजे पाहिजे तितका खर्च करण्यास
र असतात; पण एकूनएक मांडलिकानें वर्षांतून एकदोन
तरी राजदरबारीं येऊन आपली स्वामिभक्तीची हजिरी
द, असें त्यांस वाटत असतें. पर्वांपर्यंत जपानांतील सरदा-
त किंवा मांडलिकांस आपापल्या जहागिरींत वर्षांतील बारा
यांपैकीं फक्त सहा महिने घालविण्याची परवानगी असे
सहा महिने त्यांनीं येड्डो येथें घालवून प्रपंचसुख अनुभवावें
निर्बंध असे. प्रपंचसुख असें म्हणण्याचें कारण असें कीं,
रदारांनीं बंडखोर न व्हावें म्हणून त्यांचीं बायकामुलें
'ओलीस' म्हणून नेहमीं राजधानींत ठेवलेली असत ! आपल्या
सखोर मोंगल बादशहांच्या अंमलांत तर या प्रचाराच्या

हास्यास्पदतेची कमाल होऊन गेली होती. या बादशहांपैकी किल्येकांच्या अमदानींत ठरीव सरदारांनीं दिवसांतून दोन वेळ म्हणजे सकाळीं अकरा वाजण्याचे सुमारास न्यायनिवाडा चालला असतां, व रात्रीचे दहाचे सुमारास राजकीय प्रकारणांचा वाटाघाट होत असतां, तख्ताधिपतीस सलाम करण्यास आलें पाहिजे, असा नियम असे ! कोणास ही कदाचित् अतिशयोक्ति वाटेल; पण जम्मू व काश्मीर येथें ही प्रात्याहिक द्विवार प्रणीत पद्धति आजामितीस जागृत आहे. तसेंच आमच्या एका मित्रानें एकदां आह्मांस असें सांगितल्याचें स्मरतें चवड्याासारख्या इंग्रजी धर्तीवर आलेल्या संस्थानांतही कांहीं वृद्ध राजभक्त अहेत कीं, महाराज राजधानींत असोत किंवा नसोत, त्यांना वाड्यांत जाऊन महाराजांच्या गादि निदान वाड्याला तरी, सकाळसंध्याकाळ मुजरा केल्याशिवाय अन्न गोड लागावयाचें नाहीं ! असो ज्या ठिकाणीं सर्वांनीं मुख्य नायकास किंवा राजास भेटण्यास येणें सोयीचें नसतें त्याठिकाणीं त्यांनीं त्यांच्या प्रतिनिधींस मंत्र्यांस भेटावें असें ठरविलेलें असतें; म्हणजे मांडलिक महाराजास भेटावें व सामान्य लोकांनीं मंत्र्यास भेटावें असा नियम होतो; व हाच नियम थोड्याशा भेदानें येथे जे दरबार प्रतिवर्षी भरविण्यांत येतात, त्यांत दृष्टीस पडतो.

मोठमोठे राजे आणि त्यांचे मांडालिक यांच्या अन्योन्य भेटी हा प्रकार झाला. त्यांचेंच अनुकरण इतर पदवींचे लोक करतात कनिष्ठानें वरिष्ठास भेटण्यास जावें हा साधारण नियम; जर

वैद्यकपत्रिका:— हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधी माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें

ां कनिष्ठास भेटावयास गेला तर तो अनुग्रह समजावयाचा.
ंदारांनीं सावकारास, कुळांनीं जमीनदारास, पक्षकारांनीं
ल्लास, शिष्यांनीं गुरूस, धाकट्या भावांनीं वडील भावास,
ांनीं मातापितरांस, खालच्या अधिकाऱ्यांनीं वरच्या अधिका-
स, व सांसारिकांनीं परमार्थरतास भेटण्यास जावें अशी पद्धत
त्र पडली आहे, व हिचें उल्लंघन चांगल्या कारणांशिवाय
ंही होत नाहीं. दसऱ्यासारख्या किंवा संक्रातीसारख्या
ास प्रत्येक वर्गातील मोठमोठ्या लोकांनीं बिछायती घालून
ुजऱ्या किंवा डाव्या बाजूस पानसुपारीचीं ताटें ठेवून भेटीस
ाऱ्या मंडळीची वाट पहात बसावें, हा या सणांस एकमेकांच्या
ा घेण्याचा जुना प्रकार होय. अंत अलीकडे वरचेंच अंतर
ठ आहे, व पुढें याहूनही अधिक होण्याचा संभव आहे.
ण सुधारलेल्या किंवा सुधारूं लागलेल्या देशांत
ा प्रकारची समता वाढत असते, व या समतेमुळें एका पक्षाची
नीयता आणि दुसऱ्या पक्षाची पूजकता यांचा हळूं हळूं लोप
ा असतो. समाजरचनेचीं आद्यबंधनें बलात्कारात्मक असतात
तोंपर्यंत किंवा ज्या बाबतींत हें बलात्कारतत्व जारीनें अंमलांत
तें तोंपर्यंत व त्या बाबतींत कनिष्ठांचा वरिष्ठांशीं वर सांगि-
याप्रमाणें व्यवहार चालतो. युरोपांतील सुधारलेल्या देशांत
ज मित्तीस लष्करी खात्यांतील अधिकाऱ्यांचे एकमेकांशीं
णण्याचे जे नियम आहेत ते इतर खात्यांतील नियमांपेक्षां
ो सक्तीचे आहेत. ज्या देशांत एकसत्ता प्रचल असते त्यांतील
वारांची रहाटी बऱ्याच अंशीं लष्कराच्या रहाटीसारखी असते
ह्मणण्यास हरकत नाहीं. एकसत्ता क्षीण होत जाऊन
क सत्ता प्रचल होत गेली, आणि लोकांत ज्ञानाचा
णि संपत्तीचा बराच प्रसार झाला ह्मणजे बलात्कारतत्व
ास जाऊन संमतितत्व तत्स्थानापन्न होतें, आणि तसें
ह्मणजे सामाजिक व राजकीय आचारांस समतेचें

वळण लागूं लागतें. धर्मसंबंधानेंही अशाच प्रकारची स्थित्यं तरें होत जातात पण त्यांस थोडासा अधिक काळ लागतो धर्माचार राज्याचारांच्या अगोदर अस्तित्वांत येऊन त्यांचें वैरूप्यही त्यापेक्षां सावकाशीनें नाहींसें होतें. राजाच्या अगोदर देवाची कल्पना येत असल्यामुळें व देव हा राजाहून मोठा मानिला असल्यामुळें राजाविषयीं पूज्यबुद्धि नाहींशी झाली तरी देवाविषयीं ती नाहींशी होत नाहीं, व राजे आणि राजवाडे पंचत्वाप्रत गेले तरी देवालयांत जाऊन प्रार्थना करण्याची पद्धत सुरू असते. धर्मसंबंधाचें वरेंच ज्ञान वाढलें तर एवढाच भेद होतो कीं, शुद्ध पाषाणास किंवा मनुष्याकृति पाषाणमूर्तीस देव कल्पून, व त्यांचे ठाईं मनुष्य स्वभावासारख्या देवस्वभावा कल्पना करून, मनुष्याच्या अन्तर्बाह्येंद्रियांस ज्या गोष्टी समाधान व आनंद होतात, त्याच गोष्टींनीं शिलाकार देवतांस संतोष होत असेल असें मानणें बरोबर नाहीं असे वाटूं लागे सजीव व निर्जीव पदार्थांच्या बलिप्रदानानें त्यांचें अर्चन करा त्यांस सुप्रसन्न करून घेण्याचा प्रघात मागें पडत जातो, व मूर्ति शून्य अशा मंदिरांत नियमितकाळीं व दिवशीं निराकार परमेश्वर प्रेमपूर्वक डोळे मिटून, हात जोडून; गुढगे टेंकून व प्रणिपात करू भजण्याची व स्तवण्याची पद्धति सुरू होते, ख्रिस्तधर्म, मुसलमा धर्म व इकडील कांहीं धर्मपंथ अशा प्रकारचे आहेत. मूर्तिपूजेलय होऊन निराकार ईश्वररूपाचें ध्यान होऊं लागणें हें धर्म चरेंच उन्नत स्वरूप होय यात संशय नाहीं. तर हें स्वरूप प्राप्त झालें असतांहीं, तदनुयायांस मूर्तिपूजाकाल

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ-प्रकाशन काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

लागलेल्या साऱ्या सवई नाहींशा होत नाहींत. ख्रिस्ती व मुसल-
मान लोकांनीं फक्त मूर्तिपूजा काय ती टाकली आहे; बाकी
त्यांचे इतर धर्माचार बऱ्याच अंशीं आम्हा मूर्तिपुजकांच्यां।
धर्माचारासारखेच आहेत. जात प्रेतादिकांच्या संस्काराचें बंड जसें
आम्हांत तसें त्यांतहीं अद्यापि बरेंच आहे. धर्माधिकाऱ्यांचें
वर्चस्व जसें आमच्या इकडील अज्ञ लोकांवर व स्त्रियांवर
अजून जबर आहे, तसें तिकेडेही आहे. इकडील भाविक जसे
प्रत्येक दिवशीं देवदर्शनास जातात, त्याप्रमाणें प्रत्येक दिवशीं
मशिदींत जाऊन निमाज पढणारे व **चर्चांत** जाऊन **प्रेअर**
करणारे भाविक त्यांच्यातही आहेत. ज्याप्रमाणें देवास भेट-
ण्यास व भजण्यास घरापेक्षां देऊळ विशेष सोईचें आहे असें
आम्हांस वाटतें त्याप्रमाणें ख्रिस्त्यांस व मुसलमानांसही वाटतें.
पवित्र भूमीस यात्रा करण्याची उत्कंठा क्रूसवाल्यांच्या अंत:-
करणांत एकदा जेवढी प्रबल होती तेवढी आतां नाहीं हें
मेंचूल केलें पाहिजे, पण श्री काशीस जाऊं इच्छिणाऱ्या भाविक
मनेंद्रूंची संख्या मक्केस जाऊं इच्छिणाऱ्या महंमदीयांच्या
यासंख्येपेक्षां जास्त असेल असें आम्हांस वाटत नाहीं.
ज कदाचित् जातिभेदाच्या व परधर्मीयांकडून धर्मांतर करवि-
ण्याच्या वगैरे संबंधानें मुसलमान व ख्रिस्ती धर्मांस
साशेष **श्रेष्ठत्व** आलें आहे असें कित्येकांचें म्हणणें असेल, व
तसें कदाचित् तें बरोबरही असेल; त्याविषयीं आम्हांस कांहीं एक
म्हणावयाचें नाहीं. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, धर्मसंबंधीं
मूलतत्वें, ठोकळ समजुती, आणि सामान्य आचार आम्हां
सर्व लोकांत सारखेच आहेत, व देवाच्या भेटीस जाण्याचा
व जाजे देवदर्शन घेण्याचा आचार आजमित्तीस आम्हांत जित-
का रूढ आहे तितकाच त्या दोन मुर्तीस न भजणाऱ्या लोकां
तही आहे. ख्रिस्ती लोकांत अर्वाचीन ज्ञानप्रसारामुळें
त्यांचा नाद बराच कमी झाला आहे, व

चर्चेला जाणाऱ्यांची संख्याहा प्रतिवर्षी कमी होत आहे. ह्य स्थित्यंतराच्या बरेवाईटपणाविषयीं अभिप्राय येथें देण्याचें का रण नाहीं. येथें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, ज्या ज्ञाना मुळें ख्रिस्तीलोकांच्या धर्मवृत्तींत असा बदल झाला ओ तेंच ज्ञान इकडे पसरलें, (व पसरणार याविषयीं यत्किंचि संशय दिसत नाहीं) तर या देशांतील लोकांच्या धर्मवृत्तींतह तसें स्थित्यंतर होणें अपरिहार्य आहे.

पुण्याचे लोकांनो, सावध व्हा सावध व्हा.

आज सर्व महाराष्ट्रभर तुमची कीर्ति दुमदुमत आहे त कां ? तुमच्या आंगीं स्वदेशाभिमान, बुद्धिमत्ता, वक्तृत्व, स्पष्ट वक्तेपणा, स्वातंत्र्य इत्यादि अनेक गुण तुमच्यांत वास करी होते म्हणून ? कोणत्याही शहराची कीर्ति त्यांतील सुशिक्षित पांचचार गृहस्थ असतात त्यांवर अवलंबून असते. त्याप्रमा तुमचीही होती. परंतु आतां मात्र ती एका उदार, बुद्धिमा सहिष्णु, सुशील परोपकारी व तुमच्याविषयीं रात्रंदिवस कळक बाळगणाऱ्या पुरुषावर अवलंबून आहे. जर तुमच्या दुर्दैवा अशा महंतास बाहेर जाणें भाग पडलें तर तुमची स्थिति होण काय ? तुम्हांला तर चटोरपणाची, अपमान करण्याची, कृत पणाचीं इतकी संवय लागून गेली आहे कीं थेट वामनरावापास

संगीत सुविचार-विजय नाटक.

आ. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

तों विनाकारण बी. ए. पर्यंत असें करण्यांत तुम्हाला गौरव वाटतो. विद्येनें, अधिकारानें, संपत्तिनें, सहिष्णुत्वानें व इतर पुष्कळ नैसर्गिक गुणांनीं तुमच्याहून जे श्रेष्ठ त्यांची विटंबना करणें, अवहेलना करणें (व ती तरी कोणाकडून, ज्या पोरांना विद्येचा गंध नाहीं, देशसुधारणा, देशसेवा, सामाजिक सुधारणा इशा विषयांवर ज्यांना मत देण्यास अधिकार पोहोंचत नाहीं शा पोरांकडून) या सारखें महत् पातक दुसरें कोणतें ? धड-ोडीत आज आपण डोळ्यांनीं पाहतों कीं पुण्यांतील एक हिरा शिवर गमावला वर तसा किंवा तशा सारखा दुसरा मिळणें म्हणजे रफोण पंचाईत ! कृष्णशास्त्री, केरूनाना, विष्णुशास्त्री, माधवराव यांच्यासारखे अस्से लोक निर्घृण काल एका पाठीमागून एक बलात्कारें माझून नेत आहे. अशा लोकांच्या मरणानें समाज बंधनाच्या विल्याावश्यक सांखळ्या अचानक गळून पडताहेत. अशी स्थिति रफसतां अजून देखील तुम्ही जागें होऊं नये काय ? अशा ांचेंडी तुमच्या शहरांत पडतांना तुम्ही पाहून स्वस्थ बसणें, नेंदवा झालेल्या स्थित्यंतराची कल्पना सुद्धां तुमच्या मनांत न ाडेल्यांग हें कोणच्या स्थितीचें दर्शक होय बरें ? अशी कल्पना ा ांद्वारा कीं गांवांत एक परदेशाहून विद्वान मनुष्य आला व त्याला या ाडील वादग्रस्त विषयावर माहिती करून द्यावयाची आहे तर स ाच्या गांवांत पांचचार लोक आहेत कां कीं ज्यांचीं मतें ारां द हीं विषयावर ठाम झालीं आहेत. वाचाळपणा पुण्यांत तर ल ण ार का माजला आहे कीं, वाटेल त्यानें वाटेल त्या विषयावर स ावें व यथेच्छ तोंडसुख घ्यावें असा पुरुष एखादा सांपडेल ो र ा जो विषयासंबंधानें पूर्ण माहिती मिळवून बोलेल. बाकी स उ ा साहेबांसारखे गृहस्थ येवोत, आमची पुण्यांतील मंडळी म्ह ोच्याजवळ सुद्धां बाता झोडायला तयार ! फॉरेस्ट संबंधानें हेती विचारा कीं उगलेच आमच्यांतले एखादे स दिली

माहिती २।३ वाक्यांत ठोकून ! अचकारी खात्यासंबंधानें काय, जमाबंदी काय, मिठा संबंधानें काय, माहिती म्हणजे ओतप्रोत. माहिती इतकी भरपूर कीं वर्तमानपत्र चालविण्याची तर कधींच पंचाईत पडत नाहीं.

पुण्यांतील लोकांनो, ज्यांना ज्यांना म्हणून तुमची आंतर्ल माहिती आहे ते सर्व तुमची दिखाऊ विद्वत्ता पाहून गालांत ल्यागालांत हांसतात. कांहीं लोकांना तर तुमचा वृथाभिमान पोकळ गर्व व वरकांती विद्या पाहून तिटकारा येतो. बरें इतकें असून बढाई कोण ? ह्याला काय येतें, त्याला काय येतें, तो को शाहणा, त्याचेंच का ऐकावें अशी तर घमंडी. विचारवैचित्र्य विचारस्वातंत्र्य यांशिवाय मनुष्याची उन्नति व्हावयाची नाहीं खरें परंतु एवढयाच करितां मनुष्यानें बहकत सुटणें हें माणुसकी काम नव्हें. केवळ विषयांची पूर्ण माहिती म्हणजे विषय सर्व नव्हे हीही गोष्ट प्रत्येकानें ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. ही झा शिक्षण मिळालेल्या लोकांची स्थिति.

मध्यमप्रतीचे शिक्षण मिळालेल्या लोकांची स्थिति याहून भयंकर आहे. मोठया माणसास भरसभेंत वेडयाचा करणें, वडी माणसांचा मान न राखणें, अश्लील शब्द उच्चारणें, अर्था अनर्थ करणें ह्या गुणांचें आदिपीठ पुणेंशहर होऊन बसलें आ पुण्यांतील लोकांनीं अजून तरी जागे व्हा. आम्ही पुण्यपत्त वासी आहोंत असें म्हणण्याची देखील लोकांस शरम वाटू लागर बाहेर गांवच्या लोकांना तुमची किंमत कळून चुकली. एं

संगीत समाजादर्श नाटक.

य. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपा

'संदेश' एजंट, पुणें सिटी.

लोकांना जसा कोअर्शना आक्ट लावला तसा येथील लोकांना लावला तर कांहीं चांगला परिणाम झाला तर होईल. कांहीं सुशिक्षित लोकांचा असा समज आहे की हा परिणाम शिक्षणाचा नव्हे इतिहासांत हें शिक्षण मिळतें, कां गणितांत मिळतें कां रसायन शास्त्रांत मिळतें. असें ते विचारतात. त्यांना उत्तर येवढेंच कीं तें हिराबागेंत मिळतें. हल्लींची पुण्याची स्थिति आफ्रिकेंतील कोणच्याही रानटी शहरापेक्षां अधिक चांगली आहे असें म्हणावयाला आज कांहीं जागा नाहीं कोणच्याही संभावित मनुष्याला किंवा स्त्रीला तुमच्या शहरच्या समाजापुढें येऊन बोलावें असें वाटणार नाहीं. तुम्हीही आपली भयंकर स्थिति ओळखून सुधारण्याचा प्रयत्न जर न कराल तर याचा परिणाम याहूनही भयंकर होईल. मुळीं हीच स्थिति सुधारण्याला पांच चार वर्षें लागतील. ज्यांना ज्यांना म्हणून पंडितारमाबाईचे हिरावागेंतील शिक्षणाची आठवण होईल त्यांच्या आंगावर रोमांचच उभे राहतील व पुण्यातील उच्च प्रतीचे ब्राम्हणाला विद्येनें अतिशय मागासलेल्या लोकांत सांपडणाऱ्या अश्लील शब्दांचे चाळकडूच दिलें आहे अशी पक्की खातरी होईल. स्त्रीशिक्षणास लोकांची संमति असो किंवा नसो; ६०।७० कोसांवरून ह्या विदुषी बाई इतर शांत स्त्रियांनीं कसकसे पराक्रम केले हें सांगण्यास मुद्दाम जातील, पण त्यांचें भाषण सावधान चित्तानें ऐकून घेण्याइतका सभ्यपणा पुण्यांत (जें विद्येचें माहेरघर असें लोक म्हणतात ! !) नसावा ही गोष्ट फार लाजिरवाणी आहे. म्हणणाऱ्या लोकांची अशी समजुत आहे कीं, पुरुष समाजामधें ज्या असल्या म्हणजे पुरुषांवर एक प्रकारचा दाब असतो. गीतांचे शब्द स्त्रियांपुढें उच्चारण्यास त्यास शरम वाटते. आमच्या पुण्याची स्थिति त्याहून अगदीं उलट; कारण याचे लोक पडले फार शहाणे. अशा वेळीं त्यांच्या नीतीला पाला फुटतो.

जोंपर्यंत स्त्रीजातीविषयीं व स्त्रियांच्या असाधारण गुणाबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली नाहीं, जोंपर्यंत स्त्री म्हणजे प्रजाजनन यंत्र होय, जोंपर्यंत स्त्री तुमची दासी होय तोंपर्यंत हा उद्धामपणा व बेशरमपणा जाणें फार कठिण आहे. लोकशिक्षणाकरितां ज्यांचें जनन अशी पुण्यांतील कांहीं वर्तमानपत्रें निलाजरेपणाच्या व तिरस्कारणीय कृत्यांवर पांघरूण घालतात, व कांहीं तर पाठ थोपटतात व म्हणतात कीं वाहवारे बच्च्यांनो, गाजिवलीत आज राखलीत बाजू ! ! धन्य तुमची ! ! आज आपल्या शहराचा व मातापितरांचा उद्धार केलात. कोण भयंकर स्थिति ही. ज्ञान-प्रकाशासारखे म्हणतात कीं, जरी बागेंत दाटीमुळें गडबड झाली तरी लोकांचें वर्तन कांहीं वाईट नव्हतें. बरोबरच आहे. दाटी होती म्हणून अश्लील शब्द पोरें बोललीं व शहाणे लोक (! !) हासले. ! ! ! बाकी पुण्याचे लोक फार गरीब व नीतिमान ! ! असो, ज्ञानप्रकाश जेथें पडतो तेथें ही स्थिति ! जर लोकांना खरोखर त्या सर्व गोष्टींबद्दल वाईट वाटत असलें, जर त्यांना आपल्या मुलाबाळांची काळजी असली, व जर आपल्या जुनाट व नामांकित शहराची कीर्ति राखावयाची असली तर लवकर जागे व्हा, व आपली शोचनीय स्थिति सुधारा.

आमची एक दुष्ट खोड: आळस.

आलंस्यहि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ॥

समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक व्यापारवृद्धि आहे, ती होण्यास उत्पादक उद्योग वाढला पाहिजे, हें मागें-

मांथिअनचीं बक्षिसें.

सुधारकांत प्रसिद्ध झालेली बोधप्रद लेखमाला. किं. ८

सुधारक ऑफीस पुणें.

सांगितलें . पण दुर्दैवानें आमच्या येथें उत्पादक उद्यो-गाविषयींच रड आहे असें नाहीं; अनुत्पादक उद्योगाची सुद्धां आह्मांस ह्मणण्यासारखी हौस नाहीं. आपण ज्या स्थितींत उपजलों असूं तीं स्थिति कसेंही करून आपणांस कायम ठेवतां आली म्हणजे आपण कृतकृत्य झालों असा आपल्यापैकीं बहुतेकांचा समज असतो. असलेल्या स्थितीहून चांगली स्थिति यावी, अशी इच्छा करणारे पुष्कळ आहेत पण ती प्राप्त होण्यासारखे परिश्रम करणारे इसम शेंकडा पांच सुद्धां मिळणार नाहींत. उत्पादक श्रम म्हणजे काय; राष्ट्राची संपत्ति वाढण्यास त्या श्रमांची अवश्यकता किती आहे; वगैरे गोष्टी सुधारलेल्या राष्ट्रांतील सान्याच लोकांस समजत असतात असें नाहीं; पण त्या सर्वांत एक विशेष दिसून येत असतो तो हा कीं तेथील वयांत आलेला प्रत्येक इसम रात्रंदिवस कष्ट कर-ण्यांत चूर होऊन गेलेला असतो. लोकांत उद्योग करण्याची हौस व संवय असली, ह्मणजे त्यांच्या उद्योगास चांगलें वळण लावून देऊन तो फायदेशीर होईल असें करणें कठिण नाहीं. तें काम विचारी लोकांचें आहे, व तें त्यांस सहज करतां येतें. पण सारी जी अडचण येऊन पडते ती आळसांत मौज वाट-गाऱ्या लोकांस ती वाटेनाशी कशी होईल. येथें आहे. मागल्या लेखांत असें म्हटलें आहे कीं, आमच्या लोकांस अंमलदारीचा फार पोक आहे. केवळ उद्योगदृष्टीनेंच पाहिलें तर हा पोक दूषणीय आहे असें नाहीं. जर्मन लोकांनाही सरकारी नोकऱ्यांचें असेंच वेड आहे. पण त्यांत व आम्हांत जो मोठा भेद आहे तो हा कीं, **व्हॉन जेफकेन्** सरकारी नोकर असला तरी सकाळपासून संध्याकाळपर्यंत इराणीवाल्याप्रमाणें जिवाकडे न पहातां काबाडकष्ट करीत असतो ! आमच्या लोकांची तशी गोष्ट नाहीं. आमच्या सेवाचिकीर्षु उमेदवारांत जी थोडीशी उद्योगपरायणता दिसून येते ती कोठपर्यंत ? तर अंमलदारीचा हुकूम मिळेनोंपर्यंत.

आमक्या " आमक्या ठिकाणीं तुम्हांस सबजज्ज किंवा मामलेदार नेमिलें आहे " असा हुकूम हातीं पडला कीं, आमच्या इकडील सरकारी नोकरांच्या रावसाहेबी खाक्यास आरंभ झाला ! नौकरीवर रुजूं होण्यापूर्वी पहिला विचार काय कीं, परीक्षेंत पसार होण्यासाठीं कुटून काढलेल्या पुस्तकांची वाट कशी लावावी ? कां ती कोणांस देऊन टाकावीं, कां त्यांचा गट्ठा करून तो कोठें तरी गाडून टाकावा, कां त्यांची आताराच्या घरीं रवानगी करावी, कां त्यांचा पाण्यानें किंवा विस्तवानें मागमूस नाहींसा करावा ? यांपैकीं एखाद्या पद्धतीनें ज्यांच्या समागमांत रात्रींच्या रात्री घालविल्या, व ज्यांना पोटच्या पोराप्रमाणें हातावर व पोटावर खेळविलें, आणि ज्यांच्या साहाय्यानें दोन पैसे कमाविण्याची अक्कल आली, त्यांची वाट लावल्यावर नोकरीवर हजर व्हावयाचें ! आणि ही हजीरी मजूर होऊन सरकारी **ग्याझेटांत** नांव दाखल झालें कीं, संसारसमरभूमींत आपण विजयाचा झेंडा लाविला, असें या नादान वीरांस वाटतें. येथून पुढें, केलेल्या कष्टांचें फळ भोगण्याशिवाय, आपणांस कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं, अशी त्यांची वृत्ति होते, आणि सुखोपभोगाशिवाय दुसरें कांहीं करावयाचें नाहीं असा त्यांचा निर्धार होतो. आधुनिक सुशिक्षित तरुण सरकारी नोकरांचें हें चित्र फाजील काढलें आहे, असें कोणास वाटणार आहे; आणि खरोखरीच तें तसें असेल तर आम्ही आपली चुकी कबुल करून तीं केल्याबद्दल त्यांची क्षमा मागूं; पण तसें करण्यापूर्वी त्यांनीं तीं आमच्या पदरांत घातली पाहिजे. कांहीं व्यक्तींचें वर्तन अपवादक

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चि. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपाया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी

असेल. पण आम्ही जें येथें लिहित आहों तें व्यक्तीच्या संबंधानें नाहीं; वर्गाच्या संबंधानें आहे. आणि अशा रीतीनें या गोष्टीचा विचार केला असतां, वरील लिहिण्यांत अतिशयोक्ति आहे, असें कोणासही वाटणार नाहीं. सध्यां आमच्या न्यायखात्यांत आणि जमाबंदीखात्यांत खासे खासे अनेक सुशिक्षित तरुण आहेत, त्यांपैकीं पुष्कळांना, विशेषतः न्याय-खात्यांतील इसमांना, युनिव्हर्सिटीच्या पदव्या मिळालेल्या आहेत. राष्ट्रोन्नति म्हणजे काय; ती होते कशानें; जीं राष्ट्रें ह्यास गेलीं तीं कशानें गेलीं, आमचे डोकें वर निघण्यास आम्हांस काय केलें पाहिजे. वगैरे गोष्टींचें ज्ञान ज्याला झालेलें नाहीं, असा मनुष्य या सेवाकुल तरुणांच्या समुदायांत एकही सांपडणार नाहीं. असें असून नोकरी कायम रहाण्यास, किंवा फार झालें तर बढती होण्यास, लागणाऱ्या अपरिहार्य उद्योगा-शिवाय अधिक उद्योग करणारे इसम येवढ्या सुशिक्षितांच्या तांड्यांत किती आहेत ? कचेरींत पुढें आलेलें काम कसें तरी उडवून द्यावें; शिरस्तेदारांवर दरोबस्त जबाबदारी टाकून निःशंकपणें पुढें आणिलेल्या प्रकरणावर लहान मोठीं कोंवडीं करावीं, हुजुरांतून आलेल्या हुकमांची वाट जेमतेम लावावी, आणि वरिष्ठ अधिकारी तपासणीस आला असतां त्याच्या भोंवतीं भोंवतीं घिरट्या घालून, होईल तितक्या उत्तम रीतीनें त्याची सरबराई ठेऊन वेळ मारून न्यावी, ही यांची कर्तव्य कल्पना ! अगोदर उशिरानें उठावयाचें; नंतर शौचास जाण्यापूर्वी बराच वेळ विड्या फुंकण्यांत, चिलमी ओढण्यांत, किंवा तंबाखू चोळण्यांत जावयाचा ! मुखमार्जन आटोपल्यावर संतानसमुदायासह तरुण कुटुंबिनीशीं सुखसंलाप करीत करीत चहापान करावयाचें किंवा कांहीं फराळ उरकावयाचा ! हा प्रकार आटोपल्यावर पुनः एकदां पान तंबाखूचा वार भरावयाचा ! तों कचेरींतला कोणी तरी कारकून प्रकरणें घेऊन येतो. मग बोलत बोलत त्यांवर सह्या करण्या

च्या कामास सुरवात व्हावयाची, व हें बरेंच वेळ चालावयाच. हें चाललें असतां कोणी भेटावयास आलें तर त्याच्याशीं बोलणें; धोबी, कोष्टी, वाणी, मारवाडी कडबेवाला, लाकुडवाला, वगैरे कोणी आला असल्यास, किंवा बोलावून आणला असल्यास, त्याच्याशीं त्यासंबंधीस चालावयाचीं ! या घासाघिशींत मधून मधून अधिकाराची थोडीशी जरब दाखवावयाची, व तसें करण्यास पुढें असलेल्या कारकुनाकडून, शिपायाकडून, व इतर गृहस्थांकडून, अनुमोदन व प्रोत्साहन मिळत असावयाचे ! अशा थाटांत तास दोन तास घालवून पुढें स्नानास उठावयाचें. स्नानभोजन व पानतंबाखू आटोपल्यावर बायकोमुलांशी गप्पा मारीत कांहीं वेळ काढावयाचा, किंवा थोडीशी वामकुक्षी घ्यावयाची ! नंतर कचेरीस जाण्याचा विचार ! तेथलें काम करण्याच्या पद्धतीचा वर उल्लेख केलाच आहे. संध्याकाळीं घरीं परत आल्यावर जेवणाच्या अगोदर व मागून घरांतल्या किंवा बाहेरच्या माणसांशीं गप्पा माराव्यायाच्या, किंवा विशेष संघट्टनांतले येणारे जाणारे स्नेही असल्यास गांजिफांस, सोंगट्यांस किंवा एस्पिकांस उदारआश्रय द्यावयाचा ! अशा प्रकारें आमचे बहुतेक तरुण रावसाहेब आपला कालक्रम करीत असतात, असें आम्ही उघड उघड सांगतों. नाहीं म्हणण्यास कोणाची छाती असेल तर त्यानें नांवनिशीं पुढें यावें. फार झालें तर भामलतदारांच्या बतीनें या पद्धतींत आणखी एक कलम चढवावें लागेल तें हें कीं, त्यांना घोड्यावर स्वार होऊन फिरावें लागतें, त्यासुळें त्यांचें उपभोगयंत्र मुनसिफांच्या यंत्रापमाणें

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ८५

लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

एकसारखें चालत नाहीं. अशा प्रकारच्या आयुष्यक्रमांत सुख मानून तद्नुसार वागणाऱ्या आत्मवंचक रावसाहेबांची सुशिक्षित मनें गंजत असतात, व शरीरांस मांद्य येऊन त्यांना अनेक व्याधि जडत असतात, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत सुद्धां येत नाहीं ! सतत स्त्रीसानिध्यामुळें कोणाची कामवासना मंद झालेली असते तीं प्रज्वालित कोणत्या उपायांनीं होईल अशा पंचायतींत कांहीं जण पडलेले असतात; कित्येकांस अग्निमांद्यानें घेरलें असल्यामुळें क्षुत्क्षोभ कशानें होईल अशी चिंता लागलेली असते; सारांश कोणास मधुमेह, कोणास जीर्णज्वर, कोणास मस्तकशूल, कोणास विस्तृतयकृत याप्रमाणें या विषयसुखरत निरुद्योगी रावसाहेबांपैकीं बहुतेकांच्या पाठीमागें कांहींनाकांहीं तरी लचांड लागलेलें असतें ! अशापासून विशेष त्रास होऊं लागला कीं, घ्या ' सिकलीव्ह ' आणि पळा पुण्यास अथवा मुंबईस ! किंवा जे कोणी यथल्या किंवा मुंबईच्या प्रसिद्ध डॉक्टरांकडे वारंवार जात येत असेल, त्याच्या पहाण्यांत अमले दौंदील, फिकट, कृश, उत्साहशून्य, व किरकिर करणारे पुष्कळ रावसाहेब पाहण्यांत येत असतील असें आमचें अनुमान आहे, व तें बहुशः खोटें होणार नाहीं अशी आमच्या स्वल्प माहितीवरून आमची खातरी आहे. सामान्य सुखांचा अभिलाष करणाऱ्या आमच्या तरुण सुशिक्षित अंमलदारांची ही गोष्ट झाली. हें बहुशः मोठ्या दुर्व्यसनापासून अलिप्त असतात. यांचें वर्तन निरुपद्रवी असतें. आपल्याकडून होईल तितका चोख न्याय करण्यास हे झटत असतात. बायकापोरांस यांच्या सहवासांत मोठें सुख असतें. कचेरीत निरुद्योगाशिवाय म्हणण्यासारखें व्यसन यांचें अंगीं नसल्यामुळें त्यांची अंमलदारी लोकांस त्रासदायक होत नाहीं. पण यांखेरीज अंमलदारांचा आणखी एक वर्ग आहे. त्यांत पुन तीन प्रकारचे लोक येतात; शिकलेले, अर्धवट शिकलेले, व

मुळींच न शिकलेले या पैकीं शेवटले पहिल्या पिढींतले आहेत. या जुन्या खोडांपैकीं कांहींचें वर्तन अनुकरणीय असेल याबद्दल आम्हांस शंका नाहीं, पण सामान्यपणें हे सारे वृद्ध कर्पा, आणि यांच्या जोडीचे कांहीं शिकलेले व कांहीं अर्धवट शिकलेले अंमलदार असे आहेत कीं, त्यांचें नांव काढले असतां भीति उत्पन्न होतें. यांपैकीं कांहींस द्रव्य लोभानें वेडावून सोडिलेलें असते कांहीं पराकाष्ठेचे कामुक असतात; व कांहींना कटिशूळाची जबरदस्त व्यथा असून, शिवाय चाटलाचाईची विशेष भक्ति असते. लक्ष्मी, स्त्री, आणि मदिरा यांपैकीं एकीनें जरी एखाद्यास मनापासून धरले असलें तरी देखील त्याची किती थोडया काळांत धूळधाण होऊन जाते, हें सर्वांस ठाऊक आहेच. तेव्हां जे कोणी एक समयावच्छेदेंकरून या तिन्ही हडळींच्या झपाट्यांत सांपडत असतील त्यांची किती दुर्दशा होत असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी. या तिघींनीं ज्यास गळ घातला आहे अशा कोणत्या मनुष्याची अब्रू, संपत्ति, किंवा शरीरप्रकृति फार वर्षें नीट राहिली आहे? काफर्डप्रकरणामुळें कांहीं शिकलेल्या मामलतदारांचीं नांवें पुढें येऊन त्यांचा मोठा दुर्लौकिक झाला आहे, व नानाप्रकारचे लोक त्यांस नानाप्रकारचे दोष देत आहेत. पण वास्तविक पाहिलें तर यांपैकीं बहुतेकांचा अपराध किती स्वल्प आहे बरें? आपली नोकरी राहण्यासाठीं लांच देण्यास सिद्ध होणें ही गोष्ट वाईट नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं. पण बेशरमच लोभी वरिष्ठ अधिकाऱ्यानें तो देण्याबद्दल चाप लाविला असतां, तो देत नाहीं असें साफ म्हणणाऱ्यांच्या अंगीं अमानुष धैर्यच

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

असलें पाहिजे; आणि तें सामान्य मनुष्यांच्या अंगीं नसल्याबद्दल त्यांस विशेष दोष देणें न्याय्य नाहीं; कारण तशा प्रकारचें धैर्य थोड्यांच्या अंगींच असतें. शिवाय, ही मंडळी पुढें न येती तर हें विलक्षण प्रकरण सरकारास आपल्या हातीं मुळींच न घेतां येतें, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. इतकें करून मग त्यांस जेवढा दोष लावणें योग्य असेल तेवढा लावण्यास आम्ही तयार आहों. पण जर कोणी हा स्वल्प अपराध करून, शिवाय लांच खाणारे व दुसऱ्यांच्या स्त्रीधनाचा अपहार करणारे मादिरासक्त अंमलदार रेव्हिन्यू खात्यांत, जुडीशीयल खात्यांत, किंवा दुसऱ्या कोणत्याही खात्यांत असतील, तर त्यांस काय शिक्षा करावी, हें कोण सांगूं शकणार आहे? असल्या राक्षसी अंमलदारांकडून उत्पादक श्रम होऊन देशाचा व्यापार व संपत्ति वाढण्याची कल्पना स्वप्नांत तरी आणितां येईल काय? यांच्या दुर्वर्तनामुळें यांच्या कुटुंबास व यांच्या ताब्यांतील रयतेस तर अनन्वित पीडा भोगावी लागतेच. पण कधीं कधीं इतरांस सुद्धां हे अनेक प्रकारें त्रासदायक होतात. असल्या अधिकाऱ्यांहून आळशी अधिकारी शेकडोंपट बरे. सबब ज्यांच्या मनांत देशोन्नति व्हावी असें असेल त्यांनीं अशांचें निर्मूलन करण्यास अगोदर झटले पाहिजें. हे नाहींसे झाल्याशिवाय व्यापार व संपत्ति वाढण्याचा संभव नाहीं.

ही दगलबाजी नव्हे काय?

मुंबईसरकारानें क्राफर्डप्रकरण हातीं घेतल्यापासून त्याचा शेवट होईपर्यंत जें करावयाचें, तें सेक्रेटरी ऑफ स्टेट व हिंदुस्थान सरकार यांस कळवून करावयाचें, असा परिपाठ ठेवला होता. कांहीं विशेष करावयाचें झालें कीं, तारा सुटत, व प्रत्येक डाकेला कच्च्या हकीकतीचें पुडकें इंग्लंडास रवाना होत असे. क्राफर्डविरुद्ध

जे साक्षीदार आणावयाचे त्यांना त्यांच्या आपराधाची पूर्ण माफी करण्याचें अभिवचन दिल्याखेरीज ते पुढें येणार नाहींत, असें मुंबईसरकारास वाटल्याबरोबर, त्यांनीं तसें करून ती गोष्ट तारेनें व डांकेनें सेक्रेटरी ऑफ् स्टेटच्या कानावर घातली. त्या वेळेस त्या हपिसरानें मुंबईसरकारच्या करण्यास कोणत्याही प्रकारचा प्रतिषेध केला नाहीं. लांच दिला. असें आपण होऊन कबूल करणारे मामलतदार नौकरींत ठेवणें बरोबर नाहीं, असें सेक्रेटरी ऑफ स्टेटचें मत होतें, तर त्याच वेळेस त्यांनीं मुंबई-सरकारास अशी उलट तार पाठवावयाची होती कीं, अशा प्रकारें माफी देणें बरोबर नाहीं; कारण तसें केलें असतां आपल्या तोंडानें आपला अपराध कबूल करणारे मामलतदार नोकरीवर ठेवावे लागणार आहेत, व तसें होणें इष्ट नाहीं. पण त्या वेळेस सेक्रेटरीची स्वारी मूक राहिली. कारण त्या वेळेस मुंबईसरकारास तुर्ता अशी माफी देऊं नका, असें म्हणणें म्हणजे मागल्या तीन गव्हर्नरांनीं जी बेबंदशाही व लुटालूट जाणून बुजून चालूं दिली होती, ती पुढेंही चालूं देण्यास सेक्रेटरी ऑफ् स्टेटची संमति आहे, असें झालें असतें, आणि त्यामुळें इंडिआहपिसाच्या नांवानें फारच मोठा गवगवा झाला असता. अशा कारणामुळें **लॉर्ड क्रॉस** यांनीं त्यावेळीं मुंबई-सरकारास वाटेल तें करूं दिलें, मामलतदारांकडून होण्यासारखा फायदा करून घेतला, क्राफर्ड साहेबाची बाताबेताची वाट लाविली, आणि आतां दिलेलीं अभिवचनें अक्षरशः खरीं करून दाखविण्याचा प्रसंग आल्याबरोबर, क्राफर्डपक्षीयांनीं पार्लमेंटांत व त्याच्या बाहेर केलेल्या काहूरास भिऊन जाऊन, लॉर्ड क्रॉस

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

मुंबईसरकारावर उलटून पडत आहेत, ही दगलबाजी नव्हे काय ? पूर्वीप्रमाणें इंग्लंडास पत्र जाण्यास वर्षसहामाहिने लागत तर निराळी गोष्ट होती. पण तशा प्रकारची अडचण सध्यां मुळींच नाहीं. रोजच्या रोज येथील हवी ती गोष्ट इंग्लंडास पोहोंचत आहे, व तिकडील येथें पोहोंचत आहे. या क्राफर्ड-प्रकरणांतील प्रत्येक महत्वाच्या गोष्टीच्या संबंधानें एकमेकांस तारा पाठविण्यांत आल्या होत्या. त्यावेळेस लॉर्ड क्रॉस याची न्यायबुद्धि झोपीं गेली होती काय ? किंवा तिला कसला भ्रम झाला होता काय ? आमच्या मतें लॉर्ड क्रॉसकडून या कामांत अतिशय अप्रयोजकपणाचा विश्वासघात होत आहे. अगोदर तीनशें साडेतीनशें वर्षांचा जुना इंग्रजी कायदा आज मित्तीस येथें लागूं करणें हें अगदीं अयोग्य होय; पण कायदे-शास्त्र्यांच्या मताप्रमाणें तो लागूं केला पाहिजे, असें घेऊन चाललों, तरी तो कोठें लावावा, आणि कोठें न लावावा, याचा निर्णय करण्यास हिंदुस्थानसरकारास अधिकार नाहीं असें नाहीं. कायद्यांचें पालन करण्यानें एकंदरींत कल्याण होतें, म्हणून तें करावयाचें. कायद्याच्या ज्या पालनानें हिताहून अहित फार होणार तो कायदा बदलूं कां नयें ? ब्रिटिश पार्लमेंटानें योग्य प्रसंगीं तो बदलल्याचें उदाहरण आहे, व हिंदुस्थानसरकारानेंही या प्रसंगीं तसें करणें उचित आहे. याउप्पर आपणांविषयीं लोकांत बेभरंसा आणि अप्रीति उत्पन्न करून घेण्याचा त्यांचा निश्चयच झाला असेल तर आमचा नाइलाज आहे.

शनीदेव उर्फ साडेसातीचा देव.

शनैश्वराची मूर्ति काळी ॥
तो जातीचा होय तेली ॥
चरणपंगु खुरत चांगली ॥
पूजा करी काळभैरवाची ॥ १ ॥
त्याची दृष्टि पडे जयावर ॥
करी तयाचा चकनाचूर ॥
अथवा कृपा करी जयावर ॥
तयासि सर्व आनंद प्राप्त होय ॥ २ ॥

तात्याजी महिपतीकृत शनीमहात्म्य.

हे सूर्यतनया, महश्रेष्ठा, शनीश्वरा, तुझें उग्र व विशाल स्वरूप तुझा भीमपराक्रम, व चराचरावर असलेला तुझा दरारा आम्ह मर्त्य पामरांनीं काय वर्णावा ? स्वर्गस्थ देव गंधर्वांपासून तों क्षुद्र भूगोलावरील यःकश्चित् कीटकांपर्यंत तुझ्या झपाट्यां सांपडला नाहीं असा कोण आहे ? एका सव्वा प्रहरांत आपल्या पूज्य गुरूस कसा हात दाखविलास, हें कां आम्हां अवगत नाहीं ? फकीराचा वेष धारण करून त्वां गुरूस अर्पि केलेल्या खरबुजांचीं शिरकमलें झाल्यामुळें, थोड्यांत चुकले नाहीं तर त्यावर सुळी जाण्याचाच प्रसंग येऊन बेतला होता सर्वसंगपारित्याग करून, वैराग्याच्या वेषानें हिमाचलावर संचा

रसमंजरी:—यांत ८० रसायनाचे पाठ, बालचिकित्सा सप्तधातूंचे जारणमारण आणि पाऱ्यावरील संस्कार शास्त्रोक्त रीतीनें दिले आहेत. किं. १। रुपया.

महाराष्ट्र औषधालय,
शनवार पेठ, पुणे

निदान पोटा पुरतें **कँपेनसेशन** मिळणार आहे ! पुढें विक्रमाचो ग्रहदशा किंचित् फिरली तेव्हां उज्जनींतील एका तेल्याची मुलगी तामलिंदापुरास आपल्या सासरीं जात असतां वेशीपाशीं तळमळत पडलेला विक्रम तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां तिनें त्याला ओळखून घरी नेलें आणि राजाज्ञेनें त्यास घाणा हाकण्याचें कामावर नेमिलें ! आमच्या मामलतदारांची ग्रहदशा फिरली असल्यास, हिंदुस्थानसरकार त्यांस मेहतर कन्येनें विक्रमास सांगितलेल्या कामापेक्षां अधिक योग्यतेचें काम सांगेल, याविषयीं शंका नाहीं. शेवटीं विक्रमाची ग्रहदशा संपली तेव्हां त्याचे हातपाय फिरून आले इतकेंच नाहीं, तर दीपरागाचा तान घेतल्याबरोबर जिकडे तिकडे प्रकाशमय करून टाकणाऱ्या त्याच्या अलौकिक कंठमाधुर्यामुळें, राजा चंद्रसेनाची कन्या पद्मसेना एकाएकीं अनुरागबद्ध होऊन त्याची भार्या झाली, आणि तिच्यासह राजा विक्रम मालव प्रदेशीं परत येऊन, ती उभयतां राज्योपभोग सुखानें घेऊं लागलीं ! इकडे आपल्या मामलतदारांची ग्रहदशा संपली असेल तर तेही पुनः अधिकारारूढ होऊन आपल्या मामलतींच्या स्वादुत्वाचें पुनः सेवन करूं लागतील अशी आम्ही आशा करतों ! पण ही गोष्ट हटकून व्हावयाला पाहिजे असेल तर त्यांनीं शनी महात्म्यांत सांगितल्याप्रमाणें **सुधारका**सारख्या ब्राह्मणास दानभोजनादिकांनीं संतुष्ट केलें पाहिजे ! कारण झालें आहे:—

जप (पत्र ?) कर्त्या ब्राह्मणांसी ॥
शनैश्वररूप मानूनि त्यासी ॥
दक्षिणा देऊनि पूजेसी ॥
प्रसन्नचि करावें ॥ १ ॥
मग करावें ब्राम्हणभोजन ॥
यथाशक्ति द्यावें दान ॥

ब्राम्हण तृप्त होतां पूर्ण ॥
संतोष पावे शनिदेव ॥ २ ॥

वाचकहो, किती झाला तरी तेलकट शनी ब्रम्हतेजापुढें क करणार ? निदान तात्या महिपतींनीं तरी त्याच्या महात्म्या ब्राम्हण महात्म्य श्रेष्ठतर करून ठेविलें असल्यामुळें, ब्राह्मणा जो फायदा होत असेल त्याबद्दल त्या वृत्तीवर अवलंबणाऱ्या त्याचे उपकार मानून त्यास दुवा दिला पाहिजे हें उघड आ

असो, येथपर्यंत आम्हांसारख्या भाविक लोकांच्या ग्रहां यीं या ज्या समजुती आहेत, त्या थोडक्यांत सांगितल्या! अ त्याच पद्धतीनें ह्मणजे थोडक्यांतच अलीकडल्या सुधारले ज्योतिषांचे याविषयीं जें ह्मणणें आहे तें सांगतो, आणि आ करतों.

हा भूगोल सोडून जर आपण शनिवर गेलों तर येथें आप मनाची जी स्थिति कधींच होत नाहीं ती तेथें होईल. नाहीं होणार ? शनी कांहीं सामान्य ग्रह नाहीं. आम्हांपा त्याचें अंतर १०,००,००,००० मैल आहे, व आमच्या पृ सारख्या ७३४ पृथिव्या एके ठिकाणीं कराव्या, तेव्हां त्या विस्ताराची कल्पना होणार आहे! हा इतका मोठा आहे आपल्या आंसाभोंवतीं इतक्या झपाट्यानें फिरत असतो त्याची दिनप्रदक्षिणा **दहा तासांत** संपते! शनीच्या ववृत्तापासून सुमारें २०,००० मैलांवर त्याला वेष्टणारीं ३ टीश्शीं व चकाकणारीं तीन वळीं किंवा वेढीं आहेत.

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड च करणारें महाराष्ट्रांतलि एकटेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १०

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी

यांस चापटी असें ह्मटलें आहे. कारण यांची जाडी दहापांच गांहून अधिक असेल असें वाटत नाहीं ! इंग्रजींत या विध चक्रमालेस किंवा प्रभामंडलांस **रिंग्झ** ह्मणजे आंगठ्या तात. या आंगठ्यांचा व्यास १,६६,००० मैल आहे ! आंगठ्या स्थिर नाहींत. शनीच्या बिंबाबरोबर त्याही मोठ्या नें परिभ्रमण करतात. या तीन विशाल प्रकाशपरिधीं-च शनीचा परिवार संपला असें नाहीं. आपणांस काय तो : चंद्र आहे. शनीच्या निरनिराळ्या भागास निरनिराळ्या गीं प्रकाशमय करणारे कर्मांतकर्मी आठ चंद्र आहेत ! या ह चंद्रांपैकीं जो शनीपासून अगदीं जवळ आहे तो त्याच्या यापासून १,२०,००० मैलांवर आहे, व जो सर्वांत दूर हे तो २२,९३,००० मैलांवर आहे. यावरून काय सिद्ध ले कीं, कर्मांतकर्मी ४५ लक्ष मैलांचे यासाऱ्या वर्तुलांत जें हीं सांपडेल त्यास शनी आपल्या आकर्षणपाशानें बद्ध करून, पल्या सभोंवतीं अनंत काल घिरट्या घालण्यास लावणार !

भारतीय फलज्योतिष्यांनी **गुरूस** ब्राह्मण व **शनीस** तेली ह्मटलें आहे, यावरून जुन्या ज्योतिर्विदांपाशीं अलीकडील र्वणीच्या भिंगासारखी " लहानवस्तु धोर " दिसवणारीं भिंगें ल्याची, असा तर्क होता. कारण अलीकडील मोठ्याशा र्वणींतून गुरूकडे (Jupiter) पाहिलें असतां, त्याच्या यावर तीन पट्टी जाणव्यासारखे तीन पट्टे दिसतात, व नीवर (Saturn) तर तेलाचा सारखा घाणा चालला सावा, असें दिसतें ! शनीवर इतकें तेज व त्याच्या भोंवतीं रणारे इतके चंद्र असून, त्याच्या दूरत्वामुळें तो तेल्यासारखा तेज दिसतो, व मंदपणानें फिरतो, हें उघड आहे. **मिक्रो-मस** नांवाचा कोणी एक प्रवासी शनीवरून पृथ्वीवर उतरला, हां त्याला नी वारुळाप्रमाणें दिसली. अशी जी खिस्ती पुरा-

णांत गोष्ट आहे, तींवरून या दोन गोलांच्या आकारांचें प्रमाण ध्यानांत येतें. सुयाभोंवतीं शनीच्या प्रदक्षिणेस तीस वर्षें लागतात, म्हणजे आमच्यापेक्षां शनीवरील वर्ष तीसपट मोठें आहे, व त्याच मानानें तेथील ऋतुही मोठे आहेत. सात वर्षें चार महिने पर्यंत पर्जन्यकाळ झाल्यावर तितक्य च लांबीचा हिंवाळा येतो, व तो आटपल्यावर, सुमारें सव्वासात सव्वासात वर्षें वसंत आणि ग्रीष्म यांचा अंमल असतो. शनी कन्याराशीस आला असतां अतिशय पीडा देतो, अशी युरोपांतील अडाणी लोकांचीही समजूत आहे.

येथपर्यंत या ग्रहाधिपतीचें तत्वविनोदात्मक जेवढें वर्णन या स्थलीं करणें उचित वाटलें तेवढें केलें आतां पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्याची आरती करून त्याचा निराप घेतो:—

(जयदेव जयदेव जय पांडुरंगा—या चालीवर)


॥ जय देव जय देव जय शनीराया ॥
अज मज झाली बुध्दि तुजला वर्णाया ॥ जय.
भाविक शास्त्रज्ञांची संमत अशि गाथा ॥
गाउनि चित्ताकर्षी केली नव कथा ॥
यास्तव प्रसन्न होऊनि ' वर माग आतां ' ॥
ऐसें म्हणशिल तरी दे हें तत्वतां ॥ जय. ॥
जे न सुधारका पढतांल त्यांसी ॥
त्याची वा किंमत न देती त्यांसी ॥
राशीस येऊनी छळावेंगा देवा ! ॥
वद नाहीं नामी कां पत्र हें राया ॥ जय. ॥

लेखकांस योग्य मोबदला देऊन आम्हीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

येथें बारा आणे मुंबापुरिं रुपया ॥
फक्त दीड रुपया दुसऱ्या गांवीं या ॥
बंगींत मागतां पोष्टेजासकट ॥
फक्त अठरा आणे, हें कां संकट ? ॥ जय. ॥
वाचुनि यातें जोडि जो तत्वज्ञानाला ॥
संतती, संपत्ती, उद्धरि दे त्याला ॥
तैसेंच, यांतील विचार ज्या मान्य ॥
त्या महाराष्ट्रीयां दे दे सुखदान ॥ जय. ॥

स्वयंवर.



हेंदुपी ह्मणे ह्मणाजा जरि कथिलें म्यां परोपरी पण तो ।
पणति प्रभूसि करिती अनुकंप्या मी स्वयंवरा म्हणती ॥
धर्मेण विवाहेन बह्व्यो राजर्षिकन्यकाः ।
श्यन्ते परिणीतास्ताः पितृभिश्चाभिनंदिताः ॥

कालेंकरून जो आचार रूढ झाला तो किती अभेद्य असतो चें उत्कृष्ट उदाहरण आमची अलीकडील विवाहपद्धति आहे. मचा पूर्वीचा इतिहास, परक्या लोकांचें वर्तन, व आमची प्रत जागृत झालेली विचारपद्धति हीं सारीं या अप्रशस्त लीस प्रतिकूल आहेत तरी आम्हांस ती झुगारून देण्याचें होत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय ? किंवा आश्चर्य तरी नलें ? " हा आमच्या वडिलांचा कूप, असें ह्मणून खारें पाणी बसणारे " आम्ही लोक आहों, तेव्हां जें रूढ झालें तें म्हांस टाकवत नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. तथापि आमची नुतची निकृष्टावस्था आम्हांस नको असेल तर सर्वांच्या ोदर या अत्यंत अपायकारक प्रथाताचे निर्मूलन करण्याचा

प्रयत्न केला पाहिजे. या खटपटीपासून अनेक फायदे होणार आहेत. ज्याप्रमाणें युरोपांत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट या ख्रिस्ती धर्माच्या दोन पंथांत उत्पन्न झालेल्या वादापासून पुढें महत्वाचे अनेक परिणाम घडून आले, त्याप्रमाणें आज जर आपण जाणूनबुजून बालविवाह रद्द करणाऱ्याच्या कामीं झटूं लागलों तर त्यापासून अनेक महत्वाच्या गोष्टी निष्पन्न होणार आहेत. विचारानें चांगली गोष्ट कोणती व वाईट गोष्ट कोणती याचा पूर्ण निश्चय करून वाईट टाकण्याचा व चांगली स्थापण्याचा प्रयत्न एका वार्तीत केला असतां, जें धैर्य अंगीं येतें तेंच पुढें तसली दुसरी गोष्ट करण्यास प्रवृत्त करतें; आणि ही दुसरी गोष्ट करतांना धैर्याचें भांडवल पहिल्यापासूनच अधिक असल्यामुळें, पहिल्या प्रसंगाहून विशेष सुलभ रीतीनें यशःप्राप्ति होते. याप्रमाणें एका गोष्टींत यश आलें, दुसरींत आलें, तिसरींत आलें, असें होतां होतां नवीन नवीन गोष्टी करण्याचें धैर्य दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन त्याचा पाहिजे त्या कामीं उपयोग करण्यास उल्हास वाटूं लागतो. उन्हाळ्याच्या प्रत्येक दिवसास भूमितिश्रेढीनें वाढत जाणाऱ्या उष्णतेप्रमाणें मानसिक धैर्याची गोष्ट आहे; तें प्रत्येक दिवशीं अधिकाधिक होत जातें. उलट; तें कमी होऊं लागलें म्हणजेही भूमितिश्रेढीनेंच कमी होतें ! ज्याप्रमाणें आकाशांत फेंकलेला दगड खालीं येऊं लागला म्हणजे प्रत्येक क्षणास मागल्या क्षणापेक्षां अधिक फूट उतरतो त्याप्रमाणें कोणत्याही कारणानें राष्ट्राच्या किंवा त्यांतील एखाद्या व्यक्तींच्या मनास भयानें घेरलें म्हणजे तें

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत समधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं. ०५

खेडकरवैद्य अॅन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

क्षणोक्षणीं त्यास अधिकाधिकच ग्राशीत जातें ! तेव्हां बाल-विवाहावर निकराचा हल्ला करण्यानें प्रथम आह्मांत मानसिक धैर्य उत्पन्न होईल, व उत्तरोत्तर त्याची वृद्धि होत जाऊन इतर कामांकडेही त्याचा उपयोग करतां येऊं लागेल.

याशिवाय याच खटपटीनें दुसरा एक फायदा होणार आहे तो हा कीं, आज जे आह्मी चोहोंकडून धर्मपाशांनीं अगदीं जखडल्यासारखे झालों आहों त्या आम्हांस त्याच्या ' आज्ञा कोठवर पाळाव्या ' हें समजूं लागेल. बालविवाहाचें पूर्ण निर्मूलन आणि स्वयंवराची प्रस्थापना यांच्या दरम्यान बराच धर्मवाद उपस्थित होणार आहे, व तो करण्यानें पुढें पुष्कळ हित होणार आहे. बापाच्या घरीं मुलगी ऋतुस्नात होतां कामा नये व ऋतुस्नात झालेल्या मुलीचें यथासांग गर्भाधान झालेंच पाहिजे, नाहीं तर उभय कुलांतील चार्‌हीस पिढ्यांस दुर्गति प्राप्त होते, असल्या अजागळपणाच्या धर्मसमजुतींचा ह्रास होईल तितक्या त्वरेनें होणें फार इष्ट आहे. असल्या वेडेपणाच्या धर्मसमजुतींचा मोक्ष करण्यास पूर्वेतिहास आणि पूर्वाचार हे पुनः पुनः पुढें आणून त्यांचें फिरून अवलंबन करा असें सांगत न बसतां, अर्लाकर्डील न्यायाच्या भात्यांतून तीव्र बाण काढून त्यांचा त्यांवर संपात केला पाहिजे. कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसही आहे; पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आह्मांवरही आहे, व त्याच्याशीं त्यांचा जितका संबंध होता तितकाच आमचाही आहे; बऱ्यावाइटाची निवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी किंवा त्याहून अधिक आम्हांसही आहे; अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जेतकें कळवळत होतें, तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें, तितकें किंबहुना त्याहून बरेंच अधिक ज्ञान आह्मांस

आहे; सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्याचेंच आम्ही पालन करणार, व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन चालणार--अशा धर्तीवर हा वाद नेला पाहिजे, व अशा धर्तीवर तो नेल्यासच त्यापासून फायदा होणार आहे. एका ऋषीविरुद्ध दुसरा ऋषि हुडकींत बसण्यांत, सान्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत, कांहीं अर्थ नाहीं तसलें काम वे. झळकीकरासारख्या शास्त्र्यांनीं जुन्या पद्धतीच्या लोकांसाठीं खुशाल करांत बसावें! कोणत्याही विषयाचा ऐतिहासिक पद्धतीनें उहापोह करण्यांत फायदा आहे. नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. पण आमच्या बहुतेक जुन्या पंडितांस ऐतिहासिक पद्धति म्हणजे काय, हें मुळींच ठाऊक नाहीं. त्यांस असें वाटतें कीं जगांत म्हणून जेवढें कांहीं ज्ञान आहे तेवढें संस्कृत भाषेंतील ग्रंथसमूहांत भरलेलें आहे. त्याच्या बाहेर चहूकडे आंधार आहे! व त्यांना असें वाटणें हें कांहीं अंशीं स्वाभाविकही आहे. ज्याअर्थी दुसऱ्या भाषेंतील ज्ञानभांडारांचा गंधहि त्यांस लागलेला नाहीं, त्याअर्थी त्यांना त्यांची महती कोठून कळणार? तेव्हां अर्थात् त्यांनीं आपल्यापाशीं असलेल्या छोटेखानी डबोल्यासच अखिल विश्वांतील संपत्समूह समजून त्याच्या महत्व व अद्वितीयत्वाचे पवाडे गात सुटावे, हें साहजिक आहे. पण आमचे डोळे उघडले आहेत; ज्या आम्हांस हिंदुस्थानच्या बाहेर देश आहेत, व संस्कृत ग्रंथांच्या बाहेर विद्या आहे, हें समजत आहे, त्या आम्हींही संकुचित दर्शनाच्या शास्त्रीवैद्

वैद्यकपत्रिका:— हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधी माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें

प्रमाणें किंवा अगदीं मूढ जनांप्रमाणें वागत सुटावें ही मोठ्या लाजेची गोष्ट आहे. तेव्हां बालविवाहाचें निर्दालन करण्याचा प्रयत्न आपण मनापासून आरंभिल्यास, बऱ्याच धर्मकल्पनांचें संशोधनही आपणांस करावें लागणार आहे; व या कामीं हें संशोधन करण्यास आरंभ केला, म्हणजे इतर गोष्टींतही तें करण्याची इच्छा होऊं लागेल, व विचाराच्या भट्टींत धर्मांत शिरलेल्या हीण धातू खांक होऊन त्यांतील सारतत्वरूप बावनकशीं सोनें मात्र मागें उरेल !

हें बालविवाहाचें खंडन म्हणजे स्वयंवराचें मंडन. तेव्हां अर्थात् जे बालविवाहास प्रतिकूल असतील त्यांना स्वयंवरास प्रतिकूल असलेल्या लोकांच्या मतांचें समर्पक खंडन करतां आलें पाहिजे. यावर कोणी असा आक्षेप घेतील, कीं, बालविवाहापासून एकदम स्वयंवरावरच उडी कशाला मारायाला पाहिजे ? त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, जीं स्वयंवरें नाहींत त्या सर्वांस आम्ही बालविवाहच समजतों ! लग्नाचें त्यानें लग्न करणें म्हणजे स्वयंवर ! एकाचें दुसऱ्यानें करणें म्हणजे बालविवाह ! अर्थे स्वयंवर आणि अर्धा बालविवाह, अशी लग्नाची पद्धत शक्य नाहीं. कोणी असें म्हणतात ना, फ्रान्स देशांत अशा प्रकारची विवाहपद्धति कांहीं वर्षांमागें रूढ होती. बापानें मुलाकरितां मुलगी पाहून ठेवावा, आणि मुलास ती पसंत झाल्यास तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, किंवा मुलानें आपल्या मनाजोगी मुलगी पाहून ठेवावी, आणि ती मुलास पसंत झाल्यास, तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, हा दिसतांत मध्यगामी पद्धत दिसते, व जे लोक बालविवाहांतून सुटून स्वयंवराकडे येण्यास निघाले असतील, त्यांना कांहीं वर्षे ही पद्धतीपाशीं मुक्काम करावा लागत असे असें वाटतें ! आह्मांत काळीं स्वयंवर पद्धति अत्यंत प्रचलित होती. अशाबद्दल पुष्कळ

आधार आहे. आम्हांपैकीं बहुतेकांचीं लग्नें अकरांच्या आंतील वयाच्या मुलींशीं झालीं असल्यामुळें, सध्यां येथें बालविवाहाचीं पद्धत अंमलांत आहे, याबद्दल पुरावा देण्याची मुळींच गरज नाहीं ! एकदां आम्ही विवाहपर्वताच्या शिखरावर होतो; प्रस्तुत त्यांच्या पायथ्याशीं येऊन पडलों आहों, पुन्हां वर चढून जावें, अशी कित्येकांना इच्छा होऊं लागली आहे; पण कित्येकांना असें वाटत आहे कीं तसें करण्याचा प्रयत्न केला असतां, आह्मांस घेरी येऊन, किंवा आमचा पाय निसरून, आम्ही पुन्हा पाय-थ्याशीं गडबडत येऊन पडूं ! तेव्हां कित्येकांचें असें ह्मणणें पडतें कीं, आपणांला पायथाही नको आणि शिखरही नको; आपण आपले या पर्वताच्या मध्यप्रदेशाला धरून असावे! प्रथमदर्शनीं हा सल्ला मोठा नामी दिसतो; व त्याप्रमाणें आचरण करण्यासही आमची कांहीं हरकत नाहीं. पण मनुष्यस्वभावाचें ज्यास अगदीं सामान्य ज्ञान आहे, तोही असें सांगूं शकेल कीं, मनुष्य हा प्राणी त्याला जी गोष्ट हितावह वाटूं लागली असेल तिचा पक्का शहानिशा केल्याखेरीज रहाणारा नाहीं. मध्यप्रदे-शाशीं येऊन ठेपल्यावर आणखी एक टप्पा वर जावें असें त्यास साहाजिकपणें वाटूं लागतें तेथें येऊन पोहोंचल्यावर पुनः तोच नाद ! याप्रमाणें टप्प्याटप्प्यानें कां होईना, केव्हां तरी शिख-रावर जाऊन थडकल्याखेरीज त्याचें पूर्ण समाधान व्हावयाचें नाहीं ! 'सामाजिक सुधारणापरिषदे'च्या मनांत जी बालविवाह निषेधकमंडळी स्थापावयाची आहे, तिच्या पुरस्कर्त्यांनीं नुक-त्याच प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत १०,१२ व १४ हे जे मुलींच्या

निबंध संग्रह.

भाग १ ला. किं. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफिस, पुणें.

वयाचे आंकडे दिले आहेत, ते आमच्या मतें केवळ टप्पे आहेत! यांपैकीं शेवटचा आंकडा आम्हांस बराच पसंत आहे. पण खरें स्वयंवर ज्यांना येथें पुनः स्थापित व्हावयाला पाहिजे आहे, त्यांना तो पसंत होण्यासारखा नाहीं. पण त्यांत एक विशेष आहे तो हा कीं, त्या वर्षांपर्यंत जे आपल्या मुली अविवाहित ठेवण्यास राजी होतील त्यांनीं धर्मानें घातलेली अटकनदी उतरण्याचें कांहीं तरी साधन आपल्या मनाशीं तयार करून ठेवलें असावें, हें उघड आहे. बहुतेक हिंदू मुली १४ वर्षांच्या आंत ऋतुमती होतात, हें निर्विवाद आहे. तेव्हां १४ च्या आंतील वयाच्या मुलींचें लग्न न करण्याबद्दल शपथ घेणें, म्हणजे नहाण आलेल्या मुलींचें लग्न करण्याविषयीं शपथ घेणें होय! पण असें त्या पत्रकांत किती आहेत?

सामाजिकसुधारणा आणि कायदा.

सुधारणेचा शब्दांतः पुराच्या बाहेर संचार होऊं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून खडा पहारा करणाऱ्या नानाविध धर्मकल्पनांशीं तुमुल संग्राम करण्यास ज्यांस स्फुरण यावें, त्याच्या भोंवतालीं उभारलेल्या प्रचंड लोकमतलटास ढांसळून पाडण्यास ज्ञानतोफांस ज्यांनीं सरबत्ती द्यावी, व त्यास गराडा घालणाऱ्या रूढिखंदकावर क्रियासेतु बांधण्यास ज्यांनीं प्रवृत्त व्हावें अशा विद्याचारसंपन्न लोकांनीं दुराग्रहाच्या भर्रा भरून व शुष्क वादतीत दुर्ही माजवून आपल्या मख्य कर्तव्याची हेळसांड होऊं द्यावी हा मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.

'नवखंडपृथ्वी व दहावे खंड काशी' यापुढें ज्यांच्या भूगोलविषयक कल्पनांची धांव जात नाहीं, वेदाचा अर्थ कालत्रयीं होणें नाहीं अशी दृढ समजूत असूनही त्यांतच मनुष्यास

अवश्यक अशा सर्व ज्ञानाचा गट्ठा आहे असा ज्यांचा पक्का ग्रह झाला आहे व प्राचीन ऋषीप्रणीत आचारांहून सुखकर असे आचार असूं शकतील अशा नुसत्या कल्पनेचाही विटाळ न होऊं देण्याविषयीं जे अत्यंत दक्ष आहेत, तात्पर्य ' पुराणमित्येव साधु सर्वं ' या महामंत्राच्या प्रभावापुढें पदोपदीं येणाऱ्या असंख्य नडी ज्यांस साह्य झाल्या आहेत अशा लोकांनीं नुसतें कायद्याचें नांव ऐकलें नाहीं तोंच बेडावून जाऊन माधवबागेंतील सत्तेचाळीसेतरावर ताण करून सोडावी हें अगदीं साहजिक आहे. परंतु ही सीमा ओलांडून पुढें गेलेल्या ज्ञानविशिष्ट म्हणविणाऱ्या लोकांनीं कायद्याच्या विरुद्ध इतकें काहूर कां माजवावें याचा मात्र आम्हांस उमज पडत नाहीं. सामाजिकसुधारणा आणि कायदा यांच्यामध्यें अपरिहार्य एकनाड असल्यामुळें त्याचे जुग कमीही जावयाचें नाहीं असें जें कित्येक सामुद्रिकांनीं गणित केलें आहे त्यांत आमच्यामतें कांहीं चूक झाली आहे, व ती दाखविण्याचा प्रयत्न केला असतां तिकडे शांतपणानें नजर फेंकण्याची जर ते तसदी घेतील तर हा वाद मिटून उभय पक्षांत समेट होणें केवळ दुरापास्त आहे असें आम्हांस वाटत नाहीं. सामाजिक सुधारणेंत कायद्याची मदत घेणें अनर्थावह आहे असें प्रतिपादणाऱ्या मंडळीच्या आजपर्यंतच्या वाटाघाटींत आम्हांस जितका दुराग्रहाचा भाग दिसून येतो तितका योग्यायोग्य विचार दिसून येत नाहीं

रसमंजरी:—यांत ८० रसायनाचे पाठ, बालचिकित्सा व सप्तधातूंचे जारणमारण आणि पाऱ्यावरील संस्कार शास्त्रोक्तरीतीनें दिले आहेत. किं. १। रुपया.

महाराष्ट्र औषधालय,

शनवार पेठ, पुणें

असें म्हटल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. सकृतदर्शनीं ज्यांत कांहीं अर्थ आहे असें भासतें असें कायतें एकच कारण पुढें आलें आहे. बाकी सर्व शब्दजाल, हट्टवाद व पुराणप्रियतेच्या संस्काराची अवशिष्ट झांक यांचेंच अकांडतांडव आहे व तें कारण हेंच कीं, आमचें सरकार परकें, त्याचा धर्म वेगळा, त्यांचे रीतिरिवाज भिन्न तेव्हां अशा सरकारास आपल्या समाजव्यवस्थेंत हात घालूं देणें अत्यंत भयावह आहे. याचे परिणाम फारच अनिष्टकारक झाल्यावांचून रहाणार नाहींत. व याबद्दल मागाहून पस्ताव्यांत मात्र पडावें लागेल. आतां हा कोटिक्रम करणाऱ्यांस आमचा इतकाच प्रश्न आहे कीं, सामाजिक गोष्टींत आजपर्यंत सरकारने जें औदासिन्य पत्करलें आहे त्याचें कारण तसें करण्यास आम्हीं त्यांस परवानगी देत नाहीं इतकेंच आहे काय ? मुसलमान लोकांनीं एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन आम्हांपैकीं कित्येकांस बाटविलें त्यावेळीं तसें करण्याविषयीं आम्हीं त्यांस परवाना दिला होता काय ? किंवा आमच्या समाजव्यवस्थेंत ढवळाढवळ करण्यास सरकारनें मनांत आणलें तर तें आज असमर्थ आहे असें तरी मानतां येईल काय ? तात्पर्य सरकार सामाजिक बाबतींत उदासीन असण्याचें कारण तसें करण्यास आम्ही त्यास संधी देत नाहीं इतकेंच कायतें, बाकी आम्ही त्यास आमच्या घरगुती गोष्टींत हात घालण्यास केव्हां विनंति करूं म्हणून तें अगदीं चातकाप्रमाणें वाट पहात आहे व एकदांका त्यास आपणाकडून जराशी फूस मिळाली कीं कायद्यामागून कायदे करून आमच्या सर्व सामाजिक व्यवस्थांचा भंडवडा करून आम्हांस ते त्राहीं त्राहीं करून सोडतील वगैरे विचारांत जर कांहीं तथ्य असेल तर मग " आपण कोंबडी झांकली कीं उजाडायचें राहिलेंच " असें मानणाऱ्या झातारीच्या समजुतींतही तथ्य नाहीं असें कोण झणेल ?

(रें, सती जाण्याची चाल जी सरकारानें बंद केली त्यापा-
सून आमच्या धर्मांतही प्रसंगानुसार हात घालण्यास सरकार
डगमगणारें नाहीं असें सिद्ध झालें नाहीं काय ? किंवा जो पुन
र्विवाह हिंदुधर्मशास्त्रानें बेकायदेशीर ठरविला होता तोच
कायदेशीर ठरविण्याविषयीं कित्येकांनीं आपण
होऊन विनंती केल्यावरून तो कायदेशीर ठरविल्यास आज
३४ वर्षें झालीं असून त्यावेळीं मिळालेल्या फुर्शीचा
त्यांनीं अद्याप पावेतों फायदा घेतला नाहीं हें कसें ? इंग्लंड
देशांत बारा वर्षांच्या आंत पुरुषाचें लग्न झाल्यास तें बेकायदे-
शीर आहे, परंतु येथें पाळण्यास बाधिंगें बांधणेंही कायदेशीर
असून १० वर्षांच्या आंतील स्त्रियेशीं प्रत्यक्ष नवऱ्यानें संभोग
केला असतां त्याजवर जबरीसंभोगाचा आरोप शाबीत होते
असें कलम पीनलकोडांत कोठून आलें ? तात्पर्य सामाजिक
गोष्टींत आधीच सरकारानें हात घातला आहे असें असत
आणखी अमुक एक गोष्टींत असा असा कायदा करा अशी
सरकारास विनंती केल्यानें त्यास आमच्या सामाजिक
गोष्टींत आयतीच ढवळाढवळ करण्यास फूस सांपडेल अशा
समजुतीवर कायद्याचा निषेध करीत बसणें म्हणजे वास्तविक
पहातां आम्हांस पुढें जावयाचें नाहीं हेंच जगास जाहीर करणें
होय.

आतां आजमितीस जितक्या म्हणून सुधारणा आम्हांस
किंवा अवश्यक वाटतात त्या सर्व कायाद्याच्या मदतीनें सुसा
आहेत असें आमचें म्हणणें नाहीं किंवा त्यापेक्षां कांहीं काय

धातुरत्नमाल:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातू
शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं. ०५
खेडकरवैद्य ॲन्ड सन्स् शनवार पेठ, पुणे

सुसाध्य असल्या तथापि त्या सर्वांवर कायद्याची अंमलबजावणी करावी असेंही आम्हीं इच्छित नाहीं. परंतु याचें कारण आमचें सरकार परकें आहे हें नव्हें; किंवा सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालणें गैरशिस्त आहे अशा सामान्य सिद्धांताचा आम्ही अंगिकार करतो असेंही नव्हें. व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचें प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल, तें आचरण त्या व्यक्तीस घातक असलें तथापि त्यानें तें करूं नये अशी समाजानें सक्ती करण्याचा समाजास अधिकार नाहीं. व्यक्ति-स्वातंत्र्य आणि समाजबंधन या दोहोंसही मर्यादा आहेत. त्या मर्यादांचा अतिक्रम होईल तर त्यापासून एकंदर समाजाचेंच नुकसान होणारें आहे. व्यभिचार हा एक पुण्यमार्ग आहे असें कोणत्याही धर्माचा मनुष्य प्रतिपादणार नाहीं परंतु एवढ्यावरून व्यभिचार करणाऱ्यांस कायद्यानें शिक्षा ठरवावी किंवा नाहीं असा प्रश्न पुढें आला असतां सर्वच विचारी लोक एकदम होकारण्यास तयार होणार नाहींत. त्या व्यभिचारापासून समाजाचें प्रत्यक्ष नुकसान होत आहे कीं काय? या प्रश्नाचा प्रथम विचार केला पाहिजे. तसेंच दारू पिणें हें जरी वाईट आहे तथापि ती पिणाऱ्या व्यक्तीपासून समाजास त्रास पोंचल्यावांचून त्याच्यावर कायदा लागू करणें न्याय्य होणार नाहीं. तात्पर्य कोणती गोष्ट आपणांस कितीही चांगली वाटली तथापि दुसऱ्यांनीं तिचा स्वीकार केलाच पाहिजे अशी सक्ती करण्याचा आपणांस अधिकार नाहीं. आपण पाहिजे तर त्यांचें मन वळविण्यास प्रयत्न करावा परंतु यापुढे मात्र आपणांस जातां येणार नाहीं. वरील विचारावरून हेंही ध्यानांत येण्यासारखें आहे कीं ज्याप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या आचारविचारापासून समाजाचे नुकसान नसतां तो आचारविचार बदलण्याची समाजास सक्ती करतां येत नाहीं त्याचप्रमाणें आधींच समाजानें सक्ती केली असेल तर तीं नाहींशी करणें हेंही

समाजाचें कर्तव्य होय. व तें बजावण्यास समाज तयार नसेल तर समाजाचा विशेष जोरदार प्रतिनिधी जें सरकार त्यानें पुढें झालें पाहिजे. पातिव्रत्यसंरक्षणार्थ स्त्रियांनीं आपणांस पतिचितेवर जिवंत जाळून घ्यावें हें अत्यंत मूर्खपणाचें, अविचाराचें व साहसाचें कृत्य होय असें समजून लोकांची वाट न पहातां सरकारनें एकदम या कामीं कायदा करून ती क्रूर चाल बंद केली. एखाद्या स्त्रीचा पति निर्तला असतां तिनें दुसरा पति करूं नये अशा जी पातिव्रत्यसंरक्षणार्थ दुसरी सक्ती समाजानें केली आहे तीही व्यक्तिस्वातंत्र्याविरूद्ध आहे हें सरकार जाणून होतें, परंतु सतीच्या चालीं इतकी ती अमानुष नसल्यामुळें त्यांनीं कांहीं दिवस वाट पाहिली व योग्य काल आला असें दिसतांच तीही सक्ती दूर करून पुनर्विवाह कायदेशिर मानला जाईल म्हणून ठराव केला आतां पातिव्रत्यसंरक्षणार्थ समाजानें केलेली तिसरी सक्ति म्हणजे केशवपन होय. या केशवपनाच्या प्रथातचें मंडन करणाऱ्या लोकांनीं त्यापासून कितीजरी फायदे दाखविले व तो त्यास किती जरी संमत असला तथापि ज्या स्त्रीचें वपन होणार तिची इच्छा नसतां व ती एकसारखा हंबरडा फोडून आपणास या ममताळू वैऱ्यांच्या तावडींतून कोणी सोडवील काय म्हणून गयावया होऊन चोंहीकडे दृष्टी फेंकीत असतां तिला जुलमाने न्हाव्यापुढें बसविणें किती निंद्य आहे व अशारीतीनें तिचें स्वातंत्र्य हिरावणें म्हणजे केवढा घोर जुलूम आहे हें सिद्ध करीत बसण्याची आमच्यामतें मुळींच अवश्यकता नाहीं. ज्यांच्यावर हा घोर प्रसंग गुदरतो त्या परावलंबी अबलांस ही विटंबना कि

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

३५५५

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

तपत मानवते हें त्यांचें हृद्गत जाणणाऱ्या समवयस्क मैत्रिणी-वांचून दुसऱ्यास सहसा सांगता येण्यासारखें नाहीं ! तथापि त्याची अटकळ कल्पनेनें अगदींच बांधता येणार नाहीं असें नाहीं. ज्यानें आपणास जन्म दिला, आपणास लहानाचें मोठें केलें, व आपल्याकरितां अनंत कष्ट साहिले त्या बापाच्या नांवानें मिशा बोडण्याचा प्रसंग दुर्दैवानें आला असतां केवळ चटावर काम उरकून घेण्यास पुरुष कसे तत्पर असतात: १५-२० दिवसांनीं मुंडन केल्याचा मागमूसही राहण्याचा संभव नसून तें टाळण्यास काय काय उपाय योजतात व मुंडन केल्यावांचून गत्यंतर नाहीं असा प्रसंग आला असतां, आपल्या बापाविषयीं आपली पूज्यबुद्धि व्यक्त करण्याकरितां ज्यांनीं आपलें मुंडित मुख मोठ्या गर्वानें लोकांस दाखवीत फिरावें तेच लोक अंधार कोठडींत कशीं दडी देतात हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यास स्त्रियांच्या मनाची स्थिती कशी होत असेल याची कल्पना करणें कठीण नाहीं! लहानपणापासून ज्यांचा जीव केली, ज्यांस हौऊं माखूं घालून वाढविलें, ज्यास नानाभूषणांनीं शृंगारिलें असे केश क्षणार्धांत नाहींसें होऊन आपण सर्वांच्या तिरस्कारास पात्र होणार व पंधरा वीस दिवसांनीं पूर्वस्थिति येण्यार्चा तर आशा नाहींच परंतु उलटें ज्यांचें मुखावलोकनही करावयास नको अशा न्हाव्या परक्या नापितापुढें दर पंधरवड्यास मान वाकवावी लागणार हा विचार मनांत येऊन या विटंबनेस सर्व स्त्रिया आपण होऊन राजी होतील अशी तुसतीं कल्पनाही करतां येत नाहीं. आपल्या अत्यंत जवळच्या आप्तांच्या किंवा आपल्या स्वतःच्या प्रिय व्यक्तीच्या अशा हालअपेष्टा पाहण्याचें ज्या हतभाग्यांच्या कपाळीं आलें असेल त्यांचीं अंतःकरणें दुःखोद्वेगानें विव्हल झाल्यावांचून कदापि राहिलीं नसतील.

तात्पर्य दुसरें लग्न करण्याची इच्छा असूनही तसें करण्यास न्यायाची आडकाठी असणें यांत जितका अन्याय आहे त्याहून-

ही या विद्रूप करण्याच्या घोर चालींत अधिक अन्याय व प्रत्यक्ष जुलुमाचा प्रकार आहे हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे व तो अन्याय नाहींसा करण्यास कित्येकांनीं अर्ज करून कायद करून घेतला असतां त्याहून अधिक अन्यायाचा व जुलुमाच प्रकार बंद करण्या करितां 'अमुक वयाच्या आंत मुळीं वपन करूं नये व त्यापुढेंही तें स्त्रीच्या मर्जीविरुद्ध होऊं नये, असा कायदा मागणें हें केवळ परंपरेस धरूनच आहे यांत नवीं असें कांहीं एक नाहीं.

सामाजिक सुधारणा आणि कायदा नं. २.

'म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं परंतु काळ सोकावतो' न्यायावरच कायद्याचा प्रतिषेध करीत असणें केवळ वेडगळपणां आहे, कारण सरकारानें सामाजिक गोष्टींत आधींच हात घात आहे; तसेंच ज्या कांहीं सामाजिक गोष्टींत सरकारानें का केले आहेत, व ज्या दुसऱ्या गोष्टींत कायदा असावा असें कि कांचें म्हणणें आहे, त्यामध्येंही त्या त्या गोष्टी सामाजिक *सदरखालीं मोडतात किंवा नाहीं हा वाद अप्रासंगिक हे व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या ज्या बाबतींत वादाचा* त्यांचा अतिक्रम होतो कीं काय, एवढयाच धोरणानें काय असावा कीं नाहीं हें ठरविलें पाहिजे, व सरकारानें जो हीं जाण्यास प्रतिबंध केला, किंवा विधवेचें बेकायदेशीर मानलें जाणारें लग्न कायदेशीर ठरविलें तेंही वरी तत्वास अनुसरून केलें व विधवावपनाची चाल दं करण्यास कायद्याची मदत असावी म्हणून जें कित्येकांचें म आहे तेंही वरील तत्वावरच अवलंबून आहे, वगैरे विचार वरी लेखांत दाखविले. या लेखांत बालविवाहाची चाल बंद व

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

मो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें

ण्यास कायद्याचें साह्य ध्यावें असें जें कित्येकांचें म्हणणें आहे, त्याविषयीं दोन शब्द लिहिण्याचा आमचा विचार आहे.

बालविवाहाची चाल अत्यंत घातक आहे याविषयीं आतां बहुधा मतभेद राहिला नाहीं. तसेंच या दुष्ट चालीच्या तावडींतून आपण सुटलों असें म्हणतां येण्यास, मुलगी निदान १५--१६ वर्षांची होईपर्यंत व मुलगा २०-२२ वर्षांचा होईपर्यंत त्या उभयतांचाही ' नीतिशास्त्रांत ' प्रवेश होऊं नये, हेंहीं पुष्कळांस संमत आहे. परंतु हें घडवूं आणण्यास कोणते उपाय योजावेत, तें याबद्दलच काय तो वाद राहिला आहे. एका पक्षाचें म्हणणें असें पडतें कीं, ही गोष्ट लोकांनींच आपल्या शिरावर घेतली पाहिजे, दुसऱ्या पक्षाच्या मतें केवळ लोकांवरच ही जबाबदारी सोपविण्यापेक्षां, सरकार व लोक या उभयतांच्या साह्यानें हें काम शेवटास नेण्याचा प्रयत्न करणें, नुसतें इष्ट आहे इतकेंच नाहीं, तर तसें केल्यावांचून या बाबतींत आमचे पाऊल कशानेंही पुढें जाण्याची फारशी आशा नाहीं. आतां सती जाण्याची चाल बंद करण्यास किंवा विधवाविवाह कायदेशीर ठरविण्यास कोणीं कारणें होतीं, किंवा विधवावपन बंद करण्यास जीं कारणें होतीं, तींच या बालविवाहाच्या चालीसही पूर्णपणें लागू होतात, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या योग्य मर्यादांचा जसा प्रत्यक्ष अतिक्रम वरील गोष्टींत होतो, तसा बालविवाहाच्या चालींत उघडपणें भासत नाहीं. या बालविवाहाच्या चालीमुळें लक्षावधी मुलांचा १२ दिवसांच्या आतच मोक्ष होत असला, १६-१७ वर्षांतच मुलें बाप बनण्यामुळें त्यांची तारुण्यांतील हिम्मत व महत्वाकांक्षा सर्व जागच्या जागीं जिरून जात असली, किंवा ७-८ वर्षांपासूनच आईबापांच्या ममतेस पारखी होऊन, सासरच्या माणसांच्या कानें मुलींचें सर्व व्यक्तित्व नाहींसें होऊन संसाराचा गाडा

हांकण्यास ती सर्वतोपरी लंगडी होत असली, तथापि त्यांत काय झालें ? त्यांत घोर अनर्थ तो कोठें घडला ? व तो बंद करण्यास कायदा कशास पाहिजे ? असा एक पक्ष करतां येण्यासारखा आहे हें आम्ही जाणून आहों. आतां ' कृतांत कटका मलध्वज जरा दिसों लागली ॥ पुरःसरगदां सवें झगडतां तनू भागली अशी स्थिति होऊन जाऊन ज्यांस मृत्युपाशानें घेरल्याची चिन्हें स्पष्ट दिसत आहेत ,, अशा ९९ वर्षांच्या थेरड्यास ' नवरा मुलगा ' सजवून एकाद्या ७-८वर्षांच्या अडाणी लेकरास बहुल्यावरच ' रंडकी ' करण्यांत ज्यास अनीतीचा यत्किंचितही भाग दिसत नाहीं, व तिचा मात्र पुनर्विवाह झाल्यास 'अब्रह्मण्यम्' 'अब्रह्मण्यम्' म्हणून दाही दिशा दणाणून सोडण्यास जे तयार, अशा लोकांस, आईबापांनीं व सासुसासऱ्यांनीं, केवळ आपल्या हौसेखातर सजीव बाहुलाबाहुलींचीं लग्नें लावण्याचा खेळ खेळल्यापासून, तुमचा खेळ होतो परंतु आमचा जीव जातो' असें म्हणण्यास कधी जागा सांपडते हें कळूं नये हें अगदीं असावें तसेंच अ तसेंच एखाद्या चोरट्या सुनेस ओळ लावण्याकरितां तापल्या पळीनें डागणें, किंवा तिला उलटी टांगून तिच्या पाठी सालडीं काढणें हें जसें सासूचें कर्तव्यच आहे त्याप्रमाणें पुढें म वाईट पाऊल पडेल एवढ्या संशयाच्या आरोपावरून एखा बालविधवेची न्हाव्याकडून विंड काढविणें हें केवळ यथान्य आहे अशीच ज्यांची समजूत अशा लोकांनीं बालविवाहा कायद्याच्या आड यावें यांतही कांहीं विलक्षण नाहीं. व ' राष्ट्रीयसभा नुसत्या ब्राम्हणांचीच आहे व यापासून ब्राह्मणां आपलाच फायदा करून घेत आहेत ' असे अजागळास

प्लॉटस भाड्यानें देणें आहेत–फर्ग्युसन(पुणें) कॉ समोर–हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर–सुधारक, पुणें

प्रलाप करणारे लोक वेडे आहेत म्हणून जसें सरकारनें ते जमेस धरण्यारखे नाहींत तसेंच वरील लोकांचीही सल्ला मसलत घेण्याचें सरकारास कारण नाहीं. परंतु राजकीय गोष्टींत मदत देण्यास ज्यांस अधिकार आहे अशा सुशिक्षित लोकांत या बाबतींत केवळ एकमत जरी झालें नाहीं तरी कायदा असावा असें बहुमत झाल्यावांचून मात्र कायदा करणें योग्य होणार नाहीं हें उघड आहे.

संम आतां ज्या गोष्टींत प्रत्यक्ष अन्याय किंवा जुलूम होत नसेल अशे समाजांतील दोष कायद्यानें काढूं पहाणें योग्य नाहीं असें आम्हीं पूर्वी दर्शविलें असून या चालीच्या निरसनार्थ कायद्याची पाठिंबा द्यावी असें कां म्हणतो, हें प्रथम सांगितलें पाहिजे. सोपानापानें मुलास, पंतोजीनें शिष्यास, किंवा भाडेकऱ्यानें आपल्या कामट्यास, ममतेनें, मन वळवून चुचकारून मार्गास लावावे हा नाहींयम पक्ष परंतु तशानें सर्वच प्रसंगीं कार्यभाग होतो असें नाहीं. क्वचित्प्रसंगीं मुलास चागुलचोवाचें भय दाखवावें लागतें, कधीं शिष्यास चाबूल डीवर चढविणें भाग पडते, व तट्टास बाभळीच्या फोकावांचून वेगीं चालरा उपाय अपुरा पडतो. तीच गोष्ट प्रस्तुत प्रसंगांही लागू होते. लग्न म्हणजे पोरखेळ नव्हे, त्याचा व समाजाच्या हिताचा जसें घर निकट संबंध आहे, तेव्हां एकदा कशी तरी पोरांचीं हाडें झिजाजून काढलीं कीं, गंगेत घोडें न्हालें, असें समजून, काळ वेळ होतो, रे कांहीं न पहातां, जीं आईबापें आपल्या मुलांमुलींस चतुर्भुज करावयाविषयीं अगदीं हावरीं झालेलीं असतात, त्यांनीं आपलें कर्तव्य जाणून स्वसंतोषानें हा 'पोरखेळ' सोडावा हा तर राजमार्ग. परंतु आईबापांच्या अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें तीं असें करण्यास तयार नसतील, तर त्यांस कायद्याच्या बागुलबोबाईचा भिवविणें अर्थात अवश्य होतें. आतां नुसत्या आईबापांच्या कानें नें, किंवा शिक्षकांच्या दचकावणीनें मुलांची सर्व सुधारणा हो-

णारी नाहीं. मुलानेंही कांहीं उमजलें पाहिजे हेंही खरें. परंतु चवदाव्या रत्नाच्या भीतीनें एकदां त्यास वळण लागलें म्हणजे हळूंहळूं त्या वळणाच्या गोडीनेंच त्याची सुधारणा होत जाते. तसेंच बालविवाहाची चाल मोडून योग्य कालीं विवाह होऊं लागण्यास केवळ कायदा बस्स आहे असें आम्ही मुळींच म्हणत नाहीं. कायद्यानें फारच थोडा टप्पा साधणार आहे, पुढचा सर्व मार्ग क्रमण्यास समाजाच्या पायांतच जोर पाहिजे, त्या वांचून तो आंवरणार नाहीं हें उघड आहे. कायदा फार झालें तर मुलीच्या बाबतींत १०–१२ वर्षापर्यंत मजल मारील किंवा मुलाच्या बाबतींत १६–१७ वर्षापर्यंत विवाह मर्यादा नेईल परंतु एवढ्यानेंच आपणास समाधान मानून बसतां येत नाहीं. आपणास त्याच्या पुष्कळ पुढें गेलें पाहिजे, कायद्याच्या योगानें इतकेंच होईल कीं, १०–१२ व १६–१७ हीं मर्यादा तरी कायमची झाल्यासारखी होईल. आज मित्तीस ज्या लोकांस या दुष्ट चालीचे परिणाम माहीत नाहींत तेच याच्या पूर्वी लग्नें करतात असें नाहीं; ज्या लोकांस आपली चूक पूर्णपणें दिसत असते अशाही लोकांस मुलगी ७–८ वर्षांची झाली नाहीं तोंच व मुलास १२ वें वर्ष लागलें नाहीं तोंच त्यांच्या लग्नाच्या फिकीरींत पडावें लागतें. कारण, जातिभेदामुळें वधुवरांची निवड करण्यास फारच आकुंचित प्रदेश असल्यामुळें, व त्यांतल्या त्यांत नवीन शास्त्रार्थ मध्यें घुसून ब्राह्मणांतल्या ब्राह्मणांतच देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, असे वर्ग उत्पन्न झाल्यामुळें आपण आपली मुलगी

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकटेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १८१

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

किंवा मुलगा वाढविला असतां, त्यास पुढें योग्य स्थळ कसें मिळेल, ही काळजी आईबापांपुढें दत्तासारखी उभी राहून त्यांचें सर्व सुधारणेचे विचार जागच्या जागीं थिजून जातात. एखाद्या मनुष्यावे हात बांधून टाकून तो कांहीं उद्योग करीत नाहीं म्हणून त्यास दोष देणें शहाणपणाचें नाहीं. तसेंच सुधारणा व्हावी असें इच्छिणाऱ्या व बोलून दाखविणाऱ्या लोकांच्या अडचणी दूर करतां येण्यासारख्या असूनही त्या दूर न करितां "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे" असा मोठ्या आढ्यतेनें उपदेश करीत बसणें, व जी गोष्ट आपल्या हातून घडत नाहीं, तीच दुसऱ्यांनीं न केल्याबद्दल त्यांचा उपहास करीत बसणें केवळ चुकीचें होणार आहे. ज्या सुधारणेचा केवळ स्वतां पुरतांच परिणाम घडणारा असतो अशा गोष्टींत मनुष्यानें स्वतांस झीज लावून घेऊन, धैर्याचें उदाहरण जगास दाखवावें हें योग्य आहे. परंतु ज्या सुधारणेचा दुसऱ्याच्या हिताहिताशीं प्रत्यक्ष संबंध पोहोंचतो, अशा गोष्टींत, आपलें बोलणें खरें करून दाखविण्याकरितां, आपलें व आपणावर अवलंबून असणाऱ्या मुलाबाळांचें नुकसान करण्यास प्रवृत्त होणें, हें सर्वथा योग्यच आहे असें खात्रीनें म्हणतां येण्यासारखें नाहीं. तात्पर्य बालविवाहाची चाल घातक आहे असा जरी पुष्कळांचा समज झालेला आहे तथापि इतरांचाही तसा झाला आहे किंवा नाहीं याविषयीं साशंक असल्यामुळें व आपल्या मुलाबाळांचें हिताहित होणें विशेष महत्त्वाचें कर्तव्य असल्यामुळें, त्या विचारांचा प्रचारावर परिणाम घडण्यास जी एक मोठी अडचण येते ती या कायद्यानें दूर होण्यासारखी आहे. सर्वच मुलींचीं लग्नें १०-१२ वर्षांच्या आंत होणार नाहींत किंवा सर्वच मुलांचीं १६-१७ वर्षांपुर्वी होणार नाहींत अशा कायद्यानें हमी घेतली असतां ही चिंता काळजी दूर होईल व आपलें एकतरी पाऊल पुढें पडलें असें खात्रीनें म्हणतां येईल. शिवाय १०-१२ वर्षांपर्यंत

कांहीं मुली अविवाहित राहतात, व त्याबद्दल कोणी तक्रार करीत नाहीं येवढ्यावरून असा कायदा करण्यास लोकांची धर्म-समजूत आडवी येतें असेंही ह्मणतां येणार नाहीं तात्पर्य अशा बाबींत सामान्य दृष्टीनें पहातां कायद्याची मदत घेणें जरी सर्वांशीं ग्राह्य नाहीं तथापि आमच्या समाजाचा पूर्व इतिहास व सांप्रतची स्थिति हीं मनांत आणतां हें आमचें निगरगट्ट तट्टू कायद्याच्या फोकावांचून सहसा हलणार नाहीं असें आम्हास वाटतें

आपल्या सुशिक्षित मंडळीस खरोखर आपली सुधारणा व्हावी हीं गोष्ट जर इष्ट असेल तर आमच्या मतें त्यांनीं या कायद्याच्या आड येण्याचें कारण नाहीं. बाकी सुधारणाच नको असेल तर मग खुशाल 'थंडे सुधारक' व 'उतावळे सुधारक' वगरे निरर्थक कोटिक्रम लढवून पांडित्य करीत बसाव. आम्हास जसा कायदा असावा असें सुचविलें आहे त्यांत वावगें असें कांहीं एक नाहीं. त्याच्या योगानें समाजाच्या धर्मसमजुतीस धक्का पोहोंचण्याचें भय नाहीं, त्याच्या योगें पुष्कळांस इष्ट असणारी सुधारणा अनायासानें होणारी आहे व तीही फारच नियमित असून सर्वांस संमत अशीच आहे 'तुमच्या राष्ट्रीय सभेंत स्त्रियाही हजर आहेत हें पाहून मला फार आनंद होतो' असें मि. ब्राडलाचे उद्गार ऐकून टाळ्यांचा गजर करून सोडणारे हिंदुस्थानच्या २५ कोटि प्रजेचे मुखत्यार जर अप्रामाणिक नसतील तर या कायद्यानें विवाहमर्यादा कायमची १०—१२ वर्षांवर येऊन, तितका वेळ तरी, ज्यास ज

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपा

'संदेश' एजंट, पुणें सिटी.

किंवा मुलगा वाढविला असतां, त्यास पुढें योग्य स्थळ कसें मिळेल, ही काळजी आईबापांपुढें दत्तासारखी उभी राहून त्यांचें सर्व सुधारणेचे विचार जागच्या जागीं थिजून जातात. एखाद्या मनुष्याचे हात बांधून टाकून तो कांहीं उद्योग करीत नाहीं म्हणून त्यास दोष देणें शहाणपणाचें नाहीं. तसेंच सुधारणा व्हावी असें इच्छिणाऱ्या व बोलून दाखविणाऱ्या लोकांच्या अडचणी दूर करतां येण्यासारख्या असूनही त्या दूर न करितां " कियेवीण वाचाळता व्यर्थ आहे " असा मोठ्या आढ्यतेनें उपदेश करीत बसणें, व जी गोष्ट आपल्या हातून घडत नाहीं, तीच दुसऱ्यांनीं न केल्याबद्दल त्यांचा उपहास करीतं बसणें केवळ चुकीचें होणार आहे. ज्या सुधारणेचा केवळ स्वतां पुरतांच परिणाम घडणारा असतो अशा गोष्टींत मनुष्यानें स्वतांस झीज लावून घेऊन, धैर्याचें उदाहरण जगास दाखवावें हें योग्य आहे. परंतु ज्या सुधारणेचा दुसऱ्याच्या हिताहिताशीं प्रत्यक्ष संबंध पोहोंचतो, अशा गोष्टींत, आपलें बोलणें खरें करून दाखविण्याकरितां, आपलें व आपणावर अवलंबून असणाऱ्या मुलाबाळांचें नुकसान करण्यास प्रवृत्त होणें, हें सर्वथा योग्यच आहे असें खात्रीनें म्हणतां येण्यासारखें नाहीं. तात्पर्य बालविवाहाची चाल घातक आहे असा जरी पुष्कळांचा समज झालेला आहे तथापि इतरांचाही तसा झाला आहे किंवा नाहीं याविषयीं साशंक असल्यामुळें व आपल्या मुलाबाळांचें हिताहित होणें विशेष महत्वाचें कर्तव्य असल्यामुळें, त्या विचारांचा प्रचारावर परिणाम घडण्यास जी एक मोठी अडचण येते ती या कायद्यानें दूर होण्यासारखी आहे. सर्वच मुलींचीं लग्नें १०-१२ वर्षांच्या आंत होणार नाहींत किंवा सर्वच मुलांचीं १६-१७ वर्षांपुर्वी होणार नाहींत अशा कायद्यानें हमी घेतली असतां वरीचीच काळजी दूर होईल व आपलें एकतरी पाऊल पुढें पडलें असें खात्रीनें म्हणतां येईल. शिवाय १०-१२ वर्षांपर्यंत

कांहीं मुली अविवाहित राहतात, व त्याबद्दल कोणी तक्रा
करीत नाहीं येवढ्यावरून असा कायदा करण्यास लोकांची धर्म
समजूत आडवी येतें असेंही ह्मणतां येणार नाहीं तात्पर्य अश
बाबींत सामान्य दृष्टीनें पहातां कायद्याची मदत घेणें जरी
सर्वांशीं ग्राह्य नाहीं तथापि आमच्या समाजाचा पूर्व इतिहास
व सांप्रतची स्थिति हीं मनांत आणतां हें आमचें निगरगट्ट
तट्टू कायद्याच्या फोंकावांचून सहसा हलणार नाहीं असें
आम्हास वाटतें

आपल्या सुशिक्षित मंडळीस खरोखर आपली सुधारणा व्हावी
हीं गोष्ट जर इष्ट असेल तर आमच्या मतें त्यांनीं या का
द्याच्या आड येण्याचें कारण नाहीं. बाकी सुधारणाच न
असेल तर मग खुशाल 'थंडे सुधारक' व 'उतावळे सुधारक
पंगरे निरर्थक कोटिक्रम लढवून पांडित्य करीत बसाव. आ
जसा कायदा असावा असें सुचविलें आहे त्यांत वावगें ३
कांहीं एक नाहीं. त्याच्या योगानें समाजाच्या धर्मसमजुतं
धक्का पोहोंचण्याचें भय नाहीं, त्याच्या योगें पुष्कळांस
असणारी सुधारणा अनायासानें होणारी अ
व तीही फारच नियमित असून सर्वांस संमत अशीच आ
'तुमच्या राष्ट्रीय सभेंत स्त्रियाही हजर अहेत हें पाहून म
फार आनंद होतो' असें मि. ब्राडलाचे उद्गार ऐकून टाळ्यां
गजर करून सोडणारे हिंदुस्थानच्या २५ कोटि प्रजेचे मुखत्य
जर अप्रामाणिक नसतील तर या कायद्यानें विवाहमर्यादा का
मची १०—१२ वर्षांवर येऊन, तितका वेळ तरी, ज्यास ज

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपा

'संदेश' एजंट, पुणें सिटी.

इष्ट असेल तसें मुलीस शिक्षण देण्याची सोय होणारी आहे, अशा विचारानें ते या कायद्याच्या आड येणार नाहींत अशी आह्मांस आशा आहे. १०—१२ वर्षांच्या पूर्वी विवाह न झाल्यानें पुष्कळ बालवधूचें कुंकू पुसलें जाणार नाहीं, अशा मुग्धवयांत सासरीं कसें वागावें हें न कळल्यामुळें, त्यांच्या हातून ज्या चुका होतात, त्यांस ही संधी राहणार नाहीं, व आईबापांच्या बेचाळीस कुळाचा उद्धार होण्याचें थांबून त्या लेकरांवाही पुष्कळ जाच अनायासें दूर होईल. पेनाच्या एका लडाख्यासरशीं सर्व सुधारणा करूं पहाण्याचा आरोपही या कायद्यावर आणतां येण्यासारखा नाहीं. बालविवाहाचा प्रघात खरोखर मोडण्यास समाजानेंच तयार झालें पाहिजे हीं गोष्ट हा कायदा विसरला नाहीं. बापाच्या घरीं मुलीस ऋतु प्राप्त झाला असतां बेचाळीस कुळ्या नर्कांत जाणार ही वेडगळपणाची मजूत दूर करणें ह्मणजे एकादा प्रचंड पर्वत जमीनदोस्त करण्यासारखें आहे व या पर्वतावर आघात करीत बसण्याचें काम समाजासच केलें पाहिजे. तें मात्र कायद्यानें होणें अशक्य आहे. फार दिवसपर्यंत एकाच स्थितीशीं खिळून गेलेल्या या देशाच्या समाजास प्रथम गती देण्याचें काम मात्र कायद्यानें होणारें आहे. आगगाडी चालू लागण्यापूर्वी जसा थोडासा धक्का द्यावा लागतो तसाच हा कायद्याचा कडक उपाय गौण समजला तथापि तो पत्करला पाहिजे. एखादा मनुष्य रोगानें जर्जर झाला असतां नुसत्या मात्रेच्या वेढ्यानें त्यास ह्मणजे ताप उतार पडून तो धडाकट्टा होतो असें नाहीं तर त्याच्या योगानें केवळ प्राण मात्र वचावतो. तशीच केवळ या कायद्याची गोष्ट आहे. यांत उतावळेपणाचा गंधही नाहीं. ज्या सरकारच्या न्यायनीतीवर आमचा इतका विश्वास आहे कीं, आम्ही सर्वस्वी गुलाम झालों आहों तथापि त्याच्याच मदतीनें आह्मी स्वतंत्र राष्ट्रपद होऊं असा आमचा पूर्ण भरंसा आहे, ज्यांच्या केवळ

भूतदयेनें असंख्य गुलाम आज स्वातंत्र्य भोगीत आहेत, व आम्हांसारख्या परधर्मी, भिन्नवर्णी.. व हजारों कोसांच्या अंतरावर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठीं अभ्रांत श्रम करणारे मि. ह्यूम, मि. ब्रॉडला, त्यांच्या सारखे शेंकडों उदार महात्मे ज्या लेकांत निपजतात, त्या लोकांनीं नियंत्रित अशा हिंदुस्थान सरकारापाशीं आम्ही कायदा मागितला असतां काय परिणाम ओढवतील कोण जाणे म्हणून बळेंच आपण भ्याल्यासारखें दाखवून दुसऱ्या असंख्य लोकांस भिववण्याचा प्रयत्न करण्यांतच जर थंडी सुधारणा असेल तर अशा थंडया सुधारकांपासून ईश्वर आम्हास वाचवो ! आम्हास त्यांची ही प्राणघातक माया नको ! ज्यांच्याकरितां एकादी सुधारणा करावयाची त्यांच्यावर त्या सुधारणेनें प्रत्यक्ष जुलूम होत असूनही ती सुधारणा कोणी करूं पाहील तर त्याच्या आड येणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. व अशा लोकांसच जर योग्य रीतीनें ' थंडे सुधारक ' म्हणतां येईल तर मग बालविवाहाच्या दुष्ट प्रघातांत, लोकांवर प्रत्यक्ष जुलूम न करितां अशतः प्रतिबंध करण्यास साधनभूत असा कायदा मागणाऱ्या लोकांस ' उतावळ्या सुधारकांत ' ओढून, तुला न मला घाल कुत्र्याला असा प्रकार सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांनीं कां करावा हें आम्हांस समजत नाहीं.

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

सामाजिकसुधारणापरिषदेचे निंदक.

राष्ट्रसभेच्या पाठीमागून सामाजिक विषयाचा विचार करण्याकरितां गेलीं दोन वर्षें दोन सामाजिक परिषदा झाल्या. राष्ट्रसभेसाठीं एकत्र जमणाऱ्या लोकांना अनायासें सामाजिक गोष्टींविषयीं चर्चा करण्यास सांपडून, त्यासंबंधानें एकमेकांचे विचार एकमेकांस कळविण्यास व ताडून पहाण्यास सांपडावें, आणि जमल्यास एखादी विशिष्ट सुधारणा अमलांत आणण्यासाठीं सर्वांनीं एकत्र बसून एखादी तोड काढावी, या हेतूनें गेल्या दोन सामाजिक परिषदा भरविण्यांत आल्या, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. अशा प्रकारच्या सभांपासून व्हावा तितका फायदा तत्काळ होण्याचा संभव नाहीं, हें स्वल्प विचाराअंतीं ध्यानांत येण्यासारखें असतां, शिंगें मोडून घेऊन वासरांत शिरणारे सुशिक्षित पण लोकरंजनपरायण, लौकिकाभिलाषी, दुराग्रही, व कांहीं अंशीं भेकड असे कित्येक लोक अशा परिषदांचें आपणाकडून होईल तितकें अभिनंदन करण्याचें सोडून देऊन, त्यांवर तुटून पडूं लागले आहेत, हें पाहून कोणत्या समंजस मनुष्यास विस्मय व खेद होणार नाहीं ? सामाजिक परिषदेचें काम नीट न झालें तर त्याबद्दल लाज कोणाला ? ज्यांनीं ती स्थापून तिच्या द्वारें कांहीं सामाजिक हित झालें तर व्हावें, म्हणून आपणांकडून होईल तितकी खटपट चालविली आहे त्यांना ? किंवा जे त्याला आणवेल तेवढा व्यत्यय आणतात त्यांना ? ' अमुक प्रकारचे लोक अमुक रीतीनें सुधारणा करूं पहात आहेत, पण त्यांची ती रीत आम्हांस मान्य नाहीं,' असें म्हणून कांहींच न करणें, किंवा उपहास करीत सुटणें, हा फार सोपें आहे ! शंका कोणाला घेतां येत नाहींत ? दोष कोणाला दाखवितां येत नाहींत ? पाडापाडा व मोडातोड करण्या-

ला कोणाला कष्ट पडतात ? असलीं कामें कोणहिं करूं शकेल ! शंकांचें समाधान करणें, दोषयुक्त वस्तूंतलि चांगला भाग ओळखून त्याला चळकटी आणण्याचा प्रयत्न करणें, व जें पडलें-मोडलें असेल त्याची डागडुगी करणें किंवा कांहीं तरी नवीन बाधणें हें किती कठिण आहे ? जो हें करील तोच खरा कसबी. अशाला ' दुर्धारक ' ह्मणून, जे आपणांस व्यंग्योक्तीनें ' खरे सुधारक ' ही संज्ञा लाऊन घेतात, व दुर्धारकांवर दुःशब्दांचा प्रहार करीत सुटतात त्यांनीं आजपर्यंत काय दिवे लाविलें आहेत ? आजकाल सामाजिक गोष्टींत जी जागृति दृष्टीस पडूं लागली आहे तींत यांचें किती अंग आहे ? व तीविषयीं त्यांनी काय केलें आहे ? स्त्रीशिक्षणासाठीं मुलींचीं हायस्कुलें घालणें चांगलें नसेल, पण या ' मित ' सुधारकांनीं आपल्याच पद्धतीनें कां होईना; यासंबंधानें काय केलें आहे ? पाहिजे त्या वयाच्या गतभर्तृकेनें पुनर्विवाह करण्यास हरकत नाहीं, असें जर कधीं कोणी म्हटलें असेल तर त्यास अधीर ठरवून, या 'माफक' सुधारकांनीं ऋतुस्नात होण्यापूर्वीं जेवढ्यांस वैधव्य प्राप्त झालें असेल तेवढ्या अनाथ कन्यकांस तरी सनाथ करण्याचा प्रयत्न कां केला नाहीं ? लग्नाच्या वयाच्या इयत्तेविषयीं कायद्याचें बंधन करून घेणें हितावह नसेल, पण दहा वर्षांहून लहान वयाच्या मुलीचें लग्न करणें बरोबर नाहीं, हें जर या ' खऱ्या ' सुधारकांस संमत असेल, तर दहा वर्षांच्या आंतील वयाच्या कोणत्याही मुलीच्या भालप्रदेशावरील कुंकुमांकास धक्का न पोहचूं देण्याविषयीं यांनीं काय खबरदारी ठेविली आहे ? ऋतु

वैद्यकपत्रिका:— हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टं. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें

प्राप्त न झालेल्या स्वर्गांशीं गमन करणाऱ्या उतावीळ नवऱ्याला पिनल कोडानें अपराधी समजून शिक्षा ठोठावावी, असें म्हणणें अविचार असेल, पण जर अशा प्रकारचा संभोग निंद्य आहे, असें समाजाच्या या निष्कपट हितचिंतकांस वाटत असेल, तर त्यांनीं अशा प्रकारचा अनाचार न होऊं देण्याबद्दल आजपर्यंत काय तजविजी केल्या आहेत त्या आज ते जगापुढें मांडूं शकतील काय ? सर्वच गतभर्तृकांना वपन करून येऊन कुरूप होणें संकटावह वाटत नसेल, पण ज्यांवर तो प्रसंग मूर्ख मातापितरांच्या किंवा निर्दय सासुसासऱ्यांच्या, जुलमामुळें येत असेल, त्यांना त्यांतून सोडविण्याबद्दल दुर्धारकांच्या या निंदक सुधारकांनीं कोणते उपाय केले आहेत ? मांडीवरमांडी ठोकून वल्गना करीत सुटणें, दुसऱ्यांचीं व्यंगें काढणें, मूढ अविचारी लोकांकडून पाठ थोपटून घेण्यासारखा प्रलाप करणें, व कांहीं न करतां आपणांस देशाहिताची मोठी कळकळ आहे, व तें साधण्यासाठीं आपण नेहमीं झटत आहों, असें दाखविणें फार सोपें आहे ! जर असें नसतें, व अनेक युगें रूढ होऊन बसलेल्या अपायकारक आचाराविरुद्ध जाणें हें किती अवघड आहे, हें सहज समजण्यासारखें असतें, तर सामाजिक सुधारणापरिषदेसारख्या संस्थेच्या न्यूनत्वाची टिमकी वाजवीत न बसतां, तें काढून टाकून तिला सुरूपता व हितकर्तृकता आणण्याचा प्रयत्न या 'माफक' व 'खऱ्या' सुधारकांनीं खचित केला असता !

अजून तरी सावध व्हा.

गेल्या दीनबंधुतील लेखकानें अन्वर्थ काम केलें. अनाथ, दीन अबला गाईस वैधव्याची जन्मभर आठवण देणारा जो

न्हाव्यांचा वर्ग त्यांस चार गोष्टी सांगून त्यांच्या हातून प्रत्यहीं जें अघोर कर्म होत आहे तें स्वतः होऊन बंद करण्याचा उपदेश केला आहे. अहो धर्मसमता ठेवणारे वेदोक्त धर्माचे अभिमानी आचार्य, दिक्षितांनों ? आतां तरी कांहीं लाज धरा. तुमच्या लेकी, सुना, व भगिनी यांची दया तुमच्या शूद्र बंधूंस येऊन त्यांनीं सद्वासना धरली व अशरण स्त्रियांस तुमच्या धर्माच्या-अधर्माच्या असेंच म्हणणें सयुक्तिक आहे-चिखलांतून बाहेर काढून टाकण्याचें मनांत आणलें आहे, तें पाहून खालीं मान घाला. न्हाव्यांकडून कट झाला असतां ब्राम्हण लोक भादरण्याचा धंदा पत्करून विधवावपनाची चाल कायम ठेवतील असें आम्हांस वाटत नाहीं. वेळेवर जागे व्हाल तर बरी गत आहे, नाहीं तर सुधारणेचा शकट आज जो ब्राम्हणांकडून बऱ्याच अंशानें हांकला जात आहे, तें सर्व फिरून आजपर्यंत अडाणी मानलेल्या लोकांकडे त्याचें धुरीणत्व जाईल, हें ध्यानांत धरा. ब्राम्हण स्त्रियांची दैना पाहून शूद्र लोकांस गहिंवर याव व स्वलाभाची संधी सोडून म्हणजे आपल्या पोटावर बिब्बा घालून ब्राह्मण भगिनींचा उद्धार करण्याची खटपट करावी अशीं उदाहरणें आपल्या डोळ्या देखत घडत असतांही अजून कलीयुगच आहे, या युगांत लोक नीतिभ्रष्ट होत जाणार, इत्यादि वृथा जल्पना करणाऱ्यांचे दांत त्यांच्या घशांत घातलेंसें होत नाहीं काय ? दीनबंधूनें सुचविल्याप्रमाणें न्हाव्यांत जर कट झाला तर किती बरें मजा होईल ?

धर्मांधकारांत लोळणाऱ्या स्त्रिया, पैशाच्या लालुचीनें हजाम

ब्रह्मी बाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटं

करणारे न्हावी, व अपवाद भयानें नातेवाईक लोक इतके सर्व पापाचरणामध्यें बुडत आहेत. यापैकीं दोघांनीं मन घट्ट केलें असतां तिसऱ्याचें कांहीं न चालून त्यास गप्प बसावें लागेल. स्त्रियांनीं आपल्या संरक्षणाकरितां पुढाकार घेऊन या राक्षसी रीतीविरुद्ध बंड करावयाचा वेळ येण्यास अजून बराच अवकाश आहे. राहतांपैकीं राहिले दोन वर्ग. ज्या लोकांत केशवपनाची चाल आहे त्या जातींतील म्हणजे ब्राह्मणवर्गांतील बरेच लोक आधुनिक शिक्षणाच्या जोरानें स्त्रियांवर होणारा जुलूम पाहण्यास दिवसानुदिवस नाखुष होत आहेत हा कायतो संतोषाचा भाग आहे. आतां ह्याच अमानुष कृत्यांत ज्यांचा हात आहे असा तिसरा वर्ग न्हाव्याचा. दीनबंधूनें लिहिल्याप्रमाणें खरोखरच त्या वर्गाची हलाखी असल्यास आपल्या दुष्कर्माचरणानें फिदा होणारी अक्काबाई त्यानें लवकर लाथ मारून बाहेर घालवावी, म्हणजे पतिशोकानें गताधार झालेल्या स्त्रीलतेवर वज्राभेदी शस्त्रानें तिच्या सौंदर्याचा विध्वंस करणाऱ्या कठोर हृदय न्हाव्यांच्या हातून प्रतिदिनी पातक होत नाहीं काय ? तिचे ते, पाषाणासही द्रव आणणारे करुणशब्द ऐकून त्याच्या—मनुष्यच तो आहे—मनाची काय स्थिति होत असेल ? संसारापासून कोणाची निवृत्ति करावयाची असल्यास त्यास हा धंदा सांगावा म्हणजे झालें ! असो याप्रमाणें संसार असार आहे, अशी खातरी होत जाणाऱ्या नापितवर्गाची या मर्त्यलोकीं चलती चालत नाहीं, यांत काय आश्चर्य आहे ? आपल्यावर पडणारी ही गदा घालविणें नापित वर्गाच्या हातांत आहे. त्यांनीं कट करून अनाथगाईंचा आम्ही छळ करणार नाहीं अशी सर्व जातीसमक्ष शपथ घेतल्यास काय गंमत होईल ? दिवसानुदिवस मानसोन्नति होत जाणाऱ्या श्रेष्ठ लोकांचा या अपकृत्यापासून होणारा संताप जर सद्धर्मानें वर्तन करूं इच्छिणाऱ्या धनाभिलाषाशीं न्हाव्यांच्या तिरस्कारास मिळाला तर

फार दिवसांपासून इष्ट वाटत असलेली सुधारणा सुरूं केल्याचें आपल्यास श्रय येणार नाहीं काय ? लोकापवाद कमी झाला, व केशकर्तनकारांचा कट झाला तर गरीब बिचाऱ्या गाईंस धर्माचें पांघरूण घेणाऱ्या या भुताटकी चालीला स्मशानभूमी दिसण्याचा दिवस जवळ जवळ येणार नाहीं काय ?

सरकाराकडून कायदा मागण्याचा तरी हेतु हाच आहे. या मध्यें कोणत्याही विशिष्ट वर्गास दुखविण्याचें आमचें मानस नाहीं. जशी आपल्यामध्यें कांहीं कांहीं गोष्टींमध्यें सुधारणा करण्याचें बऱ्याच लोकांच्या मनांत येत आहे, त्याचप्रमाणें इतर वर्गांच्याही मनांत निष्पापवर्तन करण्याचें आल्यास या कामीं तरी सरकाराकडे जावें लागण्याचें कांहीं कारण राहील असें आम्हांस वाटत नाहीं.

सारांश, तात्पर्य इतकेंच ध्यावयाचें कीं, आमच्या श्रेष्ठ वर्गांतील स्त्रियांची सुटका करण्याचें इतर जातींच्या मनांत येत असतांनाही जर ज्यांचें नुकसान होत आहे अशा समजूतदार व श्रेष्ठ वर्णाच्या जातींनी आपल्या येथील घाणेरडा तबेला धुण्याचें मनांत येणार नाहीं तर मात्र सरकाराकडे गाऱ्हाणें न्यावयास आम्हीं कधींही कमी करणार नाहीं. देवदयेनें सध्यांचा प्रसंग चांगला आहे तेव्हां सगळ्यांनीं सावध व्हावें.

निबंध संग्रह.

भाग १ ला. किं. १।। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

अनाथाचा वाली कोणी नाहीं !

अलींकडे आमच्या युनिव्हार्सिटिच्या अभ्यासक्रमांत जे फेरबदल होत आहेत त्याकडे पाहिलें असतां, त्या मंडळीत जे जबरदस्त आहेत त्यांनीं हवें तें करावें, व लोकांचें खरें हित ज्या अभ्यासांत आहे, त्याकडे कोणींच लक्ष देऊं नये, असा प्रकार घडत आहे, असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. थोडया वर्षांपूर्वी सर रिचर्ड टेंपल यांस आर्ट्स् कोर्समधील दोन परीक्षेच्या ऐवजीं तीन कराव्या असें वाटलें. खुद्द गव्हर्नराच्या व चॅन्सेलराच्या, व त्यांतही सर रिचर्ड सारख्या गव्हर्नराच्या व चॅन्सेलराच्या मनांत कांहीं हुक्की आल्याबरोबर ती तडीस जाण्यास काय कठीण पडणार? युनिव्हार्सिटीचे लोक आपणांस मोठे सुशिक्षीत व स्वतंत्र म्हणवितात, व त्यांवर जुलूम करीत नाहीं, त्यापुढें ते आपल्या स्वतंत्रतेची ऐट मिरवितातही ! पण सर रिचर्ड पुढें त्यांचें कांहीं एक चालले नाहीं. सेनेटच्या एका बैठकीला दोन परीक्षा मोडून त्यांचे जागीं तीन केल्या, व आर्ट्स् कोर्स जितका कंटकमय करणें शक्य होतें तितका करून सोडिला, ही तीन परीक्षांची व्यवस्था झाल्यापासून बी. ए. चा अभ्यास करणाऱ्यास कालेजांत प्रवेश केल्यापासून त्यांतून बाहेर पडेतो पर्यंत दम टाकण्यास एक दिवसाची फुरसूत मिळेल तर ज्याचें नांव तें ! एका परीक्षेच्या चरकांतून पार पडावें तों दुसरी 'दत्त' करून पुढें उभी आहेच ! पूर्वी दीड वर्षानें एकेक परीक्षा घेतली जात असे, यामुळें आभ्यास मुरवण्यास वेळ सापडे इतकेंच नाहीं, तर विद्यालयस्थ आयुक्रम आताहून अनेक प्रकारांनीं विशेष सुखावह करून घेता येत असे. पहिल्या कोर्समध्यें पहिली व चौथी टर्म विद्यार्थ्यास खेळणें, पोहणें, हिंडणें, अभ्यासाच्या क्रमाच्या बाहेरचीं पुस्तकें वाचणें, नवीन

ओळखी करणें वगैरे गोष्टींत घालवितां येत असे. सध्यां तसें मुळींच करतां येत नाहीं; कारण प्रत्येक वर्षाच्या अखेरीस एकेक परीक्षा ठेऊन दिली असल्यामुळें, कालेजाच्या संवत्सराच्या वर्षप्रतिपदे-पासून त्याच्या फाल्गून वद्य अमामस्येपर्यंत पुस्तकाच्या समा-गमांत अहोरात्र दंग असावें लागतें. याप्रमाणें विश्रांति न सांपडतां तीन वर्षेपर्यंत सारा वेळ मानासिक श्रम करावे लागत असल्या-मुळें, हा कालेजांतर्गत त्रिवार्षिक शिक्षणक्रम अत्यंत कष्टावहं झाला आहे, हें अशा प्रकारच्या गोष्टीकडे बिलकूल ढुंकून न पाहणाऱ्या लोकांशिवाय बाकीच्यांस पूर्ण विदित झालें आहे. हें सर्व रिचर्ड टेंपल यांच्या आग्रहाचें फळ!

टेंपल व फर्ग्युसन साहेब जाऊन लार्ड रे आले. लोकशिक्षण विषयीं यांनीं फार विचार केलेला असा यांचा लौकिक यांचे पाय या देशास लागण्यापूर्वीं येथें येऊन थडकला असल्यामुळें, हे आमच्या युनिव्हर्सिटींत कांहीं तरी विलक्षण फेरफार करतील असें वाटलें होतें. पण सुदैवानें तसें त्यांनीं केलें नाहीं. युनिव्हासर्टीच्या अधिकारांत किंवा व्यवस्थेंत लार्ड रे यांनीं बिलकुल ढवळाढवळ केली नाहीं. सर्व परीक्षांचें अभ्यासक्रम व त्यांच्या मुदती अशा ते येण्यापूर्वी होत्या तशाच बहुशः अजून आहेत: व त्यांत जे अल्पस्वल्प फेरफार झाले आहेत ते युनिव्हर्सिटीनें आपले आपण केलेले आहेत.

मध्यम व वरिष्ठ शिक्षणास लार्ड रे यांनीं बाहेरून जितकी मदत करवली तितकी केली. त्या शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत त्यांनीं हात घातला नाहीं. यांत्रिक शिक्षण वाढलें पाहिजे;

संगीत सुविचार-विजय नाटक
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत
किं. ०८
सुधारक ऑफीस, पुणें.

त्यांत लोकांचें खरें हित आहे; अशी त्यांची पक्की खातरी होऊन गेली होती. पण या कामीं युनिव्हर्सिटीकडून झणण्य-सारखी मदत मिळण्याचा संभव नाहीं, असें त्यांस तेव्हांच दिसून आल्यामुळें त्यांनीं तिचा नादच सोडून दिला, आणि मग स्वतंत्र यांत्रिक शाळा स्थापण्याकडे आपलें लक्ष्य लाविलें. **व्हिक्टोरीआजूटेक्निकल इंस्टिटयूट** ही त्या हेतूनें त्यांनीं केलेल्या दीर्घ परिश्रमाचें फळ होय. शास्त्रीय विषयांकडेही लोकांचें लक्ष विशेष लागावें, असें त्यास वाटत होतें पण तें घडवून आणण्यांतही त्यांनीं बाहेरून बाहेरून तितकें करवलें तितकेंच केलें सर रिचर्डप्रमाणें युनिव्हर्सिटींत आपली चॅन्सेलर-गिरी बजावली नाहीं ! सरकारी नोकरींवर जे लोक ठेवायाचे त्यांत कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळालेलें असावें याचा निश्चय करण्याचा अधिकार वाजवी रीतीनें सरकाराकडे येतो. या योग्य अधिकाराचा फायदा घेऊन,त्यांनीं आमच्या मॅट्रिक्यूलेशन परीक्षेस बिलकुल न दुखवितां युनिव्हर्सिटीकडून सरका-रासाठीं युनिव्हर्सिटी-स्कूलफायनल नांवाची नवीन परीक्षा अस्तित्वांत आणविली, व तिच्या द्वारें आपला हेतू नेव-ल तितका स्वतंत्रपणें तडीस नेण्याचा प्रयत्न केला. तसेंच, मेडिकल व सायन्स कालेजांस हवी तितकी मदत करून, व व्हाईस चॅन्सेलरच्या जागेवर रे. मि. म्याकिकन यांची नेमणूक करून शास्त्रज्ञानप्रसाराविषयीं आपली दीर्घ उत्कंठा त्यांनीं होईल तितकी व्यक्त केली. यापलीकडे त्यांचा व युनिव्हर्सिटीचा प्रत्यक्ष संबंध घडला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. युनिव्हर्सि-टीच्या कान्व्होकेशनांत त्यांनीं केलेलें भाषण व युनिव्हर्सिटीच्या विधायिपर्यां मुंबईसरकारचा अभिप्राय यांचा युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता, हें कोणासें सांगितलें पाहिजे, असें नाहीं.

पण वारंवार होतें काय कीं, मूळ विचार करणारापेक्षां अनुकरण करणारेच मोठी धांदल करून सोडतात ! लॉर्ड रे गव्हर्नर झाले आहेत, व ते मोठे शास्त्रप्रसारेच्छू आहेत, असें दिसून आल्याबरोबर, ज्या त्या परीक्षेंत जमल्यास थोडेंबहुत पदार्थशास्त्र ढकलून देण्याविषयीं कित्येकजण उत्सुक झाले, व युनिव्हर्सिटीच्या आर्ट्स शाखेचा अभ्यासक्रम बदलण्याविषयी चर्चा सुरू झाली. हिला आरंभ होतांच ज्यांचे जे आवडते फरफार होते ते त्यांनीं पुढें आणिले. इतिहास, अर्थशास्त्र, देशी भाषा वगैरेंचें बरेंच ज्ञान असल्याखेरीज कोणाला बी. ए. म्हणणें उचित नाहीं, अशी साधारण कल्पना झाल्यामुळें, बी. ए. चा अभ्यासक्रम वाढवा अशा सूचना येऊं लागल्या. या सूचनांबरोबरच वर्षांचा संख्याही वाढविणें जरूर असल्यामुळें, तिहींच्या जागीं चार वर्षें असावीं, असा चूट निघाला; व तो बहुतेकांस पसंत झाल्यासारखा होऊन नवीन अभ्यासक्रमाचा एक मसुदा तयार करण्यांत आला. या मसुद्यांत अर्थशास्त्र, इतिहास, पदार्थशास्त्र, व देशीभाषा यांची बरीच सोय केली होती. पण जें चांगलें तें एकाएकी प्राप्त झालें तर जगाचीं सुधारणा होऊन जाऊन करण्यासारखें पुढें कांहीं उरणार नाहीं, व उर्वरित माशा मारीत बसावें लागेल, अशी भीति कित्येकांस उत्पन्न होऊन, व आमच्या खंगू लागलेल्या शरीरशास्त्राकडे त्यांचें लक्ष जाऊन, अभ्यासाच्या वाढविण्यास त्यांनीं हरकत घेतली कीं, आहेत त्याच अभ्यासांचें ओझें विद्यार्थ्यांस निभेनासें झालें असून त्यांवर अधिक ओझें लादण्यास तुम्ही प्रवृत्त होतां, याचा अर्थ काय ? बी. ए. चा क्रम चार वर्षांचा असून त्याचा अभ्यास प्रस्तुत काळीं आहे तितकाच

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत समधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. कि. ०५

खेडकरबंधु अॅन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

असला, तर तो त्रास न पडतां पक्का होईल. ही प्रतिसूचना मताधिक्यानें ठाम होऊन पहिले सारे बेत मागें पडले, व ऑक्ट. संध्याकाळीं सेनेटपुढें जो वाद होणार आहे त्यांत चतुर्वार्षिक बी. ए. च्या परीक्षेसाठीं तयार केलेल्या नवीन मसुद्याची चर्चा व्हावयाची आहे. या मसुद्यांत बी. ए. च्या प्रस्तुतच्या अभ्यासक्रमांतील कांहीं विषय कमी करून इतिहास, अर्थशास्त्र, व इंग्रजी निबंध लिहिणें या विषयांस जागा केली आहे, व देशी भाषांस गचांडी देऊन अजीबात हुसकून लाविलें आहे. तिहींची चार वर्षें झालीं असून व इंग्रजी, संस्कृत, आणि गणित यांतील कांहीं पुस्तकें कमी करण्याचा विचार असून, हा मसुदा करणाऱ्यांस देशी भाषांस पाय ठेवण्यापुरती सुद्धां जागा करतां आली नाहीं काय\? किंवा यांत त्यांच्याकडे तरी काय दोष काय आहे ? अनाथाला कोण वाली मिळणार ? ज्याप्रमाणें पूर्वी एका **ग्रांट**ानें या देशी भाषांचा पिच्छा पुरवून त्यांस युनिव्हर्सिटींतून पिटाळून लाविलें, त्याप्रमाणें दुसरा एक **ग्रांट** अवतरून तो यांचा पक्ष घेई तों पर्यंत त्यांस असेंच बाहेर भटकत रहावें लागणार, असें आम्हांस वाटतें! सिंडिकेटांतील महादेवास ही अतिशय महत्वाची बाब आहे असें अद्यापि न वाटूं लागलें असल्यामुळें, सेनेटांतील वामनदेवाचें कांहीं एक चालत नाहीं ! देशातील शिक्षणक्रम देशी भाषांत चालणें किती उचित आहे, हें ध्यानांत आणून तसें होण्याची खटपट करीत असणें हें तर एकीकडेच राहिलें; पण बाकीच्या विषयांप्रमाणें देशी भाषांस युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमाचा एक विषयही आह्मांस करतां येत नाहीं यावरून आमची आस्था, धमक, निश्चित विचार देशकल्याणाची खरी कल्पना आणि कोणत्याही गोष्टींत यश येईपर्यंत तिचा पाठलाग न सोडण्याचा निर्धार हीं व्यक्त होतात! युनिव्हर्सिटी आपल्या अभ्यासक्रमांत देशी भाषांस घालीत नाहीं ! युनिव्हर्सिटी अमकें करीत

नाहीं! युनिव्हर्सिटी तमकें करीत नाहीं! असें रडगाणें आतां आम्ही किती दिवस गात बसणार! युनिव्हर्सिटी, सिंडिकेट, सेनेट, अभ्यासक्रम, शिक्षणालयें हीं सारी निश्चयानें परिश्रम केल्यास आपल्या हातीं येणार आहेत, व आपणांस त्यांना पाहिजे तें वळण लाविलां येणार आहे, हें तुम्हांस केव्हां कळूं लागणार ? अगोदर देशी भाषांचा अभ्यास होऊं लागण्यांत व पुढें त्या भाषांतच अभ्यास होऊं लागण्यांत या देशाचें खरें हित आहे अशी तुमची पक्की खात्री झाली असेल तर युनिव्हर्सिटीचें नाक धरून तिच्याकडून या अप्रिय औषधीचा स्वीकार करविणें अशक्य आहे काय ? ती मोठी सामर्थ्य ती व आहे हें आम्ही कबूल करतों. पण अशीला जेरीस आणण्याचा खरा उपाय तिच्या दारांत पदर पसरून ' यांत आम्हास भिक्षा घाल ' अशी तिची दीनस्वरानें प्रार्थना करीत बसणें हा नव्हे असें करूं लागलांत कीं, तिला अधिकच ताठा भरला म्हणून समजा. अभिमानाचा काटा अभिमानानेंच काढला पाहिजे. युनिव्हर्सिटीचीं सूत्रें सध्यां ज्यांचे हातीं आहेत त्यांना देशी भाषांचा किंवा देशी भाषांत व राष्ट्रमतीचा अभ्यास होऊं लागल्यानें पाश्चिमात्य ज्ञानभांडारावर हल्ला करणें, व त्या हल्ल्यात सापडलेल्या लुटीपासून आपलें हित करून घेणें—या गोष्टीस किती साहाय्य होणार आहे, हें अद्यापि नीट दिसूं लागलें नाहीं, कितीहा समजाऊन सांगितलें तरी समजत नाहीं, व कानाशीं कितीही ओरडलें तरी ऐकूं येत नाहीं ? असल्या लोकांस समजविण्यास, पाहविण्यास, व ऐकविण्यास, लेचेपेचे प्रयत्न उपयोगी नाहींत. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत चळवळ करून लेखकांस योग्य मोबदला देऊन आम्हीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. व्युरो, पुणें,

च्या दंग्यानें यांचीं डोकीं भणाणून सोडिलीं पाहिजेत; 'देशी भाषा युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत घातल्याचें पाहिजेत व ज्यांना जे विषय त्यांच्याद्वारें शिकविण्याची इच्छा असेल त्यांना ते शिकविण्याची परवानगी दिली पाहिजे, अशा अर्थाचे अर्ज प्रत्येक खेड्यांतून, तालुक्यांतून, व जिल्ह्यांतून मुंबईस रवाना होऊन त्यांचे पर्वतप्राय भारे युनिव्हर्सिटीच्या हॉलांत येऊन पडले पाहिजेत, व लोकमत न पहाणाऱ्या प्रस्तुत अधिकाऱ्यांना जातां येतां त्यांचे धक्के बसले पाहिजेत, म्हणजे ते डोळे उघडून पाहूं लागतील ! अशा रीतीनें याचे डोळे व कान यासंबंधानें आपापले व्यापार नीट करूं लागले म्हणजे यांचे मेंदूही स्वाभाविकपणें आपलें काम नीट करूं लागतील ! पण त्या भरंशावर केवळ स्वस्थ रहाणें नीट नाहीं. त्याच्या पुढें या विषयांची चर्चा करून त्यांची खात्री करून सोडण्यासाठीं दूरदर्शी, विद्वान, बहुश्रुत, तारतम्यज्ञ व वाग्विदग्ध अशा प्रतिनिधीस हा कज्जा युनिव्हर्सिटीच्या कोर्टांत चातुर्यानें व नेटानें चालविण्याबद्दल वकालतपत्रें दिलीं पाहिजेत.

न करण्याचा वार शनवार.

राजकीय हक्क संपादन करण्यास आह्मांस जितक्या नडी आहेत तितक्या समाजसुधारणेस नाहींत. परंतु चमत्कार असा कीं तेथेंही पहावें तों आपलें गुडघाभरच पाणी. आतां असें का व्हावें यास पुष्कळ कारणें आहेत, व त्यांपैकीं कित्येक सयुक्तिक हि आहेत. परंतु खऱ्या अडचणीमुळें आमचें पाऊल जितकें थबकून रहातें त्यपेक्षां खोट्या अडचणीमुळें आह्मांस अधिक माघार खावी लागते. ज्या वर्गावर सर्व प्रकारच्या सुधारणेचा बोजा साहजिकपणें येऊन पडला आहे, त्यांच्यांत जर कर्तव्य

पराङ्मुखता नसती तर खऱ्या अडचणी दूर करणें अशक्य नाहीं. परंतु एकतर आमच्या सुशिक्षित वर्गापैकीं कित्येकांस आपली जबाबदारी मुळींच कळत नाहीं व दुसरे, ज्यांस ती कळते त्यांच्यापैकीं कित्येक लोक विशेष स्वार्थपरायण असल्यामुळें, परोकारार्थ आपल्या स्वतांस अप्रिय करून घेण्याचें त्यांस कधींही सुचत नाहीं. सुधारक मानलेल्या लोकांनीं ज्या ज्या सुधारणा सुचविल्या आहेत, त्या सर्व अप्रयोजक आहेत, असें म्हणावें तर तें आपल्या विद्वत्तेस शोभत नाहीं. तशानें सुशिक्षित लोकांत आपला सर्वथैव उपहास होणार. बरें त्यांचेंच मनोभावानें साध्य करावें तर सामान्य लोकसमुदायाकडून कांहीं काळपर्यंत तरी निंदा होणार. तेव्हां अशा स्थितींत काय करावें? कोंकडचा लोभ तर सुटत नाहीं. अर्थात् त्यास उपाय एकच. सोंगी बनावें म्हणजे झालें.

अशी आमच्या कित्येक सुशिक्षितांची अवस्था असल्यामुळें, आणलेल्या सोंगाची बतावणी करण्यास, त्यांस बऱ्यावाईट सर्व मार्गांचें अवलंबन करण्याची अर्थात् पाळी येते. आपली लबाडी उघडकीस येऊं नये म्हणून गारोडी जसा हरतऱ्हा करीत असते तसा यांचा प्रकार एकसारखा चालूं असतो. ' करून कां दाखवीत नाहीं ' ? म्हणून जो एक अशा लोकांकडून प्रश्न येतो त्याचें इंगितही यांतच आहे असें आम्ही मागेंच एकदां दाखविलें आहे. आतां यावर जर कोणी त्यांस उलट प्रश्न केला कीं, बरें दुसरे मूर्ख ठरले तर ठरेनात.तुम्ही स्वतःच कांहीं दिग्विजय करून कां दाखवीत नाहीं ' तर त्यावरही त्याच्या पोतडींत

संगीत समाजादर्श नाटक.
ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपाया.
' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

शक्कल तयार आहेच. ' काय करावें हो या पहिल्या मंडळींनं अगदीं घाण करून टाकली. भलभलत्या गोष्टी विचार न करतां यांनीं केल्या. लोकांचा विश्वास उडाला. आतां फिरून लोकांचा आमच्यावर विश्वास बसण्यास फार काळ गेला पाहिजे. हीं उतावळी सुधारक मंडळी आमचे पुढारी नव्हेत. हे आमचे कट्टे शत्रू आहेत, आमचा यांच्यावर अगदीं विश्वास नाहीं. अशी जेव्हां आम्ही लोकांची खातरी करूं, व या सर्वांस हुसकून लावूं तेव्हां लोकांचा आमच्यावर विश्वास बसूं लागेल. मग पहा ! ' चल चल ' म्हणतां सुधारणाच सुधारणा. उगाच घाई करून सगळी घाणच करून टाकावयाची कीं नाहीं ? हुमाहुमानें घतलें पाहिजे. ' पी हळद कीं हो गोरी ' असें कोठें झालें आह ! '

वरील शक्कल खरोखर योग्य आहे किंवा ' आपल्याला कांहीं करावयाला नको ' याचेंच हें सुधारलेलें भाषांतर आहे, हें ज्यांस पहाणें असेल त्यांनीं ' ज्ञानदीप ' मासिक पुस्तकाचे १८८७ सालचे शेवटचे दोन अंक नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत ते पहावें. त्यामध्यें पुनर्विवाहाच्या प्रसारार्थ झालेल्या उद्योगाचा संक्षिप्त इतिहास दिला आहे. यामध्यें दिलेला इतिहास जर खरा असेल व तो तसा आहे असें आम्हांस वाटतें. तर मग या पुनर्विवाहाच्या बाबतींत आमच्या पूर्वीच्या पिढींतील लोकांनीं भलभलते प्रकार केले, असा त्यांच्यावर आणलेला आक्षेप वाजवी नाहीं असें आम्हास म्हणावें लागतें. हा पुनर्विवाहाचा विषय पुढें आल्यास आज ५०-६० वर्षें झालीं. परंतु तेव्हांपासून आंतापर्यंत घडलेल्या सर्व गोष्टींचा उल्लेख करण्याची आम्हांस अवश्यकता नाहीं. आमचा उद्देश इतकाच आहे कीं, मागल्या पिढींतिल पुढारी लोकांस उतावळे सुधारक हें नांव किती अंशानें लागूं होण्यासारखे आहे, हें या इतिहासांतील कांहीं ठळक गोष्टींच्या साह्यानें वाचकांस

दाखवावें. या भागीं पुनर्विवाहाविषयीं विशेष प्रयत्न करणारे वि- ष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचें नांव सर्व आबालवृद्धांस माहीत आहे. पुनर्विवाहाचा प्रचार पाडणें युक्तिदृष्ट्या कितीहि अवश्यक असलें, व तो करण्याची स्त्रियांस परवानगा नसणें म्हणजे केवळ अन्याय होय, ही गोष्ट जरी कितीही उघड असली, तथापि या गोष्टीचा संबंध धर्माशीं पोंचत असल्यामुळें पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे, अशी लोकांची खात्री करून देणें अवश्य आहे, ही गोष्ट शास्त्रीबोवा विसरले नव्हते. प्रथमतः पुस्तकरूपानें व वर्तमानपत्र- द्वारां लोकांची समजूत घालण्याचे प्रयत्न त्यांनीं केले, व नंतर याविषयीं कोणास शंका असेल तर त्यांनीं वादास उभे रहावें, अशा अर्थाचे जाहिरनामे शहरोशहरीं स्वतःच्या सहीनिशी लावले, परंतु उपयोग झाला नाहीं. विधवेचें गोत्र कोणतें धरावें, तिचें दान कोणी करावें, अशौचाचा निर्णय कसा, दायभागाचा निर्णय कसा, वगैरे बारीक शंकांचीं उत्तरें देण्याचीजी शास्त्रीबोवांनीं मेह- नत घेतली, ती उतावळेपणाचीच साक्ष असली तर नकळे ! इतकें करूनही विरुद्धपक्षाची मंडळी वाद करण्यास उभी राहि- नात. तेव्हां अर्थात् ज्या प्रचाराच्या सशास्त्रतेबद्दल त्यांची खात्री झाली होती, तो प्रचार सुरू करण्याचा ' पुनर्विवाहोत्ते- जक मंडळीनें निश्चय केला, हेंही साहजिकच झालें. १८६९सालीं जो प्रसिद्ध विवाह सदर मंडळीनें घडवून आणला त्यांतील वधूचें वय १६ वर्षांचें असून, तिच्या दोन बंधूंच्या विचारानें ती विवाहास तयार होती. विवाह होण्याच्या अगोदर दोन दिवस

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टं. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

तिच्या स्वतःच्या भावांनीं विवाह लावण्यास तयार असावें, सर्व विधि धर्मशास्त्राप्रमाणें व्हावा, यांत सर्व सुधारणा एकदम करूं पाहण्यासारखें कांहींच झालें नाहीं. आतां इतका प्रयत्न करूनही व इतकी खबरदारी घेऊनहीं प्रतिपक्षाचा दुरा-ग्रह सुटत नाहीं. आपलें म्हणणें (मग तें वाकड्या मार्गानें का होईना) सिद्ध करण्याचा निश्चय करून त्यांनीं तो शेवटास नेला, हीं गोष्ट जेव्हां ठरल्यासारखी झाली, तेव्हां त्यामुळें जे पुनर्विवाह झालें त्यांत लौकिकाचा फारसा विचार न करितां, ज्यांस जो प्रकार योग्य व निर्दोष वाटला तो त्यांनीं केला. एवीनेवीं लोकांची मदत मिळत नाहीं, आपणास वेगळी जात तर करावी लागते, व बहिष्काराची पूर्ण छळना सोसावी लागते तीं लागतेच. मग इतक्या अडचणी सोसण्याचें ज्यांनीं धैर्य केलें, त्यांनीं लोकांची खुशामत करण्यास कबूल कां व्हावें ? त्यांस जर जातिभेद, विवाहविधि, गणमैत्री वगैरे प्रकार ईश्वरकृत नसून मनुष्याच्या अज्ञानापासून झालेले आहेत हें उघड दिसत असलें, तर मग लोकांची पर्वा कां ठेवावी ? हें आम्हांस कळत नाहीं. समाजानें जर त्यांस थोडीशी मदत केली असती, तर समाजाच्या सम-जुतीस मान देण्यास तेही तयार झाले असते. जेव्हां समाजानें त्यांस टाकून दिलें, तेव्हां त्यांनींही तो धिक्कारिला, हें यथा-स्थित च झालें. तात्पर्य सुधारकांनीं या गोष्टीविषयीं चर्चा सुरू करण्यापासून शेवटपर्यंत जितकें करून समाजांत फूट पडणार नाहीं, तितके प्रयत्न केले; परंतु त्यांचा उपयोग झाला नाहीं; यांचा दोष त्याच्याकडे नाहीं. बाकीच्या समाजाकडेच आहे. अमुक एकानें पुनर्विवाह कां केला नाहीं ? हा प्रश्नही वरच्या माळकेपैकींच होय. नुसती हजामत करावयाची झाली तरीही ' छे आज एकादशी आहे, बाबा रागावतील ' अशी ज्यांची स्थिति, त्यांनीं दुसऱ्या एखाद्यानें पुनर्विवाह न करण्यास अशींच कांहीं कारणें असतील हा विचार कां करूं नये ? बरें एका-

प्रयत्नुस्थानांतील मोठमोठे अंमलदार इतक्यांनीं तुमची
[illegible]रणीय आहे, असें आश्वासन दिल्यावर ती तशी
[illegible]ं म्हणण्याची हिंदुस्थान सेक्रेटरीची आज्ञा आहे काय?
णें बैलाची वेंसण धरून किंवा गाढवाचा कान धरून आ-
ण्यास पाहिजे तसें वागवितों, त्याप्रमाणे इंग्लंडासारख्या दे-
लोकमत सरकारी अधिकाऱ्यांस वागवितें ? थोड्या दिवसांत
विनसदी नोकरांच्या खटपटीला निदान थोडें
यश येईल, याबद्दल आह्मांस बिलकुल शंका नाहीं. आतां
ची स्थिति पहा. जीं कामें विनसनदी नोकर करतात तीं
ऱ्यानें होण्यासारखीं असून आम्ही सरकारास असें विचा-
हीं कीं, असले तक्रारी नोकर तुह्मीं लावता तरी कशा-
? दंडूं केलेल्या पगारांत याचें सामाधान होत नसेल तर
का दुसरें कां लावीत नाहीं ? रुपयाची किंमत कमी न
णें ही सरकारच्या ताब्यांतली गोष्ट नाहीं. तेव्हां तीपासून
कसान होईल ते सर्वांनीं निमुटपणें सोसलें पाहिजे. रुप-
किंमत उतरल्यानें आह्मां नेटिव्हांचें नुकसान होत नाहीं
? युरोपीअन लोकांसच पैशाची किंमत कळते, व ऐषआ-
ची लज्जत समजते, असें तर नाहींना ? मग या विनसनदी
चीच तक्रार ऐकणें हा पक्षपात नव्हे काय ? व या पक्षपा-
ठ गरीब रयतेचें तट्टं हवें तसें ताबडतोब सुटणें हा अन्याय
नव्हे काय ?, पण हें सारे पहातो कोण ? नेटिव्ह लोकांस
तीं कामें करतां येत नाहींत, व त्यांच्या खर्चास फार
गत नाहींत, हीं दोन प्रमेयें प्रत्येक युरोपिअनाच्या मनांत
होऊन गेलीं आहेत, व आम्ही नेटिव्ह त्याचे निराकरण
ा मुळींच प्रयत्न करीत नाहीं. तेव्हां आमचे कोणी
हीं, व मुक्या रयतेवरील कराचा बोजा प्रतिवर्षी वाढत
कांहीं आश्चर्य करण्यासारखें नाहीं. वास्तविक पहातां

बसतो, अशी यांची तक्रार आहे. जे लोक यांस सांवें, बोलतात ते असें म्हणतात कीं, सरकारच्या अशा रूपाच्या नौकरांस असंतुष्ट ठेवण्यांत सरकारचा बिलकुल फायदा नाहीं. सरकारानें आपल्या नोकरांच्या पाठीवर हवे तितके कोरडे पाहिजे तितकें काम खच्चून करून घ्यावें, पण त्यांच्या पोटावर मारूं नये. या सर्व बिनसनदी नोकरांचा संतोष राखण्यास फार झालें तर तीन चार लाख रुपये लागणार आहेत. येवढी रक्कम सरकारास पाहिजे तेथून काढतां येईल. हिची काटकसर करणें म्हणजे कांडीसाठीं पाडी गमावण्यासारखें ! होय हें सर्व एका दृष्टीनें बरोबर आहे. पण हे तीन लाख रुपये उत्पन्न होणार कोठून ? या विचार कोणीच करीत नाहीं. गेल्या वर्षी सेक्रेटरी ऑफ स्टेट या लोकांस असें उत्तर दिलें कीं, तुमची तक्रार बिलकुल कली जाणार नाहीं. कारण अमुक किंमतीच्या रुपयांनीं पगार व पेन्शनें दिलीं जातील, असें सरकारानें बंधन घेतलेलें नाहीं. हिंदुस्थानांत जो व जसला रुपया चालू असेल तो व तसला रुपया तुम्हास पतकरला पाहिजे. तुमची तक्रार ऐकणें म्हणजे हिंदुस्थानच्या गरीब प्रजेवर नवीन बोजा लादणें होय. हें सेक्रेटरी ऑफ स्टेटचे गतवर्षींचें उत्तर. यावर्षी तर अधिकारी असें म्हणतो कीं, तुमची तक्रार वाजवी आहे वर्ग चौकशी करण्याकरितां लौकरच पार्लमेंटरी कमिटी नेमण आमचा विचार आहे ! काय करील बापडा ? बाकीचे घान, पार्लमेंटचे सभासद, वजनदार वर्तमानपत्रें, देशांती

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च

लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

प्रयत्न झाले, याची बरीच चांगली अटकळ होते. तथापि सविस्तर माहितीचें पुस्तक झाल्यास नव्या पिढीस अधिक द्दा होण्याचा संभव आहे, व तसें करण्यास निबंधकारास च साधनें आहेत, असें आम्हांस वाटतें. म्हणून पुढें मागें नल्यास त्यानीं हा प्रयत्न अवश्य करावा, इतकें सुचवून म्ही तूर्त हा लेख संपवितों.

हलवायाचे दुकानावर ब्रम्हार्पण.

येथील सरकारी नोकरींत जे इंग्लिश लोक आहेत त्यांचे स- ी व चिनसनदी असे दोन वर्ग आहेत, हें आमच्या वाचकांस क असेलच. यांपैकीं पहिल्या वर्गांतील नोकर आमचे व कारचे शुद्ध जांवई आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ्या जागा, यांचे पगार, यांच्या चढत्या, यांच्या बदल्या, घ ांचीं पेन्शनें यांविषयीं जे नियम ठरलेले आहेत त्यांचें उल्ल- न करण्यास कोणीहि समर्थ नाहीं ! अलीकडे दुसऱ्या वर्गांतील कही या जावयाचे हक्क कमावूं पहात आहेत ! या कामांत श येण्यासाठीं त्यांनीं जें भगीरथ प्रयत्न चालविले आहेत ते हून या इंग्लिश लोकांच्या दीर्घोद्योगाची तारीफ न करणें अ- क्य आहे. दोन तीन वर्षांच्या खटपटीनें येथून इंग्लंडापर्यंत नें असा घाट उडवून दिला आहे कीं, पहावें तें वर्तमानपत्र, वा तो मुत्सद्दी, व म्हणावा तो पार्लमेंटचा भासद यांच्या मुर्तीत आल्यासारखा दिसतो ! स्थानांतील रुपयाची किंमत उतरली असल्यामुळें आपल्या ारापासून आपला जितका व्हावा तितका फायदा होत नाहीं; ंडास पैसे धाडण्यांत जी हुंडणावळ द्यावी लागते तीमुळें पलें फार नुकसान होतें, व पेन्शनास तर फारच मोठा छाट

च्या हातून चूक झाली, त्याच्या अंगीं बोलण्याप्रमाणें हाय
चें धैर्य नाहीं; परंतु त्याशिवाय ज्यांनीं बोलण्याप्रमाणें
करण्याकरतांच उतार वय झालें असूनही पुनर्विवाह केला,
शास्त्रीबोवांसारखी उदाहरणें लोक पुढें कां आणीत नाहीं
उलट तेवढेंच उदाहरण पुढें का आणतात ?

आतां कोणतीही गोष्ट मनुष्य करूं लागला असतां चुक्या
होणारच. मागच्या लोकांनीं त्या चुका पाहून पाहिजे तर शाह
णपण शिकावें व कमी चुका करण्यास झटावें. परंतु आपण
कांहीं न करतां दुसऱ्यांवर नुसती टीका करण्याचें काम नाम
र्दपणाचें आहे. सगळेच पुराणिक चातुर्मासांत वांगी सोडतात
असें नाहीं. कित्येकांस अनेक कारणांमुळें पुराणांतली वांगी
पुराणांत ठेवावीं लागतात. वैराग्याचा उपदेश करणारे सर्व
हरदास दिगंबर नसतात. म्हणून तेवढ्यावरून सर्व पुराणिक घरे
सर्व हरदास जनसमुदायाचे शत्रू आहेत, असें कोणी मानीत
नाहीं; मग मागल्या पिढींतील लोकांनीं एकादी चूक केली
असली, तथापि त्यांनीं केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ झाले, असें
म्हणतां येणार नाहीं. त्यापासून आपल्या पुढील कार्यभागास
मदतच झाली पाहिजे. त्यानीं आमची हानि केली म्हणून
आम्हास हातपाय बांधून बसावें लागतें, हें म्हणणें 'न करत्यांचा
वार शनवार' यांपैकींच आहे.

असो वर निर्दिष्ट केलेल्या निबंधांत जितका इतिहास दिला
आहे तेवढ्यावरून आजपर्यंत या बाबतींत कसकसे व काय

ब्रह्मी बाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा
जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

या विनसनदी नोकरांच्या चळवळीबरोबर आम्हां लोका चळवळ सुरू व्हावयाला पाहिजे होती पण आम्हीं पडलों कण कर्ण ! जे आम्हीं साऱ्या राज्यावर उदक सोडून बसलों आहें आम्ही पांचचार लाख रुपयांसाठीं अनुदारता प्रकट करण्य तयार होऊं काय ? ही उदारता व ही शांती आम्हांस कि भोंवणार आहे हें कोणाच्यानेंही सांगवणार नाहीं !

राजकीयसंनिधानाचें अपायकारकत्व.

मनुष्य हा एकांतवासप्रिय प्राणी नाहीं, समाज करून राहिल शिवाय त्याला सुख होण्याचा संभव नाहीं; समाज संस्थापन अमसंयोगाची अवश्यकता आहे, व अमसंयोग होऊं लागणें समाज पाहिजे, म्हणजे त्या उभयतांचें अन्योन्यावलंबन व अमसंयोग चांगला चालण्यास सामाजिक संनिधान (Soc organization) पाहिजे; हें संनिधान दोन प्रकारचें अ एक, स्वायत्त, व दुसरें, परायत्त; स्वायत्त संनिधानाप व्यक्तीचें हित होतें; समाजाचें हित प्रथम साधणें हा पर संनिधानाचा मुख्य उद्देश होय; समाजाच्या आद्य स्थि परायत्त संनिधानाशिवाय समाजाचें संरक्षण व प्रगति व्हावय नाहीं; परायत्त संनिधानापासून राजकीय संस्थांची उत्पत्ति व समाजाच्या प्रथमावस्थेत या संस्थांचा अंमल नक्कीनें च विणें अवश्य असतें; तसें न झाल्यास समाजाची वात होऊन, कोणाचेंच कल्याण होत नाहीं. वगैरे गोष्टींचें वि मागल्या लेखांत केलें आहे. राजकीय संस्थाच्या सक्त

प्लॉटस भाड्यानें देणें आहेत–फर्ग्युसन(पुणें) क समोर–हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर–सुधारक, पुणें

वसतो, अशी यांची तक्रार आहे. जे लोक यांस असावें, बोलतात ते असें ह्मणतात कीं, सरकारच्या अधारूण नौकरांस असंतुष्ट ठेवण्यांत सरकारचा बिलकुल फायदा तका सरकारानें आपल्या नोकरांच्या पाठीवर हवे तितके कोरडे पाहिजे तितकें काम खच्चून करून घ्यावें, पण त्यांच्या पोटावर म नये. या सर्व बिनसनदी नोकरांचा संतोष राखण्यास फार झ तर तीन चार लाख रुपये लागणार आहेत. येवढी रक्कम सर रास पाहिजे तेथून काढतां येईल. हिची काटकसर करणें म्ह काडीसाठीं पाडी गमावण्यासारखें ! होय हें सर्व एका दृष्टीनें ब र आहे. पण हे तीन लाख रुपये उत्पन्न होणार कोठून ? या विचार कोणीच करीत नाहीं. गेल्या वर्षी सेक्रेटरी ऑफ् यां या लोकांस असें उत्तर दिलें कीं, तुमची तक्रार बिलकुल कली जाणार नाहीं. कारण अमुक किंमतीच्या रुपयांनीं पगार व पेन्शनें दिलीं जातील, असें सरकारानें बंधन घेतलेलें नाहीं. हिंदुस्थानांत जो व जसला रुपया चालू असे तो व तसला रुपया तुह्मास पतकरला पाहिजे. तुमची त ऐकणें म्हणजे हिंदुस्थानच्या गरीब प्रजेवर नवीन बोजा ह होय. हें सेक्रेटरी ऑफ स्टेटचे गतवर्षींचें उत्तर. यावर्षी त अधिकारी असें म्हणतो कीं, तुमची तक्रार वाजवी आहे व चौकशी करण्याकरितां लौकरच पार्लमेंटरी कमिटी नेम० आमचा विचार आहे ! काय करील बापडा ? बाकी घान, पार्लमेंटचे सभासद, वजनदार वर्तमानपत्रें, देशांती

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठ ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च

लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणे.

प्रयत्न झाले, याची बरीच चांगली अटकळ होते. तथापि सविस्तर माहितीचें पुस्तक झाल्यास नव्या पिढीस अधिक दा होण्याचा संभव आहे, व तसें करण्यास निबंधकारास च साधनें आहेत, असें आम्हांस वाटतें. म्हणून पुढें मागें नल्यास त्यानीं हा प्रयत्न अवश्य करावा, इतकें सुचवून म्ही तूर्त हा लेख संपवितों.

हलवायाचे दुकानावर ब्रम्हार्पण.

येथील सरकारी नोकरींत जे इंग्लिश लोक आहेत त्यांचे स- ी व चिनसनदी असे दोन वर्ग आहेत, हें आमच्या वाचकांस क असेलच. यांपैकीं पहिल्या वर्गांतील नोकर आमचे व कारचे शुद्ध जांवई आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. च्या जागा, यांचे पगार, यांच्या चढत्या, यांच्या बदल्या, व र्ची पेन्शनें यांविषयीं जे नियम ठरलेले आहेत त्यांचें उल्ल- न करण्यास कोणीहि समर्थ नाहीं ! अलीकडे दुसऱ्या वर्गांतील कही या जावयाचे हक्क कमावूं पहात आहेत ! या कामांत ा येण्यासाठीं त्यांनीं जें भगीरथ प्रयत्न चालविले आहेत ते हून या इंग्लिश लोकांच्या दीर्घोद्योगाची तारीफ न करणें अ- क्य आहे. दोन तीन वर्षांच्या खटपटीनें येथून इंग्लंडापर्यंत र्तीं असा घाट उडवून दिला आहे कीं, पहावें तें वर्तमानपत्र, ा तो मुत्सद्दी, व म्हणावा तो पार्लमेंटचा भासद यांच्या मुठींत आल्यासारखा दिसतो ! यानांतील रुपयाची किंमत उतरली असल्यामुळें आपल्या ारापासून आपला जितका व्हावा तितका फायदा होत नाहीं; लंडास पैसे धाडण्यांत जी हुंडणावळ द्यावी लागते तीमुळें पलें फार नुकसान होतें, व पेन्शनास तर फारच मोठा घाट

च्या हातून चूक झाली, त्याच्या अंगीं बोलण्याप्रमाणें काय गोवें, चें धैर्य नाहीं; परंतु त्याशिवाय ज्यांनीं बोलण्याप्रमाणें चूक करण्याकरतांच उतार वय झालें असूनहीं पुनर्विवाह केला, त्यांच्या शास्त्रीबोवांसारखी उदाहरणें लोक पुढें कां आणीत नाहींत उलट तेवढेंच उदाहरण पुढें का आणतात ?

आतां कोणतीही गोष्ट मनुष्य करूं लागला असतां चुकया होणारच. मागच्या लोकांनीं त्या चुका पाहून पाहिजे तर शाहणपण शिकावें व कमी चुका करण्यास झटावें. परंतु आपण कांहीं न करतां दुसऱ्यांवर नुसती टीका करण्याचें काम नाम दर्पणाचें आहे. सगळेच पुराणिक चातुर्मासांत वांगी सोडत असें नाहीं. कित्येकांस अनेक कारणांमुळें पुराणांतली वांगी पुराणांत ठेवावीं लागतात. वैराग्याचा उपदेश करणारे सर्व हरदास दिगंबर नसतात. म्हणून तेवढ्यावरून सर्व पुराणिक व सर्व हरदास जनसमुदायाचे शत्रू आहेत, असें कोणी मानीत नाहीं; मग मागल्या पिढींतील लोकांनीं एकादी चूक केली असली, तथापि त्यांनीं केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ झाले, असें म्हणतां येणार नाहीं. त्यापासून आपल्या पुढील कार्यभागास मदतच झाली पाहिजे. त्यानीं आमची हानि केली म्हणून आम्हास हातपाय बांधून बसावें लागतें, हें म्हणणें 'न करत्यांचा वार शनवार' यांपैकींच आहे.

असो वर निर्दिष्ट केलेल्या निबंधांत जितका इतिहास दिला आहे तेवढ्यावरून आजपर्यंत या बाबतींत कसकसे व काय

ब्रह्मी वाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

या बिनसनदी नोकरांच्या चळवळीबरोबर आम्हां लोका चळवळ सुरू व्हावयाला पाहिजे होती पण आम्ही पडलों कण कर्ण ! जे आम्हीं साऱ्या राज्यावर उदक सोडून बसलों आहें आम्ही पांचचार लाख रुपयांसाठीं अनुदारता प्रकट करण्य तयार होऊं काय ? ही उदारता व ही शांती आम्हांस कि भोंवणार आहे हें कोणाच्यानेंही सांगवणार नाहीं !

राजकीयसंनिधानाचें अपायकारकत्व.

मनुष्य हा एकांतवासप्रिय प्राणी नाहीं, समाज करून राहिल शिवाय त्याला सुख होण्याचा संभव नाहीं; समाज संस्थापन अमसंयोगाची अवश्यकता आहे, व अमसंयोग होऊं लागणेर समाज पाहिजे, म्हणजे त्या उभयतांचें अन्योन्यावलंबन ॐ अमसंयोग चांगला चालण्यास सामाजिक संनिधान (Soc organization) पाहिजे; हें संनिधान दोन प्रकारचें अ एक, स्वायत्त, व दुसरें, परायत्त; स्वायत्त संनिधानापा व्यक्तीचें हित होतें; समाजाचें हित प्रथम साधणें हा परा संनिधानाचा मुख्य उद्देश होय; समाजाच्या आद्य स्थि परायत्त संनिधानाशिवाय समाजाचें संरक्षण व प्रगति व्हावय नाहीं; परायत्त संनिधानापासून राजकीय संस्थांची उत्पत्ति व समाजाच्या प्रथमावस्थेंत या संस्थांचा अंमल सक्तीनें च विणें अवश्य असतें; तसें न झाल्यास समाजाची वाता होऊन, कोणाचेंच कल्याण होत नाहीं. वगैरे गोष्टींचें वि मागल्या लेखांत केलें आहे. राजकीय संस्थाच्या सक्त

प्लॉटस भाड्यानें देणें आहेत–फर्ग्युसन(पुणें) क समोर–हवाशीर; सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर–सुधारक, पुणें

ामुळें लोकांचे कोणत्या प्रकारचें नुकसान होतें हें दाखवि-
चा विचार आहे.

हवा, पाणी, व अन्न हीं शरीररक्षणास अवश्य लागणारीं
ओहत, पण यांचें फाजील सेवन झालें असतां, तीं अपाय-
क होतात याचा प्रत्येकास अनुभव आहे. एका व्यक्तीनें
न्या व्यक्तीशीं व एका पोटसमुदायानें दुसऱ्या पोटसमुदायाशीं
ोग्यानें वागून समाजांत अमसंयोग उत्पन्न होऊं द्यावा,
ो होण्यासाठीं कोणाचा तरी सर्वांवर सक्त अंमल चालावा.
ष्ट निर्विवाद आहे, व अशा प्रकारच्या सक्त अमलापासून
रा फायदा आम्हांस पूर्णपणें मान्य आहे, पण यावरून
समजतां कामां नये कीं, ही सक्ती जेवढी अधिक करावी
की समाजसुधारणेस अधिक मदत होते. या सक्तीसही सीमा
या सीमेचें उल्लंघन केलें असतां ती समाजहितवर्धक न
, समाजहितविघातक होते; सारांश, समाजाचें आकलन
यास कोणत्याही प्रकारचें सरकार नसल्यापासून जे परिणाम
त तेच सरकारच्या फाजील सक्तीपासून होऊं लागतात.
तरी अधिकाऱ्यांचा चरितार्थ आणि ते जीं कामें करतात
ा खर्च प्रजेनें दिलेल्या करांपासून होत असतो. हे कर
प्रजेच्या सामर्थ्याबाहेर गेले, किंवा ते तीपासून काढण्या-
। सरकारी अंमलदार तीस दुःसह पीडा देऊं लागले, तर
ई तिकडे मारामाऱ्या, दंगेधोपे, व तंटे सुरू होऊन सर्वत्र
स्था होणार नाहीं काय? प्रजा किती ही राजनिष्ठ असली
अचेतन वस्तुप्रमाणें पाहिजे तसली वागवणूक ती हवा
वेळ सहन करील, असें समजणें हें शुद्ध मूर्खपण होय.
केलें तरी जाचांतून सुटण्याची आशा नाहीं, अशी खात्री
असतां, अगदीं क्षुद्र व क्षीण व्यक्ती देखील चिथरून
। आपला छळ करणारास शासन करण्यासाठीं, बेफाम
त्याच्या नरडीचा घोंट घेण्यास धाऊन जातो, असें

अनेक प्रसंगीं दिसून येतं. हा एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्ति केलेल्या फाजील जुलमाचा परिणाम होय. जेव्हां कोणत्या देशांतील सरकार आपल्या प्रजेशीं अशा प्रकारचें वर्तन करं तेव्हां तीही, कितीही सहनशील असली तरी, अंमलदारां जुलूम दुःसह झाला असतां, राजनिष्ठा झुगारून देऊन, त्या दंड करण्यासाठीं बंड करण्यास प्रवृत्त होते. सरकारी अंमल दारांचा जुलूम असह्य झाल्यामुळें लोकांनीं हत्यारांस हात घाल छल करणाऱ्या राजास आणि त्याच्या साथ्यांस कंठस्नान घा ल्यार्चीं उदाहरणें पुष्कळ आहेत. सरकारी अंमलदारांच्या जु मापासून होणारे दुष्परिणाम या आशिया खंडांतील प्रत देशांत पूर्वीपासून दृष्टीस पडत आहेत. युरोपखंडाच्या सुधार पेक्षां आशियाखंडांतील सुधारणे आरंभ अगोदर झाला अ ती आज मिर्त्तीस इतकी मागें पडली आहे, यार्चे बऱ्य अंशीं येथील राजांचा जुलूम हें कारण आहे, असें म्हणण्य हरकत नाहीं. पूर्वेकडील राजांचा अनियंत्रितपणा सर्व पृथ्व गाजत आहे. या अनियंत्रितपणामुळें होणारी वि अनवस्थेपासून उत्पन्न होणाऱ्या विपत्तिपेक्षां क कधीं अधिक असते, यांत संशय नाहीं. रोमन लोक मिसरदेश काबीज केल्यावर, तेथें जो सरकीचा अंमल बसा त्याची गोष्टही अशीच आहे. ज्याप्रमाणें सध्यां आप हिंदुस्थान सरकारच्या व प्रांतिक सरकारांच्या खर्चाबद्दल न प्रकारचे कर द्यावे लागतात, त्याप्रमाणें इजिप्तच्या लोकां

रसमंजरी:—यांत ८० रसायनाचे पाठ, बालचिकित्स मक्षधातूंचे जारणमारण आणि पाऱ्यावरील संस्कार शास्त्र रीतीनें दिले आहेत. किं. १। रुपया.

महाराष्ट्र औषधालय
शनवार पेठ,

द्यावे लागत असत. तसेंच, आतां ज्याप्रमाणें इंग्लिश लोकांनीं आपल्या फायद्यासाठीं ब्रह्मदेशांत, अफगाणिस्थानांत, चिनांत, युरोपांत, किंवा आफ्रिकेंत युद्ध मांडिलें असतां आह्मांस मनुष्यांचा व पैशाचा पुरवठा करावा लागतो, व आह्मीं लाचबुल कांहीही ओरडा केला तरी त्याकडे हिंदुस्थान सरकार किंवा ब्रिटिश पार्लमेंट लक्ष देत नाहीं, त्याप्रमाणें रोमन लोक जीं जीं बंडें करीत त्यांबद्दल इजिप्शियन लोकांस भुरदंड भरावा लागे. प्रांचे आधिकारी खालच्या आधिकाऱ्यांपासून इतका पैसा उकळीत कीं, त्यांस आपल्या जागांचा राजीनामा देणें किंवा सहाद्विवेक एकीकडे गुंडाळून ठेऊन तरवारीच्या धारेवर प्रजेपासून होईल तेवढी माया काढण्यास तयार होणें, भाग पडत असे. मांडलिकांनीं एक वर्षीं स्वसंतोषानें दिलेला नजराणा दुसऱ्या वर्षीं करभार होऊन बसे, व तो कोणी न दिल्यास त्यावर रोमन पलटणी चाल करून जात! ठरींव कर तर निमुटपणें द्यावे लागतच; पण त्याशिवाय सैन्याच्या अन्नपाण्याचा, वस्त्रपात्राचा, व सामानसुमानाचा पुरवठा प्रजेस करावा लागे! अशा स्थितींत प्रजेचे किती हाल होत असतील, याची वाचकांनींच कल्पना करावी. तथापि रोमन पादशाहीस उतरता पाया लागला असतां रोमन अधिकाऱ्यांनीं फ्रान्स देशांतील लोकांचा जो छळ केला त्याचा इतिहास याहुनही हृदयद्रावक आहे. त्याकाळीं त्या देशांत रोमन अधिकाऱ्यांचा सुळसुळाट कसा झाला होता, व करांचें ओझें इतकें वाढलें होतें कीं, त्या लोकांच्या अंगांत काडीचा देखील तक्वा राहिला नाहीं, क्रांत ओसाड पडले, व ज्या ठिकाणीं नेहमीं नांगर फत असत त्या ठिकाणीं भयंकर रानें वाढलीं! प्रत्येक प्रांतांत शहरावर अंमलदाराचा येवढा वर्ग होत असे कीं, त्या संख्येचे अनुमान करणें अशक्य होऊन गेलें होतें. काच्या 'चप चप' शब्दानें आणि ज्यांच्या पाठीवर ते

झडत आहेत त्यांच्या आक्रोशानें वातावरण सर्वकाळ भरून गेलें असे. विश्वासूक गुलामानें आपल्या धन्याविरुद्ध, बायकोनें आपल्या नवऱ्याविरुद्ध, व मुलानें आपल्या बापाविरुद्ध पुराव द्यावा, म्हणून त्यास चांप लावण्यांत येत असत. एक तालुकदा पाठवावा व त्यानें कांहीं एक जमाबंदी करावी; तो पुरेशी वाटून त्यास बडतफ करावें. आणि त्याहून अधिक खरमरी दुसरा तालुकदार त्याच्या पाठीमागून पाठवावा; व असें कित वेळां करावें आणि त्यांनीं किती जुलूम करावा, याला कांहीं सुमार नसे. अशा जाचामुळें गुरें आणि माणसें पटापट मरत पण जे मागें रहात त्यांस आपल्या वांट्याचे व मेलेल्यांच्य वांट्याचे कर दिल्याशिवाय गत्यंतर नसे! अशा संकटावस्थे रोमन प्रजेस कर गोळा करणारापेक्षां शत्रूच बरा वाटे, व सं सांपडल्याबरोबर ते अंमलदारांस सोडून शत्रूस जाऊन मिळ हें किती स्वाभाविक होतें बरें? रोमन पादशाहीचा ऱ्हास झाल वर फ्रान्स, स्पेन वगैरे देशांत व्हॅन्डाल्स, गॉथ्स वगैरे लोकां लहान लहान स्वतंत्र राज्यें स्थापिलीं. प्रथमारंभीं या स्व संस्थानांच्या नायकांची सत्ता फार संकुचित असे. त्य आपल्या सरदारांचा नेहमीं धाक असे. कालांतरानें या सरदार अधिकार नष्ट होऊन राजांची सत्ता प्रबळ झाली, व रोम पदपादशाहीचा इतिहास आणखी एकवार घडून आला. प्रबळ झालेल्या गॉथिक बादशहांनीं किंवा राजांनीं रोमच्या च शहांप्रमाणें आपल्या प्रजेस छळण्यास व नाडण्यास आरंभ के

संगीत सुविचार-विजय नाटक.
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत
किं. ०८
सुधारक ऑफीस, पुणें

ज्या त्या गोष्टींत सरकार हात घालूं लागलें. कोणीं कोणता धंदा करावा, कोणीं कोणता पेहराव वापरावा, कोणीं कोणत्या प्रकारें ईश्वरपूजा करावी. कोणत्या शेतकऱ्यांनीं कोणता जिन्नस किती उत्पन्न करावा, कोणत्या कारखानदारांनीं किती मजूर पदरीं ठेवावे, किती मजूरी द्यावी, किती भांडवल कोणत्या व्यापारांत घालावें, कोणता माल किती उत्पन्न करावा. याविषयीं सरकारी नियमांवर नियम व कायद्यांवर कायदे होऊं लागले, व त्याचा अंमल करण्यासाठीं नवीं नवीं खातीं आणि नवे नवे अधिकारी अस्तित्वांत आणून त्यांच्या पोषणासाठीं नानाप्रकारचें दुःसह कर बसवि-यांत येऊं लागले. रयतेच्या तक्रारींची कोठेंही दाद लागेनाशी झाली, व जिकडे तिकडे अन्याय माजून राहिला. कराच्या बोखालीं सारें लोक चीत् होऊन गेले, आणि त्यांतून सुटण्यास काय उपाय करावे, हें कोणास कळेनासें झालें ! याप्रमाणें सारी गोष्ट बेजार होऊन गेल्यावर काय प्रसंग गुदरतो, याचें उदाहरण फ्रान्स देशांत १७८९ सालीं जी प्रचंड राज्यक्रांति झाली तिच्यावरून देत आहे ! शंभर वर्षांपूर्वी फ्रान्स देशांत लोकसंतापाग्नीचें भयंकर होमकुंड पेटलें त्यांत कित्येक शतकेंपर्यंत अनाथांवर जुलुम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आणि सिंहासनस्थ जारांणीच्या आहुती पडल्या ! तात्पर्य, सामाजिक संनिधानास यामक अशी राजसत्ता जरी अवश्यक आहे, तरी या सत्तेचा मल फाजील तीव्र झाल्यास समाजघटकाचें कल्याण न होतां अन्याण होणें शक्य आहे. फ्रान्स देशांत १७८९ सालीं जो भडका ला त्याचें इंगित ज्यांस समजून घेण्याचा इच्छा असेल त्यांनीं गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, दोनशें वर्षांच्या आंत फ्रेंच राजांनीं पली जमाबंदी ११ कोटींपासून २ अब्ज ११ कोटी केली ! तुत कालींही अशा प्रकारच्या जुलमाचीं उदाहरणें दृष्टीस ग्यासारखीं नाहींत, असें नाहीं. जो कोणीं नेल नदीच्या काठीं थोडाबहुत प्रवास करील त्याला असें दिसून येईल कीं,

जेथें जेथें सुलतानाचा अंमल नीट चालत नाहीं तेथील प्रजा त्याचा अंमल चांगला चालत आहे अशा प्रांतांतील प्रजेहून विशेष सुखी आहे. पण या गोष्टीच्या सिद्धतेसाठीं या रानटी तुर्क लोकांकडेच पहावयास पाहिजे, असें नाहीं. ब्रिटिश लोकांनीं कितीही बढाया मारल्या तरी येथील नेटिव संस्थानांतील प्रजा ब्रिटिश अंमलांतील प्रजेपेक्षां एकंदरीनें अधिक सुखी आहे, असें दाखविणें फारसें कठिण पडणार नाहीं. मि. लीवार्नरसारखे एक कल्ली लोक ब्रिटिश राज्याचे कितीही पवाडे गावोत, एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपाल मि. वर्डस्वर्थ् यांसारखे विचारी गृहस्थ असें कबूल करतात कीं, इंग्लिश लोकांनीं येथें जी स्वराज्य व्यवस्था स्थापिली आहे तीबद्दल आह्मा हिंदू लोकांस जबरदस्त किंमत द्यावी लागत आहे.

यासंबंधानें स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथांतील एक वाक्य खाली फूट नोटेंत जसेच्या तसेंच दिलें आहे. कोणी असें म्हणतील कीं, हें लिहिणें इंग्लंडांत बसून लिहिणाऱ्या तत्त्ववेत्त्याचें आहे म्हणून त्याला विशेष वजन देतां येत नाहीं. नसेल कदाचित पण डॉ. हन्टरसारख्या अधिकाऱ्याचा अभिप्राय तरी सर्वांस मान्य असला पाहिजे. या सरकारी प्रमुख स्टॅटिस्टिकवाल्याचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानांतील अर्ध्या लोकांस प्रति दिवशीं अर्धी पोटीं झोंपीं जावें लागतें ! यावरून टापटिपींचा अंमल हटकून सुखावह असेलच, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. आगगाडी, तारायंत्रें, गिरण्या, हायकोर्टें, तार ऑफिसें, पोस्टऑफिसें, वर्तमानपत्रें, कॉलेजें, प्रदर्शनें, रोलेजंग इमारती, प्रचंड बाजार, इ. उत्पन्न करणारा फौजफांटा हे आणि अशा प्रकारचे सुधारणा

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. कि. ०८

सुधारक ऑफीस, पु

सरे दागिने घालून हिंदुस्थानासारखा परकी अंमलांतला देश केतीहि नटला तरी तो अंतर्यामीं सुखी असेलच, असें खात्रीनें णवणार नाहीं. एखादें प्रसंगीं मयासुरानें निर्माण केलेल्या मा- वी बाजारांत खरेदी करून बनलेल्या गिऱ्हाइकाप्रमाणें आ- र्चा स्थिति होण्याचा संभव आहे !

सामाजिक घडामोड.

य एका घराचे दगड काढून दुसऱ्या घरास लावायाचे असले ि किती त्रास पडतो हें सर्वांस माहीत आहेच. पण हेच दगड न्यांत पक्के बसविलेले असले तर फारच त्रास पडतो, आणि ांतर्हा पहिली इमारत बांधल्यापासून वर्षें लोटलीं सलीं, व चुन्याचा आणि दगडांचा एक जीव होऊन गेला पला, तर एकेक दगड सोडविण्यास किती मारामार पडते, हें णास सांगावयाला पाहिजे, असें नाहीं. तात्पर्य, कोणत्याही द्रव्यांचा संनिकट संयोग करून त्यांपासून एक पिंड केला तां, तो पिंड मोडून त्याच्या घटकांचा निराळा पिंड बनविणें अतिशय कष्टाचें काम आहे, हें प्रत्येकानें कबूल केलें पाहिजे.

सामाजिक घडामोडीचाही असाच प्रकार आहे. प्रथम कांच्या शरीररचनेचा विचार करा. आरंभीं हें शरीर सम- ीय द्रव्यांचें झालेलें असून, पुढें तें जसजसें वाढत जातें

Notwithstanding the boasted beneficence of rule in India the extra burdens and restraints involves, have the effect that the people find cent countries preferable the ryots in some ts have been leaving the homes and setting he territory of the Nizam and in Cudlor

तसतसें त्यांत विषमजातित्व उत्पन्न होतें; व ज्या मानानें त्यांत विषमजातित्व उत्पन्न होतें त्यामानानें त्यांत अधिकाधिक दार्ढ्य उत्पन्न होऊन बाह्य संस्कारांस तें अधिकाधिक प्रतिबंध करूं लागतें. कोळे वेळू, लहान झाडांच्या खांद्या, किंवा तरुण मुलांचे अवयव यांत किती लवचिकपणा असतो बरें वाढ खुंटून प्रत्येक अवयवांत काठिण्य आल्यावर, कोणत्याही मनुष्यास चांगली कसरत शिकतां येत नाहीं, ही प्रत्येकाच्या पहाण्यांतली गोष्ट आहे. समाजिक शरीरांतही परिणतीमुळे अशाच तऱ्हेचें काठिण्य उद्भूत होतें. कोणताही समाज एकदा वाढीस लागला, आणि श्रमविभागामुळें त्यास भिन्नावयवित्व प्राप्त झालें, व त्यांत निरनिराळे वर्ग उत्पन्न होऊन ते निरनिराळ्या क्रिया करूं लागले ह्मणजे त्याचें रूपांतर कठिण पहाणाऱ्या गोष्टींस त्याकडून मोठा प्रतिबंध होऊं लागतो. राज्य, धर्म, सैन्य, लोकाचारयासंबंधानें ज्या रीति एकदां रूढ होऊन जातात त्यांत फिरून बदल करणें अत्यंत दुरापास्त होऊं लागतें. पूर्वापार चालत आलेल्या चालींत विचारदृष्ट्या कितीही विसंगतता दिसली तरी त्या सोडणें किती जिवावर येतें हें बालविवाह, केशवपन, सुतक इत्यादि प्ररूढ चाली विचार करतां, तेव्हांच लक्षांत येणार आहे. समाजांतील शेंकडा नव्याण्णव लोकांची स्थिति अंधपरंपरेप्रमाणें असून मळलेल्या वाटेच्या बाहेर एक पाऊल टाकल्यानें सुद्धां आपणावर मोठा भयंकर प्रसंग गुदरेल, असा धाक त्यांस क्षणोक्षणीं वाटत असतो.

याच संबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी

निबंध संग्रह.
भाग १ ला. कि. १। रु.
मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

ची अशीः-ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांतील निरनिराळे अवयव आपापलीं कार्यें पृथक्पणानें करून एकमेकांस साहाय्य, करतात, त्याप्रमाणें सामाजिक शरीरांतील निरनिराळे भागही आपापलीं कार्यें स्वतंत्रपणें करून इतरांस मदत करीत असतात. पण पुढें असाही प्रकार घडून येतो कीं, समाजाच्या एका स्थितींत ज्या वर्गाची अवश्यकता असते तो वर्ग समाजाचें स्थित्यंतर झाल्यावर अगदीं निरुपयोगी झाला तरी, सहसा नाहींसा होत नाहीं. उदाहरणार्थ घडोद्यासारख्या संस्थानांतील बारगीर घ्या. यांचें सैन्यांतीं कांहीं एक प्रयोजन नाहीं; पूर्वीं यांच्याकडून जीं कामें होत असे तिचीं आतां गरज राहिली नाहीं. तथापि यांचा चरितार्थ चालविणें संस्थानास भाग पडत आहे. या बारगिरांप्रमाणेंच आमच्या बहुतेक संस्थानिकांची, जहागीरदारांची, त्यांच्या सैन्यांची, निरानिराळ्या ठिकाणच्या देवस्थानांची, अधिकाऱ्यांची व त्यांच्या मठांची, कित्येक धंदेवाल्यांची, आणि अनेक आचारांची गोष्ट आहे. ज्याप्रमाणें वार्धक्यामुळें अमलबजावणीस अयोग्य ठरलेल्या लोकांस नोकरीवरून दूर करून त्यांचे जागीं नवीन लोकांची योजना केली तरी पेनशनदार करून ठेवावें लागतें, त्याप्रमाणें समाजाचे स्थित्यंतर होऊन त्यांतील कोणताही वर्ग निरुपयोगी ठरला तरी त्याचा बोजा बरींच वर्षें समाजास वहावा लागतो. कारण ज्याप्रमाणें कोणत्याही व्यक्तीस आपण होऊन पंचत्वास मिळणें आवडत नाहीं, त्याप्रमाणें शरीराच्या कोणत्याही अवयवास तें आवडत नाहीं. व्यक्तीप्रमाणेंच समाजाचे अवयवही आपापलें अस्तित्व दिर्घतम करण्याविषयीं झटत असतात.

इतःपर्यंत सांगितलेल्या गोष्टींवरून समाजाचें रूपांतर होण्यास जे प्रत्यवाय असतात हें वाचकांच्या लक्षांत बरेंच आलें असेल. तथापि ज्यांच्या मनांत ही गोष्ट अजूनही बरोबर उतरली

नेतेल त्यांच्या समजुतीसाठीं आणखी एकदोन गोष्टी सांगतों. समाजांतलि लोकांचें नियामक आणि नियत किंवा शास्ते आणि शासित असे मुख्य दोन भाग असतात, हें मागें सांगितलेंच आहे. या भागांपैकीं नियामक भाग समाजाच्या परिणतीबरोबर विस्तृत होत गेला तर त्या मानानें नियत भाग क्षीण होत गेला पाहिजे हें उघड आहे. ज्या देशांत सरकारी अधिकाऱ्यांची संख्या आणि सरकारानें चालविलेलीं खातीं वाढत जातात त्या देशांतील प्रजा अधिकाधिक दुर्बल व परतंत्र होत जाते. सरकारी अधिकारी कोणत्याही खात्यांतले असले तरी त्या सर्वांचा चरितार्थ प्रजेनें दिलेल्या करांवर होत असतो. त्यामुळें होईल तितकी जमाबंदी वाढविणें आणि सक्तीचा अंमल चालविणें वगैरे गोष्टींत त्या सर्वांचे विचार सामान्यपणें एकसारखे असतात. खात्याखात्याचा केवढाही विरोध असला तरी प्रजेशीं तंटा करण्याचा, जेव्हां प्रसंग येतो तेव्हां तीं पटदिशीं एक होतात, आणि प्रजेशीं उद्भवलेल्या तंट्यांत यशस्वी होणें हें सर्वांसच हितकारक आहे, असें तेव्हांच लक्षांत आणून एकमेकांस साहाय्य करतात. शिवाय, निरनिराळीं खातीं परस्परांस कितीही विरुद्ध असलीं तरी प्रत्येक खात्यांतील खालच्या अधिकाऱ्यांचे वरच्या अधिकाऱ्यांशीं व मुख्य सरकाराशीं जे संबंध असतात ते सारे एकसारखेच असतात, व त्या सरकारचा आणि त्या बरोबर आपला अंमल उत्कृष्ट रीतीनें चालावा, असेंही प्रत्येकास वाटत असतें; यामुळें साऱ्या प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वभावांत

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

१२

एका प्रकारचें साम्य तेव्हांच उत्पन्न होतें, आणि "समानशील-व्यसनेषुसख्यं" या न्यायानें प्रजेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष न देतां, आपल्या वर्गाचें हित साधण्याविषयीं ते पराकाष्ठेचे तत्पर होऊन, त्या कामीं ते एकमेकांस अंत:करणपूर्वक मदत करतात. ज्यानें सरकारी नोकरी धरली तो पूर्वीचा कितीही सज्जन असला तरी त्याच्या वृत्तींत जो एकदम एक प्रकारचा पालट होतो त्याचें हें गुह्य आहे. स्वसंरक्षणपरायणता व स्वहितसाधानरति यांनीं प्रत्येकास घेरलें आहे आणि तसें होणें स्वाभाविक आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ व चैन प्रजेच्या श्रमाच्या फळावर अवलंबून असल्यामुळें, त्याचा होईल तितका अपहार करण्याकडे त्यांची प्रवृत्ति किती होत जाते, हें कधीं कधीं त्यांच्या ध्यानांत सुद्धां येत नाहीं !

अधिकारी आणि प्रजा यांत उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वास केवळ अधिकारीच कारण होतात, असें नाहीं. प्रजेकडूनही त्या कामांत बरीच मदत होते ! मनुष्यमात्राचा असा स्वभाव आहे कीं लहानपणापासून जी स्थिति कितीही वाईट असली तरी तीच बरी वाटत असते. ज्यांना जन्मापासून स्वातंत्र्याचा उपभोग मिळत आहे त्यांना पारतंत्र्याचा जसा कंटाळा असतो, त्याप्रमाणें जे जन्मापासून पारतंत्र्यांत वाढले असतात, त्यांना स्वातंत्र्य आपणांस उचित नाहीं, असें वाटूं लागतें. आज मित्तीस आपणांपैकीं शिकलेले अनेक लोक स्त्रियांस स्वातंत्र्य देण्यास तयार आहेत, पण त्याचा उपयोग घेण्यास आमच्या स्त्रीवर्गाची कोठें तयारी आहे ? आम्ही तें त्यांना जबरीनें देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना त्यापासून सुख न होतां, उलट त्रास होतो. जे हौशी लोक आपल्या बायका नाटक पहाण्यास किंवा हवा खाण्यास बरोबर घेऊन जातात त्यांच्या डोळ्यापुढें वर्णिल्या निधानाचें यथार्थ्य आल्याशिवाय रहाणार नाहीं !

अशा प्रसंगीं स्त्रियांच्या तोंडावरील क़ावरेबावरेपणा, डोळे वर करून पहाण्याची व स्पष्टपणें बोलण्याची भीति, पुरुषांच्या मागोमाग चालण्यास वाटणारी शंका वगैरे गोष्टींमुळें त्यांची जी विलक्षण वृत्ति होते तिजवरून अशा रीतीनें समाजांत येण्यापेक्षां घरांतल्या घरांतच रहाणें बरें असें त्यांस वाटत असावें. असें स्पष्टपणें दिसत असतें. यावरून कोणीं असें समजूं नये कीं, जी गोष्ट आमच्या स्त्रियांनीं पूर्वी कधीच न केल्यास आज त्यांना ती अवघड वाटत आहे, ती आपण त्यांच्याकडून कधींच करवूं नये. तसें करणें हें आपण मो. जिन्सिवाल्यांसारख्यांवरच सोंपविलें पाहिजे ! तथापि ज्या गोष्टीविषयीं आपण अपरिचित असतों ती प्रथम करूं लागतांना किती संकटावह होते, हें दाखविण्यासाठीं वरचें उदाहरण दिलें आहे; त्याहून येथें त्याचा दुसरा हेतु नाहीं. तात्पर्य, जन्मदारभ्य ज्या गोष्टींची आपणांस सवय लागलेली असते, त्या गोष्टी इतरांस कितीही वावग्या वाटत असल्या, व त्यांपासून अखेरीस आपलें केवढेंही नुकसान होण्याचा संभव असला, तरी या आपणांस बऱ्या वाटतात, आणि त्या टाकणें आपणांस सहसा रुचत नाहीं. दूर कशाला, आपल्या लोकांच्या राजकीय विचारांकडेच क्षणभर पहा. आम्ही पहिल्यापासून अनियंत्रित एकसत्तात्मक राज्यपद्धतींत वाढलेलों असल्यामुळें 'राजा कालस्य कारणम् ' अशी आमची पक्की समजूत, व ज्या त्या गोष्टींत राजाच्या तोंडाकडे पहाण्याची आम्हांस खोड ! लोकशिक्षण असो; व्यापारवृद्धि असो; यांत्रिक शोध असो; मादकद्रव्यसेवननिषेध असो; सामान्य नीतिप्रसार असो— काय पाहिजे तें असो; अगदीं शुष्क गोष्टींपासून मोठ्या मह-

---

लोटस भाड्यानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर–हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर–सुधारक, पुणें.

त्वाच्या गोष्टीपर्यंत सरकारापुढें तोंड वेंगाडल्याशिवाय, व राज्यकर्त्यांची मदत मागितल्याशिवाय, आमचे हातून कांहीं एव[illegible] होणार नाहीं, असा आमचा पक्का ग्रह होऊन बसला आहे. केशवपन किंवा बालविवाह कायद्यानें बंद करा, असें कोणीं म्हटलें कीं केवढा अनर्थ करून सोडावयाचा की जशी कांहीं स्वातंत्र्यवृक्षावर आकाशांतील कुऱ्हाडच पडत आहे ! म्हणजे काय कीं बायकांच्या व मुलांच्या पारतंत्र्याचा विच्छेद करणाऱ्या कायद्यास स्वातंत्र्यापहारक कुऱ्हाड म्हणावयाचें, आणि ज्या गोष्टींनीं खरोखर स्वातंत्र्यापहार होत आहे त्यांस स्वातंत्र्यसंरक्षक म्हणून प्रेमानें कवटाळावयाचें–अशी आमची शोचनीय अवस्था होऊन गेली आहे ! पण कांहीं अंशीं ही अपरिहार्य आहे. पारतंत्र्यांत ज्यांचीं अनेक शतकें गेलीं आहेत त्यांना स्वातंत्र्यांत, बाऊ वाटावयाचा ! आणि पारतंत्र्य सुखावह वाटावयाचें ! आम्हां अर्धवट सुधारलेल्या लोकांची तर कथा काय ? पण फ्रान्स व जर्मनी अशा सुधारलेल्या देशांतील तत्त्ववेत्त्यांसही न कळत अशा प्रकारची भूल पडते, हें अश्चर्य नव्हे काय ? सामाजिक नियंत्रण बलात्कारतत्वावर न होता संमतितत्वावर होऊं लागेल तेव्हांच सामाजिक सुखाची परमावधि होण्याचा संभव आहे, हें सिद्ध करण्यासाठीं प्रसिद्ध फ्रेंच तत्ववेत्ता ऑगस्ट कौंट बसला असून वहातां वहात भलतिकडेंच जाऊं लागला ! संमतितत्वावर फ्रेंच समाजाची स्थापना करण्याकरतां त्यानें जी राज्यपद्धत वर्णिली आहे ती फ्रान्स देशांत आजपर्यंत रूढ असलेल्या राज्यपद्धतिहून अधिक सक्तीची आहे ! जर्मनींतील अलीकडल्या सामाजिक तत्ववेत्त्यांची विचारपद्धतिही अशाच प्रकारची आहे. यांनीं लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देण्याच्या हेतूनें ज्या राज्यपद्धतींचें विवरण केलें आहे त्या खरोखराच अंमलांत आल्यास, व्यक्तिस्वातंत्र्य कोंठें दृष्टीस पडेल किंवा नाहीं, याचीच शंका आहे !

तात्पर्य, हाडामांसास खिळलेले आचार सामान्य लोकांसच बरें वाटतात असें नाही, तर त्यांतील दोष विचारी विद्वानास देखील सहसा दिसत नाहींत, व दिसले तरी त्यांचा अव्हेर करणें हें त्याच्यानेंही सहन होत नाहीं. यामुळें ज्या ठिकाणीं सरकारी अंमल मोठ्या जुलमाचा असतो त्या ठिकाणीं तो वाढत जाण्यास प्रजेचें वर्तनही बऱ्याच अंशी कारण होतें. जों जों सरकारी अधिकारी अधिकाधिक सक्ती करितात तों तों प्रजेच्या अंगीं, अळिकाधिक सहनशीलता येत जाते, व जों जों हीं वाढत जातें तों तों अधिकाऱ्यांस अधिकाधिक जुलूम करण्यास सवड होते. अशा रीतीनें एका बाजूनें औद्धत्य आणि दुसऱ्या बाजूनें नम्रता; एका बाजूनें चैन व दुसऱ्या बाजूनें कष्ट; एका बाजूनें स्वामित्व आणि दुसऱ्या बाजूनें गुलामगिरी यांची अधिकाधिक वाढ होत गेल्यास, उत्पादक लोकांची संख्या आणि त्यांनीं केलेलें उत्पन्न हीं दोनही संपुष्टांत येऊं लागतात. हळूं हळूं साऱ्यांसच कर्माअधिक भिकारपण येऊन लोकसंख्येची वाढ खुंटतें; आणि असाच प्रकार अधिकाधिक होत गेल्यास तीं कमी होऊं लागून अखेरीस समूळ ऱ्हासाच्या पंथास लागते ! तेव्हां लक्षांत काय गोष्ट ठेवायाची कीं, समाजाची उन्नति होण्यास एका प्रकारची नियामक व्यवस्था जरी अत्यावश्यक आहे, तरी ती फाजील होतां कामां नये. नियामक व्यवस्था अस्तित्वांत आली म्हणजे समाजाच्या अंगीं एका प्रकारचें दार्ढ्य येऊं लागतें. व जों जों ती व्यवस्था वाढत जाईल तों तों तें दार्ढ्य अधिकाधिक प्रबल होत जाऊन, समा-

---

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकटेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १८१३

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

जांतील लवचिकपणा अगदीं नाहींसा होतो, व ज्या मानानें हा लवचिकपणा नाहींसा होत जातो त्या मानानें समाजाच्या पुढील सुधारणेस प्रतिबंध होतो. ह्मणून ज्यांच्या हातीं राज्यसूत्रें असतील त्यांनीं वरील विचार रात्रंदिवस डोळ्यापुढें ठेऊन, सरकारी अंमल अगदीं वेतापुरता चालावयाचा असा निश्चय केला पाहिजे. ज्या देशांतले लोक चिखलांत रुतलेल्या गाईप्रमाणें हातपाय हालविण्यास अगदीं असमर्थ झाले असतील अशास गाळांतून बाहेर पडून दोन पावलें टाकतां येण्यापुरती मदत सरकारानें अवश्य केली पाहिजे; पण त्यापुढें त्यांना आपल्या पायांनीं चालूं न देणें ह्मणजे त्यांस निरंतर पंगू करून ठेऊन त्यांचें आणि त्याबरोबर आपलेंही नुकसान करून घेणें होय, हें अंमलदारांनीं कधींही विसरतां कामा नये.

भारतीय कलांचें पुराणत्व.

अलीकडे आह्मांस जी कारुण्यावस्था प्राप्त झाली आहे, व इंग्लिश लोकांसारख्या बलाढ्य लोकांपुढें आमची जी तेजोहीनता दृष्टीस पडूं लागली आहे, तीमुळें आम्ही पूर्वीपासूनच सर्व बाबतींत असेच गचाळ होतों कीं काय, अशी परकीयांसच नव्हे, तर आमचें आह्मांसु देखील वाटूं लागलें आहे. असें सांगतात कीं इंग्लंडचा प्रसिद्ध बृहस्पति एडमंड बर्क जेव्हां वारेन हेस्टिंग्सविरुद्ध पार्लमेंट सभेंत गर्जूं लागला तेव्हां त्याच्या वाग्वज्रानें पार्लमेंटच्या सामान्य सभासदांचीं अंतःकरणें रागानें व शोकानें विदारून गेलीं येवढेंच नाहीं, तर ज्या हतभाग्य हेस्टिंग्सवर त्याच्या वाणीचे आघात होत होते, त्या खुद्द हेस्टिंग साहेबाचें पाषाणहृदय देखील उकलून जाऊन क्षणभर त्यास असें वाटलें कीं " मी मोठा कर्मचांडाल दुरात्मा असलों पाहिजे ! " बर्कच्या

वाक्प्रभावामुळें हेस्टिंग्सची जशी दशा झाली तशीच आमचीही अलीकडे होऊं लागली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. व्यापार, विद्या, कला, युद्धकौशल्य, धाडस, शरीरसामर्थ्य, मानसिक शक्ति वगैरे कोणत्याही गोष्टींत आह्मीं आपली युरोपीअन लोकांशीं, मुख्यत्वेंकरून इंग्लिश लोकांशीं, तुलना करूं लागलों, कीं त्यांच्या आमच्यांत जमीनअस्मानाचें अंतर स्पष्टपणें निदर्शनास येऊन, त्यांचें पारडें पृथ्वीवर बसल्यासारखें व आमचें आकाशांत लोंबत असल्यासारखें दिसतें ! इंग्लिश लोकांत व आह्मांत खरोखरींच येवढें अंतर असतें, तर आमच्या मनाची जी सध्यां स्थिति झाली आहे, व तीविषयीं दुसऱ्यांस जें वाटत आहे त्याबद्दल इतका खेद करण्याची गजर नव्हती. अनेक गोष्टींत आह्मी आज मित्तीस इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडों योजनें आहों, व आह्मी त्यांपासून शिकण्यासारख्या अनेक वस्तू आहेत, हें निर्विवाद आहे. पण येवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, ज्याचा आम्ही अभिमान मानावा, किंवा ज्याच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहावलंबन करावें, असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं. जुन्या ग्रीक किंवा रोमन लोकांच्या इतिहासा इतका आमचा इतिहास आनंदजनक किंवा उत्साहजनक नाहीं, हें प्रत्येक निःपक्षपाती हिंदूस कबूल केलें पाहिजे. पण यहुदी, मिसर, पार्सीक, किंवा मुसलमान या लोकांच्या इतिहासापेक्षां आमचा इतिहास कमी मनोहर किंवा उपयुक्त आहे, असें मानण्याची गरज नाहीं, असें दाखविणें कठिण पडणार नाहीं. महंमदीय लढवय्यापणामाणें धर्मवेडानें यूरोप व आशिया खंडांतील मोठमो-

---

ब्रह्मी वाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.
डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

ठाले देश आम्हीं उध्वस्थ केले नाहींत, व राज्यलोभानें लाखों लोकांचा प्राणसंहार करून आपली रुधिरभक्ति व क्रूरनिष्ठुरता जगाच्या इतिहासांत अमर केली नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानसिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गान, वादन इत्यादि ललितकलांचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं त्यासंबंधानें आजमित्तीस सुद्धां आम्हांस कोणापुढेंही खालीं पहाण्याची अवश्यकता नाहीं. शिल्पकलेकडे वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याची युक्ति सांपडल्यापासून, त्या कलेंत प्रचंड क्रांति झाली आहे, व बाष्पप्रचोदित राक्षसी लोहयंत्रापुढें दृढिफूट लांबीच्या हाडमासाच्या हाताचें कांहीं एक चालेनासें झालें आहे, हें खरें आहे. पण यंत्रानें केवढींही अचाट कामें केलीं तरी यंत्रें हातांनींच करावीं लागतात, व यंत्रांनीं जी करामत करावयाची ती प्रथम हातानें साधण्यासारखी लागते. यंत्रांत नाना प्रकारच्या वेलबुट्ट्यांचें काम निघतें; पण जर हातानें वेलबुट्ट्या काढतां येत नसल्या व नकाशे तयार करतां येत नसले तर वेलबुट्ट्यांचें काम यंत्रावर काढतां येणार आहे काय? ज्याममाणें दुर्बिणीनें डोळसाच्या दर्शनशक्तीस साहाय्य होतें, पण आंधळ्यास तिचा कांहीं एक उपयोग नाहीं, त्याप्रमाणें जे हस्तकलेंत प्रवीण असतील त्यांसच यंत्रकला साधणार आहे; ज्यांचे हात थोटे आहेत त्यांना यंत्रापासून म्हणण्यासारखा फायदा होण्याचा संभव नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, यंत्रावर काम करणारीं बहुतेक मनुष्यें यंत्रासारखींच असतात; नवीन यंत्रें तयार करण्याची किंवा तीं बिघडलीं तर दुरुस्त करण्याची कला फार थोड्यांसच साधलेली आसते, पण हा विचार हस्तकलेसही तितकाच लागू

आहे. चांगल्या कारागिरानें एखादा सुरेख नमुना घालून दिला म्हणजे त्याचें अनुकरण करणारेच शेंकडा नव्याण्णव लोक आसावयाचे. विशाल कल्पकता ही नैसर्गिक देणगी फार थोडयासच प्राप्त झालेली असते. बहुतेक जनता तेल्याच्या घाण्याभोंवतीं डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें श्रेष्ठ लोकांनीं घालून दिलेल्या वाटांनीं भ्रमण करीत असते. आणि असें तिनें करणें हेंच फायदेशीर आहे. ज्यांना स्वतः ची अक्कल नाहीं त्यांनीं अक्कलवंतांची कास धरून चालावें हेंच नीट आहे. तात्पर्य, आर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपीअन लोकांप्रमाणें आह्मांस आवगत नाहीं, व ती त्यांपासूनच आह्मीं शिकली पाहिजे, हें जरी आम्ही प्रांजलपणें कबूल करतों, तरी ती साध्य होण्यास ज्या हस्तकलाप्राविण्याची अवश्यकता असते, ती हस्तकलाही आह्मांस सर्वांशीं युरोपीअन लोकांपासून उचलली पाहिजे हें मत आह्मांस मान्य नाहीं. तथापि आह्मी लोकर जागें झालों नाहीं, तर युरोपीय यंत्रकला आह्मांस साध्य होणार नाहीं इतकेंच नाहीं, तर सुमारें तीन हजार वर्षांच्या परिश्रमानें येथें भव्य उदयास आलेली जी अमची हस्तकला तिचाही लोप होईल, व एकदां तिचा लोप झाला ह्मणजे अर्वाचीन यंत्रकलाही अह्मास संपादितां येणार नाहीं, हें कबूल करणें भाग आहे. तेव्हां जे कोणी या देशांत यंत्रकला प्रसार करण्याविषयीं झटत असतील त्यांनीं लाखों रुपयांचीं यंत्रें परक्या देशांत खरेदी करुन, तीं येथें आणून मांडिलीं, आणि त्यांवर माल काढण्यास सुरवात केली, ह्मणजे त्यांच्या श्रमास पूर्ण यश आलें, असें आम्हांस वाटत नाहीं. यंत्रांचे कारखाने

स्थापणें तर जरूर आहेच. पण त्यांबरोबरच त्यांनीं दुसऱ्या दोन गोष्टी केल्या पाहिजेत त्या ह्या. आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाहीं तर अत्यंत रक्षणीय आहे, अशी लोकांची खातरी केली पाहिजे, व जे त्या कलेंत निष्णांत आहेत त्यांच्याकडून अर्वाचीन यंत्रकलेचें ज्ञान संपादवून, तें त्या हस्तकलेच्या विस्तृत उपयुक्तत्वाला कारणीभूत होईल, अशा उपायांची योजना केली पाहिजे. तात्पर्य, ज्या वेळेस आमच्या जुन्या हस्तकलेस नवीन यंत्रकलेचें साहाय्य होऊं लागेल, व पूर्वी जीं चतुरस्रपणाचीं कामें नामांकित कारागीर दीर्घ आयासानें, खर्चानें, व काळानें थोड्या श्रीमंतांच्या सुखासाठीं व ऐषआरामासाठीं करीत तींच कामें यंत्रांच्या साहाय्यानें स्वल्प आयासानें, खर्चानें, व काळानें होऊं लागून अनेक गरीबांस जेव्हां त्यांपासून सुख व ऐषआराम प्राप्त होऊं लागेल तेव्हांच आमच्या जुन्या हस्तकलेचें रक्षण झालें, व पाश्चिमात्य यंत्रकलेनें या भूमींत बळकट मूळ धरलें, असें म्हणतां येणार आहे.

येथील श्रीमान् लोक, धनाढ्य शेटसावकार, किंवा पैसेवाले जहागीरदार व संस्थानिक पूर्वीच्या कामासारखीं टोलेजंग कामें हिंदू कारागिरांकडून अलीकडे करवीत नाहींत, हें पाहून कित्येक पाश्चिमात्य लोक असें म्हणतात कीं, हिंदू लोकांत हस्तकौशल्याची अभिवृद्धि कधींच झाली नाहीं. नांवाजण्याभारख्या ज्या थोड्याबहुत इमारती किंवा कोरींव लेणीं दिसतात त्यांवरून इतकेंच सिद्ध होतें कीं, कांहीं कारणांमुळें हस्तकौशल्यांत आम्हांहून फार श्रेष्ठ अशा ग्रीक, रोमन, व मुसलमान लोकांचा आणि आमचा संबंध घडून आल्यामुळें आम्हांस तीं कामें करतां आलीं. त्यांचा आमचा संबंध न घडतां तर हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पहाण्यासारखें किंवा वाखाणण्यासारखें कांहीं एक नसतें. आमच्या मतें हें

म्हणणें फार चुकीचें आहे; व तें चुकीचें आहे, असें अनेक रीतींनीं सिद्ध करून देतां येणार आहे.

प्रथम असा विचार केला पाहिजे कीं, शिल्पकलेची व इतर कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास कोणत्या गोष्टींचो अनुकूलता असणें जरूर आहे; व त्या गोष्टी इताली, ग्रीस, व तुर्कस्थान या देशांपेक्षां हिंदुस्थानांत पूर्वीपासून अधिक विपुलतेनें दृष्टीस पडत आहेत किंवा नाहीं? जो कोणी थोडय बारकाईनें या प्रश्नाचा विचार करील त्याच्या लक्षांत हें तेव्हाच येईल कीं, कोणत्याही देशांत कलांची वृद्धि होण्यास त्यांतील लोकांस चरितार्थसाठीं अहोरात्र खपावें लागतां कामा नये शिवाय अशीं कामें करण्यास लागणाऱ्या जड द्रव्यांचेंही वैपुल्य असलें पाहिजे. बर्फाच्छादित उत्तर ध्रुवाकडील प्रदेशांत खुज्या लोकांत किंवा सैबरिया प्रांतांतील थंडीनें नित्य कांकडत असणाऱ्या लोकांत हस्तकौशल्याची वृद्धि कशी व्हावी, हें आह्मास समजत नाहीं. ज्यांना केवळ उदरपोषणासाठीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत समुद्रोदरस्थ मत्स्य जातीशीं, अरण्यवासी भक्ष्य जनावरांशीं, अथवा हवेंत संचार करणाऱ्या विहंगमांशीं झगडा करावा करावा लागतो, व त्यांवर आपली उपजीविका चालवावी लागते, अशा लोकांस भव्य मंदिरें बांधण्यास नानाप्रकारचे कपडे विकण्यास, व ऐषआरामाचे इतर तऱ्हांचे पदार्थ उत्पन्न करण्यास फुरसत कोठून सांपडणार? अशा लोकांनीं कांडसारख्या माशाच्या, रेनडिअरसारख्या जनावराच्या किंवा कोंचडयांसारख्या गृहपक्षाच्या चरबीवर, मांसावर, व अंडयावर चरितार्थ चालवून संकटावह असें आयुष्यक्रमण करणें

निबंध संग्रह.

भाग १ ला. किं. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

भाग आहे. शिवाय, ज्या ठिकाणीं सूर्य फारसा प्रकाशत नाहीं, मोठमोठ्या नद्या वहात नाहींत, ठरींव ऋतूंत पाऊस पडत नाहीं, व जमीन बहुधा उघडी असत नाहीं, अशा ठिकणीं मृदु, काठिण, ओवाचिक, किंवा दाणेदार अशा वनस्पतींचा वाढ होऊन, इमारतींस लागणारें सुरेख लाकूड मिळावें कसें ? तसेंच जिकडे-तिकडे सफाईदार व टिकाऊ दगडाच्या खाणी लागत नसल्या व लोखंडासारख्या अत्यंत उपयुक्त धातू सांपडत नसल्या तर दगडी कामें व हत्यारें व्हावीं कशी हा मोठा प्रश्न आहे. इजिप्तसारख्या स्वाभाविक सुपीक देशाची लॅपलंडसारख्या ओसाड भूखंडाशीं तुलना करतां येत नाहीं. एकांत मनुष्याच्या उपजीवकेस लागणाऱ्या गोष्टी सहज उत्पन्न होतात. दुसऱ्यांत त्या प्राप्त होण्यासाठीं तेथील लोकांस साऱ्या दिवसभर खपावें. लागते. नैल नदीच्या उंथळ व रुंद पात्रांत जो गाळ वहात असतो तो तिच्या दोनही किनाऱ्यांवरील प्रदेशांत कित्येक मैल आपोआप पसरला जाऊन त्यांस खत घातल्याप्रमाणें सुपीकपणा आणितो ! अशा प्रकारच्या क्षेत्रांत पूर येऊन गेल्यावर एकदां कसें तरी थोडेंबहुत बीं फेंकून द्यावें, आणि सात आठ महिने लोटल्यावर खंडोगणती धान्य घेऊट यावें–असा प्रकार चालतो, अशा देशांतील लोकांत मनुष्य सुधारणेचा आरंभ झाला, निरनिराळी शास्त्रें अस्तित्वांत आलीं, व काळाच्या विघातक सामर्थ्यास न जुमानणाऱ्या व आकाशाचे अस्तित्वांत आलीं, व काळच्या विघातक सामर्थ्यास न जुवानणाऱ्या व आकाशाचें चुंबन करूं पहाणाऱ्या पिरामिदी उठल्या, यांत कांहीं नवल आहे काय ? ज्या कारणामुळें मिसर देशांत सर्वांआधीं सुधारणेस आरंभ झाला असें म्हणतात, तींच कारणें हिंदुस्थानांत आलेल्या आर्यशाखेची सुधारणा प्रथम येथें होऊं लागण्यास पुरें होतीं, व त्याप्रमाणें ती येथें झाली, असें अंतर्बाह्य प्रमाणांवरून समाधान होण्यासारखें सिद्ध करून देतां येणार आहे प्रथम

हिंदुस्थानच्या बाह्य स्वरूपाकडे क्षणभर लक्षाद्या. येथें कशाची-तरी वाण आहे काय ? उष्ण, शीत, किंवा समशीतोष्ण कटिबंधांत पैदा होणारी प्रत्येक चीज येथें हवी तितकी सांपडते. थंड व डोंगरी प्रदेशांत होणाऱ्या जिनसा नगाधिराज हिमालय हव्या तितक्या देण्यास कालाच्या आरंभापासून एकसारखा उभा आहे ! नैल नदीच्या सूपीक व रेताड मैदानांत लीलेनें होणारी धान्यें पाहिजे असतील तर सिंधुच्या व गंगेच्या दोन्ही थडयांनीं त्यांची हवीं तितकी विपुलता आहे. तांबडया व काळ्या जमिनींतील व खारट आणि खडकाळ अशा प्रदेशांतील उत्पन्नें हवीं असतील तर दक्षिण हिंदुस्थानास वेष्टणाऱ्या समुद्रमेखलेपासून घांटापर्यंत पसरलेल्या पूर्वपश्चिम कोंकणपट्टयांकडे, व घांटावरील मोठमोठ्या नद्यानीं चित्राविचित्र व सूपीक करून सोडलेल्या सुखावह भूमिकखंडे अवलोकन केलें म्हणजे झालें. हिंदुस्थानांतील उंचडोंगरी प्रदेश, वड, पिंपळ, खर्दार, पळस, ताड, कळक वगैरे अत्यंत उपयोगी वृक्षांनीं आच्छादिलेले असून त्यांत व्याघ्र, सिंह, माकडें, व मोर वगैरे हिंस्र आणि अहिंस्र प्राणी यथेच्छ संचार करिताना दृष्टीस पडतात. याहून सखल प्रदेशांत हत्ती, रुष्ण सारंग, तांबडीं हरणें, रानडुकरें, साळुंक्या ससे, व चकोरादि पक्षी स्वेच्छेनें विहार करीत असतात. हे दोनप्रकारचे प्रदेश सोडून जेव्हां आपण सपाट मैदानांत येतों तेव्हां जिकडे तिकडे नाना तऱ्हेच्या धान्यांचीं शेतें उंसाचे फड, भाताचीं खांचरें, व नाना प्रकारच्या फळझाडांनीं, वेलांनीं,

---

संगीत सुविचार–विजय नाटक.
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत
किं. ०८
सुधारक ऑफीस, पुणें.

आणि फुलांनीं भरून गेलेल्या बागा दृष्टीस पडतात. अशा प्रकारच्या रम्य व संपन्न देशांतील लोकांस चरितार्थ चालविण्याची आरंभीं येवढी तरी पंचाईत पडली असेल काय ? व जर पडली नसेल तर ज्ञानवृद्धि आणि कलावृद्धि करण्याकडे त्यांचें लक्ष सहज वेधलें नसेल काय ? पण हें सारें या पुण्य आर्यभूमीच्या बाह्य स्वरूपाच्यासंबंधानें झालें. पुढल्या लेखांत हिच्या अंतःस्थितीचा विचार करून, मग आह्मास येथील कलांच्या पुराणत्वावद्दल जो अभिप्राय द्यावयाचा आहे, तो उघडपणें देऊं.

भारतीय कलांचें पुराणत्व.

नं. २.

कोणत्याही देशांत कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास त्याचीं बाह्य स्थिति कोत्या प्रकारची असली पाहिजे हें प्रथम सांगून, मग या भरतखंडाची स्थिति पूर्वीपासून तशी आहे, हें मागल्या लेखांत सांगितलें. तेव्हां इजिप्त देशाप्रमाणें या देशांतही कलांचा अभ्युदय फार प्राचीन कालीं झाला असला पाहिजे, असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. इंग्रज लोकांचा अंमल येथें स्थाईक होण्यापूर्वीच वाष्पशक्ति त्यांच्या हस्तगत होऊन गेल्यामुळें, व त्यांच्या अमलानें येथील कलांच्या पुरस्कर्त्यांची व आश्रयदात्यांची संख्या अत्यंत संकुचित झाल्यामुळें, येथील कारागिरी सांप्रतकालीं अगदीं लयास गेल्यासारखी झाली आहे, हें निर्विवाद आहे. तथापि ज्याचें अवलोकन वस्तूंच्या केवळ पृष्ठभागासच धरून राहात नाहीं, तर त्याच्या खालीं व पलीकडे जातें, त्यांना अजूनही असें कबूल करावें लागेल कीं, आज जें कलाचातुर्य हिंदुस्थानांत उपलब्ध आहे, त्याची उत्पत्ति व अभिवृद्धि आजकालची नाहीं तर फार जुनी आहे. हा त्यांचा

जुनेपणा ज्या दोन प्रमाणांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात त्यापैकीं त्यांची सांप्रत स्थिती या प्रमाणावर आक्षेप घेणारे असे पुष्कळ लोक आहेत. या लोकांत अनेक युरोपिअनांचा व बिल कुल शोध न करतां दुसरे म्हणतील त्यास 'हो' म्हणण्या किंवा केवळ बाह्य स्थितीनरून सिद्धांत बोधणाऱ्या एतद्देशियांच समावेश केला पाहिजे. हिंदू लोकांची राजकीय व सामाजिक अनुकंप्य स्थिती पाहून कलाखात्यांतही ते पूर्वीपासून असेच असले पाहिजेत, व आजमितीस या देशांत जी थोडीबहुत का कारागिरी दृष्टीस पडते ती त्यांनी अन्य लोकांपासून उचलली पाहिजे, असें अनुमान करून तिचें सूत हे हेकेखोर लोक ग्रीक किंवा मुसलमान लोकांकडे लावूं पहातात पण ही त्यांची मो चूक आहे, हें पुढील विवरणावरून सहज लक्षांत येईल.

मनुस्मृति हा ग्रंथ कमीत कमी झटला तरी ख्रिस्ती शकाच्या अगोदर किंवा पाठीमागून जो दोनशें वर्षांचा काळ लोटला त्यां लिहिला गेला असावा, ही गोष्ट आतां सर्व शोधक विद्वान् मा करतात. याविषयीं आतां मतभेद राहिलेला नाहीं. मनुस्मृती ज्या कलांचें व कारांगिरांचें अप्रत्यक्ष रीतीनें वर्णनें आलीं आहे त्याच प्रकारच्या कला व कारागीर अद्यापि उपलब्ध आहे तेव्हां जर कोणी आम्हांस कलाशिक्षण दिलें असेल तर तें म स्मृति अस्तित्वांत येण्यापुर्वी दिलें असलें पाहिजे, असें मान भाग आहे. परंतु मनुस्मृतीनें पुर्वीच्या स्मृतीचा व इतर ग्रंथां कला व कारागीर यांच्या संबंधानें उल्लेख केला आहे. तेव्हां अ णखी असें कबूल करणें भाग पडतें कीं, ज्या अर्थी मनुस्मृती मितीपासून इतकीं शतकें लोटलीं असून व स्थित्यंतर करण्य

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातू शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं. ०५

खेडकरवैद्य ॲन्ड सन्स् शनवार पेठ, पुणे

अत्यंत अनुकूल अशा अनेक गोष्टी घडल्या असून जर आम-
च्या कला व कारागीर त्या कालापासून आतांपर्यंत विशेष फे-
रफार न होतां एकाच स्थितींत दृष्टीस पडत आहेत, तर मनुच्या
पहाण्यांत ज्या कला व जे कारागीर आले ते तत्कालीन स्थिती-
त अनेक शतकें असले पाहिजेत ; व हें अनुमान योग्य असेल
तर भारतीय कलांचें पुराणत्व तीन हजार वर्षांवर नेऊन बसवितां
येतें! मनुस्मृतींत आलेग्झांडराच्या किंवा शिकंदराच्या स्वारीविषयीं
बेलकुल उल्लेख नाहीं, तेव्हां ती स्वारी स्मृति झाल्यावर
झालीं असावी, असें म्हणणें कांहीं वावगें नाहीं; तसेंच मनुस्मृति
ख्रिस्ताच्या अगोदर दोनशें वर्षें लिहिली गेली असावी असें
म्हणा, किंवा त्यानंतर दोनशें वर्षांनीं लिहिली गेली असावी असें
म्हणा, कसेंही झटलें तरी ती अस्तित्वांत येण्यापूर्वी मुसलमानांचा
पाय या पुण्यभूमींस लागला होता, असें कोणासही म्हणतां
येणार नाहीं. तेव्हां आम्ही आमच्या कला मुसलमान किंवा
इतर लोकांपासून उचलल्या असाव्या, असें सूक्ष्म विचाराअंतीं
कोणाच्यानेंही प्रतिपादवणार नाहीं. आतां मनुस्मृतींत तरी अप्र-
त्यक्ष रीतीनें काय काय सांपडतें तें पाहूं. अप्रत्यक्ष रीतीनें असें
म्हणण्याचें कारण असें आहे कीं, अर्वाचीन एंजिनीअरच्या ग्रंथा
सारखा मनुस्मृति कांहीं कलाग्रंथ नाहीं. तो धर्मग्रंथ आहे.
तथापि निरनिराळ्या अध्यायांत निरनिराळ्या वर्गांच्या कर्तव्यांचा
संबंधांचा विचार करीत असतां तत्कालीन कलांचा व कारा-
गिरांचा उल्लेख करणें त्यास भाग पडलें आहे. तेव्हां अशा प्रका-
रच्या ग्रंथांत प्रस्तुत विषयाच्यासंबंधानें जें कांहीं सांपडेल त्यांत
किंचित्ही व्याज असण्याचा संभव नाहीं, हें उघड आहे.
मनुस त्यासंबंधाचा जशी स्थिति दृष्टीस पडली तशीच त्यानें
लिहिली असावी, असें मानणें हेंच योग्य आहे. स्थलसंकोच
नसता तर सबंध श्लोकच्या श्लोक येथें उतरून घेतले असते.
पण जाग्याचा अडचणीमुळें तसें करतां येत नाहीं. फक्त अध्या-

याचा व श्लोकसंख्येचा उल्लेख करण्यांत समाधान करून घ्यावें लागत आहे. (अध्याय ८ श्लोक २४८ व अध्याय ९ श्लोक २८०, २८५) यांत देवालयाविषयीं उल्लेख आहे. (४, ४६—वेथून पुढें अयाध्याचा आंकडा जाडा व श्लोकाचा बारका असें समजावें--यांत मोडक्या देवळांचा उल्लेख आहे; आणि (४' ३९, १३० व ८, ८७, व ९ २८५) यांत मूर्तींचा उल्लेख आहे; (८, २४८, ९, २७९) त तळीं, हौद, विहिरी, व जिवंत टांकीं यांचा आहे; (९, २८५) त पुलांचा आहे; (७, ७०, ७६ व १, २५२) त भुइकोट किल्ल्यांचा व डोंगरी किल्ल्यांचा आहे; (७, ७०, ७६ व ९, २८५) त राजवाडयांचीं आणि त्यांवर मोठमोठ्या कांठ्यावर फडकणाऱ्या निशाणांचा आहे; (९, २८०) त कोठारांचा आणि हत्यारखान्यांचा आहे; (४, १६०) त धनुष्यबाणांचा आहे; (९; ९०) सर्व प्रकारच्या मारक शस्त्रांचा आहे; (९,२८०) त रथांचा आहे; (४,२०२,२३२ व ८,२९१) त बसण्याच्या गाडयांचा आहे; (८,२०९) त ओझ्याच्या गाडयांच्या किंवा खटाऱ्यांचा आहे; (८,२३१) त पांढऱ्या पोषाखांचा आहे (१०,८७,१२,६६) त लोकर, कापूस व ताग यांच्या रंगित वस्त्रांचा आहे; (५,१२० व ११,१५९) रेशमी कपडयांचा आहे; (४,६६,१८८,२३१, व ९,७०, २१९) त हरएक तऱ्हेच्या तंतुपटाचा आहे; (७,९०) त नीळ आणि (१०,८२ त लाख यांचा आहे, (४,६६) त जोडयांचा आहे; (२ २४६ व ७,९६) त छत्र्यांचा आहे, (११,१६८,७,२१८,८ १००, ३२३) त पोळीं, मोतीं, व इतर रत्नें यांचा आहे

लेखकांस योग्य मोबदला देऊन आम्हीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

अत (४.३६) त कानांतील सोन्यांच्या दागिन्यांचा व (२,१९४, च्य ३,५९) त बाकीच्या दागिन्यांचा आहे; (३,२०९,४,२५०, रफ १२,६५) त निरनिराळ्या अत्तरांचा आहे; (४,२०२) त पहाअसनांचा व (४,२५०) त मंचकांचा आहे; (३,२३४) त त नेपाळच्या शय्यास्तरणांचा आहे, (४,२२९) त दिव्यांचा, तर (७, १३२) दगडांच्या वस्तूंचा, व (७,१२१) त हस्तिदंत वेतं आणि शिंगं यांचा आहे; (४,२३०, ५,११२ व ११,११८) त वेलबुट्ट्याच्या साध्या आणि कोंदणांच्या दागिन्यांचा आहे;(५,११३) तांत चमच्यांचा (२,६५,७,१३२,८,३१९) त पाण्याच्या भां-वड्यांचा, (४,७४,७,५०) त फाशांचा, (४,२०२, २३२) त णविछान्यांचा व (५,, १२०) त घोंगडयांचा आहे. ही मनुस्मृतींत णआढळणाऱ्या वस्तूंची अध्यायवार व श्लोकवार याद झाली. या-यवप्रमाणें कारागिरांचीही याद देंऊ लागलों तर वाचकांस ती णहंराळवाणी होईल, म्हणून इतकेंच सांगतों कीं, मनुस्मृतींत सुतार, विणकर, लोहार, सोनार, शिंपी, कोष्टी, तेली, साळी वगैरेंचा उल्लेख केला आहे; व जरी या सर्वांस त्यानें खालच्या वर्णांत गोविलें आहे, तरी त्यांच्या धंद्यांची उपयुक्तता ध्यानांत आणून असा णअभिप्राय दिला आहे—कीं, कारागीर कोणत्याही जातीचा असला तरी ज्या हातानें तो उपयुक्त वस्तू बनवितो तो हात थ कांहीं अपवित्र नाहीं ! तसेंच, विवाहित स्त्रियांनीं कारागिरांशीं ंभाषण करणें निषिद्ध नाहीं. यावरून निवृत्तिमार्गाकडे ज्याचा ारःशेष ओघ त्या मनूला सुद्धां या कारागिरांचें महत्व आणि त्यां-च्यामुळें जगांत सुखावह करण्यास होणारें साहाय्य यांचा किती विशिष्ट कल्पना होती, हें सिद्ध होतें. तसेंच मनूच्या अमदानींत तूणें चालत होतें असेंही स्पष्ट दिसतें. कारण या वैराग्यभक्तानें णांना ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं," तांबें, रुपें, आणि सोनें तच्या ज्या विशिष्ट वजनांस नाणें अशी पारिभाषिक संज्ञा ा हे, व ज्याच्या योगानें जगाचा व्यवहार सुकर होतो, तीं

नाणीं अगदीं निर्दोष आहेत, असें माझें मत आहे. " याच रीतीनें त्यानें दुसऱ्या एका स्थलीं ऋण, करार, सारा, परमुलखांतल्या मालावरील कर, समुद्रप्रयाण; परदेशाशीं व्यापार यांविषयीं उल्लेख करून, शेवटच्या दोन गोष्टी ब्राम्हणांस निखालस वर्ज्य आहेत, असें झटलें आहे ! यावरून काय उघड होतें कीं, परदेशाशीं हिंदुस्थानाचा व्यापार मोठ्या झपाट्यानें चालत होता, व त्यामुळें जें दळणवळण सुरू झालें होतें त्यामुळें ब्राम्हण धर्मास लागलेली उतरती कळा व बौद्ध धर्माचा प्रसार यांच्या योगानें त्याचें चित्त उद्विग्न होऊन जाऊन, ब्राम्हण धर्माची पूर्वपदावर स्थापना करण्यासाठीं तो आपणांकडून होतील तेवढे निर्बंध घालीत होता. प्रस्तुत स्थलीं आम्हास या संबंधांत विशेष पडण्याची गरज नाहीं. तथापि मनुस्मृतींवरून येवढें सिद्ध करण्यास हरकत नाहीं कीं, मनूच्या कारकीर्दीत म्हणजे ख्रिस्ती शकाच्या अव्वल कारकीर्दीत किंवा त्याच्या पूर्वी पांचसातशें वर्षें म्हणजे आज सुमारें तीन हजार वर्षें हिंदुस्थानच्या कला आणि कारागीर बहुतेक अंशीं आहेत तसे आहेत; त्यांना ग्रीक लोकांनीं किंवा मुसलमान लोकांनीं विशेषसें दुखावलेंही नाहीं, व सुधारलेही नाहीं, व थोडी काळजी घेतल्यास आणखी अनेक शतकें त्या कला आणि ते कारागीर तसेच तगून राहतील ! पण हें घडावें कसें ? इंग्रजांनीं आणिलेल्या वाष्पशक्तीपुढें व राक्षसी यंत्रशक्तीपुढें आमच्या हातकारागिरांनीं टिकाव धरावा कसा ? आणि आमच्या कलांचें

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

.३१ नांव चालावें कसें ? अथवा आमच्या कारागिरांचा उदर्निर्वाह
१९ व्हावा कसा ? याला एकच उपाय दिसतो तो हा कीं, आमच्या
,६५ हस्तकौशल्याचा युरोपीय बाष्पशक्तीशीं व यंत्रशक्तीशीं विवाह
नांच होऊन त्यांच्या समागमापासून उत्पन्न झालेलीं संतानें जिकडे
ळच तिकडे फडकूं लागलीं पाहिजेत !

भारतीय कलांचें पुराणत्व.

नंबर २

मनुस्मृतीच्या साहाय्यानें आमच्या कलांचें पुराणत्व सिद्ध करण्यास अप्रत्यक्ष जातीचा किंता पुरावा मिळतो, याचें दिग्दर्शन मागल्या लेखांत केलें आहे. आमचीं महापुराणेंही या संबंधानें बरींच उपयोगी पडण्यासारखीं आहेत मनुस्मृती आणि रामायण व महाभारत हे अगदीं निराळ्या प्रकारचे ग्रंथ आहेत. तथापि त्यांमध्यें कालदूरता विशेष नसल्यामुळें, कलादि मुख्याविषयबाह्य गोष्टींचे जे उल्लेख त्यांत आढळतात, ते परस्परांशीं सदृश अभून एकमेकांचे समर्थन करणारे आहेत. आमच्या शोचनीय स्थितीमुळें, या महापुराणांचा अभ्यास आमच्या हातून जसा व्हावा तसा मुळींच होत नाहीं. पूर्वपद्धतीचे कांहीं लोक कीं पोथीपुढील तांदुळासांठीं, व्यासपूजेच्या प्राप्तीसाठीं, साप्ताहाच्या कायद्यासाठीं, किंवा बिदागीसाठीं वाचतात ! अलीकडील तरुण लोक तीं परीक्षा पास होण्यासाठीं वाचतात ! इतिहासदृष्टीनें यांच्याकडे अवलोकन करून ज्यानें त्यांच्या वाचनास आरंभ णं चालविला आहे, व तें तडीस नेलें आहे, असा बहुधा एकही अर्वाचीन विद्वान सांपडणार नाहीं. एखादा बुद्धिवान् व कल्पक ज्यविद्वान या दोन ग्रंथाचा यथास्थित रीतीनें अभ्यास करील तर हि, व जारतीय आर्यांच्या पौराणिक कालांतील स्थितीचें प्रत्येक बाब-

तींत विश्वसनीय, मनोरंजक, व बोधावह असें चित्र त्यास का
ढतां येणार आहे ! पण असलें काम नीट रीतीनें होण्यास ला
गणारा राजाश्रय किंवा लोकाश्रय आह्मांस मिळत नसल्यामुळे
यांचें जितकें मंथन व्हावयाला पाहिजे आहे तितकें अद्याप
कोणींही केलेलें नाहीं, व पुढेंही तें अशाच स्थितींत कर
ण्यास कोणी झटेल, असें आह्मांस वाटत नाहीं. इंग्लिश
लोकांनीं असलीं कामें हातीं धरल्यास, त्यांस खुद्द सरकारा
कडून व सरकारी अधिकाऱ्यांकडून साक्षात् किंवा परंपरेनें
पुष्कळ मदत होते. इतिहासदृष्टीनें या ग्रंथाकडे पाहून त्यांच्य
मदतीनें येथील जुनी स्थिति कशी असावी; राज्यपद्धती
कोणत्या प्रकारची असावी; राजा आणि प्रजा यांचे अन्योन्य
संबंध कसे होते; वर्णावर्णांत द्वेषभाव असे कीं संतोषवृत्ति
असे राजावर लोक प्रीति करीत किंवा त्याला नाखुष असत
कायदे कोण करी; कर कोणत्या प्रमाणानें कशावर, व केव्हा
घेत; सैन्याची व्यवस्था कशी काय ठेविली जात असे; स्वदेश
व्यापाराला उत्तेजन देऊन परकी देशाचा माल स्वदेशांत येऊ
न देण्याबद्दल निर्बंध करीत असत किंवा नाहीं; व्यापारा
मुख्य ठिकाणें कोणतीं होतीं; कोणकोणत्या जिनसा विके
पिकत, अथवा कोणत्या जिन्नस कोणत्या ठिकाणीं विके
सुचक होत असे, आणि त्याला काय किंमत पडे; लोकशि
णाची व स्त्रीशिक्षणाची सामान्य स्थिति कशी होती; स्त्रिय
नोकरास, व इतर परोपजीवी लोकांस कोणते हक्क असत,

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र,
संगीत समाजादर्श नाटक.
ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय्. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुप
'संदेश' एजंट, पुणें सिटी

व त्यांचा सांभाळ कोणत्या रीतीनें होत असे वगैरे गोष्टींविषयीं उत्कृष्ट माहिती या दोन पुराणांत खचित सांपडेल, अशी आमची आहे. पण इतका शोधक व सुखवस्तू वाचक येथें कोठून पैदा होणार ? व झाली तरी तो आह्मांस लाभणार कसा ? फट्दिशीं तो एखादे ठिकाणीं रावसाहेब होऊन बसावयाचा, किंवा कोठें वकीलीचा 'प्रॅक्टीस' करूं लागावयाचा, अथवा एखाद्या नेटिव संस्थानिकाच्या पदरीं चार दोनशें रुपयांवर पडून राहवयाचा ! सध्यां आमच्या संबंधानें हें बिकट काम युरोपिअन लोक करीत आहेत, व ते आमच्या हातून नीट होऊं लागे तोंपर्यंत, युरोपिअन लोकांच्या शोधांवर, व कांहीं अंशीं यांच्या कल्पनांवर, आह्मांस अवलंबून असलें पाहिजे. प्रस्तुत संबंधही **सर जॉर्ज बर्डवूड** यांनीं हिंदुस्थानच्या कलाच्या राणत्वाचें जें मंडन केलें आहे त्याच्या अनुरोधानें लिहिले जात आहे. ज्यांना सर जॉर्ज यांचा इंग्रजींत लिहिलेला अस्सल लेख ह्रावयाचा असेल त्यांनीं बॉंबेग्याझेट पत्राचा १२ जून १८९० चा क पहावा; असो.

रामायण आणि भारत हीं इतिहासाचीं पुस्तकें नाहींत हें री खरें आहे, तरी जो ऐतिहासिक दृष्टीनें त्यांकडे पाहील ाला त्यांपासून तत्कालीन व त्यापूर्वीच्या समाजाच्या अंत-य स्थितीविषयीं बरीच माहिती मिळणार आहे. प्रस्तुत यांच्या समर्थनासाठीं सर जॉर्ज यांनीं रामायणांतून एकच ाहरण घेतलें आहे. पण तेवढ्यावरूनसुध्दां पौराणिक कालांत मच्या कालची व कारागिराची स्थिति कशी होती, हें सहज ाजण्यासारखें आहे. रामायणाच्या दुसऱ्या काडांतील एको-नाऱ्या अध्यायांत अयोध्येंतील लोक भरतासह जो रामाचा न लावण्यास निघाले आहेत त्याचें वर्णन आहे. रामशोधार्थ लेली ही भरताची स्वारी मोठ्या थाटानें व व्यवस्थेनें ाली होती. हींत प्रत्येक धंद्याचें लोक असून, धंद्याच्या

महत्वाच्या अनुरोधानें त्यांच्या रांगा लाविल्या होत्या, व त्या त्या धंद्यांतील प्रमुख इसमांना त्याचे पुढारी किंवा नायक नेमिलें होतें. या प्रसंगीं हजर असलेल्या लोकांत अग्रस्थान जवाहिऱ्यांस दिलें होतें जवाहिऱ्यांच्यां पाठीमागून कासार चालले होते, व कासारांच्या मागून हस्तिदंती काम करणारे. गंधी, सोनार, कोष्टी, लोकर विणणारे; सुतार, पितळेचें काम करणारें, चितारी, गायनाचीं वाद्यें करणारे, शस्त्रें करणारे, लोहार, तांबट, पुतळे करणारे, स्फटिक कांपणारे, कांच करणारे आणि असेच इतर कारागीर अनुक्रमानें जात होते. ही यादी पाहून रामायणकालीं हे धंदे हिंदू लोकांस माहीत नव्हते असें कोण म्हणूं शकेल ? हिंदुस्थानास मुसलमानांचा वारा सातव्या शतकापर्यंत मुळींच लागला नाहीं. रामायण व भारत यांतील राजे ख्रिस्तीशकाच्या पूर्वीचीं पांचशें आणि त्यानंतरचीं पांचशें वर्षें यांच्या दरम्यान होऊन गेले असावे, असे हिंदु लोकांच्या सुधारणेविषयीं ज्यांचें म्हणण्यासारखें अनुकूल मत नाहीं, असे पंडित देखील कबूल करतात तसेंच रामायणांत धंद्यांची जी यादी दिली आहे तीच कोणी झाला तरी आज करील. फार तर काय पण एखादा सेन्सस रिपोर्ट घेतला आणि त्यांतील वर्गीकरणाकडे पाहिलें, तर धंद्याच्या कोष्टकांत म्हणण्यासारखा फरक करावा लागणार नाहीं तेव्हां काय सिद्ध झालें कीं, रामायणकालीं या भरतभूमींत जे धंदे येथें चालत होते तेच अद्यापिही चालत आहेत व यांत लोकांच्या आणि मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांनं

दि रिलाअन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.
सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्चर ८१० पौंड.
मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.
याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवू

त्यांत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. आणि वास्तविक पाहिलें तर हा फरक त्या लोकांकडून होण्याचा संभवही नव्हता. ग्रीक लोक तर येथें एखाद्या सांथीसारखे, वावटळीसारखे किंवा टोळधाडीसारखे आले आणि गेले! हिंदुस्थानांत त्यांनीं कायमचें ठाणें कधींही दिलें नाहीं, व त्यांमुळें त्यांच्याकडून येथील कलाकौशल्यांत म्हणण्यासारखा फेरफार झाला नाहीं. 'म्हणण्यासारखा' असें बुध्या लिहिण्याचें कारण असें कीं, ग्रीक लोकांनीं आम्हांस जिंकून आपली सत्ता येथें कायम केली असें जरी उपलब्ध इतिहासावरून म्हणतां येणार नाहीं, तरी त्यांचें आमचें दळणवळण मुळींच होत नव्हतें असें नाहीं. कांहीं लोकांची जिज्ञासा आणि कांहींचा व्यापार यांच्या योगानें या उभय देशांत बरेंच दळणवळण होत असावें, असें मानण्यास हरकत नाहीं. पण या दळण वळणावरून हिंदुस्थानांतील कारागिरी हिंदू लोकांनी ग्रीक लोकांपासून उचलली असावी, असें अनुमान करण्यास पुरेसा पुरावा मिळत नाहीं. उलट हिंदू व ग्रीक या उभयतांनींहि आपापल्या कारागिरींचीं मूलतत्वें आपल्याकडून जुन्या अशा तिसऱ्याच आर्यशाखेपासून संपादिलीं असावीं, असें मानण्यास बराच आधार आहे, तसेंच हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचे अनेक पदार्थ ग्रीस देशांत व इतर देशांत जात असून, त्यांची तेथें मोठी तारीफ व अनुकरण होत असे, याचद्दलही पुरावा आहे. तेव्हां कारागिरीच्या संबंधानें जर ग्रीक लोकांचें सुद्धां आम्ही कांहीं कर्ज लागत नाहीं, तर त्यांच्या जवळून ज्यानीं या देशांत बऱ्याच शतकांनीं पाय ठेवला त्या मुसलमानांचें लागतो, असें म्हणणें शुद्ध साहस आहे. शिवाय मुसलमान लोकांनीं आपल्या कसबानें किंवा विद्येनें आमच्या कारागिरींत किंवा विद्येंत प्रचंड क्रांति करून त्यांचा मागमूस काढून टाकला, असा त्यांचा अधिकार नव्हता. मुसलमान लोक

आम्हांहून विशेष कडवे, विशेष शूर, विशेष मिजासी, व धर्माभिमानी आहेत, हें क्षणभर कबूल करतां येईल; पण इंग्रज लोकांप्रमाणें ज्ञानांत, कलाकौशल्यांत, राजकारणांत किंवा कल्पकतेंत आम्हांहून ते श्रेष्ठ होते, असें म्हणण्यास बिलकुल आधार नाहीं. त्यांनीं येथें पांचसहाशें वर्षें आपली बादशाही चालविली हें कबूल आहे;-पण इंग्रजांनीं आपल्या शंभर वर्षांच्या अमलानें आमच्या अंतरबाह्य स्थितींत जें जमीनअस्मानाचें अंतर पाडिलें आहे, तें मुसलमानांस सहाशें वर्षांच्या एकछत्री अंमलानें पाडितां आलें नाहीं, हें निर्विवाद आहे. आणि असेंच होणें स्वाभाविक होतें. वर निर्दिष्ट केलेल्या गुणांत आम्हांहून मुसलमान लोक खरोखरीच श्रेष्ठ असते तर त्यांच्या सहाशें वर्षांच्या अंमलांत आमच्या घरच्या सुधारणेचा मागमूसही न रहाता. आपणाहून कमी सुधारलेल्या ज्या ज्या लोकांस त्यांनीं जिंकून पादाक्रांत केलें, व ज्या ठिकाणीं त्यांनीं आपली कायमची राज्यें स्थापिलीं त्या ठिकाणच्या जुन्या सुधारणेचा आतांपत्ताही लागत नाहीं. तात्पर्य काय कीं, कोणत्याही कमी सुधारलेल्या लोकांनीं आपणांहून अधिक सुधारलेल्या राष्ट्रास जिंकून तेथें आपली गादी स्थापिली, व अनेक वर्षें त्याचें अव्याहत राज्य केलें, तरी त्यांच्या हातून तेथल्या लोकांच्या वरिष्ठ सुधारणेचा बिमोड होऊं शकत नाहीं, हा जो इतिहासज्ञांनीं नियम काढिला आहे तोच आम्हांसही लागूं होतो. याच गोष्टींचा दुसरा प्रत्यंतर असा आहे कीं, दक्षिण हिंदुस्थानांत म्हणजे कर्नाटक, म्हैसूर वगैरे प्रांतांत मुसलमान लोकांचा स्थाईक अंमल कधींच साल-

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.
डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.
पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ८
लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

झणण्यासारखा फरक झालेला नाहीं. आणि विषयीं विक पाहिलें तर हा फरक त्या लोकांकडून होण्याचा संभ- व्हता. ग्रीक लोक तर येथें एखाद्या सांथीसारखे, वावटळीसा- किंवा टोळधाडीसारखे आले आणि गेले! हिंदुस्थानांत त्यांनीं मचें ठाणें कधींही दिलें नाहीं, व त्यांमुळें त्यांच्याकडून ये- कलाकौशल्यांत झणण्यासारखा फेरफार झाला नाहीं. णण्यासारखा ' असें बुध्या लिहिण्याचें कारण असें कीं, लोकांनीं आह्मांस जिंकून आपली सत्ता येथें कायम केली जरी उपलब्ध इतिहासावरून म्हणतां येणार नाहीं, तरी चें आमचें दळणवळण मुळींच होत नव्हतें असें नाहीं. कांहीं कांची जिज्ञासा आणि कांहींचा व्यापार यांच्या योगानें या य देशांत बरेंच दळणवळण होत असावें, असें मानण्यास कत नाहीं. पण या दळण वळणावरून हिंदुस्थानांतील कारा- री हिंदू लोकांनी ग्रीक लोकांपासून उचलली असावी, असें नुमान करण्यास पुरेसा पुरावा मिळत नाहीं. उलट, हिंदू व क या उभयतांनींहि आपापल्या कारागिरींचीं मूलतत्वें आपल्या- न जुन्या अशा तिसऱ्याच आर्यशाखेपासून संपादिलीं असावीं, सें मानण्यास बराच आधार आहे,तसेंच हिंदुस्थानांतील कलाकौ- ल्याचे अनेक पदार्थ ग्रीस देशांत व इतर देशांत जात असून, ांची तेथें मोठी तारीफ व अनुकरण होत असे, याबद्दलही राच पुरावा आहे. तेव्हां कारागिरीच्या संबंधानें जर ग्रीक ोकांचें सुद्धां आम्ही कांहीं कर्ज लागत नाहीं, तर त्यांच्या ाटीमागून ज्यानीं या देशांत बऱ्याच शतकांनीं पाय ठेवला त्या ुसलमानांचें लागतो, असें म्हणणें शुद्ध साहस आहे. शिवाय ुसलमान लोकांनीं आपल्या कसबानें किंवा विद्येनें आमच्या कारागिरींत किंवा विद्येंत प्रचंड क्रांति करून त्यांचा मागमूस ाहींसा करावा, असा त्यांचा अधिकारहि नव्हता. मुसलमान लोक

आम्हांहून विशेष कडवे, विशेष शूर, विशेष मिजासी, व धर्माभिमानी आहेत, हें क्षणभर कबूल करतां येईल; पण इंग्रज लोकांप्रमाणें ज्ञानांत, कलाकौशल्यांत, राजकारणांत किंवा कल्पकतेंत आम्हांहून ते श्रेष्ठ होते, असें म्हणण्यास बिलकुल आधार नाहीं. त्यांनीं येथें पांचसहाशें वर्षें आपली बादशाही चालविली हें कबूल आहे;. पण इंग्रजांनीं आपल्या शंभर वर्षांच्या अमलानें आमच्या अंतरबाह्य स्थितींत जें जमीनअस्मानाचें अंतर पाडिलें आहे, तें मुसलमानांस सहाशें वर्षांच्या एकछत्री अंमलानें पाडितां आलें नाहीं, हें निर्विवाद आहे. आणि असेंच होणें स्वाभाविक होतें. वर निर्दिष्ट केलेल्या गुणांत आम्हांहून मुसलमान लोक खरोखरीच श्रेष्ठ असते तर त्यांच्या सहाशें वर्षांच्या अंमलांत आमच्या घरच्या सुधारणेचा मागमूसही न रहाता. आपणाहून कमी सुधारलेल्या ज्या ज्या लोकांस त्यांनीं जिंकून पादाक्रांत केलें, व ज्या ठिकाणीं त्यांनीं आपली कायमचीं राज्यें स्थापिलीं त्या ठिकाणच्या जुन्या सुधारणेचा आतांपत्ताही लागत नाहीं. तात्पर्य काय कीं, कोणत्याही कमी सुधारलेल्या लोकांनीं आपणांहून अधिक सुधारलेल्या राष्ट्रास जिंकून तेथें आपली गादी स्थापिली, व अनेक वर्षें त्याचें अव्याहत राज्य केलें, तरी त्यांच्या हातून तेथल्या लोकांच्या वरिष्ठ सुधारणेचा चंमोड होऊं शकत नाहीं, हा जो इतिहासज्ञांनीं नियम काढिला आहे तोच आम्हांसही लागूं होतो. याच गोष्टींचा दुसरा प्रत्यंय असा आहे कीं, दक्षिण हिंदुस्थानांत म्हणजे कर्नाटक, म्हैसूर वगैरे प्रांतांत मुसलमान लोकांचा स्थाईक अंमल कधींच साल

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ८

लाल्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

नाहीं, व पश्चिम हिंदुस्थानांत तो फार स्वल्पकालीन होता. यामुळें पश्चिम हिंदुस्थानांतील कलाकौशल्यावर मुसलमानांच्या अंमलाची झांक यत्किंचित् दिसते, पण कर्नाटकांतील व म्हैसूर प्रांतांतील कारागिरांस म्लेंछस्पर्श कधींही झाला नाहीं, असें त्या त्या प्रांतांतील कारागिरीच्या आजच्या स्थितीवरून म्हणणें भाग पडतें. उलट, अमदाबाद, हैदराबाद (दक्षिण) अशा थेट मुसलमानी शहरांत सुद्धां आमची कारागिरी मशीदीपर्यंत व जनानखान्यापर्यंत जाऊन भिडली आहे, असें दिसून येईल!

भारतीय कलांचें पुराणत्व.

नंबर ४.

गेल्या तीन लेखांत मनुस्मृति, महाभारत, व रामायण या तीन ग्रंथांच्या साहाय्यानें भारतीय कला किती जुन्या आहेत हें थोडक्यांत दाखविलें. आज याहूनही एका जुन्या ग्रंथाच्या मदतीनें त्याच गोष्टीचें पुष्टीकरण करून, मग थोडासा बाहेरचा पुरवा देण्याचा मानस आहे.

सर्व ग्रंथांत **वेद** हा अत्यंत पुराण ग्रंथ आहे, असें आम्ही हिंदु लोक ह्मणतों इतकेंच नाहीं, तर युरोपांतील अत्यंत शोधक अशा प्रत्येक देशांतील विद्वानांचें मत आहे. यासंबंधानें **मॅक्स म्यूलर** साहेबांनीं कोठेंसें असें ह्मटलें आहे कीं, पृथ्वीवरील मनुष्यांचा, निदान आर्यशाखेंतील मनुष्यांचा आद्य इतिहास दुसऱ्या कोणत्याही पुस्तकांत मिळण्याचा संभव नाहीं. आपल्या मनांतील विचार दुसऱ्यास कळविणें हा भाषेचा मुख्य उपयोग होय. अशा प्रकारची भाषा आर्यशाखेंतील मनुष्यांमध्यें अस्तित्वांत येऊन, चिरस्थाई होण्यासारखे जे विचार त्यांनीं **छानदस्त वृत्तांत** प्रथम गोंविले ते

वेदांत दृष्टीस पडतात. वेदांतील ऋचा ज्यावेळेस रचल्या गेल्या त्यावेळेस आर्यलोकांस लेखनपद्धति माहीत नसावी, असें आन्तर्बाह्य प्रमाणांवरून कित्येक पंडित अनुमान करितात. तात्पर्य,— मनुष्यांच्या बुद्धिचा विकास होऊं लागला; बाह्य सृष्टीचा चमत्कार त्यांस वाटूं लागला; सूर्यचंद्रादि आकाशस्थ तेजोमय गोलक एका दिशेनें दिसूं लागतात, व कांहीं वेळ आकाशपंथ आक्रमून पुनः नाहींसें होतात; कधींकधीं नभोमंडल अभ्रानें व्याप्त होऊन जिकडेतिकडे पर्जन्यवृष्टि होऊं लागते; पर्वतांच्या बाजूवरून पाण्याचे मोठमोठे लोट वाहूं लागतात; विजा चमकतात गडगडाट होतात; फिरून वृष्टि थांबते; आकाश निरभ्र होतें; गगनस्थ कोटयावधि लहानमोठे तारकापुंज चमकूं लागतात; प्राणिमात्रांची भीति नाहींशी होऊन ते पुनः जिकडे तिकडे संचार करूं लागतात; नद्यांचें, सरोवरांचे, व सागरांचें उदक फिरून स्वच्छ होते झाडांस पालवी फुटून तीं टवटवीत दिसूं लागतात; व पुनः कांहीं महिन्यांनीं सृष्टि आपलें उग्र स्वरूप धारण करते—असा विलक्षण चमत्कार पाहून कधीं भयानें, कधीं आनंदानें, व कधीं आश्चर्य आणि निराशेनें चकित होऊन सृष्टींतील भव्य वस्तूंस प्रभु प्राणी कल्पणाऱ्या, व त्यांचा कोप शांत होऊन त्यांनीं मर्जी आपणांवर सुप्रसन्न करून घेण्यासाठीं त्यांची प्रार्थना करणाऱ्या बाल्यावस्थेंतील मनुष्यजातीचे वेद हे अव्यवस्थित उद्गार होत, ही कल्पना कांहीं बावगी नाहीं. तथापि जडसृष्टीतील चमत्कारांचें इतकें कौतुक व आश्चर्य वाटून, त्याचेठायीं बुद्धिमत्तेची, शक्तिमत्तेची, व मनुष्याला सुखदुःख देण्यास समर्थ असल्याची कल्पना येण्यापूर्वी, व त्यांचें स्तवन करण्यास

लेखकांस योग्य मोबदला देऊन आम्हीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

मनांत स्फूर्ति होऊन तो करतां येऊं लागण्यापूर्वी, बरींच सुधारणा झाली असावी, असें अनुमान करणें आवश्य आहे. इंद्र, चंद्र, वरुण, सूर्य इत्यादिकांस देवता कल्पून "अमक्या देवा, तूं आम्हांस पाऊस दे; तमक्या देवा तूं आमच्या गाईचें संरक्षण कर; अमुक देवा, तूं आमचा राजा आहेस; तूं आमचा पिता आहेस, तूं आमचा पालक आहेस; तूं चोरांस दंड करतोस; तूं मित्रांचें पालन करतोस; तूं लढाईंत मदत करतोस; तूं सज्जनास मरणोत्तर सद्गति देतोस; तूं ओषधींचा स्वामी आहेस; तूं धातूंचा उत्पादक आहेस; तूं मनुष्यास कला ज्ञान देतोस; तुझ्या कृपेनें आमचा व्यवहार व्यवस्थित चालतो"—अशा प्रकारचे स्तव ज्यांनीं केले त्यांना अनेक वस्तूंचे धर्म समजले असावे, व वन्यावस्थेंतून पार पडून राज्यधर्म, व समाज या संस्थांची उत्पत्ति व अभिवृद्धि त्यांत बरींच झाली असावी, असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. वेदरूपदर्पणांत अशा प्रकारच्या प्रथमावस्थेचें उत्कृष्ट प्रतिबिंब आहे, व जो कोणी इतिहासदृष्टीनें त्यांकडे पाहील त्यास तें सहज स्पष्टपणें दिसण्यासारखें आहे. अशा दृष्टीनें ज्यानें रा. ब. शं. पां. पंडितकृत **वेदार्थयत्नाचे** कांहीं अंक पाहिले अशा आमच्या एका शोधक व कलाभिज्ञ मित्रानें केलेलें एक टिपण मेहेरबानी करून आमच्याकडे पाठवून दिलें आहे, त्यावरून वेदकालींही या भरतखंडांत कलांचा किती प्रसार झाला होता हें सहज दिसून येणार आहे. निदान वेद तरी आम्हीं कोणापासून मागून किंवा चोरून आणिले नाहींत, हें आमच्या शत्रूंसही कबूल केले पाहिजे! तसेंच, वेदाहून जुना असा दुसरा ग्रंथ जगांत उपलब्ध नाहीं हेंही अजूनपर्यंत निर्विवाद आहे. तेव्हां वेदांत ज्या कलांचा व कारागिरांचा उल्लेख आहे, त्या कला व ते कारागीर तरी आर्यशाखेंत निर्माण झाले असले पाहिजेत, असें प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे.

वस्तूचें नांव	वे.	य.	पा.	श्लोक.	ऋचा.
पेले	१०४		४		१५
,,	११२		२		५
भांडीं	११४		५		१५
मातीचीं भाडीं	११६		९		१५
सोनें	१६८		५		२२
	४१८		५		२५
सोन्याचे रथ	३०६		१६		२०
होमाच्या पळ्या	३२२		५		२३
चिलखतें	३३		१५		३१
,,	८५०		९		५८
वज्र	३४६		१		३२
,,	६		१		५१
बाणांचे भाते	७२६		६		९२
धनुष्यें	३७२		३		२३ २३
सोन्याच्या खिळा	३७२		४		२३ २३
मोत्यांचे हार	४१६		४		३५
सोन्याचे वज्र	,,		,,		,,
नांगर	८२४		२		५७
वस्त्रें	४६		१५		२३ २३
चुना	२४८		१		२६
,,	२७		२-३		४
घुसळण्याची रवी	५		६		२८
नगारा	२७०		४		२८
घागरी	२७६		५		२८
आंस व चाकें	२८		९		,,
मध	३०४		१४।१५		३०
तांबें (कलश)	३९४		२		३५
हातोडा	४०४		८		३४

मनांत स्फूर्ति होऊन तीं करतां येऊं लागण्यापूर्वी, बरीच सुधारणा झाली असावी, असें अनुमान करणें आवश्य आहे. इंद्र, चंद्र, वरुण, सूर्य इत्यादिकांस देवता कल्पून "अमक्या देवा, तूं आम्हांस पाऊस दे; तमक्या देवा तूं आमच्या गाईचें संरक्षण कर; अमुक देवा, तूं आमचा राजा आहेस; तूं आमचा पिता आहेस, तूं आमचा पालक आहेस; तूं चोरांस दंड करतोस; तूं मित्रांचें पालन करतोस; तूं लढाईंत मदत करतोस; तूं सज्जनास मरणोत्तर सद्गति देतोस; तूं ओषधींचा स्वामी आहेस; तूं धातूंचा उत्पादक आहेस; तूं मनुष्यास कला ज्ञान देतोस; तुझ्या कृपेनें आमचा व्यवहार व्यवस्थित चालतो"—अशा प्रकारचे स्तव ज्यांनीं केले त्यांना अनेक वस्तूंचे धर्म समजले असावे, व वस्त्यावस्थेंतून पार पडून राज्यधर्म, व समाज या संस्थांची उत्पत्ति व अभिवृद्धि त्यांत बरीच झाली असावी, असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. वेदरूपदर्पणांत अशा प्रकारच्या ग्रथमावस्थेचें उत्कृष्ट प्रतिबिंब आहे, व जो कोणी इतिहासदृष्टीनें त्यांकडे पाहील त्यास तें सहज स्पष्टपणें दिसण्यासारखें आहे. अशा दृष्टीनें ज्यानें रा. ब. शं. पां. पंडितकृत **वेदार्थयत्नाचे** कांहीं अंक पाहिले अशा आमच्या एका शोधक व कलाभिज्ञ मित्रानें केलेलें एक टिपण मेहेरबानी करून आमच्याकडे पाठवून दिलें आहे, यावरून वेदकालींही या भरतखंडांत कलांचा किती प्रसार झाला होता हें सहज दिसून येणार आहे. निदान वेद तरी आम्हीं कोणापासून मागून किंवा चोरून आणिले नाहींत, हें आमच्या शत्रूसही कबूल केले पाहिजे ! तसेंच, वेदाहून जुना असा दुसरा ग्रंथ जगांत उपलब्ध नाहीं हेंही अजूनपर्यंत निर्विवाद आहे. तेव्हां वेदांत ज्या कलांचा व कारागिरांचा उल्लेख आहे, त्या कला व ते कारागीर तरी आर्यशाखेंत निर्माण झाले असले पाहिजेत, असें प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे.

वस्तूचें नांव	वे.	य.	पा.	श्लोक.	ऋचा.
पेले	१०४		४		३५
,,	११२		२		५
भांडीं	११४		५		१५
मातीचीं भांडीं	११६		९		१५
सोनें	१६८		५		२२
	४१८		५		३५
सोन्याचे रथ	३०६		१६		३०
होमाच्या पळ्या	३२२		५		३१
चिलखतें	२३		१५		३१
,,	८५०		९		५८
वज्र	३४६		१		३२
,,	६		२		५१
बाणांचे भाते	७२६		६		९२
धनुष्यें	३७२		३		३३
सोन्याच्या खिळा	३७२		४		३३
मोत्यांचे हार	४१६		४		३५
सोन्याचे वज्र	,,		,,		,,
नांगर	८२४		२		५७
वस्त्रें	४६		१५		२३
चुना	२४८		१		२६
,,	२७		२-३		४
घुसळण्याची रवी	५		७		२८
नगारा	२७०		४		२८
घागरी	२७६		५		२८
आंस व चाकें	२८		९		,,
मध	३०४		१४।१५		३०
तांबें (कलश)	३९४		२		३५
हातोडा	४०४		८		३५

वस्तूचें नांव.	वे.	य.	पा.	श्लोक.	ऋचा.
हत्यारें	४५६			१६	३६
भाले, कुऱ्हाडी	३१			५	६३
	५०६			२	३९
चाबूक	४६८			२	३७
लगाम	४७०			३	३७
कोयता	४९८			१२	३८
सुतार	८४			४	५८
आयुधें	८८०			४	६१
घरें आणि वाडे	८९६			१३	६१
शहरें व किल्ले	५२८			७	४७
फासे (शंखाचे)	४३४			३	४१
ध्वज (निशाण)	५४५			९	४१

वर जी यादी दिली आहे तीवरून वेदकालीं आर्यलोकांना सोनें, रुपें, लोखंड वगैरे धातूंचा उपयोग समजला होता; ते नौका करूं लागले होते; गाई, घोडे वगैरे जनावरें माणसाळून त्यांनीं त्यांस आपल्या कामास लाविलें होतें; धनुष्यबाण, खड्ग, रथ वगैरे जिनसा त्यांस करतां येत होत्या; गरीब व श्रीमंत आपल्या मगदुराप्रमाणें लहानमोठीं घरें बांधून रहात होते; यज्ञयागादी क्रिया होऊं लागल्या होत्या; शहरें व किल्ले बांधण्यास आरंभ झाला होता-इत्यादि गोष्टी चांगल्या रीतीनें सिद्ध होतात. तेव्हां सांप्रतकालीं आपल्या देशांत ज्या जुन्या कला दृष्टीस पडत आहेत त्यांचा उगम आर्यशाखेतील लोकांत वेदाच्या पूर्वी झाला असावा, असें अनुमान होतें. म्हणून भारतीय कलांच्या पुराणत्वास कमींत कमी पांच हजार वर्षे झालीं असावीं, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

आतां याचसंबंधानें बाहेरून जो विपुल पुरावा मिळतो,

त्याचा स्वल्प उल्लेख करूं. शके १३० त जन्मलेला ॲप्युलिअस ग्रंथकार ' फ्लारिडा ' नांवाच्या ग्रंथांत असें ह्मणतो कीं, ' हिंदुस्थानांतून युरोपांत हस्तिदंताच्या राशी, मिऱ्याच्या गोण्या, दालचिनीचे गट्टे, आणि सोन्यारुप्याचे ढाग येत असत ' ! पहिल्या शतकांतील ' पेरिप्लुस ' नांवाच्या ग्रंथांत असें ह्मटलें आहे, कीं केप गार्डाफ्यूच्या आसपासचे लोक हिंदुस्थानांतून तांदूळ, तूप, तीळ, साखर, सुटा व विणलेला कापूस, आणि रेशमी कापड आणीत असत. अरबस्थान व तुर्कस्थान यांतील लोक हिंदुस्थानचें केशर, हळद, निळें कापड, शेवरीचा कापूस, मलमल, रेशमीकापड आणि आरबी तऱ्हेचें पेहराव घेऊन जात. इराणांत हिंदुस्थानांतून साग, शिर्श्वी, शिंगें वगैरेचें कोरींव सामान जात असे. बार्बरी संस्थानांतील लोक कराचीशीं व्यापार करीत, आणि तेथून पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांतील उत्तम प्रकारचें सुती कापड, नानाप्रकारचे अंबर स्फटिकादि मौल्यवान् पाषाण, काचेचीं भांडी, व सोन्यारुप्याची ताटें व तबकें नेत. भडोच आणि मच्छलीट्टपण या ठिकाणीं फार मोठा व्यापार चालत असे. कोणी असें म्हणतात कीं मुसलमानांनीं मच्छलीपट्टण येथें चिटाचा कारखाना प्रथम सुरू केला. पण हें म्हणणें बरोबर दिसत नाहीं कारण, पेरिप्लुसमध्येंच असें म्हटलें आहे कीं, ख्रिस्तीशकाच्या पहिल्या शतकांतच मच्छलीपट्टण सुताच्या कारखान्यांत पहिल्या प्रतीचें होऊन बसलें होतें. आणि त्यापूर्वी बरींच वर्षें इराणचें आखात आणि तांबडा समुद्र यांशीं त्याचा

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र,
संगीत समाजादर्श नाटक.
ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपाया.
' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

कापडाचा व्यापार चालत होता, असें दिसतें. तेव्हां जे हिंदू लोक बाहेरच्या पुराव्यावरून सुद्धां ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमारास इतके कलानिपुण होऊन बसले असें सिद्ध होतें, त्या हिंदू लोकांस, मध्यआशियांतून रानटी मुसलमान लोकांच्या ज्या झुंडी हिंदुस्थानांत आल्या त्यांनीं कोणत्या प्रकारचें कलाज्ञान दिलें असेल, हें समजणें अशक्य आहे.

खरोखरींच पाहिलें तर युरोपखंडाशीं हिंदुस्थानचा व्यापार सुरू झाल्यास किती वर्षे झालीं, याचा बरोबर निर्णय करणें फार कठिण आहे. एका जमन शोधकास ट्रॉय येथें एक शिंप्याचें कोरीव लाकूड सांपडलें. विचार करतां तें हिंदुस्थानचें असावें असें त्याचें म्हणणें आहे. म्हणजे ख्रिस्तिशकापूर्वी सुमारें हजार वर्षे आम्ही भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील शहरांशीं व्यापार करूं लागलों होतों, असें सिद्ध होतें. क्याल्डिआ प्रांतातील ऊर येथीस जुन्या देवालयाच्या पडक्या मालमसाल्यांत हिंदुस्थानच्या सागाच्या तुळ्या सांपडल्या आहेत, व त्यासंबंधानें इतकाच मजकूर निघाला आहे कीं, ख्रिस्ती शकाच्यापूर्वी दोन हजार वर्षे हें देऊळ प्रथम बांधलें गेलें त्या वेळेस त्या (तुळ्या) हिंदुस्थानांतून नेल्या असाव्या, किंवा ख्रिस्तीशकापूर्वी सहाव्या शतकांत प्रसिद्ध **नेबुचाड्नेझर** नांवाच्या राजानें त्याचा जो जीर्णोद्धार केला त्याकरितां नेल्या आसाव्या. ख्रिस्तीशकाच्या पूर्वी १८ व्या शतकांत इजिप्त देशांत ज्या घराण्यांतील राजे राज्य करीत होते त्यांच्या थडग्यांत हिंदुस्थानांतील नील, कापूर, व चिंचेच्या पेट्या सांपडतात ! नोहाचे गलबत हिंदुस्थानच्या सागाचें बांधलें असावें, असें आलेग्झांड्रिआच्या एका जुन्या शोधकाचें म्हणणें आहे. बायबलांत सांगितलेले ऊस वगैरे जुने पदार्थ हिंदुस्थानांत व ब्रम्हदेशांत उत्पन्न होणारे आहेत. कोंबडा हा ख्रिस्तीशकाच्या पूर्वी ५०० शें किंवा ६०० वर्षे युरो-

पांत गेला असावा, असें दिसतें. आमचा मोर मीस देशांत ख्रिस्तीशकापूर्वी ४४० वे वर्षी गेल्याबद्दल बेमालूम पुरावा आहे सालोमन नांवाच्या राजानें या भव्य व रमणीय पक्षास ख्रिस्ती-शकाच्या पूर्वी १००० व्या वर्षी यरूशलेम येथें, दाक्षिण हिंदु-स्थानांतून आणविलें असावें, असें वाटतें, कारण 'टोक्की' हें त्याचें तामील भाषेंतलि मूळचें नांव बराच अपभ्रंश होऊन यूरोपांतील निरनिराळ्या देशांत पसरलें आहे, असें मानण्यास पुष्कळ आधार आहे.

पूर्वपश्चिम समुद्रांचें वेष्टण; सह्य, विंध्य, व हिमालय अशा पर्वतांच्या रांगा; कृष्णा, नर्मदा, सिंधू, भागीरथी, व ब्रह्मपुत्रा अशा नद्याचे प्रवाह; वसंतग्रीष्मादि ऋतूंची अस्खलित परंपरा; सर्व प्रकाच्या धातूंचें, पाषाणांचें, व वनस्पतींचें अस्तित्व; प्रचंड अरण्यें; विस्तृत व सपाट मैदानें; शीत, उष्ण, व समशीतोष्ण हवांचे प्रदेश–इत्यादि कारणांनीं कलांच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल अशा या भरतखंडांत त्यांचा आरंभ केव्हां झाला, आणि हिंदुस्थानचा इतर देशांशीं व्यापार किती वर्षें सुरू आहे, याचा निर्णय करणें बऱ्याच अंशीं अशक्य आहे. जितकें मागें जावें तितकें कमीच गेलों असें वाटतें. तात्पर्य भारतीय कलांच्या उत्पत्तीचा कालनिर्णय कल्पनाबाह्य व शोधातीत आहे असें मानून, ज्या साधनांनीं ही आपली वडिलो-पार्जित कमाई आपणांस व इतरांस अत्यंत हितकारक होईल अशांची योजना करावयास लागणें, हेंच आपलें आजमित्तीस मुख्य कर्तव्य आहे, हें ध्यानांत धरणें फार अवश्य आहे. तेंच आपण

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकटेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १९१३

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

केलें नाहीं, तर काळाच्या झपाट्यांतून इतकीं सहस्र वर्षें तगून राहिलेल्या आमच्या कलांचा मागमूस नाहींसा होऊन, आणि अन्नास मोताद होऊं, व अंखेरीस त्यांच्याप्रमाणेंच आमचीही दशा होईल, हें रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेऊन जें करणे असेल तें समंजस व सुशिक्षित लोकांनीं करावें.

हा कलंक कसा जाणार ?

बालविवाहापासून होणाऱ्या अनर्थांत घोडनवऱ्यानें अल्पवयस्क स्वस्त्रीवर केलेल्या जुलमापासून होणाऱ्या दुष्परिणामांचाही समावेश होतो. अशा प्रकारच्या अमानुष कामवासनेपासून स्त्रीला मृत्यु येणें याहून भयंकर असें काय असेल कोण जाणे ! ' मी तुला सहधर्मचारिणी करीन व संसारयात्रा तुझ्या विचारानें चालवीन ' अशी देवब्राह्मणासमक्ष शपथ घेऊन, आपल्या अनावर कामाच्या होमकुंडांत आपल्या सहधर्मचारिणीची आहुती टाकणारे नराधम जरी थोडे असले, तरी आमरण तिला छळील असा एखादा व्याधी तिच्या पाठीस लावून देणारे, किंवा प्राण जाईपर्यंत ज्याच्यापासून तिला अहोरात्र पीडा होईल असें एखादें व्यंग तींत उत्पन्न करणारे, भ्रतापरूपी राक्षस अनेक असतील यांत संशय नाहीं. बंगाल्यांतील हरी मोहन हा या नरपशूंचा एक मासला आहे. वास्तविक पहातां अशा व्यक्तीला पशू म्हणणें हें बरोबर नाहीं;कारण त्या अप्रबुद्ध प्राण्यांतही अशा अघोर क्रूरतेचा अनाचार घडत नाहीं. हा लज्जास्पद प्रकार आम्हां मनुष्यांकरतांच राखून ठेविला आहे. हरी मोहन आपल्या सासूरवाडीस रहात होता; त्याची मिजणयाची खोली त्याच्या बायकोच्या खोलीपासून दूर होती. एके दिवशीं मध्यरात्रीच्या सुमा-

रास आपली पुमोनी मोठमोठ्यानें ओरडत आहे, असें वाटून तिची आई घाबऱ्या घाबऱ्या तिच्या खोलींत धांवत गेली, तों निश्चेष्ट पडलेली पुमोनी आणि भिऊन गेलेले जांवई तिच्या दृष्टीस पडले ! पुमोनाचें आंधरूण रक्तानें भरून गेलें होतें ! 'जांवईबोवा, हा काय प्रकार आहे', असें सासूबाईनीं विचारल्यावरून त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, 'हें असें कसें झालें, हें मला कांहीं ठाऊक नाहीं; पण हिचें आरडणें ऐकून मी आपल्या खोलींतून या खोलींत आलों, आणि पहातों तों हा प्रकार ? हें कसें झालें असेल तें मला ठाऊक नाहीं, पण दहाव्या वर्षानंतर नवऱ्यानें बायकोकडे जाणें हें बेकायदेशीर होत नाहीं, हें मात्र मला ठाऊक आहे ! ' अशी या निंद्य प्रकरणाची हकीकत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. आजपर्यंत आम्हीं त्याविषयीं उल्लेख केला नाहीं, कारण त्यांतील खरा निराळाच प्रकार असेल, असें आम्हांस वाटत होतें. अजूनही खोटा ठरल्यास हरी मोहनाची क्षमा मागण्यास आम्हीं तयार आहों. पण तसें होण्याचें चिन्ह दिसत नाहीं हरी मोहनास देहांत प्रायश्चित्त न मिळालें तरी बरींच वर्षें काळ्या पाण्यास जावें लागणार आहे. ईश्वरकृपेनें हरी मोहनाच्या हातून हें अघोर पातक घडलें नसेल तर त्याच्या व आमच्या तोंडास लागणारा हा काळोख चुकणार आहे. हरी मोहनाच्या वयास तिशी उलटून गेली आहे, व त्याच्या परलोकवासी बायकोला फक्त अकरावें वर्ष लागलें होतें, या गोष्टी वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत !

हीं हृदयभेदक गोष्ट खरी असो किंवा नसो; अशा तोडीच्या

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

गोष्टी या भरतखंडांत कोटें कोठें या बालविवाहामुळें घडत असतील, याविषयीं कोणासही शंका घेतां येणार नाहीं. तेव्हां असल्या गोष्टी कधींही कानां न येतील अशाबद्दल काय उपाय करावे, हा मुख्य प्रश्न आहे. यासंबंधानें कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, बायकोच्या बारा वर्षाच्या आंत तिच्या नवऱ्यानें जरी तिच्याशीं संभोग केला तरी तो असंमत संभोग मानून त्याला शिक्षा करण्याचा अधिकार असावा. सध्याच्या पिनल कोडांत दहा वर्षांपुढें विवाहित स्त्रीशीं नवऱ्यानें केलेल्या संभोगास जबरीचा संभोग मानिलेला नाहीं. त्यामुळें कोर्टापुढें असल खटला आला असतां, अशा प्रकारची अगळिक करणाऱ्या नवऱ्यास जबरीच्या संभोगास ठेवलेली शिक्षा देतां येत नाहीं. फार झालें तर दुखापत करण रास सांगितलेली शिक्षा त्यास देतां येते. पण बायकोस दहावें वर्ष लागण्यापूर्वी जो तिच्याशीं संभोग करून तीस दुखापत करील त्यानें तिच्याशीं जबरीचा संभोग केला, असें होऊन त्याला त्या अपराधास ठेवलेली शिक्षा ठोठावतां येते. तेव्हां दहाच्या ठिकाणीं बारांची पत्ता घातली असतां कांहीं बरें होणार आहे, असें ही सूचना करणारांचें म्हणणें आहे- हा फेरफार करण्यास आमचा कोणत्याही प्रकारचा अडथळा नाहीं, पण त्यापासून म्हणण्यासारखा फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. मुलगा आणि मुलगी यांचें लग्न होण्यापूर्वी किती वय असावें, अशाविषयीं आमच्या कायद्यांत मुळींच निर्बंध नसल्यामुळें, जरी पांच वर्षांच्या विवाहित मुलीकडे आठ वर्षांचा किंवा अडतीस वर्षांचा तिचा नवरा गेला आणि तें त्याचें करणें उघाडीस आलें नाहीं, तर त्यानें तें कर्म केलेंच नाहीं, असें घेऊन चालावें लागतें. किती वर्षांचा कोण मनुष्य आपल्या बायकोकडे केव्हां जातो, हें पहाण्यास कोणत्याही प्रकारचें पोलीस ठेवतां येणार नाहीं, व तें ठेवलें तरी त्याला असले गुन्हे पकडतां येणार नाहींत. खुद्द मुलगी, तिचे आप्त, आणि

तिच्या नवऱ्याचे आप्त व मित्र असला गुन्हा आपणांकडून होई तितकें करून बाहेर न पडूं देण्याविषयीं पराकाष्ठेची काळजी घे असतात. कारण तो उघाडीस आल्यानें सर्वांच्याच तोंडाल काळोख लागण्याचा संभव असतो. पण जेव्हां तो फारच अन वर होतो, व त्यापासून कांहीं भयंकर परिणाम उत्पन्न होतं तेव्हां तो त्यांच्या इच्छेविरुद्ध बाहेर पडतो, आणि सर्वांस खात पहाण्यास लावतो. ज्यानें अशा प्रकारचा केलेला संभोग कोण त्याही कारणामुळें बाहेर पडला, त्या दुखापतींचद्दल शिक्षा हो किंवा जबरीच्या संभोगाचद्दल शिक्षा होणें यांत विशेष अंत अहे, किंवा कमी अधिक बेअब्रू आहे, असें आम्हांस वाट नाहीं समजा कीं, एका मुलींचें बारावें वर्ष फाल्गून वद्य अमा वास्येस संपते, व दुसरीस त्याच दिवशीं तेरावें वर्ष लागतं कायद्याप्रमाणें एकीस 'बारा वर्षांची आणि दुसरीस तेरा वर्षांची असें ह्मटलें पाहिजे समजा कीं दोघींच्याही घोडनवऱ्यांनीं दोघ वर बलात्कार केल्यामुळें एकाच प्रकारचा परिणाम घडून येऊन दोनही खटले कोर्टापुढें आले. अशा स्थितींत वर सुचविलेल फेरफार पीनल कोडांत केला असल्यास पहिलीच्या नवऱ्यास कायद्याप्रमाणें दुखापतीचद्दल व दुसरीच्यास जबरीच्या संभोगा चद्दल येवढाच भेद कायतो होणार आहे. पण या भेदामुळें य दोघा कल्पित राक्षसांच्या निर्दयपणांत, कामांधतेंत, किंवा बे अत्यंत काय अंतर दाखवितां येईल, हें आम्हांस कळत नाहीं पाहिजे त्या वयाच्या मुलींचीं लग्नें करण्याची मोकळीक असण्या पासून घडणारे अनर्थ संभोगाच्या कायद्यांत लहान लहान फेर फार केल्यानें टळण्याचा संभव नाहीं. ज्या उल्लेस हा गुन्हा

प्लॉटस भाड्यानें देणें आहेत-फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर-हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर-सुधारक. पुणें.

रावयाचा असतो ते जबरीचा संभोग आणि दुखापत यांतील
ह पाहून तदनुसार वर्तन करणारे नसतात ! जे अत्यंत निंद्य
वा क्रूर कर्म करण्यास प्रवृत्त होतात ते त्यांना ठेवलेल्या
क्षांतील अंतर पाहण्यास कधींही थांबत नाहींत ! असें कर्म
रतांना ते बेफाम होऊन गेलेले असतात, व त्यांचा मद उतरे-
पर्यंत ते कामातुरपशूप्रमाणें वागत सुटतात. अशांच्या ताब्यांत
ेच्या रूपानें लहान मुली देण्याचा प्रघात जोंपर्यंत चालू
हील तोंपर्यंत सुधारलेल्या लोकांनीं आमच्या तोंडावर थुंक-
यासारखे किंवा त्यांत शेण घालण्यासारखे असले निंद्य प्रकार
डल्याशिवाय रहाणार नाहींत ! आणि विवाहकालाची मर्यादा
र कायद्यानें वाढवून घेण्यास आम्ही तयार नाहीं तींत परक्या
रकारानें हात घालतां कामां नये. शिक्षणानें लोकांचीं मनें
ेकसित होऊन, ती जसजसी वाढत जाईल तसतशीच वाढ
ेली पाहिजे. दहा किंवा बारा वर्षांच्या आत मुलींचीं लग्नें
रूं नयेत, असा कायदा करून घेतला, तरी असले अनर्थ कसे
ाळतां येणार आहेत ? वरातीहून घरीं आल्याबरोबरच आपल्या
ारावर्षांच्या बायकोशीं एखादा घोडा असें कर्म करण्यास कशा-
ून प्रवृत्त होणार नाहीं ? पण इतकें तरी कशाला ? स्त्रिया
तुस्नात झाल्यावर जरी त्यांचे विवाह होऊं लागले तरी ज्याला
असलें कर्म करावयाचें असेल त्याच्या तावडींत कोणी तरी
ुलगी सांपडेलच. तेव्हां यासंबंधानें कायद्याचा कांहीं एक उप-
योग नाहीं, असें या बेकायदेवाल्यांचें म्हणणें आहे.'
न्य त्यांच्या अकलेची, कोटिक्रमाची, स्वातंत्र्याभिमानाची आणि
कर्तृत्वाची ! ! !

———

समजत नाहीं तें हें.

तिशी उलटलेला हरी मोहन अभ्युत्कट विषयवासनेमुळें बेफाम होऊन पूमनीवर चालून गेला, व ज्याप्रमाणें भुकेनें अत्यंत क्षुब्ध झालेला एखादा क्रूर व्याघ्र कोठें तरी निःशंकपणें फिरत असलेल्या किंवा पडून राहिलेल्या शेळीवर उडी घालून आपल्या तीक्ष्ण दंष्ट्रांनीं तिच्या शरीराचें विदारण करतो आणि आपली क्षुधा भागवितो, त्याप्रमाणें हरी मोहननें आपल्या कौमारावस्थ धर्मपत्नीशीं राक्षसी आचार करण्यास सुरवात केली, व त्याच्या दुःसह यातना न सहतां आल्यामुळें तिनें फोडलेला हंबरडा ऐकून तिला सेंडविण्यास निघालेली तिची आई तिच्यापाशीं येऊन पोहोंचण्यापूर्वीच त्यानें आपल्या भडकलेल्या कामकुंडांत तिची आहुती टाकिली, आणि तिच्या जीविताबरोबरच आपल्या लौकिकाची रांगोळी केली–वगैरे प्रकार ऐकून सदय मनुष्याच्या अंतःकरणांत त्या हतभाग्य कुमारिकेविषयीं करुणा उत्पन्न होणें, आणि हरी मोहनासारखे जे अमध्य असतील त्यांस फाडून खावें किंवा हाल हाल करून मारून टाकावें, असें वाटणें हें फार साहाजिक आहे; तसेंच अशा प्रकारचा पुण्य प्रकोप खवळून गेला असतांही, ज्याच्या वृत्तींनील विचारशीलतेचा निखालस लय होऊं शकत नाहीं, अशांनीं अशा प्रकारच्या भयानक गोष्टीचा विचार क्षणभर एकीकडे ठेवून, असे प्रकार पुनः पुनः न घडूं देण्याबद्दल काय करावें याच्या विचारास लागणें हेंही अत्यंत स्वाभाविक आहे; पण जगाची जी खरी स्थाईक सुधारणा होते, ती विपत्तीच्या दर्शनानें उत्पन्न होणाऱ्या

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं. ०५

खेडकरवैद्य ॲन्ड सन्स् शनवार पेठ. पुणें

आकस्मिक हृत्क्षोभानें, किंवा त्या विपत्तीच्या निरसनार्थ
वयाच्या भरांत कांहीं तरी सुचविलेल्या उपायानें होत नसतें.
पाहूं गेंचें निर्मूलन करण्याची प्रवृत्ति होण्यास तो पाहून खेद
वा झाला पाहिजे, व त्या खेदाबरोबर तो घालविण्याचा कांहीं तरी
क्षां उपाय करावा, असे वाटले पाहिजे, या दोन गोष्टी प्रथम झाल्या-
त खेरीज मनुष्याच्या हातून कोणत्याही प्रचंड विपत्तीचें निर्मूलन
पर होणार नाहीं हें खरें आहे. पण येवढ्या दोन गोष्टी झाल्या
च्या झणजे तें निर्मूलन होईलच असेंही खात्रीनें सांगतां येत नाहीं.
हीं आपण ज्या जगांत रहात आहों तें अनेक प्रकारच्या दारुण
या विपत्तींनीं ओतप्रोत भरलें आहे, हें खरें आहे, आणि त्या विपत्तींची
ड संख्या थोडी कमी झाल्याखेरीज आमचा येथील वस्ती सुखावह
र होण्याचा संभव नाहीं, हेंही खरें आहे. पण येवढ्यावरून विपत्ति
ग्र दृष्टीस पडली कीं, ती नाहींशी करण्यासाठीं प्रथमदर्शनीं जो
व उपाय सुचेल तो करीत सुटावें, असें सिद्ध होत नाहीं. कधीं कधीं
ह अशा प्रकारच्या उपायांनीं नफा न होतां उलट नुकसान होतें
रं सगळ्या झाडाला कीड लागून जाऊन तें अगदीं वठून गेलें
ा असलें, व त्याचीं फळें अळ्यांनीं भरून जात असलीं तर
ा त्याच्या वरच्या सालीवर किंवा फळांवर औषधोपचार करून
ा काय फायदा होणार आहे ? क्षारोदकादि ज्या उपायांची योजना
ि करावयाची असेल त्यांचा परिणाम त्यांच्या अंतर्सालीवर किंवा
ं गुळावर झाला, तरच त्यापासून कांहीं फायदा होण्याचा संभव आहे.
ि त्याप्रमाणें हाडापर्यंत जाऊन भिडलेला व्रण त्यांच्या तोंडावर चोपड-
े लेल्या तेलांनीं किंवा मलमाच्या पट्ट्यांनीं बरा होण्याची आशा
ं नाहीं, त्याप्रमाणें समाजाच्या हाडापर्यंत जाऊन खिळलेल्या व
ं शेंकडों वर्षें वहात असलेल्या अमंगलाचाररूप व्रणांचें निराकरण
व भलत्याच प्रकारच्या कायद्यांनीं होण्याचा संभव नाहीं.
क पुमर्नाचें हृदयद्रावक वर्तमान ऐकल्यापासून परमपूज्य रघुनाथ-
ा दादाप्रमाणें आमचें अंतःकरणही कळवत आहे. अमला

भयंकर मृत्यु कोणत्याही आर्यकुमारिकेस इतउत्तर न यावा, असें हिंदूप्रमाणें **सुधारका**सही नाभिमुलापासून वाटत आहे; पण ज्या उपायांनीं आप्राप्तयौवन कन्यकांवर येणारें हें विघ्न टाळतां येईल असे त्या मद्रपूरस्थ सुधारकाग्रणीस किंवा पत्राग्रणीस वाटत आहे, ते उपाय फारसे फलद्रूप होणार नाहींत, अशी **सुधारकास** भीति पडली आहे, हें त्याचें मोठें दुर्दैव होय !

मद्रास येथील विवाहपरिषदेचें (Marriage association) असें म्हणणें आहे कीं, दुर्दैवी वंगकन्येचें हें खेदजनक उदाहरण लोकांच्या डोळ्यापुढें आहे तोंपर्यंत सर्व सुधारणेच्छू सुशिक्षितांनीं व इतर सदय लोकांनीं सरकाराकडे अर्ज करून, 'जो नवरा आपल्या बायकोशीं १४ वर्षांच्या आंत (म्हणजे बायकोस चवदावें वर्ष लागण्यापूर्वी) संभोग करील, त्यानें तिच्याशीं जबरीचा संभोग केला असा आरोप त्याच्यावर ठेवून त्याला जबरीच्या संभोगास सांगितलेली शिक्षा देण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटास येईल, अशा प्रकारचा फेरफार पीनल कोडांत करून द्यावा.' आमच्या मतें असा अर्ज करण्यास फार लोक तयार होणार नाहींत, झाले तरी सरकार तो मान्य करून त्याप्रमाणें पीनल कोडाचें कलम फिरवणार नाहीं, व त्यांनीं तें फिरविलें तरी त्यापासून म्हणण्यासारखा फायदा न होतां, बराच त्रास होईल. कसा तो पहा. या देशांतील मुली बहुधा बारापासून चवदा वर्षांपर्यंत ऋतुमती होतात. त्यापुढें अस्नात रहाणाऱ्या अशा मुली फार आढळणार नाहींत. मुलीं ऋतुमती झाल्या कीं त्यांचें गर्भाधान केलेंच पाहिजे, असा प्रबुद्ध आचार आहे, व शेंकडा नव्याण्णव घरांत त्याचें परिपालन होत आहे.

निबंध संग्रह.

भाग १ ला. कि. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

तिजवराची, बिजवराची, किंवा घोडनवऱ्याची तर गोष्ट राहूं द्या. कारण ' माझी प्रिया पातळ नेसून मला भेटेल केव्हां ' त्यास झालेलें असतें, व ऋतुशांतीचा मुहूर्त, फार तर नाहीं, पण एका आठवड्याच्या लांबणीवर टाकण्याची भीड खुद्द ब्रह्मदेवानें घातली तरी देखील ती मान्य करण्यास तो तयार नसतो ! तेव्हां नेहाण आल्यावर, पण चवदा वर्षांच्या आंत, अशांनीं स्वस्त्रियांशीं केलेला जो संभोग त्यास तुम्ही आपल्या कायद्यांत ' संमत संभोग ' म्हणा, किंवा ' असंमत संभोग ' म्हणा, ते म्हणून त्याचा अनुभव घेतल्याशिवाय रहावयाचे नाहींत ! प्रबुद्धकामवासना, सुखोपभोगाची उत्कंठा, धर्मबंधन, रूढाचार, व लोकमत इत्यादि कारणांनीं असे लोक एकांत प्रियादर्शनाविषयीं मोठे आतुर झालेले असतात ! पण ज्या मुलाची अजून शाळा सुटली नाहीं, ज्याला ' अरे ' वाचून कोणी बोलत नाहीं, ज्याच्या पाठीमागचा मास्तराचा धाक सुटलेला नाहीं, ज्याच्या तोंडावर यौवनारंभाचें कोणतेंही चिन्ह दिसूं लागलें नाहीं, ज्याच्या निद्रेचा विषयचिंतेनें भंग होऊं लागला नाहीं, व ज्याला त्या सुखाची खरी गोडी समजण्याचा संभव नाहीं, अशा लुस्कान पोरास देखील, गर्भधानाचा सुखसोहळा पाहण्याविषयीं कासावीस झालेल्या आया, सास्वा, नणंदा भावजया, जावा, व इतर स्त्रिया जबरीनें मदनपाशांत बद्ध करून टाकतात, हें आपण नित्य पहात असून, चवदा वर्षांच्या आंतील संभोगास जबरीचा संभोग म्हणावें, आणि त्या गुन्ह्यास सांगितलेली शिक्षा म्हाणवलीच्या नवऱ्यास देण्याचा अधिकार-मॉजिस्ट्रेटाला असावा, अशा आशयाचें कलम पीनल कोडांत घालून द्या, अशी सरकारास पदर पसरून प्रार्थना करणारे किती हिंदू निघतील कोण जाणे ! जे असें करण्यास तयार होणारे असतील त्यांनीं सरकाराकडे तरी जाण्याची काय गरज आहे ? त्यांनीं चवदा वर्षांपर्यंत आपल्या मुलींचीं लग्नेंच करू नयेत, किंवा तसें

होणें शक्य नसल्यास तें वर्ष उलटेतोंपर्यंत निदान त्यांना त्यांच्या सासरीं तरी पाठवूं नये. पण तेंहि न घडल्यास त्या अवधीच्या आंत त्या आपल्या नवऱ्याच्या तावडींत न सांपडतील, अशाविषयीं तरी पक्का बंदोबस्त करावा म्हणजे झालें ! पाहिजे त्या वयांत मुलींचीं लग्नें करण्याची चाल ज्या देशांत रूढ आहे, व जेथें ऋतुमती झालेल्या स्त्रीचें गर्भाधान करण्याचा धर्माचार व लोकाचार प्रचलित आहे, अशा देशांत चवदावर्षांच्या आंत नवऱ्यानें ऋतुस्नात स्वस्त्रीशीं केलेल्या संभोगास जबरीचा संभोग म्हणावें, अशी सूचना कोणीं केली असतां, ती ऐकून वरच्या सारखा विनोद करण्याची प्रवृत्ति होणें स्वाभाविक नाहीं काय ? पीनल कोडांत असें कलम घातल्यास तें केवळच ' मृताक्षर ' होऊन बसणार नाहीं, असें जे कित्येक लोक मनातल्या मनांत म्हणत आहेत, ते आमचे ध्यानांत केव्हांच येऊन चुकलें आहे ! ज्या मुली तेराव्या वर्षीं ऋतुमती होऊन चवदाव्या वर्षीं गर्भवती किंवा अपत्यवती होतील त्यांच्या नवऱ्यांवर जबरीच्या संभोगाचे खटले करण्यास त्यांचीं अपत्यें बेमालूम पुरावा होतील, यांत शंका नाहीं ! मात्र अशा प्रकारचे खटले करण्याचें श्रेय पोलिसानें आपल्या शिरावर घेण्यास तयार झालें पाहिजे; कारण, नुकत्याच अपत्यवती झालेल्या किंवा होण्याचीं चिन्हें दिसूं लागलेल्या मुलींच्या किंवा सुनांच्या नवऱ्यांवर जबरीच्या संभोगाच्या फिर्यादी लावणारे मुलींच्या सासरचे किंवा माहेरचे आप्त उत्सुक

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्चर ८१० पौंड.
मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

असतील, असें आह्मांस वाटत नाहीं. तेव्हां तो बोज सर्व प्रकारें लोकांच्या नीतीचें व कायद्यांचें संरक्षण करण्यास नेमिलेल्या पोलिसाच्या डोक्यावर येऊन पडणार आहे, व तो उचलतांना भल्या गृहस्थांची अब्रू घेण्याची किंवा बेकायदेशीरपणें दोन पैसे मिळविण्याची त्यांस चांगली सवड होणार आहे! ही सत्ववती आणि अपत्यवती मुलींची आणि त्यांच्या नवऱ्यांची गोष्ट झाली. यांच्या संबंधानें न छपविण्यासारखा पुरावा पोलिसाच्या हातीं येण्याचा संभव असल्यामुळें, असलीं दंपत्यें कोर्टापुढें खेंचून आणून त्यांपैकीं गुन्हेगारांस शिक्षा ठोठावतां येणार आहे, हें कबूल आहे. पण चवदाव्या वर्षापर्यंत, नहाण आले नसून किंवा नतें आल्यावर, जे कच्चे किंवा पक्के युवे आपापल्या स्त्रियांशीं बिनबोभाट समागम करील असतील त्यांचा समाचार हें पोलिस कसा घेणार? नवरा केवढाही असला तरी नहाण आल्यावर पुमनीसारखा त्याच्या स्त्रीचा परिणाम होण्याचा संभव नाहीं; तो तितक्या विकोपास गेला नाहीं तर तो बाहेर येण्यचाही संभव नाहीं; व तो बाहेर आला नाहीं, ह्मणजे पोलिसाच्या हातून कांहीं एक होणार नाहीं! पूमनीच्या प्रकारासारखा प्रकार उघडीस आला ह्मणजे संताप येणें व कांहीं निर्बंध करावा, असें वाटणें वाजवी आहे. व पण तो करण्यापूर्वी त्याचा उपयोग कितपत होणार आहे, हें शांतपणें पाहिलें पाहिजे. आपलें "फूल नाहीं तर फुलाची पाकळी" या न्यायानें विवाहकाल तर वाढवितां येतच नाहीं, तेव्हां जबरीच्या संभोगाची घालवेळ तितकी दहशत घालून जेवढा फायदा होईल तितक्यांच समाधान मानून घ्यावयाचें असेल तर मग आमचें कांहीं एक ह्मणणें नाहीं. "माझ्या बायकोच्या वयास चवदावें वर्ष लागलें नसून, मी तिच्याकडे जाण्यास निघालों आहे, पण जर करतां माझी वासना मला आयत्या वेळीं अनावर होऊन माझ्या हातून दुखापतीचा प्रकार घडला, व तो

आज कित्येक वर्षें अव्याहत चालत आलेल्या आमच्या स्त्रियांच्या पोषाखांत झणण्यासारखें दोषस्थल नाहीं, व असलें तरी तें काढून टाकण्यासारखें नाहीं, असें जर कोणी समाधानकारक रीतीनें सिद्ध करून देईल तर आम्ही यासंबंधानें जें लिहिणार आहों, तें आनंदानें परत घेऊं. पण तसें न झाल्यास आम्ही ज्या सुधारणा सुचविणार आहों, त्या हळू हळू अमलांत आणण्याचा विचार लोकांनीं अवश्य केला पाहिजे.

प्रथम, स्त्रियांप्रमाणें पुरुषांचा पोषाख कायम राहिलेला नाहीं हें अगोदर लक्षांत आणिलें पाहिजे. उद्योगाच्या, पदवीच्या व राजकर्त्यांच्या सोयीप्रमाणें पुरुषांच्या पेहरावांत फरक झाला आहेत, व होत आहेत. आंगरखा आमचा नव्हे; मुसलमानांचा आहे, हें उघड आहे. तसेंच रामायणांतील किंवा महाभारतांतील योद्धे तुमान घालीत होते किंवा नाहीं, याची शंका आहे ! स्मृतिस्मृतिकालांत किंवा पुराणकालांत निरनिराळ्या वर्गांतील स्त्री-पुरुषें कोणत्या प्रकारचीं वस्त्रें परिधान करीत होतीं व कोणत्या प्रकारच्या भूषणांनीं आपलीं शरीरें नटवीत होत हें जर कोणी पुराणविद्याविद साधार दाखवून देतील, तर त्यांना एक मोठी उपयुक्त सामग्री बजावली असें खचित होणार आहे पण जोंपर्यंत तशा प्रकारचा लेखक पुढे आला नाहीं तोंपर्यंत बहुतेक भरंवसा अनुमानांवरच ठेवणें भाग आहे; व हीं अनुमानें बहुश. खोटीं ठरण्याचा संभव नाहीं. कारण आमचा नाइलाज झाल्याखेरीज कोणत्याही गोष्टींत आपण होऊन फेरबदल करणारे आम्ही लोक नाहींत. हिंदुस्थानच्या सभोंवतीं उल्लंघन न कर-

---

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंच्या शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं. ८५

खेडकरवैद्य ॲन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

आज कित्येक वर्षें अव्याहत चालत आलेल्या आमच्या स्त्रियांच्या पोषाखांत ह्मणण्यासारखें दोषस्थल नाहीं, व असलें तरी तें काढून टाकण्यासारखें नाहीं, असें जर कोणी समाधानकारक रीतीनें सिद्ध करून देईल तर आम्ही यासंबंधानें जें लिहिणार आहों, तें आनंदानें परत घेऊं. पण तसें न झाल्यास आम्ही ज्या सुधारणा सुचविणार आहों, त्या हळू हळू अमलांत आणण्याचा विचार लोकांनीं अवश्य केला पाहिजे.

प्रथम, स्त्रियांप्रमाणें पुरुषांचा पोषाख कायम राहिलेला नाहीं हें अगोदर लक्षांत आणिलें पाहिजे. उद्योगाच्या, पदवीच्या व राजकर्त्यांच्या सोयीप्रमाणें पुरुषांच्या पेहरावांत फरक झाला आहेत, व होत आहेत. आंगरखा आमचा नव्हे; मुसलमानांचा आहे, हें उघड आहे. तसेंच रामायणांतील किंवा महाभारतांतील योद्धे तुमान घालीत होते किंवा नाहीं, याची शंका आहे ! स्मृतिस्मृतिकालांत किंवा पुराणकालांत निरनिराळ्या वर्गांतील स्त्री-पुरुषें कोणत्या प्रकारचीं वस्त्रें परिधान करीत होतीं व कोणत्या प्रकारच्या भूषणांनीं आपलीं शरीरें नटवीत होतीं हें जर कोणी पुराणविद्याविद साधार दाखवून देतील, तर त्यांना एक मोठी उपयुक्त ज्ञानगिरी बजावली असें खचित होणार आहे पण जोंपर्यंत तशा प्रकारचा लेखक पुढें आला नाहीं तोंपर्यंत बहुतेक भरंवसा अनुमानांवरच ठेवणें भाग आहे; व हीं अनुमानें बहुश खोटीं ठरण्याचा संभव नाहीं. कारण आमचा नाइलाज झाल्याखेरीज कोणत्याही गोष्टींत आपण होऊन फेरबदल करणारे आम्ही लोक नाहींत. हिंदुस्थानच्या सभोवतीं उल्लंघन न कर-

---

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातुंच शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं. ०५

खेडकरवैद्य ॲन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

ण्यासारखा खंदक किंवा भिंती असत्या, आणि दुसऱ्या कोणत्याही लोकांचा आणि आमचा संबंध न घडता, तर वेदकालापासून आतांपर्यंत, व आतांपासून कालांतापर्यंत आम्ही जसेच्या तसेंच असतों,यांत काडी येवढा संशय नाहीं. कारण,विचारशक्ति असून विचारशक्ति नसलेल्या व केवळ उपजत बुद्धीच्या धोरानें आचरण करणाऱ्या मनुष्येतर प्राण्यांप्रमाणें आमची वृत्ति आहे. आमच्या वस्त्रप्रावरणांत किंवा आचारविचारांत मधून मधून जे कांहीं फरक झाले आहेत, ते दुसऱ्या लोकांचें आमच्याशीं संबंध झाल्यामुळें झाले आहेत; व सध्यां जे होत आहेत तेही त्याच कारणामुळें होत आहेत. आम्ही म्हणजे अमुक एक गोष्ट चांगली नाहीं, असें आपण होऊन ठरवून ती रद्द केली आहे, आणि तिच्या जागीं दुसरी कोणती तरी करूं लागलों आहों, असें सहसा आढळणार नाहीं; असो.

स्त्रियांच्या पेहरावाचा विचार करतांना उपयुक्तता आणि दर्शनता हे दोन गुण डोळ्यांपुढें ठेविले पाहिजेत. तसें न केलें तर त्यावरील टांकेंत अनेक प्रमाद होणार आहेत. उपयुक्ततेच्या दृष्टीनें पहातां निरनिराळ्या धंद्यांतील स्त्रियांचे पोषाख निरनिराळ्या तऱ्हांचे पाहिजे आहेत, हें उघड आहे. पण ही गोष्ट आजपर्यंत कोणाच्याही लक्षांत आली नाहीं, असें वाटतें. भंगीण, सुतारीण, कासारीण, परटीण, शेतकरीण, स्वयंपाकीण, दळपीण, कांडपीण, गौळण, कुंभारीण, भटीण,–सारांश, इणप्रत्ययां पाहिजे ती धंदेवालीण घ्या, 'लुगडेंचोळी' हा साऱ्यांचा, साऱ्या ऋतूंतला, व सार्वकालिक पोषाख ! यांत कोणी कोणी अल्पस्वल्प फेरफार करतात, पण त्यास फेरफार म्हणावें की काय, हें आम्हांस समजत नाहीं. कित्येक प्रांतांतील खालच्या प्रतीच्या बायका चोळ्या मुळींच घालीत नाहींत, हा एक फेरफार [illegible] कित्येक प्रांतांतील कुणब्यांच्या बायका

कासोटा मुळींच घालीत नाहींत, हा दुसरा एक फेरफार आहे ! पण या किंवा अशा प्रकारच्या इतर फेरफारांस फेरफार म्हणणें म्हणजे मिठांत तिखट व तिखटांत मीठ घातल्यानें नक्की तोंडीं लावणें झालें, असें म्हणण्यासारखें होय ! पोषाख असा असावा कीं, जो घातला असतां कोणतेंही काम करतां हस्तपादादि अवयवांचे चलनादिव्यापार सहज होऊन, श्वास कोणत्याही प्रकारचे कष्ट होऊं नयेत, किंवा त्यांत बैरूनही दिसूं नये. जो पोषाख क्षणोक्षणीं सावरला नाहीं, तर ज्या सून हातीं घेतलेल्या कामास वारंवार हरकत होणार किं शरार उघडें पडणार, असा पोषाख काय कामाचा ? स्त्रीची मान आणि कंचर यांमधील मागला पुढला भाग नीटपणें झांकला जाऊन, कोपरापासून त्यांचे दोनही हात पाहिजे तें काम करण्यास हवे तिकडे फिरवितां येण्यासारखें असावें, या गोष्टीस बहुधा कोणीही 'ना' म्हणणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. जर खरें असेल तर आम्ही आपल्या वाचकांस व इतरांस त्यांच्या गळ्याची शपथ घालून असें विचारतों कीं, हात सदरा हात खणाची चोळी आणि डाव्या खांद्यावरून उजव्या खांद्यावर अथवा उजव्या खांद्यावरून डाव्या खांद्यावर घेतलेल्या पदर हें काम होण्यासारखें आहे काय ? आपल्या वाचकांचा पदर सांवरण्यांत किती वेळ जातो, व तो वरचेवर अंगावरून सरत असल्यामुळें त्यांना किती त्रास पडतो, हें ज्यांच्या पाहण्यांत आलें असेल, त्याच्यानें वरील प्रश्नास 'हो' म्हणवणार नाहीं, असा आमचा समज आहे. ही, चोळीलुगडें वापरण्याचा ज्यांना अधिकार आहे, अशा सभर्तृकांची गोष्ट झाली. पण

निबंध संग्रह.
भाग १ ला. किं. १। रु.
मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

आमच्या गतभर्तृकांची स्थिति याहूनही विशेष शोचनीय आहे. त्यांच्या पदराला चोळीचें सुद्धां पाठबळ नाहीं ! त्यानें दगा दिला कीं, त्या उघड्या पडल्याच ! शिवाय, गतभर्तृकांच्या पदरास त्यांचें ढोकें झांकून ठेवण्याचें आणखी एक फाजील काम असतें ! यासंबंधानें या हतभाग्य स्त्रिया एकसारख्या कांचणी असतात, असें म्हटलें तरी चालेल. आपल्या अंगाचा लज्जे तो भाग उघडा पडला तरी हरकत नाहीं, पण आपलें ढोकें उघडे पडतां कामा नये, कारण तें उघडें पडलें असतां आपल्या छलेढ्यांचा निर्दयपणा व आपल्या धर्माचा अधर्मीपणा उघडा पडेल, अशी भीति त्यांच्या मनांत सर्वकाळ वागत असते. यामुळें अडचणीच्या वेळीं अशा स्त्रियांच्या पाठी दिसतात, पण ढोकीं कधींही दिसत नाहींत. यासंबंधानें परवां आम्ही एका मित्राशीं बोलत असतां, त्याचें असें म्हणणें पडलें कीं, गतभर्तृकांच्या केशकलापावर न्हाव्यांचा लोखंडी फणी चालू न देण्याचें सामर्थ्य आम्हांस येईल तेव्हां येवो, पण तें येईतोपर्यंत त्यांचीं ढोकीं चोळ्या घालू देण्याचा प्रघात जरी पडला तरी देखील बरीच पुष्कळ दैना चुकणार आहे.

आतां कोणी असें सुचवील कीं, लुगड्याचा पदर उरःस्थलावर मोकळा सोडूं दिल्यानें त्यास ज्या सुरकुत्या पडतात, त्यामुळें युरोपीअन स्त्रियांच्या वक्षःस्थलांप्रमाणें आमच्या स्त्रियांचीं वक्षःस्थलें उठून दिसत नाहींत, आणि हा या ढिल्या पदरापासून होणारा एक मोठा फायदा आहे; तसेंच, ज्या वेळेस स्त्रियांना आपले दोनही हात विशेष रीतीनें अव्याहत ठेवण्याची गरज असते, त्या वेळेस त्या आपले पदर एका खांद्यावरून मागें नेऊन दुसऱ्या हातांखालून पुढें आणितात, आणि डाव्या बाजूस त्यांचें शेवट घट्ट खोंचून ठेवतात, यावर आमचें असें म्हणणें कारणानें स्त्रियांचीं वक्षःस्थलें उठून

दिसणें हा आमच्यांत मर्यादेचा गौण प्रकार मानिला असता तर कांडतांना, न्हाऊं घालतांना, मोठमोठ्या मेजवान्यांत वाढतांना, किंवा अशाच प्रकारच्या इतर प्रसंगीं आमच्या स्त्रियांची जी नीटनेटकी व ठाकठिक आकृति दिसते, तीं आम्हांस कधींच रुचली नसती ! तसेंच, मोठमोठ्या भारतीय कवींनीं आर्यमहिलांच्या उरोजाविस्तारांचीं केलेलीं असंख्य वर्णनें आम्हीं मिटक्या मारीत कधींच वाचलीं नसतीं ! तेव्हां या बाबतींत युरोपिअन लोकांत व आम्हांत रुच्यंतर नाहीं, हें उघड आहे. तथापि, स्त्रियांचे हे भाग अस्पष्ट असणें हेंच उत्कृष्ट शिष्टसंप्रदायास उचित आहे, असें मानिलें, तरी पदराच्या सुरकुत्यांचें घसरतें 'हाफजाकिट' बनाविण्यापेक्षां, चोळी न घालतां किंवा घरच्या घरीं तयार केलेलें प्रत्यक्ष हाफजाकिटीं घालण्यास काय हरकत आहे ? ही हाफजाकिटें दोन प्रकारचीं असावीं, एक काम करतांना घालण्याचीं; व दुसरीं बाहेर जातांना घालण्याचीं. बाहेर जातांना घालावयाच्या जाकिटांच्या अस्तन्या बऱ्याच लांब असाव्या, आणि त्यांचा रंग बहुधा लुगड्यांच्या रंगासारखा असून, त्यांचीं शेवटें लुगड्यावर पडावीं. पण यासंबंधानें कदाचित् मतभेद होण्याचा संभव आहे ! जाकिटें घालण्याचा प्रघात पडल्यावर, पदर काढण्याची मुळींच गरज पडणार नाहीं, व त्यामानानें लुगड्यांची लांबी कमी केली तरी हरकत नाहीं. लुगड्यांच्या पदरांवरील नक्शांचें काम कमरेसभोंवतीं खुलेल अशा रीतीनें दाखवितां येणार आहे. खोटा देशाभिमान एकीकडे ठेऊन चोळीपदराच्या जागीं, किंवा चोळीच्या वरतीं ही जाकिट घालण्याची पद्धत पाडिली असतां

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.
प्रो. जी. सी. भांडे एम्. ए. कृत. किं. ८८
सुधारक ऑफीस, पुणें.

अनेक फायदे होणार आहेत. पदर सांवरण्याचें काम वारंवार हातांनीं न करावें लागल्यामुळें, ते मोकळे राहून स्त्रियांच्या अंगीं कार्यक्षमता अधिक येईल; कमरेवरील त्यांचा कोणताही भाग उघडा पडण्याची भीति रहाणार नाहीं; थंडीच्या दिवसांत चौघडीचें अवजड पांघरूण घेण्यापेक्षां, फलाणीची बंडी घातल्यानें पाठीच्या व पोटाच्या हाडांतील उब सहज राखतां येणार आहे. लुगड्याच्या पदरापेक्षां जाकिटावर हरतऱ्हेच्या नक्शीचें काम करून तें सुलभ रीतीनें दाखवितां येणार आहे. पण या सर्वांहून मोठा फायदा हा आहे कीं, बायकांच्या गळ्यांतले एकूनएक दागिने पटवेकऱ्यांच्या कसबासकट मागेपुढें सर्वांस दाखवितां येऊन, दुसऱ्यांनीं आपणांस श्रीमंत म्हणावें, आणि आपलें स्वरूप खुलून दिसावें, हा जो दागिने घालण्याचा मुख्य उद्देश तो पूर्णपणें सफल होईल! सध्यांच्या पद्धतीमुळें आमच्या बायकांच्या गळ्यांतील दागिन्यांचा जेवढा भाग उजवा खांदा आणि मान यांच्या दरम्यान दिसतो, तेवढ्यांतच आम्हांस आपलें समाधान करून घ्यावें लागतें! पण यापुढें जाकिटें घालण्याचा प्रचार पडल्यास, टिका, तुशा, सरी, पुनढ्यांच्या माळा, कंठा, तन्मणी, पेट्या, चंद्रहार वगैरे अलंकारांनीं आमच्या प्रियकरणींचीं वक्षःस्थलें मंडित होऊन, आतांपेक्षां डोंकडोंपट आल्हादजनक होतील, यांत काय संशय आहे? तसेंच खुद्द जाकिटेंही तापट्याचीं, मखमालीचीं, किंवा अशाच एखाद्या उंची कपड्याचीं करून, त्यांच्या अस्तन्यांवर व पुढील भागावर जरीच्या किंवा रेशमाच्या वेलबुट्टींचें कारागिरीचें काम केलें तर त्यानें दागिन्यांची शोभा दुणावेल, किंवा त्यांच्या अभावीं तेंच काम अत्यंत शोभादायक होईल! बोलून चालून नटण्याचें काम सर्व लोकांनीं स्त्रियांकडे सोंपविलें आहे. तेव्हां जोंपर्यंत हें त्यांना व आम्हांस संमत असेल तोंपर्यंत त्यांचें लावण्य जितक्या थोड्या

खचीत त्यांना जितकें अधिक सुखावह व आमच्या दृष्टीस जितकें अधिक रमणीय होईल, तितकें करणें हेंच आमच्या प्रबुद्धत्वास उचित आहे. यावरून असें कोणीं समजूं नये कीं, मडमांचा पोषाख आम्हांस मान्य आहे, व त्याचें अनुकरण, आमच्या स्त्रियांनीं करावें, असें आम्ही सुचवीत आहों. मडमांच्या पेहरावाचा बराच भाग, विशेषतः त्यांचा झगा आम्हांस बिलकुल पसंत नाहीं. तथापि त्यासंबंधानें व आमच्या स्त्रियांच्या पोषाखाच्या इतर भागांच्या संबंधानें आजच लिहिण्याचे प्रयोजन नाहीं.

आमच्या स्त्रियांचा पेहराव.

नंबर २

मागल्या लेखांत आमच्या स्त्रियांच्या पदराविषयीं चर्चा करून तो आम्ही नापसंत ठरविला आहे, व त्याचे जागीं जाळींघालण्याचा प्रघात पडेल तर फार बरें होईल, अशी इच्छा प्रदर्शित केली आहे, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. आतां कंचरमच्या स्त्रियांच्या पोषाखाच्या इतर भागांविषयीं विचार करूंतही सवड असल्यास दागिन्यांचाही थोडा विचार करावयाचा, असा इरादा आहे.

पदर लुगड्याचा काढतात; तेव्हां पदरानंतर स्वाभाविकपणें

संगीत सुविचार-विजय नाटक.
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत
किं. ०८
सुधारक ऑफीस, पुणें.

लुगड्याचा विचार करणें जरूर आहे. हें आमचें लुगडें आह्मांस पूर्ण संमत आहे. याच्या जागीं लहंगा, परकर, झगा किंवा दुसरें कोणतेंही अधोवस्त्र वापरण्याचा प्रघात पडावा, असें आह्मांस वाटत नाहीं. हें आमचें लुगडें दिसण्यास व शोभेस जितकें चांगलें असावें तितकें आहे. शिवाय, त्यापासून दुसरा असा एक फायदा आहे कीं, हें नेसण्यास मुळींच पंचाईत पडत नाहीं. एक लुगडें सोडून दुसरें लुगडें नेसणें हीं गोष्ट आमच्या स्त्रियांस शरीराचा कोणताही भाग उघडा पडूं न देतां पाहिजे तेथें करतां येण्यासारखी आहे. झग्याची व इतर अधोवस्त्रांची तशी गोष्ट नाहीं. तसलीं वस्त्रें वापरण्यास स्त्रियांना एकांतस्थलीं जावें लागतें. झगे वापरणाऱ्या स्त्रियांस आमच्या स्त्रियांप्रमाणें नदीच्या काठीं, स्नानमंडपांत, किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं स्त्रीपुरुषांच्या समक्ष वस्त्रांतर करतां येत नाहीं. कोणताही पोषाख असो असावा कीं, तो वापरणाराच्या ताब्यांत असावा; वापरणाराला त्याचें गुलामपण काढण्यास न लागावें. या दृष्टीनें युरोपीयन स्त्रियांच्या झग्याहून गैरसोईचें वस्त्र शोधून काढूं म्हणण्याचें सुद्धां कारण नाहीं. आमच्या कलावंतिणींचे झगे किंवा घागरे, युरोपीय स्त्रियांच्या झग्यांस फार्जाल कापड लागून, हिंडण्यांचे लहंगे याच धर्तीचे आहेत; पण ते त्यांपेक्षां पुष्कळ प्रियकर आल्हाद फिरण्यास त्यांना मोठा त्रास पडतो. थोडेसें झपाट्यानें चालावयाचें झटलें, किंवा ज्या जमिनीवरून चालावयाचें ती साफ नसली कीं, हे झगे एका हातानें किंवा दोन हातांनीं वर सांवरून धरावे लागतात ! जों जों श्रीमंती अधिक तों तों या झग्यांचा विस्तार मोठा ! साऱ्या मडमा आपापले झगे वर उचलून न धरतां जमिनीवर पडूं देतील, तर घरांत व रस्त्यांवर केरसुण्यांचें काम फारसें पडणार नाहीं. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील बहुतेक खेड्यांतल्या भंग्यांचें काम कुत्रीं करतात, त्या-

प्रमाणें यूरोप खंडांतल्या झाडूंचें काम या झग्यांच्या फरपट्ण्यानें होऊं लागेल ! शिवाय, एक झगेवाली स्त्री यथास्थितपणें बसावयाची झणजे तिला किती तरी जागा लागते ! पुरुष हा उद्धट प्राणी आहे, तेव्हां त्याला होईल तितक्या दूर अंतरावर ठेवावें, अशा बुद्धीनें तर पाश्चिमात्य स्त्रियांनीं या लहानशा कापडी कोटांत आपणांस कोंडून घेण्याचा प्रघात पाडला नसेलना ? एकंदरींत स्त्रियांनीं इतकी जागा आडवावी, हें आम्हांस बरें दिसत नाहीं. परंतु युरोपीअन लोक आह्मांहून स्त्रियांस विशेष मान देणारे व भजणारे आहेत; तेव्हां कदाचित् त्यांनीं जाणूनबुजून त्यांचा या कामांत वरचष्मा होऊं दिला असेल ! किंवा आंहेरून दिसण्यांत " आम्ही तुम्हांस अधिक जागा व्यापूं देतों, म्हणून स्वतःपेक्षां आमचें तुम्हांवर विशेष प्रेम आहे, " असें त्यांस आमिष दाखवून सर्वकाळ त्या आपल्या ताब्यांत राहण्यासाठीं त्यांनीं ही त्यांच स्वातंत्र्य हरण करण्याची तर युक्ति काढली नसेलना ? आम्ही असें ऐकतों कीं, या झग्यांचा त्रास त्यांच्या विस्तारानेंच संपत नाहीं. त्यांच्या आंत चोळण्यासारखें किंवा चड्डीसारखें दुसरें एक वस्त्र वापरण्याची सभ्य स्त्रियांची चाल आहे. असें असेल तर मग फारच त्रास ! अशा स्त्रियांना वस्त्रांतर करतांना केवढा अट्टाहास करावा लागत असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी. आणि येवढें कशासाठीं, तर कंचर बारीक दिसावा म्हणून ! आमच्याप्रमाणें युरोपीयन लोकांतही सिंहकटीचें मोठें महत्व आहे. पण आम्ही ती दाखविण्यासाठीं विशेष खटपट करीत नाहीं. युरोपीयन लोकांत जी जात्या मृदं-

---

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टं. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

गकटी असेल तिला देखील सिंहकटी दाखविण्याचे अनेक उपाय काढले आहेत, असें म्हणतात ! कमरेखालीं झगे फुगविण्यासाठी व कमरेचा परिघ जेवढा लहान होईल तेवढा करण्यासाठीं, कमरे-भोंवतीं कित्येक स्त्रिया लोखंडाचा पट्टा करकचून आंवळतात, असें सांगतात ! हें खरें असेल तर लोहबंधनामुळें कोठा आणि कूस यांच्यावर दाब पडून, अन्नपचन होण्यास व गर्भाचें संवर्धन होण्यास अडथळा होत असेल, व सुइणीच्या मदतीशिवाय प्रसूत होणें फार कठिण पडत असेल. खेरीज नेहमीं नेहमीं कंबर फारच आंवळली तर कुबड निघण्याचा संभव असतो, हें एक निराळेंच अरिष्ट ! तसेंच या झगेदार बायकांस पुरुषांप्रमाणें किंवा आमच्या स्त्रियांप्रमाणें दोहींकडे दोन पाय सोडून घोड्या-वर बसतां येणें बहुतेक अशक्य असल्यामुळें, एकाच बाजूस दोनही पाय सोडून बसण्यासारखीं खोगरें तयार करणें त्या लो-कांस भाग पडलें ! या खोगरांस साइड सॅडल्स असें म्हणतात. या खोगरावर बसण्यास शिकणें म्हणजे एका प्रकारची चिकट कसरत करण्यास शिकण्यासारखेंच आहे ! या प्रकारच्या आरो-हणापासून घोडा व बसणाराण या उभयतांसही मोठा त्रास पडत असेल असा आमचा तर्क आहे. खरें काय असेल तें त्या मनु-ष्यांच्या व घोड्यांच्या जीवाला ठाऊक ! एकंदरींत, हा झगा आमच्या स्त्रियांच्या चिलकुल कामाचा नाहीं, असें आम्हांस वाटतें. तसेंच, युरोपीअन स्त्रियांत जाकिटें घालण्याची चाल जरी रूढ आहे, तरी विशेष थाटाच्या प्रसंगीं त्या ज्या प्रकारचीं जा-किटें वापरतात तींही आम्हांस नको आहेत. ऐन थंडीच्या दिव-सांत रात्रीच्या प्रसंगीं उरःस्थलाचा बराच भाग व खांद्यावरचा हातांचा बराच भाग अनावृत ठेवण्यांत काय सुख किंवा मौज आहे, हें आम्हांस समजत नाहीं. या प्रकारामुळें थंडीच्या दिव-सांत तिकडील स्त्रियांस मोठे क्लेश होतात, व कधींकधीं त्यांना

त्यापासून शीतविकार जडतात, असें आम्ही ऐकतों. असें असून शेंकडों शतकें हा प्रघात तिकडे रूढ असेल तर " बलवान् लोकाचारा, तुला साष्टांग नमस्कार असो, " याशिवाय दुसरें काय म्हणावें ? तात्पर्य, युरोपखंडांतील लोकांनीं आपल्या स्त्रियांच्या पाठीमागें जो पोषाख लाविला आहे, त्यांत त्यांनीं त्यांच्या सुखाकडे किंवा सोईकडे न पहातां, त्या आपल्या नजरेस खूप मौजेच्या कशा दिसतील येवढयाच गोष्टीचा विचार केला असावा असें दिसतें. नाहींतर इतका बोजड किंवा अवजड पेहराव ते कधींही मान्य न करते. सामान्यपणें आम्हीं आपल्या पाषाणाच्या देव्यांस ज्याप्रमाणें सजवितों, त्याप्रमाणें ते आपल्या स्त्रियांस सजवितात, असें वाटतें. गंगा, लक्ष्मी, अंबिका वगैरे देवतांच्या मुर्तींचे पोषाख बांधावयाचे आहेत असें आम्ही म्हणतों, व ते बांधण्यांत पदराचा झोळ, नि-यांची गर्दी, चापचोपी वगैरे गोष्टींकडे आम्ही जितकें लक्ष देतों, तितक्या या चालत्याबोलत्या मडमा आपल्या पेहरावाकडे देत असाव्या, आणि तसें करणें त्यांच्या पुरुषांच्या आग्रहामुळें त्यांस भाग पडत असावें, असें आमचें अनुमान आहे

युरोपीअन स्त्रियांच्या पोषाखावर वास्तविक पहातां येथें इतकी टीका करीत बसण्याची गरज नव्हती. पण अलीकडे " आपलें तें सारें चांगलें " असें प्रतिपादणाऱ्या कित्येक आम्रही व अविचारी लोकांनीं सत्यास पराङ्मुख होऊन, " सुधारकमंडळीस जेवढें भारतीय तेवढें ओंगळ वाटतें, व जेवढें पाश्चात्य

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र,

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपया

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

सेवढें अनुकरणीय वाटतें " असा जो पुकारा रात्रंदिवस चालः विला आहे तो किती मिथ्या आहे, हें अनेक उदाहरणांपैकीं एका उदाहरणानें वाचकांच्या नजरेस आणण्यासाठीं आह्मीं हें यत्किंचित् विषयांतर करण्यास प्रवृत्त झालों. बाकी युरोपियन लोकांवर या टीकेचा कांहीं एक परिणाम होण्याचा संभव नाहीं हें आम्हीं पक्कें जाणून आहों. कारण, ज्या लोकांस जो पोषाख मानवलेला असतो, व ज्याच्याशीं त्यांच्या सुरेखपणाच्या कल्पना खिळून गेलेल्या असतात, ते दुसऱ्या लोकांच्या टीकांनीं त्यांत फेरबदल करण्यास कधींही राजी होत नाहींत. शिवाय, त्यांच्या पोषाखांत ज्या गैरसोई आहेत त्या त्यांच्यापैकींच कांहींच्या नजरेस येऊं लागल्या आहेत, व त्या आपल्या लोकांच्या नजरेस आणण्यास तिकडील टीकाकार हवेतितके खबरदार आहेत ! त्यांना आमच्या मदतीची बिलकुल गरज नाहीं. तथापि येथें येवढें झटल्यावांचून रहावत नाहीं कीं युरोपिअन स्त्रिया आपला झगा टाकून देऊन आमच्या स्त्रियांच्या लुगड्यासारखें एखादें वस्त्र वापरूं लागतील, तर त्यांचा पोषाख कमी खर्चाचा आणि कमी त्रासाचा होईल इतकेंच नाहीं, तर सौंदर्य व सुख या कल्पनांत साऱ्या मनुष्यनेस पसंत पडेल असा कांहीं भाग असेल तर त्याकडे त्यांची थोड्याबहुत प्रमाणानें प्रवृत्ति झाली असें होऊन, इतर खंडांतील लोकांच्या, व कदाचित् युरोपखंडांतील लोकांच्याही दृष्टीस त्या आतांहून रमणीय वाटूं लागण्याचा संभव आहे.

येथपर्यंत आमच्या स्त्रियांच्या चोळीलुगड्याचा विचार झाला; आणि हाच मुख्य महत्वाचा होता. आतां थोडावेळ त्यांच्या डोक्याकडे आणि पायांकडे पाहूं ह्मणजे झालें. आमच्या साहेब लोकांच्या मदमाप्रमाणें आमच्या बायकांच्या डोक्यांवर शिस्तरी टोप्या चढविण्याची कांहींएक गजर नाहीं. तथापि उन्हांत, पावसांत, किंवा वाऱ्यांत जातांना त्यांच्या डोक्यांस

कांहींतरी शिरस्त्राण घालण्याची चाल पडेल तर बरें होणार आहे. सध्यां पदराशिवाय दुसरें कांहींही असत नाहीं. फारच झालें तर पदरावर शालजोडी किंवा शेला घेण्यांत येतो. पण या सर्वांचें पर्यवसान हात आडवून ठेवणें आणि सर्व शरीर एखाद्या उंच कापडाच्या पोत्यांत गुंडाळण्यासारखें करणें-अशा-वर होतें. हें कांहीं प्रशस्त नाहीं. बुरखा घेण्याचे दिवस गेले. ऊन व पाऊस यांपासून संरक्षण करण्याचा जो सामान्य उपाय तो आह्मीं स्त्रियांस करूं देत नाहीं, ही मोठ्या शरमेची गोष्ट होय. आम्ही धट्टयाकट्टया पुरुषांनीं काश्मिरी चोगे घालावे, बूट-स्टॉकिंग्स चढवावे, कानास रुमाल गुंडाळावे किंवा पागोट्यावरून कानपट्टया बांधाव्या, सकलादीच्या टोप्या घ्याव्या, आणि चा सर्वांच्यावर छत्र धरावें, आणि त्या बिचाऱ्या अबलांनीं भरपाव-सांत एखाद्या चौघडीनिशीं किंवा शालजोडीनिशीं, अथवा नुसत्या पदरावरच रस्त्यानें अनवाणी भिजत जावें, ही आह्मांस मर्यादेची अमानुष कल्पना वाटते उन्हांत व पावसांत स्त्रियांनीं छत्री वापरण्यास आह्मांस बिलकुल हरकत दिसत नाहीं. तसेंच त्यांस घरांतील स्वच्छ जमिनीशिवाय दुसऱ्या कोठेंही चालण्याची संवय नसल्यामुळें, उन्हानें तापलेल्या किंवा पाण्यानें आणि थंडीनें गारठलेल्या जमिनीवरून चालतांना त्यांना पराकाष्ठेचे क्लेश होऊन, कधीं कधीं उष्णाचे आणि थंडीचे विकार होतात. हे टाळण्यासाठीं सर्व स्त्रियांनीं घराबाहेर पडतांना जोडे वापरण्यास काय हरकत आहे, हें आम्हांस समजत नाहीं. तसेंच, मोठ्या थंडींत प्रवास करावयाचा असल्यास त्यांनीं हातमोचे व

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,- सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

तेवढें अनुकरणीय वाटतें " असा जो पुकारा रात्रंदिवस चालविला आहे तो किती मिथ्या आहे, हें अनेक उदाहरणांपैकीं एका उदाहरणानें वाचकांच्या नजरेस आणण्यासाठीं आम्हीं हें यत्किंचित् विषयांतर करण्यास प्रवृत्त झालों. बाकी युरोपियन लोकांवर या टीकेचा कांहीं एक परिणाम होण्याचा संभव नाहीं, हें आम्हीं पक्कें जाणून आहों. कारण, ज्या लोकांस जो पोषाख मानवलेला असतो, व ज्याच्याशीं त्यांच्या सुरेखपणाच्या कल्पना खिळून गेलेल्या असतात, ते दुसऱ्या लोकांच्या टीकांनीं त्यांत फेरबदल करण्यास कधींही राजी होत नाहींत. शिवाय, त्यांच्या पोषाखांत ज्या गैरसोई आहेत त्या त्यांच्यापैकींच कांहींच्या नजरेस येऊं लागल्या आहेत, व त्या आपल्या लोकांच्या नजरेस आणण्यास तिकडील टीकाकर हवेतितके खबरदार आहेत ! त्यांना आमच्या मदतीची बिलकुल गरज नाहीं. तथापि येथें येवढें झटल्यावांचून रहावत नाहीं कीं युरोपीअन स्त्रिया आपला झगा टाकून देऊन आमच्या स्त्रियांच्या लुगड्यासारखें एखादें वस्त्र वापरूं लागतील, तर त्यांचा पोषाख कमी खर्चाचा आणि कमी त्रासाचा होईल इतकेंच नाहीं, तर सौंदर्य व सुख या कल्पनांत साऱ्या मनुष्यतेस पसंत पडेल असा कांहीं भाग असेल तर त्याकडे त्यांचा थोड्याबहुत प्रमाणानें प्रवृत्ति झाली असें होऊन, इतर खंडांतील लोकांच्या, व कदाचित् युरोपखंडांतील लोकांच्याही दृष्टीस त्या आतांहून रमणीय वाटूं लागण्याचा संभव आहे.

येथपर्यंत आमच्या स्त्रियांच्या चोळीलुगड्याचा विचार झाला; आणि हाच मुख्य महत्वाचा होता. आतां थोडावेळ त्यांच्या ढोक्याकडे आणि पायांकडे पाहूं म्हणजे झालें. आमच्या साहेब लोकांच्या मडमांप्रमाणें आमच्या बायकांच्या ढोक्यांवर शिसरी टोप्या चढविण्याची कांहींएक गजर नाहीं. तथापि उन्हांत, पावसांत, किंवा वाऱ्यांत जातांना त्यांच्या ढोक्यांस

कांहींतरी शिरस्त्राण घालण्याची चाल पडेल तर वरं होणार आहे. सध्यां पट्टाशिवाय दुसरें कांहींहि असत नाहीं. फारच झालें तर पट्टावर शालजोडी किंवा शेला घेण्यांत येतो. पण या सर्वांचें पर्यवसान हात आडवून ठेवणें आणि सर्व शरीर एखाद्या उंच कापडाच्या पोत्यांत गुंडाळ्यासारखें करणें-अशा-वर होतें. हें कांहीं प्रशस्त नाहीं. चुरखा घेण्याचे दिवस गेले. ऊन व पाऊस यांपासून संरक्षण करण्याचा जो सामान्य उपाय तो आह्मीं स्त्रियांस करूं देत नाहीं, ही मोठ्या शरमेची गोष्ट होय. आम्ही धट्ट्याकट्ट्या पुरुषांनीं काश्मिरी चोगे घालावे, बूट-स्टॉकिंग्स चढवावे, कानास रुमाल गुंडाळावे किंवा पागोट्यावरून कानपट्ट्या बांधाव्या, सकलादीच्या टोप्या घ्याव्या, आणि या सर्वांच्यावर छत्र धरावें, आणि त्या बिचाऱ्या अबलांनीं भरपाव-सांत एखाद्या चौघडीनिशीं किंवा शालजोडीनिशीं, अथवा नुसत्या पट्टावरच रस्त्यानें अनवाणी भिजत जावें, ही आह्मांस मर्यादेची अमानुष कल्पना वाटते. उन्हांत व पावसांत स्त्रियांनीं छत्री वापरण्यास आह्मांस बिलकुल हरकत दिसत नाहीं. तसेंच त्यांस घरांतील स्वच्छ जमिनीशिवाय दुसऱ्या कोठेंही चालण्याची संवय नसल्यामुळें, उन्हानें तापलेल्या किंवा पाण्यानें आणि थंडीनें गारठलेल्या जमिनीवरून चालतांना त्यांना पराकाष्ठेचे क्लेश होऊन, कधीं कधीं उष्णाचे आणि थंडीचे विकार होतात. हे टाळण्यासाठीं सर्व स्त्रियांनीं घराबाहेर पडतांना जोडे वापरण्यास काय हरकत आहे, हें आम्हांस समजत नाहीं. तसेंच, मोठ्या थंडींत प्रवास करावयाचा असल्यास त्यांनीं हातमोचे व

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

पायमोचे घालण्यास, आणि घोडयावर बसावयाचें असल्यास किंवा लांचीची मजल मारावयाची असल्यास मऊ कातडयाचे बूट घालण्यास आम्हीं त्यांस अडथळा कां करावा, हें सांगता येणें फार कठिण आहे. पण **शास्त्रात् रूढिर्बलीयसी** या न्यायाचे आम्हीं सारे गुलाम होऊन गेलों आहों. लोकांच्या कानाशीं कटकट करतां करतां हिच्या शृंखला झुगारून देऊन, जो मार्ग सुखावह व सुगम असेल त्यानें जाण्याचें धैर्य ज्या दिवशीं आमच्या अंगीं येऊं लागेल तो सुदिन म्हणावयाचा. कोणीं कांहीं केलें व म्हटलें तरी तो एकदां येणार आहे, याविषयीं आम्हांस शंका नाहीं. अविचाराच्या व दुराग्रहाच्या मत्यवायामुळें तो थोडासा दुरावणार आहे, येवढेंच कायतें !

अलंकारमीमांसा.

मनुष्यांच्या हातून ज्या अनेक असंबद्ध किंवा परस्परविरोधी गोष्टी होत असतात त्यांतच अलंकाराचा समावेश करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. बोलण्यांत साधेपणाची तारीफ करीत नाहीं, असा कोण आहे ? तथापि मौल्यवान वस्त्रें परिधान करून, व जेथल्या तेथें नानाप्रकारचे अलंकार चढवून ठुमकत जाणारी तरुण रमणी नेत्रपथांत आली असतां, ज्यानें अभिलाषपूर्वक तिजकडे पाहिलें नाहीं, किंवा पाहून ज्याचा अंतरात्मा क्षणभर आनंदित झाला नाहीं, असा कोण पुरुष आहे ? दागिन्यांत कांहीं अर्थ नाहीं; दागिने घालण्यासाठीं नाकाला, ओठाला, कानाला, भोंकें पाडणें हा रानटीपणा होय; दागिन्यामुळें चोरांपासून त्रास होतो; लहान मुलांच्या अंगावर सोनें घात-

ल्यानं तांच्या जिवास अपाय घडतो; दागिन्यांत पैसे अडवू ठेवल्यानं देशांतील उत्पादक भांडवलापासून व्हावा तितका फायदा होत नाहीं; दागिन्यांपासून कोणत्याही प्रकारचें सुख होत नाहीं-वगैरे पोकळ वेदांताच्या गप्पांत आह्मांस बिलकुल हांशील वाटत नाहीं. दागिने घालावयाचे नाहींत, चांगलीं वस्त्रें वापरावयाचीं नाहींत; सुग्रास अन्न खावयाचें नाहीं; सुरेख घरांत रहावयाचें नाहीं तर करावयाचें तरी काय ? सकाळपासून संध्याकाळपर्यंत जे कष्ट करावयाचे ते ओलाकोरडी भाकर जाडाभरडा कपडा, आणि थंडीवाऱ्याचें निवारण होण्यासारखें एखादें मजबूत खोपट यासाठींच काय ? यावर कोणी असें उत्तर देतील कीं, कोणतीही गोष्ट फाजील करूं नये. फाजीलपणापासून नुकसान आहे. पण यावर आमचें प्रत्युत्तर असें आहे कीं, या उपदेशाची विशेष गरज नाहीं. एखादा मनुष्य अत्यंत उपयोगी वस्तूंकडे दुर्लक्ष करून, अलंकारांकडे आपली सर्व प्राप्ती लावीत असला, म्हणून अलंकार घालण्याच्या पद्धतीवर चाल करून जाणें अगदीं अप्रशस्त आहे. सर्व ठिकाणचे रानटी लोक, सुधारलेल्या राष्ट्रांतील सर्व अज्ञान लोक, सुशिक्षित कुटुंबांतील स्त्रिया व मुलें-या साऱ्यांस अलंकारांची मोठी हौस असते हें अल्प अवलोकनावरून दिसून येणार आहे. उतार वय झालेल्या कांहीं मोठमोठ्या व विचारी विद्वानांस मात्र प्रत्यक्ष आपल्या अंगावर अलंकार घालण्यांत मोठीशी हौस वाटत नाहीं तेव्हां जी गोष्ट अनादिकालापासून सर्व प्रकारच्या, सर्व स्थितीतल्या व सर्व वयाच्या स्त्रीपुरुषांस कमी अधिक प्रमाणानें प्रिय होऊन बसली आहे, तींत कांहीं तात्पर्य नाहीं असें म्हणणें,

---

छापून भाऊनें देणें आहेत-फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर-हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर-सुधारक, पुणें.

तिच्यापासून जे क्वचित् अनर्थ घडतात ते न घडण्यासाठीं ती अर्जीवात टाकून द्या, असा मंत्रोपदेश करीत सुटणें म्हणजे मनुष्यस्वभावाचें आणि मनुष्यसुधारणेचें पूर्ण अज्ञान प्रकट करण्यासारखें होय. कोणी काय पाहिजे ते म्हणो, अलंकारांची हौस समूळ नाहींशी होण्याचा संभव नाहीं. एका प्रकारचे अलंकार नाहींसे केले तर दुसऱ्या प्रकारचे अस्तित्वांत येतील. उच्च धातू वापरण्याचा प्रघात कमी झाल्यास लत्ताकपड्यावर अधिक खर्च होऊं लागेल; व दोहींच्याही फेऱ्यांतून सुटलों तरी घरांवर, गाड्यांवर, नोकरांवर किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्या तरी ताड्यांतल्या वस्तूंवर अलंकार व वस्त्रें चढवून त्या आपल्या भोंवतीं ठेवण्यांत व त्यांच्याकडे पहाण्यांत मनुष्यांना आनंद वाटत राहील.

ज्याच्या योगानें वस्तूचें रूप विशेष खुलल्यासारखें वाटतें त्यास आपण अलंकार असें म्हणतों. या व्याख्येप्रमाणें शोभा देणाऱ्या प्रत्येक वस्तूची अलंकारांतच गणना केली पाहिजे. पण प्रस्तुत लेखांत अलंकारांची थोडी मर्यादित व्याख्या करणें जरूर आहे. नाहींतर विषय प्रतिपादनाची मोठी पंचाईत पडेल. मूळचें स्वरूप अधिक चांगलें दिसण्यासाठीं मौल्यवान् धातूच्या व पाषाणांच्या ज्या नानातऱ्हेच्या चिजा स्त्रीपुरुषें अंगावर घालतात त्यांसच येथें अलंकार असें समजून त्याविषयीं थोडी चर्चा करूं.

अलंकारांपासून स्वाभाविक सौंदर्याच्या मोहकपणांत भर पडते, असा सर्वांचा अनुभव आहे. कित्येक पाश्चिमात्य व पूर्वात्य कवींनीं नग्नसौंदर्याची मोठी प्रशंसा केली आहे. पण सध्यां रामचीं जीं मनें आहेत त्यांनीं वस्त्ररहित आणि अलंकाररहित दशा अत्यंत लावण्यवती स्त्रीचें किंवा सुंदर पुरुषाचें रूप डोयापुढें आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांना तें रूप हिडिस दिसेल ! " नष्टनंदनवनांतील " लतामंडपांतल्या पुष्पशय्येवर विलास करतांना, मनुष्यांच्या आद्य प्रतिनिधि [illegible]

पतीचें नग्नसौंदर्य पाहून काय वाटलें असेल तें असो, किंवा मनुष्यांच्या आद्य पूर्वजास आपल्याच हाडामांसापासून निर्माण केलेल्या नग्न रमणीस दृढालिंगन देतांना काय आनंद झाला असेल तो असो, आतांच्या आमच्या मनास नग्नस्त्री-पुरुषांची कल्पना ओंगळ वाटते, आणि नग्नसौंदर्याच्या मनोहारित्वाविषयीं कोणी केवढयाही थापा मारल्या, तरी ॲडॅम आणि ईव्ह यांचें अनुकरण करण्यास अर्वाचीन माणसें कधींही तयार होणार नाहींत. अलंकारांविषयीं लोकांचीं मतें स्थिर नाहींत व सारखीं नाहींत, हें कच्चूल आहे. देशकालाप्रमाणें त्यांत फरक असतो व होत जातो. निसऱ्या किंवा चौथ्या शतकांतील दागिन्यांत आणि आतांच्या दागिन्यांत बराच बदल झाला असला पाहिजे; तसेंच, कोणत्याही दोन राष्ट्रांतील लोकांच्या दागिन्यांत फारच थोडें साम्य असलें, हें कोणास सांगावयाला पाहिजे, असें नाहीं. पण जेथें दागिन्यांची चिलकुल हौस नाहीं, असें एक देखील राष्ट्र मिळावयाचें नाहीं. आपण दुसऱ्याला प्रिय व्हावें, अशी मनुष्याच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. पण ह्या प्रवृत्तीचें विशेष प्रदर्शन स्त्रीपुरुषांकडून एकमेकांस प्रिय होण्यासाठीं चालविलेल्या वर्तनांत दिसून येतें. सौंदर्याला सर्वत्रच मान आहे. पण पुरुषांच्या सौंदर्याला स्त्रियांत आणि स्त्रियांच्या सौंदर्याला पुरुषांत विशेष मान असल्यामुळें, त्या सौंदर्याला खुलवणारे अलंकार वापरण्याची इच्छा उभयतांतही स्वभावसिद्ध होऊन बसल्यासारखी झाली आहे. दागिन्यांमुळें स्वाभाविक सौंदर्यांत खरोखरीच भर-

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १८१२

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

पडेनाशी होईल, निदान पडत नाहीं असें वाटूं लागेल, तेव्हांच हा मनुष्यास लागलेला दागिन्यांचा नाद सुटण्याचा संभव आहे. मोठ्या प्रयासानें हा थोडासा कमी अधिक करतां येईल, पण जोंपर्यंत स्त्रीपुरुषें एकमेकांस प्रिय होण्याचा प्रयत्न करीत असतील, तोंपर्यंत दागिन्यांचा थोडाबहुत नाद सर्वत्र दृष्टीस पडल्यावांचून रहाणार नाहीं.

दागिन्यांवर मनुष्यांचें इतकें प्रेम बसण्याचें दुसरें एक कारण असें आहे कीं, त्यांमुळें आपण श्रीमंत आहों, असें इतरांस सहज रीतीनें दाखवितां येतें. दहापांच हजारांच्या नोटा आंगरख्यावर किंवा लुगड्यावर चिकटवल्या तर तो हेतु सिद्धीस जाणार आहे, हें खरें आहे. पण तसें केल्याने सौंदर्यांत भर न पडतां, तें उलट विद्रूप दिसण्याचा संभव आहे. तेव्हां सौंदर्याला मदत होऊन पुनः श्रीमंती दाखवितां येण्यास अलंकार घालण्यासारखें दुसरें साधन नाहीं. शिवाय, एकदां दागिन्यांचा पक्का नाद लागला म्हणजे काटकसर करण्याची सवय लागते, आणि तीमुळें दुर्व्यसनांत किंवा दुसऱ्या कोणत्याही वाईट गोष्टीकडे खर्च करण्याचा इच्छा होत नाहीं, हा आणखी एक फायदा आहे. शिवाय, एखादा प्रसंग गुदरला असतां दागिने, जसे उपयोगी पडतात, तसें दुसरें कांहीं एक उपयोगास येण्याचा संभव नाहीं. व्यापारांत घातलेला पैसा पाहिजे तेव्हां हातीं येऊं शकत नाहीं तसेंच नाहीं, तर बुडण्याची भीति असून, त्याचे योगानें रूपाला शोभकता आणण्यास कांहींच साहाय्य मिळत नाहीं. व्यंकटेशला जसा पाहिजे तेव्हां हातीं येण्यासारखा असतो. पण तुशीच्या नाकीं कां "व्यंकचुक" घालतां येणार आहे? तात्पर्य, दागिने ही एक प्रकारची अत्युत्तम ठेव आहे. ह्या ठेवीपासून सौंदर्यवृद्धि होत असून खेरीज अनेक फायदे होतात. म्हणून दागिने वापरण्याची हौस मनुष्यांतून सहसा जाण्याचा संभव नाहीं. हें सिद्ध आहे.

कोणी असें ह्मणतात कीं, दागिन्यांत पैसा घालण्यापेक्षां तो वस्त्रप्रावरणांत खर्चणें विशेष इष्ट आहे; कारण कापड दागिन्यापेक्षां विशेष उपयोगाचें व सुखाचें आहे. पण यास एक असें उत्तर आहे कीं, शीतकटिबंधांतले लोक अवश्यकतेमुळें आपल्या पैशांचा चूर पेहरावांत करतात, ह्मणून आह्मीं उष्ण कटिबंधांतील लोकांनींही तसेंच करीत सुटावें, हें योग्य नाहीं. अवश्यक असेल तेवढा पैसा कपड्यांत खर्च करण्यास आमची हरकत नाहीं. पण अवश्यकतेबाहेर जितका पैसा वाचेल तितका सारा कपड्यापेक्षां असंख्यपट अधिक टिकाऊ आणि उपयोगी अशा अलंकारांत खर्चणें हेंच प्रशस्त आहे. यावर कोणी असें म्हणतात कीं, कपडयार केलेल्या खर्चानें दागिन्यांवर केलेल्या खर्चापेक्षां व्यापारास अधिक उत्तेजन मिळते. पण आमच्या मतें ही विचारसरणी चुकीची आहे. कापडखरेदी केल्यानें कोष्टयांस व शेतकऱ्यांस उत्तेजन मिळतें; दागिने करविल्यानें खाणींतून मौल्यवान् धातू काढणारांच्या आणि सोनारांच्या धंद्यास आश्रय देण्यांत येतो ! तेव्हां दागिने घाला किंवा उंची लत्ता कपडा वापरा, कोणत्या तरी व्यापारास उत्तेजन हें मिळतेंच ! पण कपड्यांत पैसा उधळून बसण्यापेक्षां तो दागिन्यांत बैंचण्यांत विशेष फायदा आहे तो असा कीं, कपडा दागिन्यांइतका टिकाऊ नसल्यामुळें त्यांतील पैशाचा व्यय लौकर होतो, व दागिन्यांतील पैसा फार दिवस टिकतो. वस्त्र जुनें झालें म्हणजे त्यांपैकीं कांहींच हातीं लागत नाहीं; जुन्या दागिन्यांपासून रुपयाचे आठ आणे तरी मिळतात ! तेव्हां वस्त्रावर फार खर्च न करितां तो दागि-

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

न्यांत करणें विशेष प्रशस्त आहे, हें सहज लक्षांत येणार आहे.

दागिन्यांमुळें चोऱ्या व खून होतात म्हणून दागिने घालूं नयें, असें म्हणणें म्हणजे आगगाड्या व आगबोटी यांस अपघात होऊन प्राणहानि होते, म्हणून प्रवासाच्या कामीं त्यांचा कधीं उपयोग करूं नये, असें प्रतिपादण्यासारखेंच होय. लोकांच्या दृष्टीस पडणार नाहीं, चोरतां येणार नाहीं, व कोणत्याही अपघातानें नष्ट होणार नाहीं, अशा रीतीनें संपत्तीचें रक्षण करणें बहुधा अशक्य आहे. सर्व पैसा व्यापारांत किंवा जमिनींत घालून बसून, आयत्या वेळेस त्याची गरज लागली तर कोणाच्या तोंडाकडे पहावें ? व्यापारांत तोटा आला किंवा शेत पिकलें नाहीं म्हणजे जें नुकसान होतें तें चोरीच्या नुकसानापासून फारसें निराळें नाहीं, असें वाटतें. शिवाय, ज्या घरीं व ज्या माणसाच्या अंगावर कांहीं माया असेल त्यावरच उद्या पडण्याचा संभव आहे, हें जरी खरें आहे. तरी लोकांची गरीबी, अज्ञान, व स्वाभाविक दुर्गुणप्रवृत्ति या गोष्टींत चोऱ्या व खून या अरिष्टांस कांहीं कमी कारण नाहींत लोक दरिद्री नसतील व सुशिक्षित आणि सद्गुणी असतील, आणि पोलिसाचा बंदोबस्तही चांगला असेल, तर सुदाम्याच्या घराप्रमाणेंच कुबेराचें घर व शरीर कां सुरक्षित असूं नये, हें सांगतां येणार नाहीं. ऐषआरामाच्या वस्तूंत दागिन्यांचा समावेश होतो. जेथें राष्ट्र आहे तेथें थोडाबहुत ऐषआराम असलाच पाहिजे. देशकालानुरोधानें या ऐषआरामाची तऱ्हा निराळी असेल; पण जेथें मुळींच ऐषआराम नाहीं, असें राष्ट्र सांपडावयाचें नाहीं. आम्ही हिंदू लोक दागिन्यांत म्हणजे एका प्रकारच्या ऐषआरामांत थोडाबहुत पैसा खर्च करतों, हें खरें आहे. पण हा खर्च प्रतीच्या मानानें इतर लोकांच्या ऐषआरामाकडे होत असलेल्या खर्चाहून फार कमी

असून, प्रसंग पडेल त्या वेळेस या खर्चाच्या बऱ्याच भागाचा पैसा करतां येतो, हा यांत एक विशेष फायदा आहे, असें प्रसिद्ध दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या एका निबंधांत सिद्ध करून दाखविलें आहे. " काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत सुरक्षितपणें प्रवास करतां येण्यासारखा " पोलिसाचा बंदोबस्त सरकार ठेवील, तर चोऱ्यांच्या आणि खुनांच्या हरकतीमुळें दागिने वापरूं नयेत, असें म्हणतां येणार नाहीं, हें उघड आहे.

तथापि या वादग्रस्त विषयाच्या संबंधानें आम्ही थोड्याबहुत समयास येण्यास, म्हणजे आमच्या प्रतिपक्ष्यांस रुचेल तर त्यांशीं तह करण्यास, तयार आहों. कारण, कांहीं म्हटलें तरी जनसमूहास एकाएकीं सुशिक्षित, सुवृत्त व निर्लोभी करणें जितकें अशक्य आहे तितकेच 'काठीला बांधलेल्या सोन्यास कोणीं हात लाऊं नये, असा बंदोबस्त होणेंही अशक्य आहे. तेव्हां दागिन्यापासून होणारा फायदा तेवढा साधून नुकसान टाळतां येईल अशी युक्ति कोणी सुचविली, तर ती स्वीकारण्यास लोकांनीं एका पायावर उभें असलें पाहिजे. ही युक्ति फार सोपी आहे. **खरे दागिने न घालतां खोटे दागिने घालावे म्हणजे झालें !** असें केलें असतां, श्रीमंतापासून गरीबापर्यंत पाहिजे त्याला दागिन्यांपासून सौंदर्यास होणाऱ्या मदतीचा फायदा घेतां येऊन, शिवाय आपापल्या मगदुराप्रमाणें लक्षाकपड्यावर अधिक खर्च करण्यास सवड सांपडेल इतकेंच नाहीं, तर देशांतील बरेंच धन दागिन्यांत अडकून पडल्यामुळें त्याचें नुकसान होत आहे असें ज्यांचें म्हणणें आहे

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी सिक्चर ⅛ १० पौंड.

मोरोक्को कॉफी ⅛ १२ पौंड.

त्यांची ही दागिने वापरण्यास असलेली बहुतेक हरकत दूर करतां येणार आहे! एकदा हा खोटे दागिने घालण्याचा प्रघात रूढ झाला, म्हणजे त्यांसाठीं घरें फोडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें चोरलोकांत समजून येईल, आणि मारवाड्यासारखे द्रव्यलोलुप लोक लहान मुलांचे खून करण्यास प्रवृत्त होणार नाहींत! यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, लहानथोरांच्या बायका सारख्याच श्रीमंत दिसूं लागल्या, तर धनाढ्यांनीं आपली श्रीमंती कशी दाखवावी? खोटे दागिने घालण्यानें सौंदर्यांत होणारे साहाय्य साधेल खरें, पण श्रीमंती दाखविण्याचा व ती दाखविल्यापासून मनास होणाऱ्या आनंदाचा लाभ खोट्या दागिन्यांपासून कसा करून घेतां येईल? या प्रश्नास आमचें प्रत्युत्तर येवढेंच आहे कीं, अलंकारांनीं देह अलंकृत करणें हा त्यांचा आद्य उपयोग आहे. त्यांपासून होणारीं इतर कामें केवळ आनुषंगिक आहेत. तेव्हां त्यांचेकडून मुख्य काम करून घेऊन, बाकीचीं कामें साधण्यास दुसऱ्या तोडी काढाव्या, हें योग्य आहे. श्रीमंतानीं पाहिजे तर आपल्या लत्त्याकपड्यानें आपली श्रीमंती दाखवावी, अथवा लोकर व कापूस आणि यंत्रें यांच्या समृद्धीमुळें श्रीमंती दाखविण्याचें तें द्वारही बंद झालें असेल तर, त्या लोकांनीं आपल्या कपाळावर "आमच्यापाशीं इतकी माया आहे," अशा अर्थाचीं अक्षरें गोंदून घ्यावीं, किंवा त्यांना सुचेल तसला दुसरा एखादा उपाय काढावा, अथवा जबाबदारी पतकरून खरे दागिने वापरीत रहावे! मात्र तसें करतांना इतकें ध्यानांत ठेवावें कीं, दिसण्यांत खऱ्या व खोट्या दागिन्यांत फरक दिसत नाहीं, इतकेंच नाहीं, तर सौंदर्याची उठावणी करण्यांतही दोहोंचा सारखाच उपयोग असल्यामुळें, गरिबांच्या बायका श्रीमंतांच्या बायकांप्रमाणें

कसले घसले सारे दागिने वापरूं लागल्या, म्हणजे श्रीमंतांच्या बायकांच्या अंगावर असलेल्या खऱ्या दागिन्यांपासून त्यांस म्हणण्यासारखा कोणताहीं फायदा होणार नाहीं ! असो; पुढें एखादे प्रसंगीं हाच विषय पुनः हातीं घेऊन, आपल्या दागिन्यां-पैकीं त्याज्य व रक्ष्य किती आहेत या मुद्याचा आणखी कांहींसा विचार करूं.

म्हणण्यासारखा उपयोग नाहीं.

हव्या तेवढ्या वयाच्या वराशीं हव्या तितक्या लहान वयाच्या वधूचा विवाह करावा, व मग त्या घोडनवऱ्यानें उतावीळ होऊन आपल्या ऋतु प्राप्त न झालेल्या भार्येशीं राक्षसी विलास करून, तिच्या प्राणांचा किंवा प्रकृतीचा आणि आपल्या लौकिकाचा होम करावा, आणि त्यामुळें लोकांचीं मनें उद्वास होऊन लग्ना अगदीं लहानपणीं लग्न करणें बरोबर नाहीं, असें वाटूं लागावें; पण तीं एकाएकीं बंद करण्याची छाती होत नसल्यामुळें तीं तशींच कायम ठेऊन, त्यापासून होणारे घोर परिणाम न घडूं देण्याचद्दल प्रथम बारीकसारीक कायदेशीर प्रतिबंध करीत रहावें—असा या प्रश्नाचा सार्वत्रिक इतिहास असेल, व याहून दुसऱ्या कोणत्याही पद्धतीनें ही बालविवाहाची दुष्ट चाल नाहींशी करणें शक्य नसेल, तर कित्येक सामाजिक सुधारकांनीं संमति-

---

ज्ञही धाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणाराँस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खंर, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

वयाची इयत्ता वाढविण्यासाठीं हिंदुस्थानसरकारास अर्ज करण्याचा जो विचार केला आहे, तो केवळ वावगा आहे, असें म्हणतां येणार नाहीं. " वारा वर्षांच्या आंत आपण आपल्या बायकोशीं समागम केला, आणि त्यापासून भयंकर परिणाम होऊन तो जगापुढें आला, तर आपणांस असंमत उपभोगास सांगितलेली शिक्षा भोगावी लागेल; करतां आपण त्या समागम-सुखाविषयीं उत्कंठ होऊं नये " असा परिणाम जितक्या चोंढ-नवऱ्यांच्या मनांवर होईल तितक्या मानानें संमतिवय वाढविल्या-पासून फायदा होणार आहे यांत बिलकुल संशय नाहीं. पण हें मान पराकाष्ठेचें झुलक आहे. येवढयासाठींच कायदा करण्याची मोठीशी आवश्यकता नाहीं. यावर कोणाचा असा आक्षेप येईल कीं, संमतिवयाचें प्रमाण दहापासून बारा केल्यानें असंमत उप-भोगांचा झणण्यासारखा प्रतिबंध होण्याचा संभव नाहीं, हें जरी खरें आहे, तरी जे उतावीळ नवरे हा गुन्हा करतील, त्यांना दोन वर्षांहून अधिक शिक्षा ठोठावण्याचा न्यायाधिशास अधिकार असणें जरूर आहे. कामवासना अनावर होऊन वयाचा व प्रकृतीचा मग-दूर न पहातां, अल्प वयांच्या मुग्ध कन्येवर बलात्कार करून तिच्या शरीराची, अब्रूची, आणि प्राणांची दुर्दशा करणाऱ्या मनुष्याचा अपराध फार मोठा आहे, व अशा मोठ्या अपराधास मोठी शिक्षा असणें हें योग्य आहे. यावर आमचें प्रत्युत्तर असें आहे कीं कोणत्याही अपकृत्यास जी शिक्षा ठरवायाची ती त्यापासून होणाऱ्या परिणामांच्या अनुरोधानेंच नेहमीं ठरवितां येत नाहीं. ज्याच्या हातून तें अपकृत्य घडलें त्याचा हेतु कसा होता, हें पहाणें अनेक प्रसंगीं अवश्य असतें. असें समजा कीं, एखाद्या अचरट मनुष्यानें घरांतल्या घरांत पिस्तुलानें गोळी घालण्याचा नेम शिकण्याचा विचार करून, आपल्या परमप्रिय बायकोशीं

लाडिवाळपणानें खेळत असलेल्या घरच्या भाटीवर कांहीं छेर्रं सोडले, आणि ते त्या प्रियकरणीस लागून तिचा अंत झाला, तर अशा भावी गोलंदाजास बायकोचा खून केल्याबद्दल फांशीं देणें बरोबर होईल काय? अर्थात् नाहीं. त्याप्रमाणेंच जो घोडनवरा वयांत न आलेल्या आपल्या बायकोशीं राक्षसी वर्तन करतो, तो तिचा प्राण जावा किंवा तिच्या शरीरास आमरण दुःसह व्यथा जडावी, अशा बुद्धीनें तें करीत नाहीं. ज्याप्रमाणें दारूनें झिंगलेला मनुष्य पाहिजें तें करीत सुटतो त्याप्रमाणें उत्कट कामवासनेनें बेफाम होऊन गेलेला मनुष्य तसें कर्म करण्यास प्रवृत्त होतो. बायको मरावी असा त्याचा हेतु मुळींच नसतो; कसेंही करून आपली वासना तृप्त करावी, येवढाच त्याचा विचार असतो. सबब, अशा अपराधाबद्दल पराकाष्ठेच्या वाईट अविचाराच्या कृत्यास जी शिक्षा सांगितली असेल तीच देणें योग्य आहे. पंचवीस तीस वर्षांच्या दांडग्या मनुष्याच्या ताब्यांत आठदहा वर्षांची पोर बायको म्हणून द्यावयाची, आणि त्यानें अविचाराचा प्रकार केला म्हणजे त्याच्या पाठीमागें दहाबारा वर्षांचा कारागृहवास किंवा काळेपाणी लावायाचें, हें फारच शहाणपणाचें कृत्य होय! वास्तविक पहातां अशा रीतीनें मुलींचा विक्रय करणाऱ्या आईबापास किंवा पालकास, आणि विकत घेणाऱ्या सासूसासऱ्यास किंवा नवऱ्यास चांगलासा दंड करणें न्याय्य आहे! आठनऊ वर्षांच्या मुली पंचेचाळीस वर्षांच्या घोडवांना अगोदर देतां कां? आणि मग रडत बसतां कां? बारा वर्षांच्या करूनच कां देत नाहीं?

ब्रह्मी दाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खेर, लान्हा ऑफीस, पुणें सिटी.

यासंबंधानें हिंदुस्थानसरकारास पाठविण्यासाठीं जें पत्र तयार झालें आहे त्याचा मसूदा आमच्या पहाण्यांत आला आहे. या मसुद्यांत संमतिवय वाढविणें इष्ट आहे, असें सिद्ध करण्यासाठीं जितकी कुशलता दाखविणें शक्य होतें तितकी दाखविली आहे, व आजमित्तीस दहांच्या जागीं बारा वर्षें केलीं असतां लोकमतावर चांगला परिणाम होऊन, चौदाव्या वर्षांपर्यंत नवऱ्यानें आपल्या बायकोकडे जाऊं नये, असा प्रतिबंध करून घेण्यास त्यांच्या मनाची हळूं हळूं तयारी होणार आहे, वगैरे गोष्टींचा यांत मोठ्या चातुर्यानें जातां जातां उल्लेख केला आहे. परंतु प्रश्नांतील वादाचें जें मुख्य स्थल त्यांत प्रवेश न करतां, त्याच्या सभोवतालच्या अवांतर गोष्टींची मुद्देसूद व सप्रमाण चर्चा करून, त्या दूष्य ठरविल्यानें हिंदुस्थानसरकारास किंवा इतरांस असला कायदा करणें जरूर आहे, असें वाटण्याचा विशेष संभव नाहीं. बारा वर्षांच्या आंतील मुलीचा किंवा कोणत्याही वयाच्या मुलीचा नवऱ्यानें केलेल्या जुलमाच्या संभोगानें उपहास होऊं नये, ही गोष्ट जितकी कायदा मागणाऱ्या लोकांस इष्ट आहे, तितकीच ती न मागणाऱ्यास, किंवा त्यापासून फायदा होणार नाहीं, असें म्हणणाऱ्यांस इष्ट आहे. तेव्हां जेणेंकरून कामांध नवऱ्यास आपल्या बायकोची अशा तऱ्हेनें विटंबना करतां येणार नाहीं, अशी कांहीं तोड निघाल्यास ती सर्व पक्षांस मान्य होईल, असें वाटतें. सरकारानें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें आमच्या धर्मांतर्गत विवाहपद्धतींत एक दोन महत्वाचे कायदे करून हात घातला आहे, म्हणून या बाबतींतही तसें करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें म्हणून सरकारचें किंवा या भावी कायद्याच्या प्रतिपक्ष्यांचें समाधान होणार नाहीं. सती जाऊं न देणें, गतभर्तृकांनीं पुनर्विवाह केला असतां त्यामुळें त्यांचें किंवा त्यांच्या संततीचें कोणत्याही प्रकारचें नुकसान न होऊं देणें, धर्मांतरामुळें वडिलोपार्जित संपत्तीचा योग्य वांटा मिळण्यास हरकत न होणें

वगैरे गोष्टी सरकारास बऱ्या वाटत होत्या, व म्हणून त्यांनीं लोकमताकडे विशेष लक्ष न देतां, त्या संबंधानें तेव्हांच कायदे केले. संमतिवयाच्या संबंधानें त्यांना जेवढा निर्बंध उचित व अवश्य वाटला तेवढा त्यांनीं आमच्या अभिप्रायाची विशेष पर्वा न करतां केव्हांच घालून टाकला. पारशांनीं व खोजांनीं अमुक कायदा आम्हांस करून द्या, असें बहुमतानें विचारल्या-वरून त्यांना तो करून देण्यांत आला, यांतही कांहीं नवल नाहीं. या सर्व उदाहरणांवरून संमतीचें वय सध्यांप्रमाणें दहा न राहूं देतां बारा करावें, या म्हणण्यास विशेष आधार मिळत नाहीं. आजचीं मागणी लोकांकडून सरकाराकडे जात आहे, व तीही साऱ्या किंवा बहुतेक लोकांकडून जात आहे, असें नाहीं. तसेंच, हा फेरफार केल्यानें ' म्हणण्यासारखा फायदा होण्याचाही संभव नाहीं. फार झालें तर ज्या वेळीं असंमत उपभोगाचा पुरावा खटला कोर्टापुढें येईल, तेव्हां अपराध्यास आतापेक्षां अधिक कडक शिक्षा देतां येईल येवढेंच कायमचा या फेरफारा-पासून अपराधप्रवृत्ति कमी होऊं शकत नाहीं, व ती होणें हा तर कायदे करण्याचा मुख्य हेतु असतो. दुसऱ्या बाबींत मुलींचें वय बारा किंवा चौदा वर्षांचें असल्याखेरीज तीं कायद्यांत आलीं असें मानीत नाहींत, म्हणून बारा वर्षांच्या आंत नवऱ्याला तिनें जो रुकार दिला तोही कायदेशीर मानूं नये, हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, पाहिजे त्या वयांत लग्नाला रुकार देणें हें जर कायदेशीर आहे, तर ज्या गोष्टीसाठीं लग्न करावयाचें ती गोष्ट नवरा करूं लागल्यास ती कायदेशीर नाहीं, असें कसें म्हणतां येईल ? बारावें वर्ष हा मुलींच्या ऋतुदर्शनाचा सामान्य काल

निबंध संग्रह.

भाग १ ला. कि. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

होय, असें सुश्रुतादि तुमच्या अत्यंत पूज्य भिषक्प्रमुखांचें म्हणणें असतां, व मन्वादि आद्यस्मृतिकार आणि पाराशर, बृहस्पति, यम वगैरे इतर धर्मशास्त्रकर्ते हे बारा किंवा चौदा वर्षांच्या आंत नवऱ्यांनीं आपापल्या बायकांशीं संबंध ठेऊं नये, असें सांगत असतां, व या वयाच्या मुलींचीं लग्नें झालीं नाहींत तरी हरकत नाहीं, असें त्याचें ह्मणणें असतां, तुह्मी आठदहा वर्षांच्या पोरी आपण होऊन विवाहपाशांनें बद्ध करून टाकता कां, आणि मग त्या पाशापासून होणारा त्रास चुकविण्यासाठीं विशेष फायदा न होणारे कायदे मागत बसतां कां ? तुमच्या मुलींचा, तुमचा, आणि तुमच्या जावयाचा भंडवडा कशानें होतो, हें तुह्मांस पूर्णपणें कळून आलें आहे. तेव्हां शहाण्या माणसाप्रमाणें रोगाच्या मुळास हात घालाल, कीं वरवर लेप आणि मलमपट्टया लावीत बसाल ? हिंदुस्थानांतील दोन प्रांतांत एका चाळीस वर्षांच्या अवकाशांत असंमत संभोगाचे शंभर खटले कोर्टांपुढें आले, आणि त्यांपैकीं सुमारें निम्मे खटले दहापासून तेरा वर्षांच्या आंतील वयाच्या मुलींवर त्यांच्या नवऱ्यांकडून जुलूम झाला, असें सांगण्यांत, व या प्रसिद्ध जुलमांच्या मागें शेकडों अप्रसिद्ध जुलूम झाले असतील असें ह्मणण्यांत, ' संमतीचें वय वाढवा ' या प्रार्थनेस विशेष पुष्टि मिळते, असें आह्मांस वाटत नाहीं. संमतीचें वय वाढविल्यानें प्रतिवर्षीं ज्या अडीच अपराध्यांस आजपर्यंत दुखापतीबद्दल शिक्षा द्यावी लागली, तिचे जागीं, संमतीचें वय वाढाविल्यास, जबरीच्या संभोगाची शिक्षा देतां येईल, यापलीकडे कोणताही फायदा या कायद्यानें होणार नाहीं. कदाचित् फांशीचीच शिक्षा ठेविली तर मात्र काय होईल तें सांगवत नाहीं ! पण त्या शिक्षेहून दुसऱ्या कोणत्याही हलक्या शिक्षेनें प्रसिद्ध गुन्ह्यांच्या मागें होत असलेल्या अप्रसिद्ध गुन्ह्यांची संख्या दहापांच अंकांनीं

तरी स्वल्प होईल किंवा नाहीं, याची आम्हांस बराच शंका आहे. अशा प्रकारचे जे गुन्हे कोर्टापुढें येतात ते बऱ्याच अंशीं नाइलाजास्तव येतात. जे हजारों मुलगे हजारों मुलींकडे पाहिजे त्या वयास जात आहेत, पण ज्यांच्या समागमापासून भयंकर परिणाम होऊं शकत नाहीं, त्यांचा प्रतिबंध या तुमच्या कायद्यानें कसा होणार ? किंवा चाळीस पंचेचाळीसापुढें विवाह केल्यानें कोणत्याही वयाच्या मुलीस घोर अपाय होईल अशा रीतीनें तीवर आपलें पौरुष गाजाविणें ज्यांस अशक्य झालें आहे, अशांनीं आपल्या दशद्वादशसांवत्सरिक धर्मपत्न्यांशीं केलेल्या क्रीडा दंडच कशा होणार ! पंचविशीच्या पुढले व चाळिशीच्या आंतले जे उल्हू व दांडगे प्रथम वर, द्विजवर, तिजवर किंवा पाहिजे त्या खेपेचे वर, शुभमंगल झाल्यापासून आपलें उपभोगस्थान कायदेशीरपणें आपल्या हस्तगत झालें, तेव्हां त्याचा उपभोग तत्क्षत लागेल तेव्हां करण्यास कांहीं हरकत नाहीं. असे अपजन त्यावर झडप [illegible] आपलें बसलेलें

मेंढ्या न पडाव्या हा जर मूळ उद्देश असेल तर तुम्ही मागत आहां त्या कायद्यानें तो कधींही सिद्धीस जावयाचा नाहीं, व ज्या प्रचारामुळें तुमच्या तोंडांत सारीं सुधारलेलीं राष्ट्रें शेण घालीत आहेत, त्याचा निखालस लय या कायद्यानें कधींच होणार नाहीं. तो व्हावा अशी तुमची खरी इच्छा असेल तर बारा वर्षांच्या आंत मुलींचीं लग्नेंच करूं नका म्हणजे झालें. पण ही सुधारणा इतक्यांत तुमच्यानें होण्यासारखी नसेल, तर **सरकारापासून असा तरी कायदा करून घ्या कीं, पंचवीसपासून चाळीस वर्षांपर्यंत लग्न करूं इच्छिणाऱ्या कोणत्याही वयाच्या वरानें बारावर्षांचे आंतील वयाच्या मुलीशीं लग्न करूं नये.** हिंदुस्थानसरकाराकडे धाडण्यासाठीं तयार केलेल्या पत्राच्या मसुद्यांत चाळीस वर्षांत जे जबरीचे शंभर संभोग हिंदुस्थानांतल्या दोन प्रांतांत झाले म्हणून म्हटलें आहे, व ज्यांपैकीं सुमारें निम्मे दहापासून तेरा वर्षांच्या आंतील वयांचे मुलींशीं झाले, असें सांगितलें दहापोटचे, तेरा वर्षांच्या आंतील वयाच्या मुलींवर त्यांच्या नवऱ्यांकडून जुलूम झाला, असें सांगण्यांत, व या प्रसिद्ध जुलमांच्या मागें शेकडों अप्रसिद्ध जुलूम झाले असतील असें म्हणण्यांत, 'संमतीचें वय वाढवा' या प्रार्थनेस विशेष पुष्टि मिळते, असें आम्हांस वाटत नाहीं. संमतीचें वय वाढविल्यानें प्रतिवर्षीं ज्या अडीच अपराध्यांस आजपर्यंत दुखापतीबद्दल शिक्षा द्यावी लागली, तिचे जागीं, संमतीचें वय वाढविल्यास, जबरीच्या संभोगाची शिक्षा देतां येईल, यापलीकडे कोणताही फायदा या कायद्यानें होणार नाहीं. कदाचित् फांशीचीच शिक्षा ठेविली तर मात्र काय होईल तें सांगवत नाहीं ! पण त्या शिक्षेहून दुसऱ्या कोणत्याही हलक्या शिक्षेनें प्रसिद्ध गुन्ह्यांच्या मागें होत असलेल्या अप्रसिद्ध गुन्ह्यांची संख्या दहापांच अंकांनीं

वधूशीं विवाह करूं नये, असा कायदेशीर निर्बंध सरकाराकडून करून घ्या, म्हणजे तुमचा इष्ट हेतु तेव्हांच तडीस जाईल, व तुमच्या तोंडचा कलंक पुसेल. पण जर तुमच्या अंगांत खरोखरींच कांहीं रग असेल, व पूर्व ऋषींनीं घालून दिलेल्या नियमांची जी दृढ भक्ति तुम्हांस आहे म्हणून वरकरणीं तुम्हीं नेहमीं म्हणत असता, तिचा एक शतांश जर तुमच्या अंगांत खरोखरींच वास करीत असेल, व त्या मर्द आर्यांचे केवळ मिथ्याभिमानी वंशज तुम्ही नसाल, तर त्यांच्याप्रमाणें आपल्या हातून पौरुषाची कृत्यें होण्यासाठीं सोळा वर्षेपर्यंत बापानें आपणास वाटेल तशा रीतीनें स्नेहपूर्वक आपल्या घरीं आपल्या मुलीचें संगोपन करावयाचें, आणि तिला तें वय प्राप्त झाल्यावर, आपल्या व तिच्या संमतीनें योग्य वर पाहून त्याच्या स्वाधीन तीस करावयाचें—अशी चाल घाला, आणि येथून पुढें होणाऱ्या संततीच्या मानास आणि कृतज्ञतेस पात्र व्हा ! एकदां असें करण्याचा निश्चय कराल तर माऱ्याच कल्पनेनें सताळः आणि गळ्यांत जिवाचा धडा कअसतात, व सारी लज्जा एकीकडे गुंडाळून ठेऊन, संधि सांपडल्याबरोबर जसा बुभुक्षित लांडगा मेंढीवर उडी घालतो. त्याप्रमाणें जे दिवसा ढवऱ्या किंवा पूर्वरात्रीं आपल्या अर्धांग्यांना अंथरुणासकट सभोंवतीं निजलेल्या स्त्रियांतून उचलून नेऊन, त्यास योग्य वाटलेल्या एखाद्या एकांत स्थळीं, किंवा तेथल्या तेथेंच आमानुष सुखाचा घुटका घेण्याचें धाडस करतात, अशा साहसी, उतार्वाळ, दांडग्या व क्रूर लांडग्यांच्या हातीं गरीब

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र,
संगीत समाजादर्श नाटक.
ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय्. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपाया.
'संदेश' पजंट, पुणें सिटी.

मेंढ्या न पडाव्या हा जर मुळ उद्देश असेल तर तुम्ही मागत आहां त्या कायद्यानें तो कधींही सिद्धीस जावयाचा नाहीं, व ज्या प्रचारामुळें तुमच्या तोंडांत सारीं सुधारलेलीं राष्ट्रें शेण घालीत आहेत, त्याचा निखालस लय या कायद्यानें कधींच होणार नाहीं. तो व्हावा अशी तुमची खरी इच्छा असेल तर बारा वर्षांच्या आंत मुलींचीं लग्नेंच करूं नका म्हणजे झालें. पण ही सुधारणा इतक्यांत तुमच्यानें होण्यासारखी नसेल, तर **सरकारापासून असा तरी कायदा करून घ्या कीं, पंचवीसपासून चाळीस वर्षांपर्यंत लग्न करूं इच्छिणाऱ्या कोणत्याही वयाच्या वरानें बारावर्षांचे आंतील वयाच्या मुलींशीं लग्न करूं नये.** हिंदुस्थानसरकाराकडे धाडण्यासाठीं तयार केलेल्या पत्राच्या मसुद्यांत चाळीस वर्षांत जे जबरीचे शंभर संभोग हिंदुस्थानांतल्या दोन प्रांतांत झाले म्हणून म्हटलें आहे, व ज्यांपैकीं सुमारें निम्मे दहापासून तेरा वर्षांच्या आंतील वयांचे मुलींशीं झाले, असें सांगितलें [illegible] संभोग करणाऱ्या नवऱ्यांचा वयें दृष्टयांत येतां तर फार चरें होतें. पण तसें करणें ह्या पत्राच्या चतुरलेखकास इष्ट कां वाटलें नाहीं, कोण जाणे. पण जर तीं वयें पुढें येतील तर ते सारे जबरीचे संभोग पंचवीशी उलटलेल्या आणि पचेचाळिशीच्या आंतल्या अविचारी प्रथम वरांनीं, द्विजवरांनीं, किंवा तिजवरांनीं केले असावे, असें दिसून येईल, असें आमचें अनुमान आहे. विवाहघटावर वाग्वशेळीचा खेळ होऊं दिला असतां, तुम्हीं केवढीही खबरदारी ठेविलीत, तरी एखादे वेळीं वाघ शेळीला खाऊन बसेल आणि तुम्हांस राग, लज्जा, व ममता या विकारांपासून होणारा अनिवार्य त्रास सोसावा लागेल । तेव्हां सरकाराकडे सध्यां जी मागणी घालण्याचा विचार चालविला आहे, तिचा नाद सोडून द्या, आणि पंचवीशीच्या पुढल्या आणि पंचेचाळीशीच्या आंतल्या कोणत्याही विवाहेच्छु वरानें बारा वर्षांचे आंतील वयाचे

वधूंशीं विवाह करूं नये, असा कायदेशीर निर्बंध सरकाराकडून करून ध्या, ह्मणजे तुमचा इष्ट हेतु तेव्हांच तडीस जाईल, व तुमच्या तोंडचा कलंक पुसेल. पण जर तुमच्या अंगांत खरोखरींच कांहीं रग असेल, व पूर्व ऋषींनीं घालून दिलेल्या नियमांची जी दृढ भक्ति तुह्मांस आहे म्हणून वरकरणीं तुह्मीं नेहमीं ह्मणत असता, तिचा एक शतांश जर तुमच्या अंगांत खरोखरींच वास करीत असेल, व त्या मर्द आर्यांचे केवळ मिथ्याभिमानी वंशज तुह्मी नसाल, तर त्यांच्याप्रमाणें आपल्या हातून पौरुषाची कृत्यें होण्यासाठीं सोळा वर्षेपर्यंत बापानें आपणास वाटेल तशा रीतीनें स्नेहपूर्वक आपल्या घरीं आपल्या मुलींचें संगोपन करावयाचें, आणि तिला तें वय प्राप्त झाल्यावर, आपल्या व तिच्या संमतीनें योग्य वर पाहून त्याच्या स्वाधीन तींस करावयाचें—अशी चाल घाला, आणि येथून पुढें होणाऱ्या संततीच्या मानास आणि कृतज्ञतेस पात्र व्हा ! एकदां असें करण्याचा निश्चय कराल तर साऱ्याच कटकटींतून सुटाल; आणि एकवार जिवाचा धडा करून अशी रूढि उघडपणें पाडल्यास प्रवृत्त व्हाल, तर ज्यांना अलीकडे कित्येकांनीं 'प्रतिगामी अथवा प्रतिकारी' (Re-Actionists) असें नांव ठेविलें आहे, त्यांपैकीं जे खऱ्या वास्तविक उपयुक्त सुधारणेस मुळींच प्रतिकूल नाहींत, असे इसम तुह्मांस येऊन मिळतील, आणि 'थंडे व गरम' 'उतावीळ आणि मट्ट,' 'सुधारक आणि दुर्धारक' वगैरे संज्ञांनीं अलीकडील वादांत व्यक्त होऊं लागलेल्या मतभेदाचा निरास होऊन, आपण सारे एक दिलानें स्वोन्नति व राष्ट्रोन्नति करण्यास लागूं.

प्लॉट्स् भाड्यानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर–हवाशिर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर–सुधारक, पुणें.

कायदा मागतां ते जात कां करीत नाहीं ?

ज्या लोकांची अद्याप समजूतच अशी आहे कीं, पाश्चात्यांपासून राजकीय गोष्टींत मात्र आपणांस काय तें शिकण्यासारखें आहे, बाकी जी आमची गृहस्थिति आज अनादिकालापासून चालत आली, जिनें मोठाल्या क्रांत्यांशीं टक्कर मारिली, व जिचे पाये भक्कम खडकावर भरले आहेत, तींत ढवळाढवळ करून, पाश्चात्य गृहपद्धतीच्या धर्तीवर ती अंशतःही नेण्याचा प्रयत्न करणारे झाडून सारे वेड्यांच्या इस्पिळांत पाठविण्याच्या योग्यतेचे आहेत, त्या लोकांनीं ' आह्मांस ही तुमची सुधारणा नको व तुह्मांस आमचे ऐकावयाचेंच नसेल तर, करा वेगळी जात आणि व्हा मोकळे ' असा सल्ला द्यावा, याचें आह्मांस नवल वाटत नाहीं परंतु ज्यांचीं मतें वरच्यासारखीं नाहींत, व इंग्रजी राज्यव्यवस्थेप्रमाणें त्यांची गृहस्थितीही बऱ्याच गोष्टींत अनुकरणीय आहे, अशी ज्यांची खात्री झाली आहे, व ती ज्यांनीं स्पष्ट शब्दांनीं व्यक्तही केली आहे, अशा लोकांनींही ' कायदा नको ' असें आपण एकदां प्रतिपादिलेलें सोडावयाचें नाहीं, एवढ्याच दुराग्रहावर ' बाप दाखवा नाहीं तर श्राद्ध करा ' या न्यायाचा अवलंब करावा; व ' कायद्याचें तरी नांव सोडून द्या. नाहींतर वेगळी जात तरी करा ' असा मोठ्या गंभीरपणानें उपदेश करण्यास प्रवृत्त व्हावें, याचें आम्हांस राहून राहून आश्चर्य वाटतें त्यांस हें कळत नाहीं कीं—

श्रुतिस्तु वेदोविज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः
योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद्द्विजः
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः

या मनूच्या कायद्याची अंमलबजावणी सर्व कालीं व सर्व स्थळीं होत रहाणें अशक्य असल्यामुळें ' बाप दाखवा नाहीं तर

श्राद्ध करा ' हेंही तर्कशास्त्र नेहमीं व चोहींकडे निर्दोषच मानलें जाईल, असें नाहीं. तसेंच ' सामाजिक गोष्टींत कायदा नसावा हें युरोपियन ऋषींचें सूत्रही सर्वच स्थितींत लागू पडण्यासारखें नाहीं. त्यासही अपवादस्थलें आहेत. ' एकाद्या पदार्थास गति मिळाली ह्मणजे ती तशी संतत चालू असते ' हा पदार्थविज्ञान-शास्त्राचा नियम सामान्यतः जरी खरा आहे, तथापि त्यास पदोपदीं अपवाद दिसतात. मग जड पदार्थही जर एका सृष्टि-नियमानें बांधले जात नाहींत, तर हवापाणी, चालीरीति, आचार-विचार, धर्मसंस्था, शिक्षणक्रम वगैरे असंख्य कारणांनीं प्रति-क्षणीं भेद पावणाऱ्या सचेतन मानवी प्राण्यांच्या समाजास सर्व स्थितींत एकाच सूत्रानें बांधूं पहाणें किती हास्यास्पद आहे, हें अधिक स्पष्ट करून दाखविण्याची मुळींच अवश्यकता नाहीं.

आतां ' जात करा ' हा आमच्या बंधूंचा उपदेश जर खरोखरच खोडसाळपणाचा नसेल, व कायदा मागण्यापेक्षां जात केल्यानें सुधारणा जर अधिक त्वरित, अधिक व्यापक, व सुखकर होणें शक्य असेल, तर या आमच्या मित्रांनीं ' जात करा अशी आह्मांस मसलत देण्याचें सोडून ' चला आपण जात करूं' या ' असाच उपदेश केला असता कारण कीं, बोलण्याप्रमाणें

वाक्यमीमांसा आणि वाक्यांचें पृथक्करण.

An inquiry into the nature of sentences with An Analysis of them.

कै. गो. ग. आगरकर एम. ए. कृत. विद्यार्थ्यांस अत्यंत उपयुक्त असें हें पुस्तक (३ री आवृत्ति) तयार होतांच पाठवूं. किं. २ आणे.

मॅनेजर—इकॉनॉमिकल पब्लिशिंग ॲण्ड सेलिंग एजन्सी ७८२ सदाशिव, पुणें.

करून दाखविण्याचें धैर्य नसल्यामुळें जसे कायदेवाले भेकड ठरतात, व त्यांचें पुढारित्व जसें त्यांच्यापासून हिसकावलें जातें, त्याप्रमाणेंच सुधारणा पाहिजे म्हणणारे बेकायदेवालेही उदाहरण घालून देईपर्यंत भेकड कां मानले जाऊं नयेत ? व त्यांच्या जवळच तेवढें पुढारित्वाचें पदक कां राहूं द्यावें ? याची आमचे बेकायदेवाले फोड करतील काय ? हो. अलबत. याची फोड पुष्कळ वेळ केली गेली आहे. ती काय बरें ? ती इतकीच कीं, ज्यांस लोकनायकाचें काम करावयाचें असेल, त्यांनीं लोकांचेंही कांहीं ऐकिलें पाहिजे. प्रत्येक गोष्टींत आपलाच हेका चालवून उपयोग नाहीं; कांहीं कांहीं गोष्टींत त्यांच्याच धोरणानें घेतलें पाहिजे. बरें ठीक. आमच्याही मतें वरील उपदेश खचित गृहणीय आहे, व आह्मांस तर वाटतें कीं आम्हीही त्यांस सोडून वागत नाहीं. वाः ! मग कायदा कां मागतां ? लोक कायद्याच्या विरुद्ध असतां तो मागत बसणें म्हणजे कांहीं लोकांच्या धोरणानें चालणें न हे ! यावर आम्ही असें उत्तर देतों कीं, लोकनायकांनीं कांहींसें लोकांच्या धोरणानें घेतलें पाहिजे, हें जरी आम्हांस पूर्णपणें संमत आहे,तथापि कायदा हा शब्द तोंडावाटें काढला कीं, लागलाच लोकांच्या धोरणानें न वागण्याचा आरोप आम्हांवर कसा लागू होतो, हें मात्र दुराग्रहाच्या तर्कशास्त्रावांचून सिद्ध करून देतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. लोकनायकांनीं जसा अंशतःलोकमताचा आदर केला पाहिजे, त्याप्रमाणें लोकांनींही नायकाच्या मताचा अंशतः अंगिकार केला पाहिजे, हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. परंतु सर्व तंटा कायतो वरील वाक्यांतील 'अंशतः' या अज्ञात संख्येची किंमत ठरविण्यांत पडला आहे. बालविवाहाच्या दुष्ट प्रचारापासून होणारे सर्व अनर्थ टळण्यास. मुलींची विवाहमर्यादा निदान सोळा वर्षांपर्यंत तरी गेली पाहिजे, हें, विचार करण्याची इच्छा असल्यास, कोणासही सहज रःम-

जण्यासारखें आहे. परंतु रजोदर्शनानंतर कन्येचा विवाह करणें म्हणजे नरकाची सामुग्री करण होय, हा आमच्या लोकांचा समज जोंपर्यंत शिथिल झाला नाहीं, तोंपर्यंत १६ वर्षांपर्यंत कायद्यानें मुळींच लग्नं बंद करूं पहाणें म्हणजे अत्यंत जुलूम होय, ही गोष्ट कायदा मागणारे पूर्णपणें जाणून आहेत, व असा कायदा करावा, असें कोणीही सुचविलें नाहीं. कायद्याची इयत्ता कायती १० पासून १२ वर्षांच्या दरम्यानच सुचविली जात आहे; व बारा वर्षांपर्यंत मुली अविवाहित रहाणें हें कांहीं लोकाचाराच्या विरुद्ध आहे, असें कोणास प्रतिपादितां येणार नाहीं. तेव्हां अशा रीतीनें कायदेवाल्यांची परमावधीची इयत्ता जर बारा वर्षांपुढें गेली नाहीं तर ते लोकांच्या समजुतीचा आदर करीत नाहींत, व लोकांच्या धोरणानें चालत नाहींत, हें बेकायदेवाल्यांनीं कोणत्या आधारानें ठरविलें, याचा आम्हांस उमज पडत नाहीं. असो; इसाबनीतींतील लांडगा आणि कोंकरूं या गोष्टींतल्या लांडग्याप्रमाणें 'तूं नाहीं तर तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील,' या न्यायानेंच कांहींतरी दोष कायदेवाल्यांच्या माथीं मारण्याचा बेकायदेवाल्यांनीं निश्चयच केला असल्यास, 'ब्रम्हापि तं नरं न रंजयंति' असेंच म्हटलें पाहिजे. दुराग्रहाच्या तर्कशास्त्रांतील दोष दाखविण्यास दुसरा मार्ग नाहीं. कायदा करून घेतला असतां नुकसान होईल, असें दाखवितां येईना म्हणून वाटेल तें बहतक सुटावें हा तर या बेकायदेवाल्यांचा नित्याचा क्रम. 'या पारशानें आपल्या जातीची सुधारणा करण्याचें सोडून हिंदूंच्या सुधारणेची उठाठेव कां करावी'? हा

संगीत सुविचार-विजय नाटक.
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत
किं. ०८
सुधारक ऑफीस, पुणें.

मुद्दाही वरच्याच मालेंतील आहे. पण या आमच्या मलबारच्या द्वेष्ट्यांस आह्मी असें विचारतों कीं, हिंदुस्थानांतील मद्यसेवनाचा दुष्ट प्रघात नाहींसा करण्याकरितां एकादा केन, देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत आपणांस उपदेश करीत फिरला, व त्या घातक व्यसनाचा बीमोड करण्यास कायदा मागूं लागला तर त्यांत मात्र आम्हांस कांहीं वावगें दिसून येत नाहीं, आणि विचारा मलबारी तेवढाच आमच्या तिरस्कारास पात्र होतो, याचें इंगित काय? केन साहेबास जर कोणी असें म्हणता कीं, 'अरे बाबा आपल्या स्वतांच्या देशांतलें दारूचें व्यसन नाहींसें करण्याचें सोडून तूं आमच्या का वाटे जातोस? तर आह्मीं त्याची काय किंमत केली असती? व ताच आक्षेप मलबारीवर आणणारांचीही किंमत तीच होते, हें कां नव्यानें सांगितलें पाहिजे?

असो, आतांपर्यंत आम्हीं जें लिहिलें आहे तेवढयावरून कायदा मागणारे लोक समाजाच्या धोरणानें वागत नाहींत, समाजास अज्ञातपूर्व व अरूढ अशा गोष्टींबद्दल कायदे करवून त्यांच्यावर मोठा जुलूम करीत आहेत, व यांना सारी सुधारणा एकदम करायला पाहिजे अ हे वगैरे आक्षेपांस ते पात्र नाहींत, व म्हणून त्यांस वेगळीं जात करा अशा उपदेश करण्याचें प्रयोजन नाहीं, असें दिसून येणार आहे. आतां 'जात करा' असें न म्हणतां, 'जात करूं या' असें म्हणणारांविषयीं दोन शब्द लिहून आम्ही हा विषय संपवितों व त्यावरूनही, जात करण्यापेक्षां कायदा मागणें हेंच इष्ट आहे असें दिसून येईल.

'जात करूं या' असा सल्ला देणारे सुधारणेच्छु व 'जात करा' असें म्हणणारे बेकायदेवाले यांच्यांत फार अंतर आहे. बेकायदेवाल्यांच्या मतें आम्ही जी आमच्या गृहस्थितीविरुद्ध ओरड करितों, ती जणूं काय त्यापासून आमचें स्वतांचें

व्यक्तिशः नुकसान होत आहे म्हणून करतों परंतु 'जात करूं या' म्हणणारे लोक या गृहस्थितीपासून एकंदर देशाचें मोठें नुकसान होत आहे, व तें बंद करण्यास जात करणें हा एक उत्तम उपाय आहे, असें म्हणणारे आहेत. ते म्हणतात कीं, जरी आपण एक बालविवाहाचा कायदा केला तथापि त्याचे योगानें फार तर १२ वर्षेपर्यंत मुलगी अविवाहित राहील. परंतु ऋतु-प्राप्तीपुढेंही तिला अविवाहित ठेवण्यास वेगळी जातच केली पाहिजे. तसेंच विधवांवर होत असलेला जुलूम दूर करण हा जर सुधारणेच्या अनेक गोष्टींपैकीं एक गोष्ट असेल, तर तीही वेगळी जात केल्या-वांचून होणार नाहीं. परंतु या वर्गांतील लोकांनीं आमच्या मतें जात करण्याच्या सर्व अडचणींचा विचार केला नाहीं. ज्या कारणांकरितां आम्ही कायदा मागतों, त्याच कारणांकरितां जात करणें योग्य नाहीं. बालविवाहाची चाल वाईट आहे, अशी पूर्ण समजूत असणारे लोक ८ व्या किंवा ९ व्या वर्षी आपल्या मुलींचीं कां लग्नें करतात बरें? याचें कारण इतकेंच कीं, यापुढें मुलगी अविवाहित राहिल्यास लोक संशय घेतात, व तेणेंकरून मुलीस योग्य स्थळ मिळल कीं नाहीं अशी भीति उत्पन्न होते. कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे हे ब्राह्मण असून ही त्यांच्यांत परस्पर बेटीव्यवहार होत नसल्यामुळें, निवडणूकी-चा प्रदेश आधींच संकुचित झाला आहे तो अधिक संकुचित हा ऊं न देण्याविषयीं झटणें. हें प्रत्येक पित्याचें कर्तव्य होऊन बसतें. दुसरें कदाचित् काहीं तजविजीनें मुलीचें नुकसान न होऊं देण्याविषयीं खबरदारी घेणें शक्य असलें, तथापि वडील

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं. ०५

खेडकरवैद्य ॲन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

माणसांच्या इच्छेविरूद्ध जातां येत नाहीं. तेंच कायदा असला म्हणजे सर्वच मुली १२ वर्षांपर्यंत अविवाहित राहिल्यामुळें, योग्य स्थळ मिळण्याची काळजीही दूर होईल, व वडील माणसें ही नालुप होण्याची भीति नाहीं. आतां अशा रीनें वडील माणसांचीं तोंडें बंद करणें म्हणजे केवळ मेकडपणा आहे, असें कित्येकांस वाटेंल; परंतु काळ्या रंगाची, आखुड शिंगाची, व पुष्कळ दुध देणारी गाय मिळेपर्यंत दूधच घ्यावयाचें नाहीं, असा सर्वांनीं निश्चय केल्यास कसें होईल हें सांगत बसण्याची अवश्यकता नाहीं. कायद्यानें मनें दुखवतात, तो करूं नये; अवज्ञा केल्यानें मनें दुखवतात, तेव्हां तसें करूनही त्यांची मर्जी मोडूं नये; फार दिवसांच्या रूढीनें त्यांचे विचार निश्चित झाले असल्यामुळें त्याविरुद्ध त्यांच्याशीं वाद करणें म्हणजेही, त्यांचीं मनें दुखवण्यासारखें आहे, म्हणून त्याच्याही भरांस पडूं नये, असाच वाद घालीत बसल्यास त्यास आमच्या जवळ उत्तर नाहीं. प्रवाशास जसा नेहमींच सपाट रस्ता मिळणें अशक्य आहे, व नेहमींच प्रातःकाळचा शीतल मंद वारा अनुभवितां येणें नाहीं, तशीच सुधारकाचीही गोष्ट आहे. सारासार विचार केला पाहिजे एवढें मात्र खरें. असो.

तेव्हां जोंपर्यंत मनुष्यस्वभाव बदलला नाहीं तोंपर्यंत वडिलांची मर्जी होईल तितकी संभाळण्यास झटणें, व आपल्या पोटच्या गोळ्यांची काळजी वाहणें या गोष्टी नाहींशा होणार नाहींत, व यांपासून सुधारणेस येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या म्हणूनच कायदा पाहिजे हें जर खरें असेल, तर जात कशी

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०५

लाल्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

करतां येईल ही शंका आहे. कारण जात केल्यानें आपल्या सर्व व्यवहाराचा प्रदेश फारच संकुचित होणारा आहे, व तेणें-करून फार त्रास भोगावा लागेल. व वडिलांची मर्जी मोडतां न आल्यामुळें, मुलींस एकादेदुसरें वर्ष अविवाहित ठेवण्यास जर फारसे लोक तयार नाहींत, व देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे यांच्यांतही परस्पर विवाह होण्यास जर अद्याप आरंभ झाला नाहीं, तर वेगळी जात करण्यास कितीसे लोक तयार होतील, हा एक प्रश्न आहे. बरें, इतक्याही अडचणी सोसून आपण जात केली, तर लोकसमाज लवकरच आपल्या मागून येईल अशी तरी खात्री आहे काय ? व अशी खात्री देण्याजोगी जर वस्तुस्थिति नाहीं, तर वेगळी जात केल्यानें धड ना स्वार्थ ना परमार्थ असा प्रकार होणारा आहे. एकंदर समाजाचें पाऊल पुढें पडावें हा तर आपला मुख्य उद्देश, व तो जर साधत नाहीं, तर आपणा स्वतांस ताप करून घेऊन आपल्या मुलाबाळांच्या भावी कल्याणाविषयीं बेफिकीर राहणें हें सर्वथा अयोग्य होय. शिवाय, जात करण्यापासून केवळ स्वतांचें हित साधावयाचें नसल्यामुळें व सर्वच सुधारणा एका घावानें करूं पाहण्यानें आपल्याविषयीं लोकांच्या मनांत अविश्वास उत्पन्न होतो, असा कित्येकांचा आक्षेप असल्यामुळें ब्राह्मण सुधारकांची एक जात, शेणवी सुधारकांची दुसरी जात, परभूंची तिसरी जात असे अनेक भेद मात्र होणार, व इतकेंही करून समाज तर अनुक-रण करण्यास तयार नसणार. मग जात करणें म्हणजे आपलें व आपल्या पुढील पिढ्यांचें जाणूनबुजून नुकसान करणें, व

लेखकांस योग्य मोबदला देऊन आहीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,- सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

आधींच एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चिमेस असें करून टाकणाऱ्या दुष्ट जातीभेदाचें बंड निरर्थक वाढविण्याच्या पातकाचें भागीदार होणें नाहीं काय ? कन्या ऋतुमती झाल्या-वर तिचा विवाह करण्यानें जातीबाहेर जावें लागण्याचें कारण नाहीं तसें झाल्यास गोप्रदान करावें, किंवा तिच्या जितक्या पाळ्या झाल्या असतील तितक्या ब्राह्मणांस भोजन घालून दक्षिणा द्यावी, असें 'संस्कारकौस्तुभांत' सांगितलें आहे. आतां पुनर्विवाहास जरी शास्त्राधार आहे, तथापि रूढीच्या बलवत्तर प्रभावामुळें लोक दुराग्रहानें तो कबूल करीत नाहींत हें खरें आहे. व हा अन्याय दूर झाला पाहिजे हेंही खरें आहे. परंतु पाच पन्नासांची जात करून म्हणजे हा अन्याय खात्रीनें बंद होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. बालविवाहाच्या कायद्यानें जसें निदान १२ वर्षांच्या आंतील सर्व कन्यांचें वैधव्य खात्रीनें बंद करतां येईल, तसें जात करून समाजाच्या बऱ्याच भागांतून हा कलंक नाहींसा होण्याची आशा नाहीं. केशवपन केलें नाहीं तर कोणी जातीबाहेर टाकतो असें थोडेंच आहे. शारदासदनासारख्या ठिकाणीं त्यांस ठेवून, दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याच्या दीन-स्थितींतून त्यांची सुटका केल्यास कोणी बहिष्कार घालतो असें नाहीं; पण तेंही करण्यास समाज तयार नाहीं, मग असें ढळढळीत आपणांस दिसत असून वेगळी जात केल्यानें हा अन्याय दूर होईल असें आपण कसें मानावें ? हजारों वर्षांच्या सवयीनें आमचीं मनें या गोष्टीसंबंधानें इतकीं घट्ट होऊन गेलीं आहेत कीं, त्यांच्यावर कितीहि आघात केले तरी त्यांस कांहींही होत नाहीं. 'बोलणें फार झालें' ही हाकाटी 'जो उठला तो इंग्रजी शिकवी' या हाकाटीप्रमाणेंच भ्रामक आहे. या गोष्टींतील अन्याय लोकांस कळून येऊन तो बंद करण्याकडे त्यांची साक्षात् प्रवृत्ति होण्यास झालें हें बोलणें व लिहिणें कांहींच नाहीं. प्रत्येक शहरांत, प्रत्येक

गांवांत, खेड्यांत यासंबंधानें लोकमत तयार करण्यास झटलें पाहिजे. प्रत्येक सभागृहांत, बाजारांत, चव्हाट्यावर, व्यास-पीठावर, कीर्तनांत, पुस्तकगृहांत जिकडेतिकडे याविषयीं एकसारखी चर्चा चालू झाली पाहिजे, व अशी चळवळ करणाऱ्या सुधारक मिशनरींची जात होईपर्यंत वेगळी जात करण्यापासून फलप्राप्ती होण्याचा संभव नाहीं.

हिच्या नांवानेंही तीच रड.

आमच्या वाचकांच्या पारतंत्र्याविरुद्ध, अज्ञानाविरुद्ध, ढिल्या पोषाखाविरुद्ध, तऱ्हेवाईक बहुमोली दागिन्याविरुद्ध किंवा आमच्या धर्मांतील कित्येक हास्यास्पद आचारांविरुद्ध कोणा कांहीं लिहिलें तर ज्याचें माथें फिरून जातें, असे लोक व्यापारांय किंवा राजकीय विषयांच्या चर्चेचे मोठे चहाते असतील, व व्यापारांच आणि राजकीय खटपटींत आपलें मन घालून त्यासंबंधानें आपल्या पद्-रास कांहीं खार लावून घेत असतील, असें म्हणावें तर त्याची मोठी शंका आहे. कारण, धार्मिक व सामाजिक सुधारणेविषयीं आमच्या लोकांत जितकी अनास्था व विरोधबुद्धि दिसते, ति-तकी आस्था व कर्मोद्युक्तता व्यापारांय व राजकीय सुधारणेवि षयीं दृष्टीस पडती तर आजमितीस सर्व देशभर यवढी अन्नान्न-दशा आणि इतकी परवशता कां दृष्टीस पडती ? कोण काय

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

पाहिजे तें म्हणो, आह्मांस तर अलीकडे असें वाटूं लागलें आहे कीं, क्षुद्र स्वार्थसाधनाविषयीं पराङ्मुख होऊन, केवळ राष्ट्रीय किंवा केवळ सार्वजनिक हिताच्या कोणत्याही लहान किंवा थोर गोष्टीसाठीं निरपेक्षबुद्धीनें व निरलसतेनें झटणारा मनुष्य लाखांत एक सुद्धां आढळणार नाहीं ! आज ज्या राजकीय हक्कांचा उपभोग आह्मी घेत आहों, किंवा यांत्रिक शिक्षण आणि व्यापारवृद्धि यांविषयीं ज्या थोड्याबहुत सोई करण्यांत आल्या आहेत, त्यांपैकीं एक तरी आमच्या परिश्रमाचें फळ आहे, असें कोणी छातीवर हात देऊन ह्मणूं शकेल काय ? आपल्या व परक्या राजांपुढें आणि बादशहांपुढें, किंवा धर्मगुरूंपुढें जे आम्ही हजारों वर्षें ढोकीं व गुडघे घांशीत आहों, व **राजा कालस्य कारणम्** हें परावलंबमूर्ची राजकीय तत्त्व ज्या आमच्या हाडामासांत खिळून गेलें आहे, त्या आम्हीं कोणतीही सुधारणा स्वपराक्रमानें करण्याची व्यर्थ वल्गना कशासाठीं करावी ? ज्या जुन्या पद्धतीच्या लोकांना आपल्या गांवाचाहेर किंवा प्रांतांचाहेर काय चाललें आहे याची नीट कल्पना नाहीं, अशांनीं जुन्या विचाराला मगरमिठी घालून बसून, त्यांविरुद्ध अलीकडील सुशिक्षितानें किंवा सरकारानें येवढेंसें कांहीं करावयाचें म्हटलें कीं गयावया करीत सुटावें, हें नीटच आहे. जुन्यापैकीं एखादा महामहोपाध्याय कां घ्याना ? तो म्हणजे तुमच्या राष्ट्रसभेस अनुकूळ अमेल, आणि संमतीचे वय वाढविण्यास मात्र प्रतिकूळ अमेल, असें सहसा व्हावयाचें नाहीं, हें निदान पुण्याच्या लोकांना तरी सांगावयास नको आहे. जितका सामाजिक विचारांचा तितकाच राजकीय अथवा व्यापारीय विचारांचा संस्कार त्याच्या बुद्धीवर झालेला असतो ! अर्वाचीन कालांतील हरएक प्रकारची चळवळ याच्या संकुचित दृष्टीमुळें व अज्ञानामुळें त्यास विनाशक व भयप्रद वाटत असल्यामुळें, तो तिचा संग टाळण्यासाठीं तोपासन होईल

तिकका दूरदूर पळत असतो, आणि आपल्या भेकडपणावर आणि पुराणप्रियतेवर मिथ्या देशाभिमानाचें आणि लोकहितवादित्वाचें अवगुंठन घालीत असतो ! असें नसेल तर वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य, स्थानिक स्वराज्य, ज्यूरीची पद्धत किंवा अशाच प्रकारच्या इतर गोष्टींपैकीं अमुक एक गोष्ट संपादण्याविषयीं यानें खटपट केली व तीं याच्या मेहनतीनें आम्हांस प्राप्त झाली, असें कोणीं तरी सिद्ध करून दिलें पाहिजे. तात्पर्य, आमचे जुने व बडे लोक जितके सामाजिक सुधारणेविषयीं तितकेच राजकीय व व्यापारीय सुधारणेविषयीं अज्ञान व उदासीन आहेत, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. **असें नसतें तर राष्ट्रसभेच्या नांवानेंही पुनः पुनः तीच रड कां ऐकावी लागती !** पण या राजकीय परिषदेचें महत्व तरी कळलें आहे कोणाला ? मांडलिकांना, छोटेखानी राजेरजवाड्यांना, व मोठमोठ्या जहागीरदारांना असें वाटत आहे कीं, ही सामान्य लोकांची सभा महाराणीसरकारची दुस्मानगिरी करणारी आहे, आणि म्हणून तीस आपली अनुकूलता आहे असें दाखविणें, किंवा कोणत्याही प्रकारें तिला मदत करणें, हें पोलिटिकल अधिकाऱ्यास आपल्या राजनिष्ठेविषयीं अंदेशा येण्यास कारण होणार आहे. सबब, तीपासून आपणांस जितकें अलिप्त राहवेल तितकें आपण राहिलों तरच आपल्या गाद्या व आपलें मुलख कायम राहून, प्रजेच्या जिवावर आपली चैन चालणार आहे ! हिंदुस्थानांत लहान मोठीं मिळून पांचशें संस्थानें तरी असतील. इतक्यांनीं राष्ट्रसभेस प्रतिवर्षीं अगदीं स्वल्प मदत केली

समाज--शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ८८

सुधारक ऑफीस, पुणें.

तरी त्याचा संसर्ग त्यांपर्यंत अद्यापि कधींच जाऊन न पोहोंचल्यामुळें ते वैदिक कालापासून आहेत त्यां स्थितींत आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं येणेंप्रमाणें येथील अनेक प्रकारच्या वर्गांतील लोकांची हालहवाल असल्यामुळें इतर संस्थांप्रमाणें आमची राष्ट्रसभाही अशा तशीच चालली आहे, व दुर्दैवानें ह्यूम तिचें चिटणीसपण सोडतील तर ही आणखी दहा पांच वर्षें चालेल किंवा नाहीं, याची शंका आहे ! तर मग आतां करावें तरी काय ? निरुपाय ह्मणून स्वस्थ बसावें कीं कांहीं धडपड करून पहावी. अर्थात् ज्याला अर्वाचीन सुशिक्षणाचा कांहीं संस्कार झाला असेल तो कांहीं धडपड करून पहावी, असें ह्मणेल हें उघड आहे. पण हीं धडपड कोणीं करावी ? आमच्या मतें तीं करणें सद्यःस्थितींत आमच्या वकिलांचें व पत्रकर्त्यांचें कर्तव्य आहे. पैकीं पहिल्यांकडून तें थोडेबहुत बजावलें जातें; पण दुसऱ्यांकडून मात्र तें हवें तसें बजावूं लागलें नाहीं. या आरोपाचा पुरावा पुढेंमागें दिला पाहिजे, नाहींतर बेअब्रूची फिर्याद करून घेण्यास तयार झालें पाहिजे, हें आम्ही जाणून आहों !

मूळ पाया चांगला पाहिजे.

धर्मसुधारणा, आचारसुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे वर्ग केवळ व्यवस्थेकरितां केलेले आहेत. त्यांपैकीं अमुकास पहिला नंबर, अमुकास दुसरा नंबर, अमुकास तिसरा नंबर, असें कांहीं

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकमेंच साप्ताहिक. व. ८. हं. सह १८१३

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

तरी तिची किती दगदग चुकणार आहे. पण जर या संस्थानिकांस असें वाटत असेल कीं, या सभेस आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें साहाय्य दिलें तर लाट साहेब आपणांस फांशी देतील, अथवा आपला मुलूख खालसा करून आपल्या हातीं चौपदरी देतील तर, राष्ट्रसभेच्या फंडास एक रुपया तरी देण्याची त्यांची छाती कोठून होणार ? या आमच्या लिहिण्यास मुळींच अपवाद नसेल, असें आमचें म्हणणें नाहीं. पण असला तरी तो इतका स्वल्प आहे कीं, त्यामुळें आमच्या सामान्य विधानास क्षीणता न येतां, उलट त्याचें पुष्टीकरणच होतें. ही या धनाढ्य बड्या लोकांची दशा ! आतां सरकारी नोकर ते तर बोलून चालून सरकारी नोकर ! ते केवढेही गारवाले व अक्कलवाले असले म्हणून राष्ट्रसभेच्या कामास उघडपणें मदत करतील कीं काय ? करतील तर दुसरे दिवशीं आपल्या अधिकारास मुकतील व अन्नास मोताद होतील ! आपला नोकर राष्ट्रसभेस अनुकूळ झाला, आणि तिच्या प्रीत्यर्थ कांहीं हालचाल करूं लागला तर आपली धडगत होणार नाहीं. अशी सरकारास दहशत पडून, त्यानें म्युनिसिपॅलिट्या आणि लोकल बोर्ड्स यांतील गरीब मेंढराळांच्या संबंधानेंही खरमरीत ठराव करून सोडिले आहेत. राहतां राहिले शहाणेसुरते शेटसावकार हे तुमच्या जुन्या लोकांप्रमाणेंच राष्ट्रसभेविषयीं गूढ अज्ञानांत आहेत. राष्ट्रसभेस मदत करण्यानें प्राप्तीवरील कर झटदिशी कमी होता, किंवा एखाद्या मोठ्या जिनसावरील जकात उठती तर त्यांनीं तुमच्या राष्ट्रसभेस रुपयामागें दमडीटोलीची मदत केली असती. पण तसें करून दाखविण्याचें सामर्थ्य या सभेच्या हातांत नसल्यामुळें, हे लोक तीविषयीं अगदीं बेफिकीर आहेत. ओंस लटलें तरी चालेल. बाकी राहिलेल्या नांग्यांचा तर विचार करण्याचीच गरज नाहीं. ते बोलून चालून नांगरे ! हवी तितकीं राज्यांतरें व धर्मांतरें झालीं

तरी त्याचा संसर्ग त्यांपर्यंत अद्यापि कधींच जाऊन न पोहोंचल्यामुळें ते वैदिक कालापासून आहेत त्या स्थितींत आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. येणेंप्रमाणें येथील अनेक प्रकारच्या वर्गांतील लोकांची हालहवाल असल्यामुळें इतर संस्थांप्रमाणें आमची राष्ट्रसभाही अशा तशीच चालली आहे, व दुर्दैवानें ह्यूम तिचें चिटणीसपण सोडतील तर ही आणखी दहा पांच वर्षें चालेल किंवा नाहीं, याची शंका आहे ! तर मग आतां करावें तरी काय ? निरुपाय ह्मणून स्वस्थ बसावें कीं कांहीं धडपड करून पहावी. अर्थात् ज्याला अर्वाचीन सुशिक्षणाचा कांहीं संस्कार झाला असेल तो कांहीं धडपड करून पहावी, असें ह्मणेल हें उघड आहे. पण ही धडपड कोणीं करावी ! आमच्या मतें तीं करणें सद्यःस्थितींत आमच्या वकिलांचें व पत्रकर्त्यांचें कर्तव्य आहे. पैकीं पहिल्यांकडून तें थोडेबहुत बजावलें जातें; पण दुसऱ्यांकडून मात्र तें हवें तसें बजावूं लागलें नाहीं. या आरोपाचा पुरावा पुढेंमागें दिला पाहिजे, नाहींतर बेअब्रूची फिर्याद करून घेण्यास तयार झालें पाहिजे, हें आम्ही जाणून आहों !

मूळ पाया चांगला पाहिजे.

धर्मसुधारणा, आचारसुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे वर्ग केवळ व्यवस्थेकरितां केलेले आहेत. त्यांपैकीं अमुकास पहिला नंबर, अमुकास दुसरा नंबर, अमुकास तिसरा नंबर, असें कांहीं

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकमेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १८१३

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

ठरवितां येणार नाहीं. ते सर्व मनुष्यांच्या वेगळाल्या व्यवहारांचे व्यंजक होत. व त्या सर्वांची एक समयावच्छेदेंकरून सुधारणा होत जाणें, म्हणजेच मनुष्यांची किंवा त्यांनीं वसविलेल्या राष्ट्रांची सुधारणा झाली, असें म्हणतां येईल, हें आम्हीं वेळोवेळीं दाखविलेंच आहे. परंतु तें सर्वांस संमत नाहीं, असें भोंवतालच्या स्थितीवरून दिसतें. कित्येकांस वाटतें कीं, राजकीय सुधारणा सोपी आहे. सामाजिक सुधारणेविषयीं जशीं रगेंं पडतात, तशा या राजकीय सुधारणेची गोष्ट नाहीं. त्याविषयीं सर्व लोकांचें एकमत आहे. याकरितां सामाजिक सुधारणेविषयीं व्यर्थ खटपट करून, लोकांच्या शिव्याशापास पात्र होण्यापेक्षां, व आपसांत कलह माजवीत बसण्यापेक्षां, सर्वांनीं एक दिलानें राजकीय सुधारणेच्या मागें लागावें, हा उत्तम पक्ष होय. वरील उपदेश योग्य आहे, अशी आमची खात्री असूनही, लोकसमुदायास न रुचणाऱ्या गोष्टी आम्ही आग्रहानें पुढें आणीत असतों, तर त्यांत आमचाच दोष झाला असता. परंतु वरील उपदेश करणारांनीं नुसती वर वर नजर दिली आहे, त्यांनीं शांतपणानें खोल विचार केला असतां, त्यांचें मत खचित आमच्याप्रमाणें झाल्यावांचून रहाणार नाहीं, व तें होईपर्यंत, ज्या राजकीय सुधारणेपासून आपले सर्व पुरुषार्थ आपणांस प्राप्त होतील अशी कित्येकांची समजूत आहे, ती राजकीय सुधारणाही होणें शक्य नाहीं, हें आम्ही दाखविणार आहों.

राजकीय सुधारणा आम्हांस पाहिजे, असें आम्ही कां म्हणतों ? तर त्यापासून नफा होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. सामाजिक सुधारणा आम्हांस कां नको ? त्यापासून आमचें नुकसान होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. तात्पर्य कोणती गोष्ट इष्ट आहे, व कोणती गोष्ट इष्ट नाहीं, हें आपण केवळ नफ्यातोट्याच्या तारतम्यावरूनच ठरवितों व येथेंच चुक होते.

हें आमचे म्हणणें सकृत्दर्शनीं चमत्कारिकसें भासेल, व तें नसें भासावें यांतही नवल नाहीं. कारण कीं आजपर्यंतचे जगाचे सर्व व्यवहार नफातोट्यावर दृष्टी देऊनच झाले आहेत, हल्लींही होत आहेत, व पुढेंही होत रहातील, याविषयीं आम्हासही शंका नाहीं. मग असें असून, येथेंच चूक होते, असें आम्ही कसें म्हणतों, अशी पृच्छा सहज होणारी आहे, व त्याचें उत्तर देण्याच्या ऐवजीं आम्हीही वाचकांस कांहीं उलट प्रश्न करतों, व त्याचें जें उत्तर तेंच वरील प्रश्नाचें उत्तर होय. धर्म या सदराखालीं ज्या शेंकडों बऱ्यावाईट गोष्टी आपण करतों, त्यांपैकीं बहुतेक फाय-द्याच्या दृष्टीनेंच आपण करतों. अमुक झाल्यास अमुक करीन, तमुक झाल्यास तमुक करीन, अशा अटीवरच शेंकडा नव्याण्णव लोकांचे शेंकडा नव्याण्णव धर्माचार होत असतात हें आपणा सर्वांस माहीत आहेच. बायकांचें वपन कां करावें ? तर त्यांच्या कचरीबंधानें नवऱ्यास बांधलें जाऊं नये म्हणून. ऋतुप्राप्तीपूर्वीच कन्येचा विवाह कां केला पाहिजे ? तर आपल्या ४२ कुळ्या नरकांत जाऊं नयेत म्हणून. सती कां जावें ? तर तसें केल्यानें अनंत कालपर्यंत स्वर्गसुख मिळेल म्हणून. तात्पर्य कांहींना कांहीं फायदा होईल अशी खरी किंवा खोटी समजूत झाल्यावांचून, तो तो मनुष्य तें तें धर्माचरण करीत नाहीं. परंतु असें असूनही निष्काम भक्तीचा महिमा अधिक कां वर्णिला जावा ? या प्रश्नाचें उत्तर ज्यास देतां येईल, त्यास आमच्याही म्हणण्याचा अर्थ समजेल. अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर तें माझें कर्तव्य

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

आहे म्हणून, व अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर त्यापासून मला फायदा होतो म्हणून. या दोन गोष्टींत फारच मोठा भेद आहे. आपलें कर्तव्य समजून एकादी गोष्ट करणारा मनुष्य जसा नेटानें व निश्चयानें ती करतो तसा फायद्यावरच नजर देणारा मनुष्य करूं शकणार नाहीं.

वरील गोष्टी आतां आपण लोकांस प्रिय असणाऱ्या राजकीय सुधारणेसच लावून पाहू कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असले पाहिजेत असें राष्ट्रीय सभेचे चालकही म्हणतात, व इतर सर्व लोकही म्हणतात. परंतु या दोघांची दृष्टी अगदीं वेगळी आहे. ज्या कायद्यांचा अम्मल अमुक एक लोकसमुदायावर होत असेल, ते कायदे करणें हा केवळ त्याच लोकसमुदायाचा हक्क आहे; ते करण्याचा दुसऱ्या कोणासही अधिकार नाहीं. हें प्रमेय पुढें ठेऊन वर्तन करणें, व ज्याचे त्यानें कायदे कल्यास त्यापासून अधिक सुख होतें हा सिद्धान्त पुढें टेवून वागणें यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. पुराणांतरीं वर्णन केलेल्या रामचंद्रापेक्षांही अधिक न्यायी, अधिक प्रजाहितैषी असा राजा असून,त्यानें केलेल्या कायद्यापासून,प्रजेस कितीही सुख होत असलें तथापि ते करण्याचा त्यास अधिकार पोंचत नाहीं, या तत्वावर नजर देऊन कायद्याकडे दृष्टी न देतां आपले गेलेले हक्क योग्य उपायांनीं मिळण्याकरितां जे लोक, हे आपलें कर्तव्य समजून निश्चयानें यत्न करीत आहेत, ते सामाजिक सुधारणा नको व राजकीय सुधारणा पाहिजे, असा आग्रह धरीत नाहींत.

इंग्रज गुन्हेगाराचा न्याय इंग्रज न्यायाधीशानेंच करावा, व नेटिव्ह गुन्हेगाराचा न्याय तेवढा वाटल त्या न्यायाधीशानें करावा, असा पक्षपात कां? गुन्हेगाराचा न्याय तोडणें हें कांहीं त्याच्या रंगावर अवलंबून नाहीं. काळ्या रंगाच्या मनुष्या-

नें एकादा गुन्हा केल्यास त्याचा न्याय करण्याचा ज्यास योग्यता आहे, तोच न्यायाधीश, तोच गुन्हा करणाराचा रंग गोरा असला कीं, त्याचा न्याय करण्यास अपात्र कसा होतो ? हे प्रश्न सर्वांस सुचणें अवघड नाहीं. परंतु त्यांचा योग्य निकाल होण्यास तुमतें त्या प्रश्नांचें शाब्दिक ज्ञान उपयोगी नाहीं. प्रश्न करणाराचें अंतःकरण, व ओंठ यांच्यांत विसंगतता असेल, तर त्यानें कितीही आक्रोश केला तथापि व्यर्थ होय. परंतु त्या दोहों-मध्यें संगती असेल तर, विशेष आक्रोप करण्याचीही जरूर पडत नाहीं. अंतःकरण व ओंठ यांच्यांत तारायंत्र सुरू असेल, तर हळू उच्चारलेल्या शब्दासहीं विलक्षण जोर येतो व त्यांपुढें सर्वांस मान डोलवावी लागते. खऱ्या साध्वीच्या ईषत् वक्रदृष्टीनें मोठमोठ्या बलाढ्य कामांधांची गाळण उडून जाते. आपण स्वतां अन्यायाचें वर्तन करणारास दुसऱ्याच्या अन्याधाबद्दल बोलण्याचा अधिकार पोचत नाहीं इतकेंच नाहीं, तर उलट त्याची जीभ कचरूं लागते, त्याचा शब्द तोंडांतल्या तोंडांत घोंटाळूं लागतो, व असें झालें म्हणजे सिंहाचें कातडें पांघरणाऱ्या गर्दभाच्या, बाहेर डोकावूं पाहणाऱ्या लंबकर्णावरून, त्याची परीक्षा होते, व त्यास दुसरे भीत नाहींत इतकेंच नाहीं, तर स्वतांची फाजिती उडण्याची मात्र उलट पाळी येते.

महाराचा सांवली पडली असतांही विटाळ मानणारे लोक कितीही लांब जिभा करून 'आमचा रंग काळा असला व तुमचा रंग गोरा असला म्हणून काय झालें ' रंगावर कांहीं मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाहीं. ' वगैरे गोष्टी मनिपाडूं लागले तथापि त्यांच्या शब्दास जोर येण्याचा संभव नाहीं, व त्याचा परिणामही

फ्रॉन्ड्स् माझ्यानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें)

मनोरंजन–हुषारीचे, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर–सुधारक, पुणें.

होणें नाहीं. त्या शब्दांस जोर येऊन, इतरांनीं ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास, " ब्राम्हणोस्यमुखमासीत् " हे पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन, आपल्या मांडीला मांडी भिडवून ळांतून बसण्यास महारास मोकळीक दिली पाहिजे. पुरुषाची बायको मेल्यास त्यास जशी पुनर्विवाह करण्यास मोकळीक आहे, याप्रमाणें विधवांसही दुसरा नवरा करण्याची परवानगी पाहिजे. बायकांच्या केसांचा जर मेलेल्या नवऱ्याच्या गळ्यास फांस बसतो, र पुरुषांच्या शेंडीचाही मेलेल्या स्त्रीस कां फांस बसूं नये ? एकास जर कोणी संन्यासी करीत नाहीं तर दुसऱ्याला माच्य द्यायापुढें कां बसवावी ? पुरुषाला बायको आवडत नाहीं, येवढाच शुल्क कारणावरून वस्तुतः कार्डा मोडून देण्याचा घास जर अधिकार आहे, व तसें करून तो जर घ्यावयास होत नाहीं, तर एखाद्या स्त्रीला नवरा आवडत नसल्यास. तिनेही त्याला कार्डा मोडून दिली तर तिच्या नांवानें मात्र खडे त्यानें फोडावेत : अटकाव करणें असेल तर दोघांसही करा, नसेल र दोघांसही मोकळीक द्या. महार आणि ब्राम्हण, विधवा आणि भ्रूर व स्त्री आणि पुरुष यांच्या मर्यादेत अन्यायमूलक व्यवहार द करणें आपल्या स्वतःच्या हातीं असून तें करण्याची ज्यांना तर्ती वासनाही झाली नाहीं, अशा लोकांनीं जिकणारे व जिंकलेले यांच्यांतील भेद मोडून टाकण्याचा विचार मनांत तरी यो आस आणावा? व आणला तर तो सिद्धीस कसा जावा ?

तात्पर्य, लोकांनीं आपल्यासाठीं जसें वागावें असें आपणास ति, तसेंच आपणही दुसऱ्यासाठीं वागण्यास तयार व्हावयाचें. यापासून हित असो वा अहित असो, त्याविषयीं विचार करीत सावयाचें नाहीं. खरें बोलल्यापासून नफा होवो, नुकसान होवो. परंतु तसें करणें हें आपलें कर्तव्य होय, म्हणून जसें खरें बोलावयास पाहिजे त्याचप्रमाणें वागलें असतां तोटा होईल अशी भीति असतांही जसें नित्यानुष्ठान सोडावयाचें नाहीं, तसेच

कोणतीही गोष्टी असो, त्यापासून न्याय होत आहे, किंवा ती करणें आपलें कर्तव्य आहे, एवढ्या विचारावरच तिच्या मागें लागावयाचें. त्यापासून होणाऱ्या सुखदुःखाची भवतिनभवति करीत बसावयाचें नाहीं, असा पूर्ण निश्चय करून जर लोक सुधारणेची कास धरतील तर ही सुधारणा पाहिजे व ती नको हा तंटा मिटणार आहे. व सर्वच सुधारणा एकसमयावच्छेदेंकरून होऊं लागतील. हल्लीं राजकीय सुधारणेस सर्व लोक अनकूल आहेत, असें जरी बाह्यात्कारें दिसलें, तथापि त्यांत जीव नाहीं. राष्ट्रीय सभेसंबंधानें अंतःकरणापासून ज्यांनीं श्रम केले आहेत, व आपल्या पदरास ज्यांनीं खार लावून घेतला आहे, अशा सर्व इलाख्यांतील लोकांची याद केली असतां त्यांतून एक लांब जितके राजकीय सुधारणेचे चहाते आहेत तितकेच सामाजिक सुधारणेचे व धर्म सुधारचेणेही चहाते आहेत, असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. व सुधारक आमचे पुढारी नाहींत ह्मणून कंठशोष करणारे लोक जसे सामाजिक सुधारणेच्या विरुद्ध आहेत, त्याप्रमाणेंच राजकीय सुधारणेंतही ह्यांचें पाठबल तितक्या पुरतेंच आहे, हेंही सिद्ध करून दाखविणें कठीण नाहीं. व यावरून पहातां सामाजिकपरिषदेची उत्तरोत्तर भरभराट होणें, हेंच राष्ट्रीयसभेच्या खऱ्या भरभराटीचें चिन्ह होय.

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्चर ℳ १० पौंड.

मोरोक्को कॉर्फा ℳ १२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्हा माफक कमिशनवर पाठवूं.

हे तुमचे पुढारी नव्हत.

जुन्या लोकांस आम्ही विनयपूर्वक व खात्रीपूर्वक असें कळवितों कीं त्यांनीं प्रो. जिन्सिवाले व प्रो. टिळक अशा लोकांस आपले पुढारी समजूं नये. ज्याप्रमाणें आमच्या मतांत व त्यांच्या मतांत थोडासा फरक असल्यामुळें, त्यांची सुधारकांत गणना करतां येत नाहीं, असें नाहीं, त्याप्रमाणें जुन्या लोकांच्या आणि त्यांच्या मतांत जी अल्प साम्यता आहे, तीमुळें ते जुन्या लोकांचे अग्रणी होऊं शकत नाहींत. जर जुने लोक मिथ्या भ्रमानें अशांस आपले पुढारी समजून तदनुषंगानें वागूं लागतील, तर अखेरीस गोत्यांत पडून पश्चाताप पावतील, याचा आह्मांस बिलकुल संशय नाहीं! वेद पौरुष आहेत, असा प्रो. जिन्सिवाले यांचा आग्रह आहे. या मताचें ते आज कित्येक वर्षें उघडपणें प्रतिपादन करीत आहेत; व ज्याप्रमाणें गेल्या उन्हाळ्यांत त्यांनीं प्रतिपादिलेल्या विशिष्ट मतामुळें त्यांना आपल्या नौकरीचा राजीनामा द्यावा लागला तरी त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं, त्याप्रमाणें पूर्वपक्षांच्या वतीनें ब्राह्मण लोकांनीं जर असा आग्रह धरिला कीं, तुह्मीं वेद अपौरुष्य म्हणा, नाहीं तर आह्मीं तुह्मांस बाहेर टाकूं तर प्रो. जिन्सिवाले सगळ्या आचारवान ब्रह्मवृंदांस न जुमानतां, त्यांच्या मतानें वेदाच्या अस्तित्वाविषयीं जो मह घाला आहे तो कधींहीं सोडणार नाहींत, अशाविषयीं आम्ही पाहिजे तसली पैज मारण्यास तयार आहों! प्रो जिन्सिवाले थोडेसे कर्मठ आहेत, येवढ्यामुळें जुन्या लोकांना त्यांच्या वेदविषयक विलक्षण मताचा राग येत नाहीं याचा आह्मांस मोठा आचंबा वाटतो! वेदाचें अपौरुषत्व काढून घेतल्यावर वैदिक धर्माचा पायाच नाहींसा झाला, हें त्या धर्माच्या कैवाऱ्यांच्या लक्षांत येऊं नये काय? वेद हे मनुष्यकृत ग्रंथ

अहित, असं प्रतिपादणाऱ्या गृहस्थांस पाहिजे तर अजागळ पत्रकर्ते त्याच्या बाह्याचरणास भुलून जाऊन ते हिंदुधर्माचे या युगांतील आधारस्तंभ चहित, असे त्याचे पवाडे गावोत, व त्यांचा स्तुतिपाठ चांगला खुलण्यासाठीं आमच्या सारख्यांची हवी तितकी निंदा करोत, पण जे विद्वान शास्त्री किंवा आचार-संपन्न वैदिक आहेत, त्यांनीं श्रीधरपंतांच्या सारख्यांत आणि आमच्यांत विशेष भेद आहे, असें समजणें हा मोठा प्रमाद होय. कांहीं विशेष कारणांमुळें आमच्या त्यांच्यांत कितीही अंतर क्षणभर दृष्टीस पडलें, तरी त्यांचें आमचें शिक्षण एकाच पद्धतीचें असल्यामुळें, सूक्ष्म विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, एकंदरींत ते आम्हांस जितके जवळ आहेत, तितके जुन्या लोकांस नाहींत! प्रो. जिन्सिवाले यांचें असें म्हणणें आहे कीं, ज्याला अनुकूल असेल त्यानें आपल्या बायकोकडून बी. ए. च्या परीक्षेचा देखील अभ्यास करविण्यास हरकत नाहीं. एकदां खुद्द स्वतःच्या पत्नीस पहिली लेडी ग्रजुएट करण्याचा त्यांचा विचार होता. तसेंच **यद्यपि शुद्धं लोक विरुद्धं नाचरणीयं** या पंथाचे ते अनुयायी असल्यामुळें, आपल्या बायकोस आपल्याबरोबर हिंडावयाला घेऊन जाणें ही गोष्ट जरी त्यांच्या हातून होण्यासारखी नाहीं, तरी ज्या बायकांस घरांतील काम करावें लागत नसल्यामुळें कोणत्याही प्रकारचा व्यायाम होत नाहीं, अशांनीं आपल्या नवऱ्यांबरोबर किंवा चाकरांबरोबर सकाळसंध्याकाळ चुपडया हवेंत सहल करण्यास जाण्यास हरकत नाहीं, असें त्यांनीं स्पष्टपणें लागून दाखविलें आहे. जुन्या

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, कि. रु. २ व्ही. पी. खर्च ८४

लाव्हा ऑफीस, सदाशिव पेठ, पुणें.

महाराष्ट्रीयांच्या गुणग्राहित्वामुळें व समदुःखित्वामुळें आनंदानें साहिला, त्या पत्राचा आणि याचा वियोग होऊन, हा नवीन **सुधारक** अस्तित्वांत येण्यास, किंवा येथें बऱ्याच प्रतिष्ठेस आलेल्या एका लोकोपयोगी संस्थेच्या मुख्य चालकांपैकीं दोघा गृहस्थांनीं, विशेषतः रा. टिळकांनीं आपल्या कामाचा राजीनामा देण्यास, अशा प्रकारचा साधनसंबंधक मतभेद कारण झाला आहे, दुसरें कांहीं नाहीं. थोडयाच दिवसांत तुळशीबागेंतील सभेच्या बहुतेक पुरस्कर्त्यांस स्पष्टपणें असें दिसून येईल कीं, रा. टिळक हे एका गोष्टीशिवाय, दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें त्यांचे पुढारी होण्यासारखे नाहींत. ज्या सुधारणा आम्हीं कायद्यानें कराव्या, असें म्हणत आहों, त्या लोकांच्या लोकांनींच कराव्या, हें कायतें गरम व थंडया सुधारकांतील मतभेदाचें मूळ कारण आहे. स्त्रीशिक्षण, बालविवाहनिषेध, यवनानिषेध, बालावृद्धविवाहप्रतिबंध, पुनर्विवाह, कन्याविक्रयनिषेध, मदिरापाननिषेध वगैरे सर्व सुधारणा जशा एका पक्षास पाहिजे आहेत, तशा दुसऱ्यासही पाहिजे आहेत. असें असून मध्या उभयतांत जें रण माजलें आहे तें त्या अमलांत कोणत्या साधनांनीं आणावया, याविषयीं मतभेद असल्यामुळें माजलें आहे. कदाचित् कांहीं दिवसांनीं हें भेदकारण नाहींसें होऊन, सर्व सुधारकांची एकच फळी होण्याचा संभव आहे. आणि सुदैवानें असें झालें तर तुळशीबागेंतल्या सभेचे बहुतेक पुरस्कर्ते काय करतील ? ज्या सुधारणांस रा. टिळक अत्यंत अनुकूळ आहेत त्यांचा त्यांनीं कायदेवाल्या सुधारकांविरुद्ध खवळून गेलेल्या तुळशीबागेंतील श्रोतृसमुदायापुढें इष्ट हेतु साधण्यामाठीं बुध्या चिलकुल उल्लेख केला नाहीं, व त्या समुदायास मान्य होईल अशा प्रकारची टीका मि. **मलबारी** व सुधारक यांवर केली, येवढयावरून त्या सभेच्या बहुतेक पुर-

स्कत्यांनीं असें समजूं नये कीं, सामाजिक सुधारणेच्या कामीं सरकारानें सर्व लोकांस लागूं पडणारा कायदा करूं नये, यापलीकडे. रा. टिळक यांच्या मतांत आणि आपल्या मतांत कोणत्याही प्रकारचें साम्य आहे. सोळा वर्षांच्या आंत मुलींचीं लग्नें होऊं नयेत, कोणी कोणास हुंडा देऊं नये, विधवांचें वपन करूं नये, चाळिसाव्या वर्षांपुढें मुळींच लग्न करूं नये, किंवा करणें झाल्यास विधवेशीं करावें, मद्याला स्पर्श करूं नये, प्राप्तीचा दहावा हिस्सा सार्वजनिक कामाकडे द्यावा, वगैरे गोष्टी ज्यांस मान्य असतील त्यांनीं एक मंडळी स्थापून, त्या तिनें अमलांत आणण्याचा प्रयत्न करावा, व जो गृहस्थ एकदां अशा मंडळीचा सभासद होईल तो तींतून पुढें बाहेर पडण्याची इच्छा दाखवील, किंवा हे नियम मोडील तर त्याला सरकाराकडून कडक शिक्षा करवितां यावी, म्हणून अशी मंडळी रजिष्टर करावी—वगैरे रा. टिळक यांचे विचार तुळशीबागेंतील सभेसाठीं काढलेल्या निमंत्रणाचिट्ठीवर सह्या घालणाऱ्या गृहस्थांपैकीं कित्येकांस रुचणार आहेत कोण जाणे! अशा प्रकारची मंडळी स्थापण्याच्या प्रयत्नांत रा. टिळक खरोखरीच गुंतले आहेत, असें आम्ही ऐकतों, व ती स्थापण्यांत आल्यास ते तिचे सभासद होतील, आणि आतांच बारावें वर्ष लागलेल्या आपल्या मुलीचें लग्न तिच्या सोळाव्या वर्षांपर्यंत करणार नाहींत, याविषयीं आम्हांस काडीयेवढा संशय नाहीं. कारण; रा. टिळकांच्या आणि त्यांच्या प्रतिपक्ष्यांच्या विचारांत व स्वभावांत केवढाही भेद असला, तरी त्यांना येवढें

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

कबूल करणें भाग आहे कीं, जी गोष्ट एकदां टिळकांच्या मनास रास्त अशी वाटली तिचा ते, कितीही नुकसान झालें किंवा केवढाही लोकापवाद आला, तरी प्रत्यादेश करणार नाहींत, हा त्यांचे अंगीं प्रशंसा करण्यासारखा गुण आहे. तेव्हां जुन्या पद्धतीच्या लोकांस आम्ही असें विचारतों कीं, टिळकांचे वर निर्दिष्ट केलेले सुधारणाविषयक विचार आणि ते अंमलांत आणण्यासाठीं त्यांनीं चालविलेले प्रयत्न तुळशीबागेंतील 'प्रचंड' श्रोतृसमुदायापैकीं किती इसमास अभिमत आहेत, व राजोद्शनोत्तरही आपल्या मुलांस अविवाहित ठेवणाऱ्या मंडळीचे सभासद किंवा पुढारी टिळक झाले तर त्या समुदायापैकीं किती वजनदार शास्त्री, किती वैदिक, किती जहागीरदार, नोकरीवर असलेले किंवा पेनशनदार किती रावबहादुर व किती सामान्य लोक त्यांस आपल्या सभांचे चिटणीस करण्यास किंवा त्यांचे समाजाचें पुढारीपण सोंपविण्यास तयार आहेत ? आम्हांस तर असें वाटतें कीं ज्यांना आपला पूर्वापार चालत आलेला धर्म, आपल्या रीतीभाती आणि आपले आचार निर्दोष वाटत आहेत, व त्यांत सरकारानें किंवा सुधारकांनीं फेरफार करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्यांचेठाईं वैरुप्यता आणून देशाचें नुकसान करणें असें वाटत आहे, त्यांनीं वेळींच जागे होऊन, असें समजूं लागावें कीं प्रोफेसर जोन्सिवाले, गो. टिळक रा. रा. म. चि. आपटे यासारख्या अर्वाचीन विद्वान् गृहस्थांनीं प्रसंगविशेषीं विशेष कारणासाठीं एकाद्या बाबींत जुन्या लोकांच्या छंदाप्रमाणें वर्तन केलें, किंवा जुन्या लोकांच्या एखाद्या मतास आपली अनुकूलता दाखविली, तर तेवढ्यावरून ते आपले पुढारी होण्यास व अर्वाचीन सुधारणांविरुद्ध आपल्या सेना नेण्यास योग्य असे हे गृहस्थ वाचित नाहींत. जर या गोष्टीचा जुने लोक शांतपणें विचार न करतील, व अशा गृहस्थांकडून मिळणाऱ्या क्षणिक मदतीस

भुलून जाऊन त्यांचा ते कास धरतील, तर अखेरास ठार बुडतील असें आम्हांस वाटतें !

तर मग जुन्याचे पुढारी असावे तरी कसे ?

अर्थात् ज्यांत जुन्या पद्धतीचे सद्गुण पूर्णपणें भरले आहेत व जुन्या लोकांनीं निषिद्ध मानलेल्या गोष्टींपासून जे अत्यंत अलिप्त आहेत, अशा गृहस्थांनींच त्यांचें पुढारीपण पतकरल्यास जुन्या मतांस व जुन्या आचारांस कांहीं वर्षें टिकाव धरतां येणार आहे. ' कांहीं वर्षें ' असें आम्हीं जाणूनबुजून म्हणतों. कारण, जुन्या लोकांनीं आपले भीष्माचार्यांसारखे योद्धे जरी पुढें घातले तरी अगोदरच मन्वंतर इतकें बदलून गेलें आहे, व इतउत्तर तें इतक्या झपाट्यानें बदलत जाणार आहे कीं, त्यापुढें भीष्मद्रोणकृपादिकांसारख्या पूर्वपद्धतीच्या योद्ध्यांचें कांहीं एक चालेनासें होऊन त्यांचा शस्त्रसंपात निष्फळ होईल, व कांहींवर तर प्रत्यक्ष डोळ्यासमोर प्रतिपक्ष्यांनीं हस्तगत केलेली विजयश्री पहाण्याची पाळी येऊन, निराशेनें या जगद्रणांगणांतून खेद करीत परलोकास जाण्याचा प्रसंग गुदरेल. असा प्रसंग बराच टाळतां येण्यास एकच उपाय आहे, तो हा कीं पुढारी निवडतांना फार चांगली खबरदारी घेणें यांत चुकी झाली कीं नियंत्रणारे लोक जुने असोत किंवा नवे असोत, ते उपहासपात्र होणारच.

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र,
संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर्. सॅन्. आय्. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपाया.
' संदेश ' मजकूर, पुणें सिटी.

समाजाग्रणींत कोणत्याही प्रकारचा दुर्गुण असतां कामां नये इतकेंच नाहीं तर त्याचे अंगीं प्रशंसनीय सद्गुणाचा संकर असला पाहिजे. कित्येक लोकांची अशी समजूत असते कीं, ज्याच्या अंगीं एक दोन चांगलें गुण आहेत त्याच्या अंगीं पांच चार वाईट गुण असले तरी त्याला समाजाचें पुढारीपण देण्यास कांहीं हरकत नाहीं. पण आमच्या मतें ही समजूत फार गैर आहे. ज्याचें सारें आयुष्य द्रव्यार्जनांत किंवा वरिष्ठांची हांजी हांजी करण्यांत गेलें, जो स्वहितासाठीं लोकांचें हवेंतितकें नुकसान करण्यास भीत नाहीं; वाग्लाघाई ज्याची सर्वा झाली आहे; ज्याच्या कामुकतेला कशाचाही निर्बंध नाहीं; खोटें बोलण्यांत कांहीं दोष आहे असें ज्यास वाटत नाहीं; जो सत्कृत्यासाठीं उदार हात कधींही पुढें करीत नाहीं; ज्ञान संपादण्याचा ज्याला पराकाष्ठेचा तिटकारा आहे, खोटी मिजास व खोटी प्रतिष्ठा हीं ज्यास अत्यंत प्रिय आहेत, शुष्क वाचालता करण्यांत ज्यास पराकाष्ठेचा आनंद वाटतो; आपल्या थोड्या फायद्यासाठीं गांवाचें किंवा राष्ट्राचें नुकसान करण्यास जो तयार असतो; ज्याला दुसऱ्याचें बोलणें ऐकून घ्यावेसें वाटत नाहीं, दुष्कर्मानीं संपादिलेल्या द्रव्यापासून उत्पन्न झालेल्या पापाचे क्षालन ब्राह्मणभोजनें घालून, देवालयें बांधून, किंवा व्रतवैकल्यें अथवा यात्रा करून होतें, असें जो समजतो; न्याय, सत्य, शांति अनुकंपा वगैरे गुण ज्याच्या अंतःकरणांत वसत नाहींत–सारांश ज्याचें नांव ऐकल्याबरोबर किंवा मूर्ति पाहिल्याबरोबर ओत्याच्या किंवा देखकाच्या मनांत भीति, प्रेम व पूज्यबुद्धि उत्पन्न होत नाहींत–असा मनुष्य लोकाग्रणी होण्यास अगदीं उपयोगी नाहीं. जुन्या लोकांचा पेच पडला आहे. तेव्हां निदान त्यांनीं तरी अशा प्रकारच्या दुर्गुणांपासून जो अत्यंत अलिप्त असेल त्यासच आपला पुढारी नेमण्याचबद्दल फार काळजी घेतली पाहिजे.

आम्हाला ' हलकट ' कां म्हटले ?

गेल्या लेखांत तुळशीबागेंतील सभेची हकीकत देत असतां, एक ठिकाणीं कांहीं कारणानिमित्त दोनतीन विशेषणें योजण्यांत आलीं आहेत, त्यांपैकीं ' हलकट ' या विशेषणानें बऱ्याच लोकांचें पित्त खवळून गेलें असावें, असें दिसतें. त्या-संबंधानें आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, त्या सभेचे पुरस्कर्ते फक्त बेकायदेवाल्यांचीच सभा भरविते, आणि कायदेवाल्यांस किंवा ' कायदेबाजांस ' आपण होऊन बोलावून आणून त्यांचा उपमर्द न करते, तर तें विशेषण योजण्याचीचशी काय, पण त्या सभेविषयीं कोणत्याही प्रकारचा उल्लेख करण्याचीही गरज न पडती. शिवाय, रा. टिळक यांचें सुधारकांच्या संबंधानें उपहासपर भाषण चाललें असतां, ज्यांनीं आनंदप्रदर्शक टाळ्या पिटल्या तेवढ्यांसच आमचीं विशेषणें लागूं असतां, तुळशी-बागेंत जेवढे लोक जमले होते तेवढ्यासाऱ्यांस उद्देशून आम्हीं तीं विशेषणें योजिलीं असावीं, असा तर्क करून पोकळ रागाचें अवडंबर घालण्यांत काय अर्थ आहे ? तुळशीबागेंत ज्याप्रमाणें रामशास्त्र्यांसारखी एका प्रकारची मंडळी होती त्याप्रमाणेंच आ. रा. ब. भूस्कर, आ. रा. ब. रानडे, व डॉक्टर भांडारकर यांसारखी दुसऱ्या प्रकारचीही मंडळी होती. या मंडळसि आम-च्याकडून कालत्रयींही असलीं विशेषणें लागण्याचा संभव नाहीं, हें उघडच आहे. तेव्हां तुळशीबागेंतील समग्र श्रोतृजनास तीं विशेषणें लावण्याचा इरादा नव्हता हेंही उघड आहे. तथापि

लेखकांस योग्य सोबदला देऊन आलीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

गांवभर ढोलगीं वाजवून गोळा केलेल्या येवढ्या मोठ्या समाजांतील व्यक्तीनव्यक्ती ज्याअर्थी या सभेच्या पुरस्कर्त्यांस सभ्य किंवा 'हलकट' चा प्रतिभावी दिसत असावा, असें त्यांच्या मताचा प्रतिध्वनि काढणाऱ्या कित्येक स्थानिक पत्रांतील लेखांवरून व आह्मांकडे आलेल्या पत्रांवरून अनुमान करण्यास जागा होत आहे, त्याअर्थी त्यांच्या सभ्यतेची व्याख्या आमच्या सभ्यतेच्या व्याख्येहून फार निराळी असावी, असें वाटतें. तथापि जर या पत्रांत त्यांच्या संबंधानें अशा तीव्र विशेषणांची योजना न व्हावी अशी त्यांची इच्छा असेल, तर त्यांनीही सुधारकांच्या संबंधानें कोठेंही बोलतांना किंवा लिहितांना तोंड आटोपून बोलत जावें म्हणजे झालें ! जोंपर्यंत त्यांचेकडून असें होणार नाहीं तोंपर्यंत क्रियाप्रतिक्रियेचे नियमास खळ पडेल असें आम्हांस वाटत नाहीं ! अशा संबंधानें बेअब्रूच्या फिर्यादीचा बागुलबोवा आम्हांस दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. यास आम्ही पक्कें जाणून आहों ! ज्या वर्गांतील कांहीं इसमांस उद्धशून अशी भाषा सकारण लिहिण्याबद्दल शेंडीजानवें काढून देण्याचा प्रसंग ज्यावेळेस आह्मांवर येईल, त्यावेळेस मेदान चारदोन वृद्धतरुण पत्रकर्त्यांस तरी येरवड्याच्या आनंदगुहांत सामाजिक विषयांची मनमुराद चर्चा करण्याकरतां आम्ही आपल्या बरोबर घेऊन जाऊं, अशी आमची पक्की खातरी आहे ! कोठेंही असलेल्या चांगलेपणास दुखविण्याची आमची इच्छा नाहीं. पण वाईटाला वाईट म्हणण्यास असल्या दाखविण्यानें **सुधारक** केव्हांही भीईल, असें दिसत नाहीं !

बोलके सुधारक. वागते सुधारक व सुधारणा-निंदक.

हे लोकांचे तीन वर्ग सुधारणापंथास लागलेल्या प्रत्येक देशांत केव्हांही दृष्टीस पडतात. ज्या अर्थी मनुष्यास चांगल्यावाइटाची निवडानिवड करण्याची बुद्धि, व जें वाईट असेल त्याचा त्याग आणि चांगल्याचें संपादन करण्याचें मानसिक व शारीरिक सामर्थ्य आहे, त्या अर्थी पशूप्रमाणें त्याची स्थिति स्थिर न रहातां, कालमानाप्रमाणें नीति कर्मी अधिक बदल होत जाणें स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें कालाचा क्रम थांबविणें अशक्य आहे, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या स्थित्यंतरास खळ पाडणें अशक्य आहे. तथापि हें सत्य अज्ञ लोकांच्या लक्षांत नीट न येत असल्यामुळें, व आपण ज्या स्थितींत आहों तीच स्थिति अत्युत्तम असें अप्रबुद्ध जनावरांप्रमाणें त्यांस वाटत असल्यामुळें, कोणत्याही रीतीनें त्या स्थितींत बदल करूं पहाणारांचा ते द्वेष करतात, आणि त्यांचे श्रम निष्फळ होण्याचा आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करतात. अशा नित्य कलहामुळें समाजांतलि अवयवांचे प्रथम दोन स्थूल विभाग होतात; एक पुराणप्रियांचा व दुसरा सुधारकांचा. पुढें दुसऱ्याचे दोन पोट भेद होतात; एक बोलक्या सुधारकांचा व दुसरा वागत्या सुधारकांचा. ज्या वेळेस कांहीं केलें नसतां समाजांतील बहुतेक लोक चांगल्या गोष्टीचा विचार करावयाचे नाहींत इतकेंच नाहीं, तर जो तो करण्यास प्रवृत्त होईल त्याचा ते छल करण्यासही सोडीत नाहींत, अशीं

निबंध संग्रह.

भाग १ ला. किं. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

स्थिति असते, त्या वेळेस बहुधा अनेक प्रकारचे हाल व जाचणुकी सोसून व गरज पडल्यास निराळी जात करून घेण्यास किंवा मरण्यासही तयार होऊन, आपल्या विचाराप्रमाणें आचरण करण्यास प्रवृत्त होणारे मताभिमानी सुधारक फार निघतात. आजपर्यंत नवीनधर्मपंथाचे जे स्थापक झाले आहेत, त्यांचा इतिहास बहुधा अशा प्रकारचा आहे. साक्रेतिस, बुद्ध, महंमद, ख्रिस्त, ल्यूथर, राममोहन किंवा दयानंद यांपैकीं लहानमोठ्या प्राचीन किंवा अर्वाचीन पाहिजे त्या महत्पुरुषाचें चरित्र घ्या, त्यावरून असें दिसून येईल कीं, ज्या सुधारणा झाल्याच पाहिजेत असा त्यांच्या मनाचा दृढ ग्रह झाला होता, त्या सुधारणांस तत्कालीन बहुजनसमाज अत्यंत प्रतिकूल असल्यामुळें, एक तर आपला हेका आपण सोडावा, किंवा लोक जेवढा त्रास देतील तेवढा सहन करण्यास तयार होऊन आपला हेका आपण चालवावा—याशिवाय त्यांना दुसरा मार्गच नव्हता. अशा स्थितींत लोकांच्या निष्ठुर दुराग्रहामुळें सुधारकांच्या अंतःकरणांत पेटलेली ज्वाला लोकांच्या उपरोधक फुंकरांनीं न विझतां अधिक जोरानें भडकू लागतें, आणि ती त्या सुधारकांस मनाप्रमाणें आचरण करूं लागल्याशिवाय चैन पडूं देत नाही. मनाची अशी अवस्था झाली असतां, विचाराप्रमाणें न वागण्यापेक्षां लोकांनीं केलेला छळ सोसणें, हेंच अधिक सह्य व सुखावह वाटतें; आणि म्हणून अशा काळीं **वागते** किंवा **करते** सुधारक निपजतात.

परंतु ज्या वेळेस ज्ञानप्रसारामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळें लोकांची दुराग्रहबुद्धि किंचित शिथिल झालेली असते, व चर्चा केल्यानें, समजुतीच्या दोन गोष्टी बरेच दिवस सांगत राहिल्यानें, आणि अशाच प्रकारचे सामोपचाराचे दुसरे उपाय केल्यानें ते आपणास हवे तसे हवे तसें वागूं देतील इतकेंच

नाहीं, तर आपले अनुकरणहीं करूं लागतील, अशीं चिन्हें दिसत असतांत, त्यावेळेस लोकांपासून तुटून निवृत्त किंवा त्यांचे यथेच्छ 'छी थू' करून घेऊन, आपली जात निराळी करण्यास किंवा लोकांशीं रक्तस्रावाचें रण माजविण्यास प्रवृत्त होणारे सुधारक निघत नाहींत. तात्पर्य, अशा दोन प्रकारच्या सुधारकांचे दोन वर्ग निघण्याच्या विशिष्ट वेळा आहे. सध्यां आमच्या देशांत विशेषतः बोलके सुधारकच निघण्याची वेळ आहे; म्हणून जे बोलके सुधारक आहेत त्यांस सुधारणानिंदकांनीं किंवा वागत्या किंवा करत्या सुधारकपणाची फुकट ऐट मिरविणारांनीं "तुम्ही करून किंवा वागून कां दाखवीत नाहीं ? स्वतंत्र जात कां करीत नाहीं ?" असले अडाणीपणाचे प्रश्न विचारूं नये ! फार कशाला ? तुमच्या वागत्या किंवा करत्या **टिळकसुधारकाचेंच** उदाहरण घ्या. ज्यानें उपग्रातिसूचनेंत १६ वर्षांच्या आंत मुलीचें लग्न करूं नये, व प्रातीचा एक दशांश सार्वजनिक कामाकडे द्यावा, अशीं कलमें घातलीं त्यालाच त्यासंबंधानें साक्षात् कांहीं करण्याच्या हेतूनें लोकांपुढें येण्याची बुद्धि झाली, तेव्हां सोळाचा आंकडा चौदावर, व एक दशांशाचा एक विसांशावर आणून ठेवणें जरूर आहे, असें वाटलें किंवा नाहीं तें पहा ? तसेंच, अशा रीतीनें स्थापलेल्या मंडळीपैकीं कोणत्याही इसमानें प्रतिज्ञाभंग केला असतां त्याला दंडण्याकरितां सरकारची मदत घेणें अवश्य आहे, असें वाटलें किंवा नाहीं तेंही पहा ! तात्पर्य, या वागत्या किंवा करत्या **सुधारकास** प्रत्यक्ष क्रियेचा विचार मनांत आणिल्याबरोबर जर

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकमेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १८१३

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

इतकी पंचेहाट करावी लागली, व " विधि, विकल्प, आणि निषेध " या चर्चाचें रडगाणें गावं लागलें, तर यासंबंधानें खरेखरींच कांहीं करून दाखविण्याचा प्रसंग आला असता, बोलक्या सुधारकांप्रमाणें हे दहा सोळा किंवा अकरासतरा तरी कबूल करतील किंवा नाहीं, याची मोठी शंका आहे ! व अशी शंका येण्यास थोडासा आधारहीं झाला आहे. कारण चौदा म्हणजे संपूर्ण तेरा असा अर्थ आधींच निघूं लागला आहे, असें ऐकतों ! तेव्हां या कालांत बोलक्या सुधारकांची आणि पोकळ डोलाखातर स्वतःस बागते सुधारक म्हणवून घेणारांची वास्तविक स्थिति एकच आहे, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

आतां सुधारणानंदकांकडे किंचित वळूं. यांचा गतहीं पहिल्या दोघांप्रमाणेंच आहे. हे आपल्या बोलण्याच्या ऐरींत आपणास समाजाचे स्थिरस्थाणू आहों, समाजास कल्याणकारक गोष्टी कोणत्या त्या आपणांसच समजतात, व त्यांचे संरक्षणकर्ते आपणच आहों, अशी आपल्या मनांतल्या मनांत व उघडपणें कुशारकी मिरवींत असतात. पण ज्याप्रमाणें पंचाक्षऱ्यानें भारलेलें भूत त्याच्या पाठीमागें, आरडाओरड करीत कां होईना, पण कसें तरी जातच असतें, व त्याला वाटेल त्याप्रमाणें वागत असतें, त्याप्रमाणें इंग्रजांसारख्या परक्या लोकांचा अंमल; सुधारणाविषयक त्यांचे विचार; त्यांकडून आम्हांस मिळत असलेलें शिक्षण; कामधामाच्या निमित्यानें प्रत्येक दिवशीं त्यांशीं होत असलेला व्यवहार; त्यांनीं आपल्याबरोबर इकडे आणिलेल्या नानाप्रकारच्या यांत्रिक सुधारणा आणि स्थानांतराचीं साधनें—वगैरे गोष्टींनीं पंचाक्षऱ्याच्या मंत्राप्रमाणें भारून टाकलेला आमचा सुधारणानंदकगण टाकऱ्यांचीं औषधें निःशंकपणें घेऊन अप्रत्यक्ष रीतीनें मदिरा सेवन करीत आहे, आगगाडींत

व आगबोटींत प्रवास करतांना हव्या त्या जातीच्या लोकांशीं चिकटून बसून जातीचे पाश शिथिल करीत आहे, सहित्र लोकांशीं नित्य 'शेक हँड' करून किंवा त्यांच्या टेबलापाशीं खरडे घांशींत बसून पाहिजे तसला विटाळ प्रतिदिवशीं घरीं आणीत आहे, आगगाड्यांच्या किंवा आगबोटींच्या वेळा साधण्यासाठीं आणि लांबचे प्रवास झपाट्यासरशीं उरकून घेण्यासाठीं स्नानसंध्येचा प्रत्याहार करीत आहे किंवा तीस कधीं कधीं मुळींच फांटा देत आहे, वर्तमानपत्रांत किंवा इतर ठिकाणीं होत असलेल्या चर्चेमुळें न कळत लग्नाचें वय हळूं हळूं वाढवीत आहे, स्त्रीस अधिकाधिक स्वातंत्र्य देऊं लागला आहे, स्वेच्छेविरुद्ध धर्मविनाशक शाळांत आपलीं मुलें पाठवीत आहे, कामकाजाच्या संबंधानें हव्या त्या जातीच्या लोकांशीं स्नेह व व्यवहार करीत आहे, श्राद्धश्रावण्यादि धर्मकर्मांपासून कांहीं तरी शांति व्हावी, येवढ्यासाठीं सुधारकांच्या तत्त्वतांप्रमाणें त्यांस हव्या त्या फलावर नेत आहे, व कधीं कधीं त्यांचेकडून कांहीं कामें करून घेण्यासाठीं आपले हेके सोडीत आहे, हें त्यांचें लक्षांत न यावें, व जे लोक जाणूनबुजून अमुक सुधारणा केल्याच पाहिजेत असें उघडपणें प्रतिपादीत आहेत, किंवा त्या स्वशक्तीप्रमाणें अमलांत आणीत आहेत, त्यांचा थट्टा करण्यास त्यानें प्रवृत्त व्हावें--हें आश्चर्य नव्हे काय ? अथवा यांत आश्चर्य तरी कसलें ? अंतर्दृष्टिकरून न पहाणाऱ्या अज्ञ जनांनीं असें वागणें व बोलणें हेंच त्यांस उचित आहे. त्यांच्या स्थितींत जें अंतर पडत आहे तें त्यांना न समज-

---

ब्रह्मी वाम.—मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणाऱ्यांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खेर, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

जतां घडत असल्यामुळें, आपली स्थिति कायमच आहे, असें यांस वाटणें, हें फार स्वाभाविक आहे ! पण हा त्यांचा भ्रम आहे, हें कोणाही समंजस पुरुषाच्या लक्षांत सहज येण्यासारखें आहे. या सुधारणानिंदकांचा आणखी एक असा भ्रम आहे कीं, **बोलके सुधारक** कायते अलीकडेच दृष्टीस पडूं लागले आहेत. पण खरी गोष्ट तशी नाहीं. सुधारकांची ही जात पूर्वीपासून आहे ! उदाहरणार्थ, आपले पुराणिक, हरिदास, भिक्षुक, कर्मठ शास्त्री, जोशी किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही वर्गांतील लोक घ्या. लोकांस धर्मोपदेश करावा, त्यांस नीति पढवावी, व स्वतःच्या पवित्र व शुद्ध आचरणानें लोकांस उदाहरण घालून द्यावें– हें या पूर्वपद्धतीच्या सुधारकाचें कर्तव्य होय. पण हें कर्तव्य नीट बजावणारे असले किंवा सुधारक निघर्तील घरें? स्त्रियांस मंत्रोपदेश करण्याच्या निमित्तानें त्यांस व्यभिचारपंकांत गृढ गोंवून टाकणारे, पोथीपुढें ठेवलेल्या तांदुळाचें गाठोडें बाजारी अंगवस्त्राच्या घरीं नेऊन सोडणारे, लोकांस नीतिच्या व निर्लोभाच्या गोष्टी सांगून घरांतल्या घरांत किंवा परक्याच्या घरीं हवा तसला अनाचार करणारे, किंवा पैशासाठीं प्राण सोडणारे, अथवा भस्माचे लांबलचक पट्टे, मुद्रांचे छाप, दर्भाच्या मुष्टी, शालजोडयांचे लपेट, रेशमकाठीं धोतरांच्या निऱ्या, रुद्राक्षांच्या व स्फटिकांच्या माळा, टाळ व करताल इत्यादि वाद्यें, नाना प्रकारचीं भजनें व नाच व गीत, व जीवात्मा आणि परमात्मा यांतील भेदाभेदाविषयीं कधीं कधा समजणारीं व कधीं न समजणारी चर्चा इत्यादि धार्मिकपणाच्या दिखाऊ साधनांनीं बायाबापडयांस व अज्ञ पुरुषांस बुचाडणारे पहिल्या चालीचे दुर्वृत्त दांभिक सुधारक काय थोडे आहेत? पण त्यांना शेणमार करण्याची, अपंक्त करण्याचा, किंवा अलीकडील बोलक्या सुधारकांवर जी वाक्यशरांची वृष्टि होत असते तशा प्रकारची वृष्टि त्यांवर करण्याची इच्छा कधीं कोणास झाली

आहे काय ? कधीं नाहीं. कारण चांगली गोष्ट हातून प्रत्यक्षपणें न घडली तरी ती सांगत फिरणें हा कांहीं दोष नाहीं, असा मनुष्यांचा पक्का समज होऊन गेला आहे, असें त्यांच्या अशा प्रकारच्या आचरणावरून उघड होतें. तेव्हां सुधारणानिंदकांनीं सभ्यांच्याच बोलक्या सुधारकांवर इतकें तुटून पडणें शुद्ध वेडेपण होय. वाद करतां करतां ज्या चांगल्या गोष्टी ठरतील त्यांचा अंगीकार त्यांच्याकडूनचसा काय, खुद्द सुधारणानिंदकांकडूनही हळूं हळूं होत जाईल, अशी आमची पक्की खातरी आहे !

मि. अशबरनर आणि अनाथ हिंदु विधवा.

मि. अशबरनर यांची आमच्या वाचकांस बहुधा बरीच चांगली ओळख असेल. तथापि न्याशनल रिव्यू नांवाच्या मासिक पुस्तकांत त्यांनीं नुकताच जो लेख लिहिला आहे, त्यांत आमच्या हतभाग्य हिंदुविधवांवर त्यांनीं जे असभ्य, खोडसाळ, व असत्यप्रचुर आरोप लादले आहेत, ते लादण्याइतक्या नीचतरपदावर साहेबमजकूर घसरतील, असें कोणासही वाटलें नसेल ! नेटिव्ह लोकांच्या अलीकडील चळवळीपासून आपल्यावर मोठा अनर्थ कोसळेल, म्हणून वेडावून जाऊन, नंतरचा अद्वातद्वा आरोप आणणारे इंग्रजबहादूर आमच्या पुष्कळ पहाण्यांत आहेत. परंतु या द्वेषामुळें नेटिव्ह स्त्रियांची, व विशेषकरून निराश्रित असलेल्या हिंदु विधवांची, विटंबना करण्यास ते प्रवृत्त झालेले फारसे कांहीं पाहण्यांत येत

समाज-शास्त्रानुशीलन व्याख्यानें.
मे. जी. बी. भाट एम्. ए. कृत. कि. ४८
सुधारक ऑफीस, पुणें.

नाहीं. **इलबर्ट** बिलाच्या वेळीं प्रसिद्धीस आलेले वक्तृशिरोमणी **ब्रानसन्** हेही इतक्या पल्ल्यापर्यंत पोंहोचले नव्हते. तेव्हां स्त्रीदाक्षिण्याविषयीं ज्यांची योग्य प्रकारें जगभर ख्याती आहे, अशा इंग्रजांपैकीं मि. अशबरनरसारख्या अक्कलवंत, हुशार व नाणावलेल्या साहेब बहादुरांनीं आपल्या पेनाच्या शिलोंड्यांनीं आमच्या अनाथ गतभर्तृकांच्या अश्रूस डाग लावण्यास उद्युक्त व्हावें, व न्यानशाल रिव्ह्यूच्या प्रकाशकारासारख्यांनीं, त्याजविषयीं एक अक्षरही न लिहितां, असल्या घाणेरड्या लेखास प्रसिद्धि द्यावी, हें पाहून कोणास आश्चर्य व खेद वाटणार नाहीं ! ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' या स्मृतिवाक्याचा अंमल ज्या देशांत जारीनें सुरू आहे, तेथील लोकांनीं, इंग्रजस्त्रियांस पुरुषांसमवेत सहल करतांना, पुरुषसमुदायांतून चमतां उठतांना व परपुरुषांशीं निःशंकपणें भाषण करतांना पाहून, व अडाणी व हलकट लोकांच्या मनोरंजनार्थ लिहिलेल्या घाणेरड्या कादंबऱ्या वाचून, व प्रत्यक्ष इंग्लंडचा प्रवास तर दूरच राहिला, परंतु येथील इंग्रज अधिकाऱ्यांच्या गर्विष्टपणामुळें, त्यांच्या बंगल्याच्या आंतही पाऊल घालण्याची मारामारी पडत असल्यामुळें, त्यांच्या नोकर चाकरांपासून निघणाऱ्या कंड्या ऐकूनच, इंग्रज स्त्रियांच्या पातिव्रत्याविषयीं भलभलत्या कल्पना केल्या. तर त्यांत विशेष नवल वाटण्यासारखें कांहीं आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु अशा लोकांनाही इंग्रज स्त्रियांविषयीं कोणें प्रसिद्धपणें जगाकांत चूं केलें कीं इंग्रज लोक कसे खवळून जातात हें कोणास माहित नाहीं ? मग आपल्या स्त्रीवर्गाच्या अब्रूची ज्यांना तिकी आस्था, त्याच इंग्रज लोकांनीं, हिंदुविधवांविषयीं आपणाविल तसे प्रलाप केले असतां त्यापासून हिंदूंच्या अंतःकरणाला नहीं तसेंच दुःख होईल, ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत यागनूं नये काय ? किंवा ' पद्भ्यां शूद्रोऽजायत ' या श्रुतीच्या जोरावर, ब्राह्मणादि उच्चवर्णांची सेवा करण्याकरितांच ईश्वरानें शूद्रांस

निर्मिलें आहे. म्हणून जशी आमचीं शास्त्रें मानतात; अथवा अग्निहोत्रास खळ पडेल, या मिषानें आपली अनिवार कामेच्छा तृप्त करण्याकरितां, मृत स्त्रीस जाळून आल्यावर लागलीच पांढऱ्या केसाच्याही पुरुषांनीं पुनर्विवाह करावा, परंतु विधवेनें आपल्या तरुणपणींही, " मृतं भर्तारमादाय ब्राह्मणी वन्हिमाविशेत् । जीवन्ति चेत् त्यक्त केशा तपसा शोधयेद्वपुः " । म्हणून जसा आमच्या पुरुष शास्त्रकारांनीं निर्णय ठरविला आहे; अथवा गुलामांचा व्यापार सुरू ठेवण्याविषयीं आस्था बाळगणाऱ्या कांहीं इंग्रज मुत्सद्यांनीं, काळ्या कातड्याचे लोक गोऱ्यांच्या सेवेकरतांच इश्वरानें सृजिले आहेत, म्हणून जसें एक महातत्व शोधून काढलें होतें, त्याप्रमाणेंच काळ्या कातड्यांच्या आंतील अंतःकरणें अपमानाधिर असतात, किंवा सुधारलेल्या गोऱ्या लोकांच्या सेवेकरितांच इश्वरानें हिंदुस्त्रियांस वैधव्य आणिलें आहे, असें एखादें अपूर्वतत्व, एखाद्या हिंदुद्वेष्ट्या अपूर्व तत्वज्ञान्यानें नवीन शोधून तर काढल नाहींना ? व असें नसतें तर " हिंदुविधवांस घातेल तसा अनाचार करण्यास हिंदुसमाजानें पूर्ण सनद दिली आहे, तिच्या पापाचरणाकडे समाज जाणून-बुजून दुर्लक्ष्य करितो. नेहमीं अशी अत्यंत स्पृहणीय, व अप्रतिबंध अशी स्वच्छंदपणाची आयती मिळालेली वृत्ति सोडून देऊन, त्यांच्या कल्याणार्थ केलेल्या कायद्याचा आश्रय घेऊन, त्या आपल्या स्वेच्छाचारविहाराम अडचण काय म्हणून आणतील ! " असे शास्त्र साहेब बहादुरांच्या तोंडांतून उच्चित निघाले नसते. किंवा असें तर नसेलना, कीं आपला पुरुषार्थ गाजविण्यास दुसऱ्याकडचे सर्व मार्ग बंद झाले

धातुरत्नमाला —या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. कि. ४;

खेडकरवैद्य ॲन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

असल्यामुळें, ज्यांच्याविषयीं स्वतांचे देशबंधूही अनुकंपाव्यक्त करीत नाहींत, अशा निराश्रित हिंदूविधवांवर आपणें आपली तिरंदाजी चालाविली असतां आपणांस जयश्री खचित वरील, असा साहेबबहादुरांनीं तर्क केला असावा ! व असें असेल तर मात्र साहेब मजकुरांचा तर्क खोटा नाहीं, असें आम्हांस कबूल करितां येतें. कारण कीं उन्मतावस्थाप्राप्त इंग्रजस्त्रिया, आपल्या अलूस धक्का पोंचवणारा नाटेच्छ वक्ता किंवा पत्रकर्ता, यांचा त्रेधा उडवून दिल्याशिवाय जशा आपल्या पुरूषवर्गास स्वस्थ बसूं द्यावयाच्या नाहींत, तो योग्यता आमच्या बिचाऱ्या विधवांच्या आंगी नाहीं, व त्यांची बाजू घेऊन भांडणारा पुरुषवर्गही नियमितच आहे. नेव्हां साहेबमजकुरांचा तर्क खरा ठरून, त्यांनीं अजिंक्यपत्र मिळविलें, याविषयीं आम्हांस संशय नाहीं. परंतु समंजस लोक या विजयाबद्दल त्यांचें अभिनंदन करून त्यांची पाठ थोपटण्याऐवजीं त्यांस लज्जेनें खालीं मानच घालण्याचा लावणींतल यांतली शंका नाहीं.

अहो, 'असंमत वैधव्य' या एका शब्दापासून व्यक्त होणाऱ्या अभाग्य क्लेशाच्या दडपणानें आधींच चूर होऊन गेलेल्या हिंदुविधवांच्याविषयीं कोणी अनुदार प्रलाप केल्यास तो जर आमच्या अंतःकरणास दुःसह होणें साहजिक आहे, तर मग त्या स्वेच्छाचारी आहेत असा निष्फल आरोप मि. अशबरनर यांनीं हिंदुविधवांवर आणलेला पाहून आमचें अंतःकरण क्षुब्ध व्हावें, व 'जल तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट' या न्यायानें मनाच्या शांतवनार्थ आम्हीं आपल्या क्षुब्ध मनोवृत्तीस कांहींसा अनियंत्रित संचार करूं द्यावा, यांत विशेष नवल नाहीं. त्याकरीं एकंदर इंग्लिशराष्ट्र अजूनपर्यंत स्त्रीदाक्षिण्यभ्रष्ट झालें नाहीं, इतकेंच नाहीं तर तें त्यांनीं स्त्रीदाक्षिण्य इतकें गमावें आहे कीं,

ते लोक जेथें जातील तेथें तेथें त्याचा प्रादुर्भाव झाल्याचा-
ून खचित रहाणार नाहीं, असा आह्मांस पक्का भरंवसा आहे. व
मि. दादाभाई नवरोजीस 'काळा' ह्मणणाराची ज्यांनीं फटफ-
जीती उडवून दिली ते उदार इंग्रज अशा खोडसाळ लेखाची
योग्य तीच किंमत करतील, व अनेक शतकेंपर्यंत माग-
सलेल्या आमच्या लोकांची अनुदारपणें विटंबना न करितां
सर्व दिशांनीं आमची उन्नति होण्याकरितां आपली मनापासूनची
कळकळ, हितप्रद असा उपदेश, व प्रसंगविशेषीं हातीं असलेला
अधिकार यांचा उपयोग करण्यास मोठ्या आनंदानें प्रयत्न
करितील, याविषयीं आह्मांस तिळमात्र संदेह नाहीं.

मि. अशबरनर यांनीं आणलेला आरोप सर्वथैव मिथ्या आहे
हें विशेष खुलासेवार सिद्ध करण्याची आह्मांस विशेष अवश्य-
कता भासत नाहीं. तथापि ज्या देशांत पातिव्रताप्राप्त्यर्थ
लक्षावधी तरुण स्त्रियांनीं पतिचितेवर आपणांस जिवंत जाळून
घेण्याचें लोकोत्तर धैर्य दाखविलें, व त्याच्या अभावीं 'विवर्णा
दीनवदना देहसंस्कारवर्जिता' होऊन संन्यास वृत्तीचें अवलंबन
करून, उपासतापासांनीं देह वाळविण्याचें व्रत अनेक युगें
चालविलें, त्या देशांतील स्त्रियांस chartered liberties
(सनदी स्वेच्छाचारिणी) हा किताब देणारानें, आपण काय
हाणतो याचा त्रिवार विचार करावयास पाहिजे होता. 'स्त्रीणां
शतेषु देवतं' या सूत्राचा बाऊल त्या स्थितींत अलंघ्य करणें
चुकीचें असेल, सतीं जाणें हें अमानुष कृत्य असेल: व असं-

दि बिजायरस होल्डिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.
सर्वत्र मांगाजलेले खजानदार ची किंमत ८१० पौंड
मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.
याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

मतवैधव्यही अन्यायाचें असेल; परंतु या सर्व संस्थांपासून स्त्री-जातीवर जसा जुलूम झाला आहे, त्याप्रमाणेंच त्यांची पातिव्रत्यासक्ति इतर राष्ट्रांहून दृढतर झाली आहे, हेंही प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल केलें पाहिजे. ज्या इंग्रज लोकांनीं हिंदुस्त्रियांच्या चालचलणुकीबद्दल विशेष माहिती मिळविण्याची खटपट केली होती,-त्यांचे तरी विचार साहेब मजकुरांनीं प्रस्तुत लेख लिहितांना मनांत आणावयाचे होते. कर्नल मनरो हे आमच्या स्त्रियांविषयीं असें म्हणतात कीं ' It would be no slight praise to the women of any nation, even to the ladies of England, to have it said that the correctness of their conduct was not inferior to that of Brahmin women and the Hindu women of the higher classes ' (कोणत्याही देशांतील स्त्रियांस, व इंग्लंडच्याही स्त्रियांस, त्यांचें वर्तन ब्राह्मणी किंवा वरिष्ठ हिंदुस्त्रियांहून कमी शुद्ध नाहीं, असा दाखला मिळणें म्हणजे आपला मोठी वाखाणणी झाली, असें मानण्यास हरकत नाहीं.) आणि दुष्ट लोकांच्या भुलथापांनीं किंवा प्रसंग विशेषीं मनोनिग्रह न झाल्यानें वैधव्यव्रतापासून भ्रष्ट झालेल्या कांहीं विधवा आढळतील, हें जरी खर आहे, तथापि एकंदर विधवांच्या वर्गाविषयीं विचार करितां त्यांचें आचरण एकंदरीत वर निर्दिष्ट केलेल्या सामान्य स्त्रीवर्गाप्रमाणें शुद्ध व स्तुत्यच आहे, हें त्यांच्या शत्रूंसही कबूल करावें लागेल.

परंतु या संबंधानें विशेष चमत्काराचा गोष्ट हा कीं, वर सांगितल्याप्रमाणें आमच्या एकंदर समाजाची व विधवांची विटंबना करणाऱ्या साहेब बहादुरास आमचेच कांहीं व्यवसायबंधु आपले भिन्न समजाचे, न पहा ' अशाबद्दल साहेब देशील का

यद्याच्या विरुद्ध आहेत ' असें विधान करून आपला पक्ष सबळ करूं पहातात. त्यांस ही गोष्ट कळून येत नाहीं कीं, विधवांनीं पुन्हां लग्न करण्यास हरकत नाहीं, किंवा त्यांनीं विवाह करण्यास त्यांस अमुक उत्तेजन मिळावें वगैरे कायदे मागणें जर वाईट, तर मग त्यांनीं फिरून लग्न करूं नये, किंवा त्या तें करितील या भीतीनें त्यांचें मुंडन करावेंनें याविषयीं तेवढा कायदा कां पाहिजे. व या कायद्याचा तर आज मितीस प्रत्यक्ष अंमल होत आहे. मि॰ अशबरनर म्हणतात तसा जर खरोखर प्रकार असता, तर नुसतें उत्तेजन काय, परंतु सक्ति करूनही त्यांच्याकडून पुनर्विवाह केला पाहिजे, असें एकवेळ एकाद्या नीतिभक्तास म्हणतां आलें असतें. परंतु तशी मुळींच गोष्ट नाहीं. हिंदु विधवा अगदीं अनाचारांत गढून गेल्या आहेत, म्हणून त्यांस पुनर्विवाहाची मोकळीक पाहिजे असें कोणी प्रतिपादन करीत नाहीं. एकाद्या मनुष्यास सक्तीनें सद्गुणी करण्यांत अर्थ नाहीं, व त्या सद्गुणाचें विशेष मोलही नाहीं. पतिमरणोत्तर वैधव्यव्रताचें आचरण करण्याइतकी ज्यांची मनोनिग्रह शक्ति नाहीं, त्यांस मारून मुटकून संन्यासी करण्यापेक्षां व त्यापासून संभवणाऱ्या पापाचरणास कारणीभूत होण्यापेक्षां त्यांस विवाह करण्याची परवानगी दिली असतां पापाचरणाची मुळींच भीति राहणार नाहीं, व खऱ्या सद्गुणाचें योग्य मोल लोकांस कळूं लागेल. असो; यासंबंधानें आम्हीं वेळोवेळ अनेक प्रकारें लिहिलें आहे, तेव्हां याविषयीं सध्यांच विशेष विस्तार करण्याचें कारण दिसत नाहीं.

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. कि. ०५

खेडकरनेत्र ॲन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

आणखी एक शहाण्याचा कांदा.

मागील लेखांत मि. ॲशबर्नर यांनीं आमच्या गतभर्तृकां-विषयीं ठोकून दिलेल्या अभिप्रायाविषयीं जे चार शब्द लिहिले आहेत, ते वाचकांच्या ध्यानांत असतीलच. हा गृहस्थ या इलाख्यांतील मुलकी खात्यांत तीस वर्षांहून अधिक वर्षें नोकरीवर होता. असिस्टंट कलेक्टरच्या जागेपासून कौंसिलदाराच्या जागेपर्यंत ज्यानें लहान मोठ्या साऱ्या हुद्यांचीं कामें केलीं, व त्या कामांच्या निमित्तानें नेटिव लोकांशीं ज्याचें संघट्टन नित्य घडत असे, त्यानें आपल्या तीस वर्षांच्या अनुभवावरून व माहितीवरून "हिंदू विधवा सनदी स्वेच्छाचारिणी' असतात, असें आपलें मत स्पष्टपणें ठोकून दिलें आहे ! तेव्हां ज्यानें इतकीं वर्षें येथें काढलेलीं नाहींत, ज्याला आपल्या विशेष तऱ्हेच्या कर्तव्यामुळें हिंदू लोकांच्या भेटी वारंवार घेतां आल्या नाहींत, व ज्याला वाचण्याचा किंवा लिहिण्याचा विशेष नाद असण्याचा संभव नाहीं, अशा एखाद्या लष्करी लढवय्यानें जर असा अभिप्राय दिला की, बहुतेक हिंदू स्त्रिया पातिव्रत्यपराङ्मुख आहेत तर त्याबद्दल त्याला काय म्हणावें ? दुसरें काय म्हणावयाचें ? अशा भूदेवतांच्या तोंडांतून पडलेल्या शब्दकुसुमांचा सुगंध दुःसह झाल्यास, तीं तिरस्काराच्या उकिरड्यावर फेकून द्यावीं, आणि स्वस्थ बसावें, हेंच योग्य आहे ! पण जर त्या ठिकाणाहूनही त्यांचा किळस आणणारा दर्प घरांत गर्द लागला तर तो नाहींसा करण्यासाठीं ज्याप्रमाणें वाऱ्याची सांथ आली असतां शहरसफाई टेवणारे म्युनिसिपॅलिट्यांचे अधिकारी रस्तोरस्तीं रोगविनाशक तांबडी पूड शिंपीत जाऊन तीवर संसर्गप्रतिरोधक अशा एका प्रवाही द्रव्याचें प्रोक्षण करितात, त्याप्रमाणें त्यावर टीकारूप दुर्गंधविध्वंसक द्रव्याचें सिंचन केलें पाहिजे; दुसरा उपाय नाहीं !

लॉर्ड वुइलियम बेंटिक यांचे कारकीर्दीत कॅप्टन आंगस्टस वुइलर्ड म्हणून एक उत्तरहिंदुस्थानांत लष्करी अधिकारी होता. याच्या ग्रंथावरून त्याला गाण्याचा शोक फार असावा असें दिसतें. यानें आमच्या गायनशास्त्राविषयीं जो अभिप्राय दिला आहे त्यावरून त्याची शोधकबुद्धि व्यक्त होते इतकेंच नाहीं, तर त्याला आपल्या गाण्याचें मर्महीं चरेंच समजलें होतें असें दिसतें. यानें आमच्या गायकांविषयीं, वाद्यांविषयीं व संगीतकलेविषयीं जें लिहिलें आहे तें वाचून त्याविषयीं आपल्या अंतःकरणांत कृतज्ञता उत्पन्न झाल्याखेरीज रहाणार नाहीं. पण तो येवढेंच करून स्वस्थ बसला नाहीं, हें फार वाईट झालें. '**हिंदुस्थानचे संगीत**' या नांवाच्या ग्रंथांत त्याला आमच्या गाण्याविषयीं जें लिहावेसें वाटलें तें लिहून गेल्यावर, अनेक संगीतांच्या भाषांतरापासून आमच्या शुन्या चालरीती कशा प्रकारच्या असाव्या, याचें अनुमान करण्याचा प्रयत्न त्यानें केला आहे व त्यांत तो अगदीं फसला आहे कोणत्याही देशांतील लोकांच्या काव्यांवरून किंवा तालसुरांत बसविलेल्या पद्यांवरून त्या लोकांच्या नीतीविषयीं, विशेषतः लिंगविषयक नीतीविषयीं, अभिप्राय देणें मोठें साहस होय, असें आह्मांस वाटतें. कारण शृंगार हा काव्याचा प्रधान विषय असल्यामुळें, आणि अतिशयोक्ति ही काव्यरसात्मा होऊन बसल्यामुळें, काव्यांतर्गत स्त्रीपुरुषांच्या उद्गारांवरून कोणत्याही लोकांच्या नीतिमत्तेविषयीं अटकळ करूं गेल्यास तींत प्रमाद

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ८४

लाव्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

होण्याचा फार संभव असतो. **मिस्टरीज ऑफ धी कोर्ट ऑफ लंडन** या रेनॉल्डकृत ग्रंथमालिकेवरून इंग्लिश लोकांच्या नीतिविषयीं मत देणें न्याय्य होईल काय ? संभावित इंग्लिश लोक उघडपणें ही कादंबरी वाचीत नाहींत, व लोकांच्या दृष्टीस पडतील अशा ठिकाणीं तिची ' व्हाल्मे ' ठेवीत नाहींत; कारण बिभत्स शृंगार त्यांत ओतप्रोत भरला आहे, असें सांगतात ! तेव्हां ज्याप्रमाणें **मिस्टरी**ची पुस्तकें आंग्ल नीतीवर निबंध लिहिण्यास वसलेंं असतां आधारभूत मानितां येणार नाहींत, त्याप्रमाणेंच उत्तर हिंदुस्थानांतील हिंदू व मुसलमान गवय्ये आणि नायकिणी ज्या चिजा गातात किंवा वाजवितात त्यांवरून हिंदू लोकांच्या नीतीचें प्रमाण बांधितां येणार नाहीं. पण असें करण्याचें धाडस आमच्या आजच्या निबंधाच्या नायकानें केलें आहे, व तें आमच्या मतें अगदीं चुकलें असल्यामुळें या निबंधाच्या शिरोभागीं आम्हीं त्यास **आणखी एक शाहण्याचा कांदा** असें म्हणून **ॲशवर्नर** हेववाच्या पंक्तीस त्यास बसविलें आहे. आमच्या संगीत शास्त्रांतील स्वररचनेविषयीं व स्वरमेळाविषयीं जें म्हणावयाचें होतें तें म्हटल्यावर, या ग्रंथकर्त्यानें आपलें मन गीतांच्या किंवा चिजांच्या अर्थांत घातलें, व तसें केल्याबरोबर त्याच्या लेखणीस स्फुरण येण्यासारखा नवीन विषय त्याचे हातीं लागला ! अनेक चिजांच्या अर्थाचें मंथन केल्यावर आमच्या संगीतांत बहुधा ज्या गोष्टींचा अंतर्भाव केलेला असतो असें त्याच्या नजरेस आलें, त्या ह्या होत :—

१ अनुकूल होण्याविषयीं वल्लभाची प्रार्थना.

२ वल्लभाच्या विरहामुळें कामिनीस होणारा शोक.

३ प्रतिस्पर्धिनी कामिनीविषयीं द्वेषोद्गार.

४ सासू, नणंदा, किंवा जावा यांचा डोळा चुकवून प्राणेशाची मुलाखत घेण्याची पंचाईत, व मेखलांतील क्षुद्रघंटांच्या

आवाजामुळें कोणास समजूं न देतां घरांतून बाहेर पडण्याची, किंवा रस्त्यांतून जाण्यायेण्याची अडचण.

५ दयितावर ठेवलेल्या प्रेमास साशू व नणंदा यांकडून होणाऱ्या प्रत्यूहाच्या संबंधानें कामिनींचे दुःखोद्गार.

६ सखीपाशीं हितगुजाच्या गोष्टींचें कथन, आणि इष्ट मनोरथ पूर्ण करण्याच्या कामीं तिनें सहाय्य करावें यासाठीं तिची विनवणी.

७ संकेत चुकूं न देण्याविषयीं व प्रेमबंध शिथिल न होऊं देण्याविषयीं सख्यांचा उपदेश.

हें आमच्या संगीतपद्याच्या मंथनापासून बुइलर्ड साहेबांनीं काढलेलें सार किंवा नवनीत! कदाचित् हें त्यांस स्वल्प आयासानें काढितां आलें असेल, असें वाचकांस वाटण्याचा संभव आहे. पण तसें बिलकुल झालेलें नाहीं. तें काढतांना त्यांस भगिरथ प्रयत्न करावा लागला! हिंदू लोकांच्या गाण्यांतच असे विषय येतात, किंवा आशिया खंडांतील इतर लोकांच्या गाण्यांतही अशाच विषयांचा भरणा आहे, अशी शंका त्यांस उत्पन्न होऊन, आरबी व फारशी चिजांकडे त्यांनीं आपली नजर फेंकली, व त्यांवरून त्यांस असें दिसून आलें कीं, हिंदुस्थानांतील स्त्रियांप्रमाणें आरबी स्त्रियांवर मदनाच्या बाणांचा प्रहार होत नसल्यामुळें, त्यांना वश करण्यासाठीं आरबी पुरुष नेहमीं उत्कंठ झालेले असतात, व ह्मणून आरबी काव्यांत जागोजाग पुरुष स्त्रियांची विनवणी करीत आहेत असें दिसून

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टपा. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

येतें! फारशी किंवा परशिअन काव्यांत भलताच प्रकार दिसून येतो. त्यांत स्त्रीपुरुषांतील प्रेमास दुय्यम स्थान देऊन जेथें तेथें पुरुषाभिलाषाचाच उल्लेख केलेला आढळतो. या अमानुष अनुच्चारणीय पापाची आसक्ति या लोकांस कशी लागली असेल ती असो; हें खरें आहे कीं, यांच्या काव्यांत या दुष्ट व्यसनासच आद्यपद दिलें आहे! हिंदूंच्या कवितेंत आरबी कवितेचा व्युत्क्रम आढळतो. हिंदूंच्या संगति पद्यांवरून हिंदू स्त्रिया अत्यंत कामातुर आहेत, व इष्ट पुरुषास वश करण्याच्या इराद्यानें त्या नानाप्रकारचे उपाय योजीत आहेत, असें दिसून येतें!

यामप्रमाणें हिंदुस्थानांतील नायकिणींच्या तोंडीं असलेल्या चिजांच्या अर्थावरून आमच्या बायकांस कामातुर ठरविल्यावर त्या इतक्या कामातुर कशामुळें होतात याचा छडा काढण्याकडे बुइलर्ड साहेब वळले, व त्या कामित्वाचीं त्यांनीं जीं तीन कारणें शोधून काढलीं तीं हीं:—१ हिंदुस्थानांतील पूर्वीची अनवस्था; २. अनेक बायका करण्याची चाल; ३ व हिंदू स्त्रियांचें अज्ञान. या तीन कारणांमुळें पूर्वी हिंदू स्त्रिया कामातुर होऊन व्यभिचार करण्यास प्रवृत्त होत, असें बुइलर्ड साहेबांचें म्हणणें आहे!

हिंदुस्थानच्या सांप्रत स्थितीवरून त्याच्या पूर्वस्थितीचें अनुमान करणें फार चुकीचें होणार आहे, असें या गृहस्थाचें म्हणणें आहे. ती पूर्वस्थिति बरोबर लक्षांत येण्यास सध्यां डोळ्यापुढें ज्या गोष्टी दिसतात त्या अगदीं विसरून गेलें पाहिजे व इतिहासापासून, काव्यापासून, व इतर ग्रंथांपासून जी माहिती मिळते तीवरून, तत्कालीन स्थितीचें चित्र काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जे कोणी अशा प्रकारचा प्रयत्न करतील त्यांस असें दिसून येईल कीं, त्या वेळची हिंदुस्थानची स्थिति फारच शोचनीय होती. आतांप्रमाणें तेव्हां कोठेंही शांतता दृष्टीस

पडत नसे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पायवाटांनीं जावें लागे; साऱ्या देशांत चार दोन देखील मोठ्या सडका नव्हत्या. मार्गांत चोरांचें भय मोठें असे; रस्ते सांपडण्याची मारामार. पडे; वाटेंत मेटेल त्यास रस्ता विचारून पुढें चालूं लागावें तर कदाचित् त्याच्या सांगण्यावरून चोराच्या हातांत आपण होऊन पडूं कीं काय, अशी दहशत वाटत असे: जिकडे तिकडे दाट झाल्या, ओसाड रानें किंवा चिखलाच्या दलदली असत, व त्यांत भयंकर श्वापदें संचार करीत असत;-यामुळें कोणालाहा आपला गांव सोडून एकट्यादुकट्यानें फार लांब जावयास नसे; राज्यीं प्रवास करणें बहुधा अशक्यच असे; ज्याप्रमाणें जमीनी-वरचा त्याप्रमाणें पाण्यावरचा प्रवासही अत्यंत संकटावह असे. अशा स्थितींत दूरचा प्रवास करावयाचा झटला म्हणजे त्याचे दोन पूर्वी वर्ष दोन वर्षे चालत; व तो करण्याकरितां निघण्याचा प्रसंग येऊन ठेपला झणजे कुटुंबांतील माणसांत, विशेषतः ज्या तरुणींचे पति प्रवासावर निघालेले असत, त्यांच्या अंतःकरणांत दुःखाचा अनिर्वाच्य कल्होळ होत असे.

अशा रीतीनें प्रवास करण्यासाठीं घर सोडून गेलेल्या तरुणांच्या तरुण पत्न्या चिंतेनें व विरहव्यथेनें व्याकुळ होत्साऱ्या

वाक्यमीमांसा आणि वाक्यांचें पृथक्करण.

An inquiry into the nature of sentences with An Analysis of them.

कै. गो. ग. आगरकर एम, ए. कृत. विद्यार्थ्यांस अत्यंत उपयुक्त असें हें पुस्तक (२ री आवृत्ति .) तयार होतांच पाठवूं. किं. १ आणे.

मॅनेजर---इकॉनॉमिकल पब्लिशिंग ॲण्ड सेलिंग एजन्सी ७८२ सदाशिव, पुणें.

मोठ्या कष्टानें आपले दिवस कंठीत. त्यांच्या नणंदा व जावा सकाळीं उठून वेणीफणी करीत आहेत, दागदागिने घालीत आहेत, व एकमेकींचा विनोद करीत आहेत हें पाहून या विरह व्यथेनें पीडलेल्या तरुणींस फार खेद होत असे. तथापि बऱ्यावाईटानें त्या आपला दिवसांचा वेळ कसा तरी काढीत. पण रात्र येऊन जिकडे तिकडे सामसूम झालें व त्या आपल्या आंथरुणावर पडल्या म्हणजे पतिचिंतेंत त्या इतक्या व्यग्र होऊन जात कीं, उभ्या रात्रींत त्यांचा डोळा लागत नसे. अशा स्थितींत उन्हाळा गेल्यावर पावसाळ्याच्या आरंभास तरी आपले पति परत येतील, आणि आपली त्यांची गांठ पडून आपणास आनंदाचा दिवस दिसेल, अशा आशेवर त्या वसंत व ग्रीष्म ऋतूंतील अत्यंत प्रखर दिवस व रमणीय रात्री मोठ्या कष्टानें लोटीत असत. हे ऋतु निघून जाऊन पावसाळ्याच्या आरंभास त्यांचे पति परत आले तर सारें ठीकच असे; पण दुर्दैवानें जर तसें घडलें नाहीं, तर मात्र त्यांच्या दुःखास व चिंतेस पारावार नसे. याप्रमाणें अनेक वर्षें वाट पाहिल्यावर, पति परत येत नाहींत, असें पाहून कामार्तीनें करपून गेलेल्या या तरुणींची काय अवस्था होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. अशा संकटांत सांपडलेल्या तरुण कन्यका अखेरीस निराश होऊन वांकडें पाऊल टाकण्यास तयार होत, आणि सखींच्या साहाय्यानें संकेतस्थानीं पाहिजे तसलें धाडस करून वल्लभांच्या गांठीं घेत, आणि अप्रशस्त रीतीनें आपले मनोरथ पूर्ण करीत, व अशी स्थिति अनेक कुटुंबांत दृष्टिगोचर होत असल्यामुळें तिचें प्रतिबिंब तत्कालीन काव्यांत व संगीतांत पडलें आहे, असें **बुइलर्ड** साहेबांचें म्हणणें आहे.

याशिवाय आम्हांत रूढ असलेलें बहुपत्नीकत्व हें आमच्या स्त्रिया व्यभिचारी अराण्याचें दुसरें कारण आहे, असें या गृह-

स्याचें मत आहे, व तें कांहीं खोटें नाहीं. **एका पुरुषा दोघी नारी । पाप वसे त्याचे घरीं** ही तुकारामोक्ती जर आमच्या लोकांस मान्य असेल तर एकाच पुरुषानें तीन किंवा चार बायका करण्याची चाल ज्यावेळीं रूढ असेल त्यावेळेस प्रत्येक स्त्री आपल्या पतीचें सारें प्रेम आपणावर असावें म्हणून खटपट करीत असल्यामुळें, सापत्नमत्सर विकोपास जाऊन कुटुंबांतील शांततेचा नाश होत असेल इतकेंच नाहीं; तर ज्या दुर्दैवी तरुणी आपल्या पतींच्या नजरेंतून उतरल्या जात असतील त्यांचें मन त्याच्या संसाराकडे न लागतां बाह्यसुखाकडे जाऊं पाहत असेल, असें मानण्यास काय हरकत आहे ?

व्यभिचाराचें तिसरें कारण आमच्या स्त्रियांचें अज्ञान होय, असें हे साहेब म्हणतात, व त्याविषयीं आम्हांस थोडी शंका आहे ज्ञान आणि सद्गुण यांचा अन्योन्य संबंध कितपत आहे, हें अद्यापि चांगलेसें ठरलेलें नाहीं. ज्ञानाचा प्रसार झाल्यानें खून, दरवडे, मारामाऱ्या वगैरे मोठमोठ्या गुन्ह्यांची संख्या कमी होते, असें पुष्कळ विचारी लोक कबूल करतात. पण खोटें बोलणें, बनावट कागद करणें, खोट्या साक्षी देणें, चतुराईनें दुसऱ्यास फसविणें, लांच खाणें, व्यभिचार करणें, खोट्या शपथा घेणें वगैरे कमी दुष्टपणाचे गुन्हे वाढतात किंवा कमी होतात याविषयीं जितका संशय ॲरिस्टॉटल यास होता तितकाच हर्बर्ट स्पेन्सर यासही आहे. तेव्हां अज्ञानामुळें आमच्या स्त्रिया विशेष व्यभिचारी होत्या, व आतां त्यांस थोडेंबहुत लिहितां वाचतां येऊं लागलें आहे, म्हणून आमच्यांतील व्यभिचार कमी होऊं लागला असला पाहिजे, असें जर कोणी इंग्रज

प्लॉट्स् भाड्यानें देणें आहेत–फर्ग्युसन कॉलेज (पुणें)
समोर–हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.
मॅनेजर सुधारक, पुणें.

आह्मांस सागूं लागेल तर त्यांचे आह्मांस हंसूं आल्यावांचून रहाणार नाहीं ! कोणत्याही दशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचें धाडस करूं नये, ह्मणून आम्ही इंग्लिश लोकां-चा व्यभिचाराविषयीं कांहीं एक ऱ्हणत नाहीं; तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचारानें आणूं लागतील, तर तुमच्या भडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें, इतक्या त्या पवित्र आहेत, असें म्हणण्यास आम्हीं कधींही सोडणार नाहीं ! हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतकें शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याही देशांत सांपडणार नाहीं.

संमतीचे वय आणि जुन्या लोकांचा खोटेपणा.

संमतीचें वय सरकारानें वाढवूं नये, ह्मणून जुन्या लोकांनीं जी ओरड चालविली आहे तींतील खोटेपणा पाहून कोणत्याही सत्यशील मनुष्यास जुन्या लोकांचा आणि सुशिक्षित म्हणविणाऱ्या त्यांच्या पुढाऱ्यांचा तिरस्कार व संताप आल्यावांचून राहणार नाहीं. त्यांची पहिली लबाडी ही आहे कीं, संमतीचें वय बारा वर्षांपर्यंत वाढविलें असतां सरकारानें हिंदूधर्मांत लोकांच्या मर्जीविरुद्ध हात घातला असें होईल. १८५७ च्या जाहिरनाम्यांत सरकारानें असें फर्माविलें आहे कीं, आम्ही आमच्या हिंदुप्रजेच्या धर्मांत कोणत्याही प्रकारें हात घालणार नाहीं; नवऱ्यानें आपल्या बायकोस तेरावें वर्ष लागण्यापूर्वी तिच्याकडे जाऊं नये, असा निर्बंध केला असतां, या लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें सरकारानें धर्मांत हात घालण्यासारखा होतो; तेव्हां जर हा कायदा पसार झाला तर सरकारानें वचनभंग केला, असें

होणार. अशी यांच्या वाचाळ पुढाऱ्यांनीं अहमहं चालविली आहे. विवाहित स्त्रीचा संभोग तिच्या नवऱ्यानें तिला तेरावें वर्ष लागेतोंपर्यंत घेऊं नये, घेतल्यास तो संभोग दंड्य होईल, असें कलम पीनल कोडांत घातलें असतां जर हिंदुधर्मांत सरकारानें हात घातला असें होत असेल तर त्या वयाचे पूर्वी नवऱ्यानें बायकोकडे जावें, अशा अनुज्ञा हिंदुधर्मशास्त्रांत असल्या पाहिजेत. पण त्या आह्मांस तर कोठें आढळल्या नाहींत, व हिंदूधर्मशास्त्रांचीं पानें रात्रंदिवस चाळणाऱ्या जुन्या लोकांच्या पुढाऱ्यांनींही त्या पुढें आणिलेल्या नाहींत. तेव्हां या निर्बंधामुळें सरकारानें हिंदुधर्मांत हात घातला असें होतें, असे गागणारांची ही शुद्ध लबाडाची ओरड आहे असें म्हणणें भाग आहे. याचर कोणी असें प्रत्युत्तर देतील कीं, तेराव्या वर्षापूर्वी नवऱ्यानें बायकोकडे जावें अशी जरी स्पष्ट शास्त्राज्ञा नाहीं, तरी कन्या ऋतुमती झाल्याबरोबर तिचें गर्भादान करावें अशी शास्त्राज्ञा आहे. व ज्या अर्थी कित्येक मुली बाराव्या वर्षी ऋतुमती होतात असें दिसून आलें आहे, त्या अर्थी या कायद्याचें उल्लंघन न करणें म्हणजे ज्या मुलींस बाराव्या वर्षी ऋतु प्राप्त होईल त्यांच्या गर्भाधानाची स्थिति कांहीं अंतरावर टाकून पाल्य धर्माज्ञेचे उल्लंघन करणें, व बेचाळीस पिढ्या अधोगतीस जाण्यासारखें वर्तन करणें होय ! यावर आम्ही असा प्रश्न विचारतों कीं, **मुलगी कोणत्याही स्थितींत असो, किंवा ती कोणत्याही वयाची असो तिला ऋतु प्राप्त झाला कीं, सोळा दिवसांच्या आंत नवऱ्याला गर्भादान करण्याकरितां तिच्याकडे पाठ**

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकटेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १८१३

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

विलेंच पाहिजे, अशी शास्त्राज्ञा कोठें आहे ती या धर्माभिमान्यांनीं आह्मांस दाखवावी, आणि तिचे पालन सर्व ठिकाणीं सर्वांकडून चाललें आहे कीं काय, हें आह्मांस सांगावें; तसेंच, सोळा दिवसांच्या आंत गर्भादान ज्यांनीं उरकून घेतलें नाहीं त्यांस वाळीत टाकण्याचा किंवा त्यांना जबरदस्त प्रायश्चित्त देण्याचा परिपाठ आहे कीं काय, याविषयींही जो खरा प्रकार असेल तो या लोकांनीं यावेळीं प्रसिद्ध करणें अवश्य आहे. घरंवाईट न पहातां प्रतिपक्ष्यांचा पाडाव करण्यासाठीं हवें तें बहकत सुटणें, ज्या गोष्टी धर्माशीं विसंगत तर नाहींतच, पण उलट धर्मसाहाय्यकारी आहेत अशा गोष्टी धर्मविरोधक आहेत, अशी खोटी ओरड करून आपल्या प्रतिपक्ष्यांवर व सरकारावर तुटून पडणें, हें धर्मशील म्हणविणाऱ्या लोकांस अत्यंत लज्जास्पद आहे. स्त्री ऋतुस्नात असो किंवा नसो, तिला तेरावें वर्ष लागण्यापूर्वी तिच्याशीं समागम करणें हा मोठा अन्याय होय, अशा आमच्या धर्मशास्त्राच्या व वैद्यकशास्त्राच्या स्पष्ट आज्ञा आहेत; पण त्यांचा आमच्याकडून व्हावा तसा प्रतिपाळ होत नसल्यामुळें कित्येक कन्यकांवर भयंकर प्रसंग गुदरत आहेत. तेव्हां संमतीचें वय बारा वर्षेपर्यंत वाढविण्याच्या हेतूनें आ. मि. **स्कोबल** यांनीं जें बिल मुख्य का. कौंसिलापुढें आणिलें आहे, तें पसार झाल्यास ज्या राक्षसी कामुकांच्या कामवासना अनावर होतील त्यांस कडक शिक्षा देण्यास सांपडेल इतकेंच नाहीं, तर हिंदु धर्मशास्त्रांत अल्पवयस्क कन्यकांवर त्यांच्या उतावीळ नवऱ्यांकडून जुलूम न होण्याबद्दल जे प्रतिबंध सांगितले आहेत ते ब्रिटिश सरकारानें सक्त अमलांत आणिल्यासारखें होणार आहे.

या नवीन होणाऱ्या प्रतिबंधाविरुद्ध व सुधारकांविरुद्ध अज्ञान लोकांची मनें क्षुब्ध करण्यासाठीं जुन्या लोकांचे सत्यपराङ्मुख

पुढारी त्यांस असें सांगत फिरतात कीं, असा प्रतिबंध करणें म्हणजे कायद्यानें विवाहकालाची मर्यादा वाढविण्यासारखें होय ! व विवाहसंबंध तर धर्मांतर्गत विधि आहे; तेव्हां संभोगकालाची मर्यादा वाढविणें हें हिंदू धर्मावर स्वारी करण्यासारखें आहे ! असल्या भ्रामक कल्पना लोकांत पसरणारांस काय म्हणावें हें आम्हांस समजत नाहीं. असले खोटे लपंडाव करून सरकाराविरुद्ध लोकांचीं मनें कलुषित करणारांस व खऱ्या धर्मापासून व सुधारणेपासून त्यांना फितुर करणारांस राजनिष्ठ व धर्मनिष्ठ म्हणण्यापेक्षां राजद्रोही, धर्मद्रोही, लोककल्याणशत्रू म्हणणच बरें दिसतें ! तेराव्या वर्षापर्यंत संभोगार्चा मनाई केल्यानंतर जन्म झालेल्या मित्तीपासून बाराव्या वर्षाच्या अखेरच्या दिवसापर्यंत पाहिजे त्या वेळीं मुलीचें लग्न लावण्यास संमतीच्या या नवीन कायद्यानें कशी हरकत येते कोण जाणे ! पण ज्यांना कांहीतरी बडबड करून चांगल्या गोष्टीविरुद्ध लोकांचा उठावणी करावयाची आहे, व आपल्या बरोबर इतरांनाही दुष्ट आचारांच्या चिखलांत लोळत पाडावयाचें आहे, त्यांना सत्यासत्य पाहण्याची काय गरज आहे ?

पुनः या लोकांचें असें एक तुणतुणें चाललेलें असतें कीं बारा वर्षांच्या आंत स्त्रीपुरुषांचा समागम होणें जरी इष्ट नाहीं तरी तो समागम एकाएकीं कायद्यानें बंद करणें बरें नाहीं कारण त्याला लोकमत अनुकूळ नाहीं. शिक्षणाचा प्रसार होऊन लोकमत सिद्ध झाल्याखेरीज अशा प्रतिबंधापासून फायदा न होतां उलट नुकसान होणार आहे. कारण कायदा

निबंध संग्रह.

भाग १ ला. कि. १। रु.

मॅनेजर सुधारक ऑफीस, पुणें.

न ठेवल्यानें व मोऱ्या शिक्षेची भीति घातल्यानें उलट मनुष्य
पल्या अनावर झालेली तीव्रवासना तृप्त करण्यास मागेपुढें
हणारा नसतो, त्याच्या मनानें उचल खाल्ली कीं तो तुमचे
ा तसले कायदे गुंडाळून ठेऊन पापाचरण करण्यास प्रवृत्त
ो; सबब अशी वासनाच त्याचे अंतःकरणांत उद्भवणार
ही, अशा प्रकारचें शिक्षण त्याला दिलें म्हणजे झालें ! यावर
मर्ची दोन उत्तरें आहेत. पहिलें; ज्या कोटिक्रमांत बिलकुल
र्थ नाहीं असेलतर खून करणारास फांशीं देण्याचा जो
धिकार ठेविला आहे तोही पीनल कोडांतून काढून टाकला
हिजे ! कारण उत्कट द्रव्यलोभानें किंवा दुसऱ्या कोणत्याही
रणानें जो खून करण्यास निघतो, तो त्या अपराधास पीनल
डांत काय शिक्षा सांगितली आहे, हें पहाण्यतां गुंतणारा
ातो. सबब खून करणारा देहांत शिक्षा देण्यापेक्षां ज्या
क्षणानें त्याला खून करण्याची बुद्धिच होणार नाहीं, असें
क्षण त्यास द्यावें म्हणजे झालें ! या विचारसरणीप्रमाणें
जच सारें पीनल कोड रद्द करण्यास सिद्ध झालें पाहिजे !
। प्रस्तुत कायद्याचे शत्रु तसें करण्यास तयार असतील असें
ांस वाटत नाहीं. शिवाय शिक्षण म्हणजे तरी काय ?
पदेश करणें व श्रीमुखांत दोन चापट्या लगावणें यालाच
क्षण कशासाठीं म्हणावें ? सक्त मजूरी करावयास लावणें,
के मारणें, खोड्यांत घालणें, सुळीं देणें, फांशीं चढवणें वगैरे
ांसही शिक्षणाचे प्रकार कां मानूं नये ? अपराधाच्या मानानें
सुशिक्षणाचेच प्रकार आहेत असें आम्हांस वाटतें. तेव्हां संम-
ल्या संबंधानें आज जो कायदा हिंदुस्थानसरकार करूं पहात
रव
हे त्यापासून म्हणण्यासारखा तात्कालिक उपयोग न झाला
र तो शिक्षणावह होईल, असें जें ऑ. मि. स्कोचल यांचें
ोकाणें आहे, तें यथार्थ आहे.

आतां लोकमताच्या संबंधानें हे हट्टी जुने लोक जो आग्रह धरून बसूं लागले आहेत त्याविषयीं मुळींच विचार करण्याची गरज नाहीं. कारण सुधारकांना आपल्या बाजूस जितकें लोकमत आहे, असें म्हणण्याचा अधिकार आहे, त्याहून फारच कमी अधिकार या लोकांना तें आपल्या बाजूस आहे, असें म्हणण्याचा आहे. या कायद्याशीं आपल्या स्त्रियांचा विशेष संबंध आहे, व त्या त्याला प्रतिकूल आहेत, असें म्हणण्याची छाती या सत्यापलाप करणाऱ्या बाबांसही होणार नाहीं. तसेंच, खालच्या जातींचे लाखो अज्ञान लोकही यांच बाजूस आहेत असें नाहीं: कारण एक तर असल्या संभोगाचा प्रकार त्यांच्यांत सहसा घडत नाहीं, व दुसरें ज्याप्रमाणें इतर गोष्टींविषयीं त्यांचा अभिप्राय कोणी घेत नाहीं, त्याप्रमाणें या गोष्टींतही त्यांचें मत कोणीं विचारलेलें नाहीं. शिवाय, लोकमताचा आजच येथें जो समाजविणाऱ्या जुन्या लोकांस आम्ही अनुविचारतों कीं, हिंदू राजे व हिंदू शास्त्रकार लोकमताचा पत्ता करात असत किंवा आपणांस योग्य वाटतील ते निर्बंध हा मताचा विचार मनांत न आणतां बेलाशक करीत असत तसें नसेल तर "राजा कालस्य कारणम्" हा न्याय काढून आळी आ. रा. च. नूलकर या कायद्याचे [illegible] म्हणून बातमी आली आहे ती खरी नसो. कारण सुधारकांनीं येथे धाडलेल्या मेमोरीयलावर (अर्जावर) त्यांच [illegible] तथापि कौन्सिलांतील भाषणाचा कच्चा रपाट येईपर्यंत त्यावर कोणत्याच प्रकारची टीका न करणें हेंच उचित आहे.

समाज-शास्त्राकडील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. माटे एम्. ए. कृत. किं. ८८

सुधारक ऑफीस, पुणें

आतां मात्र खचित होणार.

काय ? संमतीचा कायदा ! !

आजपर्यंत ज्या गोष्टीचा इतका ' भवति न भवति ' झाली ती आतां फलद्रूप होण्याचा समय येऊन ठेपला आहे; यासाठीं हिंदू धर्माचा वृथा अभिमान धरणाऱ्या आग्रही व सत्यापलाप करणाऱ्या लोकांनीं आपली असेल तेवढी पुण्याई खर्च करून त्या गोष्टीविरुद्ध आपल्या हातून जें होणें असेल तें करावें. वायकोस बारावें वर्ष लागण्यापूर्वी तिचा नवरा तिच्याकडे गेला तर त्यानें तिच्यावर ' रेप ' केला, किंवा असंमत रत्युपभोग घेतला, असा कायदा करून जे कामी पुरुष त्याच्या नावडींत सांपडतील त्यांस जन्मठेपेची काळ्यापाण्याची शिक्षा देण्यास कांहीं हरकत नाहीं. पण असा कायदा केल्यानें अशा प्रकारच्या अपराधांची संख्या म्हणण्यासारखी कमी होण्याचा संभव नाहीं, असें आमचें मन पूर्वीपासून असल्यामुळें, आम्हीं या कायद्याचा पक्ष घेऊन मोठ्या वीरश्रीच्या वादांत कधींच पडलों नाहीं. तेव्हां हा कायदा पसार झाल्यास (व होईल याविषयीं आतां आम्हांस मुळींच शंका राहिली नाहीं) त्याबद्दल विशेष आनंद मानण्याचें किंवा फुशारकी मिरविण्याचें कारण विचारी सुधारकांस नाहीं, असें आम्हांस वाटतें. तथापि या कायद्याचा मसूदा मुख्य कौन्सिलापुढें येऊं नये, व आल्यास त्याला कायदेपण प्राप्त होऊं नये, ह्मणून जुन्या पद्धतीच्या ज्या लोकांनीं सत्यपराङ्मुख होऊन हवी तसली बडबड चालविली आहे, व पोकळ दटावणी-च्या गप्पा मांडल्या आहेत, त्यांतील कपट व लबाडी बाहेर पडून त्यांचा मोड होणार, हें पाहून आम्हास सानंद खेद होत आहे ! मागल्या लेखांत या विलाविषयीं आम्ही विशेष चर्चा करण्याच्या भरींत पडलों नाहीं, कारण त्या वेळेस त्या संबंधानें

आलेल्या तारांतील मजकुरावरून लोकांचा गैरसमज होण्याचा संभव होता; व कित्येक पत्रांनीं तो करून सोडण्यास मागेंपुढें पाहिलेंही नाहीं. त्या तारांतील अस्पष्ट व त्रोटक माहितीवरून कित्येकांनीं असा अर्थ काढला कीं, ज्या आ. रा. च. नूलकरांनीं येथील सुधारकांनी धाडलेल्या अर्जावर आपली सही दिली ते नूलकर सुद्धां या संमतीच्या वयाचे बिलास, आयत्या-वेळीं प्रतिकूळ झाले ! या सहजगत्या उठलेल्या किंवा कोणींतरी बुध्या उठविलेल्या अफवेवर आम्ही त्यावेळेस बिलकुल विश्वास ठेविला नाहीं, आणि ठेवला असता तर आमच्या हातून मोठा प्रमाद घडला असता, असें आतां हिंदुस्थान सरकाराकडून प्रसिद्ध झालेल्या **एक्सट्रेऑर्डिनरी गयाझेटांतील रिपोर्टा**वरून उघड होत आहे. या रिपोर्टापैकीं म्हणजे संमतीचें वय वाढविण्याविषयीं आ. सर. ए. स्कोबल यांनी कौन्सिलापुढें बिल आणिलें त्या वेळेस जीं भाषणें झालीं त्यापैकीं दोन भाषणें आम्हांस फार आवडलीं; एक खुद्द आ. ए. कोबल यांचें, व दुसरें आ. रा. च नूलकर यांचें लॉर्ड लॅन्सडौन यांचें भाषण आपलें सरासरीच होतें पण सर रोमेशचंद्र यांच्या भाषणाच्या बाजूस तें मांडण्याची मुळींच सोय नाहीं, कारण इतक्या मोठ्या विद्वानाकडून झालेलें इतकें गचाळ भाषण आमच्या पहाण्यांत कधींच आलें नाहीं. पण एका प्रकारें हे पेन्शनदार हायकोर्ट जज्ज जसें बोलले तसें बोलणेंच त्यांस योग्य होतें. जॉन् स्टुअर्ट मिल्ल यांच

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र,
संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम. आर. सॅन्. आय्. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपया.

'संदेश' एजंट, पुणें सिटी.

नेहमीं असें म्हणणें असें कीं, ज्याच्या अंगांत जो दुर्गुण विशेष असतो, तो तो दुर्गुण काढून टाकण्यास फार प्रतिकूल असतो. अडाणी लोकांस जबरीच्या शिक्षणाचा, वस्ताद दारू पिणाऱ्यास दारू पिण्याच्या बंदीचा, अल्पवयांत अपत्यांचे विवाह करणाऱ्यांस बालविवाहनिषेधाचा व अप्राप्तयौवनकुमारिकांचा त्यांच्या संमतीविरुद्ध संभोग करणाऱ्यांस संमतीचें वय वाढविण्याचा कायदा सहसा पसंत पडावयाचा नाहीं ! यावरून खुद्द सर रोमेशचंद्र यांनीं आपल्या तारुण्यांत तसें केलें असेल, किंवा आधुनिक तरुणांनी तसें करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें त्यांचें म्हणणें असेल, असें आम्हांस प्रतिपादितां येणार नाहीं, हें आम्ही कबूल करतों. त्यांनीं अगदीं पाप स्वतः केलें नसेल, व त्यांना तें नकोंही असेल; पण ज्या देशांत त्यांचा जन्म झाला आहे, व ज्या देशांत त्यांचें बहुतेक वय गेलें आहे, त्या देशांतील वैवाहिक आचारांचें अस्पष्ट प्रतिबिंब तरी त्यांच्या विचारसरणींत पडल्यावांचून कसें राहणार ? मुळी उपवर होण्यापूर्वी म्हणजे त्यांना अनुप्रास होण्यापूर्वी त्यांचे लहान मोठे लग्न कौतुकानें किंवा जबरीनें त्यांचेकडे पालथिणें किंवा अज्ञान मुलींस त्यांच्या नवऱ्यांच्या खोल्यांत जबरदस्तीनें लोटून घालणें हा प्रघात जितका बंगदेशांत रूढ आहे, तितका हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही भागांत नाहीं असें अलीकडे बाहेर आलेल्या पुराव्यावरून निर्विवाद सिद्ध झालें आहे. हे बंगाली लोक पूर्वीपासूनच अत्यंत विषयासक्त असावे, असा दिसतें पूर्वीच्या लोकांच्या गोष्टींत कधीं कधीं निघणारे स्त्रीराज्य कोठें तरी बंगाल्यांत असावें, असा इकडील अडाणी लोकांचा अद्याप समज आहे ! बंगवासी स्त्रियांस घराच्या बाहेर पडण्याची किंवा सांनिकट आप्तांवांचून कोणत्याही पुरुषाचे मुखावलोकन करण्याची शक्ति मनाई असल्यामुळें, शेकडो वर्षें गृहकारागृहांत

खिनपत व कुजत पडलेल्या त्या दुर्दैवी आर्यमाहिलांस अनेक व्यासंगाच्या व कर्मणुकींच्या अभावामुळें, ज्या एका पुरुषाचें मुखावलोकन करण्याची व ज्या एका पुरुषाशीं संगती करण्याची साऱ्या जन्मांत सवड मिळणार त्या एका पुरुषाशीं आपलें होईल तितकें लौकर संघटन व्हावें, असें त्यांस वाटत असेल. तसेंच, या भयंकर गोपाच्या चालीचा साधारणपणें असलाच परिणाम तिकडील पुरुषांच्या मनावरही होत असेल, यांत संशय नाहीं. तेव्हां ज्या कायद्यानें नवराबायपण एकत्र होण्याचा काळ उभ्या दोन वर्षांनीं दुरावणार तो का. दा तिकडील बहुतेक लोकांस भीतिप्रद वाटावा यांत काहीं नवल नाहीं. बंगाल्यांतील बहुतेक पुढारी लोक आणि बहुतेक वर्तमानपत्रें या कायद्याविरुद्ध एकसारखा गिल्ला करीत आहेत; तेव्हां सर रोमेशचंद्र यांच्या विचारांवरही त्याची थोडीशी झांक न पडती तर मात्र मोठें आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होती. संमतीचें वय वाढविण्यांत काहीं अर्थ नसून, त्यापासून लोकांत असंतोष मात्र निष्कारण उत्पन्न होणार आहे, असें जे त्यांनीं म्हटलें तेंच व्हावें तसें साळें! कारण मनुष्य किंतीही शहाणा असो, तो थोडाबहुत तरी आपल्या उपजत स्वभावावर गेल्याशिवाय राहावयाचा नाहीं. पृथ्वीवरील पक्ष्यांनीं किंवा वैमानिकांनीं कितीही उंच गगनचुंबी मारल्या तरी पृथ्वीचें आकर्षण ते कसें चुकविणार व पृथ्वीस वेष्टणाऱ्या वातावरणाच्या बाहेर कसे पडणार!

या कायद्याविरुद्ध आजपर्यंत आणिलेल्या सर्व आक्षेपांस आ

ह्यासंबंधानें सविस्तर माहितीकरितां येथून आतां ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें,

ए. स्कोबल यांनीं फार थोडक्यांत पण अतिशय खणखणीत उत्तरें दिलीं अहेत. या कायद्यानें नवीन अपराध अस्तित्वांत येत नाहीं, ह्मणजे जें वर्तन पूर्वी सदोष मानलें जात नव्हतें, तें हा कायदा पास झाल्यावर सदोष होणार आहे असें नाहीं; मुलींस ऋतुप्राप्त होण्यापूर्वी तिचा विवाह करावा, अशा हिंदूधर्मशास्त्रांत आज्ञा अहेत, तर्‍हा त्या कालापूर्वी जे दुष्ट पुरुष त्यांच्याशीं संग करतील त्यांस कडक शासनें सांगितलीं अहेत, तेव्हां स तेरावें वर्ष लागण्यापूर्वी ज्याप्रमाणें परक्या पुरुषानें त्याप्रमाणेंच तिच्या नवऱ्यानेंही तिच्याकडे गमन केलें असतां तो असंमत रत्युपभोग होतो, असें समजून उभयतांसही सारखी शिक्षा देण्यास ज्याप्रमाणें आह्मांस हरकत वाटत नाहीं त्याप्रमाणें पुर्वीच्या ऋषींसही वाटली नसती; ह्मणून जे लोक त्या ऋषींच्या आज्ञांचें उल्लंघन करण्याकरितां या कायद्यास धर्माची खोटी हरकत सांगत आहेत त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देण्याची गरज नाहीं; ज्यानें हा गुन्हा केला आहे असा संशय आला असेल त्याला वारंटानें कैद करण्याचा अधिकार पोलिसास देवला नसल्यामुळें व जामीन घेऊन व समानें कांहीं असल्या आरोपांची चौकशी करावी, असें कलम घातलें असल्यामुळें, पोलिसठोक घरांत शिरून भल्या लोकांची अब्रू घेण्यास, धाक दाखवून पैसे खाण्यास, किंवा दांडगाई करून संभावित कुलांत एकच कल्लोळ करून सोडण्यास प्रवृत्त होतील, अशी जी कित्येक लोकांस भीति पडली आहे ती निष्कारण आहे; इंग्लंडांतील मुलींस बहुधा सोळाव्या वर्षीं व येथील मुलींसही बहुधा तेराव्या वर्षीं ऋतु प्राप्त झाल्यानंतर, तेव्हां संमतीच्या वयाची हयत्ता वारा वर्षावर आणून, जो सरकारणयास यत्किंचित् हरकत नाहीं; तसेंच, जरी या कायद्यानें संभाव्य अपराध करणाऱ्या एकूनएक गुन्हेगारांसस याचीर्यादींत आणून शिक्षा ठोठावतां येईल, व हें पाप निस्ता-

लस निर्मूळ करतां येईल, असें म्हणतां येत नाहीं तरी ज्या थोड्या अपराध्यांस कडक शिक्षा देतां येईल त्यांच्या उदाहरणानें या अपराधाकडे प्रवृत्ति असलेल्या कामुकांस जबर दहशत पडेल, व सामान्य लोकांच्या मनावर त्याचा अत्यंत शिक्षणावह परिणाम होईल, याविषयीं अणुमात्र शंका नाहीं, असें आ. स्कोबल साहेब म्हणाले, व कोणत्याही निःपक्षपाती व विचारी मनुष्यास त्यांचें म्हणणें यथार्थ आहे, असें म्हटलें पाहिजे, असें आम्हांस वाटतें. आ. ए. स्कोबल यांचें भाषण झाल्यावर सर रोमेशचंद्र यांनीं या सभेची उलट बाजू आपणांकडून होईल तेवढ्या चतुराईनें फुगवून दाखविली. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, नवऱ्याला बायकोकडे गेल्याबद्दल कोणत्याही देशांत शिक्षा करीत नाहींत. नवऱ्यानें स्वस्त्रीकडे जाणें हाच या विषयसुखाचा प्रशस्त मार्ग होय. असल्या सुखासाठीं नवऱ्याला दंड करणें हें अत्यंत विपरीत होय. ही विपरीतता फक्त हिंदुस्थानच्या पनिल कोडांत मात्र आढळते. हिंदुस्थानच्या पनिल कोडावर टीका करतांना या वेडया न्यायाधिशानें जी एक गोष्ट लपवून ठेविली ती त्यास उत्तर देतांना कोणींच पुढें आणिली नाहीं, हा मोठा चमत्कार आहे. ज्या देशांत स्त्रीशीं अकालीं संभोग केल्याबद्दल नवऱ्यास शिक्षा मिळत नाहीं, त्या देशांत कोणत्याही नवऱ्याला आपल्या स्त्रीशीं अकालीं संभोगच करतां येत नाहीं, म्हणून तो मिळत नाहीं. हा संभोग न करतां येण्याचें कारण असें आहे कीं, त्या देशांतील मुली बाराव्या वर्षांपूर्वी कोणाच्या बायकाच

संगीत सुविचार-विजय नाटक.
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत
किं. ०८
सुधारक ऑफीस. पुणें.

होऊं शकत नाहींत; म्हणजे या वयाचें आंत मुलींचीं लग्नें करूं नयेत, असें त्या दृशांत निर्बंध केलेले आहेत पाहिजे त्या वयास मुलींचीं लग्नें करण्याची चाल येथल्याप्रमाणें युरोप खंडांत रूढ असती तर बायकोस तेरावें वर्ष लागण्यापूर्वी कोणत्याही मुलीचें लग्न करूं नये, व तेरावें वर्ष लागण्यापूर्वी कोणत्याही बायकोकडे तिच्या नवऱ्यानें जाऊं नये, या दोन निर्बंधांपैकीं पहिला समाजास विशेष हितकारक आहे हे उघड आहे. नव [illegible] ज्या अर्थी लग्नाच्या वयाची इयत्ता ठरविणें म्हणजे [illegible] नाचा [illegible] न होऊन लग्नें, लें कमलाविरुद्ध जाणें अशी [illegible] क. । [illegible] भीति वाटत आहे, त्या अर्थी संमतीच्या [illegible] यांत [illegible] सुधारणा करण्यास तयार झालें आहे [illegible] ा पाहिजे. परन्तु लोकांनीं [illegible] मुलींचीं लग्नें होतांच कामा नयेत, असा [illegible] ा पाहिजे तरी सामान्य [illegible] ांतून [illegible] ाणिल्याशिवाय [illegible] ांच्या सक्त [illegible] मनाईतून [illegible] ाल्याविरुद्धचा [illegible] ा विरुद्ध गुन्हा होणार नाहीं व समाजाला जबरीचा उपद्रव होणार नाहीं या दृष्टीनें पोक्त सुधारणा [illegible] ा [illegible] ांनीं [illegible] ा घालून [illegible] ा, प्रत्येक मराठा [illegible] ा [illegible] ा; हाच [illegible] ांत [illegible] ा [illegible] ा, तर [illegible] ांत परिपाठ आहे; तेव्हां हा [illegible] ा [illegible] ा, म्हणजे धर्मो-

लंघन करणें, व धर्माज्ञा पाळणें म्हणजे या कायद्याचें उल्लंघन करणें असा पेंच येऊन पडतो. म्हणून सरकारानें या कायद्याच्या भरीस पडूं नये. आम्ही तुमच्या धर्मांत हात घालणार नाहीं असं १८८५ च्या जाहिरनाम्यांत सरकारचें अभिवचन आहे पण त्या वचनास या कायद्यानें सरकार हरताळ लावूं पहा आहे, हें वाईट आहे. यामुळें हिंदुस्थानच्या प्रजाजनांत लोकांत मोठा असंतोष उत्पन्न होणार आहे. यावर बोलकर त्यांनीं खूप समाधानी उत्तर दिलें. ते असें म्हणालें कीं मुलींस कोणत्याही वयास प्राप्त झाला तरी तिचें गर्भाधान लावलेंच पाहिजे, असा आचार सर्व हिंदुस्थानांत रूढ आहे असें नाहीं. शिवाय, वा आचाराच्या संबंधानें धर्मशास्त्रकार, यांतही पुष्कळ मतभेद आहे. पण तो नाहीं असें वादाकरितां क्षणभर मानिलें तरी, जर आपल्या अंतःकरणांत कांहीं मूलतत्त्व असेल तर बारा वर्षांच्या आंतील मुलींस विषयकर्मांत लोटून देण्यासाठीं जेवढें धर्मोल्लंघन करणें भाग पडेल, तेवढें करणें आपण तयार झालें पाहिजे. या स्पष्टोक्तीबद्दल त्यांचे बोलून चालून तारीफ केलीच पाहिजे. पण त्यांचें असें करणें हा जर धर्म असेल तर, विषयोपभोगाला सरकारानें योग्य झालेले नाहींत. अशा अल्पवयस्क मुलींचा संसर्ग नवऱ्यास हवालदार झाल्या करून देणें हाही तितकाच मोठा हिंसा स्वरूपाचा मोठा आहे यांत व शास्त्रमतभेदाचा काय म्हणा आमच्या आधुनिक नीच स्थितींत या गोष्टींचा भीतीनें

आनुषंगिक.—या छोटेखानी पुस्तकांत सप्रमाण शुद्धि व मारणाशिया दिली आहे. पृष्ठ ८२

लंघन करणे. व धर्माज्ञा पाळणें म्हणजे या कायद्याचें उल्लंघन करणें असा पेंच येऊन पडतो. म्हणून सरकारानें या कायद्याच्या भरीस पडूं नये. आम्ही तुमच्या धर्मांत हात घालणार नाहीं असें १८८५ च्या जाहिरनाम्यांत सरकारचें अभिवचन आहे पण त्या वचनास या कायद्यानें सरकार हरताळ लावूं पहात आहे, हें वाईट आहे. यामुळें हिंदुस्थानच्या प्रजाजनांत लोकांत मोठा असंतोष उत्पन्न होणार आहे. याचर नूलकर त्यांनीं खूप समाधानी उत्तर दिलें. ते असें म्हणाले कीं मुलींस कोणत्याही वयास पतु प्राप्त झाला तरी निदें गर्भाधान लावलेंच पाहिजे, असा आचार सर्व हिंदुस्थानांत रूढ आहे असें नाहीं. शिवाय, या आचाराच्या संबंधानें शास्त्रकारांतही पुष्कळ मतभेद आहे. पण तो नाहीं असें वादाकरितां क्षणभर मानिलें तरी, जर आपल्या अंतःकरणांत कांहीं भूतदया असेल तर बारा वर्षांच्या आंतील मुलींस विषयकर्मांत लोटून देण्यासाठीं जेवढें धर्मोल्लंघन करणें प्राप्त पडेल, तेवढें करण्यास आपण तयार झालें पाहिजे. या सदुक्तीचा मनुष्य [illegible] मूलकर यांची तारीफ केलीच पाहिजे. [illegible] रहावत नाहीं. म्हणोन आम्ह्यावरोवर [illegible] करणें हा जर धर्म असेल तर, विषयोपभोगाच्या [illegible] योग्य झालेले नाहींत, अशा अल्पवयस्क मुलींचा [illegible] नवऱ्यास हवालदार झाल्या करून देणें हाही तितकाच मोठा [illegible] याकरितां मोठा आहेचापांचा धर्मशास्त्रग्रंथांचा धर्म नाहीं काय? पण आमच्या आधुनिक नवीन स्थितींत या गोष्टीचा शांतपणें

शालुकलमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सतवालेंच्या [illegible] व मारणाविषयी दिली आहे. किंमत [illegible]

[illegible]

विचार कोण करणार ? कामाच्या गुलामांना आणि त्यांच्या बायकांना आम्ही असें विचारलों कीं, बारा वर्षांच्या आंत नव्हाण आलेल्या मुलींच्या गर्भाधानास उभें न राहणें हें मोठें पाप ? कीं उभें राहून तिच्या अवयवांची आणि शरीरसंपत्तीची रासरांगोळी करण्यास प्रवृत्त होणें, आणि तिच्या व आपल्या कुलांस अक्षय्य कलंक लाऊन घेणें हें मोठें पाप ? जर तुमच्या डोक्यांत कांहीं सद्विचारतंतू असतील तर या प्रश्नाचें तुमच्या मनास खाणार नाहीं व सज्जनांस अमशस्त वाटणार नाहीं, असें उत्तर द्या, आणि वरील दोन धर्मापैकीं पाहिजे त्या धर्माचा प्रतिपाल करा, आणि वरील दोन पापांपैकीं पाहिजे तें पाप टाळा ! रा. ब. नूलकर आणखी असें म्हणाले कीं [आणि त्यांच्या त्या म्हणण्यांत बराच तथ्यांश आहे] अलीकडील कांहीं सुधारक मंडळी ज्या त्या गोष्टीकरितां कायदा करून द्यावा, असें मोठ्या दिमाखानें वारंवार म्हणूं लागल्यामुळें, जुन्या पद्धतींच्या लोकांचीं माथीं फिरून जाऊन 'कायदा' [illegible] कीं त्याच्या अंगावर कांटा उभा राहूं लागला, व कित्येक [illegible] कायद्याचा चांगला उपयोग करून घेतां घेतो, याचें [illegible]स न राहून, ते आपले जे कांहीं सुधारक करावे असें [illegible] विरोध करूं लागले आहेत ! वस्तुतः तीस [illegible] संमतीचें वय चारा वर्षांवरच काय, पण चौदा वर्षां- [illegible] नेऊन ठेविलें असतें, तरी त्याविषयीं बहुधा कोणी [illegible]कारशब्दही काढिला नसता.

ए. ब. नूलकर यांचें भाषण झाल्यावर लॉर्ड लॅन्सडौन यांचें शेवटचें भाषण झालें या भाषणांत त्यांनीं जर्मनीच्या चिलाविषयीं कारसा पाल्हाळ केला नाहीं. या चिलामुळें [illegible] च्या जाहीरनाम्याविरुद्ध सरकार जात आहे असें कोण [illegible]ही, कारण धर्मोत्तर्गत जनसंस्काराशीं याचा कोणत्याहीं प्रकार

संबंध पोहोंचत नाहीं; शिवाय, बारा वर्षांच्या अविवाहित कन्ये-कडे कोणी पुरुष जाईल तर त्याला कडक शिक्षा देण्यास कांहीं हरकत नाहीं; पण तेंच कर्म नवऱ्यानें स्वस्त्रीशीं केलें तर त्याला कोणतीही शिक्षा करूं नये, किंवा फक्त दुखापतीच्या गुन्ह्यास सांगितलेली शिक्षा देऊन सोडून द्यावें, हें अत्यंत अश्लाघ्य आहे, असें ते म्हणाले. त्यांच्या भाषणाचा विशेष कटाक्ष ज्य; सामाजिक सुधारणांसाठीं मि. मलबारी यांनीं इंग्लंडांत स्थापि-लेल्या बड्या कमिटीनें सेक्रेटरी ऑफ् स्टेटच्या द्वारें हिंदुस्थान सरकारावर वजन व भीड घालण्यास आरंभ केला आहे त्यावर होता. पण प्रस्तुत विषयाशीं त्यांचा निकट संबंध नसल्यामुळें व आजचें हें पुराण नित्याच्या मर्यादेबाहेर ओरेंच गेलें असल्यामुळें, लेखणीस विश्रांति देऊन व्हाइसरायांच्या भाषणाच्या त्या भागाचा विचार आज तहकूब करणें भाग पडत आहे.

विवाहकाल व संभोगकाल.

संमतीचें वय वाढविण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें जें बिल काढलें आहे, त्याला अडथळा करणाऱ्या धर्मनिष्ठ लोकांचें असें' म्हणणें आहे कीं, हें बिल पास झालें असतां, हिंदुस्थानसरकारनें हिंदू धर्मांत हात घातला असें होऊन, या बिलांतील कलमांचें उल्लंघन न करण्यासाठीं, त्यांस धर्मोल्लंघन करावें लागणार आहे. धर्माचें घोडें पुढें दवडून अहितकारक रूढ्याचारांचें सैतान करण्यांत प्रतिष्ठा मानणारे धर्मभरु किंवा पापभीरू लोक सरा

लेखकांस योग्य मोबदला देऊन आलीं ग्रंथ-प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. ब्युरो पुणें,

धर्म काय आहे हें नीट समजत असते किंवा निदान तो समजून घेण्यास तरी तयार असते तर बरें झालें असतें. पण ज्यांना अमुक गोष्ट रूढ आचाराच्या विरुद्ध आहे येवढ्यासाठींच नांवें ठेवून पडावयाचें आहे ते त्या आचाराविषयीं खऱ्या धर्माज्ञा काय आहेत, हें कशाला पहावयाला बसले आहेत ? शिवाय, ज्याप्रमाणें आमच्या इतर गोष्टींत त्याचप्रमाणें आमच्या धर्मशास्त्रांतही इतकी बजबजपुरी माजली आहे कीं, पाहिजे त्या प्रकारच्या अत्याचारास किंवा अनाचारास आधारभूत अशीं वाक्यें त्यांतून काढून देतां येणार आहेत. अमुक एक स्मृति किंवा अमुक एक ऋषि प्रमाण मानून त्याच्या सांगण्याप्रमाणें आपले धर्माचार करावयाचे, असा नियम असता, तर या संमतीच्या नवीन कायद्यास धर्माचा नड सांगणें नीट पाळले असतें. पण तसें करून आम्हांस मनसोक्त वर्तन करावयास कसें सांपडणार ? ज्या गोष्टीविषयीं ज्या ऋषींचें किंवा ज्या स्मृतींचें मत अनुकूल असेल तो ऋषि आणि ती स्मृति त्या गोष्टीच्या संबंधानें प्रमाण मानणार ! व ज्या अर्थी हवीं तीं गोष्ट धर्मदृष्ट्या मान्य आहे असें म्हणणारा धर्माचार्य किंवा शास्त्रचतुरांपैकीं तीं नाहीं असें सांगणारा विद्वान् कोणत्याही देशांत कधीं उत्पन्न होण्याचा कधींच संभव नाहीं, त्याअर्थी विवाहित स्त्रीनें दुसऱ्याला वेळीं संयोग देण्यास कोणतेंही तरी वचन आमच्या धर्मशास्त्रांतून काढून देतां येणार नाहीं, असें कसें होणार ? लोकांत जो आचार रूढ असेल तदनुसार मुखोद्गत संस्कृत श्लोकांचे चरण तो जुन्या पोथ्यांतून घुसडून देणें, आणि त्यांतील आज्ञा आमच्या तमक्या धर्माची, आचार्याची, किंवा भटाची आहे, असें सांगून तात्कालिक स्वार्थ साधणें, हें अगदीं सामान्य मनुष्यांच्यानें होण्यासारखें काम आहे, हें कोणीही कबूल करील. आम्हांस तरी विद्वान असें वाटतें कीं, अशा प्रकारच्या लोकानुकूलतेच्या लेखकांच्या धार्मिक लबाड्यांमुळें आमच्या धर्मशास्त्राची मान मोडीस गेलेल्याच्या

झुलीसारखा किंवा फुणट्याच्या वाकळीसारखी झाली आहे ! तेव्हां आ. रा. नूलकर यांनीं सुचविल्याप्रमाणें संमतीच्या विलाविरुद्ध कांहीं शास्त्रकारांचीं मतें कोणीं धर्माभिमान्यांनीं काढून दाखविलीं तर सरकारानें आपल्या स्तुत्य हेतुवर नजर देऊन त्यांकडे दुर्लक्ष करावें, हेंच आम्हांस बरें वाटतें. तथापि आपण जें बिल लोकांपुढें आणिलें आहे तें त्याच्या धर्माविरुद्ध नाहीं, असें सांगितल्यानें व सिद्ध करून दाखविल्यानें त्या बिलाला अडथळा करणाऱ्या लोकांचें समाधान होईल, अशी सरकारास आशा असल्यास त्यांनीं तो प्रयत्नही करून पहावा. त्यापासून होणाऱ्यासारखा फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. कारण आजमितीस ज्यांनीं सामान्य लोकांचें पुढारीपण घेतलें आहे, त्यांचा असा निश्चय झालेला दिसतो कीं, सुधारक आणि सरकार यांनीं मनांत आणिलेली गोष्ट कितीही सशास्त्र असली, किंवा देशाचें तीपासून केवढेंही हित होण्यासारखें असलें, तरी ती सुधारकांकडून व त्यांच्या मतासारखींच ज्यांचीं मतें आहेत अशा सरकाराकडून पुढें आली असेल तर शास्त्रोशास्त्रतेचा, सत्यासत्याचा, किंवा हिताहिताचा विचार न करितां, हवी ती खटपट करून ती हाणून पाडलीच पाहिजे ! अशाच्या वृथा धर्माभिमानामुळें व मिथ्या देशाभिमानामुळें लढ्या व ढाल्या पिढ्यांतील कलह अधिकाधिक वाढत जाऊन, नवीन पिढ्यांतले दोन तट होणार आहेत, व त्यापासून देशाचें अपरिमित नुकसान होणार आहे, हें या हट्टी लोकांच्या ध्यानांत कसें येत

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेले लज्जतदार टी मिक्श्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

नाहीं कोण जाणें ; तथापि या संमतीच्या कायद्यास आपल्या लोकांनीं पूज्य मानिलेल्या धर्मशास्त्रकारांची पूर्ण संमति आहे, असें सिद्ध करून दाखविल्यानें हा प्रस्तुत वाद मिटण्यासारखा असेल तर तेवढी कामगिरी आपले परमपूज्य धर्मनिष्ठ गुरु डॉक्टर भांडारकर यांनीं वेळीं बजाविली आहे. त्यांनीं यासंबंधानें नुकताच लिहिलेला लेख त्यांच्या परवानगीनें सुधारकाच्या गेल्या अंकांत साद्यंत प्रसिद्ध केला आहे, व शिवाय पुस्तकरूपानें त्यांनीं तो निराळा छापविलाही आहे. जे कोणी हा निबंध निरभिमानें लक्षपूर्वक वाचतील त्यांस स्पष्टपणें असें दिसून येईल कीं, विवाहकालाची व संभोगकालाची जी मर्यादा अलीकडील समंजस व सुशिक्षित लोकांस प्रशस्त वाटूं लागली आहे तीच मर्यादा आमच्या पुरातन प्रमुख स्मृतींस व ऋषींस पूर्ण मानवली होती इतकेंच नाहीं, तर त्या मर्यादेचें उल्लंघन करणें हें त्यांनीं मोठें पाप लावलें होतें. हीं दोन गोष्टींच्या संबंधानें आलीं जसजसे ढिले होत गेलों, तसतसे श्रेष्ठ आचारांस, धर्मशास्त्रांस गोंवून, त्यास शास्त्राधार दाखविणारे लोकाराधनतत्पर धर्मलेखक निघाले, व त्यांच्या योगानें आमच्या धर्माच्या बऱ्याच मोहरा, पुनऱ्या, होन, ये, नवलाखावल्या, बिल्ल्या, खुर्दा व फदे, आणि कवड्या ह्यांचा एकच सिच्चडी होऊन गेली ! या अनवस्थेचा आजपर्यंत असा परिणाम झाला आहे कीं, ज्याच्या हातीं जें लागेल त्यास तो उत्तम नाणें समजून, त्याच्या जिवावर सुधारकायुगें आणि सरकारापुढें " अहो अनाचार ! अहो धर्मातिक्रम ! अहो अधःपात " असा आक्रोश करून त्यास दोहिल्या लाथा देण्यास कमी करीत नाहीं ! तथापि येवढ्या घोरड्या जनसमुदायांत खरोखरीच कांहीं भाविक व धर्मभोळे लोक असतील, व मुलेला किंवा कन्येला ऋतु प्राप्त झाला असून तिचें गर्भाधान

केलें नाहीं तर आपल्या हातून मोठें पाप घडेल, असें त्यास वाटतही असेल. अशा लोकांपैकीं जे वयातीत झाले असतील, व ज्यांना फार वर्षांच्या प्रमाणप्रणीत वर्तनामुळें स्वतः विचार करून तदनुसार वागण्याची अशक्यता झाली असेल त्यांच्या समाधानासाठीं डॉक्टर भांडारकर यांच्या पुस्तकांतून कांहीं वचनें येथें उतरून घेऊन त्यांचें भाषांतर देतों. या वचनांवरून त्यांची अशी खात्री होईल कीं, पूर्वीच्या प्रमुख ऋषींनीं व स्मृतिकारांनीं सवर्ण स्त्रीसंभोगाची जी इच्छा घातली आहे तीच हिंदुस्थानसरकार घालूं पहात आहे इतकेंच नाहीं, तर त्यांनीं विवाहकालाची जी मर्यादा सांगितली आहे तिचें उल्लंघन न केल्यास, सध्यां सुधारकांत व सुधारणानिंदकांत जो वाद चालला आहे, तो देखील नाहींसा होणार आहे. मात्र एखाद्या भिकार ग्रंथकारानें रद्दीस जुळण्यासारखें दिलेलें मतच आह्मांस ग्राह्य आहे, असा असंभजसपणाचा हट्ट त्यांनीं धरून बसतां कामा नये. डॉ. भांडारकर हे अनेक उद्योगांत व्यापृत असून त्यांनीं या ऐन गर्दीच्या प्रसंगास वेळांत वेळ करून हे अनेक शास्त्राधार गोळा केले, व त्यांच्या वाचनानें धर्मनिष्ठ लोकांचा गैरसमज दूर व्हावा, या हेतूनें त्यांचा लहानशा पुस्तकांत संग्रह करून तें स्वतःच्या खर्चानें प्रसिद्ध केलें याबद्दल साऱ्या सुधारणेच्छुंनींच नव्हे काय, खुद्द हिंदुस्थानसरकारानेंही त्यांचे आभार मानिले पाहिजेत. कारण, यांच्या व्यासंगा इतका गीर्वाणवाणीचा व इतर भाषांचा व्यासंग निदान या इलाख्यांत तरी दुसऱ्या कोणी गृहस्थानें केला आहे, असें आह्मांस वाटत नाहीं; तसेंच यथार्थ धर्मनिष्ठा, सत्यप्रीति, व स्वदेशोन्नतीविषयीं खरी कळकळ इत्यादि

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

गुणांत यांहून श्रेष्ठ असा दुसरा गृहस्थ या भांतींत आह्मांस दिसत नाहीं, म्हणून अशा वादग्रस्त विषयाविषयीं अभिप्राय देण्यास यांच्या इतका दुसऱ्या कोणास अधिकार नाहीं, असें आह्मांस वाटतें. ज्यांना आमच्या या लिहिण्याचा प्रत्यय घ्यावयाचा असेल त्यांनीं येथील दुसऱ्या एका पत्रांत प्रसिद्ध केलेलीं एकदेशीय वचनें आणि प्रसिद्ध करणाराचें त्याबरील व्याख्यान पहावें, म्हणजे त्यांची खात्री होणार आहे.

कामममामरणात्तिष्ठेद् गृहे कन्यर्तुमत्यपि ।
न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥

मनु अ. ९. श्लो ९०.

अर्थः—ऋतु प्राप्त झाला असूनही कन्या बापाच्या घरीं राहिली तरी हरकत नाही; पण गुणहीन अशा वराला त्यानें ती कधींही समर्पू नये.

या मनुवचनावर मेधातिथि नांवाच्या सर्वांत जुन्या टीकाकारानें अशी टीका केली आहे:—

प्राग्तोः कन्यायां न स्नानम् । ऋतुदर्शनेऽपि
न दद्याद्यावद् गुणवान् वरो न प्राप्तः ॥

अर्थः—नहाण येण्यापूर्वी मुलीचें लग्न करूं नये. पण तें ऋतुप्राप्तीनंतरही चांगला वर मिळेतोंपर्यंत करूं नये.

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ।
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम् ॥

मनु. अ. ९ श्लोक ९०

अर्थः—ऋतु प्राप्त झाल्यावर मुलीनें तीन वर्षें वाट पहावी; त्यानंतर आपला आपण योग्य वर पाहून त्याशीं तिनें विवाह करावा.

त्रीणि वर्षाण्यृतुमती कामंक्षेत पितृशासनम्

ततश्चतुर्थे वर्षे तु विन्देत सदृशं पतिम् ॥

बौधायन, ४. १. १४.

अर्थः—ऋतु प्राप्त झाल्यावर तीन वर्षेपर्यंत मुलानें बापाच्या आज्ञेची वाट पहावी; नंतर चौथे वर्षी तिनें आपण होऊन योग्य वराशीं विवाह करावा.

वसिष्ठस्मृतींतही अशा अर्थाचेच श्लोक आहेत.

नाग्निकां तु वदेत्कन्यां यावन्नर्तुमती भवेत् ।
ऋतुमती च नाग्निका तां ब्रूयच्छेत्स्वनाग्निकाम् ॥

गोभिलीय गृह्यसूत्र; चि. इं. पा. ८३९.

अर्थः—मुलीला ऋतु प्राप्त झाला नाहीं तोंपर्यंत तिला नाग्निका म्हणतात : त्यानंतर अनग्निका म्हणतात. मुलगी अनग्निका झाल्यावर म्हणजे तिला ऋतु प्राप्त झाल्यावर (बापानें) तिचें लग्न करावें.

त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम्

मनु. अ. ९ श्लोक. ९४.

अर्थः—तीस वर्षांच्या मनुष्यानें त्यास पसंत अशा बारा वर्षांच्या कन्येशीं विवाह करावा.

या सर्व वचनांवरून मुलींस ऋतु प्राप्त होईतोंपर्यंत किंवा बारावें वर्ष लागेतोंपर्यंत अविवाहित ठेवण्यांत कांहीं दोष नाहीं, इतकेंच नाहीं, तर तसें करणेंच प्रशस्त आहे, असें होत नाहीं काय ? बारावें वर्ष उलटून गेलें व ऋतुदर्शन होऊन तीन वर्षे

लोटलें तरी देखील मुलींच्या अविवाहित रहाण्यानें धर्मोल्लंघन होतें असें ज्यांस वाटत नाहीं, अशा धर्मकर्त्यांच्या वचनांप्रमाणें आम्ही वागत असतों तर सुधारकांतल्ले रण कशाला आजले असतें ? व आ. ए. स्कोयस साहेबांस संमतीच्या वयाचें बिल सुधारून कौन्सिलांत आणावें लागून त्याबद्दल सर्व हिंदुस्थानभर इतकी खलबल व बोचाबोची कशाला झाली असती ? अगदीं "मी मी" म्हणणाऱ्या सुधारकांसही या ऋषिवचनापलीकडे जाण्याची इच्छा नाहीं. ऋतु प्राप्त झाल्यावर तीन वर्षेपर्यंत अविवाहित रहाण्याची व त्यानंतर स्वतःस पसंत पडेल असा वर वरण्याची परवानगी मुलींना देण्यांत येईल तर वासंधंधानें सुधारकांना सुधारणेसाठीं कज्या करीत बसल्यास म्हणण्यासारखें कांहीं एक कारण नाहीं, हें उघड आहे ! पण कलियुगाच्या प्रभावामुळें विपरीतपणा, अविचारी व लाभदे झालेल्या आम्हां भारतीय आर्यांस हा सरळमार्ग हा विषयसुखवर्धक, हा मनोबलसामर्थ्यदायक, हा पुण्य स्वयंवरपंथ कोठून रुचणार !

अशा रीतीनें म्हणजे ऋतु प्राप्त झालेली कन्या विवाह होऊन भर्तृगृहीं गेली असतां, शास्त्रोल्लंघन न करतां पतिसमागम केल्याशिवाय तिला किती दिवस रहातां येईल, या संबंधानें डॉ. भांडारकर यांनीं जीं वचनें काढिलीं आहेत त्यांवरून हा समागम तिला तीन दिवसांपासून तीन वर्षेपर्यंत नहवून कर-ण्याचा अधिकार शास्त्रानें दिला आहे. तेव्हां मुलीला ऋतुदर्शन झाल्यापासून सोळा दिवसांच्या आंत तिचा गर्भाधानविधि केलाच पाहिजे, असें जें कित्येकांचें म्हणणें आहे, तें बरोबर दिसत नाहीं. पण सर रोमेशचंद्रांचा रघुनंदन असें म्हणतो कीं, तसें झालेंच पाहिजे, नाहीं तर ब्रह्महत्येचें किंवा भ्रूणहत्येचें महापातक लवकरच्या योकांडास बसणार ! पण असें सांगण्यास

रघुनंदनच कशाला पाहिजे? मन्वादि ऋषींच्या युगांत लोकांच्या अंगांत असलेल्या पौरुषाचा लोप झाल्यावर, रघुनंदनासारखे निःसत्व धर्मकर्ते बंगाल्याप्रमाणें हकडेही झाले आहेत, व त्यांनीं हसा तसा धाकदपटपणा केला आहे. भेद इतकाच कीं, ज्याप्रमाणें श्रीमत्सरी व क्षीपारतंत्र्येच्छू बंगवासी लोक अगदीं क्षीण होऊन जाऊन रघुनंदनाच्या आज्ञेचें अतिक्रमण करण्यास असमर्थ झाले आहेत, तशीच केवळ आह्मां महाराष्ट्रीयांची स्थिति नाहीं. या गोष्टीचा विशेष खुलासा करण्यासाठीं या विषयाकडे आणखी एक वेळ वळणें जरूर आहे, म्हणून आज येथेंच मुक्काम करतों.

संमतिविलास धर्मशास्त्रबाधक नाहीं.

संमतिचें बिल कौंसिलापुढें आणितांना सर अें. स्कोबल यांनीं असें म्हटलें आहे कीं, या बिलास हिंदुधर्मशास्त्र प्रतिकुल नाहीं. या त्यांच्या स्वल्प उल्लेखामुळें आमच्या वृद्धाधर्मवाद्यांस शह्नजाल पसरण्यास उत्तम मसुदा सांपडून, त्यांनीं त्याच मुद्यावर आतां आपला प्राण तोंविला आहे! बि. ए. च्या परीक्षेला लागणाऱ्या पांचचार संस्कृत पुस्तकापलीकडे ज्यांचें संस्कृताचें अध्ययन गेलेलें नाहीं, असे लोक आपणांस पहिजे त्यासंबंधीं शास्त्रज्ञ, डाक्टर भांडारकरांसारख्या विद्वानांस श्रुतींचा व स्मृतींचा अर्थ बरोबर करतां येत नाहीं, किंवा त्यांनीं तो

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकमेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १८१३

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

मुळ्या केला नाहीं, अशी बडबड करीत आहेत, आणि जुने शास्त्र त्यांस "धर्मरक्षक" समजून, त्यांच्या अज्ञानमय वादास आपली संमति देत आहेत! पण अशा प्रकारची ढिलाई करण्याबद्दल या जुन्या शास्त्री मंडळींस विशेष दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, एक तर अलीकडे निव्वळ संस्कृत विद्येचा अभ्यास फायदेशीर होईनासा झाल्यामुळें, आजमितीस नांव घेण्यासारखा एकही शास्त्री या इलाख्यांत सांपडावयाचा नाहीं. असल्या शास्त्र्यांनी शास्त्रार्थ देण्यांत व बाकाच्यानीं तो पतकरण्यांत मुळींच अर्थ नाहीं. शिवाय, प्रसंग पडेल त्याप्रमाणें ओढून ताणून हवा तो अर्थ काढण्याची या शास्त्र्यांची पूर्वापार चाल आहे: तेव्हां ते या वेळींच त्या आपल्या जुन्या शीलास अनुसरणार नाहींत, असें कोणून सांगणार? ब्राम्हणांनीं वस्तरा हातीं घेऊन, न्हाव्यांची रग जिरविण्यास कांहीं हरकत नाहीं, असा शास्त्रार्थ थोड्या वर्षांपूर्वी ज्यांनीं या पुणेशहरांत साफ ठोकून दिला, त्यांना पहिल्या कटींतच गप्पीधान केलें पाहिजे, असें धर्मशास्त्राचें स्पष्ट म्हणणें आहे, असा आग्रह धरण्यास कोणून शंका येणार? पाश्चिमात्य शिक्षणाच्या वाढत जाण्याच्या प्रसारामुळें आमच्या शास्त्रिवर्गिकांचा धंदा अगदीं उठावणीस आला आहे व ते अन्नास मोताद झाले आहेत, तेव्हां अशा संकटावस्थेंत दोन पैसे मिळण्याचे संस्कार त्यांनां आपल्या हातून जाऊं न देण्याविषयीं धडपड करावी, व कधीं न मिळालेली प्रतिष्ठा दोन दिवस भोगून घ्यावी, हें अगदीं स्वाभाविक आहे. पण अशा आपत्कालीं देखील त्यांनीं इतकें पाखंडवादी व्हावें, हें त्यांच्या जुन्या विद्येस खुद्दा चांगलेसें शोभत नाहीं, असें आम्हांस वाटतें. बाकी, संमतीचें बिल पास होणें किंवा न होणें हें या शास्त्रार्थावर थोडेंच अवलंबून आहे! हें बिल पास करण्यांत ब्रिटिश सरकारला अमुक एक अडचण सोसावयाची आहे, असें

या वाक्पटू शास्त्र्यांसही म्हणतां येणार नाहीं; तसेंच हजार पांचशें सुधारकांस खुष करण्यासाठीं कोट्यावधि लोकांस नाखुष करण्यांतही कांहीं अर्थ नाहीं, हेंही तें सरकार पक्कें समजून आहे. तथापि ह्या सरकारास हेंही पक्कें ठाऊक आहे कीं, हिंदुस्थानांतील बरेच लोक आपल्या चायका दयांत येण्यापूर्वी त्यांवर जुलुम करीत असल्यामुळें, त्यांस आज कित्येक शतकें अनिर्वचनीय यातना भोगाव्या लागत आहेत; त्यांच्या यातनांच्या उपशमनार्थ होईल तितका प्रयन्त करणें हें आपलें कर्तव्य आहे; या कर्तव्यास हिंदु धर्माची अनुकूलता किंवा संमती नसली तरी प्रत्येक सदय, समंजस, व विचारी मनुष्याच्या अंतःकरणांत वास करणारा जो साऱ्या धर्माचा धर्म त्याची पूर्ण संमती आहे इतकेंच नाहीं, तर तें कर्तव्य इतकी वर्षें न बजावल्याबद्दल त्यानें एकसारखा टोंचणी लाविली आहे: तेव्हां अडाणी, अविचारी, मुधाधर्माभिमानी, व आपमतलबी हिंदूंनां केवढाही गय नवा केला तरी दहा अकरा वर्षांच्या मुग्ध कन्या अर्धार मर्त्यांच्या अतिशय सडकलेल्या कामकुंडांत आहुती पडून जळून खाक होणार नाहींत अशाबद्दल कांहीं तरी उपाय केलाच पाहिजे, असें त्यांनीं हें समाधिस्थ होतां घेतलें आहे; तेव्हां आम्हीं आपल्या आक्रोशांनीं जरी सारें ब्रह्मांड हालवून सोडिलें, तरी हें बिल पास करण्यास हिंदुस्थानसरकार अणुमात्रही भिणार नाहीं, अशी आमची बालंबाल खात्री झाली आहे. तथापि ज्या रोग्यांना जें औषध द्यावयाचें तें त्यांचें नाक धरून व त्यांना पायावर उताणें पाडून, घोंडल्यानें त्यांच्या घशांत घालण्यापेक्षां, त्या औ-

निबंध संग्रह.

भाग १ ला. कि. १। ६.

मॅनेजर-ग्रंथारक ऑफीस, पुणें.

चे गुण त्यांस समजाऊन देऊन, तें ते आपण होऊन आपल्या खातानें पितील, तर बरें होणार आहे, असें बाजून हिंदुस्थानसरकारानें आपल्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणें त्याची चर्चा चालू दिली आहे, व ज्याला जी पाहतील तीं साधकबाधक प्रमाणें त्यानें खुशाल दाखवावीं, अशी नोटिस दिली आहे ! या नोटिसचा फायदा घेऊन, कांहीं " नाकाडोळ्याचे नाडीपरीक्षद " वैद्य हें औषध तुह्मास सुखावह होणार नाहीं, अशी भीति भाचड्या लोकांस घालीत आहेत, ही केवढ्या शरमेची गोष्ट आहे बरें ? हे झोळीवाले " रसेंदूरमात्र वैद्य " अज्ञान लोकांस असें सांगत फिरत आहेत कीं, हें बिल पास झाल्यास, यापुढच्या आंत जितक्या मुलींस ऋतुदर्शन होईल तितक्यांचें गर्भादान लाचडतोब न करण्यास सांपडल्यामुळें त्यांच्या व त्यांच्या नवऱ्यांच्या कपाळीं भ्रूणहत्या येणार आहे ! तेव्हां या पापांत हीं नवराभायलें खरोखरींच पडतात कीं काय, हें थोडक्यांत पाहूं.

स्त्रीस नहाण आल्याशिवाय तिच्याकडे तिच्या नवऱ्यानें जाऊं नये, अशी आमच्या धर्मशास्त्राची सक्त ताकीद आहे. तेव्हां बारावें वर्ष लोटल्यावर ज्या मुली ऋतुमती होतील, त्यांना व त्यांच्या नवऱ्यांना हें बिल लागू पडत नाहीं, हें उघडच आहे. नहाण न आलेल्या तेरा वर्षांच्या मुलीकडे तिचा नवरा गेल्यास आमचें धर्मशास्त्र त्यास काय शिक्षा करीत असेल किंवा करूं शकेल तें खरी; संमतीच्या बिलामुळें त्याला कोणत्याही प्रकारें उपसर्ग लागणार नाहीं. बारा वर्षांच्या आंत फार झालें तर शेकडा चार मुली ऋतुमती होतात, असें दिसून आलें आहे. तेव्हां संमतीच्या बिलानुळें गर्भादान थोडयाशा लांबणीवर टाकावें लागलें. तर तें या चार मुलींकरितां टाकावें लागणार, व पंचवीस मुलींपैकीं एका मुलीच्या संबंधानें हें बिल आमच्या धर्मास बाधक झाल असें

होणार. पण हीं गोष्ट कबूल करण्यापूर्वी पहिला ऋतु झाल्यानंतर गर्भधान केलेंच पाहिजे, असा शास्त्राधार दाखविल्याशिवाय आला पाहिजे, इतकेंच नाहीं, तर लग्न केलें आहेत, जे इंग्रज सांगितले आहेत त्यांची आलच्यरी आणि लग्न न करण्यापासून होणारे फायदे यांचा शांतपणें विचार करून, शास्त्रकर्त्यांस कोणता मार्ग विशेष संमत आहे, हें निःपक्षपातानें ठरविलें पाहिजे. जो कोणी इतकी खटपट प्रामाणिकपणानें करील त्याला आमचे वेडेंवाकडें धर्मशास्त्र देखील संमती बिलाचे तत्वास बिलकूल प्रतिकूल नाहीं, असें खचित दिसून येणार आहे. कारण, पहिल्या ऋतूनंतच गर्भदान केलें पाहिजे, अशा अर्थाचें फक्त एक वाक्य आहे, व तें कोणी तरी अलीकडे धर्मशास्त्रांत घुसडून दिलें असावें. असें स्पष्ट दाखविता येत आहे. कसें तें पहा. आश्वलायनाच्या नांवावर विकणाऱ्या स्मृतींत पुढील वाक्य आढळतें:-

गर्भाधानं द्विजःकुर्याल्लतौ प्रथम एवहि ।
चतुर्थेदिवसादूर्ध्वं पुत्रार्थी द्विवसे समे ॥

अर्थ—"प्रथम ऋतुदर्शन होऊन ४ दिवस लोटल्यावर, ज्ञानानें गर्भाधान करावें, पुत्र पाहिजे असल्यास सम दिवशीं करावें" अनंत देवानें "अश्वलायनाचें म्हणून" हें वाक्य आपल्या ग्रंथांत उद्धृत घेतलें आहे. अनंतदेवाप्रमाणेंच इतर अनेक निबंधकारांनीं याच्याच धर्तीवर व इतर संबंधानें आश्वलायनस्मृतींतील अनेक उतारे घेतले आहेत. पण त्यापैकीं एकाच्या ग्रंथांतही हें वाक्य

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.
डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.
पृष्ठ ४८४ सुंदर कापडी बाइंडिंग, कि. रु. २ व्ही. पी. खर्च ८'
लाइफ ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

घेण्यांत आलेलें नाहीं इतकेंच नाहीं, तर ज्या अश्वलायन मुनींत अनंतदेवानें उलटून घेतलेलीं दुसरीं वाक्यें सांपडतात ा अश्वलायनस्मृतींत अनंतदेवाखेरीज इतर निबंधकारांनीं श्वलायनाचीं म्हणून आपल्या ग्रंथांत उलटून घेतलेलीं वाक्यंही सांपडत नाहींत ! तेव्हां अनंतदेवाची अश्वलायनस्मृति णि इतर निबंधकारांची अश्वलायनस्मृति हे भिन्न ंथ असले पाहिजेत, हें सिद्ध होतें. या बालगंडीवरून निदान ामचा तरी असा तर्क होत आहे कीं, ही अनंतदेवांस सांपड-ेली अश्वलायनस्मृति स्याच्याच श्लोकांतून निघाली असावी, व कांहीं विशेष हेतु साधण्यासाठीं त्यानें हें पुण्यश्लोक फक्त नमूद केलें असावें ! या खोट्या अथवा बनावट श्वलायनस्मृतीची पृष्ठ प्रत डा. भांडारकर यांचे जवळ आहे. नंतदेवाखेरीज दुसरे सात आठ निबंधकार ज्या अश्वलायन मृतींचा उल्लेख करतात तिच्याशीं ही ताडून पाहिली असतां, ुणघटनेंत कांहींच साम्य दृष्टीस पडत नाहीं. तेव्हां याज्ञवल्क्य निबंधकारांचा अश्वलायन बहुश: आणि अनंतदेवाचा अश्व-लायन तोतया असें समजणें भाग आहे ! आमच्या समजु-तीनें डा. भांडारकर यांची ही विचारशैली निखालस आहे, य टेळक वगैरे जे लोक अश्वलायनाच्या स्मृतीवर म्हणजे या ाचिःपतीय साक्षीदाराच्या बनावट ग्रंथावर आपल्या पक्षाचा' ूळ रचित आहेत, ते जाणूनबुजून किंवा चिवट मूर्खपणामुळें सत्यमार्गास लागले आहेत, असें वाटतें. सामर्थ्य असेल तर यांनीं ही अश्वलायनस्मृति खरी आहे, हें आमोर सिद्ध करून द्यावें, आणि मग वादास उभें रहावें.

या एका बनावट स्मृतीविषयीं दुसऱ्या कोणत्याही सर्व न्य स्मृतींत किंवा प्रसिद्ध निबंधकारांच्या ग्रंथांत समाधान ाकारक करून घेतलेंच पाहिजे, असे धर्मवादी हिट्ट करून रवसतील तर त्यांचा आग्रह किंचित् विचारणीय होणार आहे.

अगदीं अलीकडील ग्रंथांत आणखी असें एक वाक्य सांपडतें कीं " प्रत्येक ऋतूस नवऱ्यानें आपल्या बायकोकडे जावें " नवऱ्याला बायकोकडे जावायचें असल्यास त्यानें ऋतुकालीं जावें आशी जी सामान्य धर्माज्ञा होती तिचा टीकाकारांनीं मुद्दाम असा अर्थ काढला कीं, प्रत्येक ऋतुस आपल्या स्त्रीकडे गेलेंच पाहिजे: न गेल्यास भ्रूणहत्येचें पातक त्याच्या कपाळीं येतें! अर्थात् साऱ्याच ऋतुंविषयीं हें विधान करून ठाकल्यामुळें, पहिल्या ऋतूंत स्त्रीगमन न करणाराही गर्भघातक होतो, हें उघडच आहे. नेहमीं जुन्या लोकांच्या समजुतीप्रमाणें पहिल्या ऋतूंतच गर्भाधान केलें पाहिजे, व ते करील त्याला भ्रूणहत्या लागणार. हें निर्विवाद झालें! पण हें संकट येणें अपरिहार्य नाहीं. गर्भाधानसंस्काराचे दोन अंगे आहेत. एक प्राजापत्य म्हणजे होम वगैरे; दुसरें, खरें गर्भाधान म्हणजे ऋतुमती स्त्रीकडे तिच्या नवऱ्यानें जाणें. ज्याला धर्मप्रमाणें सर्व संस्कार करावयाचे असतील त्यानें पहिल्या ऋतूंस अनुकूल दिवस पाहून तेवढा प्राजापत्य होम तरी उरकून घेतला पाहिजे. गर्भाधान पुढल्या कोणत्याही पाळीस अनुकूल रजनी पाहून करण्यास हरकत नाहीं, अशी स्पष्ट शास्त्राज्ञा

वाक्यमीमांसा आणि वाक्यांचें पृथक्करण.

An inquiry into the nature of sentence with An Analysis of them.

कै. गो. ग. आगरकर एम. ए. कृत. विद्यार्थ्यांस अत्यंत उपयुक्त असें हें पुस्तक (२ री आवृत्ति) तयार होतांच पडलें. किं. ६ आणे.

मॅनेजर—इकॉनॉमिकल पॉप्युलरिंग अँण्ड सेलिंग एजन्सी ७८२ सदाशिव, पुणें.

आहे. पण प्रस्तुत वादांतील टिळकप्रभृति इहीं लोकांस तो शास्त्राधार फारच बाधक असल्यामुळें, हे दोनही विधी एकेच दिवशीं उरकले पाहिजेत, असें निराधार प्रतिपादन करीत आहेत. त्यांच्या प्रतिपादनास कांहीं आधार असल्यास तो चालू संप्रदायाचा आहे; शास्त्राचा नाहीं. शास्त्रांत प्राजापत्य आणि गर्भाधान हे स्वतंत्र विधि समजून ते स्वतंत्र दिवशीं करावे, असें स्पष्ट सांगितलें आहे. **अथर्तुमत्यः प्राजापत्यस्यर्तौ प्रथमेऽनुकूलेऽहनि** असें लक्षण पुढें **अथ-गर्भलम्भनस्यर्तौ अनुकूलायां निशि** असें म्हटलें आहे. हें **आश्वलायन गृह्यकर्या** नारायणभट्टकृत परिशिष्टांतील वाक्य आहे. नारायणभट्टानें गर्भाधानसंस्काराचे दोन भाग कल्पून पहिल्यास **प्राजापत्य** व दुसऱ्यास **गर्भलम्भन** अशीं नांवें दिलीं आहेत, आणि नंतर त्यांतील विधींचें वर्णन केलें आहे. तें देतांना आलां " **प्राजापत्याविधिर्यः**—हा विधि पहिला ऋतु झाला असतां अनुकूल दिवस पाहून...करावा " याप्रमाणें त्याचें वर्णन झाल्यावर " आलां **गर्भलम्भनाविधिर्यः**—हा विधी ऋतुकालीं अनुकूल रात्र पाहून करावा, " असें म्हटलें आहे. यावरून प्राजापत्यहोम पहिल्या ऋतूस योग्य मुहूर्तावर केलाच पाहिजे; गर्भाधान म्हणजे स्त्रीपुरुषांचा संयोग कोणत्याही पाळींत खंडीप्रमाणें करण्यास हरकत नाहीं, असा उत्तान अर्थ असून टिळकवगैरे लोकांनीं व्याकरणाकडे, वाक्यरचनेकडे, किंवा वचनाच्या ओघाकडे लक्ष न देतां, चालू संप्रदायाशीं त्याची संगति जुळवून देण्यासाठीं, ओढून ताणून त्याचा असा अर्थ केला आहे कीं, ज्या दिवशीं **प्राजापत्य** करावयाचें, त्याच दिवशीं **गर्भाधान** झालें पाहिजे.या वचनाचा अरा अर्थ असतां तर " अथ " व " अनुकूल " या शब्दांचा पुनरुच्चार करावयाला नको होता; तसेंच, " ऋतु " शब्द मुळींच घाला ायला नको होता, किंवा त्याच्या पाठीमागें " प्रथम " हें विशेषण

नरी फिरून घालायाला पाहिजे होतें. हे दोनहीं विधि चांट्ट संप्रदायाप्रमाणें एकेच दिवशीं झाले पाहिजेत, असें लिहिण्याचा नारायणभट्टाचा आशय असता, तर " योग्य दिवस पाहून " व " योग्य रात्र पाहून " अशी द्विरुक्ति त्यानें केली नसती; हे किंवा दोनही विधि एकेच दिवशीं व्हावे, अशी त्याची इच्छा असती तर 'योग्य दिवस' आणि 'योग्य रात्र' असा भेद तो कशाला करता ? आपण असा भेद सूत्रांच्या प्रचारांत मुळींच करीत नाहीं. अमुक मुहुर्त गर्भाधानाला चांगला आहे, असें ठरविलें म्हणजे तो दोनही विधि उरकण्यास ठीक आहे असें आपण समजतों. म्हणतांना 'चांगला दिवस पहा' येवढेंच म्हणतों; व होमाला जो दिवस प्रशस्त असेल त्याचीच रात्र गर्भाधानाला प्रशस्त असें समजून फक्त 'दिवस' हुडकण्याबद्दल पंचांग चाळतों. त्याच दिवसाची 'रात्र' गर्भाधानास अनुकूल असेल किंवा नाहीं, अशी शंकाही आमच्या मनांत येत नाहीं, म्हणून आम्ही रात्रीविषयीं कधींच उल्लेख करीत नाहीं. पण नारायणभट्टाचें तसें म्हणणें नाहीं. त्यावर लोकसांप्रदायाची थोडीथोडी छाया पडूं लागली होती, पण तो आमच्या इतका त्याचा बंदा गुलाम होऊन गेला नव्हता. सुश्रुत वागभटादि शारीरकवींचीं वाक्यें त्याच्या डोळ्यापुढें उभीं असल्यामुळें, स्त्रीपुत्रेच्छू पुरुषांनीं पहिल्याच ऋतुकालीं गर्भाधानासाठीं रतिगृहांत संगत व्हावें, हें त्यास बरें वाटलें नसावें, व म्हणूनच त्यानें होमाविधि प्रथम ऋतूस एखाद्या चांगल्या दिवशीं उरकून टाकून, पुढें योग्य वाटेल त्या पाळीस स्त्रीपुरुषांनीं चांगली रात्र

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, भाल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टं. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

पाहून रत्युपभोगासाठीं संगत व्हावें, असा शास्त्रार्थ दिला असावा, हें उघड आहे. असें केल्यानें धर्मशास्त्राचें उल्लंघन न करतां शारीरकशास्त्राच्या आज्ञा पाळण्याची सवडही त्यानें करून ठेविली, असें डाक्टर भांडारकर यांचें जें म्हणणें आहे, त्यावर धर्मशास्त्र दृष्ट्या किंवा व्याकरणदृष्ट्या प्रतिकूल कोटिक्रम करणें अशक्य आहे. पण ज्यांना खोट्या धर्माभिमानानें पक्कें घेरलें आहे, किंवा ज्यांना चालू संप्रदायाचा शास्त्राधार आहे असें दाखवून, अडाणी लोकांस सरकाराविरुद्ध क्षुब्ध करावयाचे आहे त्यांना व्याकरणाशीं, संगतीशीं, किंवा शास्त्रार्थाशीं हवें तसें वागवणारांच्या पदरीं अप्रामाणिकपणा किंवा मूर्खपणा येतो, हें कसें समजणार? व समजलें तरी ते आपली चुकी कोठून कबूल करणार?

यावरून पहिल्या पाळीसच गर्भाधान केलें पाहिजे, किंवा होम आणि गर्भाधान हे विधि प्रथमकालीं करतां येणारच नाहींत, असें नाहीं, हें उघड होतें. पण आमच्या प्रतिपक्ष्यांस ती गोष्ट कोठून रुचणार? ज्यांना बारावर्षांच्या आंतील वयाचें मुलींस नव्हाण आलें असलें तरी पहिल्याच खेपेस तिचें गर्भाधान केलें पाहिजे, न केल्यास शास्त्रोल्लंघन होतें, असें स्थापण्याची अवश्यकता आहे; तसें केल्याखेरीज सरकारानें आमच्या धर्मांत हात घातला अशी ओरड त्यांस करतां येत नाहीं; तेव्हां त्यांनीं कित्येक लोकांत व प्रांतांत पहिल्या पाळीसच होम व गर्भादान करण्याची जी चाल पडली आहे तींच पूर्णपणें शास्त्रसंमत आहे, व त्या चालीच्या विरुद्ध जाणें हें केवळ अशास्त्र नसलें तरी गौण आहे, आणि आपत्कालाखेरीज तसें करणें उचित नाहीं, व जेव्हां निरुपायास्तव तसें करणें भाग पडेल तेव्हां प्रायश्चित्ताशिवाय मुक्ति नाहीं, असें दाखविण्याची खटपट चालविली आहे. आमच्या

मतें या प्रकरणांत शास्त्र रूढि यांचीं उत्कृष्ट संगति कोणालही घालून देतां येणार नाहीं. संमतीच्या बिलास रूढीपेक्षां शास्त्र विशेष अनुकूल आहे. तरी रूढिही सर्वांशी प्रतिकूळ नाहीं. कारण पुष्कळ लोकांत गर्भाधानाविधि मुळींच करीत नाहींत. किंवा तो पाहिजे तेव्हां करितात, असें असून त्यांस कोणी नाकीत शकत नाहीं, किंवा प्रायश्चित्त घेण्यास लावीत नाहीं. पण हा सर्व खरा प्रकार धर्माच्या नांवावर गिल्ला करून अडाणी लोकांस सरकाराविरुद्ध चिथविणाऱ्या भोंदू धर्मनिष्ठांस कोण सांगणार ? कोणाच्याही हातून वेळच्यावेळीं गर्भाधान न घडल्यास जें पाप होतें त्याचें क्षालन पांचचार आण्यांनीं किंवा शंपनास रुपायासांनीं करतां येण्याची ज्यांनीं सवड ठेविली आहे त्यांच्या दृष्टीनें तें पाप किती किती दर्जाचें असेल, हें कां या भोंदूंस समजण्याची अक्कल नाहीं ? हवी तितकी आहे ! पण त्यांना कोठें खरें समजण्याची गरज आहे? शास्त्रांतून हुसकून लाविलें, म्हणजे रूढींच्या आड दडावें, व रूढीच्या मैदानांत चोप बसला कीं शास्त्राच्या पाठीमागें दडी द्यावी, असा यांनीं पळापळीचा व लपंडावाचा प्रकार चालविला आहे, येवढें सुज्ञ वाचकांच्या नजरेस आलें तर या संबंधानें आम्हीं आपलें कर्तव्य बजाविलें, असें आम्हांस वाटणार आहे. आपल्याकडे या धर्मवादांत पडण्याची आमची इच्छा नाहीं; कारण, संमतीच्या बिलाचें लोढणें गळ्यांत करतां घेण्यासाठीं आमच्या माथ्यांत याहून खाशा नेमाचे दुसरे पुष्कळ घण आहेत.

प्रयोगानें लोकशिक्षण झालेलें स्वचित्र.
समाजादर्श नाटक.
व. चि. घाणेकर, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर्. सॅन्. आय्. (लंडन) इत्यादि, किंमत रु. १ रुपया.
'भवितव्यता' प्रेस, पुणें सिटी.

महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र.

प्रिय देशबांधवहो, संमतीच्या चिलाच्या संबंधानें सुधारकांत आलीकडे आलेल्या कांहीं निबंधांतील भाषेची तीव्रता पाहून, तुम्हांपैकीं कित्येकांचा मनें त्यावर रुष्ट झाली असतील यांत संशय नाहीं. न्यू इंग्लिशस्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज वगैरे लोकोपयोगी संस्थांची स्थापना व उत्कर्ष, त्याप्रमाणेंच मराठा आणि केसरी पत्रांचा अवतार, प्रसार, आणि करवीर प्रकरण वगैरे गोष्टींशीं या पत्राच्या नम्र लेखकाचा व रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांचा असलेला संबंध ज्यांना ठाऊक आहे, व हे दोघे इसम वरींच वर्षें एकमेकांशीं कसें वागत होते हें ज्यांनीं पाहिलें आहे, त्यांना सुधारकाराच्या जन्मा पूर्वीचे ग्रनन्, रा. टिळक व पाटणकर यांचा पहिल्या तीन संस्थांशीं नुकताच घडून आलेला विक्षेप, व प्रस्तुत वादांत सुधारक आणि केसरी पत्राच्या चालकांनीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें एकमेकांवर चालविलेला भडीमार पाहून, या उभयतांच्या बेबनावास व फुटाफुटीस झालेलीं कारणें त्यांस ठाऊक नसल्यामुळें, विषाद वाटणें हें फार स्वाभाविक आहे. पण रा. टिळकांस नीं कारणें अवगत असतां, ज्या पत्राचें आधिपत्य त्यांचेकडे आहे त्याच्या गेल्या अंकांत " ज्यांना वादांत स्वपक्षाचा उणीव झांकण्यासाठीं परपक्षावर, आणि विशेषतः त्यांतील एकदोन व्यक्तीवर, अपशब्दरूपी गोळाचार करणें हीनपणाचें वाटत नाहीं त्यांची कानउघाडणी करण्याच्या नादास लागणेंही व्यर्थ होय. सार्वजनिक विषयावर वादविवाद करण्याच्या मिषानें खासगी टवाळीचें उद्दें काढण्याची अमृत्य संधि क्वचितच मिळते. " अशीं दोन वाक्यें आहेत. हीं वाक्यें जेव्हां आमच्या नजरेस पडलीं तेव्हां मात्र आम्हांस

मोठा विस्मय वाटला ! टिळक आणि आगरकर यांचा स्वाभाविक द्वेष ! आणि तो कशासाठी ? टिळक आगरकराचे किंवा आगरकर टिळकाचे कांहीं एक लागत नाहींत, आणि म्हणून एकाला दुसऱ्याचा ' स्वाभाविक द्वेष ' करण्याचें कारण आजपर्यंत झालेलें नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांपैकीं निदान एकाच्या मतानें तरी तें केव्हांच होण्याचा संभव नाहीं. त्या दोघांचा वेबनाव व फुटाफूट होण्यास ज्या समाईक संस्थांचे ते दोन सेवक होते त्या संस्था चालविण्याच्या पद्धतीविषयीं व त्यांच्या उत्कर्षाच्या साधनांविषयी कोणत्याही रीतीनें एकवाक्यता न होणारा त्यांचा मतभेद कारण झाला, व याच मतभेदामुळें, प्रस्तुत वादांत तें एकमेकांची मुर्वतन ठेवतां, आपापल्या मतांचा आणि पक्षाचा विजय होण्यासाठीं अन्योन्यांवर तुटून पडत आहेत; दुसरें कांहीं नाहीं ! अशा रीतीनें आपापल्या देशविषयक विचारांचे प्राबल्य स्थापण्यासाठीं अंतःकरणपूर्वक झुंझणाऱ्या लढवय्यांचें संग्रामचातुर्य पहात राहून व कौतुक करावयाचें तें विसरून जाऊन, अशा युद्ध प्रसंगीं केवळ कर्णकटु टणत्कारांच्या श्रवणावरूनच श्रेक्षकांनीं ' एकाला दुसऱ्याचा मत्सर उत्पन्न झाला आहे, ' किंवा कोणी कोणाचें ' स्वाभाविक द्वेषाचें ठेंच काढून घेत आहे, ' असा कुतर्क करणें अत्यंत अनुदार होय ! एका जननीच्या उदरांतून अवतरलेल्या सहोदरांत देखील जर भांडण किंवा मतभेद झाल्याशिवाय राहात नाहीं, तर ज्यांचा एकमेकांशीं कोणत्याही प्रकारचा कुलसंबंध नाहीं, व ज्यांनीं राजसेवेचा सामान्य मार्ग सोडून देऊन आपापल्या मनास प्रशस्त वाटेल त्या रीतीनें आपल्या हयातींत आपल्या हातून होईल

पदोन्नत भाड्यानें देणें आहेत-फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर-बंगले. सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर-इरंडवणे, पुणें.

नेवढें देशकार्य करण्याचा निश्चय केला आहे, त्यांचे विचार शर्थीशीं न जुळतां व ज्वालाग्राही प्रसंगविशेषीं आपापल्या विचारांचा पराकाष्ठेचा अभिमान उत्पन्न होऊन, एकदां उभयतांनीं आरंभिलेल्या सामान्य गोष्टीस आमरण चिकटून राहणें स्वतःस किंवा इतरांस सुखास्पद व कल्याणप्रद होणार नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें त्यांच्या जगास ही क्रिया अत्यंत आक्रमणीय वाटेल त्यांत ती घरणें, जीत नथळ वाटण्यासारखे काय आहे. हें आम्हांस समजत नाहीं ! बांधवहो, विचारकलहाला मुळीं इतके कशासाठीं भितां ? दुष्ट आचारांचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखार्थी वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहींत. आजपर्यंत या देशांत हा कलह माजावा तितका कधींच न माजल्यामुळें व बहुधा आलसी लोक 'मरानुमातिक्यच' असल्यामुळें, हें भरतखंड इतकीं शतकें अनेक प्रकारच्या विपत्तींत खितपत पडलें आहे! हा विचारकलह दुष्ट विकोपास जाऊं न देण्याविषयीं मात्र खबरदारी ठेविली पाहिजे. नाहींतर त्यापासून पुढें मोठ्या लढाया आणि रक्तस्राव होण्याचा संभव असतो. सुधारक आणि दुर्धारक, चपल सुधारक आणि मंद सुधारक, थंड सुधारक आणि गरम सुधारक अथवा नानाप्रकारच्या मतांचे लहे आणि जुन लोक यामध्यें शेंपतकाळीं जी दुही माजून राहिली आहे ती पाहून खचून जाण्याचें किंवा देशान्तर कांहीं तरी प्रचंड संकट ओढवणार आहे, असें मानण्याचें बिलकुल कारण नाहीं! पाश्चिमात्य शिक्षणामुळें ज्या दिवशीं या देशाला खरा खरा प्रारंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या • ची शतेहासांत महोत्सवाच्या दिवसारखा होईल त्या दिवशीं अनेक शतकें माद निद्रेत पडलेल्या हिंदुराष्ट्र देवी किंचित जागी होऊन चाचरूं लागली. कोणी अलीकडे झालेल्या त्याच्या उलाढाली पेक्षां पूर्वी मात्र ज्यावेळीं शांत व प्रगल्भ

नरकत नाहीं. त्या दिवशीं त्याचें स्थाणुत्व नाहींसें होऊन त्याला जी यत्किंचित् गति मिळाली ती प्रतिवर्षी अगदीं यव प्रमाणा- कां होईना, पण सारखी वाढत आहे, व जों जों हा विचारकलह निकराचा होऊं लागेल तों तों ती झपाट्यानें होऊ लागणार आहे. आतां किती झालें तरी कलह तो कलह! तो कशाही प्रकारचा आणि कितीही सौम्य असला तरी त्यांत अप्रिय असें कांहींच नाहीं, असें कोठून होणार? ज्या दोन मनुष्यांचा परस्परांशीं संबंध आहे, त्यापैकीं एक दुसऱ्याच्या विरुद्ध जाऊं लागला म्हणजे कधीं त्या दोघांस एकमेकांशीं वर्दळीस यावें लागेल; कधीं एकमेकांवर शब्दप्रहार करावे लागतील; कधीं उभयतांनीं आरंभिलेल्या कामांतून अंग काढून घेऊन विलग व्हावें लागेल; कधीं पदराला चराच खार लाऊन घ्यावा लागेल किंवा जिवाकडे न पाहतां अहोरात्र मानसिक शारीरिक कष्ट करावे लागतील; पण जोंपर्यंत आपण आपल्या विचाराच्या विजयासाठीं व प्रसारासाठीं भांडत आहों, असें प्रत्येकाच्या मनांत वागत राहीलोपर्यंत न्यायसभेंत पक्षकाराचें भांडण भांडणाऱ्या वकिलाच्या दिखाऊ वैराच्या फार पलीकडे अशा दोन व्यक्तींचें वैर जाईल असें आम्हांस वाटत नाहीं, व आगरकर आणि टिळक यांच्या वैराचें स्वरूप याहून भयंकर नाहीं असे निदान त्यापैकीं एकाला तरी वाटत आहे. तसेंच या वैरामुळें या दोघांच्या व्यासंगांत जें अंतर पडलें आहे तें कमी न होतां कदाचित् अधिकच होत जाण्याचा जरी संभव आहे तरी जेव्हां खुद्द आगरकराच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्या-

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.
सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार ही मिक्श्चर ४१० पौंड.
मोरोक्को " " ४१२ पौंड.
याशिवाय हरएक प्रकारचा म' संदेश फक्त कमिशनवर पाठवूं.

सारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकास व जेव्हां टिळकाचे घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल, तेव्हां आगरकरास, विशेष वाईट वाटून डोळ्यास पाणी येईल, व मत-भेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून, एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल!

धर्म, राज्य, व समाज या संबंधानें अलीकडे जे औपपत्तिक सिद्धांत सर्वमान्य होऊन बसले आहेत त्यांविषयीं आह्मां उभय-तांत ह्मणण्यासारखा मतभेद नाहीं. मनुष्याच्या बुद्धीचे व्यापार इंद्रियाधीन असल्यामुळें या बुद्धीचे ब्रह्मांडाच्या आदिकारणाचें किंवा परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होण्याचा संभव नाहीं, हें धर्मतत्व मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचे ते करीत गेलें पाहिजे; राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशांत ऐहिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं; पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार आणि इंग्लिश लोकांचें साहाय्य असल्याशिवाय आमचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं, या करितां राजनिष्ठा यत्किंचित् ढळूं न देतां, राजकीय हक्क संपादण्यासाठीं जें करणें असेल तें आह्मीं केलें पाहिजे; नीति-प्रसार, संपत्त्युपादन, आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्वाच्या गोष्टी ज्ञानार्धीन असल्यामुळें लोकशिक्षणाचें काम जितक्या झपाट्यानें चालवेल तितक्या झपाट्यानें चालविलें पाहिजे; जातिभेद नाहींसा झाला पाहिजे; स्त्री पुरुषांच्या ज्ञानांत व स्वातंत्र्यांत जेवढें अंतर राहू देणें अपरिहार्य असेल तेवढ्याहून अधिक राहिल्यास पूर्ण संसारसुख प्राप्त होण्याचा संभव नाहीं, ह्मणून स्त्रियांची उन्नति करण्याबद्दल रात्रंदिवस झटलें पाहिजे— वगैरे धार्मिक, राजकीय, व सामाजिक विषयांसंबंधानें स्थूल औपपत्तिक सिद्धांत जसे ए किंवा तसे दुसऱ्याला ही संमत आहेत. दोघांत जो मतभेद होतो तो व्यावहारिक तारखेस हे सिद्धांत

अमलांत आणण्यासाठीं काय करतां येईल व ते कोणत्या साधनानें करतां येईल, या संबंधानें पडतो. या घटकेस साध्य असलेल्या सुधारणेची इयत्ता आणि तिचीं साधनें याविषयीं टिळकांचे बहुतेक विचार सामान्य लोकांस मान्य होण्यासारखे असल्यामुळें, किंवा त्यास मान्य असलेल्या विचाराबाहेर जाण्यास टिळक तयार नसल्यामुळें, त्यांचें वर्तन भवभूतीनें रामचंद्राकडून वदविलेल्या—

स्नेहं दयांच सौख्यंच यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥

अर्थः—स्नेह, दया, सौख्य, फार तर काय लोकांच्या संतोषासाठीं मला जानकीचा देखील त्याग करावा लागला तरी त्याबद्दल खेद वाटणार नाहीं ! या श्लोकार्थाप्रमाणें होत आहे, व या क्षणीं ते अत्यंत लोकप्रिय झाले असून, प्रत्येकाच्या तोंडांतून त्यांचें नांव निघत आहे. पण लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळें, लोकछंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे इतकेंच नाहीं, तर लोकास अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध पुनः पुनः त्यांचेपुढें आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीवितांचें सार्थक अशी त्याची दृढ कल्पना झाली असल्यामुळें, धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपलें ज्ञान विकटोपर्यंत जाऊन पोहोंचलें आहे, व तत्संबंधक आचारांत सुधारणा करण्यास

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र.

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, किंमत कि. १ रुपाया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

म्हणण्यासारखी जागा राहिलेली नाहीं, निदान त्या कामांत सरकारचें किंवा कायद्याचें साहाय्य घेतलें असतां सर्वथैव नुकसान होणार आहे असें समजणाऱ्या श्रद्धालु पंडितंमन्य, व देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचें आणि रोषाचें स्थान त्यानें आपणांस करून घेतलें आहे. तथापि त्याला असा भरंवसा आहे कीं, म्हणण्यासारखी द्रव्यानुकूलता नसता, श्री. शिवाजीराव महाराज होळकरांनीं देऊं केलेली दरमहा पाचशें रुपयांची नोकरी ज्यानें 'मला नको' म्हणून सांगितलें; विशेष बुद्धिसामर्थ्य किंवा शरीरसामर्थ्य नसतां, आज दहा अकरावर्षें जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किंफायत नसतां, ज्यानें सात आठ वर्षें सर्वत्र प्रसिद्ध केसरीपत्राचे चऱ्या वाईट रीतीनें 'रकानें' भरून काढले इतकेंच नाहीं तर एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी, येवढयाच बुद्धीनें लिहिलेले लेख न्यायाधीशास अप्रशस्त वाटल्यामुळें त्यांनीं दिलेली शिक्षा त्यानें आनंदानें साहिली; हातीं असलेल्या पत्राचे मालक शुद्ध नाटेल तें लिहूं देत नाहींत असें दिसून आल्याबरोबर त्यांच्या धमकावण्याकडे बिलकुल लक्ष न देतां समानशीलाच्या व विचारांच्या मित्राचें प्रोत्साहन व साहाय्य मिळतांच, सर्वतोमुखी निंदा होत असलेल्या **सुधारणेचा** आणि **सुधारकांचा** पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बल नाहीं, इतकेंच नाहीं तर त्याचेंच अखेरास सर्वत्र साम्राज्य होणार आहे असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसतां, व लोकमत धडधडीत विरुद्ध असतां नवीन पत्राच्या नसत्या उठाठेवींत जो जाणूनबुजून पडला; रूढ धर्माचारांतील आणि लोकाचारांतील त्यांगांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्यामुळें, देशाभिमानी व धर्मांत

भिमानी ह्मणविणाऱ्या पत्रांकडून होत असलेला शिव्यांचा व शापाचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लगत आहे; स्वमतानें मंडन व तदनुसार होईल तेवढें वर्तन करण्यसाठीं, आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाचसा काय, तर रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर व खांद्यावर खेळवून, ज्यांनीं लहानाचें थोर केलें अशा अत्यंत ममताळू व पूज्य आतांचाही दीर्घ रोष ज्यानें आपणांवर करून घेतला आहे—अशा मनुष्याच्या लेखांत किंतीही प्रमाद होत असले व केवढीही कटुता असली तरी ते सभंजस मनुष्याच्या स्वल्प आदरांस, निदान थोड्याशा अनुकंपेस तरी पात्र झाले पाहिजेत. "हा वेडापीर इतके हाल, संकटें, व लोकापवाद सोसून ज्या अर्थी इतकी धडपड करीत आहे त्या अर्थी तो लोकांस अंतीं हितावह होईल अशी निदान याच्या मनाची तरी खात्री झाली असावी," असा विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं त्याच्या दोषांबद्दल त्यास क्षमा केली पाहिजे. त्यांनीं तसें केलें तर ठीकच आहे; पण नाहीं केलें तरी त्यास विशेषसें धाईंत वाटण्याचा संभव नाहीं; करण, सारे जग त्यावर उलटलें तरी पुढील कविवाक्याचें स्मरण करून त्याला आपलें समाधान करून घेतां येतें.

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम ।
जानन्ति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ॥

धातुरत्नमालाः—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मान्णक्रिया दिली आहे. किं ७५

अर्थः-खरोखरींच जे या गोष्टींत आमची निर्भत्सना करतात, त्यांना कांहींच समजत नाहीं, व त्यांच्या कारितां हा आमचा प्रयत्नही नाहीं. माझ्या शीलाचा एखादा इसम कोठें तरी असेल किंवा निपजेल; पृथ्वी अफाट आहे व काल अनंत आहे !

इंग्रजी राज्याची उलट बाजू

अथवा

आमचें घोर दारिद्र्य.

मुंबई शहराचा अफाट विस्तार; राजवाड्यांच्या तोडीच्या तेथील मोठमोठ्या खासगी व सरकारी हवेल्या; चारसाहा गाड्या एकीलाएक लागून जाण्यासारखे तोलेजंग रस्ते; वग्यांची शिग्रामांची, व ट्रॅमवेच्या गाड्यांची सारखी धुमश्चक्री; व्यापाऱ्यांच्या गल्ल्यांत वाट मिळण्यासाठीं जाणाराऱ्येणाऱ्यांची धक्काबुक्की; घटकोंघटकीं उतारूंच्या व मालांच्या आगगाड्यांच्या शिळांचा आणि चाकांच्या खडखडाटाचा त्रासदायक आवाज; प्रत्येक मार्केटांत नानाप्रकारच्या जिनसांचा खरेदी करण्याकरतां चांदी व नोटा खिशांत घालून, चौकशी करीत, या ठिकाणाहून त्या ठिकाणीं हिंडणाऱ्या गिऱ्हाइकांची जिकीरीची घासाघीस; चंदरांत येऊन दाखल झालेल्या हजारों पडावांची आणि मचव्यांची एकच गर्दी होऊन जाऊन, समुद्राच्या पृष्ठभागावर डोलकाठ्यांनीं झालेला आरण्यतुल्य देखावा; मोठमोठे सट्टे करण्यांत दंग झालेल्या आडत्यांचा व व्यापाऱ्यांची होऊन गेलेली एकच धांदल; आपआपल्या कामांवर जाणाऱ्या सरकारी व खासगी नोकरांची, घड्याळाकडे पहात, कमी अधिक होणारी

मुळें इकडे तिकडे न पहातां नाकासमोर तडक चालत असल्यामुळें, देशांतून नुकत्याच आलेल्या लोकांस याला चक्कर झाला असेल कीं काय, असा वारंवार होणारा भास; गिरण्यांच्या चिमण्यांतून निघणाऱ्या काळ्या धुरांचे लोळ आणि इमारतींच्या उदरांत चाललेली मोठमोठ्या यंत्रांची गडबड; न्यायकचेऱ्या, शिक्षणालयें, तारहापिसें, पोस्टहापिसें, पेढ्या, टांकसाळ, गोद्या, वगैरे अनेक ठिकाणीं सर्वकाळ दृष्टीस पडणारी ज्यांची त्यांची व्यग्रनिमग्नता; संध्याकाळच्या सुमारास विजेच्या दिव्यांचा, ग्यासाच्या दिव्यांचा व साध्या दिव्यांचा जिकडे तिकडे लखलखाट; सर्व दिवसभर नभाचें अक्रमण करून भागलेला रवि पश्चिमसमुद्रांत स्नान करण्यासाठीं क्षितिजावर येऊन ठेपला असतां, समुद्राच्याकांठीं त्याच्या समांतर किरणांत हवा खाण्यास व सहल करण्यास गाड्यांतून, घोड्यावरून, व पायांनीं जात येत असलेलीं हरएक जातीचीं व पद्धतीचीं सडीं किंवा सवत्स स्त्रीपुरुषें; अनेक कारणांस्तव अनेक देशांतून आलेल्या, अनेक भाषा बोलणाऱ्या, अनेक प्रकारचे पेहराव करणाऱ्या, अनेक पद्धतींच्या लोकांचे जागो जाग दृष्टीस पडणारे थवे; प्रिन्स ऑफ वेल्स, लॉर्ड रिपन, किंवा झारतनय यांसारख्या एखाद्या मोठ्या पुरुषाच्या आगमनप्रसंगीं अथवा प्रयाणसमयीं ठळक रस्त्यांवर दृष्टीस पडणारा असामान्य थाट, लष्करी स्वारांच्या दौडी, प्रेक्षकांची अनावर दाटी, आणि पोलीसाचा कडेकोट बंदोबस्त—वगैरे मुंबईस प्रतिदिवशीं दिसणाऱ्या गोष्टीच ज्यांस नित्य पहाण्याचा प्रसंग आहे त्यांस, किंवा या राजधानीच्या स्थितीवरून हिंदुस्था-

---

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट हं. सह २ रु.

नच्या लोकांच्या स्थितीचें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें जे समजत असतील त्यांस, त्या स्थितीचें खरें स्वरूप कधींच व्हावयाचें नाहीं ! मुंबईची सदा दिवाळी पाहून या अधुनिक व ऐहिक कुबेरनगरींतिल लोकांप्रमाणेंच या देशांतील इतर शहरांतले किंवा गांवांतले लोक धनाढ्य असतील असा तर्क करणें म्हणजे लग्नाकार्यांत आमचे लोक जो शक्तीबाहेर खर्च करतात त्यावरून आमच्या ऐपतीचा अंदाज करण्याइतकें वेडेपणाचें काम होणार आहे ! वास्तविक पाहतां मुंबई किंवा कलकत्ता हीं आमचीं शहरें नव्हत; हीं इंग्रजलोकांचीं शहरें आहेत ! निदान मुंबईतील संपत्तीच्या अर्ध्याहून अधिकाचे मालक इंग्रज लोक आहेत, असें सहज दाखवितां येणार आहे. तसेंच, या शहरांत कांहीं श्रीमान् नेटीव व्यापारी दिसतात, व त्यांच्या हातून लाखों रुपयांच्या प्रतिदिवशीं घडामोडी होतात, येवढ्यावरून इतर ठिकाणींहीं अशाच प्रकारचे श्रीमंत लोक असतील, किंवा अशाच प्रकारच्या घडामोडी चालल्या असतील, असा तर्क करणें अगदीं चुकीचें होणार आहे. ज्याप्रमाणें जड वस्तूंत गुरुत्वाकर्षणाचा एक बिंदू असतो, त्याप्रमाणें या इलाख्यांत किंबहुना या देशांत मुंबईशहर संपत्त्याकर्षणाचें आद्यस्थान होऊन बसलें आहे. या इलाख्यांतील बहुतेक संपत्ति, बहुतेक शहाणपण, बहुतेक कारखाने, बहुतेक व्यापार व व्यापारी, बहुतेक जातींचे व धर्मांचे लोक–सारे मुंबईत भरले आहेत. इतर ठिकाणीं आळस, दारिद्र्य, व हरएक प्रकारचे गचाळपण हीं मात्र यथेच्छ नांदत आहेत. उद्यां जर मुंबईवर एखादें मोठें अरिष्ट गुदरलें तर कोणाच्याही तालूवर जोराची बुक्की मारल्यानें त्याच्या इतर अवयवांची जी गति होईल ती इतर शहरांची होणार आहे ! एका दिवसांत त्या सर्वांस अर्धांगवायूचा झटका झाल्याप्रमाणें [illegible]

जो मनुष्य नोकरी करण्याकरितां इंग्लंडाहून येथें येऊन मुंबईस उतरत असेल त्याच्या मनावर त्या शहरच्या प्रथमावलोकनानें होणारे संस्कार त्याला कधींही सोडीत नसतील. युरोपांतील मोठमोठ्या शहरांच्या आणि मुंबईच्या संपत्तिमत्वांत आणि उद्योगीपणांत बरेंच साम्य असल्यामुळें, 'आपल्या देशबंधूंनीं हिंदुस्थानचें राज्य कांहीं वाईट रीतीनें चालविलें नाहीं,' असा प्रत्येक नवीन साहेबाचा ग्रह एकदम होऊन जाणें फार स्वाभाविक आहे; व हा ग्रह पुढें होत जाण्यासही अलीकडे बरींच कारणें झालीं आहेत. अलीकडील अत्यंत शोधक इंग्रजी अधिकाऱ्यांशिवाच इतरांस आमची खरी स्थिति आम्हांत मिळून मिसळून समजून घेण्याची गरज उरली नाहीं. साहेबाचा पगार हवातितका मोठा असल्यामुळें, व त्याच्या सुखास लागणाऱ्या बहुतेक चिजा त्याच्या पुरत्या बहुशः सर्व ठिकाणीं आतां मिळूं लागल्यामुळें, त्याच्या नोकरीचीं सारीं वर्षें ऐषआरामांत जातात; व पेन्शन घेऊन जेव्हां तो परत जातो तेव्हां त्याचेपाशीं बऱ्याच मायेचा संचय झालेला असतो. आधींमधीं केव्हां स्वदेश पहाण्याची हुक्की आलीच तर भर पगारावर चांगली वर्षादीडवर्षाची फर्लो घेऊन, एखादी चैनीची सफर करण्यासही कांहीं अडचण पडत नाहीं. आगगाडया व आगबोटी यांच्या अभावामुळें नामदार कंपनीच्या प्रमुख गोऱ्या नोकरांस सुद्धां जीं सुखें मिळण्याची आशा स्वप्नांत देखील झाली नसेल, तीं सुखें सध्यांचे सामान्य युरोपियन नोकर अहोरात्र यथेच्छ उपभोगीत आहेत, यांत संशय नाहीं.

सुधारक.

राजकीय, सामाजिक," धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकेंच साप्ताहिक. व. इ. हं. सह १८१३

मॅनेजर, सुधारक पूर्ण सिटी.

या त्यांच्या सुस्थितीचा आम्ही हेवा करतों असें नाहीं हा गोष्ट येथें सांगण्यांत आमचा इतकाच हेतु आहे कीं, नामदार कंपनीच्या गोऱ्या नोकरांस त्या वेळच्या विशेष अडचणीमुळें, आह्मा लोकांत विशेष मिसळावें लागत असल्यामुळें, आमच्या स्थितीचें जितकें ज्ञान त्यांस होत असे, व त्यामुळें आमचा त्यांना जितका कळवळा येत असे, तितकें ज्ञान अलीकडील नुकतेच रहाणाऱ्या इंग्रजी अधिकाऱ्यांस होत नाहीं, व त्यामुळें त्यांना आमच्याबद्दल तितकी कळकळ वाटत नाहीं. वास्तविक पाहतां, कंपनीच्या अमलांत द्रव्यदृष्टीनें आह्मी जितके सुखी होतों त्याहून सध्यां पुष्कळ पटीनें कमी सुखी आहों, व जे शोधक व विचारी इंग्रज लोक आहेत ते ही गोष्ट उदार मनानें कबूलही करतात. पण येथें असलेल्या बहुतेक इंग्रज लोकांचे विचार याहून फार उलट असतात; व स्वदेशांस पेन्शन् घेऊन परत गेल्यावर ते त्याच प्रकारचे विचार आपल्या देशबांधवांपुढें सांगत फिरतात. नारायंत्रें, आगगाड्या, मोठमोठे रस्ते, लोकशिक्षण, लोकसंख्या, सोन्यारुप्याची प्रतिवार्षिक प्रचंड देवघेव, हिंदुस्थानांत येणाऱ्या व हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या मालाचे टोलेजंग आंकडे, मुंबई, कलकत्ता वगैरे मोठमोठ्या शहरांत दृष्टीस पडणारी संपत्ति आणि धनाढ्य नेटिव लोक, आणि स्वतःस सर्व ठिकाणीं व सर्व काळीं उपभोगण्यास सांपडणारी हवीतसली सुखपरंपरा—यामुळें बहुतेक अर्वाचीन इंग्रजी अधिकाऱ्यांस आपल्या राज्यामुळें प्रत्येक गोष्टींत नेटिव लोकांचें पाऊल पुढें पडत आहे, व विशेषतः आधिभौतिक संपत्तीचा जेवढा उपभोग त्यांना पूर्वीच्या कोणत्याही अमलांत कधींही प्राप्त झाला नाहीं, तेवढा उपभोग त्यांना हल्लीं मिळत आहे, असें वाटतें, आणि त्या वाटण्याप्रमाणेंच ते येथें असतां व येथून परत गेल्यावर लिहीत व बोलत सुटतात. सेक्रेटरी आफ स्टेटच्या इंडिआ कौन्सिलांत

बहुधा अशा विचारांचें मेंबर्स किंवा सभासद् असतात. त्यामुळें लॉर्डरिपनसारख्या एखाद्या उदारात्म्यानें आमच्या बऱ्यासाठीं कमी अधिक दोन शब्द लिहिले तर त्यांचा नीट विचार करणें तें एकीकडेच राहून, उलट त्यासच त्या कौन्सिलाकडून बहुधा खरपूस तंबी मिळते ! तात्पर्य, हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें खुद्द महाराणी साहेबांनीं आपल्या हातीं घेतल्यापासून हिंदुस्थानचें वित्त कृष्णपक्षांतील चंद्राप्रमाणें क्षयास लागलें असतां, व थोडया वर्षांत हिंदुस्थान देश कंगालतेच्या निबिड अंधकारांत गडप होऊन जाण्याचीं चिन्हें स्पष्टपणें दिसूं लागलीं असतां, आमचें वित्त शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वाढीस लागलें आहे, व थोडया वर्षांत पौर्णिमेच्या अतिश्रीमंत चांदण्यांत आम्ही मोठ्या आनंदानें वावरूं लागणार आहों, असा या लोकांना अलीकडील विलक्षण राज्यपद्धतीमुळें भ्रम होतो, आणि तो भ्रम आहे असें त्यांस वाटत नसल्यामुळें, ते आमच्या गाऱ्हाण्यांकडे आणि आरोळ्यांकडे लक्ष पुरवीत नाहींत इतकेंच नाहीं, तर ब्रॅडलॉसारखे जे महात्मे आमची खरी स्थिति मोठ्या प्रयासानें समजून घेऊन, आपल्या अपनीत बांधवांच्या ज्ञानचक्षूवरील भ्रमपटल यत्किंचित् दूर करण्याचा प्रयत्न करतात, त्या डोळसांवर हे मूढ अंध चवताळून जाऊन, " तुम्ही स्वदेशाचे शत्रु; हिंदू लोकांस तुम्हीच बंडखोर करतां; ज्या गोष्टींचें ज्ञान व अनुभव तुम्हांस नाहीं त्या गोष्टींत पडून उभय देशाचें व लोकांचें नुकसान निष्कारण तुम्ही करतां " अशा प्रकारच्या कुशब्दांचा वर्षाव त्यांवर करतात, आणि इंग्रजी राज्याच्या पवाडयांनीं सारी दुनिया हालवून सोडूं पहातात ! अशा स्थितीं

लेखकांस योग्य मोबदला देऊन आम्ही ग्रंथ---प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें.

स इंग्लंडच्या लोकांस व इंग्लिश पार्लमेंटच्या सभासदांस आमच्या स्थितीचें खरें ज्ञान करून देऊन, त्यांना आमच्या-कडे दयार्द्रदृष्टीनें पाहण्यास लावण्याठीं, जे दहापांच थोर इंग्लिश गृहस्थ आपली पराकाष्ठा करीत आहेत, त्यांतच राष्ट्रीय सभेच्या इंग्लिश कमिटीचे चिटणीस मि. **बुडिंगवी** हे आहेत. **इंडिआ**नामक त्यांनीं चालविलेल्या मासिकाच्या जाने-वारीच्या अंकांत " हिंदुस्थानांतील ब्रिटिश अमलाचें रुप्गांग " या मथळ्याखालीं हौस आफ् कामन्स सभेच्या सभासदांस उद्देशून लिहिलेलें एक " अनावृत्त पत्र " त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. ज्यांना इंग्रजी येत असेल त्यांनीं तर तें अवश्य वाचावेंच. पण ज्यांना इंग्रजी येत नसेल किंवा तें पत्र ज्यांच्या हातीं पड-ण्याचा संभव नसेल त्यांनाही त्यांतील ठळक गोष्टी समज-ल्यास पुष्कळ फायदा होणार आहे. असें वाटल्यावरून त्या पत्राचा गोषवारा द्यावा, असें एकदां आमच्या मनांत आलें. पण अशा प्रकारच्या लेखांचा सारांश काढणें ज्याप्रमाणें तो काढ-णारास, त्याप्रमाणें तो वाचणारांसही, कंटाळवाणा होत असेल अशी शंका आल्यावरून त्या लेखाच्या व दुसऱ्या अनेक लेखांच्या आधारानें पांचचार स्वतंत्र निबंध लिहिण्याच्या विचार केला, आणि त्याच्या प्रस्तावनेदाखल हें आजचें चऱ्हाट वळलें ! संमतीच्या चिलाचा सोक्षमोक्ष होईपर्यंत असला नवीन विषय हातीं घेणें प्रशस्त नव्हतें ! परंतु काय करावें ? चिलाच्या शत्रूंनीं पोष्टमार्गें पाठविलेल्या लेखी धमक्यामुळें—

सरला सुकृताचा तंतू ।
आयुष्यतैला झाला अंतू ॥

असें वाटूं लागलें, आणि **सबसे जीव प्यारा** या हिंदी वचनाकडे लक्ष देऊन मित्रेषणानें हें विषयांतर करण्याचा निश्चय केला ! आणि दुसरें काय !' पण हिंदुस्थानाचें दारि-

द्यानेरसन करण्याच्या कामींही सरकारची आणि कायद्याची मदत घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें ह्मणण्याचा या नवीन निबंधमालेंतही प्रसंग येणार आहे ! तेव्हां या विषयांतरानें 'आजचें मरण उद्यांवर लोटलें' येवढाच फायदा कदाचित् झाला तर होणार आहे !!!

हिंदुस्थानास क्षय लागला !

आठराव्या शतकाचे अखेरीस ह्मणजे या देशांत ब्रिटिश राज्याची पूर्ण स्थापना होण्याचे पूर्वी जे मोठे चौकस इंग्रज लोक इकडे येऊन गेले त्यापैकीं एकानें या भरतखंडाविषयीं असा अभिप्राय लिहून ठेवला आहे कीं या देशानें कोणत्याही गोष्टीसाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें, असें कधींच होण्याचा संभव नाहीं, व आजपर्यंत कधीं झालें नाहीं. जीवितसंरक्षणास अवश्य लागणाऱ्या पदार्थांची किंवा चैनीच्या पदार्थांची हिंदुस्थानांत चंगळ आहे, फारच झालें तर हिंदुस्थानची लोकसंख्या फारच मोठी असल्यामुळें, तेथील लोकांना थोडेसें कापड दुसऱ्या देशांपासून विकत घ्यावें लागेल; म्हणजे दोन हिस्से कापड हिंदुस्थानांत उत्पन्न करतां येऊन कदाचित् एक हिस्सा दुसऱ्या देशांच्या बाजारांत त्यास खरेदी करावा लागेल. या एका वस्तूशिवाय हिंदुस्थान देशाला कोणत्याही वस्तूसाठीं दुसऱ्या देशावर अवलंबून रहावयास नको आहे, हा अभिप्राय १७९३ त दिलेला आहे. आणखी दोन वर्षांनीं १८९३ साल

लौट्स् भऱ्याचा देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर–हवाशीर. स्वतंत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर–सुधारक, पुणें.

ाईल. म्हणजे इंग्रजाचें राज्य येथें पूर्णपणें स्थापलें गेल्यास ८ वर्षें किंवा पुरें शतक लोटलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. ा शतसांवत्सरिक अमलामुळें वरील अभिप्रायांत वर्णन केलेल्या स्थितीच्या अगदीं उलट स्थिति आमच्या कपाळीं आली आहे ! या गोष्टीसाठीं आज आम्हांस इंग्लंडाच्या तोंडाकडे पहावें ागणार नाहीं किंवा लागत नाहीं, अशी गोष्ट तरी सांगतां ईल काय ? १७९३ त आम्हांस लागणाऱ्या कापडाच्या एक तितांशाशिवाय बाकीच्या बहुतेक साऱ्या वस्तू आम्ही येथल्या थें उत्पन्न करीत होतों; किंवा कांहीं दुसऱ्यांकडून घेत असलों र त्याच्या मोबदला आपला माल त्यांच्या पदरांत बांधीत तों. पण या घटकेस तो मनु अगदीं फिरून गेला आहे. ाटिश अमलांत असणाऱ्या येथील प्रजेस प्रतिवर्षी ज्या वस्तू ागतात त्या साऱ्यांचा एकतृतीयांश तरी येथें उत्पन्न होतो ऱ्या नाहीं, याची मोठी शंका आहे. ज्याप्रमाणें एखाद्या अन्वि- क कुटुंबांत एकानें मिळवावें आणि तिघानीं बांड्यास येईल वढें बसून खावें, अशी स्थिति असते, त्याप्रमाणें या देशांतील कांची अवस्था झाली आहे. परक्या देशांपासून जो तयार लेला माल आम्ही प्रतिवर्षी घेतों, त्याच्या मोबदला तयार लेला माल आम्ही त्यांस देत असतों तर ठीक होतें. कारागि- च्या वस्तू आम्हांस लागत नाहींत किंवा आम्ही त्या विकत त नाहीं, असें नाहीं. जशा आम्हांस त्या पूर्वी लागत असत ाच आताही लागतात. भेद एवढाच कीं, पूर्वी त्या दुस्थानचे कारागीर तयार करीत असत; सध्या इंग्लं- चे कारागीर त्या तयार करून आम्हांस आणून कतात ! यावर कोणी अशी शंका घेईल कीं, ज्या अर्थी कारा, रीचे पदार्थ अलीकडे या देशांत फारसे उत्पन्न न करतां- क्या देशांपासून विकत घेण्याचा परिपाठ पडला आहे, त्या र्थी त्यांच्या मोबदला या देशांतील लोक त्या दुसऱ्या देशा-

नंतर लोकांत कांहीं तरी देत असले पाहिजत. कारागिरीचे पदार्थ तुम्ही दुसऱ्या देशांपासून घेत असलां तर त्यांना कच्चा माल देत असाल. कसेंही झालें तरी कोणत्याही दोन अथवा अधिक देशांत सारख्या किंमतीच्या कसल्या तरी मालाची अदलाबदल झाल्याखेरीज व्यापार चालणें अशक्य आहे. तेव्हां जर तुम्ही कारागिरीचे जिन्नस उत्पन्न करीत नसला तर कच्चा माल उत्पन्न करीत असला पाहिजे; व तसें करीत असला तर ब्रिटिश सरकाराविरुद्ध कुरकुरी करण्यास तुम्हांस विशेष जागा नाहीं. कारागिरीचे पदार्थ उत्पन्न करणें किंवा कच्चा माल उत्पन्न करणें हें ज्याच्या त्याच्या मर्जीवर आहे. तुम्ही कच्चा माल उत्पन्न करावा, आणि इंग्लंडानें तुम्हांस त्याबद्दल कारागिरीचे जिन्नस तयार करून द्यावे, ही गोष्ट तुम्हा उभयतांस फायदेशीर दिसून आल्यामुळें, तुम्ही हिंदु लोकांनीं शेतकीचा धंदा आणि त्या इंग्रज लोकांनीं कारागिरांचा धंदा पत्करला असला पाहिजे. ज्याप्रमाणें एखाद्या खेड्यांत काहीं लोक शेतकीचें काम करितात, व कांहीं कारागिरीचे करतात, आणि एकमेकांच्या मालाची अदलाबदल करून उपजीविका करितात, त्याच प्रकारचा हा इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील व्यवहार आहे. यांत इंग्लंडच्या पायीं हिंदुस्थान देश बुडत चालला आंहे, किंवा हिंदु लोकांना दारिद्र्यक्षयं लागून ते मृत्यूच्या द्वारीं येऊन बसले आहेत, असें कसें म्हणतां येईल कोण जाणे !

प्रथमदर्शनानीं हा आक्षेप कित्येकांस निरुत्तर वाटण्यासारखा

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठ ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ८५

लाल्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

आहे. पण थोड्या सूक्ष्म विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, इंग्लिश लोकांनी जरी जाणूनबजून आह्मांस दारिद्र्य आणिलें नाहीं, तरी ते परदेशस्थ राज्यकर्ते असल्यामुळें, त्यांनीं स्वकीय व्यापाऱ्याच्या फायद्यासाठीं जे कायदे केले आहेत, व जी राज्यपद्धति येथें घातली आहे, त्या कायद्यामुळें व त्या राज्यपद्धतीमुळें, त्यांच्या मनांत नसतां किंवा त्यांना नकळत आमचें प्रतिवर्षी अनिर्वचनीय नुकसान होत असून त्यांच्या शंभर वर्षाच्या अंमलांत आमचे प्राण आमच्या डोळ्यांत येऊन ठेपले आहेत ! आमचा उत्कर्ष व आमची भरभराट असावी, अशी इंग्रज लोक रात्रंदिवस चिंता करतात, याविषयीं शंका नाहीं. अडांत पाणी नसेल तर तें पोहऱ्यांत यावयाचें नाहीं, हें त्यांस पक्कें ठाऊक आहे. पण राष्ट्रांच्या द्रव्यसंचयाला किंवा द्रव्योत्पत्तीला आडांतील पाण्याची आणि त्याचा जो भाग करांच्या रूपानें सरकार घेतें त्यांस पोहऱ्यांतून वर येणाऱ्या पाण्याची उपमा देतानां थोडी खबरदारी ठेवली पाहिजे. ज्याप्रमाणें आडाचा तळ एकदां कोरडा पडला ह्मणजे त्यांवर पोहऱ्यानें कितीही हपटाहपट केली तरी त्यांत एक थेंब देखील येण्याचा संभव नसतो, त्याप्रमाणें या राष्ट्रकूपाची गोष्ट असती तर राज्यकर्त्यांच्या करापोहरांत कांहीं एक न येतें हें उघड आहे. पण हा राष्ट्रकूप केवळ जडकूपासारखा नाहीं. याला आपल्या भीत्ति किंवा अंगें पिळून घेऊन त्यांतील रुधिर द्रव्यरुपानें आपल्या राज्यकर्त्यांस देतां येतें ! व निरुपायास्तव राजनिष्ठ प्रजा आपले प्राणोत्क्रमण होईतोंपर्यंत करांच्या चरकांत आपणास पिळून घेऊन, तिजोरींचें पोतें भरून देत राहील. अंगातील सारा रस नाहींसा होऊन, त्याचें अगदीं शुष्क चिपाड झालें--ह्मणजे मात्र आमच्यापाशीं तुमचें पोतें भरून देण्यास आलां कांहीं उरलें नाहीं, आम्ही अगदीं मेलवन् गेलों आहों, असें सांगण्याचा दुर्धर प्रसंग अत्यंत राजनिष्ठ

प्रजेवर देखील कधीं कधीं निरुपायामुळें येऊन ठेपतो. ब्रिटिश लोकांनीं जी राज्यपद्धति येथें घातली आहे ती नैतिक दृष्टीनें जरी अत्यंत निर्दोष आहे, तरी द्रव्यदृष्टीनें ती पराकाष्ठेची एकदेशीय आहे, म्हणजे ती फारच थोडया अंशानीं हिंदू लोकांस हितावह आहे, असें म्हणणें भाग आहे. हें सत्यकथन पुष्कळ इंग्लिश लोकांस रुचत नाहीं. पण त्यांना तें रुचत नाहीं, म्हणून तें अनुक्त राहूं देणें चांगलें नाहीं. तसें करण्यापासून अखेरीस आमच्यावर व त्यांच्यावर भयंकर प्रसंग गुदरणार आहे. त्यांना हिंदुस्थानचें राज्य सोडून द्यावें लागेल; व आम्ही बहुतेक नाहींसें होऊं ! ही अखेरची गोष्ट आहे. पण ब्रिटिश पार्लमेंट आणि मुख्यत्वेंकरून इंग्लंडचे सदय लोक असा प्रसंग येऊं देतील असें आम्हांस वाटत नाहीं. आंग्लभूमीच्या कुशींत **मेकॉले, रिपन, ब्राइड, बॅडला,** किंवा **ह्यूम** यांसारख्या धीरोदार पुरुषांचें जनन होण्याची अक्षमता उत्पन्न झाली नसेल, व उत्तरोत्तर तिच्या पुण्यगर्भाशयांत अशा प्रकारच्या सात्विक आत्म्यांची अधिकाधिक धारणा होत जाणार असेल, तर इंग्लंडचा राज्यविस्तार संकुचित होण्याचें, व आमचें राष्ट्रजीवित नष्ट होण्याचें भय नाहीं इतकेंच नाहीं, तर या आमच्या राज्यकर्त्या इंग्लिश लोकांच्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या, मतदयेच्या व उदाहरणाच्या साहाय्यानें आम्ही आपल्या सांप्रत अत्यंत शोचनीय स्थितींतून हळूं हळूं बाहेर पडून कांहीं शतकांनीं इंग्लिश लोकांच्या बरोबरीचा सुखोपभोग घेऊं लागूं. पण तो सुदिन येणें किंवा न येणें हें बीस बाब्यांनीं इंग्लिश लोकांवर ऐशीं बाब्यांनीं आमचें आम्हांवर अवलंबून आहे. मनुष्य हा

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८

आपल्या भाग्यमंदिराचा शिल्पकार आहे, हें जें एका प्रसिद्ध इंग्लिश तत्ववेत्त्याचें ह्मणणें आहे, व ज्याला अनुसरून इंग्लिश लोकांचें नित्यवर्तन होत असतें, तें आह्मी अहोरात्र डोळ्यापुढें ठेऊन तदनुसार वर्तन केलें पाहिजे. आपल्या लोकांतही "नर करणी करे तो नरका नारायण हो जाय" असा जो हिंदुस्थानीं दोहरा तोही **बेकनच्या** वरील वाक्याच्या तोडीचाच आहे. असलीं वचनें ध्यानांत ठेऊन तदनुरोधानें आमचें वर्तन होऊं लागेल, तरच अस्ताचलास गेलेला आमचा भाग्यरवि पुनः उदयाचलावर येण्याचा संभव आहे. नाहींतर हिंदुस्थानास सांप्रतकाळीं चौंहोदिशांनीं परिवेष्टणाऱ्या निर्धनतेचा संध्यांधकार होतां होतां कंगालतेचें निबिड तम होऊन त्यांत येथील लोक निमग्न होतील !

वर घेतलेल्या कल्पित आक्षेपाचें किंवा शंकेचें समाधानकारक उत्तर सामान्य लोकांस देतां येवो किंवा न येवो, यवढेंच खरें आहे कीं, दिवसेंदिवस द्रव्यदृष्ट्या आह्मी अधिकाधिक खचत जाऊन, पोटभर अन्नास सुद्धां मोताद होऊं लागलों आहों, याविषयीं. आतां बहुतेकांस कमीअधिक स्वानुभवावरून शंका राहिलेली नाहीं. सर्वांस हवातितका धंदा मिळत नाहीं व ज्या थोड्यांस तो मिळतो त्यांनीं कितीही कष्ट केले तरी त्यांस पोटभर अन्न मिळत नाहीं, व एखादा दुष्काळ आला कीं लाखों लोकांस अन्न न मिळाल्यामुळें, यमलोकांस जावें लागतें, हें प्रत्यक्ष गोष्टींवरून व सरकारी दप्तरातील पुराव्यावरून निःसंशयपणें सिद्ध करून देतां येणार आहे, न तें करण्याचा आमचा इरादा आहे.

वाचाल तर चकित व्हाल !

हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा स्पष्ट कल्पना वाचकांचें ध्यानांत येण्यासाठीं आज कांहीं आंकडे द्यावे, अशी आमची इच्छा आहे. जे कोणी या आकडयाकडे नजर फेंकतील ते ते पाहून चकित झाल्यावांचुन रहाणार नाहींत, अशी आमची खातरी आहे. हिंदुस्थानच्या दारिद्र्याचे संबंधानें आम्हांस जें लिहावयाचें आहे, तें वाचकांच्या मनांत चांगल्या रीतीनें उतरण्यासाठीं, त्यांनीं हे पुढील आंकडे ध्यानांत ठेवणें फार जरूर आहे. कदाचित् हे आकडे दिल्यावर विशेष लिहाण्याची गरजही रहाणार नाहीं. कारण कोणत्याही गोष्टीचें यथास्थित आकलन होण्यास ज्या वस्तूंची आवश्यकता असते, त्या वस्तू निर्विवाद असल्या तर त्या समजाऊन देण्यांसाठीं किंवा त्यावर अवलंबून असणाऱ्या सिद्धांताचे स्वीकारण करविण्यासाठीं, विशेष खुलासा करांत बसण्याचें प्रयोजन रहात नाहीं. पश्चिमात्य यंत्रकलेचें ज्ञान हिंदू लोकांस करून दिल्यामुळें व्यापारधंद्यांत त्यांचें पाऊल प्रत्येक दिवशीं अपाऱ्यानें पुढें पडत आहे, व साधारणपणें युरोपांतील मध्यम स्थितींतल्या लोकांहून हिंदुस्थानचे लोक सुखी आहेत, असें सर रिचर्ड टेंपल सारख्या अभिमानी इंग्लिश लोकाचें वारंवार म्हणणें पडतें. अशा रीतीनें आपल्या राष्ट्राच्या परोपकारित्वाविषयीं बढाई मिरविणारे इंग्रज लोक जाणून बुजून खोटें बोलत असतील, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. कारण

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत

किं. ०८

आपल्या अनृत भाषणानें ब्रिटिश लोकांस व ब्रिटिश पार्लमेंटास हिंदुस्थानची खरी स्थिति समजली नाहीं, व त्यामुळें त्यांचेकडून प्रमाद होत जाऊन एखादे प्रसंगी इंग्लंडावर व हिंदुस्थानावर प्रचंड संकट गुदरलें, तर त्यांत उभय देशांचें मोठें नुकसान आहे, हें सर्व मुत्सद्दी इंग्लिश लोकांस चांगलें समजत आहे. तेव्हां हिंदुस्थानच्या स्थितीची जी मोहक तसवीर ते वारंवार काढतात ती ते जाणून बुजून स्वदेश बांधवांस फसविण्याच्या इराद्यानें काढतात असें नाहीं; तर विशेष बारकाईनें दुसऱ्याच्या स्थितीचें निरीक्षण करण्याची इच्छा नसल्यामुळें, व आपण केलेलीं चांगलीं कृत्यें आणि त्यापासून होणारे चांगले परिणाम यांचें फिरून फिरून कथन करून आपल्या दोषांवर व चुकांवर पांघरूण घालणें किंवा ते सहज विसरून जाणें ही सामान्य मनुष्यस्वभावाची अपरिहार्य लकब असल्यामुळें त्यांच्याकडून असलें एकदेशीय वर्तन होत असावें, असा आमचा समज आहे. पण ज्या इंडिआ पत्रांतून आम्हीं पुढील माहिती घेतली आहे, तसलीं पत्रें पुनः पुनः त्यांच्या अवलोकनांत येतील, व त्यांत नमूद केलेल्या गोष्टी निर्विवाद आहेत, अशी त्यांची खात्री होईल तर इंग्लंडांतील पाहिजे तो मुत्सद्दी, मग तो लिबरल पक्षाचा असो किंवा कान्सरव्हेटिव पक्षाचा असो, हिंदुस्थानच्या लोकांचा कैवार घेऊन आपल्या लोकांकडून होत असणाऱ्या चुका दूर करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय रहाणार नाहीं. कोणाला केवढाही राज्यलोभ असो, ज्या लोकांवर राज्य करावयाचें ते लोक संतुष्ट व सुखी असले तरच राज्य करणाऱ्या लोकांस फायदा होण्याचा व सुख लागण्याचा संभव आहे, ही गोष्ट अगदीं सामान्य मनुष्यास समजण्यासारखी आहे. तेव्हां जे इंग्लिश लोक या देशांत नोकरी करतात येतात, किंवा जे

त्यांच्या अंतःकरणांत आह्मांविषयीं परोपकारबुद्धि असो किंवा नसो, त्यांना आपला स्वार्थ नीट समजत असेल तर आमच्या बऱ्याविषयीं त्यांना कधींही उदासीन होतां येणार नाहीं. आजपर्यंत त्यांच्याकडून आमच्या कल्याणाकडे जें दुर्लक्ष झालें आहे, तें त्यांच्या नजरचुकीनें झालें आहे; त्यांना कळून वळून झालेलें नाहीं. म्हणून त्यांच्या नजरेस त्यांचे प्रमाद आणून ते दूर करण्याविषयीं त्यांची आग्रहपूर्वक प्रार्थना करणें हें आपलें कर्तव्य आहे. जर आपणच स्वसुखाविषयीं बेपर्वा झालों, किंवा नशीबावर हवाला देऊन स्वस्थ बसलों तर मग त्यांच्याकडे काय दोष आहे बरें ? आपल्या निर्धतेस आपले आपण किती कारण आहों, व आपले राज्यकर्ते किती कारण आहेत, याचा नीटपणें विचार व निश्चय करून, ज्या चुका आपल्या हातून होत असतील, त्या आपल्या आपण नाहींशा करण्यास झटलें पाहिजे, व ज्या आपल्या राज्यकर्त्यांकडून होत असतील त्या त्यांचेकडून दूर होण्यासाठीं त्यांचें मन वळविलें पाहिजे. अशा रीतीनें दोहोंकडून प्रयत्न झाल्यावर पाच पंचवीस वर्षांत आह्मांस प्राप्त झालेली अन्नान्नदशा दूर होऊन, जाडेंभरडें कां होईना, पण निदान पोटभर अन्न आह्मांस मिळूं लागेल, व एकादा दुष्काल आला असतां, मृत्युमुखांत क्षुधार्तांच्या केवळ लाखोल्याच समर्पण्याचा प्रसंग टाळतां येऊन, ज्या संख्येचें सहस्रांनींच परिमापन करतां येईल, अशा संख्येनें त्याची समजूत काढतां येण्याचा संभव आहे. पण हें सर्व करता येण्यास अगोदर आमच्या स्थितीचें आम्हांस चांगलें ज्ञान झालें पाहिजे. तें झाल्याखेरीज आमच्या हातून कांहींच होण्याची आशा नाहीं. तेव्हां ज्यांना

निबंध संग्रह.

भाग १ ला. कि. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

अशा प्रकारची माहिती मिळण्याचीं साधनें असतील त्यांनीं तीं त्यांच्याद्वारें संपादून, लोकांत तिचा होईल तितका प्रसार करण्याविषयीं झटलें पाहिजे.

पृथ्वीवरील सुधारलेल्या देशांत हिंदुस्थान देश अत्यंत गरीब आहे, याविषयीं ज्या कोणास संशय असेल त्यानें पुढील आंकड्यांचें मनन करून त्या संशयाची निवृत्ति करून टाकावी. संयुक्त राज्य म्हणजे इंग्लंड, स्कॉटलंड, व ऐर्लंड या तिहींनीं झालेल्या ब्रिटनांतील लोकांपैकीं प्रत्येक मनुष्याचें वार्षिक उत्पन्न सरासरीनें ४२० रुपये आहे; आस्ट्रेलिआंत ४३० आहे; क्यानडांत २६९ आहे; हालंडांत २६० आहे; फ्रान्सांत २५८ आहे. डेनमार्कांत २३५ आहे; बेलजिअमांत २३० आहे; जर्मनींत १८८ आहे; स्वीडनांत १७० आहे; ऑस्ट्रिआंत १६३ आहे; स्वीट्झरलंडांत १६० आहे; पोर्तुगालांत १४० आहे; स्पेनांत १३० आहे; नॉर्वेत १३० आहे; ग्रीसांत ११४ आहे; इटलींत ११३ आहे; रशियांत १०० आहे; व **हिंदुस्थानांत प्रत्येक इसमापाठीमागें वार्षिक उत्पन्न सारें २० रुपये आहे!** युरोप खंडातील संपन्न देशांशीं तुलना करतां ग्रीस, इटाली, रशिया वगैरे देश फार गरीब दिसतात: पण युरोपांतील गरीबांतला गरीब देश हिंदुस्थानापेक्षां पांचपट श्रीमंत आहे! दुसरी ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, युरोपांतील देशांच्या उत्पन्नाचा सारा भाग तेथील लोकांच्या निर्वाहाकडे किंवा सुखोपभोगाकडे लागतो. आमच्या देशांतील उत्पन्नाचा बराच भाग प्रतिवर्षी परक्या देशांत जातो, व त्याबद्दल एका कवडीचा देखील मोबदला आह्मांस मिळत नाहीं! म्हणजे या विसांपैकी १५ रुपये तरी आमच्या पोटांत जात असतील किंवा नाहीं, याचा संशय आहे!

आमचे प्रस्तुत नाना फडनवीस **सर डेव्हिड बार्बूर** यांना

असा अदमास केला आहे कीं, हिंदुस्थानांतील शेतकीचें सारें उत्पन्न बहुधा ३२,५०,००,००० रुपयें असावें, व शेकीचें एकंदर सारें उत्पन्न याच्या निमें म्हणजे १६,२५,००,००० रुपये असावें. म्हणजे ब्रिटिश अमलांतील प्रजेची संख्या वीस कोटी धरली, तर या अधिकाऱ्याच्या गणिताप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रत्येक इसमाच्या वार्षिक उत्पन्नाचा आंकडा २७ रुपयेपर्यंत येऊन ठेपतो. दादाभाई सारख्यांचें असें म्हणणें आहे कीं, तो २० पुढें जात नाहीं. दादाभाईनीं तुमची हिशेब करण्याची पद्धति दाखवा, म्हणून हिंदुस्थानसरकारची अनेक वेळां विनवणी केली, पण तिचेकडे कोण लक्ष देतो? पण नाहीं दिलें म्हणून तरी काय हरकत आहे? मारूनकुटून सर डेव्हिड सात रुपयांचीच कसर काढणार कीं नाहीं? हा सत्ताविसांचा आंकडा सरासरीचा आहे, व तो निरनिराळ्या प्रांतांचे आंकडे एकवट करून काढलेला आहे. ते आंकडे येणेंप्रमाणें आहेत:—मध्यप्रांत ३०$\frac{1}{2}$; मुंबई इलाखा ३०$\frac{1}{3}$; मद्रास इलाखा २६$\frac{1}{2}$; पंजाब २५$\frac{1}{2}$; बंगाला २२$\frac{1}{2}$; वायव्यप्रांत वगैरे २२$\frac{1}{5}$. याच प्रसंगीं वाचकांनीं दोन महत्वाच्या गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत त्या ह्या कीं, पंजाबांतील

वाक्यमीमांसा आणि वाक्यांचें पृथक्करण.

An inquiry into the nature of sentences with An Analysis of them.

कै. गो. ग. आगरकर एम. ए. कृत. विद्यार्थ्यांस अत्यंत उपयुक्त असें हें पुस्तक (३ री आवृत्ति) तयार होतांच पाठवूं. किं. ९ आणे.

मॅनेजर—इकॉनॉमिकल पब्लिशिंग ॲण्ड सेलिंग एजन्सी ७८२ सदाशिव, पुणें.

शेतकरी कुणब्यास कर्मीत कमी वर्षास २४ रुपये खर्च लागतो; व हिंदुस्थानांतील इतर उष्ण प्रदेशांतील कुणब्यास ३० रु. लागतो. हिंदुस्थानांतील इसमाची सरासरी वार्षिक प्राप्ति २७ रुपये आहे, हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां आतां सत्तावीस मिळणाऱ्या कुणब्यानें ३० किंवा २४ रुपये खर्च २७ रुपयांतून कसा करावा, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. व त्याचें एकच उत्तर आहे तें हें कीं, रोज थोडीशी भूक ठेऊन जेवावें, किंवा हातीं पडेल तसल्या कोंड्यानें किंवा पाल्यानें पोटाची खळगी भरून काढावी, आणि अजारी पडून अकालीं परलोकाचा मार्ग सुधारावा, अथवा कांहीं दिवस निर्जळ्या एकादश्या करून एकदम विष्णुलोक काबीज करावा! हिंदु लोकांवर असें करण्याचा प्रसंग येऊन गुदरल्यास बरींच वर्षें गेलीं, व त्याचे भयंकर परिणाम प्रतिवर्षीं अधिकाधिक भयंकर होऊं लागले आहेत.

अशा रीतीनें आह्मांस निस्त्राण करून सोडण्यांत आपला कांहीं एक फायदा नाहीं, ही गोष्ट साहेब लोकांच्या मनांत चुकूनच येऊन जावयाला पाहिजे होती; पण आमचे इतके हाल होऊं लागले असूनही त्यांच्या मरचराईंत अद्यापि कमतरता पडून नसल्यामुळें त्यांना सवत्र आबादानी आहे, असें वाटून हे असावें असें दिसतें. हिंदुस्थान देशांत फार अन्न लागतच नाहीं, तर असा त्यांचा समज आहे कीं काय कोण जाणे? पण ही ती अन्नाचीही गोष्ट असो. शरीरांतील रक्ताची शुद्धि आणि निरोगीपणा प्रतिदिवशीं त्यास जो मिठाचा पुरवठा होतो त्यावर अवलंबून असतो. इंग्लंडांत प्रत्येक मनुष्याला फक्त खाण्याकरितां ४० पौंड सरासरीं दर साल शेर मीठ लागतें, व शेतकीकरतां, किंवा मासे मांस वगैरे जिनसा टिकविण्याकरितां मिठाचा जो एकंदर व्यय होतो, त्याचा हिशेब केला असतां इंग्लंडांत प्रत्येक इसमाच्या मागें प्रतिवर्षीं ५० पाट मीठ खर्च होतें. आह्मां हिंदु लोक भाकभाजी खाणारे; इकट रोगगई विशेष, असें असून

प्रत्येक हिंदूच्या पाठीमागें प्रतिवर्षी १० पौंडांपेक्षां म्हणजे ५ शेरांपेक्षां या देशांत अधिक मीठ खपत नाहीं. हा प्रभाव कशाचा बरें ? सन १८०० शेंत मुंबई व मद्रास इलाख्यांत मणाला फक्त आठ आणे पडत; सध्यां २ रुपये ११ आणे पडतात ! हें मीठ तोडणें परिणामीं फार जाचणार आहे !

यांत कांहीं फायदा नाहीं.

आजपर्यंत संमतीच्या चिलाविषयीं जो वाद झाला तो जरी काय पुरेसा न होऊन त्याची द्वीपांतरीं पुरवणी काढण्याच्या कित्येकांचा विचार आहे. आमच्या मतें या प्रयत्नापासून कोणासही फायदा न होतां, हें भांडण इंग्लंडास घेऊन जाण्यांत उलट नुकसान होणार आहे. संमतीच्या चिलाच्या प्रतिरोधकांचा इच्छेकडे लक्ष न पुरवितां, सरकारानें त्याचा कायदा करण्यास टाकल्यामुळें, त्यांचीं मनें पराकाष्ठेचीं क्षुब्ध झालीं असतील, व त्यांच्या क्षुब्धावस्थेंत अमृतोपम उपदेशाचीं गोष्टही त्यांना विषतुल्य वाटणार आहे, हें आम्ही पक्कें समजून आहों; तरी ते आमचे देशबांधव आहेत; त्यांचें जें अहित तें आमचें अहित आहे; व त्यांचें हंसें झाल्यास वाईट न वाटणें अशक्य आहे, म्हणून त्यांच्या रागाची किंवा तिरस्काराची भीति न बाळगतां, हा वाद त्यांनीं इंग्लंडास नेणें कां प्रशस्त नाहीं हें थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न करतों.

संमतीच्या कायद्याचे शत्रु इंग्लंडांत जाऊन करणार तरी

प्लॉट्स पाडण्यानें देणें आहेत-फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर-हवाशीर. स्वतंत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर-व्यवस्थापक

काय ? हिंदुस्थानसरकारच्या ठरावावर सेक्रेटरी ऑफ् स्टेटकडे अपील करावें, असें त्यांच्या मनांत असेल तर तें काम येथून अर्जद्वारानें होण्यासारखें आहे. तसेंच, यासंबंधानें पार्लमेंटांत कांहीं चळवळ करावयाची असेल तर तीही येथून करतां येण्यासारखी आहे. हिंदुस्थानचा पक्ष घेऊन भांडणारे जे अनेक इंग्रजी सद्गृहस्थ आहेत, त्यांपैकीं कोणीं या कामाची, वकिली पत्करल्यास येथून त्यास माहिती पुरवली म्हणजे झालें. पण ही असली वकिली मात्र कोणी पतकरील किंवा नाहीं, याविषयीं आह्मांस मोठी शंका आहे ! इंग्लंडांत मतवैचित्र्याची कमाल होऊन गेली आहे, हें आह्मांस कबूल आहे, पण स्त्रीजातीविषयीं, तुर्कस्थानच्या लोकांशिवाय, इतर युरोपियन लोकांची व विशेषतः इंग्लिश लोकांची जी पूज्यबुद्धी आहे, ती ध्यानांत आणिली असतां, ज्याच्या मनाचे सारे व्यापार नीट चालले आहेत; असा कोणत्याही पदवीचा भला मनुष्य या अमंगल कामाचें वकीलपत्र घेईल अशी आमची मनोदेवता सांगत नाहीं. इंग्लिश लोकांची राष्ट्रीय नीति कशीही असो, व आमच्यापेक्षां ज्यांना तिची माहिती नाही ते त्या लोकांच्या येथें दिसून येणाऱ्या बाह्य वर्तनावरून त्यांच्या नीतीच्याविषयीं हवेतसे कुतर्क करोत, ऋतु प्राप्त झाला आहे म्हणून बारा वर्षांच्या आंतील वयाचे मुलाशीं तिच्या नवऱ्यानें खुशाल जावें, असें म्हणणें व उघडपणें मोठमोठ्या ठिकाणीं त्याचें मंडन करणें हें काम त्यांच्यानें या कालांत होण्यासारखें नाहीं. कारण, ज्या दृष्य आचारापासून आपण मुळापासून अलिप्त असतों, किंवा मोठ्या प्रयासानें मुक्त झालेले असतों, त्या आचाराचें मंडन करणें अत्यंत संकटावह, किंबहुना किळस आणणारें असतें ऋतु प्राप्त झाल्यावरोबर स्त्रीगमन करण्याची चाल इंग्लंडांत कधीं काळीं रूढ होती किंवा नाहीं, हें आम्हांस [illegible]. तथापि आसदया त्या चालीस चांगल्या ठरावण्याचें

कुस कोणताही समंजस इंग्लिश गृहस्थ करूं इच्छिणार नाहीं. अशी आमची खात्री आहे. तथापि " बहुरत्ना वसुंधरा " या न्यायानें हा पक्ष घेण्यासारखा एखादा गृहस्थ ब्रिटिश पार्लमेंटांत मिळण्यासारखा असल्यास येथिल लोकांनीं त्याकडे आपल्या प्रकरणाचे कागदपत्र पाठवून द्यावे, म्हणजे झालें. खुद्द जाण्या-येण्याचा खर्च व दगदग करण्यांत काय हांशील आहे ! चिलाच्या प्रतिरोधकांस हा सल्ला कदाचित मायावीपणाचा वाटणार आहे. परंतु थोड्या महिन्यांपूर्वी यासंबंधानें पार्लमेंटांत प्रश्न निघाला असतां, जी प्रश्नोत्तरें झालीं, त्यांवरून या प्रकरणांत हिंदुस्थानसरकारास सध्यांचें इंग्रजी प्रधानमंडळ अनुकूल आहे; निदान सरकारच्या निश्चयांत कोणत्याही प्रकारें हात घालण्याची खाली इच्छा नाहीं, असा लॉर्ड क्रॉस यानीं प्रधानमंडळीच्या पतीनें दिलेल्या उत्तरांचा स्पष्ट आशय होता, हें ज्यांच्या लक्षांत असेल ते तरी, आमच्या या सल्लयावर मायावीपणाचा आरोप देणार नाहींत, अशी आम्ही आशा करतों. पण यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, सेक्रेटरी ऑफ् स्टेट किंवा ब्रिटिश पार्लमेंट यांनीं आमचें अपील नामंजूर केलें म्हणून काय झालें ? यांच्या अधिकारापेक्षां अधिक अधिकार असलेलें दुसरें एक कोर्ट इंग्लंडांत आहे. त्यापुढें खटला चालवून त्या कोर्टाकडून त्याचा प्रतिकूल निकाल होईतोंपर्यंत चिलाच्या प्रतिपक्ष्यानीं हतबल होण्याची गरज नाहीं; व या कोर्टापुढें आपलें म्हणणें यथास्थितपणें मांडण्यासाठीं कांहीं लोकांनीं स्वतः जाणें अवश्य आहे. ब्रिटिश लोक मोठे सदय व न्यायी आहेत; तेव्हां अनेक हिंदूंची संमती नसतां जो कायदा हिंदुस्थान सरकारानें जबरद-

---

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

स्तीनें पसार केला, आणि तसें करण्यांत त्यांच्या धर्मांत हस्त घातला, तो कायदा पार्लमेंटाच्या द्वारें हिंदुस्थान सरकाराकडून रद्द करविण्यास ते मागें पुढें पहाणार नाहींत ! या शंकेवर आमचें एकच उत्तर आहे, तें हें कीं, ब्रिटिश पार्लमेंटाचे सभासद सुशिक्षित व समंजस असल्यामुळें, त्यांपैकीं एखादा दुसऱ्या संमतीच्या कायद्याविरुद्ध आमचें काय ह्मणणें आहे तें निदान ऐकून घेईल, किंवा आपल्या वेळाच्या घटका दोन घटका मोहून त्यासंबंधाचे कागदपत्र वाचून पाहील. पण सामान्य इंग्लिश लोक "बारा वर्षांच्या आंतील मुलीकडे जाण्याचा हक्क नवऱ्यास असावा, असें प्रतिपादण्यासाठीं अमुक अमुक गृहस्थ हिंदुस्थानाहून आले आहेत, व अमुक ठिकाणीं व्याख्यान दे[illegible] लोक आहेत" असें समजल्याबरोबर त्यांचें ते कोणत्या प्रक[illegible] स्वागत करतील, हें सांगतां येणें अशक्य आहे ! अगोदर या मंडळीचें भाषण कोणीही ऐकून घेणार नाहीं; पण मोठ्या मिनतवारीनें तें दहा पांच मिनिटें ऐकण्यांत आलें तर त्यापासून त्यांस इतका संताप उत्पन्न होईल कीं, भाषण करणारांवर ते चवताळून जाऊन त्यांस 'दे माय धरणी ठाय' असें करून सोडतील! धर्माच्या मिषानें किंवा दुसऱ्या कोणत्याही मिषानें बारा वर्षांच्या आंतील मुलीचा संभोग करण्याचा हक्क तिच्या नवऱ्यास असावा, ह्या शब्दापासून त्या लोकांच्या कानास जो त्रास होईल त्यापुढें, वैदिकांनीं प्राजापत्य करीत असतां स्त्री-पुरुषांच्या नाकपुड्यांत पाडलेल्या दूर्वांच्या थेंबांपासून होणारा त्रास कांहींच नाहीं, असें म्हणावें लागेल ! असल्या अमानुष जुलमाचें मंडन हिंगाच्या पाण्याप्रमाणें त्यांच्या कर्णरंध्रांचा आग करून सोडील, व तिच्या झटक्यानें त्यांचीं माथीं फिरून जाऊन ते आमच्या वकिलावर तुटून पडतील, अशी आह्मांस भीति आहे ! आमच्या प्रतिपक्ष्यांस आमचें हें भाकित हास्य

निराधार वाटून, जर ते इंग्लंडांस जाण्याचा हेका धरतील, तर पुढें ते पश्चात्तापांत पडतील याविषयीं आह्मांस शंका नाहीं. तथापि अशा गोष्टीविषयीं दुसऱ्यांनीं विशेष बोलण्यापेक्षां ज्याचा त्यानेंच शांतपणाचा विचार करावा हें बरें ! दुसऱ्याच्या उपदेशानें गैरसमज दूर न होतां; त्यास अधिकच पीळ पडत जातो. तथापि हा पक्ष घेऊन इंग्लंडास जाणाऱ्या लोकांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, उलट पक्ष्याचे लोक म्हणजे संमतीच्या कायद्यास अनुकूल असलेले लोक आपल्या प्रतिपक्ष्याकडून धर्मसंबंधानें किंवा दुसऱ्या कोणत्याही संबंधानें या प्रकरणा विषयीं इंग्लिश लोकांचा गैरसमज न होऊं देण्याविषयीं कांहीं तरी तजवीज केल्याशिवाय राहणार नाहींत. या कायद्याविरुद्ध खटपट करण्या-साठीं जे लोक इंग्लंडास जाण्यास तयार होतील त्यांच्याबरो-बरच किंवा त्यांच्या पाठोपाठ एखादा सुधारक तिकडे जाण्यास निघेल, हें त्यांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें. धर्माशिवाय आतां या कायद्यास विरोध करण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं; व धर्मसंबं-धानें कित्येकांनीं त्याचा जो बागुलबोवा करून ठेविला आहे तोही किती पोकळ आहे, हें आतां सर्वांच्या ध्यानांत आलें आहे. तथापि इंग्लंडासारख्या नवीन ठिकाणीं या कायद्याचे प्रति-पक्षी याच मुद्यावर सारी भिस्ती ठेवणार, हें उघड आहे. कारण इंग्लंडांसारख्या सुधारलेल्या देशांत दुसऱ्या कोणत्याही मुद्यावर असल्या घाणेरड्या हक्काचें मंडन करणें अशक्य आहे. धर्मसंबं-धानेंही त्यांचा कोटिक्रम अनेक प्रकारांनीं आजपर्यंत मोडून काढण्यांत आला आहे, व तेथें फिरून काढतां येईल; पण सध्यस्ती

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. घ. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

लोक आमच्या धर्माची फारशी मुर्वत ठेवतील असें आम्हांस वाटत नाहीं. विशेषतः उलट पक्षाकडून जेव्हां असें दाखविण्यांत येईल कीं, या प्रकरणाच्या संबंधानें धर्ममतांत व धर्माचारांत अनेक भेद आहेत, तेव्हां तर ते तुमच्या तक्रारकिडे मुळींच लक्ष देणार नाहींत. आणि त्यांनीं तें द्यावें तरी कां हें आम्हांस समजत नाहीं. हिंदुस्थानची लोकसंख्या एकंदर तीस कोटी; त्यांत सर्व प्रकारच्या ब्राह्मणांची संख्या चार किंवा पांच कोटी असेल. या संख्येंतून ज्या लोकांत मुळींच गर्भाधान करीत नाहीं, केलें तर लग्नाचे वेळीं करतात, किंवा हवें तेव्हां करतात ते वजा घाला; म्हणजे हा कायदा कोटी दीड कोटी लोकांना लागूं पडेल किंवा नाहीं याची शंका आहे. अशा रीतीनें ज्या थोड्यांस हा लागूं पडणार त्यांतील १२६ मुलींपैकीं सहा मुलींस बाराव्या वर्षांपूर्वी ऋतु प्राप्त होतो, असें दिसून आलें असल्यामुळें, हिंदुस्थानापैकीं किती थोडया लोकांच्या धर्माच्या आड हा कायदा येणार आहे, हें सहज व्यक्त होणार आहे. शिवाय, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, पहिल्या ऋतूंत गर्भाधान केलें पाहिजे, अशी स्पष्ट शास्त्राज्ञा कोठेंहीं नाहीं. कांहीं लोकांत परिपाठ मात्रा तसा आहे. पण तो परिपाठ टाकून दिल्यास धर्मोल्लंघन होईल असें नाहीं. हे सर्व विचार गरज पडल्यास इंग्लिश लोकांपुढें असल्याशिवाय रहाणार नाहींत व ते आल्यास कायद्याच्या प्रतिपक्ष्यांचा जम तेथें कसा बसेल, याचा त्यांनीं नीट विचार करून मग जें करणें असेल तें करावें. द्रव्यास व लौकिकास निष्कारण मुकण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या रीतीनें पैशाचा व श्रमाचा दुरुपयोग करण्यापेक्षां लोकोन्नतीसाठीं ज्या विशाळ कल्पना अलीकडे कित्येकांच्या मनांत घोळूं लागल्या आहेत, त्यांपैकीं एखादी खरी करून दाखविण्याचा प्रयत्न केला तर किती नामी होणार आहे ?

इंग्लिश राज्यांत पोटभर अन्न मिळत नाहीं.

हा देश ब्रिटिश लोकांनीं काबीज केल्यापासून एका गोष्टीशिवाय इतर गोष्टींत त्याला जो फायदा झाला आहे तो नाकबूल करण्याची किंवा त्याबद्दल कृतघ्न होण्याची आमची इच्छा नाहीं. तसेंच, ज्या एका अनिष्ट गोष्टीविषयीं आम्ही आपल्या सांप्रत राज्यकर्त्यांस जबाबदार धरतों, तिचा सारा वाईटपणाही त्यांच्यावर लादण्यास आम्ही तयार नाहीं. हिंदू लोक अमेरिकन किंवा यूरोपीयन लोकांप्रमाणें सुखाभिलाषी व दीर्घोद्योगी असते;एकमेकांवर विश्वास टाकून जुटीनें वागण्याची त्यांस हौस असती; द्रव्यसंपादनासाठीं हवा तो धंदा किंवा हवें तसलें धाडस करण्यास मागें पुढें पहाणारे ते नसते तर त्यांस जी आजमित्तीस अन्नान्नदशा आली आहे, ती कदाचित् येतांना. म्हणजे वारंवार हांतीं काय कीं, अतिशय वरिष्ठ लोकांचा कनिष्ठ लोकांशीं समागम झाला, मगें कनिष्ठ लोकांत जे थोडेबहुत गुण असतात तेही लयास जाऊं लागतात, व अखेरीस ते अगदींच मेषपात्र होतात, किंवा पूर्ण लयास जातात. यूरोपांतील लोकांच्या सान्निध्यामुळें अमेरिकेंतील तांबड्या इंडिअन लोकांच्या अनेक जातीं नष्ट झाल्या आहेत व होत आहेत. आमची दशा केवळ त्यांच्याप्रमाणेंच झाली नाहीं. याचें कारण येवढेंच कीं, अमेरिकेंत वसाहती करण्यास गेलेल्या यूरोपीयन लोकांत आणि

संगीत सुविचार-विजय नाटक.
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.
किं. ०८
सुधारक ऑफीस, पुणें.

ते ील मूळच्या रहिवाशांत सुधारणेच्या संबंधानें जेवढें अंतर ह ा त्याहून बरेंच कमी अंतर आह्मांत व आमच्या राज्यकर्त्यांत . हे. तथापि मानसिक व शारीरिक श्रम करून हें अंतर अधिकाधिक कमी होत जाण्याचा प्रयत्न आह्मीं केला नाहीं तर तें वाढत जाऊन अखेरीस इंडिअन लोकांप्रमाणेंच आमची ा त होण्याचा संभव आहे. पण या कामीं सरकाराकडून विशेष फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. लोकांच्या ठायीं स्वाभाविक जोम असल्याखेरीज सरकार तरी काय करणार ? वास्तविक पहातां सरकारानें कसें करावें आणि काय करावें, हें ठरविण्याचें सामर्थ्य लोकांच्या अंगीं असलें पाहिजे, तें लोकांचें लोकांनीं संपादून राखलें पाहिजे. समजा कीं, एखाद्या उदार सरकारानें आपल्या प्रजेस मेहेरबान होऊन कांहीं महत्वाचे हक्क दिले पण ते वापरण्याची योग्यता तिच्या अंगीं नसली, तर त्या हक्कापासून तिचें कल्याण न होतां, उलट ते कल्याणच होण्याचा संभव नाहीं काय ? सरकार आणि प्रजा किंवा शास्ते आणि शासित यांचा स्वाभाविकपणें परस्परांशीं विरोध असतो. कोणतेंही सरकार जुलमी असणें किंवा नसणें हें त्या सरकारच्या अमलांत असलेल्या प्रजेच्या नैसर्गिक प्रकृतीवर अवलंबून आहे. त्यांस स्वभावतः स्वातंत्र्याची किंवा सुखानुभवाची चाड असेल, ते प्रसंगाविशेषीं निरुपायास्तव कांहीं काल गुलामगिरीचा अंगीकार करतील किंवा हालांत दिवस काढतील; पण योग्य संधी सांपडल्याबरोबर आपलें स्वातंत्र्य फिरून मिळविल्याशिवाय कधींही रहावयाचे नाहींत. राजकीय हक्कांची, सुखांची, किंवा स्वातंत्र्याची 'घाल' म्हणून कोणा भीक 'घालत नाहीं.' या गोष्टी केवळ ज्याच्या त्याच्या अकलेनें व पराक्रमानेंच साध्य होण्यासारख्या आहेत. तेव्हां इंग्लिश लोकांनीं आमची संपत्ति नेली; आमच्या स्वातंत्र्याचा अपहार करून आह्मांस गुलाम करून सोडलें; आमचा सारा व्यापारधंदा

नाहींसा करून आह्मांस कंगालता आणिली; आह्मांवर नाना प्रहेचे कर बसवून व हजारों युरोपीयन लोकांस मोठमोठ्या जागा देऊन आह्मांस पोटभर अन्नाला महाग करून सोडले—अशा प्रकारची रड गात बसल्यापासून फारसा फायदा होईल असें आह्मांस वाटत नाहीं. इंग्लिश लोक मोठे दयाळू आहेत व अलीकडे दुसऱ्याच्या कल्याणाकडे लक्ष देण्याची बुद्धि अत्यंत सुधारलेल्या देशांत बरीच फैलावत चालली आहे, त्यांमुळें किंवा दूरदर्शी स्वार्थामुळें आमच्या सरकारच्या हातून आमच्या फायद्याच्या कांहीं गोष्टी होण्याचा संभव आहे; मुळींच नाहीं, असें नाहीं. पण ते कितीही उदार झाले तरी त्यांची संख्या फारच स्वल्प पाहिजे. हातींपायीं पडून जेवढें चांगलें करून घेतां येण्यासारखें असेल तेवढें तर करून घ्यावेंच. पण फारच थोडें असणार आहे, हें ध्यानांत ठेवून. त्याशिवाय दीर्घोद्योगादि स्वोन्नत्तीचीं जीं प्रशस्त साधनें आहेत, त्यांचा अंगीकार करून त्यांच्या साहाय्यानें आपला इष्ट हेतु साधण्याचा प्रयत्न करणें हेंच खास यशाचें चिन्ह नव्हे काय? याशिवाय राणें या विषयाविषयीं आमचें मत असल्यामुळें, अशा प्रकारच्या लेखांत सरकारचे जे दोष दाखविण्यांत येतात ते त्यांच्या नजरेस येऊन त्यांनीं ते दूर करावे, हा एक हेतु असतोच; पण मुख्य हेतु तो नाहीं. लोकांच्या नजरेस ते दोष पडून, त्यांनीं आपल्या विपत्तीचीं खरीं कारणें समजावीं, आणि तीं दूर करून सुखी होण्याची इच्छा उत्पन्न व्हावी, हा त्यांचा मुख्य

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ७

लाव्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

हेतु आहे. "सांगितलेली बुद्धि आणि पदरीं बांधलेली शिदोरी कोठवर पुरणार ?" अशी आपल्या मार्गेंत म्हण आहे, ती [redacted] वावगी नाहीं. सरकारच्या कृपाळूपणापासून, न्याय्यतेपासून, किंवा सारासार विचारापासून, आम्हांस मिळणाऱ्या हक्कांचा, व त्यांपासून होणाऱ्या सुखांचा, परिघ अत्यंत मर्यादित आहे. तेव्हां हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयीं जें आजपर्यंत लिहिण्यांत आलें आहे, व पुढें येईल, त्याविषयीं आमच्या वाचकांनीं असें समजावें की, तसें करण्यांत आमच्या राज्यकर्त्यांस दोष दाखविण्यापेक्षां, किंवा त्यांच्यापुढें झोळी पसरून त्यांत एखादा तुकडा टाकण्याबद्दल त्यांची प्रार्थना करण्यापेक्षां, लोकांस आमच्या स्थितीचें खरें ज्ञान होऊन, ती सुधारण्याविषयीं उत्साह उत्पन्न व्हावा, हा आमचा प्रधान हेतु होता, आहे, व असेल. तेव्हां आज जी थोडीबहुत माहिती देणार आहों, तीं रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेवून, ज्यानें त्यानें आपापल्या शक्तीप्रमाणें देशाच्या दारिद्र्यहननासाठीं होईल तेवढे परिश्रम करण्यास प्रवृत्त व्हावें, अशी विनंती आहे.

इंग्लंडांतील प्रत्येक मनुष्याच्या पाठीमागें जें सरासरीचें वार्षिक उत्पन्न पडतें, त्यांतून त्याचा वार्षिक खर्च वजा केला असतां, त्याचेपाशीं सुमारें ४२ रुपये फाजील किंवा शिलक राहतात. या शिलकेतून त्यास चैन करतां येते, किंवा अडचणीच्या प्रसंगासाठीं ती राखून ठेवतां येते. हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति अगदीं निराळ्या तऱ्हेची आहे. आमचे फिनॅन्स मिनिस्टर अथवा फडनवीस **सर डेव्हिड वार्वर** यांच्या हिशेबाप्रमाणें या देशांतील प्रत्येक इसमाच्या पाठीमागें सरासरी वार्षिक उत्पन्न २७ रुपये पडतें, व त्याच्या खर्चास कमींत कमी प्रतिवर्षी ३० रुपये लागतात. म्हणजे केवळ प्राणरक्षण करण्यास जितक्या पैशाची त्यास अवश्यकता आहे तितके पैसेही त्यास

मिळत नाहींत. त्यांत तीन रुपयांची तूट पडते! मि. दादाभाई नवरोजी त्यांचें असें म्हणणें आहे कीं, सरकारी तुरुंगांतील कैद्यास प्रतिवर्षी सरासरीनें जितका खर्च लागतो, तितका हिंदुस्थानांतील प्रत्येक इसमाच्या पाठीमागें धरला, तरी देखील त्याचेपाशीं दीडदोन रुपये शिल्लक रहातील किंवा नाहीं, याची शंका आहे. साऱ्या गोष्टींचा विचार करतां असें दिसून येतें कीं, हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्याच्या पाठीमागें सरासरीनें सुमारें २ रुपयाचें उणें उत्पन्न आहे! उत्पन्नाच्या किंवा प्राप्तीच्या अशा स्थितींत हिंदू लोक जगतात तरी कसे, असा प्रश्न आहे. या खेदजनक प्रश्नाचें समर्पक व समाधानकारक उत्तर पुढील आकड्यावरून वाचकांचें वाचकांस देतां येईल. परवां झालेल्या मनुष्यगणतीचे आंकडे अद्यापि बाहेर पडले नाहींत. म्हणून १८८१ त केलेल्या मनुष्यगणतीचाच आधार घेऊन चालूं. या मोजणींत प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, इंग्लंडांतील मनुष्य सरासरीनें ३९·९१ वर्षें जगतो. व हिंदू २३·५ वर्षें जगतो! हे आंकडे पाहिल्यावर आमच्या ऋणग्रस्तीवर आम्ही कसे राहतों, या प्रश्नाचें उत्तर देण्यास कोणास कठिण पडेल काय? चरें, हीं तेवीस वर्षें तरी आम्ही सुखानें घालवतों काय? सुखाचें नांव कशाला? कोणाला पोटभर अन्न आहे, तर दुंगणाला चिरगुट नाहीं; कोणाला चिरगुट आहे, तर आश्रयाला खोपट नाहीं. याप्रमाणें बहुतेक लोकांची

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, रुत किं. १ रुपाया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

प्राणयात्रा अत्यंत संकटावह झाली आहे. बहुतेक प्रांतांत मेघ-राजाची किंचित् वक्रदृष्टि झाली कीं, लहानापासून थोरांचीं व श्रीमंतांपासून गरीबांचीं धाबीं गडबडून जातात ! काय ही आमची दशा ! पृथ्वीतील साऱ्या लोकसंख्येचा सहावा भाग या देशांत रहातो; येथील जमीन सुपीक; येथें सर्व प्रकारच्या हवा; व्यापाराचीं जहाजें चालण्याजोग्या येथें मोठमोठ्या नद्या; येथील रानां-त व डोंगरांत सांपडणार नाहीं अशा एका झाडाचें नांव घेण्याची मुष्कील; बहुतेक धातूंचा हवा तेवढा पुरवठा; तीन हजार वर्षांची आमची पुरातन सुधारणा; युरोपांतील राष्ट्रें अज्ञानातिमिरांत घोरत पडलीं असतां, नानाप्रकारच्या विद्यांत व कलांत आमच्या आह्मीं संपादिलेल्या प्राविण्यामुळें सर्व पृथ्वीवर अद्यापि गाजत असणारा आमचा लौकिक—अशा प्रकारचे आह्मी हिंदू लोक असून, आज आह्मांस दुपारची नड कशी भागवावी, अशी प्रतिदिवशीं पंचाईत पडावी काय ? पंचवीस मनुष्यजंतूंपैकीं प्रत्येकास एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, वर्षेंच्या वर्षे अर्धपोटीं दुसऱ्या दिवसाची चिंता करीत व झोंपेची प्रार्थना करीत, रात्रीच्या प्रहरीं जमिनीवर आंग टाकण्याचा प्रसंग यावा, आणि शरीरांत व मनांत उत्साहाचें पुनरुज्जीवन न होतां, आंथरूण सोडून हात पाय ओढींत रोज सकाळीं फिरून उद्योगास लागणें भाग पडावें, हें किती शोचनीय आहे बरें ? रात्रंदिवस दुष्काळाची धास्ती; अनेक प्रकारच्या रोगांनीं विशेषतः अपुऱ्या अन्नामुळें, वस्त्रामुळें, व रहाण्याच्या घाण जागेमुळें, उत्पन्न होणाऱ्या तापानें ज्याच्या त्याच्या घरांत दृष्टीस पडणारी विपत्ति; गाल बसलेले, डोळे खोल गेलेले, साऱ्या अंगास पळ्या पडलेले, सारांश, भुकेनें सर्व प्रकारें गांजून आयुष्यास कंटाळलेल्या लोकांचे गांवोगांवीं व शहरोशहरीं दिसणारे थवे—हें पाहून अशा नीतिमान्, ज्ञानवान्, व दयावान् राज्य-

कत्यांविषयीं स्वाभाविकपणें जितकी पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी तितकी होणें शक्य आहे काय ?

हिंदुस्थानांतील अन्नान्नदशेचे दुष्परिणाम.

मागल्या अंकांत आह्मांस " इंग्रजी राज्यांत पोटभर अन्न मिळत नाहीं, " या सदराखालीं तें मिळण्याचीं कारणें दाखवून त्यापासून उत्पन्न होणारा एक परिणाम सांगितला आहे. इंग्लिश लोकांस पोटभर अन्न, अंगभर वस्त्र, व रहावयास चांगलीं घरें मिळत असल्यामुळें, आणि त्यांवर दुष्काळाचा किंवा महर्गतेचा प्रसंग आल्यास, त्यांतून त्यांस जवळ असलेल्या शिलकेच्या साहाय्यानें सहज निभावून जातां येत असल्यामुळें इंग्लंडांतील गचाळ हवेंत त्यांच्या प्रकृतीचें उत्तम रीतीनें रक्षण होऊन तें सरासर्‍यानें ४० वर्षें जगतात, व आमचा देश सुपीक असून आम्हांस पोटभर अन्न, अगदीं जरूरीचें वस्त्र, व ऊन, वारा आणि पाऊस ह्यांच्यापासून संरक्षण होण्यासारखीं घरें रहाण्यास मिळत नसल्यामुळें, व दुष्काळ पडल्यास त्यांतून पार पाडण्याजोगी शिल्लक आमच्यापाशीं बहुधा होत नसल्यामुळें, आह्मी सरासरीनें २३ वर्षें जगतों, ह्मणजे इंग्लिश लोकांपेक्षां १७ वर्षांनीं आमचें आयुष्य कमी आहे व त्या मानानें आमच्या हातून उद्योगधंदा कमी होऊन संपत्त्युत्पादनही कमी होतें, हें सिद्ध

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.
प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८
सुधारक ऑफीस,

लें. इंग्लिश लोकांच्या आयुष्यापेक्षां आमचें आयुष्य कमी ग्यास येथील दुष्काळ तर कारण आहेतच; पण त्यांहीपेक्षां त्याच्या उपासमारीपासून आमच्या प्रकृतीवर जे परिणाम तात ते होत. पोटभर अन्न न मिळाल्यामुळें प्रकृतींत क्षीणता , व क्षीण प्रकृतींत रोग सहज जडतात. अन्नाच्या व वस्त्रा- ा कमताईमुळें हिंदुस्थानांतील किती लोक प्रतिवर्षी तापानें तात, याची वाचकांस कल्पना देखील नसेल. कांहीं प्रांतांत हजारास सोळा किंवा अठरा मनुष्यें तापास बळी पडतात ! ७७,७८,७९ हीं तीन दुष्काळाचीं वर्षें होतीं. व १८८६।८७। हीं सालें एकंदरीनें आबादानीचीं होतीं. परंतु चमत्कार हा , साऱ्या हिंदुस्थानांत पहिल्या तीन वर्षांत एकंदर जितकीं गसें मेलीं, त्यांहून दुसऱ्या तीन वर्षांत अधिक मेलीं ! ' ८४, ६१९; ५१, ६३, ९९६, ४९, ७०, ००८ एकूण ४३.१८,७१३ हा पहिल्या तीन वर्षांतील मृत्यूंचा आंकडा होता. ऱ्या तीन वर्षांपैकीं पहिल्या वर्षांत म्हणजे १८८६त ,१६, ८७७ माणसें मेलीं; १८८७ त ५५,०८४'१४ मेलीं; ८८त ५०,४७, १२८ मेलीं. एकूण १,५५,१२,४६९. म्हणजे ं कीं, तीन वर्षें दिसण्यांत सुबत्तेचीं होतीं त्यांत दुष्काळाच्या वर्षांपेक्षां ५,९३७६६ मनुष्यें अधिक मेलीं! हा विलक्षण प्रकार न ज्याच्या मनांस आश्चर्य व खेद वाटणार नाहीं, असा ा आहे ? सुबत्तेच्या वर्षांत दुष्काळाच्या वर्षांपेक्षां अधिक यें कां मरतात ? या प्रश्नाचें उत्तर येवढेंच आहे कीं, दुष्का- ा ज्यांना अन्न मिळत नाहीं, तीं नाहींशीं होऊन गेलीं म्हणजे चे बरोबरच रोगाचें बीजही निघून जातें; व जीं मागें रहा- , तीं धष्टीकट्टीं असल्यामुळें बरींच टिकतात; सुबत्तेच्या वर्षांत होत नाहीं. सर्वांस थोडे थोडें अन्न मिळत असल्यामुळें ळ उपासमारीनें मृत्युसंख्या फार होत नाहीं हें जरी खरें , तरी बहुतेक लोक जरत्कारू होऊन गेले असल्यामुळें

तापादि रोग्यांच्या सांथींनीं ते जर्जर होऊन जातात, आणि एकंदरींत दुष्काळांच्या वर्षांपेक्षां सुवत्तेच्या वर्षांतच मृत्युसंख्या अधिक होते. उदाहरणार्थ पहिल्या तीन वर्षांत व दुसऱ्या तीन वर्षांत तापानें मेलेल्या मनुष्यांच्या संख्येकडे पहा. पहिल्या तीन वर्षांत ९३, ३१, ४३४ माणसें तापानें मेलीं, व दुसऱ्या तीन वर्षांत, १,०४,३९,२५५ मेलीं. म्हणजे पहिल्या तीन वर्षांपेक्षां दुसऱ्या तीन वर्षांत १०, ९८, ४२१, माणसें यासंबंधानें अधिक मेलीं. याचप्रमाणें इतर सांथींचाही परिणाम घडतो. तेव्हां दुष्काळाच्या वर्षांपेक्षां सुवत्तेच्या वर्षांत मृत्युसंख्या अधिक का होते, हें वाचकांच्या ध्यानांत सहज येणार आहे.

हिंदू लोकांस ब्रिटिश अंमलापासून जीं अनेक सुखें प्राप्त झालीं आहेत, व ज्यांचद्दल आपली आपण प्रशंसा करून घेण्याचा इंग्लिश लोकांस कधींही कंटाळा येत नाहीं, त्यांत त्यांनीं या देशांत सतत चालणाऱ्या लढाया बंद करून, त्यांच्या जागीं सर्व देशभर स्थापिलेल्या स्थाईक शांतीचा वारंवार उल्लेख करण्यांत येतो. लढाईपासून होणारा त्रास आणि नुकसान, व शांततेपासून होणारें सुख व फायदा हीं कोणाही मनुष्यास कबुल केलीं पाहिजेत. पण सर्वच स्थितींत किंवा सर्व कालीं लढाई अहितकारक आणि शांतता कल्याणप्रद असेल, असें कोणाच्यानेंही निश्चून म्हणवणार नाहीं. देशी राजांच्या कारकीर्दीत किंवा मराठ्यांच्या अंमलांत सर्व हिंदुस्थानभर दंगेधोपे होत असत, लढाया चालत असत, व मारामाऱ्या होत असत,

---

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ०५

खेडकरबंधु अॅन्ड सन्स शनवार पेठ. पुणें.

खरें आहे. पण या सर्वांपासून जेवढी प्राणहानि किंवा वित्त-
लेश होत असे, त्याहून सांप्रतच्या शांत अंमलांत आधिक
प्राणहानि व अधिक वित्तनाश होत आहे, हें इंग्लिश दप्तरांतील
त्या सरी कागदपत्रांच्या आधारानें सिद्ध करून देतां येण्या-
इत रखें आहे. इंग्लिश राज्यामुळें अखेरीस आमचें काय हित होईल
ते, सांगतां येणें कठिण आहे. तसेंच, सध्यां आह्मांस ते लोक जें
या द्यामृत पाजीत आहेत, व आमच्या राजकीय विचारांस व
र्तनास जें वळण लावीत आहेत, त्याची काय किमत करावी
ेण जाणे. येवढें मात्र खरें आहे कीं, सूक्ष्म दृष्टीनें विचार
रतां त्यांच्या अंमलांपासून शरीरसुखास अत्यंत अवश्य जें
ोटभर अन्न तें आह्मांस त्यांच्या राज्यांत मिळत नाहीं, आणि
या अन्नाभावामुळें घडून येणारे जे लाखों मृत्यु त्यांपासून
यांस आमचा बचाव करतां येत नाहीं. १७९३ पासून १८९०
र्यंत युरोपखंडांत एकसारख्या लढाया होत होत्या. या लढायांत
स्कंदर ४५,००,००० पंचेचाळीस लक्ष लोक पडले असावेत,
असा अजमास केला आहे. ह्मणजे या सत्याण्णव वर्षांपैकीं
त्येक वर्षीं सुमारें पन्नास हजार मनुष्यें धारातीर्थीं पडलीं. हा
चंड आंकडा पाहून कोणाच्याही अंगावर कांटा उभा राहणार
आहे, व युरोपांतील लोकांस सुधारलेले ख्रिस्ती लोक म्हणावे,
कीं रानटी म्लेंच्छ ह्मणावें, अशी शंका येणार आहे. तथापि जर
कोणी हिंदुस्थानांतील मृत्युसंख्येचा विचार करील तर त्याला
ती याहूनही भयप्रद दिसून येईल, याविषयीं आह्मांस बिलकुल
संशय नाहीं. १८८० साल हिंदुस्थानास सर्व प्रकारें बरें गेलें,
असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या वर्षीं कोणत्याही कारणानें
विशेष माणसें मेलीं नाहींत. तेव्हां हें वर्ष आधारभूत धरून, या
वर्षापासून पुढल्या आठवर्षांचा विचार केला तर असें दिसून
येईल कीं, १८८०-१८८८ यांच्या दरम्यान फक्त तापा-

च्या सांथींनीं ४३,४९,९२२ माणसें जाफा मेलीं. " जाफा मेलीं " याचा अर्थ येवढाच कीं, १८८० हें चांगलें वर्ष मोनून त्यांत जितकीं माणसें तापानें मेलीं तितकीं प्रतिवर्षीं मराव्याचींच, अशी कल्पना करून त्यांच्या आठपटीयेवढा आंकडा, वरील ४३, ४९, ९२२ हा आंकडा काढतांना तापानें मेलेल्या साऱ्या माणसांच्या आंकड्यांतून वजा केला आहे. अशा रीतीनें हा आंकडा काढण्याचें कारण येवढेंच कीं, ज्याप्रमाणें 'लढाई' हें मृत्युसंख्या वाढविणारें आगंतुक कारण आहे, त्याप्रमाणें तापाच्या भलभलत्या सांथी उद्भवून, त्यांमुळें नित्याहून फाजील माणसें मेलीं, तर त्या सांथींस आगंतुक कारणें मानण्यास हरकत नाहीं. तात्पर्य, **संग्रामरूप आगंतुक कारणानें युरोपखंडांत सत्त्याण्णव वर्षांत जितकीं मनुष्यें मेलीं तितकीं या हतभाग्य हिंदुस्थान देशांत** फक्त आठवर्षांच्या आंत तापाच्या आगंतुक सांथींस चळी पडलीं! आठ वर्षांत ४३,४९,९२२ माणसें आगंतुक तापांनीं मरणें म्हणजे प्रतिवर्षीं ५,४३,७४० माणसें मरणें होय. युरोपांत लढाईमुळें गेल्या सत्त्याण्णव वर्षांपैकीं प्रत्येक वर्षीं सुमारें ५०,००० मनुष्यें मेलीं, हें वर दाखविलेंच आहे. या संख्येनें तिच्या मागल्या संख्येस भागिलें असतां; दशांश किंवा अकराचा भाग लागेल. या भागावरून काय उघड होतें कीं, गेल्या सत्त्याण्णव वर्षांपैकीं कोणत्याही एका वर्षीं लढाईनें युरोपांत जितकी प्राणहानि केली, तिच्या दहापट किंवा अकरापट प्राणहानि १८८०-१८८८ यांच्या दरम्यान प्रत्येक

निबंधसंग्रह.

भाग १ ला. किं. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

वर्षी येथें झाली! हे आंकडे जर निर्विवाद असतील, आणि ते निर्विवाद आहेत याविषयीं कोणासही शंका घेतां येणार नाहीं, कारण ते पार्लमेंटरी **ब्ल्यू बुकांतून** (ह्मणजे पार्लमेंटाच्या हुकुमावरून जे सरकारी कागद निळा पुट्ठा किंवा निळें मलपृष्ठ घालून लोकोपयोगासाठीं छापण्यांत येतात, त्यांतून) घेतलेले आहेत, तर सध्यांचा शांततेचा अंमल बरा आहे, किंवा पहिला इंग्याधोप्याचा व मारामाऱ्यांचा अंमल बरा होता, याचा निश्चय करणें कठिण आहे. अन्न, वस्त्र आणि आच्छादन हीं तीन, व कोणत्याही आगंतुक कारणापासून होणारी लोकसंख्येची हानि यांनीं कोणत्याही राज्याचा चांगुलपणा किंवा वाईटपणा ठरवायाचा असेल, तर ब्रिटिश राज्याचा कैवार घेऊन भांडणाऱ्या खुद्द ब्रिटनांसमुद्धां यासंबंधानें एतद्देशीय राज्यें ब्रिटिश राज्यापेक्षां हिंदू लोकांस अधिक हितकारक होतीं, व झालीं पाहिजेत, असें कबूल करणें भाग पडेल.

यांना कोणी विचारता नाहीं काय ?

(जी. आय्. पी. आर. व एस्. एम्. आर.)

पूर्वी **नामदार कंपनी** हिंदुस्थानचें राज्य करीत होती, तेव्हां तिच्या व्यवस्थेवर देखरेख करण्याकरितां इंग्लंडांत बोर्ड ऑफ कंट्रोल असून, एक कौल संपला कीं दुसरा कौल करतांना कंपनीनें आपला अंमल कसा चालविला, याबद्दल पार्लमेंटसभेंत वादाघात होत असे, व त्या वादाघातींत कंपनीचे जे दोष दिसून येतील ते दूर करण्याविषयीं कंपनीस सक्त ताकीद मिळत असे. शिवाय कंपनीच्या नोकरांनीं फारच बेबंदशाही केली असल्यास,

पार्लमेंटपुढें त्यांची चौकशी होत असे. **लॉर्ड क्लाइव्ह व वॉरेन हॅस्टिंग्स** यांच्यावर जे खटले झाले, ते याच कारणामुळें झाले पण महाराणीसाहेबांनीं या देशाचीं राज्यसूत्रें खुद्द आपल्या हातीं घेतल्यापासून, साराच मनु फिरल्यासारखा झाला आहे. १८५७ पासून आतांपर्यंत हिंदुस्थानचे राज्य कसें चाललें आहे, याबद्दल म्हणण्यासारखी चौकशी झाली नाहीं इतकेंच नाहीं, तर अफगाणिस्थानाशीं निष्कारण लढाई उपस्थित करून, कोट्यावधि रुपयांचा व लाखो प्राणांचा होम केला, किंवा ज्यांनीं हतभाग्य **थीबास** कैद करून, ब्रह्मी लोकांस गुलाम केलें, आणि अगोदरच आहाराबाहेर गेलेल्या राज्यविस्ताराचा विस्तार आणखी वाढवून, हिंदुस्थानचा अंमल हरएक प्रकारें अधिक संकटावह केला, अशांच्या कृत्याविरुद्ध कोणी एक ब्र देखील काढिला नाहीं ! मग त्यांना क्लाईव्ह किंवा हेस्टिंग्स यांप्रमाणें अपराधी समजून पार्लमेंटपुढें त्यांची चौकशी करण्याची वार्ता कशाला पाहिजे ! आणि अलीकडे असें होऊं लागलें आहे, हें रास्तच आहे. हिंदुस्थान सरकार जें विशेष जबाबदारीचें काम करतें तें सेक्रेटरी ऑफ् स्टेटच्या सल्ल्यानें करतें; सेक्रेटरी ऑफ् स्टेट जो सल्ला देतो, तो अधिकारारूढ मंत्रिमंडळाच्या इच्छेप्रमाणें देतो, आणि त्यानें तसें करावें हें नीटच आहे, कारण त्या मंडळापैकींच तो एक असतो; तेव्हां इकडे ज्या ज्या मोठ्या घडामोडी होतात, त्या इंग्लिश प्रधानमंडळाकडूनच होतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या प्रधानमंडळाच्या कृत्यांवर पार्लमेंटाची देखरेख आहे.

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकेंच साप्ताहिक. व. ट. हं. सह १४१३

मॅनेजर, सुधारक पुणें सिटी.

पण अलीकडे ब्रिटिश पार्लमेंट या अधिकाराचा जसा उपयोग कराव्या तसा करीत नाहीं. ज्या प्रधानांच्या हातून विशेष दोष देण्यासारखीं कामें होत, त्यांच्यांवर पूर्वी पार्लमेंट खटले करून त्यांना शिक्षा देत असे. अलीकडे बऱ्याच वर्षांत पार्लमेंटानें तसें करण्याचें धैर्य दाखविलें नाहीं. पार्लमेंटास व लोकांस अंमल रुचत नाहीं, असें दिसून आल्याबरोबर अधिकारारूढ प्रधानमंडळी आपल्या कामाचा राजीनामा देते, आणि येथेंच बहुधा हें तंट्याचें प्रकरण मिटतें. पुढील प्रधानमंडळी मागल्या मंडळीस हवा तितका तोंडीं दोष देत. पण त्यापैकीं कोणावरही खटला करण्याची छाती त्यांस होत नाहीं. कारण पुढें आपणावरही तोच प्रसंग येण्याचा संभव आहे, अशी त्यांस भीति वाटत असते ! आज या साऱ्या गोष्टी येथें सुचण्यास, आमच्या रेलवे कंपन्यांतील व्यवस्थेबिषयीं किंवा अव्यवस्थेविषयीं मनांत आलेला विचार कारण झाला. इतर इलाख्यांतील रेलवे कंपन्याविषयीं आम्हांस फारशी माहिती नाहीं, म्हणून त्याविषयी आम्ही कांहीं लिहूं इच्छित नाहीं. व तसें करण्याचें आम्हांस प्रयोजनही नाहीं.ज्यांचा या कंपन्यांशीं प्रत्यक्ष संबंध असेल,व त्यांतील अव्यवस्थेमुळें ज्याचें नुकसान होत असेल,त्यांनीं त्याविषयीं तक्रार करावी, हेंच योग्य आहे. तसेंच, या इलाख्यांतील रेलवे कंपन्यांपैकीं **बि. बि. सी. आय्**शींही आम्हां दक्षणी लोकांचा विशेष संबंध नाहीं. शिवाय, या कंपनींची व्यवस्थाही बरी आहे, असें सांगतात. तेव्हां आम्ही जें लिहिणार आहों, तें या इलाख्यांतील जी बडी कंपनी **जी. आय्. पी. आर** आणि तिचेंच चारपांच वर्षांचें धाकटें भावंड **एस्. एम्. आर.** यांस उद्देशून आहे.

या दोन आगगाडयांमुळें या इलाख्यांतील व्यापारास जो फायदा झाला आहे व प्रवास करण्याची जी सोय झाली आहे, ती नाकबूल करण्याची आमची इच्छा नाहीं. तसेंच, मोठमोठे

कारखाने निघून व्यापार वाढत चालला, व कामाधामाच्या
निमित्तानें, व दुसऱ्या अनेक कारणांनीं, निरनिराळ्या जातींचे
व पदवींचे लोक एकत्र येऊं लागलें ह्मणजे अप्रत्यक्ष रीतीनें
ज्या सामाजिक सुधारणा सहज होत जातात, व जे सुशिक्षण
मिळतें तेही या गाडग्यांच्या खात्यांस रूजु धरण्यासें आह्मी
नाखुष आहों, असें नाहीं. अशा प्रकारच्या गोष्टींपासून अनेक
फायदे होतात, हें आह्मी कबूल करतों, पण हें कबूल केलें
ह्मणून कोणासही असें म्हणतां येणार नाहीं कीं, यांतील दो
किंवा अडचणी दाखवून त्या दूर करण्याचा प्रयत्न करूं नये
येवढें खरें आहे कीं, उत्तर हिंदुस्थानांतील कित्येक आगगाडयां
जी अंदाधुंदी आहे ह्मणून सांगतात तसली अंदाधुं
या दोनही कंपन्यांच्या कारखान्यांत ना
काशीकडे जाऊन आलेल्या कोणत्या पाहिजे त्या गृहस्था
दोन घटका बोला, तो तिकडील आगगाडयांची थोडीच
नाचक्की केल्यावांचून रहाणार नाहीं. आह्मी यासंबंधानें शेक
लोकांशीं बोललों आहों व त्या सर्वांच्या बोलण्यांत एक मे
गोष्ट आमच्या नजरेस आली ती ही कीं, तिकडील कंपन्य
बहुतेक नोकर लोक जबरदस्त पैसे खाऊ आहेत. गाडी
माल धाडावयाचा असो; कीं तिकीट काढावयाचे असो;
पार्सल पाठवावयाचें असो; वा बरोबरचें ओझें तोलाव
असो; त्या त्या कामाच्या मनुष्यास थोडीबहुत चिर्‍
दिल्याशिवाय ते नीट रीतीनें व झटदिशीं शेवटास जावय

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार ची मिक्श्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर

ल्लीं ! यासंबंधानें के. रा. मा. मंडलिक यांस देखील निकडीच्या
का स्टेशनावर त्रास पडून, त्यांना दक्षिणा ब्राह्मणांचे उग्र
रूप त्या बाबू लोकांच्या प्रत्ययास आणून देण्याचा प्रसंग
ाला होता. रावसाहेब लोकांशीं व्यवहार करतांना वेळेची
वढी प्रतिष्ठा ठेवीत असत, हें अद्यापी लोकांच्या स्मरणांतून
ळें नसेल. यासंबंधानें त्यांच्या अनेक मनोरम आख्यायिका
हित. पैकीं एकीचा सांप्रत विषयाशीं संबंध असल्यामुळें तीं
डक्यांत सांगतों. इकडील थाटाप्रमाणें तिकडेही एकेदिवशीं
डी स्टेशनावर येण्याच्या अगोदर सुमारें पंधरा मिनिटें रावसा-
ची गाडी स्टेशनाच्या फाटकाशीं येऊन दाखल झाली. फाटक
च्या गडयानें गाडींत नेटिव आहे असें पहातांच तें चटदिशीं
ऊन घेतलें. रावसाहेब कांहीं एक भाषण न करितां, आपल्या
याळाकडे पहात स्वस्थ बसले. इतक्यांत एका गोऱ्याची
ी आली, त्यासरशीं फाटकवाल्यानें दार उघडून रस्ता
ा कहून दिला, व गोऱ्याच्या कोचमिनानें स्टेशनाच्या
ंउंडांत गाडी हांकली. हा प्रकार रावसाहेबांच्या नजरेस
च, त्यांनींही आपली गाडी फाटकाच्या आंत नेण्याविषयीं
चमिनास हुकून दिला. रावसाहेबांचा हुकूम होतांच कोच-
नानें फाटकांत गाडी घातली. तो फाटकवाला फिरून आडवा
ग ला. ही लबाडी पाहिल्याबरोबर रावसाहबांचे पित्त इतकें
पळून गेलें कीं, त्यांनीं आपल्या कोचमिनास सांगून त्या
फाटकवाल्याच्या अंगावर सुमारें पंचवीस कोरडे ओढविले,
ण बरोबर असलेल्या शिपायाकडून त्यास गचांड्या देऊन
ायद्यांतून एकीकडे करविलें, आणि गाडी कंपाउंडांत आणून
ल उद्योगास लागले ! इकडे त्या मारखाऊ फाटकवाल्यानें
न पळत जाऊन स्टेशनच्या मास्तरापाशीं झालेल्या आगळि-
ा रडकथा बराच निखरमीठ लावून सांगितली. ती ऐकून

घेतांच दोन पैसे मिळविण्याचा हा प्रसंग आहे, असें बहुधा मनांत मानून आंतल्या आंत आनंदित झालेला व रेलवेचा नोकर आपलें कर्तव्य बजावीत असतां, त्याला मारहाण करण्यास प्रवृत्त झालेल्या मनुष्यावर खटला करून त्याचा चांगलाच समाचार घेतला पाहिजे असें तोंडानें पुटपुटत व मोठ्या आवेशाचा आविर्भाव करीत, एक तेलकट काळ्या रंगाचा लट्ठ बाबू, " कोण आहे तो मारामारी करणारा मनुष्य " अशी चौकशी करीत बुकिंग हापिसांत येऊन दाखल झाला ! रावसाहेब फर्स्ट क्लास वेटिंग रूममध्यें जाऊन स्वस्थ बसले होते. व त्यांचा मनुष्य प्लॅटफॉर्मवर त्यांचा बोजा सांभाळीत उभा होता त्या मनुष्यास पहातांच मारखाऊ फाटकवाल्यानें स्टेशनमास्तरास असें सांगितलें कीं, " ज्यानें मला धक्के दिले तो हाच मनुष्य " हें ऐकतांच स्टेशनमास्तरास आतां आपली शिकार साधणार, असें वाटून ते थोडया सपाट्यानें चार पावलें टाकून त्यापाशीं येऊन दाखल झाले, व त्याला दटावणी देऊन बोलण्यास सुरवात करणार तों मास्तरसाहेबांच्या सुदैवानें त्यांची नजर बोजावरील चिठ्ठ्यांकडे गेली. त्यांपैकीं एका चिठ्ठीवरील नांव व हुद्दा वाचतांच, मास्तरसाहेबांची गाळण उडाली त्यांनीं हापिसाकडे ताबडतोब आपला मोर्चा फिरविला, व त्या लाचखाऊ फाटकवाल्याचीच चांगली भोसडपट्टी काढली ! हा **इंडिअन रेलवेंतील मिस्टरी** पाहून वाचकांस कदाचित् मोठा आचंबा वाटणार आहे. पण जर ते रा. सा. मंडलिकांचा सर्वत्र प्रसिद्ध लौकिक, निस्पृहता, पदरीं आपल्या कोणत्याही प्रकारचा दोष न येऊं देण्याविषयीं त्यांची दक्षता, व अमर्याद स्वाभिमान लक्षांत आणतील, तर झाल्या गोष्टींत नवल करण्यासारखे कांहींच नव्हते, असें त्यांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. कधीं कधीं कांहीं विशेष कारणामुळें विशेष प्रकारचे

मोठे मनुष्य स्वदेशापेक्षां परदेशांतच अधिक प्रसिद्ध होतात. व रावसाहेब मंडलिक यांचा बऱ्याच अंशीं तसाच प्रकार होता. शिवाय, रावसाहेब सुप्रीमलेजिस्लेटिव कौंसिलचे मेंबर असतां, ते कलकत्त्यास जावयास निघाले म्हणजे कोणत्याही स्टेशनावर त्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय न होऊं देण्याबद्दल सर्व ठिकाणच्या स्टेशनमास्तरांस हिंदुस्थानसरकाराकडून, त्या त्या कंपन्यांच्या मॅनेजरांच्याद्वारें वटहुकूम सुटत असे हें आह्मी डोळ्यानें पाहिलें आहे. तेव्हां, प्रस्तुत आख्यायिकेंतील बाबुस्टेशन मास्तरानें जें वर्तन केलें तेंच त्यास योग्य होतें, असें कोण म्हणणार नाहीं ? असो, या मजेदार विषयांतराबद्दल वाचकांची क्षमा मागतों व उत्तर हिंदुस्थानांतील आगगाडयांत हजारों यात्रेकरू सांगतात त्याप्रमाणें खरोखरीं लांचलुचपतीचा तमाम कारखाना चालू असेल, तर त्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनीं ते प्रकार बंद करण्याविषयीं प्रयत्न करणें जरूर आहे अशी इच्छा प्रदर्शित करतों. पण ही गोष्ट त्यांच्या शक्तीच्या बाहेर असल्यास सरकारानें तींत आपलें मन आवश्य घातलें पाहिजे.

आमच्या इलाख्यांतील कंपन्यांचे अधिकारी इतके निगरगट्ट नाहींत. कधीं लोकमत, कधीं सरकारचा दपटशा व कधीं खुद्द त्यांचा सदसद्विवेक-मिळून त्यांच्या हातून विशेष निंद्य असें सहसा कांहीं होत नाहीं. तथापि कंपनीचा अंमल नाहींसा झाल्यापासून येथील राज्यव्यवस्थेची जी वासलाद झाली आहे, तिचीच छाया या कंपन्यांच्या कारभारावर पडली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्याप्रमाणें हिंदुस्थान सरकाराविरुद्ध सेक्रेटरी ऑफ् स्टेटकडे तक्रारी नेऊन कांहीं फायदा होत नाहीं; कारण मोठमोठ्या बाबतींत हिंदुस्थान सरकार जें करतें तें बऱ्हुधां त्या अधिकाऱ्यांच्या व इंग्लिशप्रधानमंडळीच्या सल्ल्यानें किंवा संमतीनेंच करतें. त्याप्रमाणें येथील कंपन्यांचे व हिंदु-

स्थान सरकारांचें, किंवा सेक्रेटरी ऑफ़ स्टेटचे आंतस्थ सूत्र एकच असल्यामुळें, या कंपन्यांविरुद्ध खासिफ किंवा मुख्य सरकारांकडे केलेल्या तक्रारींपासून लवण्यासारखा फायदा होत नाहीं. हिंदुस्थान सरकार व सेक्रेटरी ऑफ् स्टेट या कंपन्यांस बहुतेक नियम घालून देतात; व त्यांचा प्रतिपाळ या कंपन्या करून नीट होतो किंवा नाहीं, हें पाहणेही त्याच सरकारांचें किंवा अधिकाऱ्यांचें काम ! तेव्हां या कंपन्यांच्या व्यवस्थेंत जी विशेष महत्वाची चूक दिसून येईल, त्याबद्दल हिंदुस्थान सरकार किंवा सेक्रेटरी ऑफ् स्टेटच विशेष जबाबदार आहेत, असें लवण्यास हरकत नाहीं. आपली चूक आपल्या तोंडानें कबूल करून, ती दुरुस्त करण्याचा प्रयत्न करण्यास लागणारें मानसिक धैर्य फार दुर्मिळ असल्यामुळें, हिंदुस्थान सरकार येथील रेलवे कंपन्यांच्या अव्यवस्थेंत आपलें लक्ष फारसें घालीत नाहीं हें अत्यंत स्वाभाविक आहे. शिवाय, आपल्या फायद्याकरितां लवून आज ज्या गोष्टी चालू करीत आहेत त्यांपासून पुढें आपलाही फायदा होण्याचा संभव आहे, अशी आशा हिंदुस्थान सरकारास असल्यामुळें, लोकांच्या अडचणीकडे दुर्लक्ष करण्यास हा मानीव स्वार्थ आणखी एक बलवत्तर कारण होत असेल, हे स्वरूप कसेंही असो, येथील रेलवे कंपन्यांची आजची तशी स्थिति नाहीं, आणि ती तशी नसल्यामुळें ज्या आतांश भोळा नाम सोशाचा रामनो त्या आहीं त्या कंपन्यांच्या दरिद्र अधिकाऱ्यांनी व सरकारच्या नजरेस ती आणण्याचा प्रयत्न केला नाहीं, तर तिची सुधारणा

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बांइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाला ऑफीस सदाशिव पेठ, पुणें

होणं अशक्य आहे. तेव्हां या इलाक्यांतील जी. आय्. पी. आर् व एस्. एम्. आर. या दोन कंपन्यांच्या व्यवस्थेंत ज्या कित्येक उणिवा आमच्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत आल्या आहेत, त्या त्या कंपन्याच्या अधिकाऱ्यांच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न करतों.

कोणत्याही कारखान्याचें काम नीट चालण्यास त्यांतील नोकर संतुष्ट असले पाहिजेत. पण आमच्या दोनही रेलवे कंपन्यांत शेंकडा पांच नेटिव नोकर संतुष्ट निघतील किंवा नाहीं याचा आम्हांस संशय आहे. या कंपन्यांचा कंजूषपणा हा या असंतोषाचें कारण होय. युरोपांतील लोक ज्यू लोकांच्या द्रव्यलोभाची, व हिंदुस्थानसरकार येथील मारवाडी लोकांच्या द्रव्यलोभाची नेहमीं निंदा करीत असतात. पण आमच्या या दोन रेलवे कंपन्या कोणत्या पाहिजे त्या मारवाड्यास किंवा मारवाड्याच्या कंपनीस लोभीपणांत मागें हटतील अशी आमची पक्की खातरी आहे ! हिंदुस्थानसरकार या कंपन्यांस इतके लोभी का होऊं देतें, हें समजत नाहीं. इतका कंजूषपणा करून, या कंपन्यांचा धंदा नेहमीं फायदेशीर होता तर मग त्या कंजूषपणाच्या वर्तनें काहीं तरी बोलतां येतें. हिंदुस्थानांतील रेलवे कंपन्यांना हिंदुस्थानच्या तिजोरींतून प्रतिवर्षी **ग्यारंटीड इंटरेस्ट**वर म्हणजे ठरीव व्याज पाडून देण्यावर्दल बरीच रक्कम द्यावी लागते. तेव्हां एकंदरीनें येथील आगगाड्यांचें काम सध्यां आंतवट्यानें चाललें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें जर खरें असेल तर तिजोरीस आणखी थोडासा चट्टा लाऊन घेऊन, रेलवेकडील नोकरांचा दुवा तरी सरकारानें कां घेऊं नये ! याचर कदाचित कोणी असें उत्तर देईल कीं, "एकाला खुश्चून, एकाला तारण्यांत किंवा एकाला

दुखवून दुसऱ्याला सुखविण्यांत पुण्य नाहीं किंवा फायदा नाहीं. रेलवेकडील नोकरांस संतुष्ट राखण्यासाठीं, रयतेवरील कराचा बोजा वाढविणें न्याय्य नाहीं " असें जर कोणाचें उत्तर असेल तर त्यांतील न्याय्यता आम्ही कबूल करतों, आणि उलट असा प्रश्न विचारतों कीं, सरकार आपल्या पदरच्या नोकरांच्या संतोषासाठीं तरी इतकी परवा कां करतें ? त्यांच्या संतोषासाठीं गरीब रयतेवर कराचा येवढा बोजा लादणें हेंही न्याय्य नाहीं. सरकार आपल्या पदरच्या नोकरांस जो पगार देतें, किंवा नोकरांच्या संबंधानें ज्या सवलती देतें, त्याहून बऱ्याच कमी पगारांवर व अधिक कडक अटींवर नोकर मिळण्याचा संभव आहे. असें असून हवीतिकी कमी पगार व ठेवतील तितक्या कडक अटी सरकार स्वतःच्या नोकरांच्या संबंधानें कां ठेवीत नाहीं ? याचें उत्तर एकच आहे, आणि तें हें कीं, असंतुष्ट, भिकार, व हपापलेल्या नोकरांकडून आपली हवीतशी नोकरी होणार नाहीं, व एकंदरीनें अशा प्रकारच्या काटकसरीपासून आपला नफा न होतां उलट नुकसान होण्याचा संभव आहे, अशी सरकारची पक्की खातरी आहे. पण याच खातरीचा उपयोग सरकार रेलवे कंपन्यांचे नोकर संतुष्ट राखण्याकडे करीत नाहीं हा केवढा चमत्कार आहे ! रेलवे कंपन्यांसाठीं कायदे करणें, आणि रेलवे कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनीं केलेले पोटानियम मंजूर करणें, ही जर सरकारच्या अधिकारांतली गोष्ट आहे, तर स्वतःच्या नोकरांप्रमाणें रेलवे कंपन्यांचे नोकरही संतुष्ट राहतील, अशी व्यवस्था करणें सरकारास

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनावर पाठवूं.

काडीमात्र अशक्य नाहीं, असें आह्मांस वाटतें. तसेंच, ज्याप्रमाणें स्वतःचे नोकर संतुष्ट राखल्यानें सरकारचा फायदा होत आहे, त्याप्रमाणें रेलवे कंपन्यांचे नोकर संतुष्ट राखल्यास या कंपन्यांस सध्यांपेक्षां अधिक फायदा होऊं लागेल, व त्या मानानें या कंपन्यांच्या संबंधाचा आपल्या मानेवरील बराच बोजा कमी होईल, असें सरकारास विचाराअंतीं दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. जशी सरकारची तशीच या रेलवे कंपन्यांची एक मोठी चूक होत आहे तीं ही कीं, युरोपीअन लोकांबरोबर थोडचा पगारावर काम करणारे नेटिव लोक मिळत असून, वाजवीपेक्षां फाजील युरोपीअन लोक भारी पगारावर या कंपन्या आपल्या नोकरीस ठेवतात. या संकुचित देशाभिमानामुळें व आपल्या देशाचें खरे हित कशांत आहे हें नीटपणें न समजल्यामुळें, हिंदुस्थान सरकाराप्रमाणेंच या कंपन्याही आपलें अतोनात नुकसान करून घेत आहेत. एकंदरीनें साधेल तितक्या नेटिव लोकासच आपल्या नोकरींत ठेवणें यांतच आपले विशेष व दीर्घकाल टिकणारें हित आहे, हें जेव्हां या कंपन्यांस व हिंदुस्थानसरकारास कळूं लागेल, तेव्हां या कंपन्यांचे कारखाने आणि हिंदुस्थानची राज्यव्यवस्था नीट चालूं लागणार आहेत ! एकटा युरोपिअन कधीं कधीं पन्नास नेटिवांचें अन्न गट्ट करून वसतो ! व काम म्हणाल तर दोन नेटिवांइतकें देखील होण्याचा मारामार ! ज्या कामास लायक नेटिव मिळत नसतील तीं करण्यास युरोपिअन लोक अलबत लावावे. पण अशीं कामें फार थोडीं आहेत. गार्ड्स, ड्रायव्हर्स, पाहिजे त्या दर्जाचे स्टेशन मास्तर्स-वगैरे चतुरांच्या नोकरांच्या जागीं रेलवे कंपन्यांनीं नेटिव लोक कां नेमूं नयेत, हें आह्मांस समजत नाहीं. टिकिटें कापण्यास, टिकिटें तपासण्यास, टिकिटें पाहून उतारू लोक सोडण्यास, किंवा अशाच प्रकारचीं इतर क्षुल्लक कामें करण्यास भारी पगाराचीं उद्धट युरोपिअन पोरें कशाला पाहिजेत ? रेलवे

कंपन्या आपल्या पदरच्या युरोपिअन नोकरांची संख्या बरीच कमी करतील तर नेटिव नोकरांचे पगार वाढवितां येऊन, शिवाय त्यांस चराच खर्चही वाचवितां येणार आहे. रेलवे कंपन्यानीं कोणत्या कामाबद्दल किती पगार द्यावा, आणि किती तास नोकरी घ्यावी, याविषयीं कांहींच नियम नाहींत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आमच्या **स्वदेश मराठा रेलवे कंपनी**तील भिकार पगारांसारखे पगार तर कोठेंही नाहींत. पण या सर्व रेलवे कंपन्यांची आपल्या नोकरांकडून कही नोकरी घेण्यात केवढी सक्ती असते ! येवढयाशा चुकीबद्दल आठ आणे किंवा रुपयाचा दंड कसा ठेवलेला ! अशा सक्तीनें ज्याच्यापासून काम घ्यावयाचें, त्याना आठ दिवसांतून विश्रांतीचा एकादा दिवस मिळत असता, सणावारीं आळीपाळीनें सुटी देण्याची व्यवस्था केली असती, कामाच्या नेटाच्या दिवसांत अधिक पगार देण्यांत येतो, वर्षांतून महिनाभर हक्काची रजा मिळती, विशेष अडचणीच्या प्रसंगीं फार खटपट न करितां **कॅझुअल लीव्ह** देण्यांत येती, कंपनीची नोकरी बजावीत असतां एखाद्या अवयवास पंगुपणा येऊन, काम करण्यास असमर्थता आली तर बरेंच **कांपेनसेशन** मिळतें, व इमानानें नोकरी करतां करतां वार्धक्य येऊन, कांहीं वर्षें चिनकष्टांत आयुष्य घालविण्याचा प्रसंग आला असतां, थोडेंबहुत पेन्शन किंवा बरीच पॅचुइटी देण्याचा परिपाठ असता, तर लहान पगारांबद्दल किंवा सक्तीच्या नोकरीबद्दल, आम्हीं विशेष कुरकुर केली नसती, पण रेलवेची नोकरी म्हणजे शुद्ध गुलामगिरी होऊन बसली आहे ! अगदीं हलक्या स्टेशनावरील स्टेशन

लेखकांस योग्य मोबदला देऊन आम्हीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्युरो, पुणें.

मास्तराच्या किंवा तारमास्तराच्या कर्तव्यपरतेवर शेंकडों लोकांचे प्राण अवलंबून असतात !असल्या गरीब लोकांच्या शिरावर येवढी जबाबदारी टाकली असून, त्यांना पोटभर अन्न मिळूं नये, दोन पैसे मागें टाकतां येऊं नयेत, वर्षांतून माहिनाभर हक्काची रजा मिळूं नये, आठवड्यातून एक दिवस विश्रांति मिळूं नये, वीस पंचवीस वर्षे इमानेंइतबारें नोकरी केल्यावर लहानशा पेन-शनाची आशा असूं नये, व हातपाय लुला झाला असतां कस-लाही आधार असूं नये ही किती कष्टावह, व किती निर्दयपणाची सेवा आहे बरें ! मुंबई, भुसावळ, किंवा जबलपूर—अशा मोठ-मोठ्या स्टेशनावरील नोकरांस किती हाल सोसावे लागतात, याची वाचकांस कल्पना देखील करतां येणार नाहीं. विशेषतः कल्याण व मुंबई यांच्या दरम्यान असलेल्या एखाद्या स्टेशनावर नोकरी करून उदनिर्वाह करण्यापेक्षां अन्ना-वाचून उपाशीं मरणें देखील बरें, असें कित्येकांस वाटत असेल ! या स्टेशनांच्या दरम्यान व्यापाराच्या हंगामाच्या दिवसांत कमींत कमी दीडशें गाड्या येत जात असतील; म्हणजे प्रत्येक तासास सुमारें पांच किंवा सहा गाड्या पडतात, अथवा दर दहा किंवा बारा मिनिटास एक गाडी पडते. कामाच्या अशा गाड्यांत व कोंकणातल्या भिकार हवेंत भर उन्हाळ्यांत बारा तास नोकरी करणें किती कठिण आहे बरें ? नोकरी करणा-रांचीं शरीरें औंतीव लोखंडाचीं केलीं असलीं तरी तीं सुद्धां चारसहा महिन्यांत झिजून जाऊन मोडकळीस येतील असें वाटतें ! मग हाडामांसाच्या माणसांची कथा काय ? पण या गोष्टीकडे आमच्या **कांडर** साहेबांचें लक्ष कधीं गेलें आहे काय ? कशाला जाईल ? हवे तितके नेटिव लोक पैदा होत आहेत, तोंपर्यंत ते या हृदयभेदक स्थितीकडे कशाला पहातील ? अशा रीतीनें कंपनीच्या नोकरांकडून मक्तीची नोकरी घेण्यांत आपण कंपनीच्या भागीदारांचा मोठा फायदा करीत आहों,

असें कदाचित् त्यांस वाटत असेल. पण हा त्यांचा व इतरांचा शुद्ध भ्रम आहे. मनुष्य कितीही प्रामाणिक व कष्टाळू असला तरी त्याच्या काम करण्याच्या सामर्थ्यास सीमा आहे. त्या सीमेच्या बाहेर त्यास ताबलतोंब असतां, नाइलाजामुळें त्याच्या हातून आपल्या कर्तव्याची हेळसांड होते, व त्यामुळें मालकास हजारों रुपयांचें नुकसान सोसावें लागतें, हें पर्वा कुरला येथें घडलेल्या अपघातासारख्या अपघातावरून अगदीं लहान पोराच्या देखील लक्षांत येण्यासारखें आहे. पण अतिलोभानें, मिथ्या देशाभिमानानें, नैसर्गिक अनुकंपाभावानें, आणि उदार शिक्षणाच्या शून्यतेनें ज्यांच्या दृष्टीनास अंधत्व आलें आहे, त्यांना मनुष्यांच्या कल्याणाचा खरा मार्ग कोठून दिसणार ? व दुसऱ्यांनीं दाखविला तर त्यांस तो पसंत तरी कसा पडणारी रेलवे कंपन्या हक्काची रजा तर देतच नाहींत; पण कामाची मंदी असल्यास बिनपगारी चार दोन महिन्यांची रजा घेण्यास भाग पाडतात, असेंही ऐकलें आहे. हें खरें असेल तर अतिशय निर्घृण मारवाड्याहूनही या कंपन्या निर्घृण नाहींत, असें कोण म्हणूं शकेल ?

येथपर्यंत रेलवेकडील नोकरांच्या कर्मकथेची दुःखकारक कहाणी सांगितली. आतां या प्रांतांतल्या रेलवेंतील तिसऱ्या क्लासानें प्रवास करणाऱ्या ऊतारूंच्या हालांविषयीं चार शब्द लिहून फारच लांबलेल्या या चऱ्हाटास गांठ मारतों ! हे हाल अनेक प्रकारचे आहेत. प्रत्येक कंपार्टमेंटांत " आट किंवा

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकटेंच साप्ताहिक. व. इ. सं. सह १८३१.

मॅनेजर-सुधारक, पूणें सिटी.

दहा उतारू नेणें" अशा ढोबळीं अक्षरें लावलेलीं असतात. पण यांनीं घालून दिलेल्या नियमाच्या प्रतिपालनापेक्षां त्याचे उल्लंघनच अधिक वेळां होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं! गाडी सोडण्याच्या वर्दीत स्टेशन मास्तर किंवा पोलिस शिपाई "कलाव" असा दर्डावणीचा शब्द उच्चारून बकऱ्यांप्रमाणें डब्यांत माणसें कोंबून घाडद्विशीं दार लावतो, तेव्हा डब्यांतील लोकांस अशा जुलमामुळें किती त्रास होत असेल याची कल्पनाही त्यांच्या मनांत येत नाहीं. पण या त्रासाची जबाबदारी सर्वथैव स्टेशनमास्तराच्या किंवा पोलिसाच्या शिरावर लादण्यासही आम्ही तयार नाहीं. उतारू लोक आपलपोटेपणा सोडून दरीव संख्या, दरीव जागेत, ओढाओढी न करतां बसूं देतील, व अधिकार नसतां जरेरीची न करतील, तर चार दोन डबे अधिक लावल्यानें या संबंधाचे हाल चुकणार आहेत. पण दिवाबत्ती, पाणी, व वेटिंगरूम्स यासंबंधाच्या उणीवा कंपन्यांनींच दूर केल्या पाहिजेत पावसाळ्यांत आश्रयाच्या जागेची, उन्हाळ्यांत सर्व काळीं पाण्याची, आणि सर्व ऋतूंत रात्रीं ढळढळीत दिवे असण्याची फार अवश्यकता आहे. यासंबंधानें जी. आय्. पी. रे. व बरोडा, ग्रा. आर. या दोन्ही कंपन्यांनीं बरीच सुधारणा केली पाहिजे. या दिवसांत प्रत्येक स्टेशनावर उतारूंच्या प्रत्येक गाडीला पाणी पुरविलें पाहिजे. थर्ड क्लासांत लघवी वगैरे सोय केली असतां, आमचे अडाणी लोक अनर्थ घाण करतील, म्हणून त्यासंबंधाची सध्यां जी व्यवस्था आहे तीच बरी आहे, असा आम्हांस वाटतें. कदाचित् वायकांच्या डब्यापुरती तेवढी सोय करणें जरूर आहे. पण यासंबंधानें आम्हांस दुसरी एक सूचना करावयाची आहे ती ही कीं, रेलवे कंपन्यांनीं सर्व वर्गांचें भाडें जरी बरेच उतरलें आहे तरी त्यांतल्या त्यांत एक मोठी सुधारणा करण्यास चांगली जागा आहे. कांहीं दिवस जी. आय्. पी. आरनें हा सोय

केली होती; पण ती फिरून रद्द का केली हें समजत नाहीं. ती आणखी एकवार अंमलांत आणून तींपासून बराच अनुभव घेऊन पहावा, अशी आमची सूचना आहे साधारणपणें सेकंड क्लासास तिसऱ्या वर्गाच्या अर्ध्याचपट भाडें द्यावें लागतें. आमच्या मतें हें अंतर फार आहे.या अंतरामुळें सामान्य ऐपतीच्या मनुष्यास, बसावें तर स्वर्गात नाहीं तर पातालांत, असें होतें. एक तर सेकंड क्लासाचें भाडें थर्ड क्लासाच्या दुप्पट असावें. किंवा तसें करणें इष्ट वाटत नसल्यास, सेकंड व थर्ड यांच्या दरम्यान थर्ड क्लासाच्या दीडपट भाड्याचा एक इंटरमीजियेट क्लास असावा. हा क्लास उत्तर हिंदुस्थानांतील पुष्कळ गाड्यांस असतो. अनेक क्लास केल्यानें हिशेब ठेवण्यास, व व्यवस्था राखण्यास फार त्रास पडतो, हें आम्ही कबूल करतों, पण तसा क्लास नसल्यामुळें मध्यम प्रतीच्या लोकांची फार गैरसोय होत असून, कंपन्यांचेंही बरेंच नुकसान होत आहे. असा आमचा समज आहे. तेव्हां दोनही कंपन्यांचे अधिकारी या गोष्टीचा नीट विचार करतील अशी आशा करतों. कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनीं प्रवाशांच्या दाखविलेल्या गैरसोई आणि आपल्या पदरच्या नोकरांच्या तक्रारी दूर केल्या तर ठीकच आहे; नाहीं तर स्वतः त्यांनीं व त्यांच्या वतीनें लोकांनीं सरकाराकडे दाद मागितली पाहिजे. आज नाहीं उद्यां, सरकार या तक्रारींचा विचार करील; निदान त्यांची चौकशी करण्याकरितां कमिशन तरी नेमील, अशी आम्हांस खातरी आहे.

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सत्रधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ८ ५

खेडकरबंधु ओंकार स्क्वेअर शनवार पेठ. पुणें.

भांडवल गेलें; व्यापार गेला !

ज्याप्रमाणें शरीराला अन्नाची त्याप्रमाणें व्यापाराला भांडवलाची अवश्यकता आहे. ज्या देशांत भांडवल नाहीं, तेथें व्यापार कोठून चालणार ? मुसलमान लोकांनीं येथें अनेक शतकें राज्य केलें; पण त्यांच्या त्या दीर्घकालीन अमलानें आम्ही जितके डबघाईस आलों नाहीं, तितके या शतसांवत्सरिक ब्रिटिश अंमलानें आलों आहों. याचें कारण उघड आहे. तैमूरलंग, चांजिजखान, गिझनीचा महंमद यांनीं या देशावर ज्या स्वाऱ्या केल्या, त्यामुळें आमचें अतोनात नुकसान झालें हें खरें आहे. पण तें नुकसान, ब्रिटिश अंमलामुळें आमचें जें नुकसान होत आहे त्यापुढें कांहींच नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुसलमान लढवय्यांनीं जें द्रव्य लुटून नेलें तें सांचलेलें द्रव्य होतें. त्याचा व्यापाराशीं ताद्दश संबंध नव्हता. पंचवीस वर्षांनीं एखादी झुंड येऊन, कोटी दोन कोटी रुपयांची लूट घेऊन गेली तर तीपासून होणारें नुकसान आणि प्रतिवर्षी उत्पादक संपत्तीपैकीं बाहेर जात असलेल्या दहापांच कोटींपासून होत असणारें नुकसान यांची साम्यता कोठून होणार ! तसेंच, हेंही ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, मुसलमानांचा अंमल येथें कायम झाल्यापासून, येथला पैसा बहुधा बाहेर गेला नाहीं. त्याप्रमाणें मुसलमान लोक पिशवी भरली कीं विलायतेस पळणारे नसल्यामुळें, त्यांच्या अंमलापासून द्रव्यदृष्ट्या आमचें म्हणण्यासारखें नुकसान झालें नाहीं. शिवाय त्या वेळेस मोठमोठ्या हुद्यांच्या जागा जिकणाऱ्या जातभाईंस मिळत असत, परंतु त्यांचें नेहमीचें राहणें येथें पडल्यामुळें, त्यांचा सारा खर्च येथेंच होत असे, व त्यामुळें व्यापारधंदा करणाऱ्या लोकांस किंवा जोडधंदा करणाऱ्या लोकांस मोठें नुकसान झाल्यासारखें वाटत नसे

मशीदीचे दगड घडविणें; किंवा देवळाचे दगड घडाविणें, ताजमहाल बांधणें किंवा काशीविश्वेश्वराचें देऊळ बांधणें; पेशव्यासाठीं शालजोडया विणणें किंवा बादशहाकरतां मोलाचे गालीचे तयार करणें, मस्तानीसाठीं निवडक जवाहीर विकणें किंवा नुरजहानच्या सांगण्यावरून सारा देश धुंडाळून पाचेचे सर्वोत्कृष्ट खडे पैदा करणें—यांत ल्या त्या कारागिरांस किंवा व्यापाऱ्यांस विशेष भेद वाटला नसेल, हें उघड आहे. पण सध्यांची स्थिति तशी नाहीं. इंग्लिश लोक ज्या वस्तु वापरतात, त्यांपैकीं बहुतेक इंग्लंडाहून येतात इतकेंच नाहीं, तर त्यांच्या यंत्रकृत वस्तू आमच्या हस्तकृत वस्तूंहून अधिक सबंग व सफाईदार असल्यामुळें, आमच्या उपयोगास लागणाऱ्या वस्तूंपैकीं अनेक वस्तूंही आम्ही इंग्लंडापासूनच खरेदी करतों. यामुळें येथील कारागिरांस हवेंतितकें काम मिळेनासें झालें आहे. याशिवाय, ज्या खर्चाबद्दल आम्हांस एका कवडीचाही मोबदला मिळत नाहीं, असाही पुष्कळ खर्च होत आहे. या सर्व खर्चाचा **होम चार्जीज** या नांवाखालीं समावेश करण्यास हरकत नाहीं. यांत हिंदुस्थानास असलेल्या कर्जाबद्दल व्याजाची जी रक्कम प्रतिवर्षी इंग्लंडास पाठवावी लागते ती; नोकरी आटोपून किंवा सोडून गेलेल्या नोकरांचीं पेन्शनें; सेक्रेटरी ऑफ् स्टेटच्या कौन्सिलाचा खर्च आणि यांसारख्या ज्या इतर बाबी आहेत त्या येतात. या सर्वांबद्दल गेल्या वर्षी सेक्रेटरी ऑफ् स्टेट यानें आम्हांपासून

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपा

' संदेश ' एजंट, पुणें सिटी

तेवीस कोटी रुपये घेतले! हिंदुस्थानाच्या काळीचा एकंदर वसूल एकोणीस कोटी रुपये आहे. तेव्हां हिंदुस्थानच्या जमीनीचें सारें उत्पन्न जरी त्या प्रचंड अधिकाऱ्यांस अर्पण केलें तरी देखील त्यांचें पोट भरत नाहीं, हें उघड आहे. त्यांचें समाधान होण्यासाठीं आणखी चार कोटी रुपये कोठून तरी काढून द्यावे लागतात! म्हणजे हिंदुस्थानच्या नक्त उत्पन्नापैकीं पक्कें अर्धें उत्पन्न इंग्लंडात जात असून, त्या बद्दल आमचा काडीचा देखील फायदा होत नाहीं; व असा क्रम कमीअधिक प्रमाणानें आज शंभर वर्षें चालला आहे! या गोष्टी ज्याला समजल्या असतील त्याला 'आम्ही इतकें दरिद्री कशासाठीं' हें तेव्हांच कळून येणार आहे. इंग्लिश लोक मोठे उद्योगी, कल्पक, साहसी, व बुद्धिवान् आहेत, व या गुणामुळेंच त्यांनीं आपला देश सुवर्णमय करून टाकला आहे, हें निर्विवाद आहे. तथापि या पुराण सुवर्णभूमींतील वरेंच सुवर्णही रुपयांच्या संपत्तिमत्त्वास कारण झालें आहे, हें त्यांचें त्यांनाच लवकरच कळावें लागेल. पण ज्यामानानें ते आमच्या देशांतून उत्पत्तिवर्षी उत्पादक संपत्ति तिकडे नेत आहेत, त्या मानानें हिंदुस्थानची कंगालता अधिकाधिक दाट होत जाऊन, आमचे हाल अपार बेद पडत चालले आहेत; पोटभर अन्न व अंगभर वस्त्र काय मिळाल्यामुळें, नानातऱ्हेचे रोग वाढत चालले आहेत; रोग घालवणारे उपासमार यांच्यामुळें आम्ही व्यथित होऊन आमच्या मरणाकडेवर अवकळा येत चालली आहे; आणि प्रतिवर्षी रक्तामांसाच्या महारोगग्रस्तांची व इतर जातींच्या रोग्यांची संख्या वाढत जाऊन, त्याच प्रमाणानें मृत्युसंख्याही वाढत चालली आहे. इंग्लिश लोक या भयंकर स्थितीच्या संबंधानें लक्ष्यांत पुढें पूर्ववत् डोळे झांक करतील तर उभय देशांवरही उपासमारीच्या संकटाचा प्रसंग गुदरून त्यामुळें उभय देशांतील लोकांचेंही अज्ञातपूर्वक नुकसान होणार आहे! ज्याप्रमाणें

झाडाच्या चार दोन फांद्यांवर थोडीशी टवटवीत पालवी, व दहा पांच फळें दृष्टीस पडतात; पण वारकाईनें त्याकडे पाहिलें तर बुडख्यापासून शेंड्यापर्यंत तें किड्यांनीं पोंखरून टाकिलें आहे, व थोड्याशा जोराच्या वाऱ्यानें एकदम मोडून पडण्यासारखें झालें आहे, असें दिसून येतें, त्याप्रमाणें या देशाची अवस्था झाली आहे. मुंबई, कलकत्ता, किंवा मद्रास यांसारख्या दहापांच टवटवीत शहरांवरून, किंवा लाख दोनलाखांत जो एखादा दुसरा खरा सुखवस्तू इसम दृष्टीस पडतो त्यावरून, चहूंकडे तशीच अवाढार्ना असेल असें अनुमान करणें हा शुद्ध भ्रम होय. **सर रिचर्ड टेंपलसारखे** जे गृहस्थ जाणूनबुजून इंग्लिश पार्लमेंटांत व इंग्लिश लोकांस या मिथ्या भ्रमांत पाडीत आहेत, ते इंग्लंडचें अपरिमित नुकसान करीत आहेत, व या त्यांच्या अपराधाबद्दल उभय लोकांस भुरी दंड द्यावा लागणार आहे. तेव्हां हा प्रसंग टाळण्यासाठीं आम्ही आपली खरी स्थिति इंग्लिश लोकांच्या नजरेस आणणें हें जितकें आमचें कर्तव्य आहे, तितकेंच इंग्लंडाचें खरें हितचिंतणाऱ्या आंग्लतनयांचेंही आहे.

येथील बहुतेक उत्पादक भांडवल प्रतिवर्षी इंग्लंडास जाऊन येथील उद्योगधंदा नष्ट झाल्यामुळें येथील काम करणाऱ्या लोकसंख्येची कशी स्थिति झाली आहे, हें कोणास थोडक्यांत समजून घेण्याची इच्छा असेल तर त्यांनीं पुढील आंकडे लक्ष लाऊन वाचावे. हिंदुस्थानांतील शंभर मनुष्यांपैकीं ८६ मनुष्यांचा संबंध शेतकीशीं आहे; इंग्लंडांत १४ चा आहे. गिरण्या वगैरे कारखान्यांत हिंदुस्थानांतील लोकसंख्येपैकीं शेंकडा १

प्लॉट्स झाडण्यानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें समोर–हवाशीर. सर्व पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर—सुधारक.

माणसें असतात; इंग्लंडांतील लोकांपैकीं अशाच कामांकडे शेंकडा ३० असतात; आणि इतर सर्व प्रकारच्या उद्योगामुळें इंग्लंडांत शेंकडा **पंचावन्न** इसमांस जें काम मिळतें, तें येथें जेमतेम दोन इसमांस मात्र मिळतें ! अशा स्थितींत दुष्काळ आल्याबरोबर, लाखों लोकांस, अन्नान्न करीत, परलोकप्रयाण करावें लागतें, यांत कांहीं नवल आहे काय ? आमच्या व्यापाराची ही हृदयभेदक स्थिति समंजस इंग्लिश लोकांपुढें आणिली म्हणजे ते असा अभिप्राय देतात कीं, हिंदुस्थानची व्यापारवृद्धि झाली पाहिजे. तीवांचून दुसरा तरणोपाय नाहीं ! पण ही व्यापारवृद्धि कशी होणार, याचा मात्र विचार करण्यास कोणी धजूं शकत नाहीं ! कारण तो करूं लागलें कीं, इंग्लंडच्या व्यापाराचा थोडीबहुत गदा येईल, निदान त्याला थोडाबहुत तात्कालिक तरी धक्का पोहोंचेल, अशा साधनांचा उपयोग केल्याशिवाय, हिंदुस्थानच्या व्यापारधंद्यास सांप्रत स्थितींत उत्तेजन देणें अशक्य आहे, हें दिसून येतें. तसें करण्याची आजमित्तीस कोणाची छाती आहे ? परोपकाराच्या लांब लांब गप्पा मारणें फार सोपें आहे ! व्यक्तिपेक्षा राष्ट्रास ही गोष्ट विशेष तऱ्हेनें लागू पडते. इंग्लंडानें आमचे व्यापार आपले असल्यामुळें, आमचें केवढें नुकसान न आंहे, हें जोपर्यंत इंग्लंडचा माल येथें खपत आहे तोंपर्यंत इंग्लिश व्यापारी मनांत कशासाठीं आणतील ? ज्यावेळेस येथें मोठा मोठा दुष्काळ पडून, किंवा **टाइम्स ऑफ् इंडिआनें** दाखल्याप्रमाणें, दारिद्र्यानें पिळून काढलेल्या व भुकेनें गांजून गेल्या लोकांचे एखादें प्रचंड बंड होऊन, त्यांच्या व्यापारास एकी मोठा धक्का बसेल, व कोट्यावधि रुपयांचे नुकसान होईल, तेव्हां कोठें त्यांचे डोळे उघडणार ! तसें नसेल तर, आपल्या व्यापाराची वृद्धि करणें काय कठिण आहे ? एकट्या

कापसाच्या व्यापारास थोडेसें उत्तेजन दिलें तरी देखील आम्हास आलेली अन्नान्नदशा कांहीं वर्षें दूर होणार आहे इतकेच नाहीं, तर अफूचा व्यापार बंद झाल्यास हिंदुस्थानच्या जमाबंदीच्या तटांत जें पांचसात कोटींचे अवाढव्य भगदाड पडण्याचा रंग दिसत आहे तेंही बऱ्याच अंशीं भरून काढतां येणार आहे. अशा प्रसंगीं इंग्लंडाहून येणाऱ्या कापडावर जबर जकात ठेवण्यास काय हरकत आहे ? तसें केल्यास, जमाबंदीस बरीच मदत होऊन, येथील कापसाच्या कारखान्यांसही बरीच मदत होणार आहे. वास्तविक पाहतां कापसाची, मजूरांची व कापसाच्या कारखान्यांस लागणाऱ्या भांडवलाची आमचेपाशीं इतकी समृद्धि आहे कीं, जर उत्पन्न केलेला माल हटकून खपेल अशी आमची खात्री होईल, तर भरतभूमीस आपली लाज झांकण्यासाठीं इंग्लंडचा धांवा करावा लागणार नाहीं इतकेंच नाहीं, तर या व इतर खंडांत ज्या भूमिका उघड्या पडल्या असतील. त्यांच्या शरीरांवर ही भरतभूमि, आपले एक अंगुष्ठ देखील उघडे पडूं न देतां, हवीं तितकी वस्त्रें घालील ! पण ल्यांक्याश्टरच्या व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानसरकारास असें करूं देणें म्हणजे स्वार्थरूप बाभळीच्या झाडाला अघटित घटनेनें फणस किंवा आंबे येण्यासारखें होय !

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टा. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस ज्ञानवाग, पुणें.

खुळे रे खुळे ?

अथवा

बहिष्कारांचे शुष्क अवडंबर !

चा पुण्यांतील रिकामटेकड्या लोकांना मधून मधून तऱ्हेतऱ्हेचीं फॅशनीं येत असतात ! पुनर्विवाहाचा दंगा, दयानंदाशीं वद्दळ, संमतीच्या विलाविरुद्ध कंठशोष, व सध्यां चालू असलेली बहिष्कारांची धामधूम, हीं या फॅशन्यांचीं कांहीं ठळक उदाहरणें होत ! वृद्धापकाळ येऊन ठेपला; कर्तृत्वशक्तीचा लय झाला; गात्रांवर स्वामित्व चालेनासें झालें. अधिकार नष्ट झाला; आणि सरकारानें दिलेल्या पेनशनावर, अथवा जो थोडाबहुत कुणगा केला असेल त्यावर, किंवा प्रपंचभार वाहूं लागलेला कर्ता मुलगा घालील तेवढया तुकड्यावर राहण्याचे दिवस आले म्हणजे ज्याप्रमाणें कांहीं म्हातारे अतिशय वटवट करूं लागतात, ज्याच्या त्याच्यावर तोंड सोडतात, प्रत्येक गोष्टीबद्दल नवीन पिढींतील तरुणांस दोष देतात, व कंटाळवाण्या कटकटींनें मुलांस व सुनांस भंडाऊन सोडतात आणि सर्वांकडून आपलें हसें व अपमान करून घेतात, त्याप्रमाणें या पुण्यांतील जुन्या लोकांची गत झाली आहे. पेशवाई बुडाली, स्वराज्य नष्ट झालें, नवीन विद्या, नवीन विचार व नवीन रीतरिवाज नवीन अंमलाबरोबर अस्तित्वात येऊं लागले, जुन्या आचारांतील व विचारांतील दोष स्पष्टपणें नजरेस येऊं लागून ते अजीबात टाकण्याची किंवा त्यांत सुधारणा करण्याची अवश्यकता वाटूं लागली; धर्माचें, देशाभिमानाचें, स्वकर्तव्याचें खरें स्वरूप समजूं लागलें--इतकें सर्व होऊन चुकलें व तदनुसार नवीन पिढीस वळण लागूं लागलें तरी आमच्या अभेद्य जुन्या मंडळीस असें

वाटत आहे कीं, या देशाची स्थिति जशी साठ किंवा सत्तर वर्षांमागें होती, तशीच आजमित्तीसही आहे ! असें नसतें तर आकाशाला ठिगळें देण्याचा हा व्यर्थ धंदा त्यांनीं कशाला आरंभिला असता? यांना हें कसें समजत नाहीं कीं, आपल्या अंगांत कोणत्याही प्रकारचे त्राण, योग्यता, व अधिकार न राहिल्यामुळें, त्राम्हण्य करण्याचे, बहिष्कार घालण्याचे, किंवा कोणाला वाळींत टाकण्याचे दिवस आतां गेले ! उलट हे वेडे-पीर ज्यांना बहिष्कार घालण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांचेकडून ते बहिष्कृत होण्याचा संभव आहे ! कोणत्याही शिक्षेची भीति वाटत असेल तोपर्यंत ' ती देऊं ' अशी धमकी घालण्यांत, किंवा प्रसंगविशेषीं ती प्रत्यक्ष देण्यांत कांहीं अर्थ आहे. पण जर त्या शिक्षेची चट्टूकडे थट्टा होऊं लागली असेल, व ती देण्याचा आव घालणारांसच त्रास होण्याचा संभव असेल तर त्यांनीं आपण होऊन आपलें हसें कां करून घ्यावें, हें समजत नाहीं ! पण येवढें समजण्याची अक्कल असती तर "खुळें" ही पदवी कोणी प्राप्त झाली असती ? पहिल्या पद्धतीनें त्राह्मणपण राखणें ही गोष्ट आतां आपल्या आहाराबाहेर गेली, हें सत्य या म्युच्वांच्या ध्यानांत येऊन, नव्या पिढीशीं सलोख्यानें व गोडीगुलाबीनें ते वागूं लागतील, तरच त्यांची धडगत आहे. नाहींतर व्हायचे तें न चुकतां त्यांना मात्र शेवटपर्यंत विडंबन, उपहास, तिरस्कार, व अपमान सहन करणें भाग पडणार आहे.

ज्या लोकांची धर्मावर खरी श्रद्धा आहे; ज्यांनीं अनेक धर्मग्रंथांचें अवलोकन करून धर्माविषयीं खोल विचार केला

निबंधसंग्रह.

भाग १ ला. कि. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

आहे; पण हिंदुधर्मांत; विशेषतः त्याच्या तंत्रांगांत बराच फेरफार केल्याशिवाय तो अर्वाचीन विचारी श्रद्धालूंच्या आदरास पात्र होण्याचा संभव नाहीं, अशी ज्यांची खात्री झाली आहे;--अशा लोकांचा स्वधर्मांत मानपुरःसर संग्रह करावयाचा तें सोडून, हे खुळे धर्माभिमानी अशा विचारवान् व श्रद्धावान् लोकांस "ब्रह्मो, प्रार्थनापंथी, आर्य समाजिष्ट" अशीं निंदाव्यंजक नांवें देऊन, त्यांस आपले शत्रु करून घेत आहेत. अर्वाचीन पद्धतीप्रमाणें शिकलेल्या धर्मशील लोकांची अशी वाट लावण्यापूर्वी, खुळ्या धर्मवेड्यांनो, आपल्या अंगांत आपला धर्म संभाळण्याची काय ताकत आहे याचा नीट विचार करा; आग्रहानें, अविचारानें, किंवा भुलथापीनें भलतेंच करून बसाल, आणि परिणामीं फुकट फशीं पडाल हें नीट ध्यानांत आणा. हिंदू धर्माचा जीर्णोद्धार करून, त्याच्या तारुण्यांतलें, किंवा ऐन ज्वानींतलें त्याचें मोहक स्वरूप त्याला आणण्याचा जो तुमचा विचार आहे, तो फार प्रशंसनीय आहे; पण तो अंमलांत आणण्यास तुमच्यापाशीं काय सामुग्री आहे, याची तुम्हीं कधीं चौकशी केली आहे काय? हिंदू धर्मास उतरती कळा लागण्यास किंवा जीर्णदशा येण्यास जीं अनेक कारणें झालीं आहेत, त्यांत पाश्चिमात्य शिक्षण मुख्य कारण होय, असें आम्हांस वाटतें. तुमचें मतहीं तसेंच असल्यास, अगोदर हें पाश्चिमात्य शिक्षण येथून पिटाळून लावण्याची, निदान त्याला कोलदांडा घालण्याची कांहीं तरी तोड काढिली पाहिजे! या शिक्षणानें जिकडे तिकडे अश्रद्धाच अश्रद्धा करून सोडिली आहे, हें निर्विवाद आहे! पण हें पेंढार येथून घालवायचें कसें? इंग्रज लोक आमच्या धर्माविषयीं पूर्ण उदासीन आहेत; पण आमच्या शिक्षणाविषयीं, म्हणजे त्यांजकडून आम्हांस जें शिक्षण मिळत आहे त्याविषयीं 'तुम्हीं उदासीन व्हा," अशी विनंती त्यांस केल्यास ती त्यांचा आदर करणार नाहींत, असें वाटतें. करणा-

त्या महाकारस्थानी लोकांनीं आमच्या धर्मांत प्रत्यक्ष स्थिति न घालण्याचें अभिवचन आह्मांस दिलें असल्यामुळें व चेतें ! त्यांच्याकडून ह्मणण्यासारखें उल्लंघन कधींही होत ष्टी घडत नाहीं ! अप्रत्यक्ष रीतीनें आमच्या धर्मश्रद्धेची रांगोळी ा करून व्यावहारिक शिक्षण ते आम्हांस देत आहेत, त्याच्या क, किंवा दोष देण्यास आम्हांस जागा सांपडत नाहीं ! तेव्हां प्रवृत्त स नव्ही हें पाश्चिमात्य शिक्षण बंद करावयाचें ह्मणजे खुद्द इंग्रजांसच येथून हांकून लावण्याची कांहीं तरी युक्ति कांढिली पाहिजे ! हें करण्यास दोनच उपाय आहेत; **शाप** किंवा **शार**. पैकीं **शार** अथवा **शस्त्रें** हत्यारांच्या कायद्यामुळें आह्मांपाशीं राहिलीं नाहींत ! तेव्हां आतां आमची सारी भिस्त शापावर येऊन टेपली आहे ! ही शापशक्ति आमच्या सारख्या **सुधारकांस**-अनुकूळ नाहीं हें उघडच आहे ! तस्मात् ज्या क्षौरी शास्त्र्यांच्या किंवा दर्दुरानुकारी वैदिकांच्या यज्ञोपवीतांत जोर असेल त्यांनीं आपल्या मंत्रसामर्थ्यानें या फिरंग्यांस खाक केल्याशिवाय, आमच्या सनातन वैदिक धर्माचें संरक्षण होण्याची आशा राहिली नाहीं ! शिव ! शिव ! सनातन वैदिक धर्मा, काय हा घोर प्रसंग तुजवर गुदरला ! कलिप्रभावामुळें मंत्रविद्या अगदीं लयास गेली ! त्यांतल्या त्यांत जीं एकदोन अस्त्रें अद्यापी चालू आहेत, त्यांचा राजवर्गावर मुळींच परिणाम घडत नाहीं ! आतां या तुझ्या निःसीम भक्तांनीं काय करावें ? **नारायणा**, तुला तरी या मृत्यूच्या दाराशीं वसलेल्या हिंदू धर्माची कांहीं करुणा येऊं दे !

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें

र्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।

तुझी प्रतिज्ञा आहे. मग अशी डोळेझांक का करतोस
र्वसाक्षी प्रभो, तुझ्या डोळ्यासमोर जे अनन्वित प्रकार
डूं लागले आहेत, ते तुला दिसत नाहींत काय ?
ा हातीं वेद गेले ! यज्ञयाग होईनासे झाले ! संध्यावं-
र्पण, व वैश्वदेवादि नित्य ब्रह्मकर्में लयास जात
वेदशालांच्या जागीं राक्षसी शिक्षणाच्या शाळा
ल्या ! वर्णसंकर झाला पाहिजे असें लोक उघडपणें
व चोरूनमारून निरानिराळ्या जातींचे लोक एक-
ोदकव्यवहार करूं लागले ? स्त्रिया उद्धत होऊन
आणि दास्यद्वेषिणी होऊं लागल्या ! **अष्टवर्षा**
या वैवाहिक सीमेचा मोठ्या डौलानें अतिक्रम
धत्वाविवाहासारखीं अनुच्चार्याय पातकें राज-
ू लागला, व खुद्द नवऱ्याला बारा वर्षांचे आंतील
वयाचे बायकोकडे जाण्याची बंदी झाली ! हा भयप्रद अना-
चार, देवा, तुझ्यानें पहावतो तरी कसा ? किंवा तुला तरी दोष
देण्यांत काय अर्थ आहे ? आमचें कर्मच खोटें म्हणून आम्हांला
अशी दशा आली असेल ! आम्हीं आपलीं पोरें या इंग्रजांच्या
शाळेंत घातलीं नसतीं तर आज ही आमची दशा कशाला
झाली असती ? पण त्या शाळेत त्यांना घातल्याशिवाय तरी
कसें चालणार ? जळांत राहून माशांशीं वैर काय कामाचें ?
आम्हीं देऊं दिल्या तर सात रुपयांच्या शिपुर्ड्यांच्या जागा
देखील इंग्रजलोक स्वजातीयांस देऊं लागतील, आणि संतो-
षानें त्या पतकरणारे हवे तितके आंग्लभौम येथें पैदा होतील !
अशा स्थितींत जीव राखावा कीं धर्म राखावा, अशी मोठी
पंचाईत येऊन पडली आहे ! आम्ही आपल्याकडून होईल
तितकी धडपड चालविली आहे, पण तिचा चट्ट परिणाम
होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत '

धर्मनिष्ठ देशबांधवहो, हा तुमची अनुकंपनीय स्थिति पाहून आह्मां **सुधारकांस** देखील तुमची मोठी कींव येते! पण काय करावें! परमेश्वराच्या इच्छेवांचून अशा गोष्टी घडत नसतात, हें ध्यानांत ठेवा, आणि आळा दिवस साजरा करून घ्या! तसें न कराल आणि मूर्ख, आपमतलबी, दांभिक, किंवा हट्टी लोकांच्या नादीं लागाल आणि भलभलतें करण्यास प्रवृत्त व्हाल तर मात्र ठार बुडाल, हें पक्कें समजून असा! जे तुह्मी बहिष्काराची धमकी घालण्यास निघाला आहां, त्या तुमच्या पायाखालीं काय जळत आहे, हें तुह्मीं कधीं पाहिलें आहे काय! पदोपदीं ब्राह्मणधर्माचें उल्लंघन तुमच्या हातून होत आहे, हें तुमच्या लक्षांत नाहीं काय? दर्शाचे दर्शास क्षौर करणारे शास्त्री किंवा वैदिक धर्मोपदेश करण्याच्या निमित्तानें करूं नये अशीं कर्में करतात, हें तुम्हांस ठाऊक नाहीं काय? अशा दांभिक धार्मिकांस वाळींत टाकण्याचा विचार तुमच्या मनांत कधीं आला आहे काय? मुसलमान तांबोळ्यांच्या दुकानांतला ओला चुना, हलवायाच्या घरची मेवामिठाई, कंठाळींतल्या दशम्या, चांभाराच्या दुकानचे जोडे, व मांगाच्या हातच्या दोऱ्या बेतानां तुमच्या मनांत कधीं दिक्कत आली आहे काय? इंग्रजांचें राज्य स्थापित झाल्यापासून दवाखान्यांतलि औषधांच्या नांवानें ब्राम्हण लोकांत, किती दारूचा खप प्रत्येक दिवशीं होत आहे, हें तुह्मांस ठाऊक नाहीं काय? फार कशाला, आपला भाऊ, मुलगा, बाप, किंवा काका, दारू पितो, मांस खातो, किंवा यवनीशीं गमन करतो. हे पक्कें ठाऊक असून त्याच्याशीं तुह्मी अन्नव्यवहार करीत नाहीं काय? किंवा अशा प्रकारच्या परक्या गृहस्थाशीं लग्नसंबंध जुळवीत नाहीं काय? "आह्मी असें करतों" अशी अशा लोकांनीं आपण होऊन नोटीस दिली नाहीं तोंपर्यंत ते तसें करीत नाहींत असें समजणें रास्त आहे असें ह्मणणें, आणि कधीं मायेनें, कधीं लोभानें, व

कधीं कायद्याच्या भीतीनें त्यांच्याशीं खुशालपणें हवा तो व्यवहार करणें म्हणजे "माझ्या जिभेला हात लावला नाहींस म्हणून मला विटाळ झाला नाहीं," असें म्हणणाऱ्या अवाच्य पोराच्या वर्तनाचें अनुकरण करून, सनातन वैदिक धर्माच्या संरक्षणासाठीं आपला जीव तिळतिळ तुटतो आहे, असें दाखविणाऱ्या लांभिकांनीं विश्वासघातकी गाद्यांप्रमाणें विषांत बुडविलेले खंजीर त्यांच्या बरगड्यांत खुपसण्यासारखें होय ! सांप्रतकाळीं कांहीं स्वार्थसाधु शिकलेल्या लोकांचें पाठबळ तुम्हांस मिळाल्यासारखें झालें असल्यामुळें, तुम्ही खुळ्यासारखें नाचूं बागडूं लागलां आहां; पण आज जे गृहस्थ तुम्हांस तुमचें कैवारी असें दाखवून, तुमच्या अजागळपणाचा फायदा घेत आहेत तेच तुम्हांस त्यांची कार्यसिद्धि झाल्याबरोबर कोणत्या खड्ड्यांत नेऊन घालतील, याची शंका तुम्हांस कधीं आली आहे काय ? वेदांत ज्यांना भरंसा नाहीं; खिस्त्याच्या घरीं चहा कॉफी खेलाशक घेण्यास ज्यांना फिकीर वाटत नाहीं, डाक्तराच्या सांगण्यावरून मद्यिरार्काचा किंवा गोमांसार्काचा उपयोग करण्यास ज्यांना दरद्द वाटत नाहीं; बबर्जीच्या हातचीं बिसकुटें ब्राम्हणानें तयार केलेल्या शंकरसाखरांहूनहीं ज्यांना पवित्र वाटतात; जे कोणत्याही देवाला मानीत नाहींत किंवा कोणताही ब्राह्मणाचार नित्य करीत नाहींत; सोवळ्याओंवळ्यांचा ज्यांनीं उघडपणें त्याग केला आहे, व कुणब्याच्या हातचा चहा व पाणी हीं ज्यांच्या अंगांत अनेक धंदे खिळून जाऊन ज्यांचे देह शूद्रसदृश झाले आहेत-अशा लोकांच्या जिवावर हें बहिष्काराचें अवडंबर तुम्ही उभारलें असेल तर, ध्यानांत ठेवा, हे तुमचे कावेबाज पुढारी आपली कामगिरी झाल्याबरोबर खांका वर करून तुम्हांस तोंडघशीं देतील ! यांचें वर्तन असें आहे:—

न संध्यां संधत्ते नियमित निमाजां न कुरुते ।

स वा सौंजीबंधं कलयति न वा सौनतविधिम् ।
न रोजां जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते ।
न काशी मक्का वा शिवशिव हिंदुर्न यवनः ॥

अर्थः—" संध्या करीत नाहीं, व निमाजही पढत नाहीं, ज्याला सुंजही नको, म सुंतेचीही गरज नाहीं; रोजा माहीत नाहीं व एकादशीही करीत नाहीं; जो काशीलाही मानीत नाहीं व मक्केलाही विचारीत नाहीं;—एकून हरहर ! जो धड हिंदूही नाहीं आणि मुसलमानही नाहीं ! "

तेव्हां अशा प्रकारच्या थट्टा टकांकडून चकले जाऊं नका इतकेंच नाहीं, तर देशकालमानावर नजर देऊन सुधारणेच्या स्वाभाविक ओघास निष्कारण प्रतिरोध करूं नका, येवढेंच तूर्त सांगणें आहे !

बंधनें कोण व कोणतीं घालणार ?

ज्यांना बसल्या जागेवरून हालावयाचें नाहीं, व 'जुनें तेवढें चांगलें,' असें वरकरणीं म्हणत बसून, जुन्या लोकांकडून गाजी म्हणवून घ्यावयाचें आहे, त्यांच्या अनेक लपंडावांपेकीं हा एक लपंडाव आहे कीं, कोणतीहा गोष्ट करण्याची जबाबदारी आपल्या अंगावर न घेतां, ज्या गोष्टी कराव्या असें दुसरे लोक म्हणत असतील, त्यांतील दोष मात्र काढीत बसावयाचें, पण त्या करणें योग्य नसेल तर त्यांच्या ऐवजीं दुसऱ्या कोणत्या कराव्या, हें स्पष्टपणें सांगण्याची छाती कधींही करावयाची नाहीं ! कोठून करतील बापडे ! ज्यांच्या विचारांचा व आचारांचा पक्का काडीमोड झाला आहे, त्यांना अमुक प्रकारचें वर्तन चांगलें असें उघडपणें कोणून म्हणतां

येणार ! भलतेंच करणें उचित आहे, असें म्हणावें तर मोठ-मोठ्या पदव्या मिळविल्या असून व विद्वानांत नांवाचा उच्चार होत असून, अज्ञान व अप्रबुद्ध मनुष्यासमाणें कांहीं तरी बड-बडल्याचा दोष पदरीं येणार, व विचारानें प्रशस्त वाटलेल्या गोष्टीचा निषेध केल्याबद्दल काळजाला रात्रंदिवस टोंचणी लागणार ! बरें तसें न करावें, आणि मनास शुद्ध वाटत असेल तें उघडपणें बोलून दाखवावें, तर लोकांची इतराजी होऊन, लोकप्रशंसारूप चैतन्यहेतु आणि चैतन्याधार लयास जाणार ! अशा रीतीनें दोहों बाजूंनीं दोन प्रकारच्या इंगळ्या ज्यांस आपल्या तीव्र नांग्या मारीत आहेत, त्यांनीं सैरावैरा करूं लागून भलभलतें बडबडत सुटावें; बुद्धिमत्तेची व शहाणपणाची वृथा घमेंड मारीत बसून अमक्याची प्रोफेसरी जाईल अशा भीतीनें अमका अमक्याचा स्तुतिपाठ करीत आहे असें म्हणावें; आणि आपली प्रोफेसरी गेल्यामुळें, केवळ स्वारितार्थासाठीं घातलेलें बॅरिस्टरीचें नवीन दुकान भरभराटीनें नीट चालावें म्हणून किंवा अविचारानें अथवा दुराग्रहानें जीं मतें एकदां चांगलीं म्हटलीं व प्रसिद्धपणें ज्यांचा एकवार अंगीकार केला त्यांच्या उलट मतातील चांगलेपण कबूल केलें तर वर्गणीदार कमी होऊन शिवाय मूर्खपणाही पदरीं येणार तें टळावें म्हणून, द्रव्यार्जनासाठीं हवा तो धंदा करणाऱ्या समाजांतील अतिकनिष्ठ व्यक्तीसमाणें, दुरावस्था जो गिऱ्हाईक जाईल त्याला हाका मारमारून तो खुष होईल असा प्रलाप त्याच्यामुळें करावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. असलें वर्तन फायद्याचा हिशेब चोख रीतीनें करतां येणाऱ्या गणित्यालाच साधण्यासारखें आहे, व त्याच्या त्या शास्त्रांतील पांडित्याला जर कायद्याची थोडीशी फोडणी दिलेली असेल तर त्याला त्या वर्तनाची कुलाला सामान्य

लोक चकतील अशा रीतीनें छपावितां येणार आहे, हें आम्हीं कबूल करतों ! ज्यानें तर्कशास्त्राचीं फक्त दहापांच पानें वाचलीं आहेत त्याला ही मायासुराची कला साधावयाची नाहीं, व ती साधण्याची तो पर्वाही करीत नाहीं ! लोक कांहींही म्हणोत, असला मनुष्य मिशा वोढून घेऊन कर्मठ ब्राह्मणांच्या कळपांत शिरण्याची महत्त्वाकांक्षा न धरतां, आपल्या मनास शुद्ध वाटेल तें बोलतों, आणि "वडवाघुळाप्रमाणें माझी अवस्था झाली आहे" असे लाजिरवाणे शब्द स्वमुखांतून काढण्याचा शोचनीय प्रसंग स्वतःवर न यावा, म्हणून समाजास न सोडतां आपल्या आचारविचारांत जितकी संगत ठेवतां येईल तितकी ठेवण्याचा प्रयत्न करतो. असो; आमच्याकडे असलेल्या कर्जाची आज ही अंशतः फेड केली आहे येवढेंच येथें सांगतों, आणि असली तत्त्वविषयक प्रस्तावना पुरी करून मुख्य विषयाकडे वळतों.

समाजाची सुस्थिति असावी, आणि त्यास हळूं हळूं उन्नतावस्था येत जावी, यासाठीं प्रत्येक अवस्थेंत त्याला कांहीं बंधनें असणें अवश्य आहेत, व त्याच्या घटकांनीं त्यांचा प्रतिपाल केला पाहिजे, हें सामान्य विधान ज्याप्रमाणें आम्हीं कबूल करतों, त्याप्रमाणें अनेक कारणांनीं प्रत्येक समाजाच्या स्थितींत एकसारखा फेरफार होत असतो, म्हणून त्याच्या बंधनांतही फेरफार होत गेला पाहिजे, हें विधान पुराणप्रिय आमच्या प्रतिपक्ष्यांनीं कबुल केलें पाहिजे. कलह न होतां ज्या

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार ची मिक्श्चर ४१० पौंड.

मोरोक्को कॉफी ४१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

२२

समाजांत सुधारणा होत असते, त्या समाजाचे अज्ञ व प्रज्ञ घटक नकळत किंवा जाणूनबुजून निरुपयोगी झालेलीं जुनीं धंदे धनें टाकीत जातात, आणि नवीं लाऊन घेतात. कालमान प्रवाह्यानें बदलत चालले आहे, असें पाहून जुन्या लोकांनीं नव्या लोकांसाठीं आपली पुराणप्रियता किंचित् ढिली केली पाहिजे, व नव्या लोकांनीं जुन्या लोकांसाठीं आपली नवप्रियतारूपी घोडीशी कमी केली पाहिजे. तसें न होईल तर नव्या जुन्यांचें रण माजल्याशिवाय रहाणार नाहीं. अशाल्या रणांत उभय पक्षांतील लोकांनीं शब्दप्रहारांपलीकडे जाऊं नये, असें सामान्य इसम झणतात; पण ज्यांना आपणाकडे जगांतील दुर्लक्षित अकलेचा मक्ता आहे, असें वाटत असतें, ते अशा समरांत केशाकेशी व दंडादंडी होण्यास कांहीं हरकत नाहीं. येवढें प्रतिपादूनच रहातात असें नाहीं, तर पडद्याआड उभे राहून, अशा पुण्य कृत्यास आपल्या हातून होण्यासारखी मदत करतात ! असले इसम समाजाचे अत्यंत निर्घृण हितशत्रु होत, व अशांचें मायावीपण उघडें पाडणें म्हणजे समाजाचें कल्याण करणें होय ! सध्यां आपल्या समजांत जो कलह चालला आहे तो वर सांगितलेल्या सामोपचाराच्या मार्गानें मिटविण्याचा प्रयत्न न करतां, तो अधिकाधिक पेटत जाण्यासाठीं जे आपली अकल व विद्वत्ता खच करीत आहेत त्यांना कां मनुष्य म्हणावें, कां राक्षस म्हणावें, हें आम्हांस समजत नाहीं. पूर्वीचें कडकडीत ब्राह्मणपण आतां रहाण्याची आशा नाहीं, हें पक्कें समजलें असून, आपल्या आचरणानें व भाषणानें " तुम्ही करतां तें ठीक आहे; तुमचें बोलणें वाजवी आहे; गरज पडल्यास मी तुमच्यांत मिळून तुमची तरफदारी करण्यास तयार आहें " असें जुन्या लोकांस भासवून, त्यांचेकडून आश्रय, असंगदर्शित्व, व गर्वाचें अहिनकर अशा चळवळींचें

उठावणी करणाऱ्या मनुष्यानें 'मी समाजाचा खरा अग्रणी आणि मतप्रदर्शक प्रतिनिधि ' म्हणून राजरोस मिरवावें, याहून विशेष हास्यास्पद असें कांहीं असेल काय ? स्वातंत्र्याची विनाकारण ऐट मिरविणाऱ्या, पण वास्तविक पाहतां लौकिकाशेनें अज्ञजन-समूहाचे दासानुदास होऊन गेलेल्या, कांहीं दांभिकांचा भर न मिळतां, तर सध्यां बहिष्काराची जी शुष्क चर्चा चालली आहे ती मुळींच चालली नसती. पण यांनीं जर अशा रीतीनें मूढ लोकांस गोंजारलें नाहीं व विचारलें नाहीं, तर यांच्या नांवाचा नगारा कसा वाजणार, व प्रशस्त किंवा अप्रशस्त साधनांनीं यांना आपल्या प्रतिपक्ष्यांचा सूड कसा घेतां येणार ! समाजाच्या कल्याणाची जर यांना खरी कळकळ असती, तर बहिष्कारवाल्यांनीं ज्या अत्यंत असंभवनीय अटींवर साह्य घेण्यासाठीं, घरच्या भाकरी खाऊन, जोडे फाडण्याचा धंदा आरंभिला आहे त्यांत त्यांस पडूं दिलें नसतें, किंवा मानभावी लोक म्हणतात त्याप्रमाणें या बहिष्कारवाल्यांशीं त्यांचें कांहींच संगनमत नसतें. तर सांप्रत कालीं अमुक बंधनांचा त्याग केलाच पाहिजे, अमुक ठेविलीं पाहिजेत, व अमुक नवीन करून घेतलीं पाहिजेत, असें त्यांनीं उघडपणें सांगितलें असतें. समंजस लोकांनीं आपणांस अगदींच मूर्खांत काढूं नये, म्हणून जातांजातां असें म्हणावयाचें कीं, ब्राम्हणांनीं पुनर्विवाहांशीं संबंधित असलेल्या गृहस्थांशीं अन्नोदक व्यवहार करण्यास, पाहिजे त्या हिंदूच्या हातचें पाणी घेण्यास, उष्णातिशयाचा सोडावाटरानें उपशम कर-

---

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

प्यास, फार लांचच्या प्रवासांत दारुण क्षुत्पीडा दूर करण्यास्तव **विस्कुट्टाशन** करण्यास, किंवा एखादे प्रसंगीं केवळ मजालसे-खातर खिस्त्यानें तयार केलेल्या व परोपकारी आंग्ल स्त्रियांनीं प्रेमपुरःसर सुंदर कांचपात्रांत घालून पुढें केलेल्या **कांग्राव्हॅलें-तील फ्यामिली मिक्स्चराचे** उन्हन उन्हन चार घोट घेण्यास कांहीं हरकत नाहीं ! पण ही हकीकत समजल्यावर, गवयगाति ब्राह्मण जर असें म्हणूं लागले कीं, " काहो, आम्ही तुम्हांस आमचे अग्रणी समजतो. निदान तुम्ही आजपर्यंतच्या आपल्या भाषणांनीं व वाङ्मय कृत्यांनीं आम्हांस असें भासविलें आहे. तेव्हां तुमच्या विरुद्ध जी किंवदंती उठली आहे तींत कांहीं तथ्य आहे काय ?" तर या जंबूकवृत्ति **'न हिंदुर्न यवनास'** असें उत्तर द्यावें लागतें कीं, "माझ्या हातून नकळत तुम्ही म्हणता ती चूक झाली खरी; पण तीबद्दल तुम्ही सांगाल तें प्रायश्चित्त घेऊन मी तुमचा अग्रणी रहाण्यास तयार आहे !" जर हें आमचें लिहिणें या पंथाच्या लोकां-विरुद्ध शुद्ध बालंट असेल, तर ते आमच्या तीरावर किंवा तटांत आहेत, उलट तीरावर किंवा तटांत नाहींत, हें त्यांचें त्यांसच कबूल केलें पाहिजे ! पण सांप्रतकाळीं पखवाजाच्या दोनही तोंडांसारख्या त्यांना दोहोंकडूनही ज्या चपात्या मिळत आहेत त्यांचें कारण त्यांचें वर्तन व विचार नवीन पंथाचे असून, केवळ तोंडाच्या पोकळ थापांनीं ते जुन्या पंथांतील लोकांचें अग्रणीत्व आपल्या हस्तगत करून घेण्याच्या, व त्यापासून होणारे आधिभौतिक व अध्यात्मिक फायदे साधण्याच्या खुळ्या नादास लागले आहेत ? त्रिशंकूची पुण्याई मोठी असल्यामुळें तो कसा तरी अंतराळीं लोंबत राहिला; पण हे बिचारे अत्यंत पुण्यहीन असल्यामुळें दोन तटांच्या किंवा तीराच्या दरम्यान होत असलेल्या खळखळाटांत गडप होतील कीं काय ? अशी

भीति वाटते ! देव करो, आणि हे या किंवा त्या तटांस कसे तरी लागोत असें आम्ही मनापासून चिंतितों.

आतां कोणी असें विचारतील कीं, या दोन तटाच्या दरम्यान लहानसा सेतु किंवा किंवा पूल बांधतां येणार नाहीं काय, यावर आमचें असें उत्तर आहे कीं, वर निर्दिष्ट केलेल्या समाजाग्रणींसारखे समाजाग्रणी सुदैवानें पुढें न येतील तर थोडया वर्षांत या पुलाचे मच्छ पाण्याच्या पृष्ठभागावर दिसूं लागून, त्यांवर कमानी टाकण्याचा आणि त्यांवरून जाण्यायेण्यास सुलभ असा रस्ता करण्याचा संधि येण्याचा संभव आहे; कारण तसें करण्याचीं वरींच साधनें चोहोंकडून जुळूं लागलीं आहेत. पण या कौटिल्यपूर्ण **इतोभ्रष्टस्ततोभ्रष्टांच्या** अनिश्चल व परवंचक भाषणांनीं आणि कृत्यांनीं उभयपक्षांचा समय होण्याचीं चिन्हें कर्मांकमीच होत जाणार ! अशा लोकांच्या आधारावर जुने लोक जर भलभलते आग्रह धरून बसतील तर त्यांस ज्या धर्मग्लानीचें एवढें भय पडलें आहे ती त्यांस म्हणतां म्हणतां ग्रासून टाकील, असें वाटतें. आणि एका प्रकारें असेंच म्हावें, असें आमच्या मनांत कधीं कधीं येतें; कारण यांच्या धर्मग्लानीच्या बऱ्याच भागास आम्ही धर्मग्लानि न समजतं धर्मोत्कर्ष समजतों ! मूर्तिपूजा अजीबात नाहींशी होणें. जाच्या यागांचें धोतांड क्रमाक्रमानें शिथिल होत जाणें, वर्णसंकर होऊन पाहिजे त्याला पाहिजे त्याशीं अन्नोदकव्यवहार करण्याची किंवा लग्न लावण्याची सदर परवानगी असणें, पाहिजे त्यानें पाहिजे त्या शास्त्रांचा किंवा धर्मग्रंथांचा अभ्यास करणें, स्त्रीपुरु-

सुधारक.

राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयांची निर्भीड चर्चा करणारें महाराष्ट्रांतील एकटेंच साप्ताहिक. व. ८. हं. सह १४१३

मॅनेजर-सुधारक, पुणें सिटी.

पांनीं हव्या त्या वयापर्यंत किंवा मुळींच अविवाहित रहाणें, स्त्रियांस हवी ती विद्या संपादूं देणें किंवा हवा तो धंदा करूं देणें, ज्याचें त्यानें आपल्या तद्वयतीप्रमाणें लग्न करणें, अशौचादि कोणत्याही प्रकारच्या कारणानें कोणासही कुरूपता न येणें, और्ध्वदैहिकादि गलिच्छ व अमंगल संस्कार बंद पडणें– वगैरे गोष्टी प्रचारांत आल्यास कोणत्याही प्रकारची धर्मग्लानि होणार आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. अशा प्रकारच्या आचारांनीं हिताहून अहितच अधिक होत आहे, असा आमचा समज आहे. तथापि यांपैकीं कित्येक आचारांवर अनेकांचा खरा विश्वास असेल, याविषयीं आह्मांस शंका नाहीं. त्यांचा त्यांवरील विश्वास उडण्यास त्यांना अर्वाचीन पद्धतीचें शिक्षणच मिळालें पाहिजे. तें मिळून त्यांचीं मनें सुसंस्कृत होईपर्यंत, सर्वसामान्य अशीं कांहीं बंधनें करून घेण्यास आम्ही राजी आहों. पण आज तीं ठरविणार कोण व त्यांचा अंमल करणार कोण, हें मात्र समजत नाहीं !

आपल्या हातानें आपल्या पायावर दगड.

तोंडांस.

सध्यां बहिष्काराच्या कृत्यांत जे लोक गुंतले आहेत त्यांचें वर्तन आपल्या हातानें आपल्या पायावर दगड पाडून घेण्यासारखें होत आहे. धर्म म्हणजे काय, त्याचा विस्तार कसा होतो, त्याचें आकुंचन होण्यास काय कारणें होतात, त्याचें रूपांतर कशानें होतें, त्याची ग्लानि कां होते, त्याचें पुनरुज्जीवन होण्यास काय करावें, मनुष्याच्या अंतःकरणांतील धर्मबुद्धींत कोणत्या प्रकारचे फरक होत आहेत, व अखेरीस त्या धर्मबुद्धीस कोणतें स्वरूप प्राप्त होण्याचा संभव दिसत आहे, धर्मरक्षण करूं

इच्छिणारांच्या अंगीं कोणत्या प्रकारचें ज्ञान, सामर्थ्य व योग्यता पाहिजे वगैरे गोष्टींच्यासंबंधानें आमचे बहिष्कारवाले पूर्ण मुग्धावस्थेंत आहेत असें वाटतें ! ज्याप्रमाणें डोळ्यांस दोहों बाजूंनीं झांपडें लाविलेलें घोडे, हांकणाऱ्याच्या लगामाच्या हिसका बसेल तसे वळतात, व त्यांच्या चाबकाच्या फटकाऱ्याच्या मानानें पाय उचलतात, त्याप्रमाणें हे ज्ञानांध लोक विकारवश होऊन ते नेतील तिकडे जात आहेत ! ज्या आचारांस आह्मी धर्म समजत आहों, त्यांपैकीं बहुतेकांपासून आजपर्यंत आमचें कोणत्याही प्रकारचें ऐहिक किंवा पारमार्थिक हित झालें नाहीं, अशी जरी आमची खात्री होऊन चुकली आहे, तरी फलज्योतिष, किमया, शकुन, सुर, पिशाचयोनी, पुनर्जन्म वगैरे गोष्टींवरील विश्वास ज्या प्रकारच्या साहजिक कारणांनींच अस्तित्वांत आला त्या प्रकारच्या साहजिक व नैसर्गिक कारणांनींच नानातऱ्हेचे धर्मविचार आणि त्यावर अवलंबून असलेले नानातऱ्हेचे धर्माचार अस्तित्वांत आले असावे, असें मानणें जरूर आहे. तेव्हां ज्यांना आज ते नकोसे झाले असतील त्यांनीं ते झुगारून द्यावयाचे झाले तरी वेताबेतानें झुगारून दिले पाहिजेत. कारण, समाजांतील प्रत्येक मनुष्याचा बऱ्याच इतर मनुष्यांशीं संबंध असतो. या संबंधामुळें त्याच्या असामान्य वर्तनाचा संसर्ग इतरांपर्यंत जाऊन पोहोंचतो; व हें वर्तन सामान्य लोकांच्या वर्तनाहून फारच भिन्न असलें, आणि अशा व्यक्तीवर अवलंबणाऱ्या आश्रितांचा समुदाय फारच मोठा असला, तर त्या

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें संचित्र
संगीत समाजादर्श नाटक.
ब. चिं. घारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर्. सॅन्. आय्. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपया.
' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

सर्वांना या वर्तनामुळें बराच मोठा धक्का पोहोंचतो. तथापि ज्यांची ज्या गोष्टीविषयीं चालंजाल खात्री झाली आहे, व जिच्या अनुरोधानें आचरण केलें नाहीं तर आपण आपलें कर्तव्य बजावलें नाहीं असें वाटून, ज्यांस मनाची रात्रंदिवस टोंचणी लागणार आहे, व शिवाय मधून मधून इतरांकडून " दांभिक " असेंही म्हणवून घ्यावें लागणार आहे, असे मनुष्य लोकमताची विशेष पर्वा न करतां, आपल्या मनास शुद्ध वाटेल त्याप्रमाणें वागतात, व त्यांस तसें वागूं देणें हेंच समाजास अत्यंत हितकारक आहे. कारण, वर्तनाचा अमुक पंथ चांगला किंवा अमुक विचार कधींही चुकीचे ठरावयाचे नाहींत, असा व्यर्थ गर्व कोणत्याही व्यक्तीनें बाळगूं नये. ज्याप्रमाणें मनुष्यविषयक इतर गोष्टींत दिवसेंदिवस फरक होत आहे, त्याप्रमाणें मनुष्यांच्या धर्मविषयक आचारांत व विचारांतही फरक होत आहे, व तो झालाच पाहिजे. त्याला अवरोध करण्यापासून समाजाचा नफा न होतां उलट नुकसान होतें. **प्रायः स्वंमहिमानं क्षोभात् प्रतिपद्यते जंतुः** (म्हणजे प्राण्याला चिथविलें असतां तो आपला पराक्रम दाखवितो) अशी संस्कृतांत म्हण आहे. हिंदुस्थानांतील नवीन पिढीच्या लोकांस पूर्वीपेक्षां अगदीं निराळ्या तऱ्हेचें शिक्षण मिळत असल्यामुळें, त्यांच्या धर्मकल्पना जुन्या लोकांच्या धर्मकल्पनांहून निराळ्या झाल्या आहेत, व तदनुसार त्यांच्या धर्माचरणांत अंतर पडत आहे. हें अंतर दिवसेंदिवस अधिकाधिक पडत जाणार. याला आवरण्याचा प्रयत्न करणें म्हणजे कड्यावरून तुफान वेगानें खालीं येणाऱ्या पाण्याच्या लोंढ्याचा प्रवाह मागें उलटविण्याचा अशक्य प्रयत्न करण्या-सारखें होय ' याचा परिणाम कदाचित् येवढाच होणार आहे कीं, बहिष्कारवाल्यांनीं माराकुटी करून वेडावांकडा मांध घातला, तर क्षणभर त्या प्रवाहाची गति स्तंभित झाल्यासारखा

होईल खरी; पण जें पाणी निघून गेलें नाहीं तें तुंबून राहून मागें फुगत जाईल, व थोड्याच वेळांत त्याचा जबरदस्त दाब व वेग त्याला अडविण्यासाठीं घातलेल्या बांधाऱ्यास किंवा धरणास अनावर होऊन, **इंद्राय तक्षकाय स्वाहा** या न्यायानें, त्या चिखलाच्या भिंताडाची आणि त्याची लिंपालिंप करीत बसणाऱ्या अविचारी लोकांची शोचनीय अवस्था होईल !

देशकालवर्तमानाचा विचार न करतां, अंगीं असेल तेवढें सामर्थ्य दुसऱ्यावर जुलूम करण्यांत खर्ची घालणारांची अशी दशा झाली असें कधींही होत नाहीं. अशा लोकांना मागून मोठा पश्चात्ताप होतो. पण त्याचा काय उपयोग ? फ्रान्स देशांतील कुलीन घराण्यांतले लोक, धर्माधिकारी, दरबारी लोक, आणि सरकारी अधिकारी आपल्या जुलमाच्या काढण्या योग्य-वेळीं थोडया ढिल्या करते तर १७८९ त त्या देशांत जी टोले-जंग राज्यक्रांति झाली ती कदाचित् त्यांस टाळतां आली असती, असें कित्येक इतिहासकारांचें म्हणणें आहे. पण योग्यवेळीं त्यांना तसें करणें प्रशस्त वाटलें नाहीं, म्हणून फ्रान्स देशांत तो प्रचंड वणवा पेटला, आणि त्याच्या भडाक्यांत साऱ्यांसच दारुण यातना सोसाव्या लागल्या ! आमच्या सांप्रत धर्मकलाहाचीही तशीच अवस्था होणार आहे. ज्याचें वर्तन म्हणण्यासारखें शुद्ध नाहीं; जगाच्या सुधारणेचा ओघ कोणत्या दिशेनें चालला आहे हें समजण्याजोगें ज्यांपैकीं एका-सही स्वाभाविक किंवा संपादित शहाणपण नाहीं; व पदरीं पडलेल्या नायकोशिवाय ज्यांची कोणवरही सत्ता किंवा अधि-

---

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

कार चालत नाहीं—अशा गेंग्या लढवय्यांनीं बहिष्काराच्या भंगलेल्या जुन्या तोफेतून निघणाऱ्या फुसक्या गोळ्यांनीं नवीन पिढींतील लोकांवर हल्ला करून त्यांस चीत करण्याचा, व साधल्यास त्यांना हस्तगत करून घेऊन, कुचक्या कर्माचाररज्जूंनीं त्यांस बांधून घालण्याचा, व स्मशानादि कारागृहांत किंवा तशाच प्रकारच्या इतर ठिकाणीं क्षौर, पिंडदान, पंचकव्यप्राशन, तरुणीकेशनयन, होम, ब्राह्मणभोजन व दक्षिणा इत्यादि पुण्य धर्मकर्में त्यांच्याकडून सक्तीनें करविण्याचा घाट घातला आहे ! वैदिकधर्मविघातकांनो, या तुमच्या मूर्खपणाच्या वर्तनामुळें वैदिकधर्माचा ज्यांना कंटाळा आला आहे ते नर त्याचा वेधडक त्याग करतीलच ! पण आजपर्यंत त्यांना कोणीं चियविलें नसल्यामुळें, ते आपल्या संबंध्यांच्या किंवा तुमच्या सांगितला कधींहीं गेले नाहींत. " विनाकारण धर्मकलहकक्षासाठीं माजवा ? आपणांस जें शिक्षण मिळालें आहे, त्याचा जसजसा प्रसार होत जाईल तसतशी आपल्याप्रमाणें इतरांची विचारदिशा फिरत जाईल " असें त्यांत वाटत होतें, आणि म्हणून ते आपण होऊन कधीं कोणाच्या वाटेस जात नव्हते. पण आजमित्तीस आपण होऊन नसते भांडण उ रून काढण्याची दुर्बुद्धि तुम्हांस आठवली आहे. तीं लौकर लयास जाईल तर बरें आहे; नाहीं तर वैदिकधर्माचा नाश केल्याचें श्रेय तुमच्याकडे येईल इतकेंच नाहीं, तर सर्व लोकांच्या आधीं महाराष्ट्रीय लोकांस नास्तिक पक्के करून टाकल्याचें श्रेयही तुमच्याकडेच येणार आहे ! नव्या पिढींतील लोक आपण होऊन वैदिकधर्मास जेवढा मान देत आहेत तेवढ्यांत संतोष न मानतां, आपल्याप्रमाणें त्यांना ह्या धर्माचे गुलाम करण्याचा प्रयत्न कराल तर टार बुडाल, हें पक्कें लक्षांत ठेवा. तुमच्या जुलमामुळें नवीन पिढी वैदिकधर्मास अजीबात झुगारून देऊन केवळ निर्धर्म होऊन बसेल ! वैदिक-

धर्म आम्हांस जरी निर्दोष वाटत नाहीं, तरी एकाएकीं त्याची अशी दशा व्हावी, हें आम्हांस देखील संमत नाहीं. पाश्चिमात्य शिक्षणानें ज्यांचें विचारांतर झालें आहे अशांवर विचारांतर न झालेलीं शेंकडों स्त्रीपुरुषें अवलंबून आहेत. आजपर्यंत या शेंकडों स्त्रीपुरुषांस आपापल्या समजुतीप्रमाणें धर्माचरण करण्यास सांपडत आहे. अशा प्रकारच्या परावलंबी स्त्रीपुरुषांच्या पालकांवर किंवा पोषिंद्यावर बहिष्कार घालण्यास तुम्हीं आरंभ केला आहे; तेव्हां आतां त्या परावलंबी स्त्रीपुरुषांनीं तुम्हांस प्रशस्त वाटलेल्या धर्माचें परिपालन करण्यासाठीं उपाशीं मरण्यास किंवा भीक मागण्यास तयार झालें पाहिजे, किंवा तुम्ही वाळींत टाकलेल्या पोषिंद्यांबरोबर वाळींत पडलें पाहिजे. अशा पेंचांत शेंकडा नव्याण्णव स्त्रीपुरुषें कोणता मार्ग पतकरतील हें समजण्यापुरतें तुम्हांस तारतम्य असेल, तर आपण आरंभिलेला आत्मघातक धंदा सोडून देणें जरूर आहे, असें तुम्हांस दिसून येईल. दुर्दैवानें इतकें तारतम्य तुमच्यांत नसेल तर मुख्य मुख्य धर्माचारांचा बारावाते-रावा दिवस तुमच्या डोळ्यांदेखत होऊन जाईल? अलीकडे जीं तुम्ही चोरटीं प्रायश्चित्तें भटाभिक्षुकांस आपआपसांत देऊं लागलां आहांत, व जे मऊ गृहस्थ सांपडतील त्यांपासून दंडाऐवजीं निघतील तितक्या चवल्या किंवा पावल्या काढण्याचा जो क्रम चालविला आहेत, त्यांत तुमच्याकडून तुमचा उपहास करण्याजोगे अनेक प्रमाद होत आहेत, ही गोष्ट एकीकडेच राहूंद्या, पण ज्या शास्त्रार्थांच्या किंवा शास्त्र्यांच्या आधारावर हा धर्मकलह तुम्हीं उपस्थित केला आहे, त्या

लेखकांस योग्य मोबदला देऊन आम्हीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

शास्त्रार्थास आणि शास्त्र्यांस मोडून काढणारे शास्त्रार्थ आणि शास्त्री लोकरच या वादांत दृष्टीस पडूं लागणार आहेत, आणि नियमाला नियम, वैदिकाला वैदिक, शास्त्र्याला शास्त्री, गृहस्थाला गृहस्थ आणि बहिष्काराला बहिष्कार-अशा प्रकारचें द्वंद्वयुद्ध सुरूं होणार आहे, याचें तुम्हांस स्वप्न तरी पडलें आहे काय? **सुधारक** आणि **सुधारणा** या शब्दांचा विपरीत अर्थ करून, त्याच्या भरांत तुम्ही त्यांविरुद्ध हवें तसें बहकूं लागलां आहांत. पण हें पक्कें ध्यानांत ठेवा कीं, मांसाहार, मदिरापान, व्यभिचार, अनृत भाषण, विश्वासघात, अप्रामाणिकपणा, क्रूरपणा वगैरे गोष्टी खऱ्या सुधारकांस तुम्हांपेक्षां अधिक निंद्य वाटतात. पण हीं महापातकें कितीही वाढलीं तरी त्याची तुम्हांस विशेष काळजी वाटत नाहीं. अशा प्रकारच्या पातकांत रात्रंदिवस पोहोंणारा मनुष्य तुमच्या दृष्टीनें अत्यंत धर्मनिष्ठ असून, त्याच्याशीं अन्नोदकव्यवहार करण्यासच काय, पण त्याच्या अंगुष्ठाचें तीर्थ घेऊन, आपल्या पापाचें क्षालन करून घेण्यास देखील तुम्ही तयार व्हाल! पण या घोर पातकांपैकीं ज्याला एकाचाही स्पर्श झाला नाहीं, असा एखादा ब्राह्मण, प्रभू किंवा सारस्वत शूद्राच्या हातचें उघडपणें पाणी पींईल, एखाद्या ख्रिस्ती स्नेह्याच्या घरचों चार दोन बिस्कुटें आणि पेलाभर चहा यांचें सेवन करील, किंवा अडचणीच्या वेळीं एखाद्या मुसलमानानें तयार केलेला भात खाईल तर मात्र तुम्हीं त्यास वाळींत टाकणार, व पंधरा पावल्या दिल्या कीं त्याबरील बहिष्कार काढून घेणार! काय धर्म! काय प्रायश्चित्त!! काय धर्मशास्ते! ' ! धिक् तुमच्या धर्माला, तुमच्या प्रायश्चित्ताला आणि तुम्हांला! मन्वादिकांचे ग्रंथ जरी तुम्हांस नीट माहीत असते, आणि त्याप्रमाणें चालण्याचा तुमचा निश्चय असता, तरी देखील तुमचा हातून असल्या वेड-

गळपणाचें वर्तन झालें नसतें ! ज्या धर्मपुस्तकांस तुम्ही प्रमाण मानतां, तीं धर्मपुस्तकें तरी डोळे उघडून पहा, आणि त्यांत सांगितलें असेल त्याप्रमाणें आचरण करा. आम्हांस त्या ग्रंथांची विशेश माहिती नाहीं हें आम्ही कबूल करतों; पण त्यासंबंधानें कित्येक शास्त्र्यांशीं आमचें जें बोलणें झालें आहे व विशेषतः रा. **वामनशास्त्री मराठे** यांनीं आम्हांस जी माहिती दिली आहे तीवरून सध्यां चालू असलेला बहिष्काराचा प्रकार फारच अप्रयोजकपणाचा आहे असें आम्हांस वाटतें. पुढल्या अंकांत खुद्द शास्त्रीबोवाच यासंबंधानें कांहीं मजकूर लिहिणार आहेत, तेव्हां आजच आम्हीं **अव्यापारेषुव्यापार** करूं नये, हें बरें दिसतें !

बहिष्कृतांनीं बहिष्कार घालावा हा चमत्कार नव्हे काय ?

सध्यां कांहीं गृहस्थांनीं व शास्त्र्यांनीं गांवांत जी बहिष्काराची धामधूम चालविली आहे तिला काय म्हणावें, हें आम्हांस समजत नाहीं. त्यांच्या कृतीला चोरटा जुलूम हेंच नांव योग्य दिसतें. पांच हौदमिशनांत ज्यांनीं चहा घेतला, किंवा भिकारदासाच्या बागेंत जे जेवायास गेले त्यांनीं जातिभ्रष्ट होण्यासारखें काम केलें, असें सदाशिवशास्त्री थत्ते, नारायणशास्त्री गडचोले, बाळासाहेब नातू, गोविंदराव गद्रे वगैरे शास्त्रीगृहस्थांचें मत असेल तर त्यांनीं गांवांतील प्रमुख शास्त्री, भिक्षुक,

---

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ०५

खेडकरवैद्य अॅन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

व गृहस्थ यांची सभा भरवून तीपुढें या लोकांवर जो आरोप ठेवणें त्यांस प्रशस्त वाटत असेल तो त्यांनीं ठेवावा, व शास्त्रीरीत्या त्याची चर्चा करून, मग बहुमतानें जो मार्ग प्रशस्त दिसेल त्याचें अवलंबन करावें हें उचित दिसतें. हें सारें सोडून देऊन, दहापांच जणांनीं एक लहानशी धर्मकमिटी करावी, आणि तिनें श्रीकडे हवा तसला पत्रव्यवहार करावा, आणि पाहिजे त्या गृहस्थाला किंवा भिक्षुकाला वाळींत टाकावें, हा कोठला जुलूम व न्याय ? पुण्यग्रामस्थ बहुतेक शास्त्रीभिक्षुकांनो, प्रस्तुत बहिष्कार प्रकरणांत गुंतलेले शास्त्री व भिक्षुक तुमचा अधिकार बळकावून स्वेच्छेप्रमाणें इतरांचा छळ करीत आहेत, हें तुमच्या ध्यानांत येत नाहीं काय ? हे तुमचे गडबोले, थत्ते किंवा नातू यांची सांप्रत कालांत खरी योग्यता किती आहे, हें ज्या आम्हां गृहस्थांस पक्कें ठाऊक आहे, ते आम्ही त्यांच्या बहिष्काराला आणि त्यांना तृणवत् मानतों, हें तुम्हांस ठाऊक आहेच. पण तुम्हां बहुतेक भिक्षुकांचा आणि शास्त्र्यांचा त्यांनीं जो निष्कारण भंडवडा मांडिला आहे तो तुम्ही मुकाट्यानें कशाकरितां सहन करतां ? शोधाअंतीं तुम्हांस दोन गोष्टी दिसून येतील त्या ह्या. एक, सध्यां बहिष्कारांत गुंतलेले शास्त्री व गृहस्थ धर्मशास्त्राप्रमाणें आणि श्री. शंकराचार्यांच्या आज्ञेप्रमाणें अत्यंत बहिष्कृत आहेत, तेव्हां त्यांना दुसऱ्यास बहिष्कार घालण्याचा अधिकार मुळींच पोहोंचत नाहीं. उलट, जे त्यांच्याशीं व्यवहार करतील तेच पतित होणार आहेत. दुसरें, बहिष्काराची गोष्ट एक किंवा दोन व्यक्तींच्या तक्रारीवर अवलंबून असत नाहीं. तिचा सगळ्या जातीशीं संबंध पोहोंचतो; तेव्हां जातींतील सर्व प्रमुख गृहस्थांनीं तिचा विचार केला पाहिजे. पांचहौद मिशन किंवा भिकारदासाची बाग येथें जो प्रकार झाला त्याबद्दल जाहिरसभा भरवून, त्याची उघडपणें चर्चा करण्यांस हे आचारवान्,

हे बुद्धिवान्. हे ज्ञानवान्, व हे प्रतिष्ठावान् आर्यधर्मा-धारस्तंभ कां कचरताहेत, व लपूनछपून गरीब सावजांवर उड्या कां टाकीत आहेत, याचा विचार तुम्हीं अवश्य केला पाहिजे. वामनशास्त्री मराठे यांचें असें म्हणणें आहे कीं, सदाशिवशास्त्री किंवा नारायणशास्त्री यांस जर शास्त्रार्थ समजत असेल, निष्पक्षपातानें शास्त्रार्थ करण्याची त्यांची इच्छा असेल, व खरोखरीच हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें आणि श्री. शंकराचार्यांच्या आज्ञेप्रमाणें रहाण्याचा त्यांचा हेतु असेल, तर या चहावाल्यांकडून किंवा जेवणवाल्यांकडून खुद्द आपले आपण अधिक पतित व बहिष्कारार्ह आहों, हें त्यांना स्वतःच्या तोंडानें कबूल करावें लागेल ! रा. व. रानडे यांशीं कोणत्याही प्रकारचा संसर्ग ठेऊं नये, अशी संस्थान देवतेची आज्ञा असून, सदाशिवशास्त्र्यांसारख्या धर्मनिष्ठ, कर्मठ, व धर्मज्ञ शास्त्र्यांनीं, त्यांच्या समवेत नानासाहेब फडतरे यांच्या दिवाणखान्यांत वे. शा. सं. पाप्पय्याशास्त्री सोमयाजी यांचें वेदार्थाचें व्याख्यान कसें ऐकलें ? उपनिषदादि ग्रंथांवर जेकब साहेबांनीं केलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे पवाडे गाऊन तद्दुक्त उच्छिष्ट द्रव्यें मिटक्या मारीत यांनीं कशीं भोगिलीं ? रा. रा. का. प. गाडगीळ यांच्याशीं दक्षिणाग्रहणादि व्यवहार आजपर्यंत निःशंकपणें यांनीं कसे केले ? आनंदाश्रमाच्या व्यवस्थापकाचें नांव प्रसिद्ध वेचाळिसांत आहे, येवढ्याच कारणास्तव आनंदाश्रमांत कथा करणाऱ्या हरिदासाला बहिष्काराचा बागुलबोवा दाखविणाऱ्या आर्यधर्मरक्षक शास्त्र्यांना, वैदिकांना व गृहस्थांना

निबंधसंग्रह.

भाग १ ला. कि. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

आह्मी असें विचारतों कीं, तुह्मी कोणत्या वासनेनें खुद्द आपलें आपल्या जगद्गुरूचें, आणि आपल्या धर्माचें हंसें व नुकसान करून घेण्यास प्रवृत्त होत आहां ? तुमच्या अंनें रा. व. रानडे यांस एकदां बहिष्कृत केलें होतें हें तुम्हांस ठाऊक आहेना ! असें असून त्या श्रीकडून अशा गृहस्थांस पंचहौद मिशनांत तुम्ही धर्मविरुद्ध जें आचरण केलें त्याबद्दल तुमचें काय म्हणणें आहे हें तोंड जबानीनें किंवा पत्रद्वारा एक महिन्याच्या आंत स्वामीचरणारविंदीं जाहीर करा, नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज करण्यांत येईल, अशा अर्थाची धमकीची नोटीस येणें म्हणजे बौद्ध, ख्रिस्ती, किंवा महंमदीय धर्मानुयायांवर करवीरमठाधिपतीनें आपला धर्माधिकार चालविण्यासारखें होत नाहीं काय ? तसेंच, पुणेंवैभवासारख्या अनेक वेळ अविश्वसनीय ठरलेल्या वर्तमानपत्राच्या आधारावर गोविंदराव गद्यासारख्या गृहस्थांनीं श्रीस पाहिजे तो मजकूर कळवावा, आणि त्यावर श्रीनें पाहिजे तशा नोटिसा काढाव्या, हें शुद्ध धाडस नव्हे काय ? सिस्टर्स होममध्यें ज्यांनीं चहा घेतला नसून ज्यांचीं नावें पुणेंवैभवानें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांनीं आतां गोविंदरावावर किंवा "महानुशासनवरीवार्ति" अशा सहीचा हुकूम सोडणाऱ्या धर्माध्यक्षावर बेअबूची फिर्याद लाविली तर त्यांचीं चिमणीसारखीं तोंडे होणार नाहींत काय ! वृथाधर्माभिमान्यांनो इतके विकारवश, इतके अज्ञानवश, इतके तारतम्यशून्य होऊं नका, आणि आजच धर्माच्या मुळावर कुऱ्हाड घालूं नका !

ग्रामण्यप्रकरण.

थोड्या दिवसांपूर्वी येथें माजलेल्या चहाकाफीच्या प्रकरणा-संबंधानें मोठा वाद उपस्थित होऊन तो तोडून घेण्यासाठीं सरकारदरबार झालें, आणि निष्कारण दुसऱ्याची इज्जत घेणाऱ्या पक्षास दंड भरावा लागला, हें वाचकांनीं ऐकलें असेलच. या कज्जाचा निकाल अद्यापि लागला नाहीं. दंड झालेल्या पक्षानें एका वरिष्ठ कोर्टांत आपल्यातर्फे अपील लावलें व त्यानें तें वरच्यावर फेंटाळून टाकलें. तथापि धीर न सोडतां हायकोर्ट पाहण्याचा त्या पक्षाचा विचार आहे, असें आम्ही ऐकतों. यांत कांहीं वावगें नाहीं. ब्रिटिश राज्यांत कोर्ट-परंपरा स्थापण्यांत आली आहे इतकेंच नाहीं, तर एखाद्या कामांत न्यायसभांकडून किंवा न्यायाधिकाऱ्याकडून फसगत झाली असें दिसून आल्यास, प्रवर्तक सरकारास किंवा त्याच्या अध्यक्षास निष्कलंक न्यायसंशोधन होऊं देण्यासाठीं किंवा निष्कारण न्याय आणि करुणा यांचें संमेलन होऊं देण्यासाठीं, न्यायसभांनीं किंवा न्यायाधिकाऱ्यांनीं केलेल्या ठरावांत फेरचदल करण्याचा किंवा वऱ्याच अंशीं ते रद्द करण्याचा अधिकार आहे. तेव्हां सांप्रत प्रकरणांतील प्रतिवादीची मजल हायकोर्टापर्यंतच संपली पाहिजे असें नाहीं. मुंबई सरकार, सेक्रेटरी ऑफ स्टेट, किंवा खुद्द महाराणी साहेब यांनाही या कामांत

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठ ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाव्हा ऑफीस सदाशिव पेठ,

हान घालतां येऊन, सिटीमॅजिस्ट्रेटाचा निकाल रद्द करतां येणार आहे, व या सवलतीचा फायदा प्रतिवादीच्या दीर्घ प्रयत्नानें त्यास मिळून त्यानें दिलेला दंड, शक्य असल्यास त्यास परत मिळावा, अशी आमची इच्छा आहे !

ही या प्रकरणाच्या एका बाजूची भूत, वर्तमान व भावी हकीकत आहे. याच्या दुसऱ्या बाजूस आरंभीं थोडी चळवळ होऊन पुढें ती थंडावली. पण ती अगदींच विझली असें नाहीं. राखेखालीं ती हळू हळू धुमसत होती. गेल्या आठवड्यापासून तिला पुनःचेतना प्राप्त झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या चेतनेचें कारण श्री. शंकराचार्यांच्या दोन विद्वान् प्रतिनिधींचें अग्रागमन होय. हे येथें या प्रकरणाच्या चौकशी करतांच आले आहेत, व चालू आठवड्यांत चौकशी सुरू आहे. धर्मदिशेनें हा खटला सध्यां चौकश्यन्तर्गत ऊर्फ **सब जुडाइस** असल्यामुळें, त्यावर टीका करण्याची आमची इच्छा नाहीं. अशा स्थितींत टीका करण्याचा अधिकार धर्मशास्त्रीय सोसाजराप्रमाणें किंवा व्यवहारनियमाप्रमाणें आह्मांस आहे किंवा नाहीं, याची आह्मांस खात्री नाहीं. तथापि तो नाहीं असें, गृहीत धेऊन या खटल्यांतील पुराव्याविषयीं, साक्षीदारांविषयीं, जबान्या घेण्याच्या पद्धतीविषयीं, वकिलांच्या किंवा मुखत्यारांच्या तारतम्याविषयीं, अथवा न्यायाधिकाऱ्यांच्या वर्तनाविषयीं कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उल्लेख करण्याची आमची इच्छा नाहीं. न्यायसंमत कोणत्याही प्रकारची चाचाचाच किंवा घिसामस्ती न होतां, श्रीच्या प्रतिनिधींनीं हातीं घेतलेली चौकशी धडरीतीनें शेवटास जावी, आणि त्यांचा निकाल श्रींच्या उच्चपदास व लौकिकास, न्याय करणाऱ्यांच्या निःपक्षपातचातुर्यास व विद्वत्तेस, उभयपक्षांच्या संमतीस, आणि समस्त लोकांच्या मान्यतेस पात्र होण्यासारखा व्हावा, येवढेंच

आमचें मागणें आहे. कालमानावर नजर देऊन अशा तऱ्हेचा निकाल करण्यांत आला नाहीं तर त्याचा पुढें काय परिणाम होईल, एवढेंच येथें थोडक्यांत सांगण्याचा विचार आहे.

या वादग्रिय मजेदार तऱ्हेवाईक शहरांत थोडया वर्षांपूर्वी अशाच प्रकारचें किंबहुना याहून फार खडतर असें एक प्रकरण उद्भवलें होतें, हें वाचकांना ठाऊक असेलच. त्याप्रसंगीं खुद्द श्रीची स्वारी येथें आली होती, व खुद्द श्रीच्या समक्ष त्याची चौकशी होऊन आरोपींवरील गुन्हा शाबीत झाला होता, व धर्मशास्त्रांत सांगितलेली अत्यंत कठोर जी बहिष्काराची शिक्षा ती त्यांस देण्यांत आली होती. पण या शिक्षेपासून म्हणण्यासारखा फायदा झाला असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. ज्या अपराधाबद्दल शिक्षा द्यावयाची तो दिवसेंदिवस कमी होत जावा आणि ज्या इसमांना ती देण्यांत आली असेल त्यांचें वर्तन सुधारावें–हा जो शिक्षेचा मूळ उद्देश तो कोणत्याही रीतीनें सिद्धीस गेला आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. श्रींनीं व श्रीस मदत करणाऱ्या धर्मशील पंडितांनीं पुनर्विवाह अशास्त्र ठरविला असून, तो प्रतिवर्षी लोकादरास अधिकाधिक पात्र होत आहे, व बहिष्काराच्या भीतीस न जुमानतां, सदय व निग्रही मातापितरें आणि बंधू आपल्या कन्यांचा व भगिनींचा वैधव्यांत करण्यास प्रवृत्त होत आहेत. यावरून काय उघड होतें कीं, यासंबंधानें अस्तित्वांत असलेल्या धर्मशास्त्राची आणि समंजस व सकरुण लोकांच्या मनाची प्रवृत्ति अगदीं निराळी आहे. व कालेंकरून धर्मशास्त्र मागें पडून पुनर्विवाह रूढ होण्याचीं चिन्हें

प्लॉट्स गाडयानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर–हवाशीर, सर्व पार्णा खेळविलेले असे.

मॅनेजर—सुधारक.

हात घालतां येऊन, सिटीमॅजिस्ट्रेटाचा निकाल रद्द करतां येणार आहे, व या सवलतीचा फायदा प्रतिवादीच्या दीर्घ प्रयत्नानें त्यास मिळून त्यानें दिलेला दंड, शक्य असल्यास त्यास परत मिळावा, अशी आमची इच्छा आहे !

ही या प्रकरणाच्या एका बाजूची भूत, वर्तमान व भावी हकीकत आहे. याच्या दुसऱ्या बाजूस आरंभीं थोडी चळवळ होऊन पुढें ती थंडावली. पण ती अगदींच विझली असें नाहीं. राखेखालीं ती हळू हळू धुमसत होती. गेल्या आठवड्यापासून तिला पुनःचेतना प्राप्त झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या चेतनेचें कारण श्री. शंकराचार्यांच्या दोन विद्वान् प्रतिनिधींचें अग्रागमन होय. हे येथें या प्रकरणाच्या चौकशी करतांच आले आहेत, व चालू आठवड्यांत चौकशी सुरू आहे. धर्मादेशानें हा खटला सध्यां चौकश्यन्तर्गत ऊर्फ **सब जुडाइस** असल्यामुळें, त्यावर टीका करण्याची आमची इच्छा नाहीं. अशा स्थितींत टीका करण्याचा अधिकार धर्मशास्त्रीय प्रोसीजराप्रमाणें किंवा व्यवहारनियमाप्रमाणें आह्मांस आहे किंवा नाहीं, याची आह्मांस खात्री नाहीं तथापि तो नाहीं असें, गृहीत घेऊन या खटल्यांतील पुराव्याविषयीं, साक्षीदारांविषयीं, जबान्या घेण्याच्या पद्धतीविषयीं, वकिलांच्या किंवा मुखत्यारांच्या तारतम्याविषयीं, अथवा न्यायाधिकाऱ्यांच्या वर्तनाविषयीं कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उल्लेख करण्याची आमची इच्छा नाहीं. न्यायसंमत कोणत्याही प्रकारची वाचा-वाच किंवा धिंगामस्ती न होतां, श्रीच्या प्रतिनिधींनीं हातीं घेतलेली चौकशी धडरीतीनें शेवटास जावी, आणि त्यांचा निकाल श्रींच्या उच्चपदास व लौकिकास, न्याय करणाऱ्यांच्या निःपक्षपातचातुर्यास व विद्वत्तेस, उभयपक्षांच्या संमतीस, आणि समस्त लोकांच्या मान्यतेस पात्र होण्यासारखा व्हावा, येवढेंच

आमचें मागणें आहे. कालमानावर नजर देऊन अशा तऱ्हेचा निकाल करण्यांत आला नाहीं तर त्याचा पुढें काय परिणाम होईल, एवढेंच येथें थोडक्यांत सांगण्याचा विचार आहे.

या वादग्रिय मजेदार तऱ्हेवाईक शहरांत थोडया वर्षांपूर्वी अशाच प्रकारचें किंवहुना याहून फार खडतर असें एक प्रकरण उद्भवलें होतें, हें वाचकांना ठाऊक असेलच. त्याप्रसंगीं खुद्द श्रीची स्वारी येथें आली होती, व खुद्द श्रीच्या समक्ष त्याची चौकशी होऊन आरोपींवरील गुन्हा शाबीत झाला होता, व धर्मशास्त्रांत सांगितलेली अत्यंत कठोर जी बहिष्काराची शिक्षा ती त्यांस देण्यांत आली होती. पण या शिक्षेपासून म्हणण्यासारखा फायदा झाला असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. ज्या अपराधाबद्दल शिक्षा द्यावयाची तो दिवसेंदिवस कमी होत जावा आणि ज्या इसमांना ती देण्यांत आली असेल त्यांचें वर्तन सुधारावें–हा जो शिक्षेचा मूळ उद्देश तो कोणत्याही रीतीनें सिद्धीस गेला आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. श्रींनीं व श्रीस मदत करणाऱ्या धर्मशील पंडितांनीं पुनर्विवाह अशास्त्र ठरविला असून, तो प्रतिवर्षी लोकादरास अधिकाधिक पात्र होत आहे, व बहिष्काराच्या भीतीस न जुमानतां, सदय व निग्रही मातापितरें आणि बंधू आपल्या कन्यांचा व भगिनींचा वैधव्यांत करण्यास प्रवृत्त होत आहेत. यावरून काय उघड होतें कीं, यासंबंधानें अस्तित्वांत असलेल्या धर्मशास्त्राची आणि समंजस व सकरुण लोकांच्या मनाची प्रवृत्ति अगदीं निराळी आहे. व कालेंकरून धर्मशास्त्र मागें पडून पुनर्विवाह रूढ होण्याचीं चिन्हें

स्लिप्स गाडग्यानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें) रुमोर–हवाशीर, सर्व पार्णा खेळविलेले असे.

मॅनेजर—सुधारक.

असह्य वेड्यें लोकांसी आहेत. हेही असो. मागल्या दशकांत ज्या आरोपांस पतित ठरविलें होतें, ते पतित होऊन न राहतां प्रति दिवशीं समाजाच्या अधिकाधिक मानास पात्र होत आहित तेव्हां कालास विरुद्ध असे ठराव करण्यांत काय अर्थ आहे, याचा आपण व आपल्या प्रतिनिधींनीं शांतपणानें विचार करावा. हिंदु धर्म, संस्कृत विद्या, आणि हिंदू आचार यांच्या बाहेर ज्यांचें आचरण किंवा अवलोकन कधींच गेलेलें नाहीं, त्यांना मनुष्याच्या अंतःकरणांतील धर्मबुद्धीचा कल सध्यां कोणत्या दिशेकडे जाऊं लागला आहे, हें स्पष्टपणें समजण्याचा संभव नाहीं, व त्यांस तो समजला नाहीं म्हणून आह्मी त्यांस फारसा दोषही देत नाहीं. आमचे स्वामी, आमचे शास्त्री व वैदिक, आणि या देशांतील बहुतेक अशिक्षित जनसमूह हे सारे या कोटींत येतात. परक्या लोकांस किंवा अर्वाचीन शिक्षण मिळालेल्या अन्नस्थ सुशिक्षित लोकांस हिंदुधर्माचा व आचारांचा बराच भाग वेडेपणाचा दिसूं लागला असला, तरी वर सांगितलेल्या जुन्या लोकांची धर्मश्रद्धा आणि आचारभक्ति बरींच कमी अधिक प्रमाणानें कायम रहाणार आहे, हें निर्विवाद आहे. तथापि परधर्मीय लोकांचें राज्य येथें झालें असल्यामुळें, आणि नवीन तऱ्हेचें शिक्षण लोकांस मिळूं लागल्यामुळें, तरुण पिढीच्या मनांत नवीन धर्मकल्पना आणि नवीन आचार यांचा उदय होऊं लागला आहे इतकेंच नाहीं, तर या कल्पनांचा आणि या आचारांचा परिणाम जुन्या लोकांवरही अप्रत्यक्ष रीतीनें त्यांस नकळत होत आहे, आणि त्यांच्या मर्जीविरुद्ध व समजाविरुद्ध ते सुधारक बनत आहेत, हें शांतपणें लक्षांत आणण्यासारखें आहे. सध्यां जें धर्मकोर्ट श्री. सांगलीकरांच्या वाड्यांत बसलें आहे त्यांतील प्रमुख न्यायाधीशांनीं आणि त्यांस साहाय्य करणाऱ्या अन्नस्थ शास्त्रीविदिकांनीं पुनर्विवाहाच्या वादापासून येथें घडून आलेल्या सर्व गोष्टी

मनांत आणून, मग चहाकाफीच्यासंबंधानें जो ठराव करणें प्रशस्त दिसेल तो करावा. ना. रा. ब. रानडे यांस श्री. स्वामींनीं पतित ठरविलें होतेंना? पण त्या पतित ठरविण्याचा काय उपयोग झाला बरें? रा. ब. रानडे मुंबईच्या कायदेकौन्सिलाचे सभासद प्रथम झाले त्यावेळेस या शहरांतील प्रमुख लोकांनीं त्यांस हा मान मिळाल्याबद्दल आपला आनंद प्रदर्शित करण्यासाठीं हिराबागेंत जी टोलेजंग मेजवानी दिली ती पुष्कळांच्या स्मरणांत असेल. त्या मेजवानीस जे लोक रावबहादूरांच्या पंक्तीस जेवले त्यांस वाळींत टाकण्याची गोष्ट कोणीं काढिली काय? तसेंच, अगदीं थोड्या दिवसांपूर्वी रावबहादूरांनीं आपले घरीं रा. ग. मोरो विश्वनाथ जोशी यांस जी मेजवानी दिली त्या मेजवानीस हजर असलेल्या लोकांवर बहिष्कार घालण्याचा बूट कधीं निघाला होता काय? रा. जोशी विलायतेहून जाऊन आले असून, त्यांनीं त्या कर्माबद्दल प्रायश्चित्त घेतल्याचें आमचे ऐकण्यांत आलेलें नाहीं! तसेंच, रावबहादूर भिडे, रावसाहेब भट, रावबहादूर गोपाळराव हरी देशमुख वगैरे लोकांच्या घरीं पुनर्विवाहाच्या वाढापासून जीं कार्यें झालीं व त्या कार्यांत ज्या गृहस्थांनीं किंवा भिक्षुकांनीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार उघडपणें केला त्यांस जातिबाह्य करण्याचा आजपर्यंत कोणीं प्रयत्न केला आहे काय? आगगाडींतून प्रवास करतांना स्टेशनावरील ख्रिस्ती किंवा मुसलमान लोकांकडून चहाचे पेले, सोडावाटरच्या बाटल्या, आणि गरज लागल्यास कणकीचीं बिस्कुटें विकत घेणें

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.
प्रो. जी. सी. भाटे एम. ए. कृत. किं. ४८
सुधारक ऑफीस

. त्याच्यायोगानें तहान व भूक भागविणें हा बराच सामान्य प्रकार झाला आहे, व अशा रीतीनें उघडपणें आचरण करणारे लोक राजरोसपणें समाजांत वावरत असून, आणि त्यांचे घरीं हवें ते भिक्षुक व शास्त्री जेवतखात असून त्यांच्या वर्तनाबद्दल कोणाच शंका घेत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय ? आम्हांस तर असें वाटतें कीं, असल्या आचारांस अधर्मी आचार म्हणावयाचें असेल, तर असला अधर्म परंपरेनें ज्याच्या हातून घडला नाहीं, असा एकही ब्राह्मण या देशांत सांपडणार नाहीं. खुद्द श्री. शंकाराचार्य आणि त्यांचे अनुयायी यांच्या पोटांत पतितांच्या स्पर्शामुळें त्याज्य होणारें अन्नपाणी मर्तादिवशीं जात आहे व आजपर्यंत पुष्कळ गेलें आहे, असें दाखवितां येईल. पूर्वपद्धतीचा आचार लहानापासून थोरापर्यंत व धार्मिकापासून अधार्मिकापर्यंत कमीअधिक प्रमाणानें सुटत चालला आहे व तो सुटणें अपरिहार्य आहे. आम्हांस त्याबद्दल बिलकुल वाईट वाटत नाहीं ! आमचा त्यांतच आनंद आहे ! आम्ही त्यालाच सुधारणा म्हणतों ! पण जुन्या लोकांच्यानें तसें मानवणार नाहीं व म्हणवणार नाहीं. तथापि ते अंतर्दृष्टि करून पहातील तर अनिवार्य स्थित्यंतराच्या झपाट्यापुढें त्यांचें कांहीं एक न चालतां, ते त्याबरोबर ढकलत किंवा वहात चालले आहेत, हें त्यांच्या नजरेस आल्याशिवाय रहाणार नाहीं. अशा स्थितींत आग्रहाचा पीळ थोडा ढिला करून कांहीं कांहीं सवलती देत जाणें आणि नव्याजुन्यांची एकी कायम ठेवणें हें, किंवा वृथा धर्माभिमानानें तट्ट किंवा तंग होऊन बसून कधींच अंमल न होण्यासारखे हुकूम सोडणें आणि नवीन पिढीस अतिशय सक्तीमुळें बंड करण्यास प्रवृत्त करणें हें विशेष श्रेयस्कर आहे, याचा श्रीमच्छंकराचार्यांनीं, त्यांच्या प्रतिनिधींनीं, आणि हिंदूधर्माच्या समस्त हितचिंतकांनीं शांतपणें विचार करावा. आम्हांस

तर असें वाटतें कीं, ज्याप्रमाणें वनस्पतींच्या किंवा प्राण्यांच्या शरीरांत रात्रंदिवस नवेंजुनें होत असतें, म्हणजे जुने परमाणू अदृष्ट होऊन त्यांजे जागीं नवीन परमाणू दिसूं लागतात, त्याच समाजशरीरांतहीं तसला व्यापार सतत चालला पाहिजे. झाडाच्या खोडांत रोज नवीन पोषक रस उत्पन्न होणार नाहीं आणि त्याची जुनी त्वचा झडत जाऊन तिच्या जागीं नवीन त्वचेचा आविर्भाव होणार नाहीं, व जुनें मांस, कातडें, स्नायु, शिरा वगैरे भाग नष्ट होऊन त्यांचे जागीं नव्यांची उत्पत्ति होणार नाहीं–तर त्यांची वाढ होणें अशक्य आहे. त्याप्रमाणेंच समाजाच्या सर्व प्रकारच्या कल्पना आणि आचार यांत कालानुरूप फेरबदल होत गेल्याखेरीज त्याची प्रकृति निरोगी रहाणार नाहीं. जे लोक अशा प्रकारचा दृशांतरांत विरोध करतात ते त्याचे हितशत्रु होत. समाजांत कल्होळ उत्पन्न करणाऱ्या क्रांति त्यांस हितावह नाहींत, हें आम्ही कबूल करतों; पण कोणत्याही प्रकारची केवढीही क्रांति होऊं न देण्याविषयीं हट्ट धरून बसणें, हें शुद्ध वेडेपण होय, असें आहीं समजतों. पेशव्यांनीं राज्यसूत्रें हातीं घेतल्यावर माधवरावासारख्यांनीं स्नानसंध्या करीत बसणें अधर्म होय असा शास्त्रार्थ रामशास्त्र्यांनीं दिला, कित्येक रजपूतांनीं मुसलमानांशीं विवाहसंबंध केला; परशुरामभाऊ पटवर्धनांनीं काशीच्या शास्त्र्यांकडून पुनर्विवाहास आधार काढविला; रघुनाथराव पेशव्याकरतां जलपर्यटण करून इंग्लंडांत बर्क साहेबाच्या घरीं स्नान संध्या करण्याचा पतकर एका कर्मठ ब्राह्मणानें घेतला, या इतिहासप्रसिद्ध गोष्टी ज्यांना आपलें धर्माधिकारित्व राखून घ्यावयाचें असेल त्यांनीं निरंतर ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

पांचजन्याचा हंगाम.

आतां एक महिनाभर सर्व देशभर कर्णमनोहर शंखध्वनि चालणार ! हिंदु धर्माच्या नांवाखालीं मोडणारे जे अनेक लज्जास्पद आचार या देशांत रूढ आहेत त्यांत शिमग्याला पहिला नंबर दिला पाहिजे. इतका बीभत्स सण दुसरा कोणत्याही देशांत पाळला जात असेल. असें आह्मांस वाटत नाहीं. माघ शुद्ध पौर्णिमेपासून फाल्गुन वद्य पंचमीपर्यंत हिंदू धर्मानें हिंदू लोकांस पशुतुल्य वर्तन करण्याचा पास दिला आहे ! दारू, अफूम, गांजा वगैरे मादक पदार्थ मोठे घातक आहेत; परंतु ते मुळींच विकूं दिले नाहींत तर त्यांपासून होणाऱ्या फायद्यांस अजीबात अंतरावें लागेल, म्हणून त्यांचे मळे देण्याचा व त्यांच्या विक्रीकरतां परवाने काढण्याचा प्रघात सर्व ठिकाणीं पडला आहे: व याच प्रघाताचें अनुकरण, शिमग्याचा सण स्थापणारांनीं केलें असेल कीं काय असा संशय उत्पन्न होतो ? सगळे लोक वर्षाच्या वर्षे अचकट बोलल्याशिवाय, किंवा उघडपणें जनावरासारखे वागल्याशिवाय, राहिले, तर, त्यांना सदाचरणाची मोडशी होईल अशी भीति वाटून प्रतिवर्षी निदान एक महिना त्यांस मनसोक्त वागूं देणें जरूर आहे, अशा हेतूनें आमच्या शास्त्रकर्त्यांनीं ही हुताशनाची पूजा अस्तित्वांत आणिली कीं काय कोण जाणें ! अलीकडे मोठमोठ्या शहरांत व अर्वाचीन पद्धतीचें शिक्षण मिळालेल्या लोकांत या व्रताचें महात्म्य थोडेसें कमी होत चाललें आहे; तथापि याच वर्गापैकीं कित्येक इसमांस धर्मश्रद्धेची जी उकळी फुटल्यासारखी दिसत आहे, तीमुळें या निंद्य धर्माचाराचें हे इसम मोठ्या निकरानें खंडन करण्यास पुढें सरसावण्याचा संभव आहे ! सुधारकानें

किंवा सुधारकांनीं अमुक जुना आचार वेवकूफपणाचा ठरविलाना, तर मग आपणाला त्याचें वकीलपत्र घेतलेंच पाहिजे असा या इसमाचा निश्चय झाल्यासारखा दिसतो. होवो पापडा! सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं व रात्रीं शेफरलेल्या व उनाड टारग्या पोरांनीं रस्तोरस्तीं अनिवाच्य शब्द तोंडांतून काढावें आणि सभ्य स्त्रियांस व पुरुषांस लज्जेनें माना खालीं घालून निमुटपणें जावें लागावें, येवढ्यानेंच या आचाराची परमावधि होती तर याकरितां आम्हीं एका आर्टिकलाची जागा आटपिली नसती. पण तसें नाहीं. ' माघीपूर्णिमे पासून असल्या आचाराचे अधिकाधिक दिवस लोटत जातात तसतसें अधिकाधिक चांगले लोक या प्रतिसांवत्सरिक बीभत्सपणाचे भागीदार होऊं लागतात; अखेरीस फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला प्रत्येक हिंदुगृहांत हुताशनीची पुजा होऊन तिच्या भोंवतीं प्रदक्षिणा घालण्यांत येऊन मंगल फाल्गुनवाद्य गृहाधिपतीकडून घरांतील बायकांचें, मुलींच्या, व मुलांच्या समक्ष यथाशास्त्र वाजविलें जातें! तसेंच या तिथीला गावांतील मोठमोठ्या देवळांपुढें किंवा चवाट्यांच्या जागांवर रचलेल्या सार्वजनिक होळ्यांस संध्याकाळीं गावांतील मानकऱ्यांकडून अग्नि देववून त्यांच्या सभोंवतीं या अति-शुभसूचक मुखवाद्याचा गजर करण्याची रीत आहे!

या उत्सवाचा येथेंच शेवट होता तरी देखील फार चांगला झाला असतें, पण आमचे हिंदू लोक धर्माला खुप राखण्याविषयीं फार उत्कंठ असल्यामुळें या राक्षसी, पैशाचिक, नि

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठ

रानटी देवीचा ते पूण पांच दिवस मोठ्या थाटाचा उत्सव करतात ! तमाशांच्या छकडी, वेश्यांचीं गाणीं, रंगाचीं शिंपणीं-यासंबंधाचाच अप्रशस्तपणा असावा त्याहून वाईट आहे: पुष्कित्येक ठिकाणीं धुळवडीच्या दिवशीं जो समारंभ होतो त्यापुढें हा अप्रशस्तपणा सूर्यापुढें काजव्यासारखा फिक्का पडतो ! लहानमोठ्या गृहस्थांनीं होळीच्या राखेंत माती, शेण, व त्याहूनही घाण अशीं द्रव्यें मिसळून तयार केलेल्या खातेऱ्यांच्या पंचामृतानें आपापलीं अंगें नखशिखांत माखून घेऊन " टेंपरवारी " वराहस्वरूप कित्येक मोठ्या हौसेनें धारण करतात. नंतर एखादें चाबरें, लाथेरें व नाक लागलेलें गाढव हुडकून काढून त्यावर पिछाडीकडे तोंड करून या सोंगांपैकीं एक सोंग स्वार होतें. खराटे, केरसुण्यांचे चुरखंडे, फाटकीं शिंपतरें व गुंडे वगैरे जिनसांचीं छत्र चामर सज्ज झाल्यावर गांवांतल्या लग्नाच्या वरातीप्रमाणें व तमाशेवाल्या वा एखाद्या रांचवरोवर मोठ्या प्रेमानें विचकट लावण्या म्हणत, नानाप्रकारच्या उखाणे म्हणत, नवीन मनुष्य दिसला कीं, त्याच्या अंगावर खातेरें शिंपून, व त्याच्या चेहऱ्यांवर घाणेरडे छाप ठोकून त्याला सामान्य घोळक्यांत ओढून घेत, व ठिकठिकाणीं उभें राहून जाणाऱ्या-येणाऱ्या बायकांच्या किंवा या छबिन्यांत येऊन दाखल होण्यास कांकूं करणाऱ्या गांवकऱ्यांच्या नांवानें जबरदस्त पांचजन्य करीत, ही सैतानसेना एखाद्या बागेतीच्या, म्हसोबाच्या, किंवा गांवांतील चावडीच्या, पटांगणांत येऊन ठेपते आणि तेथें दुपार होऊन जाईपर्यंत यथेच्छ धुळवड खेळल्यावर आंघोळीकरितां तीतील बऱ्हाडी विहिरीवर, तळ्यावर, ओढ्यावर, नदीवर किंवा आपल्या घरीं जाऊं लागतात धुळवडीचा दिवस हा या सणाचा अत्यंत लाजिरवाणा दिवस आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारचा पशुपणा खरोखरींच कायद्यानें एकदम बंद

केला पाहिजे. पण जो कोणी सरकाराला अशी सूचना करील त्याच्या नांवानें अधिकच पांचजन्य होऊं लागेल यांत संशय नाहीं !

या सणाचे कित्येक भक्त असें म्हणतात कीं, एकसमयावच्छेदेंकरून सर्व देशभर होळ्या पेटविल्यानें व त्यांत दूध, तूप, व पोळ्या जाळल्यानें जो सुवासिक धूमकल्होळ उत्पन्न होतो त्यामुळें मनुष्याच्या जीवितास अपायकारक असे, वातावरण व्यापून राहणारे परमाणुरूप सूक्ष्म कृमि नाशास पाऊन हवा शुद्ध होते, व रोगाचें बीज नाहींसें होतें; तसेंच, होळीच्या भोंवतीं बोंब मारण्याची आमच्या पूर्वजांनीं जी चाल घातली आहे, तिवरून असें व्यक्त होतें कीं, आग लागली असतां तिचा उपशम करण्यास बोंब मारण्यासारखा उत्कृष्ट उपाय नाहीं ! कारण या अद्वितीय भारतीय शिंगाचा किंवा **टेलिफोनाचा** स्वर कानीं पडल्यावरोबर चार लोक चोहोंकडून धांवत येतात, आणि आग विझाविण्याचा प्रयत्न करतात ! शिमग्यांत जो बेताल विचकटपणा चालतो तोही केवळ वावगा आहे असें नाहीं. ज्याप्रमाणें ठाणावर डांबून घातलेला घोडा मस्त होतो, त्याचप्रमाणें मनुष्यस्वभावांत ज्या दोन चार दांडग्या वृत्ति आहेत, त्यांना नेहमींच कोंडून ठेविलें तर त्या फारच त्रासदायक होतात; सबब कधीं कधीं त्यांना खुल्या करणें जरूर आहे. एंजिनांत फार वाफ जमली तर तीं रक्षकद्वारानें (safety valve) सोडून दिली पाहिजे, नाहींतर तिच्या अनावर सामर्थ्यामुळें समग्र एंजिनाचे तुकडे होतात. मनुष्यांच्या विकारां-

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८

सुधारक ऑफीस; पुणें.

चीही तशीच गोष्ट आहे. पाळीपाळीनें साऱ्यांची सोय लाविली पाहिजे; अलंकारिकांनीं नवरसांत बीभत्स रसाचाही समावेश केला आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. दुर्भाषण करणें, सातेऱ्यांत लोळणें, उचनीचत्वाच्या भाव टाकून क्षणभर लहान-थोरांनीं बरोबरीच्या नात्यानें एकमेकांशीं वागणें, थट्टा करणें वगैरे गोष्टी इतर गोष्टींप्रमाणेंच मनुष्यास हव्याशा व अवश्य वाटतात; ज्याप्रमाणें इतर गोष्टींनीं त्याप्रमाणें यांनींही त्याचें मनोरंजन व सुखवृद्धि होते; तेव्हां यांचाही अगदींच निषेध करतां कामां नये !

ही विचारसरणी शिमग्याच्या भक्तांस केवळ निरुत्तर वाटणार आहे, व जे पूर्वपद्धतीचे लेखक आमच्या या निबंधाविरुद्ध आपली लेखणी उचलतील ते या सरणीचें आपापल्या कलाप्रमाणें वेडेंवांकडें भाषांतर करतील या विषयीं आम्हांस शंका नाहीं ! तथापि मनांतल्या मनात आपण सैतानाचा पक्ष घेऊन भांडतों आहों, असें त्यांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. वाईट कृत्यांकडे मनुष्यार्चा सहज प्रवृत्ती आहे.त्याप्रवृत्तिच्या समाधानापासूनउत्पन्न होणारं सुख त्यास प्राप्त होण्यासाठीं विशेष काल,विशेष सण,किंवा विशेष ऋतु नेमिले पाहिजेत असें नाहीं. अशा प्रकारचें शिक्षण देण्यासाठी शाळा घालण्याची गरज नाहीं. मनुष्याच्या सांप्रत स्थितींत दुर्वर्तनाचा अंकूर त्याबरोबरच जन्मास येतो, आणि लहानपणापासून तो खुडून टाकण्याचा किंवा समूळ उपटण्याचा प्रयत्न केला नाहीं तर स्वल्प वयांत तो सारें अंतःकरण आपल्या विषारी विस्तारानें व्यापून टाकून, सद्वृत्तींचा वाढ बिलकूल होऊं देत नाहीं. तेव्हां शिमग्याच्या सणासारखे सण नाहींसे करून टाकल्यास आमचें कोणत्याही प्रकारचें नुकसान होण्याचा संभव नाहीं. शिमग्यावांचून शिमग्यांतले नित्य प्रकार आपल्या व इतर समाजांत नित्य घडत असतात. आम्ही मात्र त्यांना

धर्माच्या नांवानें फाजील उत्तेजन देऊन आपलें अधिक नुकसान करून घेत आहों.

क्षणभर असें समजा कीं, होळीच्या किंवा धुळवडीच्या दिवशीं एखादा जिज्ञासू प्रवासी जर्मनींतून किंवा चिनांतून येथें आला, आणि रस्तोरस्तीं चाललेला दंगा व चोंचाचोंच पाहून हा काय प्रकार असावा, हें समजून घेण्याच्या इराद्यानें त्यानें कोणा एखाद्या गृहस्थापासून जागोजागीं झडत असलेल्या लावण्यांचा आणि उखाण्यांचा अर्थ—समजून घेतला तर तो या आमच्या सणाविषयीं आणि सार्वजानिक नीतिमत्तेविषयीं काय कल्पना करील बरें ? ज्या गोष्टीबद्दल दुसऱ्यापुढें आपणांस अधोवदन करावें लालेल, व जी गोष्ट आपली आपल्यासच शांत वेळीं लाजिरवाणी वाटते, तिचें मिथ्या धर्माभिमानानें मंडन करणें, आणि कांहीं मूर्ख लोकांनीं प्रसंगवशात् तिला धर्माधार लावून दिला असल्यामुळें तिचा त्याग करण्यास भिणें, हें खऱ्या धर्मश्रद्धेचें किंवा धर्मबुद्धीचें लक्षण नव्हे. शिमगा हा आमच्या धर्मावर फार मोठा डाग आहे. स्त्रियांच्या हातच्या चहाहूनही फाल्गुनांतला सार्वजानिक विचकटपणा आणि त्वंपुरा विशेष गर्हणीय आहे; तेव्हां खुद्द श्रीनें किंवा श्रीच्या प्रतिनिधींनीं चहाप्रकरणांतून आपलें लक्ष काढून घेऊन त्याचा मोर्चा या अश्लाघ्य दुराचाराकडे फिरविला तर फार चांगलें होईल असें आह्मांस वाटतें ! पण सामान्य लोकांच्या धर्मकल्पनांहून त्यांच्या धर्माधिकाऱ्यांच्या धर्मकल्पना विशेष उन्नत असतील, असें मानणें म्हणजे समाजशास्त्राचा विशेष परिचय नाहीं, असेंच व्यक्त करणें होय !

निबंधसंग्रह.

भाग १ ला. कि. १। रु.

मॅनेजर-सधारक ऑफीस, पुणे.

सुधारकाविषयीं कित्येकांचा असा समज झाला आहे कीं, जेवढें जुनें व हिंदू असेल तेवढें नादान ठरविण्याचा त्यानें जणूं काय विडाच उचलला आहे! आमच्या मतें हा समज फार चुकीचा आहे. आमचा कोणताही आचारविचार आह्मांस चांगला वाटत नाहीं, असा या लोकांचा समज कोणत्या कारणामुळें झाला असेल हें त्यांचें त्यांसच ठाऊक. तथापि सणांच्या संबधानें त्यांचा आमच्याविषयीं गैरसमज न व्हावा म्हणून आम्ही स्पष्टपणें येथें हेंही सांगून ठेवतो कीं, शिमग्याचा सण आम्हांस जितका तिरस्कारणीय व त्याज्य वाटतो तितकाच दिवाळीचा सण अभिनंदनीय व रक्षणीय वाटतो. या सणांत आह्मी कसें वागतों याचा छडा कोठल्याही चिकित्सक प्रवाशानें कितीही काढला तरी आह्माविषयीं त्याच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होण्याचा अणुमात्र भीति नाहीं. उलट अभ्यंगस्नानें, सुग्रास भक्षण, लक्ष्मीपूजन व जमाखर्चाचा आढावा, देण्याघेण्याचा निकाल, सौम्य व सुखदायक खेळ, दीपोत्सव व दारूकाम, बहिणभावंडांच्या भेटी आणि ओवाळण्या वगैरे गोष्टी कोणत्याही प्रकारें लाजिरवाण्या नसून त्यामुळें आमच्या संसारिक वृत्तीची व कुटुंबपद्धतीची रम्य बाजू या मंगल प्रकारांची शिमग्यांतील ओंगळ प्रकारांशीं तुलना करा, आणि या प्रस्तुत लेखास दोष देणें योग्य वाटेल तर तो खुशाल द्या.

धर्माचा सुकाळ व बकऱ्यांचा काळ.

एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याचें घर फोडून त्याचें वित्त हरण केलें म्हणजे आपण त्यास चोर म्हणतों आणि शिक्षा देतों; एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्यास पैशाकरितां किंवा खाजगी द्वेषाकरितां ठार मारलें तर आपण त्यास खुनी मानतों

आणि फाशीं देतों; पण हेच अपराध जेव्हां उभ्या समाजाकडून होतात तेव्हां त्यांचें अपराधत्व नाहींसें होतें इतकेंच नाहीं, तर ते ज्या व्यक्तीकडून घडतात ते लोकांच्या प्रशंसेस पात्र होतात. उत्तर व दक्षिण अमेरिकेंतील लाखों इंडियन लोकांना स्वर्गद्वार दाखवून अलीकडील ख्रिस्ती लोकांनीं त्या खंडांत जी आपली सत्ता स्थापिली आहे तीबद्दल कोणास शरम तर कधीं वाटत नाहीं; उलट आपण मोठें देशकृत्य किंवा धर्मकृत्य केलें, असें ते मानितात. हिंदुस्थानांत ज्या शूर शिपायांनीं ब्रिटिश राज्याची इमारत उठवून दिली त्यांविषयींही त्यांच्या देशबांधवांस मोठे कौतुक वाटतें; गुजराथेत व माळव्यांत मराठे लोकांनीं जीं संस्थानें स्थापिलीं आहेत त्यांबद्दल आम्हांस केव्हांही वाईट न वाटतां उलट अभिमान वाटतो. तात्पर्य, ज्या दोषांत पुष्कळांचा वाटा असतो, व ज्यांपासून समाजिक हित होण्याचा संभव असतो तो सद्गुणांत मोडला जातो, आणि जो इसम त्यांत तरबेज असेल त्याची त्याबद्दल तारीफ होते. धर्मसंबंधाचा प्रकारहा असाच आहे. **न नीचो यवनात् परः** (म्हणजे मुसलमानापेक्षां नीच कोणी नाहीं) असा आमचा पुरातन समज असून अ-म्हांस मुसलमान तांबोळ्याच्या हातचा ओला चुना चालतो; मोठमोठ्या लग्नांत व देवांच्या उत्साहांत त्याह्यांचे व देवांचे कान यवनीच्या मधुर आलापावांचून तृप्त होत नाहींत; महाराकडून हवी ती नोकरी करून घेणाऱ्या साहेबाला कडकडून भेटण्यास देखील चिता नाहीं, पण खुद्द महाराची सांवली देखील उपयोगाची नाहीं; पंचहौद मिशनांत पेलाभर चहा आणि दोन बि-

ळोटून भाड्यानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर–हवाशीर, मनोरा पाणी रोखलेले असे.

स्कुलें खाल्लीं तर त्याबद्दल सक्षोर प्रायश्चित्त घेतलें पाहिजे, पण नरसोबाच्या वाडीस विद्वान् धार्मिकांनीं आपल्या हातांनीं बकऱ्याचे प्राण घेऊन त्यांच्या मांसाचे गोळेच्या गोळे दिवसा ढयढ्या हजारें लोकांसमक्ष मिटक्या मारीत खात बसण्यास कांहीं हरकत नाहीं ! तात्पर्य, ज्या कृत्याला बहुत लोकांनीं मंगल ठरविलें तें खरोखरीं कितीही अमंगल असलें तरी सामान्य मनुष्यास ते तसें न भासतां उलट स्पृहणीय भासतें !

कांदी येथें नुकताच झालेला यज्ञ ज्या दंपत्यानें केला व ते काम ज्या ऋत्विजांनीं चालविलें त्यांविषयीं आमचें दोघेंहि म्हणणें नाहीं. अनंत जन्मींच्या मोठ्या पुण्याईनें झालेल्या ब्राह्मणजन्माचें सार्थक करण्याचें जें साधन त्यांस प्रारब्धानें योग्य वाटलें त्याचा त्यांनीं उपयोग केला, हें अगदीं स्वाभाविक आहे, व त्याबद्दल त्यांना दोष देणें हें अगदीं अयोग्य आहे. आम्हांस जें वाईट वाटतें तें बकरीं मारून त्यांचें मांस खाल्ल्यानें देव खुष होतो आणि मुक्ति देतो असा मूर्खपणाचा समज अद्यापि आमच्या धर्मांत राहिला आहे, आणि त्या समजाप्रमाणें आचरण करण्यास प्रवृत्त होणारे लोक अद्यापि आम्हांत असल्यामुळें याबद्दल वाईट वाटतें. मांस खावेंसें वाटलें किंवा खाण्याची लहर लागली तर घर सोडून एखाद्या पेंढोऱ्या नसरवांजीच्या होटेलांत किंवा दुकानांत जाऊन आणि दोन रुपये खर्च करून अंतरात्मा गार करावा ! यवढ्यासाठी सुखाकरतां इतकें सव्यापसव्य अथवा द्राविडप्राणायाम कशाला पाहिजे ? बकरीं मारण्याचा धंदा कधीं केला नसल्यामुळें तीं लवकर मारतां येऊं नयेत; मांसाचा पाक कसा करावा हें माहीत नसल्यामुळें तो चांगला साधूं नये; आणि इतके कष्ट, इतका खर्च व इतकी बडबड करून आठचार दिवस सुग्रास

विधि संपुष्टांत आणितां येतात त्याप्रमाणें हाही आणखी काय हरकत आहे ? **हॉटेलांत** जातांना थोडेसें तीर्थ बरोबर घेऊन जावें आणि मांसाची वशी भरून पुढें आली म्हणजे झालें ! देवाला त्याचा कांहीं भाग अर्पण करणें अवश्य असेल तर खुद्द आपण करावा, किंवा बचर्जीलाच तसें करण्यास सांगून ठेवावें, म्हणजे तो सरस पुलावा चुलीवरून उतरल्याबरोबर वैश्वदेव आटपून घेईल !

यज्ञाविषयीं वरील तऱ्हेचें लिहिणें वाचून आमच्या वाचकवर्गांत जर कोणी जुन्या पंथाचे धर्मनिष्ठ वाचक असतील तर त्यांस आमचा मोठा राग येणार आहे, हें आम्ही समजून आहों. पण जर ते क्षणभर आपला राग आवरून आमच्या लिहिण्याचा शांतपणानें विचार करतील तर त्या लिहिण्यांत कांहीं वावगें नाहीं, असें त्यांस खचित दिसून येईल मांस खाण्याच्या विधीला यज्ञ म्हणा, महायज्ञ म्हणा, याग म्हणा, काय पाहिजे ते म्हणा: **अहिंसा परमो धर्मः** हें बौद्धतत्त्व ज्यांना पूर्णपणें संमत झालें आहे, नित्याहारांत ज्यांनीं मांसत्याग केला आहे, अनेक शतकांच्या संस्कारांमुळें अभक्ष्य भक्षणाचा ज्यांच्या वृत्तींत मोठा तिटकारा वसून गेला आहे, सारांश, मांसाहार ज्यांनीं धर्मबाह्य ठरविला असून जे मांसाहार करणाराना पंक्तीस घेत नाहींत, अथवा त्यांच्याशीं अन्नव्यवहार आणि शरीरसंबंध करीत नाहींत–अशा ब्राह्मणांनीं यज्ञाच्या मिषानें आपणांस मांस खाण्याची मोकळीक आहे इतकेंच नाहीं, तर तसें केल्यानें

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

आपल्या पदरीं असामान्य पुण्याची जोड होते, असें समजणें हें केवढें अज्ञान होय ! यज्ञावर विश्वास ठेवणारे लोक अशा ज्ञानें असें मानतात कीं, यज्ञांत मारलेली बकरी पुनः जिवंत होतीस ! चुक्क्यांनीं हाल हाल करून मारलेल्या बकऱ्याच्या मांसाचा काही भाग हुताशनाच्या द्वारा जगद्भोक्त्यास अर्पण करून, यज्ञकर्त्याचें यजमानानें आणि ऋत्विजांनीं सेवन केलें असतां तो त्यांच्यावर सुप्रसन्न होतो आणि त्यांस जन्ममरणापासून मुक्त करतो ही जितक्या वेडगळपणाची समजूत, तितक्याच वेडगळपणाची ही दुसरी समजूत होय. यज्ञांत मारलेली बकरी फिरून जिवंत होत असतील तर प्रत्येक खाटिकवाड्यांत तोडलें जात असलेलें जनावर पुनः जिवंत कशावरून होत नसेल ? त्याचें मांस तरी सकल अग्नींत जो श्रेष्ठ अग्नि जठराग्नि त्यासच समर्पण होत असतें, व त्याच्या योगानें परमात्म्याचा अंशभूत जो जीवात्मा तो समाधान पावत असतो ! मारलेली बकरी उठतात याचा अर्थ काय ! तीं उठत असलीं तर परलोकीं उठत असतील; या लोकीं तीं एकदां मेलीं म्हणजे मेलीं ! जर तीं येथल्या येथें उठविण्याचें सामर्थ्य कोणत्याहि ऋत्विजांत असेल तर तो मात्र खरा याज्ञिक समजला पाहिजे; तसेंच, अशा याज्ञिकानें बकऱ्यास चुक्क्या खातांना गुदगुल्या होतात, असेंही सिद्ध करून दाखविलें पाहिजे. मारलेलें बकरें उठो किंवा न उठो, त्याला यज्ञांतल्या रानटी पद्धतीनें मारतांना असह्य यातना होत असतील असा आमचा तर्क आहे. तेव्हां हा तर्कही खोटा आहे हें सिद्ध करून दाखविण्याची जबाबदारी ही या याज्ञिकांवरच आहे. या याज्ञिकांस आम्हीं आणखी असा प्रश्न करतों कीं, अग्निनारायणास बकऱ्याचें मांसच आवडतें, हें त्यांना कशावरून समजलें ? दृष्टीस कष्टानें गोचर होणाऱ्या क्षुद्रकीटकापासून थेट मनुष्यापर्यंत अनंत जीवांची परंपरा आहे; तीतील इतर सारे जीव सोडून देऊन खुद्द परमात्मा किंवा

त्याचा गुमास्ता हुताशन चोकडावर किंवा बकऱ्यावरच इतका फिदा कां झाला ? गोजात आणि मेषजात हीं दोन मनुष्याच्या मांसाहाराची प्रधान अंगें होत; पैकीं गोजात या देशांत अलीकडे पवित्र कोटींत जाऊन बसली ! बाकी राहिली गरीब बिचारी मेषजात. मनुष्याप्रमाणें देवालाही हीच कशी मानवली याचा आम्हांस मोठा चमत्कार वाटतो ! यज्ञांत ज्या पशूस मारावयाचें त्याला त्या मारापासून कोणत्याही प्रकारच्या यातना होत नसतील व तो फिरून जिवंत होतो हें खरें असेल तर, आम्ही प्रेतसंस्काराविषयीं लिहीत असतां आमच्यावर टीका करणाऱ्या कांहीं चतोर लोकांस एका देशस्थ वृद्ध बारकऱ्यानें जशा प्रकारचा प्रश्न केला तशा प्रकारचा प्रश्न त्याच्या उद्गाहरणापासून अवश्य धैर्याचें अवलंबन करून येथें करतों. आमचा कैवारी असें म्हणाला कीं, "जर भटास दिलेली शय्या, गाय, उदकुंभ, व श्राद्धें मृतास पोहोंचत असतील तर मृताची बायकोही श्राद्धाचें दिवशीं रात्रीं भटाकडे कां पाठवूं नये ?" हा प्रश्न ऐकल्याबरोबर आमची निर्भत्सना करणाऱ्या लोकांनीं या विलक्षण स्पष्टवक्त्या माळकऱ्यास आमच्याकडे पाठवून दिलें ! असो आमचा प्रश्न या साठी उलटून गेलेल्या भजनी बाबाच्या प्रश्नाइतका शोचणारा नाहीं. आम्ही फक्त येवढेंच विचारतों कीं, ज्या अर्थी यज्ञांतील बलीस यातना होत नाहींत, व फिरून जीवदशा प्राप्त होते असा भाविक याज्ञिकांचा समज आहे, त्या अर्थी यजमानानें आपलें एखादें मूल अग्निनारायणास अर्पण करण्यास काय हरकत आहे ? किंवा त्याला यज्ञ करून जन्म-

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ गुंतर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ८४

लाल्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

मरणापासुन मुक्त व्हावयाचें आहे त्यानें स्वतःच्या समग्र शरीराची किंवा त्याच्या कांहीं भागाची आहुति देण्यांस काय प्रत्यवाय आहे ! असें केल्यानें गळा दाबून घेणें-कोमल भागावर घुक्या मारून घेणें किती सुखकारक असतें हें ज्याचें त्याला स्वतःच्या किंवा स्वतःच्या अपत्याच्या अनुभवावरून चांगलें समजून येईल, व परलोकची हालहवाल कशी काय असते, हें ताबडतोब पहाण्यास सांपडेल !

इति श्रीचहायामेण्यप्रकरणं समाप्तम् !

फार दिवस भिजत पडलेल्या येथील चहामकरणाचा श्रीशंकराचार्यांकडून आलेल्या शास्त्री ट्यांकडून एकदांचा अखेरचा निकाल लागला, व मंडळी प्रायश्चित्तें घेऊन मोकळी झाली, हें एकंदरींत चांगलें झालें. आतां ' स्त्रियांची साक्ष पुराव्यांत घेतां येत नाहीं ' वगैरे ज्या शास्त्राचे सिद्धांत त्याबरच रचलेल्या निकालास आमच्याकडून किती महत्त्व मिळणार हें नव्यानें सांगणें नकोच ! तथापि न्यायाधिशाचें काम कायदे करण्याचें नसून केवळ असलेल्या कायद्यांवरून निकाल सांगण्याचें आहे ही गोष्ट मनांत आणून निःपक्षपातपणें या गोष्टीचा विचार केल्यास एकंदर चौकशी व निकाल हीं ओकडून आलेल्या शास्त्रीद्वयास भूषणास्पद आहे, हें आम्हांस कबूल केलें पाहिजे. असें आहे तरी निकालाच्या मुख्य मुद्यासंबंधानें शास्त्रीद्वयांनीं जी संदिग्धतों राहूं दिली आहे ती शास्त्रदृष्ट्या विचार करतांही युक्त नाहीं, असें आम्हांस वाटतें. निकालांत असें म्हटलें आहे कीं, " अशा प्रकारचा [illegible] पुरावा, साक्ष, सिद्धान्त, प्रयुक्त वगैरे

ग्रंथांचा व संमतिपत्रांचा बलाबलाधिकरण न्यायानें विचार करितां **इतकें प्रायश्चित्त जरी येत नाहीं, तथापि इतर दोषांचा अपवाद व काल-विलंब वगैरे कारणें मनांत आणून सर्वहू प्रायश्चित्त सांगितलें आहे.**" आतां अशा प्रकारचा चहा एकवार घेणारास शास्त्रदृष्ट्या जर इतकें प्रायश्चित्त येत नाहीं, तर किती येतें हें संदिग्ध न रहातां त्याचा स्पष्ट खुलासा झाला असता, ह्मणजे या बाबतींत शास्त्रार्थाचें जें रण माजून राहिलें होतें, त्यांत अखेर जय कोणाचा झाला हें खाचीनें ठरलें असतें; व बटलराच्या हातावर चहाच्या पेल्याकरतां जसे दोन आणे ठेवावयाचे, तसेच भटाच्या हातावर दोन आणे टाकून राजरोसपणें रिफ्रेशमेंटरूममध्यें जाण्यास मोकळीक झाली असती ! आणि असें झाल्यानें प्रवास वगैरे प्रसंगांची गैरसोय दूर होऊन आयतेच धर्मसंरक्षणही झालें असते ? असो, फिरून एकादा असाच प्रसंग आल्यास त्यावेळीं या प्रायश्चितांचें घोडें चाहूनही मागें हटेल अशी आमची पूर्ण खात्री आहे. सध्याच्य ठरावानेंहि, हूणस्पृष्ट चहास प्रायश्चित्तच नाहीं असें म्हणून तो घेणाराला जातींतून हुसकून देण्याचा ज्यांनीं चंग बांधला होता, त्यांची मसलत फसली, व व यांच्या मिशा तरी आम्ही खालीं आणूं ह्मणून ज्यांनीं वरतरे पाजळविले होते त्यांच्याच मिशा खालीं झाल्या हें कांहीं थोडें काम झालें नाहीं ! शिवाय या चहाप्रकरणानें दुसऱ्या एका महत्वाच्या प्रश्नाचा अनायासेंच तिकाल लागल्यामुळें हा तंटा सुरू केल्याबद्दल पुणेकरांस इतर लोकांनीं दोष देण्याच्या ऐवजीं त्यांचे आभारच मानले

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

पाहिजेत.नुसत्या नौकागमनास किंवा म्लेंच्छदेशगमनास शास्त्राची अडचण नाहीं हें आजच्याच अंकांतील दुसऱ्या एका लेखावरून वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. तेव्हां विलायतेस जाण्याची मुख्य अडचण कायती इंग्रज लोकांचा संसर्ग हीच होय. तेव्हां विलायतेहून परत आलेल्या माणसास प्रायश्चित्त देणें तें हा संसर्ग, इतर दोषांचा अपवाद व कालविलंब या कारणावरच अवलंबून असल्यामुळें तें सध्या ठरलेल्या प्रायश्चित्तांहून भिन्न न हीं हें ठरलेंच व या वादापासून हा झालेला फायदा कांहीं सामान्य नाहीं. एकंदर ठराव लवकरच छापून प्रसिद्ध होणार आहे, तेव्हां तो देऊन पत्राची जागा अडवण्याचें आम्हास कांहीं कारण दिसत नाहीं. परंतु आमच्या येथील धर्माभिमानी पत्रांतून या ठरावाचा उत्तरभागाच तेवढा साकल्यानें देण्यांत आला असून पूर्वभागाचा नुसता उल्लेखहीं त्यांनीं कां केला नाहीं अशी कोणास जिज्ञासा असल्यास त्यांच्याकरितां इतकें सांगितलें पाहिजे कीं, त्यांतील मजकूर अथपासून इतिपर्यंत आमच्या धर्माभिमान्यांच्या काळजास झोंबण्यासारखा आहे. फिर्यादी पक्षाचें वर्तन प्रथमपासून शेवटपर्यंत केवळ दुराग्रहाचें कसें होतें, आम्ही अभियोग करतों म्हणून पुढें आणलेले कागदपत्र व साक्षीदार म्हणून हजर केलेले गृहस्थ हे दोन्हीही यत्किंचित भरंवशास कसे पात्र नाहींत, वगैरे मुद्यांचें शास्त्री बोवांनीं जें जोरदार व मुद्देशीर रीतीनें विवेचन केलें आहे, तें देऊन आपलेंच हंसें करून घेण्यास हे तयार झाले नाहींत हें केवळ साहजिक होय. परंतु अशा भेकडपणानें आजचें मरण काय तें उद्यावर मात्र ढकलतां येण्यासारखें आहे. कुंभाराची सून उकिरड्यावरही येणारच, मग आपण होऊन मुद्दाम तिला फरफर ओढण्यांत काय अर्थ आहे! असो, या ग्रामण्यप्रकरणाची इतिश्री करण्यापूर्वी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणें आमच्या मतें अवश्यक आहे. या चहाच्या प्रकरणांत जर

एक अनिष्ट प्रकार

झाला नसता तर सांत एकंदरींत खेदकारक असें कांहींच न
न तो अनिष्ट प्रकार म्हटला झणजे चहा प्यालेली किंवा
गेलेली मंडळी व खिस्ती मिशनरी यांची या कामीं एक
आहे, असा जो कित्येकांचा गैरसमज झाला आहे तो
तेथें जाण्यांत मंडळीचा असा मुळींच उद्देश न
हें आम्हांस तर प्रथमपासूनच माहीत आहे. झाले
चौकशींत ही गोष्ट चांगली सिद्ध होऊन ठरवांतही
स्पष्ट उल्लेख झाला आहे हें चांगलेंच झालें. पण प्रथमपासू
अशा संशयास अगदीं जागा न रहाती तर उत्तम झालें अ
खिस्ती मिशनऱ्याचें स्वधर्म प्रसारावांचून दुसरें कोणतेंही
स्थानांत काम नाहीं हें उघड आहे. तेव्हां त्यांच्याशीं
ठेवल्यानें या मंडळीच्या मनांतूनही हिंदु धर्म सोडून रि
धर्मांत जावें असें आहे, अशी कोणास शंका आल्यास ती
दींच गैरवाजवी आहे, असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.
एकंदर झालेल्या प्रकाराचा फायदा घेऊन " येथील सुशि
ब्राह्मण मंडळीस सत्य धर्माची हळूहळू गोडी लागत चा
आहे व ते आमच्या घरीं येऊन चहाकाफीही घेऊं ल
आहेत, " वगैरे विधानें आपल्या वार्षिक रिपोर्टांतून करण
हे मिशनरी चुकतील असें आम्हांस वाटत नाहीं. व असें
हें तर आम्हांस मुळींच संमत नाहीं. आम्ही चालू
धर्मावर कितीही तीक्ष्ण प्रहार केले तथापि आमचा देश खि
व्हावा ही नुसती कल्पनाही आम्हांस सहन होणारी नाहीं. अ
च्यांतील अतिशूद्र लोकांस आम्ही अगदीं दूर टाकल्य

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधा
शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ०५
खेडकरवैद्य अॅन्ड सन्स् शनवार पेठ. पुणे

पूर्वसारखी ख्रिस्ती धर्माकडे धांव चालू आहे, ही गोष्ट
न अत्यंत उद्वेगजनक आहे, व या लोकांस आम्ही जवळ
लागून त्यांचा तिकडील ओघ परत फिरेल तो सुदीन असें
स वाटत आहे ! आमच्या मतांच्या वेडगळ धर्मसमजुती
च्या आम्हास अज्ञानाच्या वाटतात, त्याहून या पाद्यांच्या
मजुती अधिक उन्नत आहेत असें आम्हांस वाटत नाहीं.
एक चुकीचा रस्ता सोडून दुसऱ्या चुकीच्या रस्त्याचें
च्या लोकांनीं अवलंबन करावें असें आम्ही कधींच प्रति-
करणार नाहीं हें उघड आहे. व या चहाप्रकरणांत गुंत-
बहुतेक लोकांची आम्हास जी माहिती आहे त्यावरून पहातां
ा धर्मास साह्यभूत होण्याची कल्पना त्यांच्या मुळासही
आली नसेल असें आम्ही खात्रीपूर्वक सांगतों. परंतु असा
प्रकार आहे तरी बेसावधपणानें कां होईना ख्रिस्ती मिशन-
ां या कामांत संबंध ठेवला गेला हें आमच्या मतें फारच
वाईट. व एवढा अनिष्ट प्रकार न होतां तर या एकंदर
गांत खेद मानण्यासारखें कांहीं आहे, असें आम्हांस वाटत
, ब्राह्मणेतराच्या हातचा चहा पिण्यांत आम्हांस दोष
नाहीं. इतकेंच नाहीं, तर आमच्या नीच मानलेल्या
ाची स्थिति सुधारून त्यांची व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांची
पंगत झालेली जर आम्हांस पाहातां येती, तर आम्हीं
स मोठे कृतार्थ मानलें असतें, ही गोष्ट आमच्या देशाभि-
मुळ आम्हा चोरून ठेवीत नाहीं. परंतु आमच्यांतील जाति-
नाहींसा व्हावा अशी जरी आमची मनापासून इच्छा
ी तथापि ख्रिस्ती लोकांशीं कारणावांचून मुद्दाम आम्ही
संसर्ग ठेवावा हें आम्हांस कळत नाहीं. व म्हणून यापुढें
अशा अनवश्यक गोष्टी आमच्या सुशिक्षित लोकांच्या हातून
ार नाहींत अशी आम्ही आशा करतों. असो, सरतेशेवटीं
च्या धर्माभिमान्यांच्या कानांत एक गोष्ट सांगून या चहाप्र-

तीन अर्थशास्त्रें.

ज्याप्रमाणें विषुववृत्ताच्या किंवा पृथिवीच्या परिघाच्या दोन दिशांनीं दोन गृहस्थ निघाले तर कोठें तरी त्यांची गांठ पडण्याचा संभव आहे, त्याप्रमाणें एका बाजूनें शहाण्याचें शहाणपण वाढत गेलें व दुसऱ्या बाजूनें मूर्खाचें मूर्खपण चरत चाललें तर कोठें तरी त्या उभयतांचा शेकहँड (मुलाखत) होईल यांत संशय नाहीं ! फाजील शहाणपण आणि गाढ अज्ञान यापासून अनेकदां सारखेच परिणाम होतात. सध्यां आमच्या देशांत अर्थशास्त्राच्या संबंधानें कांहीं अंशीं असाच प्रकार होत आहे. या गरीब बिचाऱ्या शास्त्राचें एक टोंक आमच्या सरकारच्या व सैर अज्ञान लोकांच्या हातांत आहे, व दोघेंही आपापल्या सामर्थ्यानुरूप आपापल्या बाजूस तीं ओढीत आहेत. या **ताण-ओढांत** (Tug of war) लोकांची बाजू बरीच क्षीण आहे म्हणून बरें झालें आहे; नाहींतर ताणास लागलेल्या या शास्त्ररज्जूचे केव्हांच तुकडे होऊन गेले असते ! पण सरकारच्या मनोबलांत लोकांच्या मनोबलापेक्षां विशेष मजबुती असल्यामुळें, फ्रांस सरकार आपल्या बाजूला फरफरा ओढून नेत आहे ! गरीब व बिचारी तिच्याईत लोकांस ही स्थिति पाहून फार वाईट वाटतें. पण समुदायाच्या गाढ अज्ञानापुढें व सरकारच्या स्वार्थापायापुढें किंवा ज्ञानातिशयापुढें त्यांचें कांहीं चालत नसल्यामुळें जागच्या जागीं त्यांस स्वस्थ बसावें लागत आहे. तथापि खास सांगतां येईल कीं, सरकार आणि लोक यांनीं या गरीब बिचारी लोकांच्या शहाणपणाचा लवकरच विचार केला पाहिजे आहे; नाहीं तर लोक निष्प्राण होऊन सरकारी खजाने पडतील, व राजाप्रजेची निर्धनावस्था झाल्यामुळें जे दुष्परिणाम होतात ते सर्व घडूं लागतील.

हिंदुस्थानांत सांप्रतकाळीं प्रवर्तीत असलेल्या अर्थशास्त्राचे किंवा संपच्छास्त्राचे विषय विवेचनाच्या सोईसाठीं येथें तीन भाग करतों; १ ला औपपत्तिक; २ रा प्रयोज्य; व ३ रा भ्रामक. पैकीं पहिला सरकारानें उचलला आहे; तिसऱ्यानें सामान्य लोकांस पछाडलें आहे; व दुसरा विचारी पुरुषांच्या फक्त डोक्यांत आहे. सरकारच्या हातीं प्रवर्तक सत्ता असल्यामुळें दुसऱ्याचें व तिसऱ्याचें कांहीं एक न चालतां, पहिल्याचाच अंमल जारीनें होत आहे. सरकाराला पहिला व दुसरा यांतलि भेद कळत नसेल असें आह्मांस वाटत नाहीं. कदाचित् कांहीं अधिकाऱ्यांना तो कळत नसेल; पण त्याचें खरें स्वरूप कोणाच्याच लक्षांत उतरण्यासारखें नाहीं, असें मानणें अशक्य आहे. संपत्तीचें उत्पादन, वंटन आणि प्रतिपणन या तीन विषयांचा अर्थशास्त्रांत विशेष विचार केलेला असतो. आमच्या देशांत व्हावी तितकी संपत्ति उत्पन्न होत नाहीं; जी थोडीबहुत होते, ती खऱ्या ह्मणजे प्रयोज्य अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणें वांटली जात नाहीं व खोन्यांचें नाणें वापरणाऱ्या व्यापारकुशल श्रीमंत परक्या राष्ट्राच्या राजसत्तेमुळें तिची अदलाबदल किंवा देवघेव तर फारच तऱ्हेवाईक होते. आमच्या संपत्तीच्या प्रसवांत, विभगांत, व विनियमांत होणारा हा गोंधळ टाळावा कसा हें समजणें, समजाऊन देणें, किंवा समजाऊन घेणें, विशेष अवघड नाहीं; पण त्याप्रमाणें आचरण करणें हें फारच कठिण आहे.

संपत्तीची उत्पत्ति. वांटणी, आणि अदलाबदल यांपैकीं कोणत्याही गोष्टींत सरकारानें हात घालूं नये, असा अर्थशास्त्राचा सामान्य औपपत्तिक नियम आहे. या नियमाचें पालन

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

सरकार आपल्या फायद्यापुरतें तेवढें करतें, व जेथें त्या पालनापासून त्याचें नुकसान होत असेल तेथें त्याचें उल्लंघन करण्यास तें मागें पुढें पहात नाहीं, असें म्हणणें केवळ निराधार होणार नाहीं. यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, जें सरकारचें हित तेंच प्रजेचें हित असा राज्यशास्त्राचा सामान्य नियम असून, सरकारानें स्वतःला हितकर व रयतेला अहितकर असें अर्थशास्त्रीय वर्तन करणें कसें संभवतें ? यावर आमचें उत्तर असें आहे. कीं, ज्याप्रमाणें औपपत्तिक राज्यशास्त्राचे नियम पुस्तकांत राहून राज्यकर्ते आणि प्रजा यांचा बेबनाव होतो, त्याप्रमाणें औपपत्तिक अर्थशास्त्राचे नियम जेथल्या तेथें राहून उभयतांसही निर्धनता येते. उपपत्ति व्यवहारास लावतांना तींत जो फेरफार करावा लागतो त्याकडे कोणत्याही कारणानें दुर्लक्ष झालें असतां, असा परिणाम घडतो. शिवाय, या देशांतील सरकार आणि प्रजा यांत विशेष प्रकारचा संबंध आहे, हेंही लक्षांत बागविलें पाहिजे. आमच्या राज्यकर्त्यांस आमच्याच फायद्याकडे लक्ष द्यावयाचें असतें तर गोष्ट निराळी होती. पुष्कळदां आमच्या फायद्यापेक्षां त्यांना आपल्या देशाच्या व देशबांधवांच्या फायद्याकडे विशेष नजर पुरविणें भाग पडतें. ! त्यांनीं असें करावें हें अत्यंत स्वाभाविक आहे. पण व्यापारदृष्टीनें पहातां, इंग्लिश लोकांचा जो फायदा तो आमचाही फायदा असणें स्वाभाविक नाहीं. जें काम आमचें आम्हांस करतां येण्यासारखें आहे तें आमचें आम्हीं न करतां स्वस्थ बसलों, आणि तें दुसऱ्याकडून करून घेतलें, तर त्याच्या मूल दुसऱ्यास जें वेतन, रोजमुरा, किंवा किंमत द्यावी लागेल निश्चया मानानें आमचें नुकसास होणार आहे या किंमतीबद्दल आम्हांस विश्रांति मिळेल ही गोष्ट खरी. पण पोट भरलेलें असलें तरच विश्रांति सुखावह होते. लहान मुलांस भूक लागली असतां तीं रडून उठतात हें सर्वांस ठाऊक आहेच; व या गोष्टींत

लहान मुलांप्रमाणेंच थोरांचीही स्थिति आहे. पोटांत कांवळे कोरूं लागले असतां स्वस्थ बसण्यापासून सुख कसें होणार ? भुकेच्या यातनेपेक्षां कामाचे श्रम सहज साहण्यासारखे आहेत. इंग्लिश लोकांनीं आमचा व्यापारधंदा आटपल्यामुळें निरुद्योगापासून होणारे हाल आम्हांस सोसावे लागत आहेत. यावर कोणी असा प्रश्न करतील कीं, इंग्लिश लोकांस तुम्हीं आपले धंदे नाहींसे करूं कां दिलेत ? याचें उत्तर येवढेंच आहे की, ज्या कारणामुळें आम्ही आपलें राज्य त्यांना घेऊं दिलें त्याच कारणामुळें आम्ही आपलें धंदेहीं आटपूं दिलें ! आणि राज्य परत मिळविण्यासाठीं ज्या प्रकारच्या खटपटींचा उपक्रम आम्हीं केला आहे त्याच प्रकारच्या खटपटी व्यापारधंदा फिरून हातीं येण्यासाठींहीं चालविल्या आहेत. एक दुसऱ्याशीं संलग्न आहेत: तेव्हां साध्य होणार असतील तर दोन्ही एकाच क्रमानें साध्य होत जातील! भेद इतकाच आहे कीं, व्यापारधंद्याच्या संबंधानें आम्हांस आमच्या सरकाराशीं विशेष राजगोसपणानें भांडतां येतें. तथापि हें भांडण घालीत असतां, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, आधिभौतिकदृष्ट्या इंग्रजलोकांस हिंदुस्थानच्या राज्यापेक्षां हिंदुस्थानाशीं, व हिंदुस्थान हातीं असल्यामुळें सर्व आशिया खंडाशीं, करतां येत असलेल्या व्यापारापासून अधिक फायदा होत आहे. तेव्हां जर आम्हीं आपल्या व्यापाराचें पुनरुज्जीवन मनापासून करूं लागलों तर त्यांना उघडपणें जरी त्याला प्रत्यवाय करतां येणार नाहीं, तरी आमचा सगळा व्यापार आमच्या हातीं फिरून पडूं देण्यापेक्षां आमचें राज्य ते आम्हांस अधिक आनंदानें परत देतील! आम्हां हिंदूलोकांस युरोपिअन किंवा अमेरिकन लोकांप्रमाणें नानातऱ्हेच्या अनेक वस्तूंचा उपभोग घेण्याची हौस लागलेली नाहीं, व त्यामानानें त्या वस्तू उत्पन्न करण्यास लागणारी चलाखी आमच्या येथें दृष्टीस पडण्याचा संभव नाहीं, हें जरी खरें आहे, तरी त्या

थोड्या वस्तू आह्मांस लागतात, व ज्यांचा खप आह्मांमध्यें अधिकाधिक होत आहे, त्या सर्व सरकारनें कांहीं वर्षें मदत दिल्यास येथल्या येथें कमी खर्चानें करतां येण्यासारख्या ओहत हैं त्यांना ठाऊक नाहीं किंवा समजत नाहीं असें नाहीं पण व्यापाराच्या कामांत सरकारानें हात घांलूं नये, हा सामान्य औपपत्तिक नियम त्याचें मिष करून, तें आमच्या व्यापाराकडे ढुंकून देखील पहात नाहींत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि दिवसेंदिवस अधिकाधिक कंगाल होत जाणाऱ्या पंचवीस कोटी प्रजेचें विनबोभाट राज्य करणेंही कांहीं सोपें काम नाहीं. विहिरींत पाणी नसेल तर तें पोहऱ्यांत येण्याचा संभव नाहीं, हें आमच्याप्रमाणें त्यांसही चांगलें समजतें. तेव्हां प्रजेची हलाखी दृष्टीस पडूं लागली ह्मणजे तिच्या चौकशीसाठीं एखादें कमिशन नेमावें, शेतकऱ्यांस कांहीं सूट किंवा तगाई द्यावी, करांत एखाद्या फेरफार करावा, शेतकीची सुधारणा करण्याचें अवडंबर घालून कोठें एखादा कालवा काढ, कोठें तळें बांध, कोठें विहिरखण, कोठें कापसाचें किंवा गव्हाचें बीं वाट, कोठें शेतकीचें प्रयोग करण्यासाठीं एखादें फार्म [शेत] तयार कर, कोठें झाडें लाव, कोठें तोफा सोडून पाऊस पाडण्याचा प्रयत्न कर, कोठें गुरांचें इस्पितळ घाल, कोठें खताचे प्रयोग करून दाखीव, कोठें सावकाराला ओरबाडून शेतकऱ्याला वांचविण्याचा प्रयत्न कर, कोठें शेतकीची व्यवस्था पहाणारें खातें काढून त्यावर हुशार पण भारी पगाराचे अधिकारी नेम, कोठें रस्ते कर, कोठें झाडाचे छाट तोंडूं दे, व जंगलांतील गवत मुफत किंवा हलक्या किमतीनें नेऊं दे, कोठें शेतांस व जनावरांस लागणाऱ्या मिठासारख्या वस्तूंवरील कर थोडाबहुत कमी कर याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रसंगीं क्षुद्र सुधारणा करण्यांत येतात. पण अशानें कोठें अभ्यास मोनाद्द झालेली व उपाशीं मरूं लागलेली कोट्या-

वधि माणसें खाऊनपिऊन सुखी होणें शक्य आहे काय ? काळजापर्यंत जाऊन ठेपलेली जखम नुसत्या मलमपट्टीनें कशी भरेल ! प्रसंगाविशेषीं कांहीं कांहीं विशिष्ट कारणामुळें अशी जखम एकाएकीं वाहूं लागली तर कदाचित् असल्या पट्ट्यांनीं तिचें तोंड कांहीं वेळ दाबून धरवेल. पण पुनः कांहीं कारण झालें कीं ती फिरून वाहूं लागणारच. या संबंधानें आमची प्रकृति बरीच दुरुस्त होण्यास आम्हांस चार दोन चांगलीच **टॉनिकें** (रक्तवर्धक व शक्तिवर्धक औषधें) मिळालीं पाहिजेत. कापूस, धान्य, लोखंड, तांबें, जस्त, पितळ वगैरे अत्यंत उपयोगी धातू ; शेतकीस व इतर साध्या धंद्यांस लागणारीं यंत्रें-वगैरे पांच चार स्थूल वस्तूंचे व्यापार पूर्णपणें आमच्या हातीं आल्याशिवाय आम्ही आपली कांत टाकून ताजेतवानें होऊं शकणार नाहीं. असले व्यापारच आमचीं रक्तवर्धक औषधें होत. पण हीं आम्हांस आमच्या राज्यकर्त्यांपासून मिळण्याचा फारसा संभव दिसत नाहीं. फ्रान्स, युनायटेड स्टेटस, जर्मनी, इटली, रशिया, जपान, स्विट्झरलंड, फार तर काय, पण खुद्द इंग्लंड वगैरे देशांनीं आपल्या व्यापाराच्या बाल्यावस्थेंत त्याच्या वाढीकरतां सरकारच्या मार्फत काय काय प्रयत्न केले, व अजूनही त्या त्या देशांतील तारुण्यप्राप्त पावलेल्या व्यापारास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें केवढी मदत मिळत आहे,हें पाहिलें तर इंग्लंडच्या व्यापारास धक्का बसेल या भीतीनें आमचें राज्यकर्ते आमच्या व्यापारास मिळत्याजुळत्या अर्थशास्त्रज्ञांनीं ज्या प्रकारच्या उत्तेजनाची अवश्यकता व सुयुक्तिकता आपापल्या ग्रंथांत प्रतिपादिली आहे. वरच्या प्रकारचे उत्तेजन अमेरिकेतील स्वतंत्र संस्थानच्या किंवा जपानच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं आपपल्या व्यापारांस देऊन त्याची भरभराट करून सोडिली आहे, त्या प्रकारचें उत्तेजन आमच्या व्यापारास देण्याबद्दल येथल्या किंवा इंग्लंडातल्या प्रमुख अधिकाऱ्यांपुढें

तुम्हीं केव्हांही गोष्ट काढिलीत तर तें आपल्या दोनही कानांवर घट्ट हात ठेऊन, दांभिकपणानें **शांतम् पापम्** या मंत्राचां जप करीत सुटतलि ! ! जंणो काय, लोकांच्या पैशानें, लोक करा लणून प्रार्थना करीत असलेली, गोष्ट करण्यास प्रवृत्त होणें हें महापातक आहे ! आमच्या व्यापारास व शेतकीस अर्थशास्त्राचें उल्लंघन न करतां कोणत्या रीतीनें मदत करतां येईल यार्चा चिकित्सा मि. जस्टिस तेलंग, रा. ब. रानडे, दादाभाई नवरोजी वगैरे अनेक अनुभविक, शास्त्रज्ञ, व विचारी गृहस्थांनीं केली आहे. पण तिचा काय उपयोग ? निजलेल्यास जागें करणें शक्य आहे; जाग्यास जागा कोण करूं शकेल ? इंग्लिश लोकांच्या मनोधर्मांत एकाएकी प्रचंड क्रांति झाल्याशिवाय त्यांच्या अंतःकरणांत जपान किंवा युनायटेड स्टेट्स येथील सरकाराप्रमाणें आमच्या व्यापारवृद्धीविषयीं कळकळ उत्पन्न होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. अशी क्रांति शंपन्नास वर्षांत होण्याचें तरी कांहीं एक चिन्ह दिसत नाहीं. तेव्हां निदान शंपन्नास वर्षे तरी आमच्या व्यापाराचा तरणोपाय आमचा आम्हींच पाहिला पाहिजे.

हा तरणोपाय कशांत आहे याचा निश्चय करणें हें प्रयोज्य अर्थशास्त्राचें काम आहे. औपपत्तिक अर्थशास्त्राचे नियम विशिष्ट देशाला लागू करावयाचे झाले म्हणजे त्याच्या स्थितीकालमानाप्रमाणें त्यांत फेरफार करावे लागतात. व्यापार बहुधा अप्रतिबंध असावा हा औपपत्तिक अर्थशास्त्राचा सामान्य नियम, पण कोणत्या बाबतीच्या जागीं, किंवा कांहीं कारणानें मागें पडलेल्या कोणत्या कांहीं बाबींत मदत दिल्यानें जो धंदा किंवा व्यापार चांगला फुलावेल व मदत काढून घेतल्यावरही जोरानें वाढत राहील असें मानण्यास चांगला आधार असेल, अशा ठिकाणीं सरकारानें अशा व्यापारास कांहीं काळ मदत द्यावी, असा प्रयोज्य अर्थशास्त्राचा नियम आहे; पण हा नियम कोणत्या

प्रकारचें सरकार अमलांत आणणार ? ज्याला त्या व्यापाराची खरोखर भरभराट व्हावी असें वाटत असेल तें. चेथला शेरभर कापूस देखील इंग्लंडास जाईनासा होईल, व इंग्लंडचा एक एक तागाही इकडे येईनासा होईल; उलट इंग्लंडच्या बाजारांतच इंग्लंडच्या सतरंज्यांपेक्षां आमच्या सतरंज्या स्वस्त दरानें विकूं लागतील तर ल्यांक्याश्टर आणि मँचेस्टर येथील गिरण्यांपैकीं हिंदुस्थानच्या कापसावर अवलंबून असणाऱ्या गिरण्यांनीं काय करावें ? व त्यांचीं यंत्रें धडपडत त्यांच्या चिमण्यातून धूर येईनासा झाल्यास, त्यांत काम करणाऱ्या लाखों मजूरांनीं कोठें जावें आणि काय खावें ? त्यांची तशी स्थिति अशी व्हावी आमची बिलकुल इच्छा नाहीं; व कालेंकरून आमचा कापूस आम्ही तिकडे न जाऊं देऊं लागलों तर ते उपाशी मरतील, अशी शंका देखील मनांत आणावयास नको. पृथ्वीच्या पृष्ठावर कापूस करण्यासारखी किंवा उत्पन्न करण्यासारखी एक इंचभर जमीन असेल तोंपर्यंत तो उद्योगी, धाडसी, व कल्पक लोक लुगावयाचे नाहींत. पण त्यांनीं आपण होऊन इतक्या प्रयासानें व खर्चानें स्थापिलेले आपले कारखाने तुमच्या स्वाधीन करावे, अशी आशा करणें म्हणजे मनुष्यस्वभावाविषयीं अत्यंत गूढ अज्ञान प्रकट करणें होय. तुमच्यांत धमक असेल तर तुमचा व्यापार तुम्ही काबीज करा म्हणजे त्यांना जे जरूर दिसेल तें ते करतील. पण सरकारच्या मदतीशिवाय आम्ही पंगू, मेकडे आळशी आणि अडाणी लोक हा विजयध्वज कसा लावणार ? सामान्य लोकांना या प्रश्नांत कांहीं काठिण्य आहे असें बिलकुल वाटत नाहीं; त्यांचें ह्यावर एक ठाम उत्तर ठरलेलें आहे, व प्रसंग पडला कीं तें ते फाडदिशीं ठोकून देतात **देशी माल**.

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८

सुधारक ऑफीस पुणें

वापरण्याचा निश्चय सर्वांनीं करावा म्हणजे चार दोन वर्षांत इंग्लंडचे व्यापारी चीची करीत बसून हिं दुस्थानांत जिकडेतिकडे उद्योगच्च उद्योग व कारखानेच्च कारखाने होऊन जातील !!! दुर्दैवानें ही निश्चयरूपी यक्षिणीची कांडी फिरवणार कोण, हें मात्र सांगणारा अद्यापि कोणी पुढें आला नाहीं; तसेंच देशी मालांत कोणत्या रीतीनें तयार केलेल्या वस्तूंचा समावेश करावयाचा हेंही या **भ्रामक अर्थशास्त्रभक्तांस** नीट समजत नाहीं. स्क्रू टांकून जेथें तेथें खिळे वापरणें; आगगाड्यांतून प्रवास न करतां पादचारी होणें; घड्याळें फेंकून देऊन घटकापात्रें लाऊन बसणें; तारायंत्राकडे पाठ फिरवून सांडणी स्वारांची योजना करणें; टपालांत पत्रें न टाकतां जामूद पाठविणें इंग्लंडच्या यंत्रावर कापड न काढतां गांव मागावर अवलंबून राहणें; छापखाने रद्द करून लेखकांच्या पलटणी तयार करणें–हें केवढें अजागळपणा होणार आहे हें या लोकांस बिलकुल समजत नाहीं ! हें पोरकटपणा तोफखाना घेऊन बुद्धास निघालेल्या रोन्याशीं लहान पोरांच्या काग्दी कैपांच्या पिस्तुलांनिशीं सामना करण्यास उभे राहण्यासारखें होय ! हा **भिध्या देशाभिमान** आणि हे **भ्रामक अर्थशास्त्र** आतां आहीं टांकून देण्यास तयार झालें पाहिजे. देशाकरतां जें नुकसान सोसण्याची ईर्षा नुमच्या अंगांत असेल तीं लहानमोठे यांत्रिक कारखाने घालण्यां । । भरपूर श्रम त्यांत जें नुकशान येतें तें योग्य मार्गानें भरून काढण्यांत दाखवा. "हे देशीमालाचें दुकान:येथें परदेशच्या मालास देशाभिमानास्तव दोन पैसे जास्त द्यावे लागतात." अशा फक्त लावलेल्या दुकानें घालण्यापासून किंवा त्यांतील माल खरेदी केल्यापासून कोणास कांहीयेवढाही फायदा होण्याचा संभव दिसत नाहीं. हिंदुस्थानांत ज्या ऐशी मध्यद गिरण्या चालू आहेत त्या असल्या दुकानांत आपला माल विक्रीस ठेवीत नाहींत किंवा

असल्या मिथ्या देशाभिमान्यांच्या व भ्रामक अर्थशास्त्रभक्तांच्या जिवावर त्या निघालेल्या नाहींत. लोकांकडून किंवा सरकाराकडून ज्या प्रकारारची मदत पाहिजे आहे त्या प्रकारची मदत मिळूं लागेल तर थोड्या वर्षांत जिकडे तिकडे कापसाच्या गिरण्या आणि इतर कारखाने दिसूं लागतील. सरकाराकडून ती मदत मिळण्याचा संभव नाहीं, पण लोकांना तो घरीच देतां येणार आहे. ती त्यांनीं कशी द्यावी, हें आजच सांगितलें असतें, पण एका अर्टिकलाच्या लांबीचें जें प्रमाण आहे, तें अगदींच विसरतां कामा नये !

तीन अर्थशास्त्रं.

औत्पत्तिक, प्रयोज्य व भ्रामक असें अर्थशास्त्राचे तीन भाग कल्पून त्या संबधानें आम्हीं मागें जें विवरण केलें आहे तें वाचकांच्या ध्यानांत असेलच. व्यापाराला सरकारानें उत्तेजन देऊं नये हें सरकारचें निव्वळ औत्पत्तिक अर्थशास्त्र; देशी मालाशिवाय दुसरा माल वापरूं नये हें मूढांचें भ्रामक अर्थशास्त्र; सरकारानें व लोकांनीं वाजवी उत्तेजन देऊन या देशाला इतर देशांशीं प्रतिस्पर्धा करण्याचें सामर्थ्य आणावें आणि मग हवा तसा निर्प्रतिबंध व्यापार सुरू करावा, हें तारतम्य जाणणाऱ्यांचें प्रयोज्य अर्थशास्त्र. या तिहींपैकीं

स्लॉट्स भाड्यानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें)
समोर–हवाशीर, सर्वत्र पाणी खेळतिलेले असे.

मॅनेजर—सुधारक पुणें.

पहिलीं दोन एकंदरीनें आह्मांस कां मान्य नाहींत, हें आम्हीं बऱ्याच विस्तारानें सांगितलें आहे. व व्यापाराला उत्तेजन देण्याचा वाजवी मार्ग कोणता हें आतां सांगावयाचें आहे.

पुष्कळ व्यापार ह्मणजे पुष्कळ उद्योग, पुष्कळ उत्पन्न, आणि पुष्कळ उपभोग. नानाप्रकारचे उपभोग घेण्यास नानाप्रकारच्या वस्तू पाहिजेत, व त्या मिळण्यास नानातऱ्हेचे उद्योग केले पाहिजेत. निवाऱ्यावर चरितार्थ करून वल्कलें किंवा कृष्णाजिनें परिधान करणाऱ्या व निवाऱ्यासाठीं पर्वतांच्या गुहांचा आश्रय करणाऱ्या वैराग्यप्रिय संत लोकांना किंवा जंगली लोकांना तुमचे नानाप्रकारचे उपभोग नको असल्यामुळें नानाप्रकारच्या वस्तूंची अपेक्षा नसते, व त्यांचेकडुल आम्ह करणें हेंहि त्यांस आवडत नसतें ! युरोपांतील किंवा अमेरिकेतील लोकांशीं तुलना करतां आमचे लोक बऱ्याच अंशीं वैरागी किंवा रानटी आहेत असें म्हणावें लागेल ! आमचें खाणेंपिणें, आमचें आंथरूणेंपांघरूणें, व आमचें राहणेंसवरणें अगदीं सर्वंग च साधें ! स्वल्प आहार, स्वल्प श्रम, स्वल्प जीवित, स्वल्प सुख; "पंन आमचें सारें स्वल्प ! अशा स्वल्पसंतुष्ट लोकांत युरोपांतल्या किंवा अमेरिकेतल्या हारप्याऱ्यायेवढे कारखाने बहुधा कधींही वाढतां येणार नाहींत. निदान तसें त्यांस करतां येण्यापूर्वी त्यांच्या स्वभावांत पुष्कळ फरक झाला पाहिजे. तेव्हां हिंदुस्थानांतला व्यापार कितीही वाढला तरी लोकसंख्येच्या मानानें तो इंग्लंडांतील व्यापाराइतका फैलावेल अशी गोष्ट स्वप्नांत देखील आणावयास नको. तथापि प्रस्तुतपेक्षां तो पुष्कळ पटीनें वाढवितां येणार आहे, व त्या मानानें आमचें आधिभौतिक सुखही वाढणार आहे. इंग्लंडच्या व्यापाराप्रमाणें येथल्या व्यापाराचा विस्तार होण्याची कधींच आशा नाहीं,

असें झाल्यीं जें वर म्हटलें आहे त्याबद्दल कोणासही वाईट वाटण्याची गरज नाहीं. काठेवाडी घोड्याचे गुण आपल्या अंगांत कां नाहींत म्हणून भिमथडीचें तट्टू शोक करीत बसेल तर त्याला आपण वेडें ठरविणार नाहीं काय ? असलें वेडेपण आपल्या पदरीं न यावें, अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं इंग्लिश लोकांचा इतिहास, त्यांचें शरीरसामर्थ्य, त्यांचें बुद्धिबल, त्यांची नीतिमत्ता, त्यांचें साहस, त्यांची हवा, त्यांची जमीन, यांची आपल्या इतिहासाशीं, शरीरसामर्थ्याशीं, बुद्धिबलाशीं, साहसाशीं, हवेशी आणि जमीनीशीं तुलना करावी, आणि आपण हलक्या जातीचे लोक आहों, अशी आपल्या मनाशीं पक्की गांठ घालून आपल्या हातून जेवढें होणें शक्य आहे, तेव्हां त्यासच हात घालण्याची महत्त्वाकांक्षा धरावी हें त्यांस उचित आहे.

तेव्हां आतां जे कारखाने आमच्या हातून सहज निघण्यासारखे व निभण्यारखे असतील त्यांसच आम्हीं प्रथम हात घातला पाहिजे, व जो माल हटकुन खपण्याचा संभव असेल तोच उत्पन्न केला पाहिजे हें उघड आहे. येथून पुढें आमचे लक्ष्य व कोष्टी आणि त्यांचे भाते व माग यांवरचे अश्रू ढाळीत बसणें कामा नये. असल्या कारागिरांचीं आणि त्यांच्या अवजारांचा पूर्वी शंभर वर्षें भरून गेलीं आहेत ! जर या लोकांना उपाशीं मरावयाचें नसेल तर त्यांनीं यंत्रावरचीं कामें करण्यासच शिकलें पाहिजे. येथून पुढें आमचा बहुतेक माल यंत्रावर काढला तरच आमचा कांहीं निभाव लागणार आहे. मिथ्या देशाभिमा-

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टपा हं सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

•

नामुळें किंवा व्यतिचारी अनुकंपेमुळें जुन्या धंद्यांचें आणि धंदे-
वाल्यांचें संरक्षण करण्याच्या नादास जर आपण लागलों तर
अखेरीस त्यांना बुडवून आपणही बुडूं, हें पक्कें ध्यानांत ठेवलें
पाहिजे. या दिवसांत मोठमोठाले यांत्रिक कारखाने घालून त्यांत
खंडोगणती माल तयार केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. पण ही गोष्ट
घडणार कशी, हा मुख्य प्रश्न आहे?

मोठा कारखाना म्हणजे मोठें भांडवल.

तुम्हीं काय पाहिजे तें करा, व हवीं तितकीं व्याख्यानें झोडा-
मोठें भांडवल उभें राहिल्या खेरीज मोठा कारखाना निघण्याची
आशा नाहीं. भांडवलाच्या जवळ जवळ अकलेची गरज आहे
पण अगोदर भांडवल आणि मग अक्कल. भांडवल असल्यास
थोड्या श्रमानें अक्कल संपादितां येणार आहे. हें भांडवल येथें
कसें उभें करावें हींच मोठी पंचाईत आहे. आमच्या देशांत
भांडवलाची विपुलता असती तर युरोपिअन व्यापारी कंपन्यांनीं
येथें चालविलेले पुष्कळ कारखाने आमचे आम्हींच चालविले
असते. राज्य सुरक्षित असलें आणि पैशाचा संग्रह विपुल अस-
ला, म्हणजे तो व्यापारांत घालून त्यांपासून दीडाचे दोन कर-
ण्याची इच्छा सहज होते. येथल्या राज्यव्यवस्थेंत व्यापारास
धक्का बसण्यासारखें कांहीं नाहीं, पण येथें भांडवलाची चिलकुल
अनुकूलता नाहीं. हिंदुस्थानांत भांडवल नाहीं असें म्हणणें
कित्येकांस भारी विपरीत वाटतें. या लोकांच्या डोळ्यांत आम-
च्या व्यापाऱ्यांचें दागिने फार सलतात; नसेंच हे लोक असाही
प्रश्न करतात कीं, जर आमच्या लोकांपाशीं खरोख-
रींच पैसा नसेल तर लग्नकार्यांत व प्रेतांच्या उत्तर
क्रियांत आम्ही इतकी उधळपट्टी कशासाठीं
करतों? या आक्षेपांवर सरळ उत्तर असें आहे कीं, दुसऱ्या

कोणत्याही देशांत संपत्तीच्या किंवा वार्षिक उत्पन्नाच्या मानानें जितका अनुत्पादक भांडवल असावा लागतो हिंदुस्थानांत त्यापेक्षां हा तो असें मुळींच नाहीं. विशेषतः दागिन्यांच्या संबंधानें आह्मांवर वारंवार जी टीका करण्यांत येते तिचें अयथार्थत्व मि. दादाभाई नवरोजी यांनीं फार उत्तम रीतीनें दाखविलें आहे. तथापि ही गोष्ट निर्विवाद आहे कीं ज्या अर्थीं आह्मांस आमचा व्यापार वाढविणें अवश्य आहे त्या अर्थीं त्याला लागणारें भांडवल आम्हीं कोठून तरी उभें केलें पाहिजे व तें उभें करण्यास दागिने आणि मेजवान्या यांकडे होणारा खर्च कमी केल्यास बरीच मदत होणार आहे. याशिवाय, सरकारी बँकेत पैसा न ठेवतां तो व्यापारांत घालण्याचा समंजस लोकांनीं हिय्या केला तर सध्यां जितकें भांडवल जरूर पाहिजे आहे तितकें सहज पैदा होणार आहे. सरकारी बँकेंत ठेवलेला पैसा सुरक्षित असतो हें आह्मी कबूल करतों; पण व्यापारांत घातलेला पैसा केवळ धोक्यांत असतो असेंही नाहीं. चांगलें कारण पाहून किंवा विश्वास ठेवण्यासारखीं माणसें हुडकून काढून वार्षिक शिलकेचा कांहीं भाग व्यापारांत घालावयाचा असा प्रत्येकानें निश्चय केला, तर प्रतिवर्षी चार दोन मोठे कारखाने काढण्यापुरतें भांडवल उभें रहात जाईल. शिवाय, कोणत्याही मनुष्यानें जो पैसा व्यापारांत घालावयाचा तो सारा एकाच व्यापारांत घातूं नये. असें केल्यानें त्याचें सहसा नुकसान होणार नाहीं; कारण साऱ्याच व्यापारांत एकसमयाव-

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.

किं. ७८

सुधारक ऑफीस, पुणें.

च्छेदेंकरून बूड येण्याचा संभव कधींच असत नाहीं. तेव्हां महाग देशी माल घेण्यापेक्षां किंवा तो घेण्याचद्दल दुसऱ्यांची मनवळवणी करीत बसण्यापेक्षां, लहान लहान भागीदारींनीं उभारलेल्या समाईक भांडवलाच्या व्यापारी मंडळ्या प्रांतोप्रांतीं स्थापण्यांत आल्या तर पांच पंचवीस वर्षांत ज्या व्यापारवृद्धी-बद्दल आज आपण इतकें धडपडत आहों तीं स्पष्टपणें चोहोंकडे दिसूं लागेल. या देशांत कोणताही नवीन व्यापार काढाव-याचा म्हणजे त्याला दुसऱ्या देशांपेक्षा अधिक अडचणी येतात. अगोदर सरकार त्याला प्रतिकूळ नसलें तरी अनुकूल असण्याचा संभव नसतो. दुसरें, कारखान्याकरतां लागणारीं बहुतेक यंत्रें इंग्लंडाहून आणावीं लागतात. तिसरें, कारखाना चालविणारीं माहितगार माणसेंही येथें मिळत नसल्यामुळें निदान वरिष्ठ प्रतीचे नोकर युरोपांतूनच आणावे लागतात. एंजिनीअर, म्यानेजर वगैरे नोकर परक्या देशांतून आणल्या-शिवाय कोणताही मोठा कारखाना चालणें आज मित्तीस अशक्य आहे. या सर्व कारणांमुळें प्रथम कांहीं वर्षें कारखा-न्याचें काम बरोबर चालत नाहीं, व त्यांत निघणारा माल चांगला असत नाहीं. असला माल हलक्या किमतीनें विकावा लागतो व त्यामुळें भागिदारांस फायदा पडत नाहीं. सरकारी बयांकेंत ठेवलेल्या पैशावर निदान आजपर्यंत तरी तीनचार टक्के व्याज मिळत होतें; शेतकऱ्यांस किंवा दुसऱ्या कोणास चांगल्या गहाणावर दिलेल्या रकमेवरही बरेंच व्याज पडतें. यामुळें प्रथम प्रथम मुळींच व्याज न पडणाऱ्या अथवा कदा-चित् थोडीबहुत बूड येणाऱ्या नवीन कारखान्यांत हौसेनें आपला पैसा कोण घालणार ? तथापि मिथ्या देशाभिमानें भारी किमतीचा जाडाभरडा देशी माल वापरण्यापेक्षां कांहीं वर्षें फायद्याकडे दुर्लक्ष्य करून किंवा प्रसंगविशेषीं मूळ मुद्दलां-

तही थोडाचहुत तोटा सोसण्यास तयार होऊन, निरनिराळ्या व्यापारी मंडळ्यांचें पार्तीदार होणें परिणामीं स्वतःला व देशाला फार श्रेयस्कर होणार आहे. व्यापारवृद्धीला मदत करण्याचा हा खरा मार्ग होय. याशिवाय यांत्रिकज्ञान संपादण्यासाठीं परक्या देशास विद्यार्थी पाठाविणें; जागोजागीं प्रदर्शनें करणें; शेतकरी, सुतार, लोहार, वगैरे कारागीर लोकांस आपापल्या धंद्यांस लागणारीं लहान लहान यंत्रें घेण्यासाठीं हलक्या व्याजानें किंवा उसनवार रकमा देणें; कच्च्या मालाचें उत्पन्न वाढविण्यासाठीं शेतकीची होईल तेवढी सुधारणा करणें; लहान मोठ्या गांवांत उपयुक्त यंत्रशाला स्थापणें; कारागीर व मजूर लोकांस प्राथमिक शिक्षण, चित्रकला, व एखाद्या दुसऱ्या धंद्याविषयीं चांगल्या प्रकारची यांत्रिक माहिती देणें--या आणि अशा प्रकारच्या इतर कृत्यांकडे पैसेवाल्या समंजस लोकांचें ज्या मानानें लक्ष्य लागेल व उदारपणानें खर्च होत जाईल त्यामानानें खऱ्या व्यापारवृद्धीचा पाया या देशांत पडेल, हें उघड आहे.

यांत दोषी कोणीच नाहीं.

न्याय, समता, पूर्णत्व वगैरे गुणांचा नेहमीं विजय व्हावा असें निसर्गतः मनुष्यास वाटत असतें. असें नसतें तर परिच्छेदातीत, कल्पनाबाह्य व अनिर्वचनीय असणाऱ्याही या विश्वाच्या आदिकारणावर मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांनीं वैषम्यनैर्घृ-

---

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ०५

लेखकःवैद्य अॅण्डशानधारसस्त्र पेठ, पुणें.

प्यादि दोषांचा कधींही आरोप केला नसता. असें नसतें तर इतिहासवाचन व नित्यव्यवहारदर्शन यापेक्षां कविसृष्टिच्या मननावलोकनानें मनुष्यमात्रास अधिक आनंद झाला नसता. व असें नसतें तर त्या कविसृष्टींतही शोकपर्यवसायी कृतीपेक्षां आनंदपर्यवसायी कृती जनतेस जी अधिक प्रिय होते, तीही झाली नसती. तेव्हां या दृष्टीनें विचार करतां सुधारकवर्गी-याकडून प्रायश्चित्त ग्राहकांवर हल्ली जो भडिमार होत आहे, तो पाहून आह्मांस आश्चर्य वाटत नाहीं इतकेंच नाहीं तर उलट आनंद होतो.

परंतु यासंबंधानें आह्मांस काय वाटतें हें कळविण्यापूर्वी आणखी एक गोष्ट विचारांत घेतली पाहिजे. चांगलें काय व वाईट काय याचा जेव्हां आपण आपल्या मनाशीं विचार करीत असतो; तेव्हांही बाह्योपाधीच्या संसर्गाचा आपल्या मनावर पगडा बस-ल्याशिवांचून रहात नाहीं. तेच विचार बोलून दाखविण्याचें मनांत आणलें कीं या बाह्योपाधी आपल्यापुढें प्रत्यक्ष उभ्या राहून आ-पणास भिववूं लागतात. व विचाराप्रमाणें आचार करावयाचा झटलें झणजे तर या बाह्योपाधी आपल्यापुढें आडव्या पडून आपला मार्ग खुंटवून टाकतात. तेव्हां योग्य काय हें समजणें हें वेगळें व त्याप्रमाणें आचार करणें हें वेगळें.

वरील विचारावरून आमच्या वाचकांच्या लक्ष्यांत आलें असलच वर्ग, या प्रायश्चित्त प्रकरणानें संतापून गेलेल्या सुधा-रकांस जसें आह्मी सुधारणेचे शत्रू दिसलों नाहीं त्याप्रमाणेंच प्रायश्चित्त घेणाऱ्या सुधारकांसहीं सुधारक वर्गांतून बहिष्कृत करण्यास आह्मी तयार नाहीं ! सुधारकधुरीणांत गेल्या वर्षभर जो लढाई जुंपून राहिली होती, तीमध्यें आपल्या पक्षाचें झालेलें आचरण जरी आपल्या पूर्ण पसंतीस पडलें नाहीं तथापि

त्यांच्या अडचणी लक्ष्यांत घेतल्यावांचून त्यांच्यावर लष्करी कायद्याचा अंमल करणें हें गैरवाजवी होणारें आहे.

ज्या गोष्टींत पाप नाहीं असें आपलें स्पष्ट मत आहे त्याबद्दल प्रायश्चित्त घेणें हें जरी केवळ अप्रामाणिकपणाचें आहे, असें आमच्या कांहीं टीकाकाराप्रमाणें आम्हांस वाटत नाहीं, तथापि तसें करावें लागणें हा गौण पक्ष होय असें आम्ही समजतों. शिवाय प्रायश्चित्त घेण्यांत जर अप्रामाणिकपणा आहे तर आमच्या समाजांत प्रामाणिक कोणीच नाहीं असें म्हटलें पाहिजे. यज्ञोपवीत धारण करण्याचा जो प्रथम उद्देश होता त्याचा हल्लीं अभाव झाला असून, दर श्रावण महिन्यांत फिरून तें लोढणें गळ्यांत अडकवणारे, व मुलाची मुंज करून त्यासही आपलें अनुकरण करण्यास लावणारे हे केवळ अप्रामाणिक असले पाहिजेत ! आमच्या सोळा संस्कारांपैकीं एकही संस्कार हस्तें परहस्तें ज्यांच्याकडून केला जात नसेल असे कोणीही नसतील, तेव्हां तेही वरील तर्कशास्त्रानें अप्रामाणिकांच्या यादींतच आले पाहिजेत. परंतु गळ्यांत जानवें ठेवणारे,लग्न,मुंज, प्रेतसंस्कार इत्यादि विधी परांत होऊं देणारे हे चटसारे अप्रामाणिक आहेत असें आम्हांस वाटत नाहीं प्रायश्चित्त न घेतल्यानें वेगळी जातच करण्यावाचून गत्यंतर नसतें तर या प्रायश्चित्तासच आम्ही उत्तम मार्ग म्हणण्यास मागेपुढें पाहिलें नसतें.परंतु पुनर्विवाहासंबंधानें बहिष्कृत केलेले लोक जातीबाहेर पडले नाहीत,

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॉन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपया.

' संदेश ' एजंट. पुणें सिटी.

ही गोष्ट धडधडीत आमच्या डोळ्यापुढें दिसत असून प्रायश्चित्ताभावीं या लोकांस जातींतून कायमचे वेगळें व्हावें लागलें असतें, असें आह्मास क्षणभरही वाटत नाहीं. व असें आमचें मत असल्यामुळें या मार्गास आह्मी गौण मार्ग ह्मणतों. कांहीं दिवस कळ सोसून अहंकाराची निःसत्वता लोकांस भासविणें हा आमच्या मते सुधारणेचा उत्तम मार्ग. परंतु ती कळ सोसण्याचें सामर्थ्य नसल्यास लोकांस भिऊन रूढींचा अगदीं अतिक्रम न करण्यापेक्षां योग्य प्रसंगीं तो करून प्रायश्चित्ताचा थट्टा करणें हा सुधारणेचा गौण मार्ग होय. आतां ही कळ सोसण्याचें आपणास सामर्थ्य आहे असें ज्यांनीं आजपर्यंतच्या आपल्या आचरणावरून सिद्ध केलें आहे, त्यांनीं या प्रसंगीं या गौण मार्गाचा अवलंब कां केला व तो तरी निंद्य दोषास पात्र आहे किंवा नाहीं, याचा यापूर्वीच विचार केला आहे. बाकी राहिलेल्या इसमांमध्येंही ज्यांस आजच प्रायश्चित्त घेण्याचें नव्हते असे कित्येक गृहस्थ आहेत परंतु त्यांचें आचरण सेनानिच्या आचरणावर अवलंबून असल्यामुळें त्यांचाही वेगळ्या रीतीनें विचार करण्याची अवश्यकता नाहीं.

प्रायश्चित्त घेण्याच्या बाबतींत दोषाचा भाग किती आहे हें ठरविताना आणखीही एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. मिशन ह्मणमध्यें गेलेले सारेच लोक आपण अमुक एक गोष्ट करण्याच्या उद्देशानें तेथें जात असतात हें जाणून नव्हते. जर त्यांस ही गोष्ट पूर्वीच कळून येती तर त्यापैकीं कोणी या भानगडींत पडते किंवा नाहीं, हें आतां खात्रीनें सांगतां येण्यासारखें नाहीं. इंग्रजी डाक्टराच्या हातचीं औषधें घेणें, सोडावाटरच्या बाटलींचीं बुचें उडविणें, किंवा स्टेशनवरच्या रिफ्रेशमेंटरूमचा उपयोग करणें वगैरे गोष्टींस समाज हळूहळू परिचित होऊन आपला कार्यभाग होत असतां, ख्रिस्ती मिशनऱ्यांशीं मुद्दाम पंगत करून

विनाकाण लोकांस चिडविणें यांत शहाणपण आहे असें कोणा म्हणणार नाहीं. तेव्हां जी गोष्ट आपण जाणूनबुजून केलेली नाहीं तिचा फाजील अभिमान धरणें कोणास अयोग्य वाटल्यास त्यास दोषी ठरविणें आमच्या मतें अप्रशस्त आहे. आतां शेवटीं आणखी एका गोष्टीचा उल्लेख करून या प्रकरणाची आम्ही रजा घेतों.आमच्या समजुतीनें या प्रकरणांत जर कोणी दोषी असेल,तर तो आमच्या पुण्यांतील सुशिक्षित वर्गच होय. चहा पिणाऱ्यांवर आकडून रीतीप्रमाणें बहिष्कार झाला असता तर गोष्ट वेगळी. परंतु तसें कांहीं झालें नसून गांवांतील चार दोन लोकांनीं जरा कुठें हांहूं झाल्याबरोबर आमच्या गांवांतील विद्याविभूषित म्हणविणारांची जी कांहीं त्रेधा उडून गेली ती अगदीं विचारूं नका. ही गोष्ट खरी असतां म्हणजे अगदीं वेदोक्त धर्मानुयायी होतां असा मुळींच भाग नाहीं. ब्राह्मणेतराच्या हातच्या चहाचे पेले यांणीं आजपर्यंत कितीकदां घेतले असतील, बिस्कुटांचे डबेच्या डबे रिकामे केले असतील व याच्याही पलीकडचे व्यवहार यांच्या हातून घडले असतील. परंतु हे सर्व व्यवहार अंधेरांत- घडले असल्यामुळें जणूं काय आपण त्या गांवचेच नाहीं असें दाखविण्याकरितां आपल्या अस्तन्या वर सारून हेही ग्रामण्यवाल्यांवरोबर हैदोस घालूं लागले। या वर्गामध्यें ज्यांचा समावेश झाला होता ते लोकही लुंगेसुंगे नसून मोठमोठे नांवाजलेले पदवीधर, मोठमोठे पगार खाणारे अधिकारी, असे लोक या वर्गांत थोडे नव्हते. या लोकांची चहाला लयास मदत मिळाली असती तर ग्रामण्यवाल्यांचा पक्ष अगदीं

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.
डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.
पृष्ठें ४६४ पुंठ्यर कार्डो बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४
लाइफ ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

कमजोर होऊन हें प्रकरण गुर्का या थराला आलेंच नसतं. असो, तेव्हां वरील सर्व गोष्टींचा शांतपणें विचार करतां प्रायश्चित्त घेणारांवर जितका कहर उडवून देण्यांत आला आहे तितक्यास ते पात्र नाहींत व त्यांच्या एकंदर आचरणानें सुधारणा मार्गे गेली आहे असेंही आम्हास वाटत नाहीं. असाच प्रसंग दुसऱ्या एकाद्या शहरांतील लोकांवर आला असता तर त्यांनीं प्रायश्चित्ताचाच अवलंब केला असता इतकेंच नाहीं तर त्यांच्यानें पुणेकरांइतकाही नेट धरवला नसता अशी आमची खात्री आहे.

आम्हां पुरुषांचा पेहराव.

(नंबर १ ब्राह्मणी पगडी.)

कृत्रिम सृष्टींत जर एखादी अत्यंत निरुपयोगी, त्रासदायक व आर्य वस्तू असेल तर ती ब्राह्मणी पगडी होय ! हें विलक्षण शिरस्त्राण किंवा शिरोभूषण वापरणाऱ्या भटजीबावांस हें आमचें लिहिणें कदाचित् अतिशयोक्तिपर वाटेल; पण मिथ्या स्वयस्त्व-भिमान एकीकडे ठेऊन उपयुक्ततेच्या दृष्टीनें आमचे जातभाई या पागोट्याचा विचार करतील तर आमच्या औपक्रामिक विधानांत असली तर फारच थोडी अतिशयोक्ति आहे, असें त्यांस दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं!

फॅशन उर्फ तऱ्हा हिच्यासारखी दुसरी कोणतीही चीज आंधळी किंवा लहरी नसेल. विचाराचा दाब झुगारून देऊन एकदा ही तळ्यतीच्या आधीन झाली म्हणजे ही कोणीकडे भडकत जाईल किंवा हिला कसलें वळण लागेल हें साक्षात् ब्रह्मदेवाच्यानें देखील सांगवणार नाहीं! आम्ही ब्राम्हण लोक अगदीं

पुरातन कालीं डोक्याला कांहीं घालीत होतीं किंवा नाहीं याचा संशय आहे. फार झालें तर विशेष प्रसंगीं आम्ही आपलीं डोकीं शालजोड्यानीं किंवा रेशमिकांठीं धोतरानीं आच्छादीत असूं असा आमचा समज आहे. आंगरखा व पागोटें हीं वस्त्रें आम्हीं मुसलमानांपासून थोडा फेरफार करून उचलली असावीं, असा तर्क होतो. यज्ञयाग, देवतार्चन, शास्त्राध्ययन वगैरे आश्रमांतल्या आश्रमांत किंवा घरांतल्या घरांत चालविता येण्यासारख्या उद्योगांत निरंतर व्यापृत असणाऱ्या ब्रह्मज्ञांस तुमच्या शिजारीची अथवा पायजम्याची, तुमच्या झग्याची अथवा अंगरख्याची, तुमच्या पगडीची अथवा पागोट्याची काय गरज होती ? हिंदुस्थानास जिंकणाऱ्या मुसलमानांच्या किंवा लढाऊ मराठ्यांच्या पदरीं जेव्हां ब्राह्मण लोक कारकून पेशानें राहूं लागले व दरबारांत जाण्यायेण्याची त्यांस अवश्यकता पडूं लागली तेव्हां त्यांनीं मराठे ह्मणजे महाराष्ट्रीय क्षत्रिय आणि मुसलमान यांच्या पेहरावाकडे पाहून आपला गंगाजमनी पेहराव ठरविला असावा असें दिसतें. कै० माधवराव कुंटे कधीं कधीं असें ह्मणत असत कीं, आतांशा आह्मी लष्करांत जीं वाद्यें लाविलीं त्यांची शेज मनांत आणिली तर तींवरून आह्मांस कोणत्या व किती लोकांचें गुलाम व्हावें लागलें आहे हें सहज काढतां येण्यासारखें आहे ! प्रथम ताशानें सनईला मागें सारलें, आणि आतां बॅंड सगळ्यांत पुढें सरसावला आहे ? ज्याप्रमाणें या परकीय मंगल किंवा अमंगल वाद्यांनीं आमच्या घरच्या वाद्यांस 'खो' देऊन त्यांची जागा पटकाविली आहे, त्याप्रमाणेंच आमच्या पो-

---

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ---प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. प्रेस.

पाखाचीही दशा होत आहे किंवा झाली आहे ! ज्याला 'मरण्या' म्हणण्यास प्रत्यक्ष आधार पाहिजे असेल त्यांनी डाक्टर भांडारकरांसारख्या आमच्या अर्वाचीन ऋषींशी आणि त्यांच्या सध्याश्रमाशीं, पूर्वकालीन ऋषींची आणि त्यांच्या आश्रमाची तुलना करून पहावी. स्थित्यंतराप्रमाणें होत जाणाऱ्या या अपरिहार्य वस्त्वंतराबद्दल किंवा रूढ्यंतराबद्दल आम्हांस वाईट वाटत नाहीं, किंवा त्याबद्दल आम्ही नकाश्रू ढाळीत नाहीं. अशा अवश्यक फेरफेराबद्दल विलाप करीत बसणें हें आमचें काम नव्हे; खिस्त्याच्या हातचा चहा घेण्याबद्दल सक्षौर प्रायश्चित्ताचा हट्ट घेऊन बसणाऱ्या अमित्त ढोंड्यावर व त्यांच्या पायांत लुटमळणाऱ्या अजागळ भटभिक्षुकांवर तें काम आम्ही सोपवितों ? तथापि स्थिती पालटली असतां आपल्या चालचलणुकींत, चालीरीतींत, किंवा राहणीसरणींत जो फेरफार करावयाचा तो विचारपूर्वक केला पाहिजे. विचारपूर्वक केलेली सुधारणा टिकाऊ, सुखावह, आणि आनंदप्रद असते. आगचोटीमुळें, आगगाडीमुळें गिरणीमुळें, किंवा हपिसामुळें जी सुधारणा होत आहे ती खरी सुधारणा नव्हे. या स्थळापैकीं कोणत्याही स्थळीं आमच्या आणि अतिशूद्रादि ज्या जातींस आपण अस्पृश्य समजतों त्यांचा केवळही संबंध घडला तरी जातिभेद हा बाईट गोष्ट आहे असा आपला खात्री व्हावयाचा नाहीं. त्याप्रमाणेंच उपयुक्ततेचा किंवा दूषणीयतेचा विचार न करतां, आम्ही आपल्या पोबारखाली लहर लागेल तसे फेरफार करीत गेलों तर ते खरोखरी सुखावह होतील किंवा नाहीं याची शंका आहे. निदान पाश्चात्यांच्या संबंधानें तरी आमचा फारच फसगत झाली आहे, असें वाटतें ! बहुतां बहुतां आम्ही कोणीकडे व्हावयाचें हें कोणाच्याच लक्षांत येत नाहीं ! हें पगडुगंनर पाहून

काय मला भूल पडली भान हरपले !

या प्रसिद्ध कव्युक्तीचें स्मरण होतें ! ती आमची पूर्वीची सकलादी कानटोपी किंवा शालजोडी, किंवा धोतर किंवा पंचा कोणीकडे आणि अलीकडलें छचोर पागोटें किंवा पगडी कोणीकडे ? साधें लुगडें नेसलेली घाऱ्या डोळ्याची एखादी कोंकणी पोर एखाद्या अक्कडबाज सालंकृत नागरीक स्त्रीच्या बाजूला उभी केली तर त्या दोघींत जेवढें अंतर दिसेल त्याहूनही अधिक अंतर आमच्या अग्निहोत्र्याच्या प्राथमिक टोपींत किंवा काश्मीरपट्ट मुकुटांत आणि अर्वाचीन चवचाल पगडींत दिसून येणार आहे ! केळें काय ! पत्र्या काय ! पिळ काय ! वोंकी काय ? सारेंच नव्हेबाई ! ! पेशवाईत मुसलमानांच्या पगडीसारखी आमची पगडी अगदी लहान व साधी होती असें वाटतें. पण पेशवाई बुडाली तेव्हां आमची अक्कल आमच्या डोक्यांतून बाहेर पडून आमच्या पगडींत शिरली ! मग काय. विचारता ? बोलतां बोलतां हिचा पारिघ इतका फुगत गेला कीं, त्याला गाडीच्या चाकाची देखील उपमा साजणार नाहीं, असें वाटूं लागलें ! इंग्रजीचा अंमल कायम होईतोंपर्यंत ही वाढ भूमितिश्रेढीनें होत गेली ! पण तो अंमल कायम होण्याच्या सुमारास तिला अंमळ खळ पडला, व तेव्हांपासून तिचें पाऊल आंतच पडत चाललें आहे, असें म्हणण्या हरकत नाहीं ! कै. केरोपंत नाना छत्रे व कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे या गोऱ्या पागोट्यांचे गेल्या पिढीचे प्रसिद्ध प्रतिनिधी

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार. मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार ती मिक्श्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

होत. पण त्यांची डोकीं मोठीं असल्यामुळें त्यांवर जतणारीं गोलीं पागोटीं त्यांस भारदस्ती विद्वान दिसत असत! कै. रा. रा. वा. वि. ना. मंडलिक आणि रा. ब. कृ. ल. नूलकर यांनाहा वा संबंधानें चालू पिढींतच मोडणें बरें दिसतें! दुसऱ्या अनेक गोष्टींप्रमाणें चालू पिढीचें छोटें पागोटें रा. ब. म. गो. रानडे यांनीं रूढींत आणिलें असें म्हणतात. निदान येवढें खरें आहे कीं, आमच्या युनिव्हर्सिटीनील हे आद्य बि. ए. व एल्एल्. ची आहेत, आणि या धाकट्या पगडीस किंवा पागोट्यास एल्एल्. चीं पगडी किंवा चक्री म्हणण्याचा प्रघात पडला आहे.

आतांपर्यंत पगडी व पागोटें यांचा आम्ही भेदाभेद केलेला नाहीं; पण आतां तो करणें जरूर आहे. पगडी म्हणजे कोष्ट्यांनीं विणलेल्या कापडाच्या तुकड्यांचें शिंप्यांनीं शिवून तयार केलेलें कायमचें पागोटें: व पागोटें म्हणजे कोष्ट्यांनीं विणलेल्या नाना-तऱ्हेच्या कापडांच्या लांबच्या लांब व त्यांची पगडीवंदांनीं डोक्यावर, गुडग्यावर, किंवा लांकडाच्या ठोकळ्यांवर विशिष्ट रीतीनें गुंडाळून तयार केलेली हंगामी अथवा टेंपरवारी पगडी!! या व्याख्या न्यायशास्त्राच्या नियमांच्या कसास लागतील किंवा न लागतील हें खातरीनें सांगवत नाहीं; पण त्यांनीं ज्या वस्तूंचा वाचकांस बोध व्हावा असें आमच्या मनांत आहे तो त्यांस खचित होईल असें वाटतें! पागोट्यांचा निरुपयोगीपणा पक्का सिद्ध व्हावा म्हणून त्यांत सुधारणा करून अलीकडच्या पगड्या काढण्यांत आल्या आहेत! पागोटीं प्रसंग पडल्यास विहिरींतून पाणी काढण्याच्या, जनावरास दावें करण्याच्या, कोणाच्या मुसक्या बांधण्याच्या, किंवा जुनेपणीं बाळंतिणींचीं पोटें बांधण्याच्या उपयोगीं पडतात! तसेंच, तीं पुनः पुनः बांधण्याची व रंगविण्याची सवड असल्यामुळें घामटपणा आणि विटणेंपणा बराच टाळतां येतो. पण आमच्या पगडींत यांपैकीं एकही

सोय राहूं न देण्याविषयीं पूर्ण काळजी घेतलेली आहे । पागोट्याप्रमाणें पगडीच्या पत्र्या गळ्यांत येत नाहींत, व त्या वारंवार बांधाव्या लागत नाहींत येवढ्याशिवाय त्यांच्या तर्फेनें कांहींएक म्हणतां येणार नाहीं,असें वाटतें.बिचारी पगडी कापसाच्याचिंध्यांची असो,कीं बुट्ट्यांची असो,कीं अलवानाची असो कां रेशमाची असो; बराच घाम पीऊन व मळ खाऊन तिला उतरती कळा लागली,आणि तिचें शरीर झडूं लागून त्यांतून दोरे सुटूं लागले म्हणजे तिला उकिरड्यावर फेंकून देण्याशिवाय तिचा दुसरा कोणताही उपयोग करणें शक्य आहे काय ? पागोट्याला वृद्धापकाळ आला असतां त्याला नित्याच्या कामांवरून अखेरपर्यंत दूर करून त्याजकडून कसल्या दुसऱ्या प्रकारची नोकरी करून घतां येतें.तात्पर्य,पागोट्यांत घातलेला पैसान्‌पैसा वसूल करतां येईल पण ह्या पगडीबाईवर खर्च केलेल्या रकमेपासून फारच थोडा उलट फायदा मिळतो.हिच्या अंगाला एकदां सुरकुत्या पडूं लागल्या म्हणजे अगदीं चिकट व लोभी मनुष्याशिवाय दुसऱ्या कोणालाही तिची संगति नकोशी होते ।मग तिला डोक्यावर घेऊन सभ्य समाजांत जाण्याची वार्ता कशाला पाहिजे ! अलीकडे या पगड्यांचा मोठ्या झपाट्यानें प्रसार होऊं लागला आहे. पण यांत आम्हांस मोठेंसें नवल वाटत नाहीं. असलेल्या वस्तुस्थितींत कांहींतरी फेरफार करणें हींच पुष्कळांच्या सुधारणेची व्याख्या आहे.तेव्हां पगडी ही पागोट्याची सुधारणा असें जें सामान्य लोक मानतात तें त्यांच्या स्वभावाला अगदीं अनुरूपच आहे! खुद्द आम्हांस पागोटेंच नापसंत आहे, तेव्हां त्याची गचाळ प्रतिमा जी पगडी ती मुळींच

निबंधसंग्रह.

भाग १ ला. किं. १। रु.

मॅनेजर--सुधारक ऑफीस, पुणें.

पसंत असण्याचा संभव नाहीं,हें सांगावयास नकोच.यावर कोणी असा प्रश्न करतील कीं, तुमचें असें मत असेल तर त्या तुह्मी वापरतां कशासाठीं ? यावर आमचें असें उत्तर आहे कीं आम्हांस नापसंत किंवा असाम्य अशी हरिशी काय, पण आणखी शेंकडों गोष्टी आह्मी करतों ! आह्मी बोलते सुधारक आहों, कृतिसुधारक नाहीं ! ! अमुक गोष्ट चांगली आहे असें आह्मी प्रपादतों तेव्हां तीं स्वतः करण्यास, किंवा अमुक गोष्ट वाईट आहे असें म्हणतों म्हणून ती टाकून देण्यास आह्मी कोणाचे बांधले गेलों आहों असें आम्ही मुळींच समजत नाहीं ! आम्हांस चांगली वाटलेली गोष्ट करणें किंवा वाईट वाटलेली टाकून देणें हें केवळ आमच्या सोईवर विंवा तत्क्षणिक अवलंबून आहे ! विचाराअंतीं अमुक गोष्ट बरी दिसते व अमुक वाईट दिसते येवढेंच सांगण्याचा पत्कर आम्हीं घेतला आहे. बोलल्याप्रमाणें चालून लोकांकडून आपलीं पावलें वंदवून घेण्याची महत्वाकांक्षा आमच्या अंगीं बिलकुल नाहीं ! जे तसे करीत असतील त्यांचीं पावलें आह्मांस योग्य वाटल्यास आह्मी मोठ्या आनंदानें वंदू व दुसऱ्यांसही तसें करण्यास सांगूं तसेंच, बोलण्याप्रमाणें चालणारे लोक जगांत निर्माण होण्यांत त्याचा मोठा फायदा आहे, हें विधानही आह्मांस कबूल आहे; पण त्या वर्गांत स्वतःला गणवून घेण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं नाहीं, हें आम्ही उघडपणें कबूल करतों. यावर कोणी अशी प्रतिशंका घेतील कीं आमच्या उपदेशांत व वर्तनांत असा विरोध दिसल्यास, आमचा उपदेश कोणी ऐकणार नाहीं. त्याची छाप लोकांवर पडणार नाहीं. या प्रतिशंकेवर आमचें असें प्रत्युत्तर आहे कीं, ही प्रतिशंका आम्हांस सर्वांशी बरोबर वाटत नाहीं. अमुक गोष्ट चांगली आहे असें लोंढ्यानें म्हणून तदनुसार आचरण केलें असतां तिचा लौकर प्रसार होण्याचा संभव आहे हें जरी खरें आहे, तरी कोणतीही गोष्ट चांगली

आहे असें नुसतें सांगत फिरणें हें केवळ निरुपयोगी आहे असें आम्हांस वाटत नाहीं. ज्याच्या अंगांत धमक आहे अशाला ती घरी वाटल्यास लो कदाचित् ती अमलांत आणील !

आज ज्या प्रकारचा विषय आम्हीं आरंभिला आहे त्या संबंधानें व इतरांच्या संबंधानें अशा प्रकारचें लिहिणें एकदां स्पष्टपणें लिहून जावयाला पाहिजे होतें. आज तसें करण्याचा सहज प्रसंग आल्यामुळें तें लिहून टाकलें आहे. पण लिहितां लिहितां निबंधमर्यादा येऊन ठेपल्यामुळें आजच्या आज पागोट्याचा निरोप घेण्याचा जो मूळ विचार होता तो तर्डास गेला नाहीं याचद्दल वाईट वाटतें ! पण कदाचित् तसें वाटण्याचीही गरज नाहीं ! कारण पुढल्या ओटवड्यास कोठें जायायचें आहे ? बोलूनचालून तें लांच पडलें ! तेव्हां त्याचा एक पदर दुसऱ्या ओटवड्यापर्यंत लांबला तर त्यांत कांहीं विशेष नाहीं !

आह्मा पुरुषांचा पेहराव.

पेहरावाच्या संबंधानें मागल्या अंकांत दिलेली टीकात्मक नोट ध्यानांत ठेवलीस तरच त्यांना आमच्या या आर्टिकलांचें किंवा निबंधांचें रहस्य कळणार आहे ? तसें न करतां खुद्द आपण किंवा आम्ही कसले पोषाख करतों या गोष्टीचा विचार ते अपाल्या मनांत येऊं देतील तर त्यांची मनें विकारानें कलुषित होऊन पेहेरावाची खरी उपयुक्तता व दर्शनीयता कशांत आहे हें कळण्यास ते असमर्थ होतील. आम्हीं हा जो नेपथ्यमीमांसेस आरंभ केला आहे तो अमक्यांतिऱ्हाईत नात्यानें केला आहे आपण अमुक वस्त्र वापरतों म्हणूनच ती चांगली

म्हणावयाची व दुसरा अमुक वापरतो म्हणून ती वाईट म्हणावयाची असा बुद्धीचा जो सामान्य आग्रह असतो तो या कूट मांत अगदीं एकीकडे ठेऊन दिला आहे; आणि वाचकांचीहीं आत्मांप्रमाणेंच निराग्रह वृत्ति झाली तरच त्यांना आमच्या लेखांतील प्रखर समता समजणार आहे व रुचणार आहे!

कोणत्याही वस्तूची किंमत करण्याचे दोन मार्ग आहेत; एक उपयोग; आणि दुसरा शोभा. यांपैकीं दुसऱ्याचा मारून मुटकून पहिल्यांत अंतर्भाव करतां येईल. पण तसें करणें नीट नाहीं. कारण भावेंही आपण केवढीही हातचलाखी केली तरी चरितार्थास अत्यंत अवश्यक वस्तू व त्यांहून भिन्न वस्तू हा भेद कोणाच्यानेंही नाहींसा करवणार नाहीं. नाचण्याची भाकरी किंवा कसल्या तरी तांदुळांचा भात मिळाल्याशिवाय शरीर चालणार नाहीं; पण चिमणीच्या जिभा किंवा वाळवीचा जनानी राणिमुंगी न मिळाली तर कोणी उपाशीं मरेल असें वाटत नाहीं. तात्पर्य, अवश्यकता आणि चैन म्हणून दोन पृथक् गोष्टी ओहत हैं प्रत्येक समंजस मनुष्यास कबूल करावें लागेल. या गोष्टींच्या निकषावर आमची पगडी किंवा पागोटें लाविलें तर तें पहिल्या म्हणजे अवश्यकतेच्या निकषावर अगदीं हिणकस ठरेल असें आह्मांस वाटतें. आह्मी जे आमच्या पगडीस किंवा पागोट्यास इतके झाळलों आहों ते शुद्ध त्याच्या दिखाऊपणाकरतां होय! उपयोगाचा त्यांत चिलकुल वांटा नाहीं. ज्याप्रमाणें अंगाचें रक्षण करणें हें अंगरख्याचें काम होय, त्याप्रमाणें डोक्याचें रक्षण करणें हें पागोट्याचें किंवा पगडीचें काम असलें पाहिजे. आतां आह्मी आपल्या प्रिय वाचकांस व इतरांस शपथ घालून असें विचारतों कीं हें काम या विलक्षण वस्तूकडून शंभरांपैकीं एका हिश्शानें तरी बजावलें जात आहे काय? पगडी किंवा पागोटें घालून जात असतां मोठा वारा सुटला तर त्यापासून निवारण करण्या-

स ही वस्तू उपयोगी पडावयाची नाहीं इतकेंच नाहीं,तर वाऱ्याच्या सोसाट्यानें फडफड़ूं लागलेल्या पोकळ आंगरख्यास व नेसलेल्या ढिल्या धोतरास आवरून धरण्यासाठीं गुंतून राहिलेल्या दोन हातांपैकीं एक हात मोठ्या कष्टानें मोकळा करून डोक्यावरून उडून जाऊं पहाणाऱ्या या पगडीला किंवा पागोट्याला जागच्या जागीं थोपवून धरण्याच्या कामीं तो लावावा लागतो ! तसें न केल्यास तें किंवा ती जमीनीवर उडी घेण्यास मागेंपुढें पहावयाची नाहीं ! तसेंच मोठ्या जोराचा पाऊस आला तर या शिरस्त्राणापासून तुमचें यत्किंचित् तरी त्राण होण्याचा संभव आहे काय ? उलट, हें एकदां भिजून चिंब झालें म्हणजे घोडा मेलेल्या लष्करांतील स्वाराप्रमाणे त्याचे खोगीर डोक्यावर वागवितांना ज्या प्रकारचे कष्ट पडतात त्या प्रकारचे कष्ट ही ओली पगडी वापरणारास सोसावे लागतात ! सूर्याच्या प्रखर तापापासूनही बचाव करण्यास ही पगडी बिलकुल उपयोगी पडत नाहीं. साहेब लोकांच्या टोपीला मागेंपुढें आढीं उलरलीं असल्यामुळें व दोनही कानांवर तिच्या लांब वळचणी बऱ्याच येत असल्यामुळें, ऊन व पाऊस यांपासून तिच्यामुळें डोक्याचें बरेंच रक्षण होतें. पण त्या आमच्या ताटाकृति चक्रीची अशी कांहीं विलक्षण ठेवण आहे कीं, तीपासून कोणत्याही प्रकारचा फायदा न होता साऱ्याप्रकारच्या गैरसोई हटकून उत्पन्न होतात. तथापि जर का शेंडीचा घेराचा व विस्तार बराच प्रशस्त असेल तर ही पगडी किंवा पागोटें वापरणाराचें हाल कांहीं पुसूंच नका ? नंदीबैलाच्या मानेप्रमाणें ही पगडी डोक्यावर बहुधा हालत असते पण तसें होत नसेल तर डोक्यावर चुंबळ न टेवतां हांडा व तांब्या घेऊन जाणाऱ्या कुणब्याच्या बाईस मानेचा कांदा हळू न देण्याबद्दल जितकी खबरदारी घ्यावी लागते त्यापेक्षां कांकणभर अधिक खबरदारी असल्या घेरेदार

पगडीवाल्यास प्यारी लागते ? असल्या चुंचळी डोक्यावर चापवून एकसारखें त्यांच्या दोनातीस अगण्यांचें काम कुंचीच्या पायानें ज्याचें दोनपाय पुर्णपणें जमत न गेले आहेत अशा आमच्या हिंदुस्थानांय दुसऱ्या कोणाच्यानेंही व्हावयाचें नाहीं ! गुलामांच्या राष्ट्रांतील लोक सजीव वस्तूंप्रमाणेंच निर्जीव वस्तूंचीही गुलामगिरी चिनतकार करतात !

तेव्हां उपयोगदृष्टीनें पहातां आमच्या पगडीस शंभरापैकीं पांच गुण देखील देणें अशक्य आहे हें आमच्या निःपक्षपाती विचारी वाचकांस कबूल करणें भाग आहे. आतां सौंदर्याच्या, किंवा चैनीच्या दृष्टीनें हिचा विचार केला तर हिचा केवळ लास्ट नंबर येईल असें वाटत नाहीं शिंदी लोकांचे चषपंचपात्र, पारशांचें धुरांडें, आमच्या मराठ्यांचा पीळदार त्रिकोण किंवा चौकोन यांसारखींच आमच्या पगडीचीं एक ना-हरा आहे ती पुढून पाहिली तर सर्वांच्या खालीं गळ्याशा-वतीं केलेंलें, त्यावर दोहों अंगांनीं मागें निमूळत्या होत गेलेल्या कुंद-ळ्या केलेंलें, त्यावर एका बाजूला बरगड्यासारखे पीळ व दुसऱ्या बा-जूला सपाट चपट्या पट्ट्या, आणि सर्वांच्या वर राजऱ्या चौ-कोनासारखी कोकी ही घडण कलेच्या दृष्टीनें पहातां सर्वच मिश्र व अनाकर्षक आहे यांत संशय नाहीं; आणि या शोभेची सर्वमान्य इयत्ता अद्यापि ठरलेली नाहीं म्हणजे ही च टाकाऊन कां काढावी, हें आम्हांस समजत नाहीं तथापि जे लोक आपणांस थोडेबहुत सुधारलेले म्हणवितात ते गाजरी लोकांप्रमाणें केवळ मनास वाटलेल्या शोभेच्या पायीं पाहिजे तसली गैरसोय सोसण्यास तयार होत नाहींत. त्यांच्या उप-भोगाच्या प्रत्येक वस्तूंत उपयुक्ततेचा बराच अंश असतो. केवळ शोभेकरितां नागपुडीच्या एका पाखेंत किंवा दोहों नाग पुरींमध्यें पडद्यांत सोन्याच्या तारेंत गुंफलेली मोत्यें लोंबत

लावणें हें ज्या आह्मां हिंदु लोकांस किंवा मुसलमान लोकांस स्वरासिकतेचें मोठें व्यंजक चिन्ह आहे असें वाटतें त्या आह्मी आमच्या अत्यंत निरुपयोगी पगडीस दर्शनीयतेच्या फायद्या-साठीं चिकटून रहावें हें फार स्वाभाविक आहे! पण असें कर-पर्यंत आह्मी आपणास रानटी ठरवून घेतों, हें कोणाच्याही लक्षांत येत नाहीं हा मोठा चमत्कार आहे! अथवा रानटी लोकांना आपला रानटीपणा न कळणें यांत चमत्कार तरी कसला? तेव्हां या निरुपयोगी पागोट्याला केवळ त्याच्या दिखाऊपणाक-रितां बिलगून रहाण्याचें असेल तर पद्धति अंशतः रानटीपणा घेण्यास तयार असलें पाहिजे. पण पागोट्याशिवाय दुसरी एक वस्तु वापरण्यासारखी असून व तिचा आपण थोडाबहुत उप-योग करीत असून या दोषास कशासाठीं पात्र व्हावें, हें आम्हांस समजत नाहीं.

पागोट्यांचा किंवा पगडीचा घालण्याचा प्रघात मोडून टाकून आप-ण रुमाल घालूं लागलों तर आपला सर्वतोपरी फायदा होणार आहे. पागोट्यांतील मानीव दर्शनीयतेशिवाय रुमालांत कशा-चीही उणीव नाहीं, रुमालांत पागोट्याची एकही गैरसोय नसून फायदे मात्र असंख्य आहेत. या भागांतील पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, पागोट्याप्रमाणें रुमालानें आपली श्रीमं-ती दाखविता येत नाहीं. पण ही त्यांची मोठी चूक आहे या देशांत रुमाल घालण्याचा प्रघात फार नाहीं, म्हणून मोठ्या

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर काप्डी बाइंडिंग, कि. रु. २ व्ही. पी. खर्च ७५

लाल्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

किंमतीचें रुमाल येथें फारसे दृष्टीस पडत नाहींत. पण मद्रासेकडे एका रुपयापासून शंभर रुपये किंमतीचे रुमाल मिळतात. रुमालाच्या नानाप्रकारच्या व नानारंगाच्या जाती आहेत. तसेंच, पागोट्याप्रमाणें रुमालही ह्या तेवढ्या लहानमोठ्या आकाराचे असतात. दुखणें बाणें आलें असता डोकें बांधून घेण्यास, घोड्यावर स्वार व्हावयाचें असल्यास टापशी बांधण्यास, थंडीचा कडाका पडला असल्यास गुरगुट्टून घेण्यास, प्रवासांत आंथरुणापांघरुणाच्या जागीं वापरण्यास, व प्रसंगविशेषीं तुंगणामोंवतीं गुंडाळून घेऊन धोतराची वेळ मारून नेण्यास रुमालासारखी उपयोगी पडणारी दुसरी कोणती वस्तु आहे ? या सर्व गोष्टींत पगडी किंवा पागोटें त्याच्यापुढें क्षणभर तरी टिकाव धरणार आहे काय ! पागोटें बांधणें किती कठिण पण मोडणें किती. सोपें ? रुमालाच्या संबंधानें ही अडचण मुळींच नाहीं. तो हवा त्यानें मोडावा आणि पाहिजे त्यानें बांधावा ! रुमाल पांढरा असो, कीं दुसऱ्या कोणत्याही रंगाचा असो, त्याची विशेष खराबी न होऊं देतां किंवा विशेष दगदग न पडतां, तो घरच्यावर धुवून स्वच्छ ठेवणें किती सोपें आहे घरें? नाहीं तर तें तुमचें पागोटें तुमच्या मनाप्रमाणें चर्का उडवून देणारा पगडबंद मिळण्यासारखा असला तर घ्या, नाहीं तर घामानें विटलें व त्याचप्रमाणें द्रव्याची यथेच्छ अनुकूलता असल्यामुळें पडद्याच्या आंतल्या भागीं अस्तित्वांत आलेल्या परमाणुरूप सूक्ष्म जंतूंच्या त्रासामुळें अत्यंत असह्य झालेलें पागोटें तुम्ही महिनेभर महिने वापरीत रहाल ! बांधावयाला आलेल्या पागोट्याचें सईलपण जितकें कंटाळवाणें होतें तितकेंच नवीन बांधलेल्या पागोट्याचें घट्टपणही त्रासदायक होतें. रुमालासारखें अन्य याचविणारें दुसरें नाहीं. पागोट्याच्या किंवा पगडीच्या खरचट्या पट्ट्या फाटल्या किंवा विटल्या म्हणजे त्या दुरुस्त करण्याचा हलाज

नाहीं. ` रुमालाची तशी गोष्ट नाहीं. रुमालास केवढेही डाग पडले असले किंवा भोकें पडलीं तरी तीं सहज लपावितां येतात. कदाचित् कोणी असें म्हणतील कीं, पागोट्याच्या किंवा पगडीच्या पदराच्या पोटांत चिंध्या किंवा कागदाचे तुकडे भरून लांब सर्वांच मोठ्या पदराचा खोटा आकार आणतां येतो, व अशा रीतीनें थोड्या पैशांत मोठा भपका करतां येतो; रुमालांत तशी सोय नाहीं. पण असें म्हणणारांचा हा चुकीचा समज आहे. पागोट्यापेक्षां रुमालांत विशेष काट-कसर करतां येते. रुमालांच्या चारही अंगांस जर न घालतां दोनच अंगास घालतां येतो. पण तेवढेंहीं करावयाचें नस-ल्यास रुमाल व कांठ निराळे घेऊन टेवण्यास हरकत नाहीं. ज्यावेळेस श्रीमंती दाखवावयाची असेल तेव्हां रुमाल बांधून लावर दोनतीन हात कांठाचे एक दोन वेढे टांचणीनें ऐटीत बसवून द्यावे म्हणजे झालें ? रुमाल बांधणाऱ्या कांहीं लोकांत असें करण्याचा परिपाठ आहे. तात्पर्य रुमाल हें तुमच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत हरएक प्रकारें तुमच्या उपयोगीं पडणारें वस्त्र असून तुमचा अंत झाल्यावरही तुमचें शरीर झांकण्यास त्याचा, उपयोग करतां येणार आहे ! तेव्हां पागोटें व रुमाल यापैकीं कोणाचा अंगिकार करावा हे सांगावयास पाहिजे असें नाहीं !

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र
संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, रुन किं. १ रुपाया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

आह्मा पुरुषांचा पेहराव.

(नंबर २ आंगरखा)

आतां पर्यंत झालेल्या नेपथ्य मीमांसेत आमचें शिरोभूषण जी पगडी ती नादान ठरून पदच्युत केली व तिच्या जागीं रुमालाची नेमणुक केली, हें पाहून पुढें कोणावर कसली गदा येणार या भीतीनें आमच्या वाचकांपैकीं कांहींचें धाबें गडबडून गेले असेल यांत संशय नाहीं ! पण त्यास आमचा नाइलाज आहे ! एकदां सत्य निर्णय करावयाचा निश्चय केला म्हणजे कोणाचीही मुर्वत ठेवतां कामा नये ! हीं आमचीं वस्त्रें टीकेच्या कांटयाळा लावतांना जर खुद्द आह्मी आपली परवा ठेवीत नाहीं, तर इतरांचा किती ठेवणार, हें उघडच आहे ! पण एका दृष्टीनें पाहतां या चर्चेला कोणी इतकें भिण्याचेही कारण दिसत नाहीं. कोणताही विचार भग दिसल्या बरोबर तो अमलांत आणण्याचा हट्ट ! किंवा सामान्य मनुष्यांच्या अंगीं असतें तर या पृथ्वीचा स्वर्ग कध्हांच होऊन गेला असता ! आचारविचारामध्यें निदान शंभर वर्षांचें अंतर असतें; म्हणजे जो विचार निर्दोष व उपयुक्त ठरतो तदनुसार सार्वजनिक आचरण होऊं लागण्यास निदान शंभर वर्षे लागतात ? पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते, सूर्य पृथ्वीं भोवतीं फिरत नाहीं ही गोष्ट कोपरनिकस व ग्यालिलिओ यांनी जगाच्या नजरेस आणून दिल्यास पक्कीं सव्वा दोनशें वर्षें होऊन गेलीं, तरी आमच्या मतें सूर्य व चंद्र एकाच दर्जाचे ग्रह असून, ते पृथ्वीसभोंवतीं फिरत्या घालीत आहेत; आमच्या पंचांगांत प्रत्येक पानावर चमकणारे पण अर्वाचीन ज्योतिषज्ञांस मोठमोठ्या दूरदर्शक यंत्रांच्या साहाय्यानेंही अद्यापि न गवसलेले राहू व केतू द्विजास विकल करीत आहेत; शनी वगैरे

दूरस्थ ग्रहांच आमच्याशीं अर्थार्थी संबंध नसून त्याची साडेसाती आम्हांस अद्यापि छळीत आहे; सारांश, साऱ्या ग्रहमालेपुढें आमची पृथ्वी एका बोरायेवढी नसूनही आह्मीं तिला एका दृष्टीनें सर्व ग्रहांची स्वामिनी आणि दुसऱ्या दृष्टीनें सर्वांची बटीक करून सोडीत आहों ! परिचारकांप्रमाणें चंद्रसूर्यशनिमंगळांनीं पृथ्वीच्याभोंवतीं भ्रमण करीत असावें येवढा तिचा प्रताप ! असें असून सूर्यानें आणि त्याच्या मंद पोरानें, शुक्रानें आणि मंगळानें, राहूनें आणि केतूनें आमच्या जननीची आणि आमची हवीतशी वासलात लावावी, हें आमच्या अत्यंत नीचत्वाचें चिन्ह नाहीं काय ? तात्पर्य, रूढ आचार किंवा विचार खरा असो किंवा खोटा असो, त्याचे जीवित्व पराकाष्टेचें चिकट असतें ! शेंकडों वर्षें त्याच्या टाळक्यांत व पेकाटांत सोटे घालावे तेव्हां कोठें तो हळूं हळूं आपला पाय काढता घेतो ! तेव्हां आमच्या पेहरावाविरुद्ध तुफान टीका करून सारी दुनिया जरी आह्मी हालवून सोडली तरी आमचा पोकळ आंगरखा, आमचें सइल धोतर, व आमचा ढिला जोडा आम्हांस लष्कर सोडील, अशी भीति बाळगण्याची बिलकुल गरज नाहीं ' असो.

पोषाखाच्या योग्यायोग्यतेचा विचार करतांना दर्शनीयता आणि उपयुक्तता यांचा विचार केला पाहिजे असें जें मागें झटलें आहे तें वाचकांच्या ध्यानांत असेलच. पैकीं दर्शनीयतेविषयीं सर्व लोकांत मोठा मतभेद आहे इतकेच नाहीं, तर परमेश्वर स्वरूपाप्रमाणें निचें स्वरूप परिच्छेदातीत आहे,

निबंधसंग्रह.

भाग १ ला. किं. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

म्हणजे त्याची व्याख्या करतां येणें अशक्य आहे. तेव्हां तूर्त तरी दर्शनीयतेच्या दृष्टीनें आंगरख्याचा विचार करण्याच्या भानगडींत न पडतां फक्त उपयुक्ततेच्या कसालां तो कितपत उतरतो तें पाहूं. पहिली अडचण अशी आहे कीं, आज जी टीका करावयाची तीं कोणत्या प्रकारच्या आंगरख्यावर करावयाची ? आंगरखा व पागोटें हीं दोन वस्त्रें आम्हीं अन्य लोकांपासून उचललीं असल्यामुळें त्याविषयीं आमच्या अंतःकरणांत स्थाईक प्रेम अद्यापि जोडलेलें नाहीं असा वारंवार संशय येतो. मुसलमानांच्या अंमलांत अस्तित्वांत आलेल्या व पेशवाईत एका प्रकारच्या वाढास लागलेल्या पागोट्यास किंवा पगडीस एका प्रकारचें कायम वळण लागल्यासारखें दिसतें. आमच्या सारख्यांच्या टीकांनीं कदाचित् ती चेतावेतानें मागें पडत जाईल, पण तिच्या स्वरूपांत बदल होऊन ती साहेब लोकांच्या किंवा पारशांच्या टोपीच्या वळणावर जाण्याची शंका नाहीं. पण आंगरख्याची तशी गोष्ट नाहीं. सध्यांप्रमाणें या वेष्ट्याचे रंग वारंवार फिरत आहेत ! पेशवाईच्या अखेरचा गञ्याखालच्या गुंडीचा एकेरी किंवा दुहेरी आंगरखा कोणीकडे आणि अर्लाकडे त्यांच्या ज्या नाना प्रकारच्या " सुधारलेल्या आणि वाढविलेल्या " आवृत्ति निघत आहेत त्या कोणीकडे ! कोपराइतक्या चुण्यांचा गुढघ्या खालीं पडणारा आंगरखा हौसेनें वापरणारे अनेक इसम आहेत असें म्हणावें, तर तंग कंठीदार आंगरख्यांतून आपल्या तेजःपुंज वक्षःस्थलाच्या दक्षिण प्रांताच्या कांहीं भागाची प्रभा प्रेक्षकांस दाखविण्याविषयीं अत्यंत उत्कंठ असणारे गृहस्थही कांहीं कमी नाहींत ! या दोन प्रमुख जुन्या प्रकारांशिवाय मनगटपट्टीचे व पोकळ अस्तन्यांचे कंठीदार व पेलेदार मांड्याइतके नवीन लोकांचे आंगरखे व याशिवाय अर्लाकडे चाल्याच त्वरेनें प्रसारांत येऊं लागलेला ' सचंध पोटगुंड्यांचा

पारशी चालीचा कोट–अशा आमच्या आंगरख्याच्या आधुनिक बहुरूपांपैकीं अस्सल कोणाला म्हणावें आणि नकल कोणाला म्हणावें अशी मोठी पंचाईत येऊन पडली आहे व तींतून पार कसें पडावें हें सुचेनासें झालें आहे ! तथापि येवढें खास निर्विवाद आहे कीं, आजमित्तीस ज्याला आम्ही सभ्य आंगरखा म्हणतों त्यांत असावे ते गुण फारच थोडे असल्यामुळें तो चिरस्थाई होण्याचें चिन्ह मुळींच दिसत नाहीं. उजव्या खांद्यावरचें बिरडें, उजव्या खाकेंत दोन चंद्रांची गांठ, छातीवर चार जोड चंद्रांची दुसरी गांठ, डाव्याबाजूला अगोदर पडदा आणि मग कळी व पडद्यांत पेला किंवा कंठी, आणि डाव्या बाजूला अगोदर चारीक कळी आणि मग पडदा; चूणदार खाका; सुमारें गुडघ्या इतकी लांबी; पट्टीच्या किंवा साध्या सईल अस्तन्या; आणि कमरेभोंवतीं बेताचा घोळ–असें सभ्यांच्या सभ्य आंगरख्याचें स्वरूप आहे असें आम्ही मानतों. कापडाच्या भगदुराप्रमाणें किंवा वापरणाराच्या हौसेप्रमाणें संजाप, मगजी, गोंडे वगैरेंचा येथें विचार करण्याची गरज नाहीं; कारण आंगरख्याच्या सांच्यांत त्यांचा अंतर्भाव होत नाहीं. तसेंच, बिरड्या ऐवजीं कोणी चंद्र लाविला तरीही हरकत नाहीं पण तेच बिरडें कांहीं मुसलमान लोकांप्रमाणें डाव्या बाजूस लावून असें कोणी म्हणेल तर मात्र चालावयाचें नाहीं ! तसेंच, पारशी फ्याशनचा कोट कोणास कितीही रुचत असला तरी गव्हनेराच्या लेव्हीच्या वेळेस, निदान लग्नमंडपांत तरी आपला षड्चंदी घोळदार आंगरखा घालून जावें, असें खऱ्या कुलवंताच्या मनांत आल्यावांचून रहाणार नाहीं !

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

जें जें अत्यंत योग्य असतें तेंच अखेर तरतें; बाकींचें लयास जातें–हें सृष्टीच्या घडामोडींत अनादि कालापासून साम्राज्य करीत आलेलें तत्व कोणाच्या लक्षांत येवो अगर न येवो, स्थावर आणि जंगम सजीव आणि निर्जिव सृष्टीचे व्यापार तदनुरोधानें होत आहेत. राज्य, धर्म, समाज–एतद्विषयक एकूनएक कल्पना व आचार या तत्वाच्या झपाट्यांत सांपडून "अमुक तगणार" व "अमुक बुडणार" असा शेरा त्यांवर पडतो, आणि तदनुरोधानें त्यांस क्षीणता येऊन ते नाहींसे होतात, किंवा त्यांच्या रूपांत थोडेंबहुत अंतर पडून त्यांचें सामर्थ्य वाढत जाऊन ते प्रत्येक नवीन स्थित्यंतराशीं तुल्यबल तयार होतात. या **सार्ववास्तविक** नियमास शरीराचा आंगरखाच अपवाद कोठून होणार? आंगरख्याचा आकार, शरीराची ठेवण, ऋतूचें मान, आणि धंद्याचें स्वरूप, या उपयुक्ततेच्या तीन मुख्यांगांवर अवलंबून असला पाहिजे. आमच्या आंगरख्याची रचना झाली तेव्हां या गोष्टींचा एकीचाही नीट विचार झाला असेल असें वाटत नाहीं. अगोदर आमच्या बंदा इतकी नाजुक व हिली दुसरी कोणतीही वस्तु नसेल! शरीराच्या सर्व भागांत गळ्यापासून कमरेपर्यंतचा भाग साऱ्यांत स्थूल व शारीरकाच्या दृष्टीनें डोक्याच्या खालोखाल महत्वाचा आहे. काळीज, फुप्फुसें, नळ अथवा वरचाखालचा कोठा, मूत्राशय, यकृतस्थान, प्लीहा-स्थान वगैरे साऱ्या प्रमुख अंतरिंद्रियांचा हा भाग साक्षात् कोश किंवा अस्थिकृत पेटिका असल्यामुळें, त्याचें संरक्षण करणारें वस्त्र लाला अगदीं "फिट्ट" होणारें म्हणजे जागच्याजागीं टाकटिक बसणारें व त्याच्या चलनवलनव्यापारास कोणत्याही प्रकारचा व्यत्यय न आणणारें असलें पाहिजे. आमच्या आंगरख्याकडून हें काम बिलकुल होत नाहीं असें आढांग

घाटतँ. मानेच्या मण्यापासून माकडहाडापर्यंत व गळ्यापासून खोलच्या कोठ्यापर्यंत झांकणाऱ्या पोषाखाचा सरा बंदोबस्त करण्याची जबाबदारी वर्तायेवढाल्या सहा चंदांच्या व एका भिकार चिरडयाच्या शिरावर ! या चंदाची दिवसांतून तीनदा निरगांठ पडावयाची व वर्षांतून ते छत्तीसदां तुटावयाचे ! आतां येवढें खरें आहे कीं, अलीकडे धांगडाधिंग्याचें कोणतेंही काम आमच्या शिरावर पडत नसल्यामुळें, ताबुतांतल्या चित्राप्रमाणे आमच्या चलनवलन व्यापाराची अवस्था झाली आहे, व त्यामुळें आमचे चंद चिरडीं वारंवार तुटत नाहींत. पण सध्यां आम्ही आहों यापेक्षां जरासे अधिक उद्योगी व दांडगे (म्हणजे रगदार किंवा सकत) झालों तर आमचा पडूचंदी आंगरखा आम्हांस फेकून द्यावा लागेल किंवा तो असून नसल्यासारखाच मानावा लागेल ! जरा छाती फुगवली कीं तुटला चंद ! कोणा पदराला हात लावला कीं झालें कोठें तरी चिर ! आली वाऱ्याची येवढीशी झुळूक कीं लागले दोनही पदर फडफड करावयाला ! गुलाब वगैरे कांटेरी झाडें ज्या वाटेनें दाट लागून राहिलीं आहेत, नानाप्रकारचीं लहान मोठीं यंत्रे ज्या कारखान्यांत जवळ जवळ फिरत आहेत; किंवा ज्या ठिकाणीं कोणत्याही कारणानें अस्पश्य असलेले लोक बसले आहेत,अशा ठिकाणीं असला आंगरखा घालून कोणी गेला, आणि त्यानें त्याचा अवसानघात केला नाहीं असें सहसा व्हावयाचे नाहीं ! तसें नच झालें तर तो वापरणाराचें मन पहाण्याच्या वस्तूपेक्षां आंगरखा

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, इंग्लिश, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. ष. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

संभाळण्याकडे विशेष गुंतले असलें पाहिजे असें अनुमान वेधडक करावें. थंडीवाऱ्यापासून तर या पोकळ आंगरख्यानें मुळींच संरक्षण होत नाहीं ही प्रत्येकाच्या अनुभवांतली गोष्ट आहे. वाऱ्यानें पाहिजे तेथून आंत शिरावें आणि हवे तेथून बाहेर पडावें किंबहुना सारा भांत त्याला मनमुराद धिंगाणा घालण्यास खुला ठेवलेला असतो—असें म्हणण्यास हरकत नाहीं. कांहीं बचाव झालाच तर आंगरख्याच्या जडपणामुळें किंवा वस्त्राच्या जातीमुळें होतो. जाड्या भरतीच्या, फलाणीच्या किंवा धाबळीच्या आंगरख्यापासून कांहीं ऊब आल्याशिवाय राहणार नाहीं, हें कोणासही कबूल केलें पाहिजे. आतां येवढें खरें आहे कीं, असलेल्या वस्तूंत दोष काढणें नेहमीं निर्दोष वस्तू मुबलविण्यापेक्षां फार सोपें आहे. कोणी जर असें विचारलें कीं, आमचा आंगरखा इतका टाकाऊ म्हणतां तर त्याच्या ऐवजीं आमच्या देशकालवर्तमान स्थितीला योग्य असा दुसरा कोणता आहे? तर त्यावर समर्पक व समाधानकारक उत्तर देणें फार कठिण आहे. हें उत्तर देण्यांत आमच्या चतुर व कल्पक वाचकांपैकीं कोणी आम्हांस कांहीं सुचना केल्यास त्यांचा आमच्याकडून आभारपूर्वक स्वीकार होणार आहे! निदान आर्टिकलाच्या मर्यादेचें अतिक्रमण झालें असल्यामुळें त्या सूचनांच्या अपेक्षेच्या मिषानें आज येथेंच मुक्काम करण्यास हा चांगला टप्पा आहे!

आह्मा पुरुषांचा पेहराव.

(नंबर ४ पोतर.)

आपण सभ्यां सभ्यपणाचा म्हणून जो आंगरखा वापरतों त्यांत चरींच दोषस्थलें आहेत, व त्याचेठाईं हवी तितकी उप-

युक्तता व दर्शनीयता येण्यास त्यांत बऱ्याच सुधारणा केल्या पाहिजेत, हें मागल्या अंकांत सांगितलें अहे. मागें स्त्रियांच्या पेहरावाविषयीं लिहीत असतां चोळीच्या ऐवजीं जाकिटाची किंवा जाकिटाच्या धर्तीवर शिवलेल्या चोळीची, किंवहुना चोळी कायम ठेऊन तीवर जाकिट घालण्याची कल्पना सहज सुचविली आली; कारण, तसें करण्यानें आमच्या मतें आमच्या स्त्रियांच्या पेहरावांत वास्तविक रीतीची सुधारणा होणार आहे ! पण आंगरख्याच्या संबंधानें तसा साफ अभिप्राय देतां येत नाहीं. बंद नकोत व बिरडें नको इतकें मात्र निक्षून सांगतां येतें; पण त्या ऐवजीं काय व कसें लावावें याचा अजून आमच्या मनांत निश्चय झालेला नाहीं. आमच्या वाचकांपैकीं कोणी कांहीं कल्पना सुचवील या आशेनें मागल्या निबंधांत त्यांची प्रार्थना केली होती; पण उभ्या आठवड्यांत फक्त चारच इसमांची पत्रें आलीं, यावरून बहुतेकांना असल्या विषयांवर विचार करतां येत नाहीं, किंवा आपण वापरतों त्या आंगरख्यांत सुधारणा करण्यास चिलकुल जागा नाहीं असें त्यांचें मत असलें पाहिजे, असें अनुमान करणें भाग पडत आहे ! युरोपीअन लोकांत व इतर लोकांत समारंभाचे वेळीं जे कोट किंवा आंगरखे वापरण्यांत येतात त्यांचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, आंगरखा कमरेच्या खालीं उतरून तिच्या सभोंवतीं त्याचा घोडा बहुत घोळ पडावा, ही गोष्ट सर्वांस अवश्य व पसंत झाली आहे, व ती आम्हांसही मान्य आहे. पण तो

संगीत सुविचार--विजय नाटक.
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.
किं. ०८
सुधारक ऑफीस, पुणें.

येतां येतां फारच खाली येतां कामा नये. तो गुडघ्याच्या खाली जाऊं देणें म्हणजे कापडाचा निष्कारण व्यय करून शिवाय नसती अडचण उत्पन्न करण्यासारखें होय. तेव्हां चिन बंदांचा व चिन बिरडयाचा मांडया झांकणारा आंगरखा बहुधा सर्वानुमतें बरा ठरेल असें वाटतें. या संबंधानें आम्ही आपला टांक आतांच गुंतवून घेण्यास तयार नाहीं ! आम्ही या गोष्टीचा पुरता विचार करण्यासाठीं आमच्या वांचकांपासून आणखी थोडीशी फुरसत मागून घेतों, व हें गूढ कोडें आमच्यानें सुटलेंच नाहीं, तर त्याचा विचार करण्यासाठीं एखादी कमिटी किंवा कमिशन नेमावें, अशी सूचना करून ठेवितों. या कमिशनांत दोन तीन कुशल दर्ज्यांची योजना झालीच पाहिजे, हें सांगावयास नकोच आहे. तसेंच, अशल्या महत्वाच्या कामाकरितां फ्याशनच्या म्हणजे पोषाखांच्या निरनिराळ्या तऱ्हांचें अगर जो फ्रान्स देश त्याहून एखादा प्रसिद्ध नेपथ्यकार आणून, तो या कमिशनाचा प्रेसिडंट अथवा अध्यक्ष नेमला तर पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे ! तेव्हां तूर्त आंगरख्याचा प्रश्न असाच खुला ठेऊन धोतराकडे वळूं.

धोतराविषयीं अभिप्राय देतांना आमच्या देशांतील हवापाण्याचा आणि त्यावर अवलंबून असणारी आमच्यांत जी राहण्याची रीत पडली आहे तिचा, पूर्ण विचार केला पाहिजे. धोतर हें काय कीं, जो मनुष्य आपणापेक्षां कांहीं श्रेष्ठ असतो, त्याच्या साऱ्याच गोष्टी आपणास श्रेष्ठ वाटूं लागून त्यांतील एक गोष्ट कुचकामाची आहे, असा भ्रम होऊं लागतो. इंग्रजी अमलाच्या आरंभीं अशा प्रकारचा भ्रम फार लोकांस झाला. त्या वेळेस ज्यांना इंग्रजी शिक्षण मिळे व इंग्रजी गुरूंचा चांगला सहवास घडे, त्यांपैकीं पुष्कळांस देशी वस्तु तेवढी नाहून वाटूं लागे. देशी धर्म, देशी अन्न, देशी रीतभात, देशी

धरसार, देशी विद्या —झाडून सारें टाकाऊ व इंग्रजी विद्वानास अगदीं न शोभण्यासारखें भारूं लागलें ! अनेक दिवस ठाणावर बांधून घातलेला घोडा खुला किंवा कावळि झाल्यामुळें अंधार कोठडींत कित्येक दिवस बसून राहिलेला मनुष्य एकाएकीं उजेडांत आला म्हणजे त्याची जशी अवस्था होते, त्याप्रमाणें इंग्रजी शिक्षणामुळें स्वदेशी आचारांच्या व विचारांच्या बंधनांतून एकाएकीं मुक्त झालेल्या एतद्देशीय प्राथमिक विद्वानांची अवस्था झाली ! इंग्रजी ज्ञान, इंग्रजी स्वातंत्र्य, इंग्रजी ऐषआराम, इंग्रजी स्त्रीपुरुषांचें बरोबरीचें वर्तन, अननुभूतपूर्व रुचीचा इंग्रजी खाना व चित्तास उल्हास देणारीं इंग्रजी पेयें इत्यादिकांनीं आमच्या सुशिक्षितांचा पहिलें घाणा दिपून, वेडावून, भांबावून गेला ! पण तो मनु आतां बदलत चालला आहे. जेवढें साहेब लोकांचें तेवढें चांगलें, व आमचें तेवढें गचाळ, असें मानण्याचा परिपाठ कमी होत आहे, व कांहीं देशाभिमानी सुशिक्षितांत तर अगदीं उलट रीतीनें विचार करण्याचा प्रघात घडूं लागला आहे ! आणि न जाणो, कदाचित् कांहीं दिवसांनीं हें आणखी एक नवीनच लचांड आमच्या पाठीमागें लागेल कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे ! एकदां पेशाभिमान शून्यता आमच्या विद्वानांस आली होती ! आतां कित्येकांस देशाभिमानातिरेक घेरूं लागला आहे ! आम्हांस हे दोन्हीही पंथ मान्य नाहींत. आमच्या मनें खरी वाट दोहोंच्या मधून जाते, व याच वाटेनें चालत राहण्याचा आमचा इरादा आहे.

समाज-शास्त्राचरील व्याख्यानें.

मो. जों. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ८८

सुधारक ऑफीस पुणें.

घर निर्दिष्ट केलेल्या मार्गाचें अवलंबन करून युरोपीअन लोकांत पाटलोणी घालण्याची व आपल्या लोकांत धोतरें नेसण्याची चाल कां पडली याचा विचार केला तर या वस्त्र भेदाचें कारण सहज उमगणार आहे. युरोपांत, विशेषतः इंग्लंडांत, थंडी फार व येथें उन्हाळा फार; तेव्हां थंडीचें निवारण होण्यासारखें तळपायापासून कमरेपर्यंत अंगास चिकटून बसणारें वस्त्र वापरणें तिकडील लोकांस अवश्य झालें; व इकडील लोकांस उकाड्याचा त्रास नं होण्यासारखें व अंगास वारा लागण्यासारखें सुटें वस्त्र घेण्याची अवश्यकता पडली. युरोपीअन व नेटीव लोकांच्या एकंदर पेहरावांत जो भेद दिसतो त्याचें सामान्यपणें मुख्य कारण हेंच आहे. त्यांची टोपी, त्यांचा डगला, त्यांची तुमान, त्यांचे पायमोजे, त्यांचे बूट या सर्वांचा कटाक्ष एका थंडीवर आहे. थंडी फार असल्यामुळें अंगास फार घाम येत नाहीं; व घाम फार न आल्यामुळें अंगावरील कपडा खराब होत नाहीं; आणि या दोन गोष्टी न झाल्यामुळें नित्य स्नान करण्याची किंवा रोज नवीन वस्त्रें घालण्याची जरूर त्यास पडत नाहीं. नेहमीं बाजेवर किंवा पलंगांवर निजणें; खुर्चीवर, स्टुलावर, किंवा कोचावर नेहमीं बसणें; लिहिण्यास वरण्याचें किंवा दुसरें कसलेंही काम मेजावर किंवा टेबलावर करणें; पायांतील बूट सहसा न काढणें; बसण्या उठण्याच्या बहुतेक खोल्यांतील जमिनीवर चटया किंवा सतरंज्या पसरणें; वाऱ्याचा बिलकुल प्रवेश न होईल अशीं भिंगांचीं व लाकडांचीं दारें व खिडक्या करणें; रात्रीं निजतांना थोडीशी कढत काफी किंवा ब्रँडी घेणें, आणि निजून उठल्याबरोबर कढत चहा घेणें; देहधर्म व्यवस्थेनें घरांतल्या घरांत उरकणें व त्याकरतां पाण्याहून अन्य वस्तूंची योजना करणें; प्रत्येक मोठ्या खोलीच्या भिंतींत किंवा कोपऱ्यांत शेगडीची सोय केलेली असणें हे सारे थंडीपासून होणारा त्रास

टाळण्यासाठीं योजलेले उपाय होत. तसेंच फार दिवस टिकणारे खाण्याचे पदार्थ त्यांच्या लोकांत तयार करण्याची जी चाल पडली आहे तीही त्या देशांत थंडी फार म्हणून रोज चूल पेटवून लाकूड किंवा कोळसा खर्च केल्यानें निजण्याचसण्याच्या खोलींत ऊब करण्यास पंचाईत पडणार हें एक कारण, शिवाय थंडीमुळें शिजवलेले किंवा भाजलेले पदार्थ सहसा नासत नसल्यामुळें ते नित्य नवे करण्याची दगदग करणें हाणजे निष्कारण त्रास करून घेणें हें दुसरें. आमचा प्रकार याच्या अगदीं उलट आहे. आमचा स्वयंपाक नित्य नवा, जमल्यास दिवसांतून दोनदां किंवा तीनदां, झाला पाहिजे; आम्हांस तुमच्या खाटांची किंवा पलंगाची गरज नाहीं; गोमयाशिवाय दुसऱ्या कसल्याही आस्तरणानें आमच्या घरांतील जमीनी आच्छादण्याची गरज नाहीं; धोतर किंवा पंचा आम्ही जुलमास्तव लाऊन घेणार; उन्हाळ्यांत त्यालाही वर खोंचून शरीराचा जेवढा भाग वायूस अर्पण करवेल तेवढा करण्याचा आमचा प्रयत्न चाललेला असतो; साहेब लोक ब्राँडी घालून आपलें पाणी कढत करून पितात; आम्ही तें मडक्यांत घालून किंवा फडकें लाऊन गार करून पितों. आम्ही नदीच्या किंवा ओढ्याच्या कांठी अथवा फारच झालें तर परड्यांत याहिर्दिशेला जाणार, व प्रत्येक वेळेस हातपाय, डोळे, व तोंड धुणार; आम्हांस दिवसांतून एकदां तरी स्नान पाहिजे. आंगरख्याची व पागोट्याची गोष्ट राहूं द्या; कारण तीं परकीं वस्त्रें आहेत, पण आमचें घरचें वस्त्र जें नेसायाचें आणि पांघरायाचें धोतर

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ०५

खेडकरवैद्य अॅन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

ते रोजच्यारोज धुतलें गेलें पाहिजे. धोतरें धुणें आणि ती गुलाचाच्या कळीसारखीं राखणें हें आमच्याकडे एक मोठ्या प्रतिष्ठेचें, हौसेचें, व स्वच्छपणाचें चिन्ह होऊन बसलें आहे. साहेब लोकांचा या देशांत प्रवेश होईतोंपर्यंत खुर्ची टेबल कोणास ठाऊक नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. जोडा दारा-पाशीं ठेऊन आमचा घरांतील सर्व व्यवहार अनवाणी. बहुतेक स्त्रियांच्या पायांस तर बांकतपणांत निरुपायास्तव घालावा लागणाऱ्या फाटक्या तुटक्या व तेलकट जोड्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही पादत्राणाचा वर्षाच्या वर्षे संसर्ग घडत नाहीं. आह्मीं नेहमी डोकें बांधावयाचे व पाय उघडे ठेवायाचे; साहेब लोक डोकीं खुर्ची ठेऊन पाय झांकून घ्यावयाचे ! एका गोष्टींत मात्र त्यांच्या आमच्यांत व्युत्क्रम दृष्टीस पडतो. आह्मांस स्वच्छ व वहाती हवेची पराकाष्ठेची अवश्यकता असून तिचा प्रवाह घरांत न येईल, व घरांत जी मूळ असेल ती होईल तितकी खराच होईल अशाविषयीं आम्ही पक्का बंदोबस्त केलेला असतो ! साहेब लोकांस मोकळ्या हवेची इतकी गरज असून ते तीं मिळण्यासाठीं हरयुक्ती लढवीत असतात. त्यांच्या आमच्यांत हा भेद होण्याचें कारण अगदीं उघड आहे; तें हें, त्यांना अक्कल आहे आणे आम्हांला ती नाहीं ! प्राणरक्षणास आणि प्रकृति निरोगी राहण्यास स्वच्छ हवा किती अवश्यक आहे हें त्यांना समजतें आणि आह्मांस समजत नाहीं !

फक्त धोतरांचा विचार करीत असतां या अवांतर गोष्टींचा येथें उल्लेख कशासाठीं केला आहे असें कोणी विचारील तर त्यावर असें उत्तर आहे कीं, आह्मां ब्राह्मणांच्या पायांमागें जें हें हिंवें धोतर लागलें आहे, तें उगींच लागलेलें नाहीं. त्याच्या मुळाशीं कारण आहे व तें फार सबळ कारण आहे. नेहमीं पायलोणीच्या किंवा विजारीच्या बंदींत राहून सबळ कारण

कोणी पुढें आणिल्याखेरीज धोतर टाकून तुमान वापरण्याची इच्छा आह्मांस व्हावयाची नाहीं. कारणपरत्वें धोतरास विश्रांति देऊन थोडा वेळ पायजमा चढविणें ही एक गोष्ट; व सारा वेळ विजारीच्या दोन अस्तन्यांत दोन पाय अडकवून बसणें ही दुसरी गोष्ट ! पहिली आह्मांस मान्य आहे; दुसरी नाहीं, कां तें पुढें पाहूं.

आह्मा पुरुषांचा पेहराव.

(नंबर ५ धोतर.)

हवेंतिल थंडीच्या किंवा उष्णतेच्या कमी अधिकपणामुळें पाश्चात्यांच्या व आमच्या गृहरचनेंत आणि नेपथ्यविधानांत फरक होणें अपरिहार्य असल्यामुळें, ते लोक लोंकरीच्या घट्ट तुमानी वापरूं लागले व आम्ही कापसाची पोकळ धोतरें नेसूं लागलों, हें उघड आहे. तेव्हां अवश्यक म्हणून ज्या वस्तूचा आपण उपयोग करीत आहों ती अनवश्यक ठरल्याशिवाय टाकून देणें बरोबर नाहीं. या संबंधानें आशिया खंडांतल्या ऊष्ण देशांतील पाहिजे त्या लोकांच्या पेहरावाकडे पाहिलें तरी हेंच दिसून येईल कीं, उष्णतेची पीडा न होऊं देण्या ऐवीं प्रत्येकास आपल्या पेहरावांत बरीच ढिलाई ठेवावी लागली आहे ! मोंगल चिनी, अरब वगैरे लोकांच्या पोकळ तुमानी आणि पोकळ सदरे पुष्कळांनीं पाहिलेच असतील. ढिलें धोतर नेसणें व पोकळ तुमानी पालणें यांत आह्मी फारसा भेद मानीत नाहीं. पोकळतुमानवाला ढिल्या धोतर वाल्यापेक्षां विशेष ठाकठिक किंवा

ट्रॉट्स आड्यानें देणें आहेत–फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर–हवाशीर, सर्वत्र पाणी मेळविलेले असे.

मॅनेजर–सुधारक पुणें.

कार्यक्षम असतो असें नाहीं. प्रसंग विशेषीं पोकळ तुमानींतून बाहेर पडण्यापेक्षां धोतर साडून मोकळें होणें सहज घडण्यासारखें आहे ! तुमान आणि धोतर यांपैकीं पहिल्याकडून पाण्याच्या आणि विस्तवाच्या कामीं विशेष दगा होण्याचा संभव आहे ! तथापि पोकळ तुमानींत सुद्धां जो एक प्रकारचा नीटसपणा आहे तो धोतरांत नाहीं, हें निःपक्षापाती मनुष्यास कबूल करणें भाग आहे. पण बहुतेक व्यापार जमीनीवर बसून करणाऱ्या आह्मां हिंदू लोकांस एकंदरीनें पहातां तुमानापेक्षां धोतरच विशेष सोईचें आहे. आमचें जेवण खाण, निजणेंबसणें, आमचें लिहिणेंपुसणें, आमचें कामकाजवगैरे सर्व गोष्टींत समूळ क्रांति झाल्याशिवाय, सर्व दिवसभर कोणत्याही प्रकारची पालोण, तुमान, किंवा विजार आह्मांस सुखावह होणार नाहीं. अगोदर पाहिजे त्या ठिकाणीं व पाहिजे त्याच्या समोर एकें तुमान काढून दुसरी तुमान घालणें किती अवघड आहे, हें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. तुमानांतर करावयाचें झटलें झणजे कांहीं तरी आडोसा पाहिजे; तो नसेल तर पुरेसा निर्लज्जपणा तरी पाहिजे ! पण सामान्यतः या संबंधाचा निर्लज्जपणा आमच्या लोकांत असावा तितका नसल्यामुळें, तुमानी बरोबर ही नसती अडचण घरांत आणावी लागणार आहे. आज आमची अशी स्थिति आहे कीं, आम्हीं किंवा आमच्या बायका भर बाजारांत, नदीच्या कांठीं, उभ्या सभेंत किंवा अशाच प्रकारच्या पाहिजे त्या स्थळीं जेथें स्त्रीपुरुषांचा तमाम समुदाय जमला असेल तेथें एक काडीदेखील आड न धरतां एक वस्त्र सोडून दुसरें नेसूं. तुमान आली कीं ही सोय गेली ! अलीकडील कांहीं लोक एक तुमान सोडून दुसरी चढविण्याच्या अगोदर एक मांडघोळ सदरा घालतात ! चार दोन मिनिटें शुद्ध दिगंबर होण्यापेक्षां ही युक्ति बरी आहे; पण

ती आमच्या अपरिचित दृष्टीला कसलीशीच वाटते! यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, नेसलेल्या धोतराशिवाय सर्वांग उघडें टाकून स्त्रियांच्या समोर राजरोस हिंडणारे फिरणारे व कधीं तर या नेसलेल्या धोतरासही कारणानिमित्त वरेंच वर खोवून जंघाप्रदेश उघडा टाकणारे, किंबहुना धोतराला अजीबात रजा देऊन बुधवारी पंचा लाऊन घेणारे असें आम्ही नेटिव लोक असून, व आमच्या देशांतील कुणबी वगैरे गरीब लोकांस दारिद्र्यामुळें नुसत्या लंगोटीवर आपली लाज झांकणें अगत्याचें झालें असून नुमानांतर करतांना जी धोंडाशी अनावृता अवश्यक आहे ती बद्दल येवढी मोठी खंती दाखविणें हें लाजरेपणाचें शुद्ध थोतांड आहे! कमरेभोंवतीं कसलेल्या सोलांत किंवा दर्भरज्जूंत साधा किंवा भगवा लंगोट अडकविलेले वैरागी अथवा संन्यासी ज्या समाजांत यथेच्छ वावरतात; ज्या समाजांतील हलक्या जातींच्या स्त्रिया नदीच्या, ओढ्याच्या, किंवा सार्वजनिक विहिरीच्या अथवा हौदाच्या कांठावर टिचभर फडकें कमरेभोंवती गुंडाळून घेऊन जाणाऱ्या येणाऱ्यांच्या दृष्टिपाताची कार्डामात्र पर्वा न करतां आपण स्नानविधि यथासांग उरकतात; ज्या देशांतील पुराणप्रिय सुशिक्षित स्त्रीपुरुषांना, यमुनाप्रवाहांत स्नानाकरतां अवतरलेल्या गोपींचीं वस्त्रें पळवून नेऊन कळंबाच्या झाडावर जाऊन बसलेल्या श्रीगोपाळकृष्णास करुणस्वरानें वस्त्रें परत देण्याबद्दल प्रार्थना करणाऱ्या गोकुलांतील वस्त्रहीन लज्जावृत स्त्रीजनाच्या दीन स्थितीचा हुबेहुब देखावा रंगभूमी-

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

वर पहाण्यांत मोठा आनंद वाटतो; ज्या देशांतील धर्मशील सभ्य स्त्रियांस किंवा पुरुषांस शुद्ध नग्न संन्याशांचें भक्तिपूर्वक दर्शन घेण्यास बिलकुल शंका वाटत नाहीं; अशांनीं अंग उघडें पडूं न देण्याविषयीं विशेष चर्चा करणें अगदीं अप्रशस्त आहे. या आक्षेपाला आमचें येवढेंच उत्तर आहे कीं, आम्ही हिंदू लोक अंग उघडें टाकण्याच्या संबंधानें कितीही निष्काळजी असलों तरी ज्याला आमच्या समाजाची पक्की माहिती आहे त्याला असें कबूल करावें लागेल की, साऱ्या मनुष्यांच्या दृष्टीनें स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या शरीराचा जेवढा भाग अत्यंत गोपनीय मानला आहे, तेवढा झाकण्याबद्दल आम्ही पराकाष्ठेची खबरदारी ठेवतों. असें असून आम्हां ब्राह्मणांचें ढिलें धोतर एखादे वेळेस आमची अब्रू घेतें, हें कबूल केलें पाहिजे ! पण ती नाइलाजाची गोष्ट आहे ! तेजःपुंज चंद्रमुखावर देखील गालबोट हें आहेच !

वरील सर्व विवेचनावरून आमचें धोरण कोणीकडे आहे हें आमच्या वाचकांच्या लक्ष्यांत ऑलेच असेल एकंदरीत आमचें धोतर कायम ठेवणें जरूर आहे, असें आम्हांस वाटतें. तथापि कारणानिमित्त तुमान, पाटलूण,विजार अथवा पायजमा यांपैकीं ज्याला जें आवडेल तें घ ज्याला जें सोईचें वाटेल तें त्यानें वापरलें पाहिजे. ज्या ठिकाणीं स्त्रीपुरुषांचा मोठा समाज जमावयाचा आहे, व बहुतेक कामें उभ्यानें किंवा खुर्च्यावर अथवा बाकांवर बसून उरकलीं जाणार आहेत अशा ठिकाणीं; थंडीच्या दिवसांत सकाळीं किंवा संध्याकाळीं विशेष लांब जाववायाचें असेल तर; सामान्यपणें टांग्यांत किंवा बोळ्यावर बसावयाचें असल्यास; तात्पर्य ज्या कामांत विशेष आपसरपणा किंवा ऊच पाहिजे असें काम पायजमा घालून केल्यास चेर होणार आहे. नमेंच, माहेच लोकांच्या घरीं जावयाचें असेल

तर, किंवा ज्या समुदायांत नेटिवांपेक्षां साहेब लोकांची संख्या आधिक आहे अशा समुदायांत जावयाचें असेल तर, सर्व सुशिक्षित सभ्य लोकांनीं होतां होईल तों पाटलुणी घालून जावें हें बरें दिसतें. **राजा कालस्य कारणं** हें वाक्य युरोपांत कितीही मागें पडलें असलें तरी येथें त्याचा अद्यापि बराच अंमल आहे. तेव्हां देशाभिमानाचा निष्कारण टेंभा मिरवून आपणाविषयीं आपल्या राज्यकर्त्यांचें मन कलुषित करण्यांत शहाणपण नाहीं. पेशव्याकडून व निजामाकडून इंग्रज लोकांस आपलीं कामें साधावयाचीं होतीं तेव्हां ते त्यांच्या दरबारांत बूट काढून व हात बांधून घेऊन जात असत असें सांगतात ! नेक नामदार साहेबांच्या खेंड्यास येणाऱ्यांनीं तुमानी व बूट वापरले पाहिजेत असा ठराव केल्यास तुही सारे चुरमुरे खात तो पेहराव करून जाळ यामध्यें आह्मांस शंका नाहीं ! शिवाय, बडोदे, म्हैसूर, इंदूर, लष्कर वगैरे संस्थानांतील दरबारी पोषाखाकडे लक्ष द्याल तर समारंभाचे वेळीं पायजमा किंवा तुमान वापरणें म्हणजे केवळ साहेब लोकांचेंच अनुकरण करणें नव्हे, हें कळून येईल ! या गोष्टीच्या पुराव्या करतां

टाकी उपानह पदें अतिमंद ठेवी
केली विजार वरि डौरहि मौन सेवी ॥

हें रघुनाथ पंडितकृत नळराजाचें वर्णन देतों. यावरून निदान हंस पकडण्याचे वेळीं तरी आमचे राजे लोक विजार घालीत असें सिद्ध होईल ! ज्याप्रमाणें आम्ही धोतराचरोबर, त्याप्रमाणें यांनीं विजारीबरोबर, उपानहाचा म्हणजे जोडयाचा उल्लेख केला आहे. पण स्थलसंकोचास्तव तो आम्ही पुढल्या आठवडयावर ' टाकतों ' !

आह्मां पुरुषांचा पेहराव.

(धोतर, जोडा, किरकोळ.)

एकंदरींत धोतर वापरण्यास आमचा हरकत नाहीं खरी; तथापि तें वापरण्याच्या पद्धतींत फेरफार करण्यास पुष्कळ जागा आहे, व तो केला तरच तें वापरण्यांत अर्थ आहे. अगोदर निमूळत्या निऱ्या काढून मग त्यांचीं शेवटें निऱ्यांच्या मुळांत किंवा त्यांच्या डाव्या बाजूस खोवणें व तसें करतांना पायाच्या दोन नळ्यांच्या दरम्यान लोंबता सोगा काढणें ही धोतर नेसण्याची सांप्रत ढिली पद्धत आह्मांस बिलकूल मान्य नाहीं. तथापि याहून गचाळपणाचें नेसणें म्हणजे हरदासी नेसणें होय. रेशमाचे मोठे कांठ वर काढून पायघोळ निऱ्या जमीनीवर दोन पायांच्या दरम्यान लोळूं दिल्यानें देवाच्या किंवा देवीच्या पोषाखासारखा हरदासी पोषाखाचा थाट प्रेक्षकांस दर्शनीय होतो यांत संशय नाहीं; पण पखवाजाच्या घोडीपासून दुतर्फा बसलेल्या गृहस्थभिक्षुकांच्या ओळींतील संकुचित जागेंत देखील सातआठ पावलें सहज टाकतां येण्यासारखा तो नसतो हें असल्या ऐटबाज कीर्तनकारांस सुद्धां कबूल करावें लागेल. कधेकधी बायांना आपले काळेभोर पाय सभ्य स्त्रीपुरुषांस दाखविण्याची लाज वाटत असेल तर त्यांनीं अलीकडे थोड्या किंमतींत मिळण्यासारखे पायमोजे वापरावे, किंवा नेसलेल्या धोतराचे कांठ लोकांच्या दृष्टीस पडलेच पाहिजेत असा हेतु असेल तर, देवपुत्र्यांतल्या अथवा राक्षसपुत्र्यांतल्या सोंगांच्या पायांस ज्या रीतीनें लुगडीं व धोतरें गुंडाळतात, त्या रीतीनें या भगवतभक्तांनीं आपलीं धोतरें काठ वर काढून आपल्या पायाभोंवतीं गुंडाळून द्यावीं. असें केल्यानें धोतर नेसलें असून रेशमी पट्ट्यांचा घट्ट विचार वापरल्यासें श्रेय व शोभा

येणार आहे ! कसेंहो झालें तरी वाऱ्यानें सहज उडून जाणारा, आपला किंवा दुसऱ्याचा पाय अडखळून तोंडघशीं पडण्यास मदत करणारा, व डाव्या कमरेवर खोवलेल्या दुहेरी पदरामुळें निऱ्याखालून उजव्या पायाकडे पडत असणाऱ्या वर्ळास एखाद्या थट्टेखोरानें लहानसा हिसडा दिल्याबरोबर सारें धोतर भुऱ्कदिशीं फिटूं देणारा सोगा आम्हांस बिलकुल पसंत नाहीं ! घरांतल्या घरांत हवीतिनकी ढिलाई असली तरी हरकत नाहीं; बाहेर जातांना सर्दीनीं कांस घालणें जरूर आहे. कांस घातल्या बरोबर एक प्रकारचें अवसान आल्यासारखें वाटतें, हें सर्वांस स्वानुभवावरून ठाऊक आहे. झाडावर चढावयाचें असल्यास, घोड्यावर बसावयाचें असल्यास, पाण्यांत पोहावयाचें असल्यास, मोठ्या वेगानें पळावयाचें असल्यास अथवा जोरानें उडी मारावयाची असल्यास आपण कांस मारतों; किंबहुना क्षणभर धोतराला चड्डीची आकृति आणतों, हें जर खरें आहे, तर नेसण्याच्या ज्या पद्धतीनें आटोपसरपणा सहज येतो, तिचें अवलंबन आपण बहुधा कां करूं नये ! एक तर सोग्यास रजा देऊन कांस घालण्याचा प्रघात पाडा, किंवा सांगली मिरजेकडील मराठे ज्या पद्धतीनें आपली धोतरें नेसतात, ती पद्धत स्वीकारा. तीही कांहीं वावगी नाहीं. तिच्या योगानेंही दोनही पाय चांगल्या रीतीनें झांकले जाऊन, कमरेंत अवसान वाटते न सुटण्याची भीति नसते. गुजराथी ब्राह्मण व भाट्ये यांचें नेसणेंही खूप घट्ट असतें. पण तें बहुधा गुढग्यावर असून, मराठ्यांच्या नेसण्यांत जी एक ऐट असते ती त्यांत मुळींच नसते. पोषाखांतील दर्शनीयता न गमावतां तो सुखावह व कार्यक्षम असला तरच तो प्रशंसनीय व अंगीकरणीय होय; आणि अशा तऱ्हेनें धोतराचा उपयोग करावयाचा असेल तर नेहमीं त्याची कांस घातली पाहिजे किंवा तें कुणची पद्धतीनें नेसलें पाहिजे !

असो धोतरानें आपली बरीच जागा घेतली तेव्हां त्याला आतां निरोप देऊन जोडयाकडे वळूं.

आमच्या पोषाखाच्या सगळ्या वस्तूंत पुणेरी तऱ्हेचा जोडा आम्हांस अत्यंत नादान वाटतो. आणि या जोडयाला तर जिकडे तिकडे मान व मागणी ! ज्यालात्याला पुणेरी जोडे पाहिजेत ! तेव्हां त्यांना नापसंत करणारे जे त्वा आहां आमच्या किंवा मोठ्या प्रेमानें तें वापरणाऱ्या शेकडों लोकांच्या डोक्यांत कांहीं तरी गोम असली पाहिजे ! आतां एका व्यक्तीनें साऱ्या दुनियेस मूर्ख मानण्यापेक्षां आपल्या मेंदूतच कांहीं उणेपणा असेल असें मानावें, हा सामान्य मर्यादेशीलपणाचा मार्ग होय. पण तो आमच्या काय कामाचा ? समग्र मनुष्यसृष्टीच्या वर्तनांतील दोषांचें आविष्करण करून, सर्व ठिकाणी सुधारणेचा विजयध्वज फडकवण्यासाठीं आमचा अवतार झालेला ! आमच्या निचारांत चुकी होणें म्हणजे जें असंभवनीय तें संभवनीय मानण्यासारखें होय ! अथवा हा प्रकार कसाही असो, तुमचा पुण्याचा जोडा आम्हांला आवडत नाहीं, ही गोष्ट खरी आहे, व तो पुष्कळ लोक हौसेनें वापरतात येवढ्यावरून ते चांगले करतात असें म्हणण्यास आम्हीं तयार नाहीं. येवढें सांगणें पुरें आहे ! लहान पोरींच्या पावलांस नानाप्रकारचे लेप व पट्टया बांधून आणि लाकडाच्या किंवा लोखंडाच्या साच्यांत ती गच्च अडकवून देऊन त्यांचे ठाई मानीव सौंदर्य उत्पन्न करण्याच्या वेडगळ प्रकारास शहरि चिनी लोक मान डोलवितात; पण तो एका हिंदूस तरी चांगला म्हणवेल काय ? साहेब लोकांना आमच्या स्त्रीपुरुषांचे उघडे पाय पाहून चेरंच वाईट वाटत असेल. पण जर कोणी आम्हांस असें सांगितलें कीं, रात्रीच्या मोठमोठ्या समारंभास स्त्रियांनीं आपल्या बर्फतुल्य उरःप्रदेशाचा व स्कंधप्रदेशाचा बराच भाग अनावृत्त राहील अशा रीतीनें

जाळीदार कापडाचा पोषाख करून येणें हें सुधारणेंचें एक मोठें चिन्ह आहे तर त्यास आम्ही काय म्हणूं ? इंग्लंड देशांतील असह्य थंडीमुळें स्त्रियांना या प्रकारच्या पोषाकापासून घशाचें व फुप्फुसाचे विकार जडतात. पण आमच्या स्त्रियांप्रमाणें त्याही रूढीच्या पाशांनीं जखडून गेल्या असल्यामुळें, कांकूं न करतां आपलीं वक्षःस्थळें उघडीं टाकून ऐन कडाक्याच्या थंडींत सहा सहा सात सात तास नाचत रहाणार इनकेंच नाहीं, तर अशा प्रकारच्या देहाविष्कारणांकडे विशेष सभ्यत्व येऊन, आपल्या गुणग्राहकांस आपण विशेष प्रिय होऊं या बुद्धीनें तें जितकें अधिक करवेल तितकें करण्याचद्दल त्या एकमेकींशीं स्पर्धा करतात ! या स्तुत्य स्पर्धेचे दुःखकारक परिणाम परम दयालू राणीसाहेबांच्या कानावर आल्यावरून, हिंवाऱ्यांतील लेव्हीला भेटीला येतांना स्त्रियांनीं असे पोषाख न केले तरी हरकत नाहीं, अशा प्रकारचा वैकल्पिक हुकूम राणी साहेबांकडून थोड्या दिवसांपूर्वी सुटला असें आम्ही ऐकतों. या गोष्टी येथें सांगण्याचें कारण येवढेंच कीं, अमुक एक गोष्ट पुष्कळ लोक करतात म्हणून ती चांगली असलीच पाहिजे असा सिद्धांत करतां येत नाहीं. साऱ्या ब्राह्मणांत विधवांचें वपन करण्याची चाल्ल आहे, पण तिला कोण खरा सुधारक चांगली म्हणूं शकेल ? आतां येवढें खरें आहे कीं, हवा तेवढा कोटिक्रम लढवून आम्हीं तुमचे जोडे कवडीच्या मोलाचे सिद्ध करून दिले तरी

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. स. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

ते तुम्ही आजच टाकून देण्यास तयार होणार नाहीं व ते करणारांच्या पोटावर पाय येणार नाहीं. पण हा गोष्ट प्रत्येक सुधारणेस लागू आहे, हें मागेंच सांगितलें आहे. असो; साहेब लोक ज्याला स्लिपर म्हणतात त्या तोडीचा आमचा जोडा आहे. वास्तविक पाहिलें तर हा फक्त घरांतल्या घरांत वापरण्याच्या योग्यतेचा आहे. पण घरांत तो वापरण्याची आम्हांस गरज पडत नाहीं; तेव्हां सरळ दृष्टीनें पहातां त्याचा कांहींच उपयोग नाहीं. असें असून पुष्कळ लोक त्यावरच आपला निर्वाह करतात हें खरें आहे. पण निर्वाह काय पाहिजे त्यावर होईल. संन्याशांचा निर्वाह खडावांवर होतो; कोंकणांतल्या लोकांचा वहाणांवर होतो. कांहीं अंशीं आमच्या जोड्यापेक्षांही कोंकणी पायतणें सुद्धां आम्हांस बरीं वाटतात. यांनीं पायास मदत होते; पायांना त्यांस मदत द्यावी लागत नाहीं. आमच्या जोड्याची तशी गोष्ट नाहीं. साधारण चालतांना आमचे पाय त्यांस ओढीत नेतात; आणि पळावयाचा प्रसंग आला म्हणजे आमचे हात त्यास उचलून घेतात! पायाचा मथळा आणि टांच यांचें त्यामुळें बिलकूल रक्षण होत नाहीं. विंचू कांटा व सापकिरडूं यांच्यापासून या दिखाऊ पादत्राणानें आमचा बचाव होत नाहीं. एका पायांतला जोडा दुसऱ्या पायांत सहज घालतां येतो, हा आम्हां त्याच्या अंगचा गुण न समजतां अवगुणच समजतों. दोनही पायांची घटना निराळी असून यांचें पांघरूण त्याला आणि त्याचें पांघरूण याला होतां येतें म्हणून असें म्हणणे तें दोघांलाही घट्ट बसण्यासारखें नमून दोघांस कसेंतरी वेष्टणारें पोकळ पोतें असलें पाहिजे हें म्हणणें सिद्ध होतें. आणि तसाच खरा प्रकार आहे ऐन थंडीच्या दिवसांत जंगलांत किंवा डोंगरांत रात्रीं फिरण्यास हा कमानदार पोकळ जोडा कांहीं कामाचा नाहीं. थंडीच्या गारठ्यामुळें अंदो-

रात्र पाय झांकून घेणाऱ्या साहेब लोकांच्या बुटाइतके घट्ट आणि घोट्यापर्यंत सारें पाऊल चौंहोंकडून आच्छादण्यासारखे अघळपघळ आमचे जोडे नसले तरी चालतील. तसेंच घरांत व बाहेर ज्यांस वापरण्याची सदर परवानगी आहे अशा साहेबी बुटांत जो गुण नाहीं तो आमच्या जोड्यांत अवश्य असला पाहिजे. साहेबी जोडा झटादिशीं निघत नाहीं व बसत नाहीं. आमच्या जोडयांत ते दोन्हीही गुण असले पाहिजेत. नाहींतर जमिनीवर व बिछायतीवर बसणाऱ्या व निजणाऱ्या आह्मां लोकांस एकमेकांच्या जोड्याचा स्पर्श वारंवार होणार व त्यांना लागून आलेल्या मातींत लोळावें लागणार! आह्मी ऊर्ध्व कटिबंधांत राहणारे लोक; तेव्हां साहेब लोकांच्या बुटापेक्षां आमच्या जोडयांत अधिक वारा खेळला पाहिजे. हिंदुस्थानी चढाऊ जोडा बरा आहे. पण तो पुढल्याबाजूनें फारच कठिण व निमुळता असल्यामुळें, पायाच्या बोटांस फार त्रास होतो. दिल्लीकडे कांहीं पातळ चढाऊ जोडे मिळतात, व त पायास बरेच सुखकारक असतात. पण त्यांच्या फाजील नाजुकपणामुळें ते बिछायतीवरच वापरण्यासारखे असतात. एकंदरींत आमच्या आवडीसारखा जोडा अद्यापि आमच्या पहाण्यांत आलेला नाहीं. पुण्याच्या जोड्याचे सागळ रेशीम वगैरे सामान चांगलें असतें; पण तळांत व टांचेंत काय निघेल याची कोणासही खात्री देववणार नाहीं. नगर, वाई वगैरे प्रांतांत कातडें फार चांगलें कमावतात. सांगली, मिरज, व एकंदर कर्नाटक प्रांत यांत कातडयावर चांगली मेहनत होत असत

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ०५

खेडकरवैद्य अॅन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

अगदीं वाईट तऱ्हेचे जोडे तयार करण्यांत येतात; जोडे म्हणजे पादरक्षणाचे साधन या नात्यानें ते पुण्याच्या जोड्यापेक्षां ही वाईट असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुंबईच्या भाट्यांचा व गुजरांचा अणकुचीदार द्रोणही आम्हांस पसंत नाहीं. नगरी जोड्याचा मऊपणा, पुण्याची सागळ व रंग, इंग्रजी बुटाचा आटोपसरपणा व सर्व बाजूंनीं पायाचे रक्षण करण्याचें सामर्थ्य, चढाऊ जोड्यामाणें झटादिशीं घालतां येणें व काढतां येणें; म्हणजे आलें असतां बंद आवळून घेऊन किंवा नवें रबर घालून घट्ट करण्याची सोय असणें-वगैरे गुण ज्या जोड्यांत साधले जातील असा एखादा अँग्लोइंडियन किंवा हिंदी-मराठी नवीन जोडा काढल्याशिवाय या संबंधाची आमची उणीव दूर होणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. या कामाकडे कांहीं सुधारकांचें लक्ष लागलें आहे असें दिसतें. पण आज-पर्यंत त्यांचेकडून झालेल्या सुधारणेंत प्रशंसा करण्यासारखें कांहीं नाहीं असें आमचें मत आहे. कल्पक सुधारकांचें, दुर्धारकांचें व दोहों मध्यम तृतीयप्रकृतीचें या अवश्य सुधारणे-कडे लक्ष जावें म्हणून या लेखा अन्वयें आम्ही असें जाहीर करतों कीं, जो कोणी वर सांगितलेल्या अडचणी व सोई मनांत आणून, आम्हांस मानवेल असा जोड्याचा नवीन नमुना तयार करुन देईल त्याला आम्ही दहापासून पंधरा रुपये बक्षीस देऊं!

या शिवाय जोड्याशिवाय उपरणें पंचा, बंडी, जाकिट, उभ्याटोप्या, कानटोप्या, हातमोजे, पायमोजे, हातरुमाल, गळपट्टे, कमरपट्टे गंजिफाक, शबलें, बडा डगला वगैरे पेहरावाच्या अनेक गोणांचा उल्लेख करून त्यांबद्दल आमच्या मनांत आजच थोडें बहुत लिहावयाचें होतें. पण आर्टिकलाची मर्यादा उलटून गेल्यामुळें तो हेतु आतां सफळ होण्याची आशा राहिली नाहीं!

तथापि पुढें केव्हां तरी या किरकोळ रकमांकडे वळणें आहे कारण यांतही मोडातोड व फिरवाफिरव करण्यास पुष्कळ जागा आहे. यापैकीं बहुतेक परक्या वस्तू आहेत. त्या इंग्रजी अमलाबरोबर येथें आल्या आणि ज्याप्रमाणें दिवसेंदिवस तो अंमल किंवा त्यांतील मुख्य तत्वें आह्मांस अधिकाधिक प्रिय होत चालली आहेत, त्याप्रमाणें या परक्या वस्तूही आह्मांस अवश्य व प्रिय वाटूं लागल्या आहेत! तात्पर्य काय कीं, बऱ्या सोईपुढें व सुखापुढें धर्माभिमान, देशाभिमान, व स्वाभिमान वगैरेंत जेवढा त्याज्य भाग असतो तेवढा हळूं हळूं लयास जातो, असें दिसतें ! इंग्रजी तऱ्हेचा कोट, पाटलूण, व बूट घालून "स्प्रिंगच्या जाकेटावर" टीका करणारे वस्ताद गडी आह्मीं पाहिले आहेत; हे लोक कालेंकरून टोपीवाल्यांची टोपी घालतील याविषयीं आह्मांस शंका नाहीं; पण आज जर आह्मीं असें ह्मटलें कीं कांहीं प्रसंगीं रुमालापेक्षांही इंग्रजी टोपी वापरणें सुखावह आहे तर ते आम्हांस अत्यंत्य मूर्खांत खचित काढतील !

सुधारकालाच दोष कां ?

(फिरून एकदां जोडे)

आभरण, आवरण, अलंकार इत्यादि गोष्टींविषयीं सुधारकाप्रमाणें इतरांच्या मनांतही नानाप्रकारचे विचार आज कित्येक

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भांडे एम्. ए. कृत. किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

वर्ष घोकूं लागले असून, व कित्येकांनीं तर ते अमलांत आणिले अस्तून, सुधारकांत केवळ सार्वजनिक फायद्यासाठीं त्यांची चर्चा सुरू करण्याबद्दल निर्दय टीकाकार त्याला इतका दोष कां देतात हें समजत नाहीं ! ज्या गोष्टी तुम्ही राजरोसपणानें करतां, व ज्या करण्याबद्दल कोणी कोणास दोष देत नाहीं इतकेच नाहीं तर उलट उत्तेजन देतात, त्या 'करावया' असें वर्तमान पत्रांत उघडपणें झळकलें असतां कोणाचेंही पित्त इतकें खवळून कां जावें हें सांगणें अंमळ कठीण आहे ! नाग, केतक, फुलें वगैरे डोकीं-तले दागिने व छुशा वगैरे गळ्यांतले दागिने पोकळ करून लाखेनें भरण्याचा फार जुना परिपाठ आहे; गोठ, तोडे, चिलवर वगैरे हातांतले दागिने कांहीं प्रांतांत बहुधा पोकळ करतात; नथ, बुगडया, पिंपळवण वगैरे मोत्यांच्या दागिन्यांत कापुरमोत्यांचा उपयोग कसा करावा हें ज्यांना ठाऊक नाहीं असे फारच थोडे लोक असतील;-हा सर्व प्रकार यथास्थितपणानें चालत असून, चोरांची भीति नाहींशी व्हावी, लहान मुलांच्या जिवाला धक्का न लागावा, उत्पादक व्यापार काढण्यास भांडवल मिळण्याची पंचाईत न पडावी, श्रीमंताप्रमाणें गरीबास यथेच्छ नटतां येऊन अलंकारामुळें शरीरास येणाऱ्या शोभेपासून होणाऱ्या आनंदाचा उपभोग मिळावा व उभय वर्गांतील मत्सर कमी होऊन मैत्री व्हावी अशा अनेक कारणांकरतां पोकळ दागिने, गिल्टी दागिने किंवा खोटे दागिने घालावे असें उघडपणें प्रतिपादणाऱ्यांचा पोकळ गिल्टी, व खोटे दागिने वापरणारांनीं उपहास करावा हें आश्चर्य नव्हे काय ? अलंकारांत शरीर खुलविण्याचा जो धर्म असतो तो लोंना त्यांच्या किमतीमुळें येत नसतो, तर सुवर्णकाराच्या ऊर्फ सोनाराच्या घडणाचातुर्यामुळें येत असतो. तेव्हां दागिने कोणत्याही धातूचे किंवा दगडाचे करून त्यांचा आकार व रंग चांगला साधला म्हणजे ते वापरण्यास कोणाचीही

हरकत नसली पाहिजे. ज्याला ओंमंतीच दाखवायाची अशा त्यानें आपलें ब्यांकबुक गळ्यांत बांधावें झणजे झालें ! पेहेरावाच्या संबंधानें अशीच गोष्ट आहे शोभा आणि उपयोग यांच्या अनुरोधानें अगदीं मट्ट लोकांच्या पहेरावांतदेखील फेरफार होत असतो; पण नवीन सोई मनांत आणून कोणी अमुक प्रकारचा नवीन पोषाख करावा असें म्हटलें कीं, रूढीच्या मळलेल्या रस्त्यानें हमेशा जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना आपल्यावर मोठें अरिष्ट येऊन गुदरलें असें वाटतें ! जाकिटाची गोष्ट राहूंच द्या; बाहेर जातांना पुरुषांपेक्षां स्त्रियांनीं जोडे वगैरच्या वापरणें विशेष अवश्य आहे, हें ज्याच्या डोक्यांत निदान रतिभर अक्कल असेल त्याला देखील कबूल करावें लागेल. असें असून ग्रीष्म ऋतूच्या ऐन भरांत आम्ही आपल्या वाचकांस ताडूवर प्रखर ऊन घेत अनवाणी हिंडूं देत नाहीं काय ?

हे सारे विचार येथें सुचण्याचें कारण थोडया दिवसांपूर्वी नेपथ्यमीमांसेवर आम्ही जे लेख लिहिले आहेत त्यांपैकीं जोडयाच्यासंबंधानें लिहिलेला मजकूर कारण झाला आहे. पुण्याचा जोडा आम्ही अगदीं नापसत ठरविला आहे, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. तसेंच, जोडा कसा असावा विषयीही त्या लेखांत आम्ही कांहीं सूचना केल्या आहेत. त्या सूचनांबरहुकूम जोडे तयार करविण्याचा विचार प्रथम आमच्याच मनांत आला असें निदान आतां तरी आमच्यानें झणवत नाहीं;

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ८४

लाव्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

कारण, त्या सूचना प्रसिद्ध केल्यापासून आम्हांकडे जीं पत्रें व जे जोड आले अहेत त्यांवरून जोडयाची सुधारणा पुष्कळांच्या मनांत पुष्कळ दिवस घाटत आहे हें उघड दिसतें. कित्येकांनीं तर या कामीं बराच पैसाही खर्च केला आहे. मुंबईच्या एका संमान्य अनुभवशीर वृद्ध गृहस्थानें जो जोड तयार करवून पाठविला आहे त्यांत आम्ही सुचविलेल्या बहुतेक सुधारणा घडवून आणिल्या आहेत. या सुधारणांमुळें त्या जोड्यास बऱ्याच अंशीं शूचें रूप आलें आहे. या सुधारणा या गृहस्थाच्या मनांत पूर्वीच येऊन चुकल्या होत्या असें त्याच्या पुन्नावरून उघड दिसतें. मुंबईहून आलेल्या जोड्यांत मुख्य सोय ही आहे कीं टांचेला वेष्टणारा कातड्याचा भाग पाहिजे तेव्हां पाडतां येतो किंवा उभा करतां येतो. जोडा घट्ट बसवायचा असेल तर तो टांचेखालीं पाडावा, अशा योजना मिसमिशीतपणा न येईल अशा रीतीनें केली आहे. बोटाकडील भाग जितका रुंद असावा तितका नसल्यामुळें बोटावर दाब बसतो, व त्यामुळें थोडा त्रास होतो. पण चर्मकाराच्या हट्टामुळें हा दोष या आमच्या मित्रास काढून टाकतां येईना ! दुसरा गयेचा एक जोडा आला आहे. तो कांहीं अंशीं चढाऊ जोडयासारखा आहे. त्याचें तळ अगदीं चपटें आहे. ज्याच्या पायांस तो बसेल त्यास तो फार सुखावह होण्यासारखा आहे. तशींच त्याची मजबुतीहि तारीफ करण्यासारखी आहे पण स्वरूपाच्या कामीं अगदीं नादान ! दुसऱ्या ठिकाणाहूनहि यासंबंधानें बरींच पत्रें व चित्रें आलीं आहेत. एक दोन चांभारांनीं ' नमुना दिल्यास त्याबरहुकूम जोडा करून देतों ' अशा अर्थाचीं पत्रें पाठविलीं आहेत. आम्हीहि पांच चार प्रसिद्ध ठिकाणांहून मासले मागविले आहेत, पण आतांपर्यंत समाधानकारक जोडा आमच्या दृष्टीस पडला नाहीं, हें कळविणें जरूर आहे.

उत्तम जोडा कसा असावा याचा योग्य निर्णय करण्यास आम-च्या मतें जोडयांचें प्रदर्शनच केलें पाहिजे ! या प्रदर्शनासाठीं हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध ठिकाणचे जोडे आणवावे इतकेंच नाहीं, तर आशिया, युरोप, अमेरिका वगैरे खंडांतील प्रसिद्ध देशांतले जोडे आणविण्याचीही व्यवस्था केली पाहिजे. निरानिराळ्या राष्ट्रांचे मुंबईस जे वकील असतात त्यांच्या मार्फत ही व्यवस्था सहज करतां येणार आहे. पण आम्हा हिंदू लोकांत अशा प्रकारचें प्रदर्शन करण्यास कोण धजावणार ? युरोपांत कुत्र्यांचीं, मांजरांचीं, गाढवांचीं, घोडयांचीं, फुलांचीं, यंत्रांचीं, धान्यांचीं, फार तर काय प्रेक्षणीय स्त्रियांचीं देखील प्रदर्शनें होतात. आम्हांस या गोष्टी अद्यापि निरुपयोगी किंवा उपहासास्पद वाटत आहेत. फार कशाला, हा आम्ही जोडयांच्या प्रदर्शनाचा जो विचार काढला आहे तो अंमलांत आणण्याचा विचार तर कोणी करणारच नाहीं; उलट त्यांची थट्टा मात्र चोहोंकडे होईल! परंतु **सुधारक** अशा थट्टेस डगणारा नाहीं. थट्टेनें कोणत्याही वस्तूचें नैसर्गिक चांगुलपण नाहींसें होत नाहीं. आज नाहीं उद्यां जी चांगली गोष्ट आहे ती तुम्हास पतकरलीच पाहिजे तसें न कराल तर तुमचा निभाव लागणार नाहीं !

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. चारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

ही सुधारणेची दिशा नव्हे.

सध्याच्या काळीं आम्हां पुणेंकरांसारख्यांच्या तंट्यापासून रहावेल तितकें दूर रहण्यांतच हित आहे, नाहीं तर पुढें मागें पस्ताव्यांत पडावें लागेल अशी गेल्या अंकीं श्रीशंकराचार्यांस आम्ही प्रेमबुद्धीनें विनंति केली; व त्या विनंतीबरोबरच आम्ही आपल्या सुधारक मित्रांसही इशारा केला कीं, धर्माच्या वादांत पडून आपलें पाऊल पुढें पडण्याची आशा कोणी करूं नये. ज्यानें त्यानें आपापल्या मगदुराप्रमाणें आपला पंथ सुधारावा हेंच सध्याच्या काळीं श्रेयस्कर आहे. श्रीशंकराचार्यांस आमची सूचना कितपत रुचते, हें अद्याप पहाणें आहे; परंतु आमच्या सुधारक वर्गास केलेली सूचना त्यांस पूर्णपणें मानवली असावी असें दिसत नाहीं. तेव्हां त्यासंबंधानें अधिक फोड करणें अवश्य दिसतें. आमच्या सूचनेची यथार्थता मनांत विंचण्यास प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आमचा धर्म म्हणजे फळ्यांवर धूळ खात पडलेल्या पोथ्या नव्हत किंवा खुद्द श्रीशंकराचार्यांचें आज्ञापत्र नव्हे. पोथ्यांमध्यें काहींही लिहिलें असलें, किंवा श्रींनीं कोणतेंही आज्ञापत्र काढलें, तरी तें लोकांस मान्य होण्याचा संभव नाहीं. लोकांच्या हल्लीं ज्या कांहीं समजुती बनून राहिल्या आहेत त्या शास्त्राला धरून असोत वा नसोत, त्यांस श्रीची संमति मिळो वा न मिळो, त्या समजुतींवरच त्यांच्या धर्माचरणाचा पाया रचलेला आहे. देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे वगैरे पोट वर्गांत बेटीव्यवहार होण्यास हरकत नाहीं म्हणून श्रीचा हुकूम सुटल्याचें आम्हीं एकदां ऐकलें होतें. पण त्याचा काय उपयोग झाला ? कांहीं नाहीं. याचें कारण इतकेंच कीं, पोथ्या व धर्मगुरु यांचा लोकमतावर परि-

माण होण्याचे हे दिवस नाहींत. हे दिवस पडले रूढीच्या साम्राज्याचे. तुम्ही एकदां नवी रूढी पाडा, ती धर्माच्या, नीतीच्या व विचाराच्या कितीही विरुद्ध असो, पण ती एकदां बरीच जुनी झाली कीं आलें तिला वेदवाक्यत्व; झाला तिचा अंमल जारीनें सुरू. या रूढीच्या अमलाखालीं प्रत्यक्ष मूर्तिमान धर्मचेंही नांव धर्मभ्रष्टांच्या पदांत गेल्याखांचून रहावयाचें नाहीं ! तेव्हां अशा स्थितींत 'पतौ, आणि 'पत्यौ' या विभक्तिरूपांवर कोटिक्रम करीत बसून काय निष्पन्न व्हावयाचें, तें यापूर्वीच करून चुकलें आहे. मग ज्या गोष्टीचा एकदां-अनुभव आलेला आहे, त्याची पुनरावृत्ति काढण्याच्या उद्योगास लागणें म्हणजे काळाचा, बुद्धीचा, व कर्तबगारीचा अपव्ययच करणें नव्हे काय ? असें आम्ही फिरून विचारतों. आगगाडींतून प्रवास करून आलें असतां सारीं गाठोडीं जलपूत करण्याचें तर एकीकडेसच राहिलें, पण नुसतें डोक्यावरून पाणी घेणारे तरी शेंकडा किती सांपडतील ! कै. रा. ब. देशमुख यांस जसें शाळेंतून आल्यावर सचैल स्नान करावें लागे, तसें आतां कोणत्या विद्यार्थ्यास करावें लागतें. हापिसांतून आल्यावर आंगरखा पागोटें एका बाजूस ठेवून स्नान करून पंचा नेसून माजघरांत शिरणारे हाफिसर हल्लीं कोणाच्या दृष्टीस पडतात काय ? अनार्यस्पृष्ट बर्फ घालून थंड केलेलें पाणी कोणता धर्माभिमानी आनंदानें घशांत ओतीत नाहीं ? उघडपणें सोडा-

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

बॉटरची बाटली तोंडास लावण्यास मुंबई, पुणें यांसारख्या शहरीं लोकांची कोण मुर्वत ठेवतो ? या सर्व प्रचारांस सनातन वैदिक धर्माचें सांकशन मिळाविण्याकरितां सांगलीकरांच्या वाडयांत कमिशनें बसल्याचें कोणी ऐकलें आहे काय ? नाहीं. ज्यानें त्यानें उगाच वाद घालीत बसण्याचें सोडून आपली सोय सुधारली त्याचा हा परिणाम होय व आतां या गोष्टीस वेदांत प्रत्यक्ष आधार सांपडला नाही, तथापि ' असतिहि अनुमानं ' या सूत्राच्या जोरावर त्यांचें धर्मप्रणीतत्व प्रस्थापित होईल यात संशय नाही ! तेव्हां असा राजमार्ग आपल्यापुढें असतांना नसते वाद काढून असलेली स्वतंत्रता गमावण्याच्या प्रयत्नास आपण कां लागावें ? व आपल्या हातानें आपल्या पायांवर धोंडा कां पाडून घ्यावा हें आम्हांस समजत नाहीं. यावर कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, होय, तुम्ही म्हणतां तें खरें. या चळवळीस सुरवात झाली, तेव्हांच त्याच्यावर लाथ झाडली असती तर सारें सुरळीत झालें असतें; पण सकारण असो वा अकारण असो, एकदां त्या वादांत पडल्यावर आतां त्याचा शेवट लावणें अवश्य आहे. हा युक्तिवाद आम्हांस संमत नाहीं. आज जे धर्माभिमानी म्हणून थाटले आहेत, ते खऱ्या खऱ्या धर्मरक्षणबुद्धीनें पुढें आले आहेत असें नाहीं. तसें असतें तर चालू धर्मसमजुतींविरुद्ध हजारों गोष्टी त्यांच्या डोळ्या देखत घडत असून, व कित्येक तर खुद्द त्यांच्या घरांत शिरल्या असून तिकडे ते जी डोळेझांक करतात ती त्यांनीं कधींच केली नसती. या कामांत ख्रिस्ती मिशनऱ्यांशीं संबंध आला, म्हणून त्यांस त्याविषयीं विशेष राग आला असेंही कित्येकांचें म्हणणें आहे. सुधारणेच्या कामांत या मिशनरी मंडळीस आपल्या कटांत येऊं देऊं नये असें आमचेंही मत आहे, परंतु त्यामुळेंच धर्माभिमान्यांच्या तळची आग मस्तकास गेली ही

गोष्ट आम्हांस कबूल नाहीं. घटकाभर तें खरें होतें असें गृहीत धरलें तरी प्रायश्चित्तें झाल्यावर तीं आग निवावयास पाहिजे होती. पण फिरून जे शुक्ल आणि कृष्ण पक्ष अस्तित्वांत आले, व श्रीकडे अपिलें झालें, त्यावरून ती निवली नाहीं असें उघड दिसत आहे. अपिलाचा श्रीकडून अद्याप निकाल झाला नाहीं; परंतु तो झाला व बेचाळिसांनीं तो केला असें मानले, तथापि हीं रिकामी मंडळी उगाच बसतील असें वाटत नाहीं. याकरतां ज्या लोकांच्या हातून दुसरीं महत्वाचीं कामें होण्यासारखीं आहेत त्यांनींही त्यांच्या नादास लागून त्यांत व्यत्यय आणावा,हें योग्य नाहीं. आमच्या धर्माभिमान्यांत अपूर्व तरतरी आजमित्तीस आलेली दिसते, तिला नसतें महत्व देण्याचा प्रयत्न झाला नसता, तर यापूर्वीच जागच्या जागीं थंड झाली असती! विनाकारण तंटे माजून इतर संस्था कमकुवत होऊं नये तया उद्देशानें बेचाळिसांपैकीं कांहींनीं प्रायश्चित्तें घेतलीं. पण तेणेंकरून तंटा तर मिटला नाहींच, पण सुधारक आपणास भ्याले असें समजून दुसरा पक्ष मात्र अधिकच थेर करूं लागला. हे त्यांचे थेर बंद करण्यास उत्तम उपाय म्हटला म्हणजे त्यांच्याकडे कोणी पाहूं नये हाच होय. या धर्मवादांत पडल्यानें कांहीं फायदा होण्याची आशा नसून तसें करणें म्हणजे उलटें खुंटा हलवून बळकट करण्यासारखें आहे विचारानें योग्य वाटणाऱ्या सुधारणांचा लोकांस परिचय करून द्यावा; त्यांचें शंकासमाधान करावें; व आपापल्या

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ⁄१० पौंड.

मोरोक्को कॉफी ⁄१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

स्थित्यनुरूप प्रचार पाडावा हाच प्रशस्त मार्ग होय. केवळ धर्मपुस्तकांच्या सुतानें सुधारणा गांठू म्हटलें तर तें साधणें नाहीं. लोकांची समजूत पाडण्याकरितां साधेल तेंव्हां पोथ्या त्यांच्या पुढें उघडा; पण कमिशनें नेमण्याचे प्रसंग आणून पोथ्यांचा कायमचा अर्थ ठरवून टाकण्याच्या भानगडींत मात्र पडूं नका. पुनर्विवाहाच्या शास्त्राशास्त्रतेविषयीं वर्तमानपत्रांतून, व्याख्यानांतून व पुस्तकांतून वाद चालला होता तों तसाच चालू ठेवला असता व पंच नेमून त्याचा निर्णय करण्याच्या कोणी खटपटींत पडलें नसतें तर आमच्या मतें आज पुनर्विवाहाचा पक्ष पुष्कळ पुढें सरकला असता. परदेश गमनाचीही गोष्ट तीच आहे. अशा गोष्टींचा युक्तता विचारानें ठरवावयाची. ती शास्त्रानें ठरवूं पहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. शास्त्रांत आपणांस अनुकूल अशीं वचनें असलीं तथापि आमच्या शास्त्र्यांच्या चष्म्याला कदाचित् तीं विपरीत मात्र दिसावयाचीं. जरी कदाचित् तीं अनुकूल अशींच दिसलीं तथापि तीं आमच्या तंटेखोर धर्माभिमान्यांस काय कामाचीं? त्यांच्या मनाप्रमाणें निकाल न करणारा धर्मगुरु जसा त्यांस मान्य नाहीं त्याप्रमाणेंच त्यांस नको अशीं वचनें असलेलीं शास्त्रें तरी ते कबूल कशास करतात ? आजपर्यंत या प्रश्नाचा कायमचा निकाल न झाल्यामुळें परदेशगमन अगदीं बंद पडलें असें थोडेंच आहे, व इंग्लंडाहून आलेले लोकही थोडेच बहिष्कृत झाले आहेत ! तेव्हां अशा प्रश्नासंबंधानें धर्मगुरूकडून निर्णय करून घेण्याचा विचार सोडून देऊन साधेल त्यानें प्रचार पाडण्यास सुरुवात करावी, व लोकांस बनविण्याचा आपला क्रम चालू ठेवावा म्हटलें आहेः-शास्त्राद्बुद्धिर्बलीयसी.'

आतां धर्माभिमानी स्वतःच वेगळी जात करणार म्हणतात !

कालाची गति विचित्र आहे! वेगळी जात करा, वेगळी जात करा, म्हणून वेळोवेळीं सुधारक वर्गीयांस आपण जो उपदेश करीत सुटलों होतों, त्याचा अवलंब करण्याची आपणास्वतः वरच पाळी येणार, असें कधीं आमच्या धर्माभिमान्यांस स्वप्न तरी पडलें असेल काय ? नाहीं. आंपला उपदेश हे हट्टी सुधारकं बन्या बोलानें ऐकत नाहींत. असें पाहून त्यांस वेगळी जात करण्यास भाग पाडण्याची शक्कल जेव्हां यांच्या डोक्यांत शिरली तेव्हां झाला आपला कार्यभाग म्हणून या मंडळीस कोण हर्षवायु झाला होता; व त्याच्या झटक्यांत त्यांनीं काय काय चेष्टा मांडल्या होत्या ! परंतु पुढें पहातात तों सगळेंच औं-फस्स. या सुधारकांची खोडकी मोडण्याकरितां म्हणन ज्याचा आश्रय केला, तो त्यांस अब्राम्हण मानीत नाहीं इतकेंच नाहीं, तर चांगलें जबर प्रायश्चित्तही त्यांस सांगत नाहीं, असें आढळून आलें तेव्हां यांच्या डोळ्यास चांगलें अंजन मिळालें, व त्यांस वस्तुस्थितीचें स्वरूप अधिक स्पष्टपणें दिसूं लागलें. प्रायश्चित्तप्रकरणाचा अद्यापि कायदेशीर रीतीनें निकाल होणें आहे; पण तो काय होणार हें आतां त्यांस अगोदरच दिसत असल्यामुळें आपली मसलत

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

एकंदरींत फसली असें पाहून ते अगदीं हताश होऊन गेले आहेत; व या वर्गाचे पुढारी आपल्या हस्तकांकडून आपल्या साग्यांस इशारा करीत आहेत कीं, बाबानों, या सुधारकांस आपणांतून हुसकून लावण्याचा आपला वेडा फंद आपण आतां सोडून देऊं या. हे आपणास हार जातील ही कल्पना अगदीं चुकीची आहे. त्या आपल्या कटांत सामील होण्याचीही आशा दिसत नाहीं. तेव्हां आतां आपणच आपला रस्ता सुधरावा हा उत्तम पक्ष. धर्मरक्षणाचा तर विडा आपण घेऊन चुकलों आहों. तो कसा-तरी नेटास लावला पाहिजे. या सुधारकांस जातीबाहेर काढण्याच्या कार्मीं आपण हतवीर्य झालों असलों, तथापि यांच्यातून बाहेर निघण्याचें सामर्थ्य आपणांत नाहीं असें नाहीं; करितां चला आपणच आपली वेगळी जात करूंया.

वरील उपदेशाचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं; सुधारकांची वेगळी जात करण्याचा धर्माभिमान्यांची खटपट जशी व्यर्थ गेली, तशीच आपले अनुयायी आपल्या सूचनेस मान देऊन सुधारकांशीं आपला संबंध तोडून टाकतील ही त्यांची समजुतही भ्रामक आहे हें त्यांस प्रत्यक्ष अनुभवानें कळून येण्यास कालावधि नको; परंतु लागलेल्या ठेंचेचा उपयोग करून घेण्याचें जर या धर्माभिमानी म्हणविणाऱ्यांस शहाणपण असेल, तर या बहिष्कारनाटकाचा आणखी एक अंक करून दाखवून आपलें अधिक हंसें करून घेण्याच्या खटपटींत ते पडणार नाहींत असें आम्हास वाटतें. सध्यांचा काल जातीचें बंड कमी करण्यास जसा अनुकूल आहे, तसा तो त्याची वृद्धि करण्यास नाहीं हें आज मिसीस कोणास समजावून सांगितलें पाहिजे असें नाहीं. याउपर अजूनही वेड घेऊन पेडगांवास जाण्याचा जर आमच्या धर्मरक्षकांचा हेका असेल तर त्यांनीं तसें खुशाल करावें; आह्मी त्यांच्या मार्गांत आडवे येऊं इच्छित नाहीं.

आजपर्यंत झालें तितकें पुष्कळ झालें, हा धर्मरक्षणाचा मार्ग आहे असें जें आम्ही वर सुचविलें आहे, तें आमच्या धर्माभिमान्यापैकीं बहुतेकांस रुचूं नये, व आमच्या योग्य उपदेशापेक्षां आण स्वतः घालीत असलेला गोंधळच त्यांस अधिक बरा वाटावा हें केवळ सहाजिक आहे, व त्यांनीं पांघरलेल्या धर्माभिमानाच्या कातडयांतून बाहेर डोकावणारे कान आम्हाप्रमाणें ज्याच्या दृष्टीस पडत असतील, त्यांस त्याबद्दल आश्चर्यही वाटण्यास नको ! परंतु या धर्माभिमान्यांत व त्यांच्या अंधानुयायांत काहीं खरे धर्मभीरू लोकही सांपडले अहेत व ते आमच्या म्हणण्यांचा शांतपणें विचार करतील अशी आम्हांस आशा आहे.

आतां निर्दिष्ट केलेल्या खऱ्या धर्मभीरूंस उद्देशून आम्हांस जें लिहावयाचें आहे, तें लिहिण्यापूर्वी एका गोष्टीची पुनरुक्ति करणें अवश्य दिसतें. या वर्गाची आम्हांस कीव येते येवढ्यावरून त्याच्या समजुती आम्हांस मान्य आहेत असें कोणीही समजूं नये. हिंदुस्थान देशावांचून अन्यत्र कोठेंही स्पृष्टास्पृष्ट अन्नपाण्यांत पापपुण्य येऊन बसलेलें दृष्टीस पडत नाहीं. आमक्याच्या हातचें अन्नपाणी घेण्यांत पाप आहे आणि अमक्याच्या हातचें घेण्यांत पुण्य आहे अशा पापपुण्याच्या संकुचित कल्पना आमच्या डोक्यांतून कधींच पार नाहींशा झाल्या आहेत. नुसत्या ब्राम्हणेतरस्पृष्ट अन्नादिकांत पाप वसूं शकत नाहीं इतकेंच नाहीं तर चोरी, खून, शिनळकी वगैरे सर्व देशांतून निंदिलेले गुन्हे करणारांच्या नुसत्या स्पर्शास्पर्शानें,

---

निबंधसंग्रह.

भाग १ ला. किं. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

योग्य वाटतें त्याप्रमाणेंच इतर लोक आपलें आचरण ठेवतील तरच त्यांच्याशीं व्यवहार ठेवावयाचा, असा तुमचा विचार असल्यास तुम्हांस गिरिकंदरांत जाऊन दडी दिली पाहिजे व तेथें तरी तुम्ही अगदीं शुद्ध रहाल किंवा नाहीं याबद्दलही संशयच आहे.

तुम्ही ज्यास हीनजात मानतां, तो दुराचाऱ्यापेक्षां व्यवहार ठेवण्यास अधिक योग्य आहे, अशा रामजुतीनें आम्हास जें काय सांगावयाचें होतें, तें आम्हीं सांगितलें; परंतु हा आमचा कोटिक्रम तुम्हांस कबूल नाहीं असें मानलें व हीनजात मनुष्य दुराचाऱ्याइतकाच, किंबहुना अधिकच, त्याज्य आहे असेंही तुम्ही समजत असलां-तुम्हीं असें समजत असाल असें आम्हास वाटत नाहीं-तथापि पूर्वी दर्शविलेलीच अडचण फिरून पुढें येते. सध्याचे प्रसिद्धीस आलेले ४२ तुम्हास टाळतां आले म्हणजे झालां कां तुम्ही पवित्र ? ज्या इतर गृहस्थांशीं तुमचा व्यवहार होत आहे ते सर्व अशा संसर्गापासून अलिप्त आहेत असें तुमच्यानें म्हणवेल काय? तात्पर्य, कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी सुधारकांस बहिष्कृत करणें किंवा त्यांच्यापासून आपण स्वतः बहिष्कृत होणें, हें गिरिकंदराचा आश्रय केल्यावांचून सध्याच्या काळीं शक्य नाहीं, हें मनांत आणून धर्मरक्षणाची ही आरंभिलेली दिशा तुम्ही सोडून द्यावी हेंच तुम्हांस उचित आहे.

राज्यकर्त्यांनों !

लोभ मूलानि पापानि ।

हें वचन नित्य ध्यानांत ठेवा.

या पत्रांत वारंवार येणारी इंग्रज लोकांच्या गुणांची प्रशंसा आणि हिंदू लोकांच्या दुर्गुणांची निंदा पुनः पुनः वाचून कित्येक सुशिक्षित लोकांस असें वाटूं लागलें आहे कीं या पत्राचे चालक पक्के देशाभिमानशून्य असावे ! बापडे असतील कदाचित् ! स्वदोष गोपन आणि परदोषाविष्करण ज्याप्रमाणें व्यक्तीला त्याप्रमाणें व्यक्तिसमुदायालाही स्वभावतः फार प्रिय असतात ; आणि म्हणून जे कोणी आपली कुटुंबस्थिति; आपली राज्यव्यवस्था, व आपली धर्मपद्धति यांतील चुका न दाखवितां उलट त्यांवर पांघरूण घालण्याचा किंवा त्यांचें मंडन करण्याचा प्रयत्न करतात आणि परक्यांच्या गुणांचा बहुधा अपलाप करून त्यांच्या दोषांचें अतिशयोक्तीनें वर्णन करतात ते देशाभिमानी म्हणून सामान्य लोकांत ख्याति पावतात. अज्ञ व अविचारी लोकांची अशा प्रकारची तोंड-पूजा करून प्राप्त होणारा लौकिक हाच ज्यांचा अत्यानंद होऊन बसला असेल, व असलें नर्मसाचिव्य करणें यांतच खरा देशाभिमान आणि खरं देशहित आहे असें ज्यांस वाटूं लागलें असेल त्यांनीं तो धंदा खुशाल चालवावा. आम्हांस त्या धंद्याची आणि त्यापासून प्राप्त होणाऱ्या लौकिकाची चिलकुल पर्वा नाहीं. सत्यास जागृत राहून आपणांस जें बरें दिसेल तें बरें म्हणणें आणि वाईट दिसेल तें वाईट म्हणणें यांतच खरें हित, खरें कर्तव्य, व खरा देशाभिमान आहे अशी आमची पक्की समजूत होऊन गेली असल्यामुळें, इंग्लिश लोकांचे

गुण गाण्यांत ज्याप्रमाणें स्वदेशाभिमानास लाज आणणारी अशी गोष्ट आमच्या हातून घडते असें आह्मांस वाटत नाहीं, त्याप्रमाणें प्रसंग विशेषीं त्यांच्या हातून घडणारे प्रमाद उघडपणें बोलून दाखविणें यांतही आमच्याकडून कोणत्याही प्रकारचें अप्रशस्त आचरण होतें, अशी शंका आमच्या मनांत येत नाहीं. आजचा प्रसंग विचारी व माहीतगार हिंदू लोकाग्रणींनीं आमच्या राज्यकर्त्यांच्या हातून जी एक मोठी चूक कित्येक वर्षे घडत आहे व जिचे दुष्परिणाम आम्हांस अलीकडे फारच भोंवूं लागले आहेत ती संमानपूर्वक पण निर्भीडपणें बोलून दाखविण्याचा आहे. आम्हीं असें केल्यानें ते आपली ती चूक दूर करतीलच असें कोणालाही खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. तथापि तसें करणें हें आमचें कर्तव्य आहे इतकेंच नाहीं, तर आमच्या सुदैवानें आम्हां हिंदूंच्या राजनिष्ठ प्रार्थनांवरून ती चूक त्यांच्या मनांत भरली आणि वेळींच ती दुरुस्त करण्याची बुद्धि त्यांना झाली तर त्यापासून उभयतांचा मोठा फायदा होणार आहे. ते तसें न करतील तर त्यापासून पुढें काय परिणाम घडतील याबद्दल आजच वेडींवांकडीं अनुमानें करीत बसण्यांत जरी कांहीं अर्थ नाहीं, तरी प्रजेची दारुण दैन्यावस्था कोणत्याही राज्यकर्त्यांस केव्हां तरी विघातक झाल्यावांचून रहात नाहीं येवढें स्पष्टपणें बोलून दाखविण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

इंग्रज लोकांच्या राज्यापासून आमचा फायदा होत आहे, त्या फायद्याबद्दल त्यांनीं आह्मांपासून आपला फायदा करून घ्यावा, हें अगदीं न्याय्य आहे. पण आम्हांस त्यांच्या राज्यापासून होणाऱ्या फायद्यांत आणि त्यांना आमच्यापासून होणाऱ्या फायद्यांत कांहीं तरी प्रमाण असलें पाहिजे. प्रत्येक वर्षीं यांत जर जबरदस्त अंतर पडूं लागलें,

म्हणजे आमच्या फायद्यापेक्षां त्यांच्या फायद्याचेंच प्रमाण जोरीनें वाढूं लागलें तर थोड्या वर्षांत या व्यापारांत दिवाळें वाजण्याचा संभव नाहीं काय ? पुष्कळ इंग्लिश लोक ह्मणतात त्याप्रमाणें हिंदुस्थानची पादशाही ब्रिटिश राज्यवैभवाचा आदिस्थ स्तंभ असेल तर हा स्तंभ यत्किंचित् डळमळूं न देण्याबद्दल होईल तेवढी खबरदारी घेणें हें आम्हांहून त्यांसच अधिक हितकर नाहीं काय? पण अलीकडे त्यांचें जें वर्तन चालले आहे त्यावरून पहा तां ही गोष्ट अशा रीतीनें त्यांच्या मनांत वागत असल्याचें चिन्ह दिसत नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या नादी मनुष्यास उंच इमला बांधण्याची भेताळ हाव सुटाली, आणि त्यानें तळघरां-चा मगदूर न पहातां मजल्यावर मजला चढवीत न्याला त्याप्रमाणें कांहीं अंशीं आपल्या राजकर्त्यांची सांप्रत स्थिति झाली आहे. इंग्लिश लोकांनीं आपल्या बहादुरीनें आणि आमच्या कमकुवतपणानें हिंदुस्थानचें राज्य आपलेसें केलें. आ-मच्यांतील आपसांत तंटयामुळें आणि त्यांच्या धूर्तपणामुळें तें दृढ झालें. त्यांचें राज्यकौशल्य आणि आमची राजनिष्ठा यांमुळें तें अव्याहत चालत आहे. पण जर कधीं काळीं त्यांचा लोभ अमर्याद झाला आणि आमचें दारिद्र्य असह्य झालें तर ही त्यांनीं इतक्या कष्टानें रचिलेली इमारत ढासळल्यावांचून रहाणार नाहीं हें त्यांच्या हितचिंतकांस व त्यांच्या राज्यवैभ-वाचें चिरस्थायित्व चिंतणाऱ्यांसही कबूल असलें पाहिजे !

हिंदुस्थानच्या राजव्यवस्थेंतलि मुख्य दोष उधळेपणा हा आहे. हा दोष वर वर पहाणारास फार भयंकर दिसत नाहीं; पण या एकट्या दोषामुळें प्रजेंत जितका असंतोष उत्पन्न होतो तितका दुसऱ्या कोणत्याही दोषामुळें होत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. या राज्याची अशी व्यवस्था होईल असें भविष्य पूर्वीच एका मोठ्या तत्ववेत्त्यानें करून ठेविलें होतें.

गुण गाण्यांत ज्याप्रमाणें स्वदेशाभिमानास लाज आणणारी अशी गोष्ट आमच्या हातून घडते असें आह्मांस वाटत नाहीं, त्याप्रमा[illegible] प्रसंग विशेषीं त्यांच्या हातून घडणारे प्रमाद उघडपणें बोलून दाखविणें यांतही आमच्याकडून कोणत्याही प्रकारचें अप्रशस्त आचरण होतें, अशी शंका आमच्या मनांत येत नाहीं. आजचा प्रसंग विचारी व माहीतगार हिंदू लोकाग्रणींनीं आमच्या राज्यकर्त्यांच्या हातून जी एक मोठी चूक किंत्येक वर्षें घडत आहे व जिचे दुष्परिणाम आम्हांस अलीकडे फारच भोंवूं लागले आहेत ती संमानपूर्वक पण निर्भीडपणें बोलून दाखविण्याचा आहे. आम्हीं असें केल्यानें ते आपली ती चूक दूर करतीलच असें कोणालाही खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. तथापि तसें करणें हें आमचें कर्तव्य आहे इतकेंच नाहीं, तर आमच्या सुदैवानें आम्हां हिंदूच्या राजनिष्ठ प्रार्थनांवरून ती चूक त्यांच्या मनांत भरली आणि वेळींच ती दुरुस्त करण्याची बुद्धि त्यांना झाली तर त्यापासून उभयतांचा मोठा फायदा होणार आहे. ते तसें न करतील तर त्यापासून पुढें काय परिणाम घडतील याबद्दल आजच वेडींवांकडीं अनुमानें करीत बसण्यांत जरी कांहीं अर्थ नाहीं, तरी प्रजेची दारुण दैन्यावस्था कोणत्याही राज्यकर्त्यांस केव्हां तरी विघातक झाल्यावांचून रहात नाहीं येवढें स्पष्टपणें बोलून दाखविण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

इंग्रज लोकांच्या राज्यापासून आमचा फायदा होत आहे, त्या फायद्याबद्दल त्यांनीं आह्मांपासून आपला फायदा करून घ्यावा, हें अगदीं न्याय्य आहे. पण आम्हांस त्यांच्या राज्यापासून होणाऱ्या फायद्यांत आणि त्यांना आमच्यापासून होणाऱ्या फायद्यांत कांहीं तरी प्रमाण असलें पाहिजे. प्रत्येक वर्षीं यांत जर जबरदस्त अंतर पडूं लागलें,

सत्तावन्नच्या बंडानंतर नामदार कंपनीकडून हिंदुस्थानचा अंमल काढून घेऊन त्यांची सूत्रे खुद्द राणीसाहेबांच्या हातांत द्यावयाची ठरलीं त्याच वेळीं **जॉन स्टुअर्ट मिल्ल** यानें आपल्या कडून होईल तितक्या स्पष्ट रीतीनें इंग्लिश लोकांस असें सिद्ध करून दाखविलें कीं, हें अधिकारांतर ब्रिटिश पार्लमेंटास परिणामी अत्यंत त्रासदायक होणार आहे मिल्लचें असें म्हणणें होतें कीं, कंपनीच्या हातून कांहीं चूक घडली तर तिच्या-बद्दल कंपनीस जबाबदार धरणें शक्य आहे. पण हिंदुस्थानचा राज्यकारभार खुद्द राणीच्या हातांत गेला म्हणजे त्यांत घड-णाऱ्या प्रमादांबद्दल कोण कोणास जबाबदार धरणार ? कोणी नाहीं; आणि मिल्लचें हें भविष्य अक्षरशः खरें होऊं लागलें आहे. पूर्वी क्लाइव्ह, वारेनहेस्टिंग्स वगैरे प्रख्यात लोकांची पार्लमेंटपुढें चौकशी झाली; कारण कंपनीच्या अमलांत जुलूम घडे त्याबद्दल ब्रिटिश सरकाराकडे ओरड नेहमीं येत असे; पण आतां जो जुलूम होतो तो खुद्द ब्रिटिश सरकाराकडून किंवा त्या सरकारच्या प्रतिनिधींकडून होत असल्यामुळें दाद मागण्यास जागाच राहिली नाहीं. कंपनीच्या गव्हर्नर-जनरलांनीं अफगाणिस्थानचीं किंवा ब्रह्मदेशाची लढाई केली असती तर एकोणिसाव्या शतकांतल्या एखाद्या **बर्क**ानें त्या लढाई करणाराचे ब्रिटिशपार्लमेंटापुढें हाल हाल केले असते. पण या लढाया खुद्द ब्रिटिश सरकारच्या संमतीनें झाल्या असल्यामुळें **लिटन्** व **डफरिन्** यांची चौकशी व्हावयाची नाहीं एकीकडेच राहून ते आणि त्यांचे प्रिय सुहृद् मोठ्या मानमान्यतेप्रत पावले ! यावर कोणी अशा प्रश्न करील कीं, खुद्द ब्रिटन्चा राज्यकारभार ब्रिटिश सरकार चिनबोभाट कसा करतें ? आणि हिंदुस्थानच्या कारभारांतच त्याचेकडून इतके दोष कसे घडतात ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, वास्तविक

पहातां ब्रिटिशसरकार हिंदुस्थानचा राज्यकारभार पहात नाहीं. जे अधिकारी ब्रिटिश कारभार पहातात ते आपल्या वेळाचा व लक्षाचा एकदृशांश हिंदुस्थानच्या राज्यकारभाराकडे देतील तर त्यांतले नऊदृशांश दोष नऊदहा वर्षांच्या आंत नाहींसे होतील ! पण तसें करण्याची त्या अधिकाऱ्यांस व ब्रिटिश पार्लमेंटास सवड नाहीं किंवा इच्छा नाहीं. ब्रिटिश प्रवर्तक अधिकारी आणि ब्रिटिश पार्लमेंट यांनीं हिंदुस्थानचा कारभार फक्त नांवानें आपल्या हातांत घेतला आहे. पण वास्तविक पहातां तो सेक्रेटरी ऑफ स्टेट आणि त्यांचें कौन्सिल व व्हॉइसरॉय आणि त्याचें कौन्सिल यांच्या हातांत आहे. या दोन कौन्सिलाचे बहुतेक सभासद हिंदुस्थानांतच लहानाचे थोर झालेले अंमलदार असतात.जो पक्ष अधिकारावर असेल त्याच्याकडून सेक्रेटरी ऑफ स्टेटची आणि बहुधा व्हॉइसरायाची नेमणूक होते. हे दोघे बडे अधिकारी आणि त्यांच्या कौन्सिलांतील सदस्य हे आमचे खरे राज्यकर्ते होत यापुढें काय होईल हें सांगवत नाहीं; पण आजपर्यंत या अधिकाऱ्यांकडून व कौन्सिलांकडून देशाचा अनियंत्रित कारभार होत आहे असें म्हणण्यांशिवाय प्रत्यवाय नाहीं या अनियंत्रितपणाचा परिणाम काय झाला आहे तो पहा. ज्या लढाया करण्याची मुळीं खातीं काढण्याची बिलकूल गरज नव्हती त्या लढाया व नीं खातीं उपस्थित करून या अधिकाऱ्यांनीं आणि कौन्सिलांनीं आमचा जीव आम्हांस नकोसा करून टाकला असतां, आमच्या स्थितिकडे कोणी लक्ष देत नाहीं; आमचे

संगीत सुविचार-विजय नाटक.
श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.
किं. ०८
सुधारक ऑफीस, पुणें.

ज्यांज्या पायीं आह्मांस अन्नान्नदशा आली आहे त्यांच्या चैनीस थोडासा चट्टा चसूं लागतांच त्यांनीं सर्व ब्रह्मांडभर एकच आकांत करून सोडल्यामुळें इलाख्याचें गव्हर्नर्स, व्हॉइस-रॉय, सेक्रेटरी ऑफ् स्टेट, प्रधानमंडळी, आणि पार्लमेंटचे अनेक सभासद यांचा जीव या आपल्या देशबांधवांच्या असह्य आरडी-मुळें कासाविस होऊन त्यांकरता काय करावें आणि काय न करावें, असें त्यांस होऊन गेलें आहे ! जॉन स्टुअर्ट मिल्लनें दुसऱ्या एका स्थळीं हिंदुस्थानाविषयीं लिहीत असतां, हिंदु-स्थानांतील ब्रिटिश अंमलदार अशा प्रकारच्या चळवळींनीं दशादिशा दणाणून सोडून आपलें हित साधून घेतील, व तसें करण्यांत हिंदु लोकांचें कितीही नुकसान झालें तरी त्यांत कोणी मन घालणार नाहीं, असेंही भाकीत करून ठेविलें आहे. रूपयाचा भाव उतरला असल्यामुळें या देशांतील इंग्लिश लष्करी आणि मुलकी अंमलदारानें जें थोडेंबहूत नुकसान होत आहे तें भरून काढण्यासाठीं त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांचा पगार वाढविण्यांत आला किंवा अमुक भावानें त्यांचे रुपये सरकारी खर्चानें इंग्लंडास पोंचते करावयाचे असें ठरलें, आणि त्याकरता आम्हांवर एखादा नवीन कर बसविण्यांत आला अथवा प्राप्तीवरचा किंवा मिठावरचा कर वाढविण्यांत आला तर यासंबंधानें मिल्लसाहेबानें करून ठेवलेलें भाकीत अक्षरशः खरें झालें असें ह्मणावें लागणार नाहीं काय ? पण अशा प्रकारचीं भाकितें खरीं होण्यांत आमचा तर कोणत्याही प्रकारचा फायदा नाहींच नाहीं; पण इंग्लिश लोकांचाही एकंदरींत फायदा नाहीं असें आह्मांस वाटतें. तें कसें हें दोन तीन निबंधांत सिद्ध करून दाखविण्याचा आमचा विचार आहे, आणि त्या स्वल्प निबं-धावलीची प्रस्तावना आजच्या ह्या अल्प लेखानें केली आहे. पुढल्या अंकांत इंग्लिश अधिकाऱ्यांनीं पगाराच्या बढतीकरतां

"चालविलेल्या प्रचंड आरडघाचें स्वरूप सांगून त्यांवर ओढव-लेलें संकट दूर करण्यास्तव कोणते उपाय करावे याचें स्थला-वकाशाप्रमाणें विवेचन करण्यांत येईल !

अतितृष्णा न कर्तव्या चक्रं भ्रमति मस्तके.

रुप्याचा भाव अतिशय उतरला असल्यासुळें ज्या साहेब लोकांस आपला बहुतेक पगार विलायतेस पाठवावा लागतो त्यांचें मोठें नुकसान होत असेल व त्या नुकसानामुळें त्यांना मोठा त्रास पडत असेल याविषयीं आह्मांस शंका नाहीं. आ-मच्या पगाराच्या मानानें साहेब लोकांचे पगार मोठे आहेत खरे; पग त्याच मानानें त्याचे खर्चही मोठे आहेत. आह्मांस ऐष आराम भोगण्याची जात्या सवय नाहीं. चांगलें खाणें, चांगलें पिणें, चांगलें रहाणें, चांगले वापरणें- याविषयीं आमच्या ज्या कल्पना आहेत त्यांत आणि युरोपियन लोकांच्या कल्पनांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. शरीरास अवश्य लागणाऱ्या वस्तूंपलीकडे अधिक वस्तूंची खरेदी करणारे आणि त्याचा उप-भोग करून घेणारे लोक या देशांत फार थोडे आहेत. निर्वा-हानंतर जी शिल्लक उरेल ती दागिन्यांत गुंतवून टाकण्याची आमची सामान्य प्रवृत्ति आहे. जो तो आपल्या सामर्थ्याप्रमाणें

प्लॉट्स झाड्यानें देणें आहेत-फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर-हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर—सुधारक पुणें.

प्रतिवर्षी थोडेंबहुत सोनें घेण्याचा खटपटींत असतो ! रुप्याचा भाव उतरण्यास जीं कारणें झालीं आहेत त्यांत रुपें देऊन सोनें घेण्याचा आमचा हव्यास हें एक बरेंच बलवत्तर कारण आहे. इतकें करून आम्ही प्रतिवर्षी सोन्याची फार मोठी खरेदी करतों असेंही नाहीं. आम्ही दागिन्यांच्या रूपानें सोनें वापरणारे लोक असून आमच्या देशांत दर इसमामागें प्रतिवर्षी जितकें सोनें खरेदी केलें जातें त्याहून अधिक सोनें इंग्लंड देशांत खरेदी केलें जातें, असें मि. दादाभाई नवरोजी यानीं कोठेंसें सिद्ध करून दाखविलें आहे. तथापि आमच्या प्राप्तीच्या मानानें सुवर्णक्रयांत आम्ही फाजील पैसा घालून बसतों हें निर्विवाद आहे. ही सोनें घेण्याची चटक आम्हांस नसती, आणि नानाप्रकारच्या उपभोग्य वस्तु विलायतेहून आणविण्याची अवश्यकता आम्हांस वाटती, म्हणजे आम्हीही सरकारच्या इंग्रजी नोकरांप्रमाणें या उतारास लागलेल्या रुप्याच्या भावामुळें गांगरून जाऊन त्यांसारखे गयावया करूं लागलों असतों. आज ज्यां रुपयाचद्दल आपणांस येथें आठ शेर तांदूळ मिळतात त्याच रुपयाचद्दल उद्या ते पांच किंवा चार शेर मिळूं लागले तर आमची काय स्थिति होईल बरें ? ज्याप्रमाणें आठ शेरांच्या जागीं पाचच शेर धान्य मिळणें हें मोठें संकट आहे त्याप्रमाणेंच पांचशेंच्या ऐवजीं साडेसातशें किंवा सातशेंच्या ऐवजीं हजार रुपये इंग्लंडास पाठवावे लागणें हेंही मोठें संकट आहे. समजा कीं, एका इंग्रजी हापिसराला तेराशें रुपये पगार आहे, व तो त्यापैकीं सातशें रुपये आपल्या मुलांसाठीं, मातापितरांसाठीं इंग्लंडास धाडून बाकीच्या सहाशेंत आपला येथला प्रपंच भागवितो. अशा मनुष्यास सातशेंच्या ऐवजीं हजार रुपये जर इंग्लंडास पाठवावे लागले, आणि येथल्या खर्चास फक्त तीनशेंच रुपये उरूं लागले तर पराकाष्ठचा त्रास पडणार नाहीं काय ! सहाशेंचा

खर्च तीनशेंवर आणून ठेवणें फार कठिण आहे. पण आम्हां कंगाल लोकांस साहेब लोकांची ही दैना नीट कळणार नाहीं व खरी वाटणार नाहीं. आम्ही असें म्हणणार कीं, एका मनुष्याला दरमहिना सहाशें रुपये हवेत कशाला ? गाडीला दोन घोडे न जुंपतां एक जुंपला म्हणून काय झालें ? दोघांनीं एका बंगल्यांत राहिलें म्हणून काय झालें ? दहा नोकर न ठेवतां पांचच ठेवले म्हणून काय झालें ? साऱ्या विलायती वस्तू न घेतां कांहीं हिंदुस्थानच्या घेतल्या म्हणून काय झालें? या नेटिवशाही कार्पण्यांत आम्हांस बिलकुल अर्थ दिसत नाहीं. आमच्या येथल्या उत्तम खाणावळींतल्या उत्तमोत्तम जेवणास महिना दहा किंवा पंधरा रुपये पडत असतील; साहेबी हॉटेलांत तशा प्रकारच्या जेवणास दीडशें किंवा दोनशें रुपये पडतात। एके दिवशीं एका साहेबाला येथील एका हॉटेलांत एक वेळ जेऊं घातल्याबद्दल आमच्या एका स्नेह्यासें पांच रुपये द्यावे लागले, हें आम्हीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. तात्पर्य, ज्यांचा आहार, चैतन्य, व कर्तृत्व हीं सारींच क्षुद्र आहेत त्यांनीं पुष्कळ खाणाऱ्या, फार जगणाऱ्या, व प्रचंड मेहनत करणाऱ्या लोकांशीं आपली तुलना करणें आणि आपल्या मितव्ययाची त्यांचे पुढें शिफारस करणें हें शुद्ध वेडेपण होय ! भिमथडीच्या तट्टानें आरबी घोड्याबरोबर कदम टाकण्याची उमेद कशाला धरावी ? घोंडा तो घोडा आणि तट्टू तें तट्टू. आम्हांस या रुप्याच्या खालावलेल्या

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ⁄१० पौंड.

मोरोक्को कॉफी ⁄१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

भावामुळें पगारी साहेब लोकांचें जें अतोनात नुकसान होत आहे त्याबद्दल खरोखरी दुःख होतें, आणि त्यांचें तें नुकसान न होऊं देण्यासाठीं कांहीं तरी योग्य उपाय योजणें जरूर आहे असें वाटतें. रुप्याच्या या पडल्या भावानें त्यांना केवढया मेटाकुटीस आणिलें आहे याची तुह्मांस कल्पनाच नाहीं. कित्येकांना या अडचणीमुळें आगबोटींत व आगगाडींत पहिल्या वर्गाच्या ऐवजी दुसऱ्या वर्गानें प्रवास करणें जरूर पडूं लागलें आहे; कित्येकांना जे घोडे गाडीला लावायाचे तेच बसावयास घेण्याची पाळी आली आहे; कित्येकांची दोन दोन वर्षांची रजा तुंबली असून पैशाच्या टंचाईमुळें ती घेतां येईनासें झालें आहे; कित्येकांच्या बायका प्रसूत होण्यास इंग्लंडास गेल्या ह्मणजे तीन तीन चार चार वर्षें परत येऊं शकत नाहींत; कांहींचीं अपत्यें लहानांचीं थोर झालीं तरी त्यांची भेट घेण्याची संधी मिळत नाहीं; एका लष्करी अधिकाऱ्यानें अकरा वर्षांपूर्वी विलायतेस पाठविलेलें तान्हें मूल आज मित्तीस अकरा वर्षांचा शाळेंत जाणारा सुरेख मुलगा झाला आहे. पण त्याच्या हतभाग्य बापास अद्यापि पुत्रमुखावलोकनानंद प्राप्त झाला नाहीं. सारांश, या नादान रुप्यानें बायकोची नवऱ्यापासून, भावांची बहिणीपासून, व मुलांची मातापितरांपासून ताडातोड चालविली आहे इतकेंच नाहीं तर त्यांच्या खाण्यापिण्याचे, त्यांच्या रहाण्यासवरण्याचे, त्यांच्या वस्त्रप्रावरणाचे, त्यांच्या शिकण्यासरण्याचे, त्यांच्या येण्याजाण्याचे, आणि त्यांच्या ऐषआरामाचे असह्य हाल मांडिले आहेत! त्यांतून या दुर्दैवी लोकांची सुटका झाली पाहिजे असें आम्ही मनापासून चिंतितों; पण ती कशी व्हावी यासंबंधानें आमची अक्कल अगदीं गुंग होऊन गेली आहे!

थोड्या वर्षांपूर्वी दोन शिलिंग ह्मणजे एक रुपया आणि दहा

रुपये ह्मणजे एक पौंड असें आमचें कोष्टक असे, व याच कोष्टकाबरहुकूम इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या दरम्यान देणें घेणें होत असे. पण ही स्थिति अलीकडे अगदीं फिरून गेली आहे. अंकगणितांतील छापील उदाहरणें व कोष्टकें जरी अद्यापि कायम आहेत, तरी प्रत्यक्ष व्यवहार त्यांहून अगदीं निराळा झाला आहे. ज्या इंग्रजी वस्तूबद्दल पूर्वी आह्मांस दहा रुपये द्यावे लागत, तीबद्दल आतां पंधरा, सोळा, किंवा, सतरा रुपये द्यावे लागतात; व कदाचित् पुढें मागें अठरा अथवा वीस देखील देण्याचा प्रसंग येतो कीं काय अशी भीति पडली आहे. रुपयाला खरोखरीच अशी अवदशा आली आणि ती कायम झाली, व सरकारच्या पदरीं असलेल्या इंग्रजी नोकरांच्या पगारांत कांहीं फेरबदल केला नाहीं, तर त्यांचे पगार तिसऱ्या हिश्शानें किंवा अर्ध्यानें कमी केल्यासारखें होणार आहे. कोणत्याही नोकराच्या पगाराची अशी दशा झाल्यास तो अधिक पगार मागितल्यावांचून राहणार नाहीं. तो तसें न करील तर आपल्या पगारांतील सूट भरून काढण्याचे अन्य उपाय करील किंवा अजीबात नोकरी सोडून देईल. प्राप्ति कमी झाली ह्मणून खर्च कमी करून प्रामाणिकपणांत संतोष मानून रहाणारे फार थोडे लोक असतात. इंग्रजी, लष्करी व मुलकी नोकरांच्या पगारास जो चट्टा बसूं लागला आहे तो बसूं न देण्याचा कांहीं विचार न झाल्यास ते लोक लांच घेऊं लागतील, चांगले नोकऱ्यांचा राजीनामा देतील, वाईट लोकांची त्यांच्या जागीं भरती करावी लागेल, व असें झाल्यास साऱ्या पादशाहीस मोठा धक्का बसेल,

---

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ८८

सुधारक ऑफीस, पुणें.

असें जें त्यांच्या कैवाऱ्यांचें म्हणणें आहे त्यांत कांहीं सत्य नाहीं, असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार न केला तरी तो दुसऱ्या दृष्टीनें म्हणजे व्यापाराच्या दृष्टीनें केलाच पाहिजे. नाणें हें देवघेवीचें आद्य साधन होय. तेव्हां त्याची किंमत स्थिर असणें फार अगत्याचें आहे. त्यांत जर वारंवार मोठी चलबिचल होऊं लागली तर व्यापारास मंदी आल्यावांचून रहाणार नाहीं. पण नाण्याच्या भावांत ही चलबिचल होते कशी आणि ती बंद करावी कशी हें कोणासही अद्यापि नीटसें समजलेलें नाहीं. या देशांत रुप्याचें सोन्याशीं प्रमाण स्थिर राखण्यासाठीं जे उपाय सुचावण्यांत आले आहेत, त्यांत मुख्य तीन आहेत; पहिला, रुप्याचें नाणें बानाचेतानें पाडावें; दुसरा, कायदेशीर रुप्याचें सोन्याशीं ठरीव प्रमाण करावें म्हणजे रुप्याचें एकूक तोळे म्हणजे सोन्याचा एक तोळा असें सरकारानें करावें; तिसरा, हिंदुस्थानांत रुप्याच्या ऐवजीं सोन्याचें नाणें करावें. यांपैकीं पहिला उपाय हिंदुस्थानांत तावडतोब अमलांत आणावा, म्हणजे रुप्याचा भाव वाढेल व युरोपिअन नोकरांची तक्रार दूर होईल असा कित्येकांचा अभिप्राय आहे. दुसरे असें म्हणतात कीं हा किंवा वर सांगितल्यापैकीं दुसरा कोणताही उपाय केला, तरी त्यापासून फायदा होतां उलट आतांहून अधिक नुकसान होणार आहे. इंग्लंडांतील अधिकारारूढ सांप्रतचें लिबरल प्रधानमंडळ सोन्याच्या नाण्याशिवाय दुसरें नाणें इंग्लंडात चालू करण्यास तयार नाहीं. फ्रेंचांतील व अमेरिकेंतील मोठमोठे अर्थशास्त्रवेत्ते थोड्या दिवसांपूर्वी ब्रुसेल्स येथें जमले होते. त्यांनीं या प्रश्नाचा बहुत खल केला, पण सर्वानुमतें कोणता ही ठराव पसंत झाला नाहीं. तथापि त्यांनीं केलेल्या वादावरून तेथें जममेल्या बहुत अर्थ-

शास्त्रधांस व मंच्यास सोनें आणि रुपें, या दोन्ही धातूंचा नाण्याच्या कामाकडे एकसमयावच्छेदेंकरून उपयोग करावा, हें मत विशेष ग्राह्य पडलें असें दिसतें. पण या शास्त्रज्ञांच्या मताचा व्यवहारांत प्रयोग करून कोण पहाणार ? इंग्लडांत सोन्याचें नाणें चालू आहे व त्याबरोबर रुप्याचें चालू करण्यास लिबरल पक्षाग्रणी ग्लॅडस्टनसाहेब प्रतिकूल आहेत. जर्मनीचाही कांहीं अंशीं असाच हट्ट आहे. या दोघां बलाढ्य व कांचनमय देशांनीं असा आग्रह धरला असल्यामुळें बाकीच्या देशांस काय करावें हें सुचेनासें झालें आहे. युरोपांतील मातबर व प्रमुख देशांनीं सोन्याच्या वतीनें असा आग्रह धरल्यास आम्हीही आपल्या राज्यांत रुप्याचें नाणें मोडून सोन्याचें नाणें प्रचलित करूं, अशी अमेरिकेंतलि स्वतंत्र संस्थानच्या सरकारानें धमकी देण्याचा उपक्रम केला आहे. आम्ही तर बोलून चालून सर्वांच्या पराधीन; तेव्हां आमचें म्हणणें कांहीं असलें तरी त्याकडे कोणीं लक्ष देणार नाहीं हे स्वाभाविकच आहे. पुढें मागें हें कोडें सुटल्याशिवांचून रहाणार नाहीं, हें खरें आहे. पण आज काय करावें—निदान ज्यांचा रुपेरी पगार इंग्लंडांत गेला असतां अगदीं हिणकस ठरतो त्यांच्या विपत्तिनिवारणासाठीं काय करावें हा मोठा गूढ प्रश्न आहे; आणि त्यावर कित्येकांचें असें उत्तर आहे कीं, हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करणें, रुप्याचें सोन्यांशीं प्रमाण ठरविणें, किंवा रुप्याचें नाणें बेतानें

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाव्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

पाडणें यापैकीं कोणतीही गोष्ट आजच होऊं शकत नसेल तर एका रुपयाची किंमत एक शिलिंग व दोन किंवा अडीच पेन्स या दरानें हिशेच करून इंग्रजी नोकरांचीं पेनशनें द्यावीं. व त्याच भावानें त्यांचे पगार विलायतेस पाठविण्याचा पतकर हिंदुस्थानसरकारानें व सेक्रेटरी ऑफ् स्टेटनें द्यावा. या मतास पुष्कळांची संमति आहे, व बहुधा तें अमलांत येईल. आह्मांवर नवा कर न बसवतां ही अडचण तूर्त या रीतीनें दूर करतां येत असेल तर तसें करण्यास आमची फारशी हरकत नाहीं; पण तसें करतां येईल किंवा नाहीं हें अत्यंत शंकास्पद आहे,

---

शेळी जाते जिवानिशीं खाणार म्हणतो वातड !

रुप्याचा भाव उतरल्यामुळें अँग्लोइंडिअन नोकरांचें होत असलेलें नुकसान, आणि तें न होऊं देण्याबद्दल कांहीं तरी उपाय करण्याची अवश्यकता या दोहोंच्या संबंधानें गेल्या दोन अंकांत जें लिहिणें उचित वाटलें तें लिहिण्यांत आलें आहे, व त्यांत असाही ध्वनि केला आहे कीं, आम्हावर एखादा नवीन कर न बसवितां,या नोकरांचें नुकसान भरून काढण्याची कांहीं युक्ति निघत असेल तर ती काढण्यास आमची हरकत नाहीं; पण अँग्लोइंडिअन अधिकाऱ्यांच्या आणि त्यांच्या कैवाऱ्यांच्या भाषणांत जे उद्गार वारंवार येतात त्यांवरून असें दिसतें कीं, आमचें कांहीं झालें तरी बेहेत्तर आहे, कसें तरी करून आपला पगार दोन शिलिंगांप्रमाणें आपल्या पदरांत पडावा, असा

त्यांचा आग्रह आहे. आमच्या मतें हा त्यांचा आग्रह अत्यंत स्वार्थी व अप्रशस्त आहे. आणि म्हणून त्यांचा निषेध करण्यां- विषयीं आम्हीं आपली पराकाष्टा केली पाहिजे.

ब्रिटिश लोकांच्या दृष्टीनें पहातां ज्यांच्या शिरावर हिंदुस्था- नच्या राज्याची जबाबदारी आहे त्यांना संतुष्ट राखणें अत्यंत अवश्य आहे, हें आम्ही कबूल करतों. पण हा त्यांचा संतोष राखण्यासाठीं कराच्या चरकांत आम्हांस पुनः पुनः पिळण्यापा- सून त्यांचा फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. रुप्याचा भाव उतरण्यास कोणत्याही प्रकारें आमचें वर्तन कारण झालेलें नाहीं. तेव्हां त्याबद्दल आम्हास दंड कशासाठीं ? अवर्षण, टो- ळधाड, रोगांची सांथ अशा प्रकारच्या कोणत्याहि दैविक अ- आरिष्टामुळें ज्या वेळेस आमचें अतोनात नुकसान होतें त्या वे- ळेस जर आम्ही तें निमुटपणें सहन करतों व त्याबद्दल सरका- रास त्रास देत नाहीं, तर यामुळें या हतभाग्य देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत कंगालतेवांचून दुसरें कांहीं दृष्टी- स पडत नाहीं. जिज्ञासेखातर किंवा चैनीखातर हिंदुस्थानांत चारदोन महिने प्रवास करून जाणारे लोक त्याच्या बाह्य स्व- रूपाला भुलून जाऊन, हिंदुस्थानचे लोक इंग्रजी अमलामुळें प्रत्येक दृष्टीनें सुखी होत चालले आहेत असा आपला मह क- रून घेतात, आणि आपापल्या देशास परत गेल्यावर त्या महा- प्रमाणें लिहीत व बोलत सुटतात; पण त्यांना हिंदुस्थानच्या अंत: स्थितीचें खरें स्वरूप बिलकुल समजलेलें नसतें. मुंबईची संपत्ति वस्ती, व उद्योगधंदा; सर्व देशभर पसरलेले आगगाड्यांचे व

लेखकांस योग्य मोबदला देऊन आम्हीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर,-सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

साधे रस्ते, तारायंत्रें व पोष्ट हापिसें; मुख्य मुख्य ठिकाणीं लष्करी फौजेचा थाट; राजेरजवाडयांच्या मुलाखती आणि संस्थानिकांच्या वाडयांत दृष्टीस पडणारी संपत्ति; शाळा, कॉलेजें व वर्तमानपत्रें; सुशिक्षित व अशिक्षित लोकांची संतोषवृत्ति व राजभक्ति; विशेष निमित्ताभुळें वरिष्ठ जातींतिल हिंदुस्त्रिया व पुरुष बाहेर पडतात तेव्हां त्यांच्या अंगावर दृष्टीस पडणारे अलंकार व मौल्यवान वस्त्रें, पिकाच्या हंगामांत जिकडे तिकडे नजरेंत भरणारी धान्याची समृद्धि-इत्यादि बाह्यांगाच्या प्रेक्षणानें आम्ही सुखी असलो पाहिजे असें थोडे दिवस फिरत राहणाऱ्या परक्या प्रवाशास वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे. पण सारी वरकांती शोभा आहे; देशाच्या शरीराचा अंतर्भाग कीड लागलेल्या झाडाच्या सोंटाप्रमाणें आंतून अगदीं पोकळ होऊन गेला आहे. हें त्या विचाऱ्यांस कोठून समजणार ? जो बहुधा चैनीखातर येथें येतो आणि तीं यथेच्छ भोगून निघून जातो त्याला या देशाची खरी स्थिती कळावी कशी ? हत्तीवर बसून एखाद्या संस्थानिकाच्या परिवारासह शिकारीला जाणें; आगगाडीच्या पहिल्या क्लासानें मुंबईहून मद्रासची व मद्रासेहून कलकत्त्याची दौड करणें; सरकारी बंगल्यांत किंवा खासगी मित्रांच्या घरीं नाचनाचणें; क्लबांत व इतर ठिकाणीं खेळ खेळणें आणि पाहुणचार घेणें, महाबळेश्वर, नीलगिरी, विजापुर, आग्रा, जोधपूर, अजमीर अशा ठिकाणची हवा, इमारती, किंवा शोभा पहाण्यास जाणें; बहुधा अधिकारी स्वजातीयांच्या समागमावांचून इतरांचा समागम न करणें; काळ्याबेऱ्या नेटिवांच्या स्पर्शानें एखादा रोग येईल कीं काय, अशा भीतीनें त्यांचा होईल तितका संसर्ग टाळणें—अशा रीतीनें हिंदू लोकांच्या खऱ्या स्थितीविषयीं माहिती मिळण्याचा संभव नाहीं. पण शेंकडा नव्याण्णव युरोपिअन प्रवाशी याच रीतीनें हिंदुस्थानाविषयीं माहितगार होऊन स्वदेशास परत जातात, आणि अशा रीतीनें संपादिले-

ल्या माहितीचा ब्रिटिश राज्याचे पवाडे गाण्यांत उपयोग करतात ! पण या त्यांच्या एकदेशीपणाचा अलीकडे फारच वाईट परिणाम होऊं लागला आहे. बरेच इंग्रज लोक आमची खरी स्थिती कशी आहे हें जाण्याची इच्छा करीत नाहींत व कोणी तद्देशीय किंवा एतद्देशीय गृहस्थ ती त्यास समजावून देऊं लागला तर त्यावरच त्यांची इतराजी होते ! सारेच अशा तऱ्हेचे असते तर आम्ही या घटकेस त्यांची प्रजा असतों किंवा नाहीं याचा संशय आहे. तथापि लॉर्ड लिटन साहेबांसारखे पांच सात गव्हर्नर्स जनरल एकापाठीमागून एक येथें येतील, अफगाणिस्थान, ब्रह्मदेश वगैरे देशांत केलेल्या लढायांप्रमाणें आणखी पांच चार लढाया उकरून काढल्या जातील, काश्मिरिच्या महाराजांप्रमाणें दहा पांच महाराजांशीं धरमोडीचें वर्तन करण्यांत येईल, अठराशें पंचाहत्तर शहात्तर सालच्या दुष्काळासारखें एक दोन दुष्काळ पडून लाखों लोक प्राणास मुकतील व अशा दिवसांत राणीस मोठमोठें किताब देण्यासाठीं दिल्लीदरबारासारखे समारंभ करण्यांत येतील, दुष्काळाकरतां जमविलेला पैसा लष्करी खात्याकडे खर्ची घालून याच्या कधीं न भरणाऱ्या गर्तेत लोकशिक्षणासारख्या उपयुक्त खात्यांतून ओरबाडून घेतलेला पैसा ओतण्यांत येईल, व रुप्याचा भाव उतरला आहे, म्हणून माल्टा येथील आरमार वाढविलें पाहिजे म्हणून, मिसरदेशाला किंवा युगांडयाला फौज पाठविणें जरूर आहे म्हणून—किंवा अशाच दुसऱ्या एखाद्या शुष्क कारणास्तव आमच्या खऱ्या स्थितीकडे न पाहतां प्रार्तीवरचा व मिठावरचा

निबंधसंग्रह.

भाग १ ला. किं. १। ६.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

४४

कर वाढविण्यांत येईल आणि नवीन कर बसाविले जातील; तर अँग्लो-इंडियन नोकरांच्या असंतोषामुळें पादशाहीस जेवढा अपाय घडणार आहे त्याहून अधिक मोठा अपाय अन्नास मोताद झालेल्था हिंदू प्रजेच्या असंतोषामुळें घडेल असें आह्मास वाटतें!

जावई पाहुणा आला ह्मणून टोणगा पान्हवेल काय?

इंग्रजी अमलापासून आमचें कल्याण होत आहें; इंग्रजी फौज, इंग्रजी आरमार, इंग्रजी मुलकी अधिकारी, इंग्रजी विद्या व इंग्रजी शिल्पकला या साऱ्या गोष्टी आह्मांस पाहिजे आहेत; आणि रुप्याचा भाव उतरल्यामुळें इंग्रजी नोकरांचें जें नुकसान होत आहे तें होऊं नये हें सारें खरें आहे. पण या सर्व गोष्टी आमच्या कर देण्याच्या सामर्थ्यावर अवलंबून असल्यामुळें आंमच्या अंगांत तें कितपत आहे याचा विचार अगोदर केला पाहिजे. आम्ही सध्या जे कर देत आहों त्यामुळेंच आमचे प्राण डोळ्यांत आले आहेत! असें असतां या युरोपियन अंमलदारांच्या पगारांची दोन शिलिंगाप्रमाणें भरपाई करण्यासाठीं दोन तीन कोटी रुपये उभे करण्याच्या हेतूनें आणखी एखादा जबरदस्त कर आमच्या पाठीवर लादण्यांत आला तर आम्ही त्याच्या भाराखालीं अगदीं चिरडून किंवा बेडाबुंन जाऊं. याहून तिसरा परिणाम सांप्रत स्थितींत शक्य दिसत नाहीं. पण हे दोनही परिणाम इष्ट नाहींत. तेव्हां रुप्यास आलेल्या नादानपणामुळें येथील इंग्रजी नोकरांचा जो तोटा होत आहे तो इंग्रजी खाजिन्याच्या मदतीनें अथवा काटकसरीनें भरून काढण्याशिवाय दुसरा चांगला उपाय दिसत नाहीं. इंग्रजी

नोकरांस त्यांच्या पगारांपैकीं सध्या दहा आणे किंवा बारा आणे पोंचत आहेत. हे बारा आणे आम्हांकडून दिले जात असून बाकीचे चार आणे तेवढे इंग्लंडानें कशासाठीं द्यावे, असा कित्येक निष्ठुर इंग्रज लोक प्रश्न करतात. इंग्रजी नोकरांनीं हिंदुस्थानची नोकरी करावीं आणि तिचें वेतन इंग्लंडास द्यावें लागावें हा कोठला न्याय ? यावर दोन समर्पक उत्तरें आहेत. एक, या नोकरांस असें साफ सांगावयाचें कीं, " बाबांनों, तुमची नोकरी फार मोलाची आहे हें आम्ही कबूल करतों; पण सध्या दोन शिलिंगांप्रमाणें तुमचा पगार देण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं राहिलें नाहीं. तेव्हां चांगले दिवस येतोंपर्यंत आमच्या नाइलाजास्तव तुमच्या हातीं जेवढा पगार पडत आहे तेवढ्यांतच तुम्हीं समाधान मानून घेतलें पाहिजे. पुढेंमागें देवानें अथवा दैवानें चांगले दिवस दाखविल्यास तुमचें नुकसान भरून देण्याचा विचार करण्यांत येईल; पण जर तुम्हांस ही गोष्ट मान्य नसेल तर निरुपायास्तव आम्हांस तुमच्या मदतीवांचून राज्य चालाविणें भाग पडेल. " पण आपल्या प्याऱ्या नोकरांस असें उत्तर देण्याची छाती ब्रिटिश सरकारास होत नसेल तर हिंदुस्थानच्या कंगाल प्रजेच्या वतीनें हिंदुस्थानसरकारानें ब्रिटिश सरकारास असें निक्षून सांगावें कीं, " इंग्रज नोकरांच्या पगारांपैकी बारा आणे तरी हिंदु लोकांकडून निघावे अशी तुमची इच्छा असेल तर

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपाया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

बाकी राहिलेल्या चार किंवा सहा आण्यांचा बोजा त्यांवर लादणें उचित नाहीं. कांहीं वर्षें तो ब्रिटिश तिजोरीनेंच उचलला पाहिजे. तसें न केल्यास हिंदुस्थानांत मोठी चल-विचल होणार आहे. " हिंदुस्थानसरकार ब्रिटिश सरकाराला अशा निरवाणीचा उपदेश करील कीं नाहीं याचा संशय आहे; पण अशा प्रकारची कांहीं व्यवस्था होईल तरच आमचें दिवाळें वाजण्याचा प्रसंग टळणार आहे.

दरमहिन्याला शंभर रुपयांपैकीं तीस किंवा चाळीस रुपये कोणी तरी काढून घेतल्यासारखे होऊन तीन बकऱ्यांच्या जागीं दोन बकऱ्यांवर, तीनशें अंड्यांच्या ऐवजीं दोनशें अंड्यां-वर, किंवा तीन घोडयांच्या जागीं दोन घोडयांवर गुजारा करून घेण्याचा प्रसंग येणें अत्यंत संकटावह आहे हें आम्ही कबूल करतों. पण ही संकटावह स्थिति सुद्धां साक्षेप आहे. पायीं चालणारानें घोडयावर बसणाराकडे न पहातां पाय पोळत अनवाणी चालणाराकडे पहावें अशी जी आमच्या भाषेंत म्हण आहे तिचा भावार्थ हे गयाजया करणारे साहेब लोक आपल्या लक्षांत आणतील तर त्यांना आपल्या कष्टमय स्थितीबद्दल इतका खेद होणार नाहीं. हिंदुस्थानांतील अर्ध्या प्रजेस नित्य अर्ध पोटीं झोंपीं जावें लागतें ; एक दोन वर्षें अवर्षण पडलें कीं लाखों लोकांस अन्नासाठीं टांचा घांसून प्राणास मुकावें लागतें; पंचवीस कोटी प्रजेस आपला चारितार्थ कसा चाल-वावा या काळजींत रात्रंदिवस चूर असावें लागतें--या गोष्टी आमचे राज्यकर्ते आपल्या नजरेपुढें वागवतील तर त्यांना आमच्या अर्ध्या भाकरीपैकीं एक चतकोर हिसकावून घेऊन आपल्या अंडयांची, बकऱ्यांची, व घोडयांची संख्या पूर्ण करावी असें खचित वाटणार नाहीं, अशी आमची पक्की खातरी आहे. रुप्याचा भाव फारच उतरल्यामुळें

त्यांचे घ त्यांच्या बायकापोरांचे फार हाल होतात हें खरें आहे. पण या हालांचा विचार करतांना आमची स्थिति किंवा कंपनीच्या अमलांत ज्यांनीं हिंदुस्थान काबीज केलें त्यांची स्थिति आपल्या डोळ्यापुढें ते का आणीत नाहींत ? या काळच्या अगदीं गरीब युरोपियनाला जीं सुखें येथें मिळतात तीं कंपनीच्या अमलांत मोठमोठ्या युरोपिअन अधिकाऱ्यांस तरी मिळालीं असतील किंवा नाहीं याचा संशय आहे. अगोदर त्या वेळचे पगार फारच हलके होते; इंग्लंडास जाण्यास निदान सहा महिने लागत; या देशांत आगगाडया वगैरे प्रवासाचीं साधनें बिलकुल नव्हतीं; इंग्रजी वस्तूंपैकीं फारच थोडया वस्तु येथें मिळत व त्याही फार महाग पडत; एकंदर युरोपिअन लोकांचीं संख्या फारच स्वल्प असल्यामुळें घडोघडीं नेटिव लोकांशीं प्रसंग पडे; तात्पर्य, एकदां इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाठ फिरविली म्हणजे फिरून आपल्या जन्मभूमीचें दर्शन आपणास होईल किंवा नाहीं अशी त्या वेळीं इकडे येणारास भीति वाटत असे, व पुष्कळांची ती भीति यथार्थ होई. पण अलीकडे मनु अगदीं बदलून गेला आहे. साहेब लोकांस खुद्द इंग्लंडचीं किंचहुना त्याहून अधिक मोलाचीं सुखें येथें मिळूं लागलीं आहेत. इंग्लंडची पाहिजे ती चीज स्वल्प किमतींत येथें पैदा होऊं लागली आहे; हुक्की आली कीं रजा घेऊन तीन वारांच्या आंत आपल्या देशबांधवांत अथवा बायकामुलांत जाऊन पडण्याची सोय झाली आहे; येथें असणारांस रहाण्याचीं, खेळण्याचीं, ऐषआराम करण्याचीं, व दळणवळण ठेवण्याचीं उत्तम

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

साधनें प्राप्त होऊं लागलीं आहेत; व फारच थोडया इंग्रज लोकांना आमच्याशीं आतां विशेष संबंध ठेवण्याची गरज पडूं लागली आहे. अशा प्रकारच्या रम्य स्थित्यंतरामुळें जी सुखवृद्धि झाली आहे ती त्यांच्या ध्यानांत कशी येत नाहीं याचें आह्मांस मोठें आश्चर्य वाटतें. अनेक हाल सोशीत ज्यांनीं आपल्या रक्तानें येवढी पादशाही येथें स्थापिली त्यांच्या वंशजांनीं किंवा अनुगाम्यांनीं अपरिहार्य कारणामुळें आपलें एक-तृतीयांश सुख कमी झालें ह्मणून इतकें हवालादिल होऊन जावें हें त्यांच्या शौर्यास, पूर्वसंचित लौकिकास, व उच्च पदवीस बिलकूल शोभत नाहीं. इंग्रज लोकांच्या अंगीं सांप्रत काळीं दृष्टीस पडूं लागलेला नामर्दपणा, आधिभौतिक सुखाची वांच्छा, व दुसऱ्याच्या सुखदुःखाचा यत्किंचित् विचार न करणारी क्रूर स्वार्थपरायणता हीं मनांत आलीं असतां, मालिकामा-अझमाच्या पादशाहीचा सांभाळ करण्यास हे लोक अगदीं नालायख झाले आहेत असें तिऱ्हाईत मनुष्यास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदुस्थानांत नानातऱ्हेचे राजविलास हवेतसे भोगीत असून त्याला काळ्या पाण्याची उपमा देणें आणि निष्कारण तळमळत सुटणें हें अत्यंत लांछनास्पद होय ! हिंदुस्थानांत नोकरी करणें ह्मणजे हद्दपार केलेल्या मनुष्याप्रमाणें कसें तरी आपलें आयुष्य कंठणें असें जे इंग्रज लोक वरकरणी म्हणतात त्यांना आम्ही असा प्रश्न विचारतों कीं, " साहेबबहादुरांनों, तुह्मी या काळ्या पाण्यावर न येतां तर तुमची स्वदेशांत काय स्थिति झाली असती ? येथें तुह्मांस जी चंगळ करावयास सांपडते तिचा एक दशांश तरी तुम्हांस स्वदेशभूमींत प्राप्त होता काय ? हिंदुस्थानदेश जर तुम्हांस भयाण अरण्याप्रमाणें वाटतो तर तुह्मी येथें येतां कां ? किंवा फसून येत असाल तर तुमचे डोळे उघडल्याबरोबर

परत कां जात नाहीं ? जेव्हां हिंदुस्थानांत येण्यासाठीं तुम्ही निघतां तेव्हां आपलें पोट भरण्यासाठीं निघतां किंवा स्वदेशसेवा करण्यासाठीं निघतां ? हिंदुस्थानचें राज्य तुम्हांस कष्टावह झालें असेल तर तें तुम्ही सोडून कां देत नाहीं ? परोपरकारबुद्धीनें आमच्या कल्याणासाठीं तुम्ही इतके कष्ट सोशीत असाल तर तुमच्या सुखासाठी आम्हांस पिळून काढण्यांत आमचें कोणतें कल्याण तुम्ही करतां, व तुम्हांस कोणते कष्ट सहावे लागतात, हें सांगाल कांय ? कोणाच्याही सुखाचा तिसरा हिस्सा कमी होणें आणि अन्नावांचून कोणालाही उपाशीं मरावें लागणें यांतील भेद तुम्हांस कळत नाहीं काय ? गड्यानों, तुमचें सुख अणुरेणूइतकें देखील कमी व्हावें अशी आमची बिलकुल इच्छा नाहीं. सुखसागरांत तुम्ही आपले यथेच्छ डुंबत रहा; पण तसें करतांना आमच्या जिवांकडे कांहींतरी पहा. आमच्या विपत्तीमुळें जर तो सागर अगदीं कोरडा पडला तर मग तुमची काय स्थिति होईल ? आम्हांस शुष्क करून सोडण्यांत तुमचा फायदा नाहीं. ही भारतीय कामधेनु ताजी राहिली तरच तुमची चैन चालणार आहे, हें मित्रांनों विसरूं नका. द्रव्यदुग्ध हिच्या कांसेंत नसेल तर तें तुमच्या तोंडांत कोठून येईल ? ”

आमच्या असल्या विनवण्यांकडे आमच्या राज्यकर्त्यांचें लक्ष कितपत जाईल हें सांगतां येत नाहीं. तथापि त्या करणें हें आमचें कर्तव्य आहे आणि तें शक्त्यनुसार बजावण्याचा प्रयत्न प्रस्तुत विषयानुरोधानें आम्हीं केला आहे.

— — —

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ० ५

खेडकरवैद्य अॅन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

घ्या, पण त्याला कांहीं धरबंद असूंद्या.

आह्मी भेकड, आम्ही दुर्बल, आम्ही भांडखोर, व आम्ही अज्ञान असल्यामुळें आमचें राज्य आम्हांस चालवितां येणें शक्य नाहीं, आणि म्हणून आमच्या डोक्यावर कोणी तरी बलवत्तर शास्ता पाहिजे हें आम्ही कबूल करतों, व त्या शास्त्याला आमच्या सामर्थ्याप्रमाणें देवघेल तितका करभार देण्यासही आह्मी राजी आहों. आमच्या अंगीं देशाभिमान असता; आम्ही धर्मवेडानें वेडावून जाऊन आपआपसांत तंटे करीत नसतों; परशत्रूला तोंड देण्यासारखी आम्हांत जुट असती; राष्ट्रहितासाठीं स्वहितत्याग करण्याची आवड आम्हांस असती; आम्हांस आमचें राज्य चालाविण्याची अक्कल असती; आणि कोणत्याही प्रकारच्या संकटास न डगणारें धैर्य आमच्या अंगीं असतें तर मुसलमान तरी येणें कशाला येते ? आणि इंग्रज तरी कशाला येते ? आमच्वा अंगीं जे गुण नाहींत त्यांबद्दल पोकळ अभिमान वहाण्यात कांहीं अर्थ नाहीं. ते गुण प्राप्त होईत तोंपर्यंत दुसऱ्या राज्यकर्त्यांचें प्रजापण स्वीकारून त्यांच्या श्रमांबद्दल त्यांना वेतन देण्यास तयार असलें पाहिजे. मुसलमान गेले आणि इंग्रज आले. उद्यां इंग्रज गेले तर त्यांच्या जागीं फ्रेंच किंवा रशियन उभे रहातील; किंवा आमच्यापैकींच एखादा क्रूर लढवय्या पुढें सरसावून होनी ती स्थिति बरी होनी असें म्हणावयाला लावील ! तात्पर्य,आमच्या अंगीं राज्यकर्तृत्व येईतोंपर्यंत आह्मीं आमच्या श्रमाचें फळ दुसऱ्यांस खाऊं दिलें पाहिजे, अशी आमची पक्की समजूत झाली आहे. तेव्हां इंग्रजलोकांविरुद्ध आम्ही जी तक्रार करतों ती त्यांनीं आह्मांपासून मुळींच कर घेऊं नये, किंवा येथून अजीबात चालतें

व्हावें म्हणून नव्हे, तर त्यांनीं जे कर व्यावयाचे ते आमचीं मगदूर पाहून घ्यावे, आणि येथें इंग्रजी अंमलदारांची जी संख्या ठेवावयाची तीं आम्हांस निभेल अशी ठेवावी येवढ्यासाठींच होय. " तुम्ही आमचें राज्यच करतां, त्याअर्थीं आमचा पैसा तुम्ही घ्या; पण त्याला कांहीं तरी धरबंद असूंद्या येवढेंच आमचें त्यांना सांगणें आहे, आम्ही दिगंबर झाल्यावर त्यांचा आधार आम्हांस हवा कशाला आणि ते तरी आम्हांपासून घेणार काय ? लोकरीया लोभानें घनगर आपल्या मेंढराचें कातडें सोलील तर मेंढरापायीं मेंढरूं नाहींसें होऊन, घनगराचा उर्णाशयही निरंतर कोरडा पडेल हें उघड आहे. तथापि राज्यकर्त्यांस आपल्या अतिलोभाचा हा दुष्परिणाम सहसा कळत नाहीं, व त्यामुळें ते मोठ्या गोत्यांत येतात.

ब्रह्मदेश खालसा करून तें राज्य हिंदुस्थानाला जोडावयाचें असा बेत ज्यांनीं केला त्यांनीं तो बेत अमलांत आणिण्यासाठीं आम्हांस व ब्रिटिश पार्लमेंटास असें सांगितलें कीं, ब्रह्मदेश जिंकल्यापासून पांच चार वर्षांच्या आंत तो जिंकण्याचा खर्च बाहेर पडणार आहे इतकेंच नाहीं, तर त्या देशांतील जमिनीच्या सुपीकपणामुळें व तेथील लोकांच्या उद्योगीपणामुळें हिंदुस्थानच्या तिजोरीस तिकडून थोडीबहुत भर पडणार आहे; आणि तसें झाल्यास हिंदुस्थानच्या लोकांवरील कराचा बोजा अंशतः कमी करतां येणार आहे ! पण प्रत्यक्ष काय घडून आलें आहे तें पहा. ब्रह्मदेश खालसा झाला; ब्रह्मी लोकांस दास्यता आली; इंग्रजी व्यापारास उत्तेजन मिळालें; व नोकरी करूं इच्छिणाऱ्या तरुण इंग्रजांस नोकरींचें नवीन क्षेत्र सांपडलें !

ब्रह्मी बाम–मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

त्यांच्या दृष्टीनें हें सारें ठीक झालें. पण आम्हांस तें कसें ठीक वाटणार ! आमचें शेंकडों शिपाई मरून त्याचीं बायकापोरें उघडीं पडलीं; आमचे कोट्यावधि रुपये खराब झाले; आणि आमच्या शिरावरील कराचा बोजा कमी न होता अधिकच झाला ! चीन, इराण, अफगाणिस्थान, बलुचिस्थान, वगैरे देशांशीं इंग्रजाचें जें कारस्थान चाललें आहे त्याचाही आमच्या स्थितीवर असाच परिणाम घडत आहे. राज्यविस्ताराबरोबर सैन्यविस्तार झालाच पाहिजे व होत आहे, आणि त्याचा खर्च आम्हांवर अधिकाधिक लादला जात आहे. रुप्याचा भाव उतरल्यामुळें हिंदुस्थानचें राज्य नीट रीतीनें करणें अशक्य झालें आहे, ही जी हिंदुस्थानसरकारची ओरड आहे ती अगदीं खोटी आहे हिंदुस्थानसरकारानें नसत्या लढाया उभ्या केल्या नसत्या; नवीन मुलूख काबीज केला नसता; सोल्जरांच्या नवीन पलटणी इंग्लंडाहून आणिल्या नसत्या;नवीं नवीं खातीं विनाकारण काढून त्यांत इंग्रजी अंमलदारांची भरती केली नसती तर रुप्याचा भाव आहे त्याहून उतरता तरी देखील हिंदुस्थानसरकारची चणचण झाली नसती, आणि नेटिव लोकांस आंरडाओरड करण्याचं जरूर न पडती. गेल्या दहा वर्षांत सुमारें ऐशीं कोटी रुपये सरकारनें वर सांगितल्याप्रमाणें खर्चून टाकले आहेत. या काळांत सुमारें पसतीस कोटी रुपये रुप्याच्या उतरलेल्या भावामुळें सरकारास अधिक खर्च करावे लागले या दोन आंकड्यां वरून वाचकांच्या हें लक्षांत येईलच कीं, पहिले ऐंशी कोटी रुपये किंवा त्यापैकीं बरेच रुपये सरकार वांचवितें तर दुसरे चौतीस कोटी रुपये त्याला लीलेनें खर्च करतां ये इतकेंच नाहीं, तर रुपयाचा भाव शिलिंग झाला असता तर सुद्धां त्याला काडीयेवढी देखील फिकीर करावी लागली नसती नामदार कंपनीच्या मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांनीं अति

राज्यलोभामुळें सत्तावन्न सालचें बंड उपास्थित केलें म्हणून ब्रिटिश लोक कंपनीवर क्रूद्ध झाले, आणि ब्रिटिश पार्लमेंटानें कंपनीकडून राज्यकारभार काढून घेऊन त्याचीं सूत्रें राणीच्या हातांत दिलीं. पण पुढें मागें राणीच्या प्रधानांच्या व नोकरांच्या वर्तनामुळेंच तसा प्रसंग येऊन गुदरला तर मग कोणाघर कोण रागावणार व कोणाकडील राज्यसूत्रें काढून घेऊन कोणास देणार ? आजच हा प्रसंग येण्याची भीति आहे असें नाहीं. पण सध्या ज्या प्रकारच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानें हिंदुस्थानसरकारचें वर्तन होत आहे त्यांचेंच वजन कायम राहिल्यास तसा प्रसंग मागें पुढें येणें केवळ अशक्य नाहीं.

रूस लोकांची किंवा दुसऱ्या कोणत्याही लोकांची स्वारी हिंदुस्थानावर होण्याची भीति न रहावी व झाली तरी राज्याला यत् किंचित् धक्का न लागावा व त्याची शांतता न मोडावी यास्तव किती बंदोबस्त, किती किल्ले व किती फौज अवश्य आहे याविषयीं अभिप्राय देणें आमचें काम नाहीं, व तो आम्हीं दिला तरी त्याला कोणी पुसणार नाहीं ! तथापि या लष्करी मजबुतीची कोणत्याही प्रकारें हेळसांड करावी असें आमचें म्हणणें नाहीं; तसेंच आजच सगळे लष्करी अधिकार नेटिवांच्या स्वाधीन करा असेंही आम्ही म्हणत नाहीं; आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं तुमच्या लष्करावर तुमची सारी मदार

कॅलेंडर:-दरसाल डिसेंबर अखेर आम्ही छापवीत असतो. ट. हं. करितां ८१ पाठविल्यास कोणासही तें फुकट मिळेल.

मॅनेजर.

सुधारक प्रिं. ब्यूरो पुणें सिटी.

असेल व त्यावर हवा तितका खर्च करावा अशी तुमची इच्छा असेल; तर तो तुम्ही खुशाल करा; त्यांचबद्दल सध्याच आम्ही तुम्हांशी भांडत नाहीं; पण लष्करी खातें व मुलकी खातें या दोहोंवरही आम्ही पाहिजे तसा खर्च करूं, व तो भागविण्यासाठीं तुमच्यावर पाहिजे तसले कर बसवूं असें तुम्ही म्हणाल तर मात्र आम्ही तुमच्याशीं एकसारखे भांडल्याशिवाय व आमच्या आरोळ्यांनीं तुमच्या कानांचीं रंध्रें भरून टाकून तुमचीं डोकीं फिरवून सोडल्याशिवाय रहाणार नाहीं ! ज्याअर्थीं सध्या तुम्हांस रशियाच्या बागुलबोवाची अगदीं दहशत पडल्यासारखी झाली आहे, आणि गोरीं पल्टणें, दगडी तटबंदी, आणि शिशाचे गोळे यांवर मनमुरात खर्च केल्याशिवाय परचक्रापासून हिंदुस्थानचा बचाव होण्याचा संभव नाहीं, असें वेड तुमच्या डोक्यांनें घेतलें आहे, त्याअर्थीं आम्ही तुम्हांस तूर्त हवी तितकी फौज ठेवण्यास हरकत नाहीं. पण हीं आमची विचारी राजनिष्ठा ध्यानांत आणून तुम्ही आम्हांस मुलकी राज्यव्यवस्थेच्या जबरदस्त भाराखालीं चिरडून देण्याचा निश्चय केला पाहिजे. तुम्हांस अवश्य वाटतील तेवढीं गोरीं पल्टणें आणि निवडक मुलकी अधिकारी येवढ्यांना तुम्ही हव्या तितक्या चांगल्या स्थितिं ठेवा; त्यांचा पगाराची पाहिजे तर तीन शिलिंगांप्रमाणें भरपाई करा; आणि ते मोठ्या संतोषानें कर्तव्य बजावतील अशा प्रकारें त्यांची बरदास्त ठेवा; त्याबद्दल आम्ही तुम्हांस दोष देणार नाहीं. पण ज्या त्या खात्यांत इंग्लंडचें बाजारबुणगें भरून त्याला राजविलास भोगता येतील असें वेतन देण्याचा मूर्ख व अशक्य प्रयत्न करूं नका. यापुढें कोणत्याही खात्यावर अगदीं अपरिहार्य दिसल्याशिवाय गोरा अधिकारी नेमावयाचा नाहीं असा निश्चय करा; आणि आतां जे गोरे अधिकारी या देशांत आहेत, ते

पेनशन् घेऊन जसजसे विलायतेस निघून जातील तसतशा त्यांच्या जागा नेटिवाना द्या. लष्करांतील बहुतेक मोठ्या जागा आणि मुलकीकडील कांहीं मोठ्या जागा तुमच्या हातीं असल्यावर तुम्हांस कशाचीहीं भीति नाहीं. तसेंच अशा पद्धतीनें हिंदुस्थानचें राज्य चालवाल तर खर्चाच्या संबंधानेंही तुमची कधीं ओढाताण होणार नाहीं; प्रजा संतुष्ट राहील; हिंदू लोकांस, मुलकी खात्यांतच कां होईना, पण मोठ्या पगाराच्या व जबाबदारीच्या जागा मिळूं लागल्यास मोठें समाधान वाटून, अधिकाधिक शहाणपण येत जाईल व त्यांची राज्यभक्ति दिवसेंदिवस दृढतर होत जाईल; सुशिक्षित व समंजस हिंदू लोकांच्या हातांत दोन अधिक पैसे पडूं लागले म्हणजे ते आपला संचय नवीन प्रकारच्या व्यापारोत्तेजनाकडे लावतील, व नशा प्रकारच्या उत्तेजनामुळें इंग्लंड व हिंदुस्थान या दोनहीं देशांतल्या काम करणाऱ्या लोकांच्या स्थितीवर चांगला परिणाम होईल. अशा रीतीनें परक्या देशाचें राज्य चालविण्यांत खरें भूषण, खरी मनुष्यप्रीति, व खरा सुरक्षितपणा आहे. अशा प्रकारच्या उदार राज्यतत्त्वांस जे राज्यकर्ते पराङ्मुख होतात, आणि जिंकलेल्या प्रजेस वाढयाकडून व चुडख्याकडून खाण्याचा प्रयत्न करतात ते तिचें सर्वतोपरी नुकसान करून अखेरीस आपलेंहीं नुकसान करून घेतात असें आजपर्यंतच्या अनुभवावरून सिद्ध झालें आहे. याकरतां तुम्ही राज्यकर्ते आमचें वित्त व्या, पण त्या घेण्याला कांहीं आळा असूंद्या, अशी आमची शेवटची प्रार्थना आहे!

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टं. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

४५

पुण्याची प्रकृति व गवताच्या गंजी.

शाळामास्तरिणींनीं जाकिटें घालावीं किंवा नाहीं, छत्र्या वापराव्या किंवा नाहीं व जोड्याचा उपयोग करावा किंवा नाहीं–असल्या विषयांवर म्युनिसिपल कमिशनरांनीं सामान्य लोकांस खुष करण्यासाठीं हवें तसें बरळत सुटावें, आणि त्यावद्दल वर्तमानपत्रांत बोभाटा होऊन युरोपिअन लोकांपुढें आपली नाचक्की होण्याचा प्रसंग आला अथवा द्रव्यद्वारा कदाचित् नुकसान होण्याची भीति पडली म्हणजे अविचारानें केलेल्या कर्माचा पश्चात्ताप होऊन ज्यांच्यावर विनाकरण एकवार वाकशस्त्र धरलें त्यांचीच स्वसंरक्षणाकरतां पायधरणी करीत बसावें–यापेक्षां लोकांचें खरें कल्याण कशांत आहे हें शोधून काढून तें वाढविण्याचा प्रयत्न करावा, हें कर्तव्यपरायण लोकप्रतिनिधींस अत्यंत उचित आहे, हें कोणीही कबूल करील, पण या निष्काग्ण वाखाणलेल्या शहरच्या म्युनिसिपॅलिटींत जे लोकनियुक्त सभासद आहेत त्या सर्वांसच आपल्या कर्तव्याची अशी कल्पना असेल असें वाटत नाहीं. ज्या शहरच्या लोकनियुक्त म्युनिसिपल रावसाहेबांचें लक्ष लोकांच्या हिताहून अन्य विषयांकडे वारंवार जात असेल अशा शहरांस म्युनिसिपालिटीचे मेंबर्स निवडण्याचा अधिकार नसावा हेंच आम्हांस बरें वाटतें ! सरकारानें निवडलेल्या कमिशनरांनीं प्रशस्त वर्तन केले नाहीं तर त्यांना व सरकाराला दोष देतां येतो; पण लोकनियुक्त सभासदांनीं तसें केलें म्हणजे **अपलव दांत आणि आपलेच ओंठ** या म्हणीचें स्मरण करून स्वस्थ बसावें लागतें ' या शहरांतील म्युनिसिपालिटीचे अधिकार **बॉबे कॉरपोरेशन**च्या अधिकाऱ्यांच्या खालोखाल आहेत. या इलाख्यांतील इतर्‍या कोणत्याही म्युनिसिपॉलिटीस येवढें

अधिकार दिलेले नाहींत, व दुसऱ्या कोणत्याही म्युनिसिपॅलिटीचें येवढें उत्पन्नही नाहीं. शहाणपण, देशाभिमान, बुद्धिमत्ता वगैरे गुणांचबद्दल तर पुण्याचा डंका आज कित्येक वर्षे साऱ्या हिंदुस्थानभर वाजत आहे ! असें असून येथल्या म्युनिसिपॅलिटीच्या हातून लोकसुखाच्या अगदीं सामान्य गोष्टी देखील व्हाव्या तशा होत नाहींत, हें आश्चर्य नव्हे काय ? खडकवासल्याच्या कालव्यामुळें सारें शहर पाण्यावर तरंगूं लागल्यासारखें होऊन दमटपणापासून होणारे विकार प्रत्येक घरीं दृष्टीस पडूं लागले आहेत तरी त्यांच्या प्रतीकारासाठीं या म्युनिसिपॅलिटीकडून अद्याप कांहींएक झालें नाहीं. तसेंच, या खडकवासल्याच्या पाण्याकरतां या म्युनिसिपॅलिटीला भलत्याचसलतीच रक्कम द्यावी लागत असून पाणी कमी घेतलें तर त्याचबद्दल कमी रक्कम देऊन चालत नाहीं; पण अधिक घेतलें तर त्याचबद्दल मात्र जबर दर द्यावा लागतो असें गणितात ! इंग्रजी राज्यांत असला मोगलाई अंमल दृष्टीस पडणें हें या शहरांतील लोकांच्या नांवाजलेल्या शहाणपणास अत्यंत लाजिरवाणें नाहीं काय ? तेंही असो. पुण्यांतील शौचकूपांइतके घाण शौचकूप पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही शहरांत खचित नसतील. असें असून ते नाहींसें करण्याविषयीं या म्युनिसिपॅलिटीनें अद्यापि म्हणण्यासारखें कांहींएक केलें नाहीं. पिण्याचें पाणी पावसाळ्यांत बऱ्याच अंशीं गुळवण्यासारखें होतें. साऱ्या बरसातींत असल्या पाण्यामुळें प्रत्येक इसमाच्या पोटांत निदान शेर दीडशेर तरी गाळ जात असेल ! पण पाणी गाळण्याची आजपर्यंत म्हणण्या-

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ⁄१० पौंड.

मोरोक्को कॉफी ⁄१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं

सारखी खटपट झाली नाहीं. पूर्वी या शहरांत जिकडे तिकडे फरशा होत्या; त्या काढून अलीकडे म्युनिसिपालिटीनें सर्वत्र खडीचे रस्ते केले आहेत, व त्यांच्या दोन बाजूंस लहानशीं गटारें बांधिलीं आहेत. मूळचे रस्ते पराकाष्टेचे अरुंद असल्यामुळें व आतां त्यांच्या दोहों बाजूंस दोन लहानच कां होईनात, गटारें झाल्यामुळें, कित्येक आळ्यांत व गल्यांत समोरा समोर दोन गाडया आल्या असतां त्यांना तोंडें न फिरवितां मागें सारीत नेण्याचा प्रसंग येतो ! अशा वेळांचे रस्ते रुंद करण्याबद्दल, निदान टिकटिकाणीं गाडया वळवितां येण्यासारख्या जागा राखण्याबद्दल सक्तीचा प्रयत्न व्हावयाला पाहिजे आहे; पण शुष्क कामाकडेच साऱ्यांची नजर असल्यामुळें असल्या गोष्टींकडे कोणाचेंही विशेष लक्ष लागत नाहीं. मळाच्या गाडया ठेवण्याच्या ज्या जागा आहेत त्यांच्या आसपासच्या लोकांस असह्य त्रास होतो, व या गाडया गांवांतून चालल्या असतां दोन-दोनशें यार्डपर्यंत कपाळ फिरविणारा दुर्गंध चालतो. थोड्या काळजीनें व खर्चानें या दोनही पीडा टाळतां येण्या. सारख्या आहेत; पण "**ड्रेनेजच्या जंगी स्कीम्स**" करण्यांत गुंतलेल्या म्युनिसिपल प्रतिनिधींना असल्या क्षुल्लक सुधारणांकडे लक्ष देण्याची इच्छा कोठून होणार ? पुण्यांतील सर्व जातींच्या बायकांस देहधर्म उरकण्यासाठीं गटारांवर मुलें घसविण्याची व कुणब्यांच्या बायकांस थोडा काळोख पडल्या बरोबरच्या टिकाणीं ने स्वतः उरकण्याची दुष्ट खोड फार दिवस लागलेली आहे! म्युनिसिपॅलिटीचे मोकदम चार सहा महिनें सकाळ संध्याकाळ थोडे परिश्रम करतील आणि ऑनररी किंवा पगारी मॅजिस्ट्रेटास थोडें अधिक काम देतील तर ही त्यांची वाईट खोड सहज घालविता येणार आहे. पण आमच्या कमिशनरांच्या नैसर्गिक कोमलतेमुळें ही घाण येथें किती वर्षें चालेल हें कोणासही सांगतां येणार नाहीं. सभ्य म्हणविणाऱ्या स्त्रियांनीं

रस्त्याच्या दोनेही बाजूंस बसविलेलीं दोन दोन चार चार पोरें राखीत उभें रहावें, आणि रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्यांस सभ्य गृहस्थांस नाकाला पदर लावून व खालीं मान घालून निमूटपणें जावें लागावें, याबद्दल येथील कौटुंबिकांची किंवा म्युनिसिपल कमिशनरांची विशेष तारीफ करावी हें आम्हांस समजत नाहीं ! फार कशाला? भर बुधवारांत व इतर पेठांत रस्त्याला लागून तपकीर घोंटण्याचा जो सपाटा चाललेला असतो त्यामुळें शिंकून शिंकून शेंकडों लोक जातां येतां घाबरेघुबरे होतात. पण हीं दुकानें रस्त्यावरून उठविण्याबद्दल अनेकांकडून अनेक वेळां सूचना करण्यांत आल्या असून त्यासंबंधानें अद्यापि कांहींच झालें नाहीं, यामुळें या म्युनिसिपालिटींतील सभासदांस घाणाद्रियें आहेत किंवा नाहींत, असा संशय देखील कधीं कधीं उत्पन्न होतो! तसेंच, **बोलो-भाईरामाच्या** कर्णकटू व भीतिप्रद आरडण्यामुळें जो त्रास व निद्राभंग होतो तो दूर करण्याविषयींही म्युनिसिपालिटि कांहीच करीत नाहीं यावरून हिच्या अधिकाऱ्यांना हा निर्घोष बंद केल्यास आपल्या हातून मोठें पाप घडेल असें वाटत असलें पाहिजे असें अनुमान करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं !

येणेंप्रमाणें पुण्याच्या प्रकृतीची सांप्रत स्थिति आहे. या स्थितींत लौकरच विशेष बिघाड होण्याचें आणखी एक कारण तयार होत आहे. तें कोणतें म्हणाल तर येथील गवताच्या टोलेजंग गंजी. पुण्याचें राजधानीत्व गेलें; पण पुण्याचे

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

लष्कर गेलें नाहीं ! कदाचित् पेशवाईंतल्यापेक्षांहीं सध्या येथें अधिक फौज असेल. भेद इतकाच कीं पेशवाईंतली फौज पुण्याचें वैभव वाढविणारी होती; सध्याची फौज पुण्याच्या किंवा त्याच्या आसपासच्या लोकांनीं तसें करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचा समाचार घेण्याकरतां ठेवलेली आहे ! असो; कसें झालें तरी पुण्यास सध्या मोठी फौज आहे, व या फौजेंत तोफखाना व स्वार आहेत ! इंग्रजी तोफांला घोंडे लावतात, व इंग्रजी स्वार घोड्यांवर बसतात ! तोफांच्या व स्वारांच्या घोड्यांस गवत लागतें आणि तें पुरविणें पुण्याच्या व्यापाऱ्यांस भाग पडतें ! वर्षाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत खळ न पडूं देतां हा पुरवठा करतां यावा म्हणून हे व्यापारी सुगीवर माफक दरानें गवत विकत घेऊन त्याच्या मोठमोठ्या गंजी घालून ठेवतात. असल्या गंजींपैकीं बऱ्याच गंजा लकडीपुलाच्या पलीकडे गणेशखिंडीस जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या उजव्या बाजूस आहेत. गवताचें नीट रीतीनें संरक्षण करण्याचे किंवा त्यापासून लोकांस पीडा न होऊं देण्याचे जे अनेक उपाय आहेत ते या व्यापाऱ्यांस मुळींच अवगत नसावे, व आमच्या म्युनिसिपल कमिशनरांस ते अवगत असले तरी ते अमलांत आणण्याचें त्यांना कधींच सुचलें नसावें असें दिसतें. खडकवासल्याच्या कालव्यामुळें पुण्यांतून दक्षिणेकडे हिंडावयास जाण्याचे जेवढे मोठे रस्ते होते तेवढे सारे आसपासच्या दलदलपणामुळें अगम्य झाले आहेत ! गणेशखिंडीच्या रस्त्याकडे या कालव्याचें एक क्षुद्र पिलूंचं आलें असल्यामुळें व या रस्त्याच्या आसपासची जमीन मुरमाड व काताळ असल्यामुळें या रस्त्याला बराच कोरडेपणा आहे. तसेंच पूर्वेकडून पश्चिमेकडे व पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या वाऱ्यास अडथळा करण्यासारखें कोठें कांहीं

नसल्यामुळें, शहराच्या बऱ्याच भागांतील व्यायामशील लोक या रस्त्यानें सकाळसंध्याकाळ हिंडावयास निघतात. पण पुलाच्या तोंडाशीं च गवताच्या टेंकड्या घालण्याचा जो प्रघात माजत चालला आहे तो बंद केला नाहीं तर थोड्या दिवसांनीं हा रस्ताही हिंडावयास जाण्यास निरुपयोगी होईल अशी आम्हास भीति वाटते! रस्त्याच्या पश्चिमेला गवताचे हे पर्वतप्राय ढीग पडल्यामुळें वारा अगदीं बंद होतो इतकेंच नाहीं, तर गवत घेऊन येणाऱ्या व तें घेऊन जाणाऱ्या गाड्यांच्या रहदारीमुळें इतर लोकांच्या गाड्यांस व पादचाऱ्यांस त्या संकुचित जागेंत मोठी गैरसोय सोसावी लागते. कित्येकदां या गवताच्या गाड्यांच्या तांड्यामुळें पांच दहा मिनिटें खोटा होते, व कधीं कधीं तर त्यांवर डोल्याप्रमाणें रचलेल्या ओझ्याचा धक्का लागून घोड्यांच्या कळसूत्री गाड्यांस व त्यांत बसणाऱ्यांस इजा होने! तथापि या गंजींविरुद्ध आमची जी तक्रार आहे ती केवळ याच कारणासाठीं नाहीं. तिला याहून बलवत्तर कारणें आहेत. गवतांत एक प्रकारचे कृमी उत्पन्न होऊन त्यांपासून एक ताप येतो. त्याला हे-फीव्हर (Hay-Fever) असें म्हणतात. शहराच्या तोंडाशीं पश्चिमेच्या बाजूला हवा खाण्यास जाण्यायेण्याच्या रस्त्यावर येवढाल्या गंजी घालूं देणें म्हणजे जाणूनबुजून तापाच्या दृष्ट सांथीचें बीज उघड्या डोळ्यानें लावून ठेवण्यासारखें होय! खेरीज पावसाळ्यांत या गंजीजवळच्या गवताचा गळाटा कुजला म्हणजे त्यापासून दुःसह दुर्गंध सुटतो इतकेंच नाहीं, तर कित्येक रोगही उत्पन्न होतात. एकंदरीत शहराच्या नजीक इतकें वनस्पति-

---

ब्रह्मी वाम–मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणाऱ्यांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

द्रव्य कुजूं देणें चांगलें नाहीं. आमची अशी सूचना आहे कीं म्युनिसिपॉलिटीनें या गंजी येथून काढून ती जागा आपल्या ताब्यांत घ्यावी, व तींत एक सार्वजनिक मोठा बाग करावा. बुधवारच्या वाड्याच्या दीडवीत बखळींत म्युनिसिपालिटीनें जी बाग केली आहे तीपासून शहरांतल्या उकाड्यानें, घाणीनें, व गोंगाटानें त्रासून गेलेल्या नागरिकांस किती आराम होत असेल याचा आमच्या म्युनिसिपल प्रतिनिधींनींच विचार करावा ! मुंबईसारख्या ठिकाणीं ज्या सार्वजनिक बागा आहेत त्यांचें स्वरूप लक्षांत आणून त्यांच्या तोडीची एक बाग आमच्या म्युनिसिपॅलिटीनें या गंजीच्या जागीं केल्यास पुण्यांतील बहुतेक लोक तिला दुवा दिल्यावांचून रहाणार नाहींत. वास्तविक पहातां पुण्यासारख्या म्युनिसिपालिटीकडून शहराच्या निरनिराळ्या भागांत अशा प्रकारच्या लहान मोठ्या चार पांच बागा पाहिजेत. असल्या बागा करणें हें व्यक्तीचें काम नव्हे. असल्या संस्था सार्वजनिक खर्चांतूनच झाल्या पाहिजेत. ज्या-लेल्या रोगांस उपाय करण्यासाठीं दवाखाने घालणें जसें म्युनिसिपालिट्यांचें कर्तव्य आहे, त्याप्रमाणें रोग न होऊं देण्यासाठीं लोकांस पोटांत चांगली हवा घेतां येऊन दोन घटका करमणूक करतां येईल अशा आरामवाटिका अस्तित्वांत आणणें हेंही तितक्याच महत्त्वाचें म्युनिसिपालिट्यांचें कर्तव्य आहे. असलीं स्थलें मोठ्या शहरांचीं फुप्फुसें होत; आणि व्यक्तिमात्राच्या फुप्फुसांस चांगली हवा मिळाल्यानें त्याच्या प्रकृतीवर जे परिणाम घडतात, तेच असल्या बागांच्या योगानें शहराच्या प्रकृतीवर होतात. कदाचित् अशा प्रकारच्या तीन चार बागा करण्याचें सामर्थ्य म्युनिसिपालिटीच्या अंगीं तूर्त नसेल. पण अनुभव घेऊन पहाण्यासाठीं अशा प्रकारची एखादी बाग तिनें लौकर करावी अशी आमची सूचना आहे. अशा प्रकारच्या बागेपासून

होणारा फायदा व आनंद यांचा प्रत्यय लोकांस आला म्हणजे त्याबद्दल ते एक लहानसा नवीन कर देण्यास देखील बिलकुल तक्रार करणार नाहींत अशी आमची खातरी आहे.

आतां वरील गंजींविषयीं आणखी दोन शब्द लिहून हें स्थानिक बाबींचें पुराण संपवितों. सध्यां ज्या ठिकाणीं या गंजी आहेत त्या ठिकाणाहून त्या हुसकून लावल्या म्हणजे त्यासंबंधानें आपलें कर्तव्य संपलें असें म्युनिसिपालिटीनें समजतां कामा नये. ज्या नवीन ठिकाणीं त्या घालूं दिल्या जातील तें ठिकाण शहरापासून निदान एक मैल तरी लांब असावें. त्यांच्या आसपास मोकळी व कोरडी जागा विपुल असावी. ती खडकाळ असेल तर फारच सोईची होय. गंजीगंजींत निदान ६० फुट अंतर असावें. मोकळ्या गवताच्या गंजी घालण्यापेक्षां गवत दाबण्याचें यंत्र 'दाबक' आणून कापसाप्रमाणें त्याचे घट्ट गठ्ठे बांधले असतां तें कुजण्याची किंवा जळण्याची फार भीति रहाणार नाहीं; जागा थोडी पुरेल; एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं तें वाहून नेण्यास सोपें पडेल; व वजनावर देण्याघेण्याम फार सुलभ पडेल. तसेंच ज्या ठिकाणीं गवताच्या गंजी असतील त्याठिकाणीं आग लागली असतां ती ताबडतोब विझविण्याचा उत्तम बंदोबस्त अमलांत आणितां येईल. तो होण्यास मुख्य दोन गोष्टी अवश्य आहेत; एक, लागेल तेव्हां पाण्याचा भरपुर

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. चारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपाया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

पुरवठा, आणि दुसरी, मोठ्या शक्तीचें **फायरएंजिन.** गव-
ताच्या प्रत्येक खजिन्यापार्शी (डीपोपार्शी) मोठा थोरला नळ
आणून ठेवावा, किंवा तसें करणें शक्य नसेल तर एखादा
मोठा तळ्यासारखा खड्डा करून तो कालव्याच्या किंवा दुसऱ्या
कसल्या तरी पाण्यानें नेहमीं भरलेला ठेवावा. या दोनही
वस्तूंचा खर्च गंजवाल्यांकडून ध्यावा, व ते तो गवत घेणारांकडून
घेतील. एखादे वेळीं अग्निनारायणाची अवकृपा झाली
म्हणजे हजारों रुपयांचें नुकसान करून घेण्यापेक्षां
व तसें झाल्यास गवतासाठीं पाहिजे तो भाव देण्यापेक्षां, गव-
ताच्या व्यापाऱ्यांनीं व तें घेणारांनीं ही अवकृपा मुळींच न
होऊं देण्यासाठीं, पाहिल्यापासून थोडीशी झांज सोसण्यास
मागेंपुढें पाहूं नये. तात्पर्य, ज्याप्रमाणें शहराच्या आसपास
उंसाची लागवड बंद केल्यानें व पर्वतीचें तळें कोरडें
पाडल्यानें लक्षांत येण्यासारखा शहराच्या प्रकृतींत फेरफार
झाला आहे, त्याप्रमाणें शहरांतला दमट्पणा व दुर्गंधनाहींसा
करून शहराच्या थेट हद्दीवर रोगाचीं जीं कारणें आहेत तीं
दूर केलीं आणि त्या ठिकाणीं स्वच्छ हवा व विसावा मिळ-
ण्यासारख्या मोठमोठ्या सार्वजनिक बागा केल्या तर नि-
रोगीपणाबद्दल पुण्याचा जो एकदां लौकिक होता तो थोड्या
अवधींत त्याचा त्यास फिरून प्राप्त होईल अशी आमची समजूत
आहे.

मराठींत चांगले ग्रंथ कां होत नाहींत ?

" मराठींत चांगले ग्रंथ कां होत नाहींत ? " असा प्रश्न
विचारण्यापेक्षां " देशी भाषांत चांगले ग्रंथ कां होत नाहींत ?"
असा व्यापक प्रश्न विचारण्यास देखील कांहीं हरकत नाहीं !

कारण ग्रंथसंबंधानें जशी मराठी भाषेची तशींच बहुतेक इतर देशी भाषांची स्थिति आहे असें म्हणतां येईल. तथापि झांकली मूठ सव्वा लाखाची—या न्यायानें गुजराथी, मारवाडी, कानडी, तेलगू वगैरे भाषांची ज्यांना माहिती नसेल त्यांना त्या भाषांत कदाचित् महत्वाचा ग्रंथविस्तार असेल असें वाटत असेल; आणि खरोखरींच तसें कोणास वाटत असेल तर त्याचा तो भ्रम दूर करून ग्रंथदुर्भिक्ष्यानें साऱ्या देशी भाषांस सारखें व्यापिलें आहे अशी त्याची खातरी करून देणें, व त्याचा मानीव आनंद नाहींसा करणें यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं ! ज्या गोष्टींत अज्ञानापासून सुख होतें त्यांत ज्ञान संपाद्-ण्याचा प्रयत्न करणें हें केवळ मूर्खपणा होय पण वारंवार काय होतें कीं, आपण आपल्या अज्ञानानंदांत आपलें आयुष्य सुखानें कंठीत असतां, आपणास महद्दशा येते म्हणून म्हणा, किंवा या सृष्टींत कोणत्याही गाण्यानें निरंतर सुखी असूं नये असा तिचा नियमच आहे म्हणून म्हणा—कोणी तरी दिसण्यांत कांहींएक कारण नसतां शुद्ध हेव्यानें आमच्या डोक्यापाशीं आपल्या शहाणपणाची रड गाऊन आमची समाधानवृत्ति नाहींशी करून टाकतो ! **रिपोर्टर ऑन् धी नेटिव प्रेस** हा एक अशा प्रकारचा अधिकारी आहे. रा. साठे यांना आपलें कर्तव्य मुळींच करतां येत नाहीं असें आम्हांस वाटतें ! रयतेनें मोठ्या कष्टानें दिलेले सरकारच्या पदरचे अडीचशें-तीनशें रुपये दर-महिना घेत बसून, वर्षाच्या अखेरीस " या भाषेंत म्हणण्यासारखा ग्रंथ झाला नाहीं; त्या भाषेंत नांव घेण्यासारखा ग्रंथ निपजला नाहीं; धर्म, काम, व कवन यांहून नेटिव लोकांस

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ८५

खेडकरवैद्य अॅन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

तिमरा विषय हातीं धरतांच येत नाहीं, आणि तिहींत नरी मोठें वाखाणण्यासारखं कांहीं स्वकपोलकल्पित असेल असें म्हणाल तर तसेंही नाहीं. जे ग्रंथ अथवा पुस्तकें होतात, तीं बहुधा या विषयांवर; त्यांचा मगदूर कितपत असतो या गोष्टीची परिस्फुटता करण्यापेक्षां ती मुग्धच ठेवावी हें बरें ! वशिष्ठ गणित, रसायन, यंत्रकला. चित्रविद्या, तारायंत्र, व्यापार वगैरे उपयुक्त किंवा गहन विषयांवर पुस्तकें लिहिण्याची हौस अथवा आवश्यकता नेटिव लोकांस वाटत नाहीं; आणि ती वाटली नाहीं तोंपर्यंत देशी भाषांत चांगलें ग्रंथ निपजण्याचा संभव नाहीं; इतिहास. थोर पुरुषांचीं चरित्रें. असल्या विषयांचें माहात्म्यसुद्धां नेटिव ग्रथकारांस कळूं नये हें मोठें आश्चर्य आहे. "—असले अभिप्राय देण्यासाठीं आपणांस प्रतिमाशीं तीनशें रुपये मिळत नसतात, हें राजश्री साठे यांस कळत नाहीं याचेंच आह्मांस मोठें आश्चर्य वाटतें. ज्यांच्याकडून साक्षात् किंवा परंपरेनें आपला पगार आपणांस मिळतो त्यांचा दिल खुष होईल अशा रीतीचा रपोट करणें हें खऱ्या नोकराचें कर्तव्य • कीं त्यांना हळहळ वाटेल अशा प्रकारचें लिहिणें लिहिणें हें आपलें खाजवी कर्तव्य यांचीच मीमांसा राजश्री साठे यांस अद्यापि करतां आली नसावी असा आह्मांस संशय येतो. अबकारी, जंगल वगैरे खात्यांचे रिपोर्टस् रा. साठे यांच्या अवलोकनांत कधींच आले नाहींत काय ? लष्करी खात्याचा अवाढव्य खर्च छापविण्यासाठीं, नवनि मुलूख काबीज करण्यांत होणारा खर्च लोकांच्या डोळ्यांत सळूं न देण्यासाठीं, साहेब लोकांचे मोठमोठे पगार अखंड चालवून त्यांच्यासाठीं नवीन खातीं काढण्यांत होणारा खर्च लोकांच्या नजरेतून चुकविण्यासाठीं, नवीन करांचा बोजा ' त्राहित्राहि ' होऊन गेलेल्या प्रजेनें आनंदानें सहावा यासाठीं गुलजार रिपोर्टस् लिहिण्याची जी कला पादशाही अंमलाची सनत वृद्धि चिंतणाऱ्या यच्चावत

इंग्रजी अधिकाऱ्यांस साधली आहे तिचें अनुकरण तर सामान्य नेटिवाला कधींच करतां येणार नाहीं; पण अपकारी, फॉरेस्ट वगैरे खात्यांकडील लुंगेसुंगे अधिकारी देखील ज्या रीतीनें आपले रपोट सजवून देतात ती रीती रा. साठ्यांसारख्या गृहस्थांस अवगत नसावी, हें त्यांच्या हपीशिअलपणास बिलकुल शोभत नाहीं ! शिवाय, युनिव्हर्सिटींत देशी भाषांचा पुनः प्रवेश झाल्यास्वेरीज त्यांना सुदशा येणार नाहीं असें मत देणें म्हणजे तर आपल्या अधिकाराचा अतिक्रम करून अराजनिष्ठेच्या अपवित्र प्रदेशांत पाऊल टाकण्यासारखें खचित होय!

पण आमची समाधानवृत्ति ढवळण्याचें पाप हे साठेच करणारे आहेत असें नाहीं. घरच्या भाकरी खाऊन नसत्या उठाठेवी करणारे वा रिपोर्टरासारखे दुसरेही पुष्कळ गृहस्थ आहेत. हेही खुद्द स्वतःला व दुसऱ्याला हाच प्रश्न म्हणजे--मराठी भाषेंत चांगले ग्रंथ कां होत नाहींत---हा प्रश्न घालून त्याचें उत्तर स्वतः देण्याचा किंवा तें लोकांकडून काढण्याचा प्रयत्न करीत असतात ! पण मौल्यवान् वस्तूविषयीं प्रश्न केला म्हणजे तो गूढ होतो आणि सामान्य वस्तूविषयीं तो केल्र म्हणजे उत्तर देण्यास सोपा जातो असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि मौज अशी आहे कीं ज्या वस्तूचा नित्य सहवास आपणांस घडत असतो तिचें कार्यकारण आपणांस टाऊक नसून टाऊक असल्यासारखें उगीच वाटतें. ढग कां येतात, पाऊस कसा पडतो, मडक्यांतलें किंवा फडकें लावलेलें पाणी गार कां होतें, उलट टांगून ठेवलेलें पाणी कापडांतून का गळत

प्लॉट्स गाड्यानें देणें आहेत-फर्ग्युसनकॉलेज (पुणें) समोर-हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर--सुधारक पुणें.

असहितरतीनें अद्याप सोडलें नाहीं, हें यावरून उघड होतें ! इंग्लंडचें नुकसान न होतां दुसऱ्यांचें कल्याण यांच्या हातून होईल तर हे करणार! हिंदू लोकांस व चिनी लाकांस अफूच्या व्यसनांतून सोडविण्यासाठीं नेटिव संस्थानिकांचा व हिंदुस्थानसरकारचा केवढाही तोटा झाला तरी हरकत नाहीं; ख्रिस्ती लोकांनीं पैशासाठीं अफूचा व्यापार करणें आणि दुसऱ्या लोकांस अफूसारखें क्षयकारी विष चारणें यासारखें महापातक नाहीं । पण त्याच लोकांनीं स्वहितासाठीं आपली दुर्बल प्रजा 'नको नको' म्हणत असतां तिच्या घशांत बाटल्या कोंबून तिची नागवणूक करण्यास बिलकुल हरकत नाहीं! इंग्लंडांतून हिंदुस्थानाकडे दारूचा ह्वा तेवढा पूर वाहूं न देणें म्हणजे इंग्लिश व्यापाऱ्यांच्या व हिंदुस्थानच्या प्रजेच्य नैसर्गिक स्वातंत्र्याला असह्य प्रतिबंध करणें होय ! दारूच्य व्यापारांत ब्रिटिश सरकाराकडून या विलक्षण तत्त्वाचा गुप्तपणानें अवलंब होत नसता तर यंथील गुत्यांची संख्या प्रतिवर्षी वाढत कां जाती ? दारूचा खप अधिकाधिक कां होता ? आणि बाईट दारूच्या अतिसेवनापासून होणाऱ्या दुष्परिणामांचें वाढतें प्रमाण कां दृष्टीस पडतें ? अफूपेक्षां दारूचें व्यसन कैकडोपट बाईट आहे. तेव्हां ब्रिटिश परोपकाऱ्यांना आमच्या कल्याणाची खरोखर काळजी असेल तर ब्रिटिश अमलामुळेंच ज्या तीव्र व्यसनाचा येथें जारीनें प्रसार होत आहे त्याला प्रतिबंध करणें हे त्यांचें पहिलें कर्तव्य आहे.

पुनः पुनः जों जों विचार करावा तों तों इंग्लंडांतल्या लोकांनीं चिनी लोकांचा अफू तोडण्यासाठीं हिंदुस्थानसरकावर जबरी करून हिंदुस्थानांतला अफूचा व्यापार नाहींसा करण्याचा प्रयत्न करावा, याचा आह्मांस मोठा चमत्कार वाटतो ! अफूच्या विक्रीपासून हिंदुस्थानसरकारला प्रतिवर्षी आठनऊ कोटी रुपये उत्पन्न करतां येतात. अफूचा व्यापार बंद

साल्यास हे आठ-नऊ कोटी कोठून पैदा करावयाचे? या प्रश्नावर मि० केन वगैरे अफीणशत्रू असें उत्तर देतात कीं, नफानुकसान आम्ही जाणत नाहीं; अफू खाणें किंवा ओढणें ही गोष्ट फार वाईट आहे; व ती नाहींशी करणें हें आमचें कर्तव्य आहे. तें केल्यानें खात्रीनें व्यक्तींचें व हिंदुस्थानसरकारचें काय नुकसान होतें आणि त्यांनीं तें कसें भरून काढावें हें पहाण्याचें आमचें काम नाहीं. ज्यांना राज्य करावयाचें असेल त्यांनीं हवें तें करून जमाखर्चाची तोंडमिळवणी करावी." आमच्या मतें हें शुद्ध आडदांडपणाचें उत्तर होय. असल्या उत्तरानें निभाव लागावयाचा नाहीं, हें त्यांना ठाऊक आहे. मानीव नीतिकरतां एकाएकीं आठनऊ कोटी रुपये हिंदुस्थानसरकाराला घालवून बसतां येणार नाहीं, आणि म्हणून असल्या नीतिप्रवर्तकांनीं कितीहि आक्रोश केला तरी तें त्यांच्याकडे लक्ष देणार नाहीं, अशी यांची मनांतल्या मनांत पक्की खातरी असल्यामुळें, यांचेकडून वारंवार असेंहि सुचविण्यांत येतें कीं, लष्करी वगैरे खात्यांत काटकसर केली असतां आठ नऊ कोटी रुपये सहज वांचविता येणार आहेत; आणि तसें झालें म्हणजे अफूचा व्यापार बंद करण्यास मुळींच हरकत नाहीं. आमचें म्हणणेंहि तसेंच आहे. पण हे लोक ब्रिटिश पार्लमेंटांत ज्या खटपटी करीत आहेत त्यांवरून अफूचा व्यापार अगोदर बंद करण्याविषयीं यांचा जितका आग्रह दिसतो, तितका काटकसर करण्याविषयीं दिसत नाहीं. तात्पर्य, पुढें मागें या परोपकारी गृहस्थांच्या अफीणद्वेषामुळें आमच्यावर एखादा नवीन कर बसण्याचा मात्र संभव आहे !

निबंधसंग्रह.

भाग १ ला. किं. १। रु.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

घरं, इतकें आल्याघर तरी चिनी लोकांची अफू सुटेलच असा जिन्मा या परोपकाऱ्यांना घेतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. आह्मांवर ब्रिटिश लोकांचा लाषा चालतो यामुळें आमच्या नफानुकसानीकडे न पहातां त्यांना आमचा अफूचा व्यापार बंद करतां येणार आहे. पण हिंदुस्थानांतून अफू येत नाहीं असें पाहून खुद्द चीन देशांत अफू उत्पन्न करण्यास सुरुवात झाली आणि चिनी लोकांस प्रतिवर्षी जेवढी अफू लागते तितकी ते घरच्या घरीं पिकवूं लागले म्हणजे हे परोपकारी गृहस्थ काय करणार ? ही गोष्ट केवळ संकेतार्थी नाहीं. अफूच्या व्यापारासंबंधानें जी माहिती उपलब्ध आहे तीवरून असें दिसतें कीं, अलीकडे पर्शिआ (इराण) व चीन या देशांत घरीच अफू उत्पन्न होऊं लागली आहे. चिनी अफू हिंदुस्थानच्या अफूइतकी कसाला किंवा कैफाला उतरत नाहीं, असें म्हणतात! नसेल कदाचित्. पण चिनांत किंवा आशिया खंडांतल्या दुसऱ्या देशांत खसम्बशीचें झाड लागतच नाहीं किंवा वाढत नाहीं असें नाहीं. अफूची लागवड करण्याच्या कामीं चिनी लोकांचा अनुभव जसजसा वाढत जाईल तसतशी त्यांच्या अफूंत सुधारणा होऊन थोड्या वर्षांच्या आंत खुद्द चीन देशांतच शंभर नंबरी हवी तितकी अफू पैदा होण्याचा संभव आहे. असें झाल्यास आमच्या ब्रिटिश हितचिंतकांनीं चिनी लोकांचा फायदा न करतां आमचें नुकसान मात्र केल्यासारखें होईल ! यासाठीं त्यांनीं या अफूच्या धोंटाळ्यांत न पडतां आमची गाठली तोडाविल्यास आह्मांवर त्यांची मोठी मेहेरबानी होणार आहे !

अंडीं खाण्यास काय हरकत आहे ?

मांसाशनास आम्ही प्रतिकूल आहों, व मांसाशनाविरुद्ध आम्हीं अनेक वेळां लिहिलें आहे हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. तथापि मांसाहारांत अण्डाहाराचा अंतर्भाव होतो किंवा नाहीं याचा उल्लेख आमच्या लेखांत स्पष्टपणें कोठेंही झालेला नाहीं; आणि कांहीं अंशीं आम्हीं तो मुद्दाच केलेला नाहीं; कारण त्याविषयीं आमच्या बुद्धीचा पक्का निर्णय अद्यापि व्हावयाचा आहे ! तथापि आमच्या एका मित्रानें अंडाहाराच्या बाजूनें पुढें जो मजकूर लिहिला आहे तेवढ्यावरून तो आम्हास स्वीकरणीय होतो असें आम्हांस वाटत नाहीं. येवढें खरें आहे कीं मांसाहाराची निरुपयुक्तता किंवा त्याज्यता सिद्ध करण्यास्तव जितकीं कारणें देतां येतात तितकीं कारणें अंडाहारा विरुद्ध देतां येणार नाहींत. पण असें आहे म्हणून अंडीं खाण्यास कांहीं हरकत नाहीं असें म्हणणें मोठी चूक आहे. मांसाहतकीं अंडीं निषिद्ध नाहींत हें खरें; पण त्यावरून तीं धान्याहतकीं किंवा फळांहतकीं प्रशस्त आहेत असेंही म्हणतां येणार नाहीं. तथापि त्यासंबंधानें आमचें काय म्हणणें आहे तें सांगण्यापूर्वी आमच्या मित्रानें अंड्याची जी तरफदारी केली आहे ती वाचकांपुढें ठेवणें योग्य दिसतें:—

" अलीकडे अत्यंत वादग्रस्त होऊन बसलेला जो मांसाहाराचा विषय त्याविषयीं मी आज तुम्हांस लिहूं इच्छित

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ८८

सुधारक ऑफीस, पुणें

नाहीं. यासंबंधानें तुमचा आमचा बऱ्याच वर्षांचा तेढा आहे व तो एकदम निघण्याची आशा नाहीं. तथापि अंडीं खाण्याच्या संबंधानें तुम्हां आम्हांत तसा वेचनाव होण्याचें वास्तविक कारण निदान मला तरी दिसत नाहीं. मांस आणि धान्य किंवा फळ यांच्या दरम्यान अंडीं ठेवतां येतील असें मला वाटतें; व एका दृष्टीनें मांसान्नापेक्षां धान्यान्नाशीं अंडान्न विशेष सदृश आहे असें विचारांतीं कोणासही कबूल करावें लागेल. अंडीं खाण्यांत कोणत्याही प्रकारची अमानुषता नसून शरीरपोषणाला अंड्यासारखें दुसरें अन्न नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. ही खात्री होण्यास माझ्या एका डाक्तर स्नेह्यानें करून पाहिलेला पुढील प्रयोग कारण झाला. या डाक्तराचा आणि माझा यासंबंधानें अनेक वर्षें वाद चालला होता; पण त्याला अनुभवशास्त्र कसें लावावें हें आम्हांस समजेना. अखेरीस आम्हांस एक युक्ति सुचली. गेल्या वर्षी माझी कुत्री विऊन तिला नऊ सुरेख पिल्लें झालीं. या पिलांना निरानिराळ्या तऱ्हेचे आहार दिले असतां त्यांवर त्यांचे परिणाम स्पष्टपणें दिसून येतील अशी कल्पना बोलतां बोलतां निघाली आणि ती आम्हीं अमलांत आणण्याचा लागलीच निश्चय केला. माझ्या स्नेह्याला अंड्यांशीं व्यवहार करण्यास प्रत्यवाय नसल्यामुळें हा प्रयोग करून पहाण्यास त्याची संमति पडली. नंतर तीन पिल्लांपेक्षां दोन आणि सारखीं पिल्लें पाहून एकाला मी आपल्या घरीं घेऊन गेलों आणि त्याला दूध, भात वगैरे अन्नाहार सुरू केला; दुसऱ्या पिल्लास माझ्या स्नेह्यानें अंडीं व मांस चारण्यास सुरवात केली. चार महिन्यांच्या अखेरीस दोघां कुत्र्यांच्या प्रकृतींत विलक्षण फेरफार दिसून आला. मांस व अंडीं खाणारें पिल्लूं चपळ व जोर-

दार दिसूं लागलें, आणि दूधभातावर पोसलेलें पिल्लूं बरेंच मंद च कमजोर असें झालें ' यापुढें आणखी ज्या प्रक्रिया आहीं करून पाहिल्या त्यावरून आमच्या नजरेस असें आलें कीं जिवंत प्रकृतींना नायत्रोजन पेक्षां आल्ब्युमन अधिक हवा असतो. नायत्रोजन फाजील झाला तर तो स्नायूंत जाऊन बसता आणि पुढें स्नायूंवर काम पडलें असतां उपयोगास येतो; परंतु हायड्रोकारबनाचा अतिरेक झाला तर त्यापासून चरबी वाढून रुधिराभिसरण नीट होण्यास अडचण पडूं लागते. ज्या अन्नांत कारबन फार आहे त्यामुळें वार्धक्य लवकर येतें व ज्यांत नायत्रोजन फार आहे त्यानें तें सावकाश येतें. अंड्यांत नायत्रोजन फार आहे, आणि म्हणून भात, साखर, दूध वगैरे पदार्थांपेक्षां दीर्घायुचिंतकांनीं अंड्यांचा विशेष उपयोग केला पाहिजे. ''

आमच्या मित्राच्या या ' प्रयोगा ' पासून, ' प्रक्रिये ' पासून किंवा ' अनुभवा ' पासून विशेष कांहीं निष्पन्न झालें आहे असें आम्हांस वाटत नाहीं. मांसाहारी प्राण्यास मांस मिळालें तरच त्याची वाढ चांगली होते, नाहीं तर होत नाहीं, येवढीच गोष्ट या प्रयोगामुळें सिद्ध झाली. पण ही नाकबूल केली होती कोणी ? सिंह, वाघ, मांजरें वगैरे जनावरांप्रमाणें कुत्राही मांसाहारी जनावर आहे, आणि म्हणून त्याच्या पोषणाला मांस अवश्य आहे, असें डाक्तरांनां मनुष्याच्या पोषणालाही तें अवश्य आहे असें अनुमान करण्यास काय आधार मिळतो ? कुत्रा

कॅलेंडर:-दरसाल डिसेंबर अखेर आम्ही छापवीत असतों. ट. हं. करितां ८१ पाठविल्यास कोणासही त्याबद्दीं तें फुकट मिळेल.

मॅनेजर.

सुधारक प्रिं. वर्क्स, पुणें सिटी.

आणि मनुष्य हे दोघेही प्राणी आहेत येवढ्याच आधारावर जें अन्न कुत्र्यांना पोषक होतें तेंच मनुष्यानांही पोषक होईल असा सिद्धांत करतां येत नाहीं. तो करतां येण्यास कुत्र्याप्रमाणें मनुष्यही जात्या मांसाहारी प्राणी आहे असें दाखविलें पाहिजे. पण तें तर आमच्या मित्राच्या किंवा त्याच्या डाक्टर स्नेह्याच्य प्रयोगांत कोठेंही दिसत नाहीं ! उलट त्याच्या प्रयोगावरून येवढेंच दिसून येतें कीं, जात्या मांसाहारीं प्राण्याचा देखील धान्याहारावर चरितार्थ होऊं शकतो ! शिवाय आपण हेंही पहातों कीं पुष्कळ कुणबी लोकांपाशीं व धनगर लोकांपाशीं असलेल्या कुत्र्यांचा बहुतेक चरितार्थ धान्याहारावर होत असून त्यांच्या अंगीं मांसाहारी कुत्र्यांपेक्षां विशेष कमी सामर्थ्य असल्याचें चिन्ह दृष्टीस पडत नाहीं. पण मांसाहारी कुत्र्यांपेक्षां त्यांत जो एक विशेष दृष्टीस पडतो तो हा कीं, ती क्रूर असून अधिक विश्वासू व कष्टाळू असतात. तेव्हां आमचा मित्र सिद्ध करायला गेला एक गोष्ट आणि त्याच्याकडून सिद्ध झाली भलतीच गोष्ट असें आम्हांस वाटतें ! मांसांत किंवा अंड्यांत खरोखरीच कांहीं अद्वितीय शक्तिवर्धक व आयुष्यवर्धक गुण असतील तर त्या चिजा बैलाला किंवा घोड्याला चारल्यानेंही कुत्र्यासारखे त्यांवरही त्यांचे परिणाम घडले पाहिजेत. पण ते तसे घडतात काय ? अगोदर घोड्याला आणि बैलाला मांस व अंडीं चारणें हेंच अशक्य आहे. घोड्यापुढें किंवा बैलापुढें मांसानें व अंड्यांनीं भरलेलीं घमेलीं किंवा पांट्या भरून ठेवाल तर तीं जनावरें, कितीही भूक लागली तरी, त्यांच्या वासाबरोबर आपलीं दांतीं व दुवासेंनें तोडून पळून जातील असें आम्हांस वाटतें ! तात्पर्य, तुमचें मांस आणि तुमचीं अंडीं विशेष प्राणिवर्गास कितीही महत्वाचीं असलीं तरी तीं साऱ्या प्राणिकोटीस तशीं होतील असें कदापि

म्हणतां येणार नाहीं. वास्तविक पाहतां मांसांत किंवा अंड्यांत किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या अन्नांत अमुक पोषकता आहे आणि अमुक नाहीं, असा सामान्य किंवा केवळ सिद्धांत करतां येणार नाहीं. कोणत्याही वस्तूंचें पोषकत्व ज्या वनस्पतीला किंवा प्राण्याला तें खत किंवा अन्न म्हणून घालावयाचें असतें त्याच्या प्रकृतीवर अवलंबून असतें. ज्या जमिनीवर दुसऱ्या झाडाचें बीं उगवणार देखील नाहीं त्या जमिनीवर घायाळ, निवडुंग, शेर अथवा टंरणी हवीं तशीं माजतील ! ज्या पाल्याला दुसरीं जनावरें तोंड देखील लावणार नाहींत तो खाऊन शेळ्या व सांडणी पुष्ट होतील आणि विपुल दूध देतील ! भाताच्या कोंडयाइतकी नीरस वस्तु क्वचितच असेल; पण गाढवाच्या प्रकृतीवर त्याचा किती विलक्षण परिणाम होतो तो पहा ! पावसाळ्यांत उठावणीला आलेल्या गाढवास भाताच्या शेरदीडशेर कोंडयासारखा दुसरा खुराक नाहीं, असें सांगतात ! पण या जनावरांची गोष्ट तरी कशाला पाहिजे ? मनुष्यजातीच्या लहान मुलाचीच गोष्ट कां घ्यावी ? मांस व अंडीं अत्यंत पौष्टिक द्रव्यें आहेत असें समजून तीं लहान मुलांस आईच्या दुधाऐवजीं दिलीं तर चालतील काय ? कधींही चालावयाचीं नाहींत. तसेंच, मोठीं मनुष्यें सर्वच आहार मांसावर व अंड्यांवर करूं म्हणतील तर त्यांचा निभाव लागेल काय ? लागेल असें आम्हांस वाटत नाहीं. कारण मनुष्याची शक्ति रहाण्यास व तो दीर्घायुषी होण्यास त्यानें मांस खाल्लेंच पाहिजे असें

ब्रह्मी वाम-मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

ह्मणणारे देखील त्यानें शुद्ध मांसाहार करावा असें सांगत नाहींत. उलट मांसाहार न करणारे लोक शतायु होऊन गेल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. मांसात किंवा अंडयांत जितकीं पोषक द्रव्यें आहेत तितकीं कांहीं प्रकारच्या धान्यांत व फळांत असून मांसापासून व अंड्यापासून घडणारे अपाय त्यांपासून घडण्याची मुळींच भीति नाहीं. तेव्हां अंडीं खाण्याची अवश्यकता कां असावी, हें आह्मांस कळत नाहीं !

अफूचा व्यापार.

थोड्या दिवसांपूर्वी या मादक वस्तुविषयीं एकवार लिहिलें असून आज फिरून तोच विषय हातीं घेण्यास इंग्लंडाहून नुकतींच आलेलीं वर्तमानपत्रें कारण झालीं. या पत्रांत या विषयाविषयीं पार्लमेंट सभेंत जो कांहीं दिवसांपूर्वी वादविवाद झाला त्याची सांगोपांग हकीकत दिली आहे. या हकीकतीवरून अहिफेनाचे शत्रू आजच आह्मांवर आपल्या परोपकारबुद्धीची गदा आणूं शकतील असें वाटत नाहीं ! तथापि या हितचिंतकांच्या वर्तनावर नेहमीं करडी नजर ठेविली पाहिजे; नाहीं तर हे बोलतां बोलतां गंडा घालावयास सोडावयाचे नाहींत ! १८९१ सालीं यांनीं मोठ्या हिकमतीनें हौस ऑफ कॉमन्स सभेकडून असा ठराव पसार करून घेतला होता कीं, हिंदुस्थानसरकार चिनाशीं अफूचा जो व्यापार करतें तो तिला दृष्ट्या अत्यंत दूषणीय आहे, आणि ह्मणून तो नाहींसा करण्याबद्दल हिंदुस्थानसरकारानें हरएक प्रयत्न केला पाहिजे.

बिचाऱ्या हिंदुस्थानसरकाराला आवडो अथवा न आवडो, आपल्या सासूच्या म्हणजे ब्रिटिश हौस ऑफ् कॉमन्सच्या हुकमांकडे थोडें बहुत तरी लक्ष्य द्यावें लागतें ! हौस ऑफ् कामन्स सभेंत अफूचा व्यापार अप्रशस्त ठरल्याबरोबर, आमच्या सरकारांला तो ठराव अमलांत आणण्यासाठीं थोडेबहुत हातपाय हलवावे लागले व गेल्या दोन वर्षांत त्या सरकारानें या कामीं आपलें बरेंच नुकसान करून घेतलें आहे. पण येवढ्यानें अफूच्या शत्रूंचें समाधान झालें नाहीं. कोठून होणार ? हिंदुस्थानच्या अफूचा व्यापार अजीबात नाहींसा करून टाकण्यासाठीं ज्यांचा अवतार झालेला त्यांना तिचा देशांतल्या देशांत व बाह्यदेशीं होणारा व्यापार नुसता कमी होत चालला आहे हें पाहून कोठून समाधान होणार ? अर्थात् नाहीं. हिंदुस्थानांत खसखशीचें झाड एकही लागूं नये, व त्याच्या मादक फळांतील रसावर एकही चिनाच्या चिलमीचा अथवा गोळीचा गुजारा होऊं नये, अशी यांची बऱ्हवत्तर इच्छा असल्यामुळें यांनीं थोड्या दिवसांपूर्वी शिताफीनें १८९१ च्या ठरावापेक्षां आपणांस विशेष अनुकूल असा दुसरा ठराव पसार करून घेण्याचा घाट घातला होता. पण सांप्रत अधिकारारूढ असलेल्या लिबरल पक्षाचा जो मुकुटमणी मि. ग्लॅड्स्टन् याच्या लोकोत्तर चातुर्यामुळें त्यांचा तो घाट समूळ फसला इतकेंच नाहीं, तर त्यांनीं पसार करून घेण्यासाठीं

---

* कॅलेंडर:-दरसाल डिसेंबर अखेर आम्ही छापवीत असतों. ट. ह. करितां ८१ पाठविल्यास कोणासही त्याबेळीं तें फुकट मिळेल.

मॅनेजर.

सुधारक मि. ब्यूरो, पुणें सिटी.

हेंही नीट समजणें जरूर आहे. आम्हीं हिंदुस्थानचें म्हणजे बीस पंचवीस कोटी लोकांचें राज्य करतों. या पंचवीस कोटींतील बरेच लोक जरी पाहिजे त्याच्या तंत्रानें चालण्यासारखे आहेत, तरी बऱ्याच लोकांना स्वतंत्रपणें विचार करण्याची व तदनुसार वर्तन करण्याची अक्कल आहे. अशा लोकांचें दारू आणि अफू याबद्दल काय मत आहे तें पाहिजे. अफूसारखी दुसरी वाईट वस्तु नसेल; पण दारू कांहीं कमी वाईट नाहीं, मिशनरी लोक हिंदू लोकांतून अफूचें व्यसन पिटाळून लावण्याचा जो उद्योग करीत आहेत तो अगदीं स्तुत्य आहे आणि मनांतल्या मनांत त्याबद्दल मी त्यांची प्रशंसा करतों. पण या मिशनरी लोकांत एक गोम आहे ती ही कीं, या लोकांस शांत आणि व्यापक असा विचार करण्याची फारशी सवय नसते. हे म्हणतात त्या-प्रमाणें जाणूनबुजून अफूचा व्यापार करणें ही अनीति असेल पण ही अनीति नाहींशी करण्याचा एकाएकीं प्रयत्न केल्यास या अनीतीहून दुसऱ्या मोठ्या अनीति हातून घडूं लागल्या तर कसें ? समजा कीं हिंदुस्थानसरकारानें एका बैठकीस अफूच्या लागवडीची सक्त मनाई केली तर तिचा पुढें काय परिणाम होईल हें पहावयाला नको काय ? आज एकाएकीं चार कोटी रुपयांचें नुकसान भरून कसें काढावयाचें ? मि. देव यांनी अफूचे शत्रू म्हणताना कीं, काटकसर कोठें करावयाची ? मुलकी व लष्करी खात्यांत. आणि ती त्यांत होण्यासारखी नसेल तर ? तें कसेंही असो; कोठें तरी काटकसर करून हे चार कोटी रुपये उभे केले पाहिजेत. अहो, पण ते कशावयाचे करो ? तें आम्ही जाणत नाहीं; तें शोधून काढण्यासाठीं येथे व हिंदुस्थानांत रॉयल कमिशन नेमावें. काय पाहिजे तें करा; अफूचा व्यापार बंद केला पाहिजे, कारण तो अत्यंत अनीतिमूलक आहे, असे हे लोक म्हणतात ! याचर प्रत्युत्तरादाखल या लो-

[redacted] विरोध [redacted] स्वास्थ्यास व प्रगतीस अत्यंत अपरिहार्य अशी जीं राजकीय नीतितत्वें आहेत तीं पाळणें अशक्य होणार आहे, आणि तसें झाल्यास सारांच घोंटाळा व अनवस्था होणार आहे. खसखशीची लागवड आज एकाएकीं बंद केली तर त्या धंद्यावर जे लाखों गरीब लोक पोट भरीत आहेत त्यांनीं कोणीकडे जावें ? तेंही असो; आम्ही प्रतिवर्षी अफूच्या ज्या ७६,००० पेट्या विकतों त्यांपैकीं निदान३०,००० पेट्या नेटिव संस्थानांकडून आलेल्या असतात. हें त्यांचें उत्पन्न नाहींसें करण्याचा आम्हांस काय अधिकार आहे ? आणि आम्ही तें दांडगाईनें नाहींसें केल्यास, त्यांच्या गरीब प्रजेनें म्हणजे अफूची लागवड करणाऱ्या प्रजेनें आपला चरितार्थ कसा चालवावा ? या नुकसानाबद्दल नेटिव संस्थानिकांची द्रव्यद्वारा कांहीं तरी समजूत काढणें अवश्य नाहीं काय ? असेल तर ती रक्कम कोठून आणावयाची ? प्रतिवर्षी चिनांत जी अफू खपते तिचा एक चतुर्थांश किंवा एक पंचमांश त्या देशाला आम्ही विकल्यानें आमच्या पदरीं जें पाप येत असेल तें नाकारण्याची माझी इच्छा नाहीं; पण तें नाहींसें करण्यासाठीं हिंदुस्थानची लष्करी किंवा मुलकी मजबुती कमी करून वांसपंचवांस कोट लोकांचें जीवित व वित्त संकटांत घालणें, नेटिव संस्थानिकांशीं बेइमानीपणाचें किंवा दांडगाईचें वर्तन करणें, आपल्या आणि त्यांच्या प्रजेपेक्षां अनेक

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

लोकांस एकाएकीं अन्नासाठीं मोताद करून सोडणें इत्यादि गोष्टी कर्मी पापकारक होतील असें मला वाटत नाहीं; आणि म्हणून आपल्या हातून त्या न होऊं देतां, अफूचा व्यापार बंद करण्याचा जेवढा उपाय करवेल तेवढा करावा, हें मला उचित दिसतें; आणि याच हेतूनें मी असें सुचवितों कीं, मि. वेब यांचा ठराव रद्द करून त्याच्या जागीं असा ठराव करावा कीं, " हिंदुस्थानांतील अफूचा व्यापार नीतिदृष्ट्या अत्यंत अप्रशस्त आहे असें प्रतिपादण्यांत आल्यावरून या सभेचें असें मत झालें आहे कीं, अफूपासून उत्पन्न कमी करीत जाण्याचा हिंदुस्थानसरकारानें जो प्रघात पाडला आहे तो तसाच चालू ठेवावा आणि एक रॉयल कमिशन नेमण्यासाठीं बादशाहिणीस प्रार्थना करावी. या कमिशनानें ज्या गोष्टींची चौकशी खरावयाची त्या त्या होत:-(औषधांशिवाय इतर उपयोगासाठीं ब्रिटिश हिंदुस्थानांत अफूची जी लागवड व विक्री होते ती बंद करावी किंवा नाहीं, आणि हा प्रतिबंध नेटिव संस्थानांस लागू करतां येईल किंवा नाहीं; (२) सध्यां नेटिव संस्थानांत पिकणारी अफू कोणत्या अटीवर ब्रिटिश मुलखांतून जाते, व त्या अटी कोणत्या रीतीनें नाहींशा करतां येतील; (अफूचे उत्पन्न नाहींसें केल्यानें हिंदुस्थानच्या जमेवर कोणते परिणाम होतील व या परिणामांचा विचार करतांना (अ) नुकसान भरून देण्यास लागणारी रक्कम, (ब) बंदी करण्यास लागणारा खर्च, (क) आणि जमेचें नुकसान यांचा आंकडाही निघाला पाहिजे;(४) अफूचाव्यापार कमी करून त्यावरील उत्पन्न वाढविण्यासाठीं केलेले जे नियम सध्यां अंमलांत आहेत त्यांत अफूचा व्यापार अजीबाद बंद करावा अशा अर्थाच्या फेरफाराव्यतिरिक्त दुसरा एखादा फेरफार करणें अवश्य आहे कीं काय ? (५) हिं-

हुस्थानांतील कोणत्या जातींत किंवा अफू खपते, आणि तिच्या सेवनापासून त्यांच्या प्रकृतीवर व नीतीवर काय परिणाम घडतो; ६ औषधांवांचून इतर कामासाठीं अफूचा उपयोग करण्याविषयीं आणि त्या उपयोगाची बंदी करण्यास जो खर्च लागेल तो सारा किंवा त्याचा कांहीं भाग वहाण्याविषयीं हिंदुस्थानच्या लोकांचें काय म्हणणें आहे, इत्यादि गोष्टींची चाचपाघाट करून कमिशनानें रिपोर्ट करावा.

मि. ग्लॅडस्टन यांच्या या सूचनेची कान्सरव्हेटिव पक्षाच्या वतीनें मि. **कर्झन** यांनीं फारच तारीफ केली. त्यांच्या बोलण्याचा भाव असा होता कीं, हा व्यापार बंद केल्यानें चीनचा काडीइतका फायदा न होतां हिंदुस्थानचें मात्र अतोनात नुकसान होणार आहे.

एकंदरीत अफूच्या परोपकारी शत्रूंना तूर्त प्रतिकूळ काळ आला आहे आणि तो तसा राहील तोंपर्यंत आमचा धडगत आहे असें आह्मांस वाटतें.

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र

संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपाया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

हिंदुस्थानचं राज्य कोणासाठीं ?

अथवा

सिव्हिलसर्विसलसाठीं समकालीन परीक्षा.

नेटिव लोकांस सरकारी नोकरींत किती घ्यावें आणि किती घेऊं नयें याविषयीं सांहेबलोकांत जी चर्चा चालते तिचें बाह्य स्वरूप कसेंही असलें तरी तिच्या मुळाशीं **हिंदुस्थानचे राज्य कोणासाठीं करावयाचें** हा मुख्य प्रश्न असतो. हिंदू लोकांस स्थानिक स्वराज्याचें हक्क द्यावे; हिंदुस्थानांत यांत्रिक शिक्षणाचा व कारखान्यांचा प्रसार व्हावा. हिंदुलोकांत विद्या-भिवृद्धि व्हावी; दिवाणी, फौजदारी, व लष्करी खात्यांत प्रतिवर्षी अधिकाधिक नेटिव नेमीत जावे. हिंदुस्थानांतील कायदे करणाऱ्या सभांत लोकनियुक्त सभासद असावे; हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा चालला आहे हें पार्लमेंटानें मसून मधून लक्षपूर्वक पहात असावें; सारांश जेणेंकरून प्रतिवर्षी नेटिव लोकांचें पाऊल पुढें पडत जाईल, अशा रीतीनें हिंदुस्थानचें राज्य करावें, असें प्रतिपादणारे जे इंग्रज लोक आहेत, त्यांच्या बुद्धीचा असा सिद्धांत झालेला असतो कीं, एका देशानें दुसऱ्या देशाचें निरंतर राज्य करणें अशक्य आहे इतकेंच नाहीं तर तसें होणें त्या दोनही देशांस किंवा राज्या जगास कोणत्याही प्रकारें परिणामीं हितावह होणार नाहीं. आज नाहीं उद्यां ज्यांचें राज्य त्यांच्या हातांत पडणें हेंच इष्ट आहे. कारण, तसें झालें तरच जगांतील द्वंद्वें नाहींशीं होऊन त्यांस शांतीचा आणि तज्जन्य इतर सुखांचा उपभोग मिळणार आहे. हीं राज्यतत्त्वें इंग्रज लिबरल पक्षाच्या; निदान त्यांच्या अग्रणाच्या, मनांत लहान-

पणापासून चिकून गेलेलीं असतात, व त्यां पक्षास अधिकार प्राप्त झाला असतां त्यांचें वर्तन थोडेंबहुत तरी या तत्वांच्या अनुरोधानें होतें. उलट, लष्करी खात्यांतील मोठमोठ्या जागा नेटिव्ह लोकांना कधींच देतां कामा नये; वरिष्ठ शिक्षणाचा प्रसार अपायकारक आहे, शेतकीची सुधारणा आणि तिला लागणाऱ्या यंत्राचें ज्ञान या गोष्टी हिंदू लोकांस पुरे आहेत; इतर कारखान्यांच्या नादांत त्यांनीं पडण्यांत कांहींएक अर्थ नाहीं. सर्व खात्यांतिल वरच्या जागा युरोपिअन लोकांच्या हातीं असल्या तरच हिंदुस्थानचा राज्यकारभार नीट चालून त्या देशांत शांतता राहील व तज्जन्य सुखही लोकांस मिळेल- यामुळें म्हणत असणाऱ्या इंग्रज लोकांची अशी खातरी होऊल गेलेली असते कीं, राज्यापासून परिणामीं जगाचें अथवा हिंदुस्थानचें हित होवो अगर न होवो, तें राज्य खुद्द आपल्या देशास निरंतर फायद्याचें आहे, आणि म्हणून हरप्रयत्नानें त्याचें संगोपन करणें आपलें कर्तव्य आहे. इंग्लंडांत ज्यांना कान्सरव्हेटिव अथवा टोरी पक्षाचे लोक म्हणतात, त्यांचीं मतें बहुधा अशा प्रकारचीं असतात. एखादे वेळीं उलट प्रकारही असण्याचा संभव आहे. पण तसें झाल्यास, टोरीला टोरी आणि व्हिगला व्हिग म्हणणें हेंच बरोबर नाहीं. टोरी आणि व्हिग या विवक्षित मतप्रदर्शक संज्ञा मानिल्या तर कोणत्याही पक्षाचा अथवा कुलाचा विचार न करतां, प्रत्येक राष्ट्र स्वराज्याकालीं असावें असें प्रतिपादणाऱ्यांस-व्हिग आणि एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राचें निरंतर राज्य

निबंधसंग्रह.

भाग १ ला. किं. १। ६.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

करण्यास कांहीं हरकत नाहीं असें म्हणाऱ्यांस टोरी, अशीं नावें द्यावीं लागतील. सनदी नोकऱ्यासाठीं हिंदुस्थानांत व इंग्लंडांत **समकालीन परीक्षा** असाव्या असें म्हणणारे सारे इंग्रज लोक सरे **व्हिग्ज** आहेत, आणि त्या नसाव्या असा म्हणणारे पक्के **टोरीज** आहेत ! **व्हिग** म्हणजे हिंदुस्थानचा हितचिंतक इंग्रज आणि **टोरी** म्हणजे हिंदुस्थानाचा हितशत्रु इंग्रज अशा या दोन नांवांच्या स्थूल व्याख्या आमच्या वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यास हरकत नाहीं ! या दोहोंपैकीं पहिल्याचें हितचिंतकत्व त्याच्या नैसर्गिक परोपकारबुद्धीपासून व दुसऱ्याचें हितशत्रुत्व त्याच्या निःसीम स्वहितपरायणतेपासून उत्पन्न होतें.

हे सामान्य विचार डोळ्यापुढें ठेविलें असतां **समकालीन परिक्षां**विषयीं सध्या येथें व इंग्लंडांत जी चर्चा चालली आहे तींत अमुक मनुष्य रीतीनें कां बोलतो व लिहितो, हें सहज समजणार आहे. मि. **पॉल** व त्यांचे मित्र--ज्यांनां या समकालीन परीक्षांच्या ठरावाचा बार मोठ्या शिताफीनें कॉमन्सकमिटींत अचानक उडवून दिला--त्यांना हिंदुस्थानास क्रमाक्रमानें ऊर्जित दशा येत जावी, व शेवटीं तो स्वतंत्र व्हावा असें वाटत असेल, याबद्दल आम्हांस शंका नाहीं. पण या विलक्षण ठरावास इतके टोरीज व व्हिग्ज प्रतिकूल असतां ज्यांनीं हा ठराव कोणत्या रीतीनें अमलांत आणावा याविषयीं हिंदुस्थानसरकारचा अभिप्राय घेण्यासाठीं तो त्याजकडे पाठविण्याचें ठरविलें त्या गृहस्थांनाही दिवसेंदिवस हिंदुस्थानची स्थिती अधिकाधिक सुधारत जाऊन अखेरीस इतर देशांप्रमाणें त्यासही स्वातंत्र्यसुख मिळणें इष्ट आहे असें वाटत असलें पाहिजे. तसें स्वरूप असल्यावांचून अशा ठरावाला त्यांनीं असलें खांचेल येऊं दिलें नसतें. **ग्लॅडस्टन, मॉर्ले, हारकोर्ट,**

रिपन, किंबरले, वगैरे सांप्रत प्रधानमंडळांत जे व्हिगमंत्री आहेत त्यांच्या पूर्वापार शिक्षणाचा, भाषणाचा, आणि वर्तनाचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, या प्रसंगीं हे गृहस्थ अधिकारारूढ होते म्हणूनच अशी गोष्ट झाली, नाहीं तर झाली नसती. आयरिश लोकांना स्वातंत्र्य-स्थानिक राजकीय स्वातंत्र्य-देण्यासाठींच ज्यांचा अवतार झाल्यासारखा दिसतो त्या पुरुषांना हिंदुस्थानांत व इंग्लंडांत **समकालीन परीक्षा** होऊन त्यांच्या निकालाप्रमाणें सनदी नोकऱ्या देण्यांत याव्या हें न्याय्य आहे, असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. पण शिक्षणानें, सहवासानें, व विचारानें मनुष्यामनुष्यांत केवढें अंतर पडतें तें पहा. हिंदुस्थानचे सेक्रेटरी **लॉर्ड किंबरले** हे इंडिआकौन्सिलचे अध्यक्ष होत, अध्यक्षाशिवाय इंडिआकौन्सिलांत जनरल लम्सडेन, सर जॉन स्ट्रॅची, सर डोनॅल्ड स्टीवर्ट, सर ए. आरब्युथनॉट आणि सर जे. पॉल असे पांच सभासद आहेत. या सभ्यांनीं हिंदुस्थानांत मोठमोठ्या जागा भरल्या असून त्यांबद्दल आतां त्यांना जाडीं जाडीं पेनशनें मिळत आहेत. हे सारे बुद्धिमान व राजकारस्थानकुशल असून त्यांना हिंदुस्थानच्या लोकस्थितीची पुष्कळ माहिती आहे असा त्यांचा लौकिक आहे. पण या सर्व गोष्टींचा त्यांच्या मनावर कसा परिणाम झाला आहे तो पहा ! एकानें तरी **समकालीन परीक्षा** घेणें योग्य आहे असें म्हणावयाचें होतें ! कोठून म्हणणार ? दुसऱ्यावर अंमल गाजविण्यांत, दुसऱ्याच्या श्रमाचे फळ नाहींसें

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर, सुधारक छा. ऑफिस, पुणें.

करण्यांत ज्यांच्या आयुष्याचा उत्तम भाग गेला; ज्यांचा सांप्रत चरितार्थही अशा रीतीनें केलेल्या नोकरीच्या पेन्शनावर अवलंबून आहे; ज्यांना मनुष्य जातीचे स्थाईक कल्याण कशांत आहे व तें कशानें होईल याचा विचार करण्यास फुरसत सांपडली नाहीं, आणि कोणी तें समजावून देण्याचा प्रयत्न केल्यास तें समजून घेण्याची बुद्धि किंवा इच्छा नाहीं; सारांश, जे इंग्लंडच्या स्वतंत्र वातावरणांत जन्मास आले असून व सध्यां रहात असून, परान्न सेवनामुळें व पराभूत लोकांच्या दीर्घ सानिध्यामुळें ज्यांच्या अंत:करणांतील उदार विचारांचें बीज नष्ट झालें आहे त्यांना पतित लोकांनीं हळू हळू वर यावें आणि अखेरीस स्वतंत्र व्हावें, असें वाटणें अशक्य आहे. हिंदू लोकांच्या अधिकारवृद्धीचा व त्यांच्या भावी स्वातंत्र्याचा विचार यांच्या डोक्यांपुढें आल्याबरोबर आपला निभाव कसा लागेल; आपल्या पोरावाळांस मुबलक द्रव्य संपादण्यास व अधिकार गाजविण्यास कसें सांपडेल; आपल्या देशाच्या राज्यविस्ताराची आणि त्याच्या व्यापाराची काय अवस्था होईल; आणि आपलें राज्यवैभव गेलें असतां आपणांस केवढी दुर्गती प्राप्त होईल–अशा विचारांनीं यांच्या वृत्ति वेडावून जाऊन, हिंदुलोकांवर हरप्रयत्नानें सतत अंमल चालविणें यांतच इंग्लंडचें हित आहे अशी कल्पना देशबांधवांची खात्री करण्यासाठीं अगदीं मूर्ख मनुष्याच्या विचारांसारखे विचार यांच्या डोक्यांतून निघतात, आणि " तुम्ही आमचे गुलाम होऊन राहण्यांतच तुमचें खरें कल्याण आहे " अशा आमच्या खात्री करण्यासाठीं अगदीं अजागळपणाचे बोल हे बोलतात यांत कांहीं नवल नाहीं. असल्या कौन्सिलदारांचे अभिप्राय धाब्यावर बसवून, लॉर्ड किंचरळे यांनीं आपल्या पक्षाचें विरुद्ध राखण्यासाठीं मि. पॉल यांचा ठराव कोणत्याहितीनें अंगलांत

आणितां येईल याविषयीं हिंदुस्थानसरकारचा अभिप्राय घेण्यासाठीं तो त्याजकडे पाठवून दिला हा त्यांचा केवढा मोठेपणा होय ? कॉन्सरव्हेटिव अथवा टोरी गव्हर्नर जनरळ लॉर्ड लॅन्सडौन आणि त्यांचे बुरोक्राटिक अथवा हपीशिअल कौन्सिलर्स यांचा या ठरावावर काय अभिप्राय पडतो हें पहावयाचें आहे; नव्याण्णव वाट्यांनीं तो प्रतिकूळ पडेल असें या पक्षाच्या अंमलदारांच्या आजपर्यंतच्या इतिहासावरून व मतांवरून अनुमान करण्यास हरकत नाहीं ! पण तसें झाल्यास आम्ही हताश होणें बरोबर नाहीं. **ज्याचें नशीब त्याच्या करामतावर सर्वथैव अवलंबून असतें** हीं सुप्रसिद्ध इंग्रजी म्हण ध्यानांत घेऊन इंग्लंडांत जे खरे उदार पुरुष आहेत त्यांच्या साहाय्यानें आम्ही आपल्या उन्नतीचा मार्ग अहर्निश आक्रमिला पाहिजे.

धर्मकल्पना आली कोठून ?

मनुष्याच्या ज्या अनेक मनोवृत्ति आहेत त्यांपैकींच त्याची धर्मकल्पना ही एक आहे. ज्याप्रमाणें इतर वृत्ति किंवा त्यांचीं बीजें त्याच्या प्रकृतीशीं खिळलेलीं आहेत त्याप्रमाणेंच धर्मकल्पनाहीं त्याचे मनांत फार प्राचीन कालपासून वास करीत आहे;

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ७८

सुधारक ऑफीस, पुणें.

किंबहुना ज्या वेळेस मनुष्याची उत्पत्ति झाली त्याच वेळेस तिचें बीं त्याच्या मेंदूंत लावलें गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. मनुष्याच्या इतर वृत्तींप्रमाणें त्याच्या या वृत्तींतही फेरफार व सुधारणा होत चालली आहे. दोन हजार वर्षांपूर्वी आमच्या या ज्या धर्मकल्पना होत्या त्यांत आणि आमच्या सांप्रतच्या धर्मकल्पनांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे, व कालांतरानें आणखीही पडणार आहे. तात्पर्य, हा सारा प्रकार मनुष्याच्या इतर मनोवृत्तींप्रमाणेंच घडून आला आहे. तथापि येवढ्यावरून त्याच्या इतर वृत्ति आणि त्याची हो वृत्ति एकाच सपाटीवर ठेवतां येत नाहीं. वृत्तिवृत्तींत पुष्कळ भेद आहे. कांहीं वृत्ति अत्यंत क्षीण आहेत व कांहीं अतोनात प्रबल आहेत. कांहींचा फक्त क्षणिक असतो; व कांहींचा आयुष्यभर टिकतो. परिणाम मनुष्याच्या धर्मकल्पनेचा या दुसऱ्या प्रकारच्या मनोवृत्तींत समावेश होतो. एका दृष्टीनें हिच्याइतकी प्रबल दुसरी मनोवृत्ति नाहीं असें झटलें तरी चालेल. हिच्या योगानें मनुष्य जसा सद्गुणी तसा दुर्गुणीही होतो. मनुष्यामनुष्यांत सख्य उत्पन्न करण्यास जशी ही कारण होते, तशीच त्यांचे वैमनस्यासही कारण होते. हिच्या योगानें आजपर्यंत जगाचें हित झालें आहे तितकेंच अहितही झालें आहे असें दाखवितां येईल. कुटुंबांत आणि समाजांत एकी राखण्याचें हिच्या अंगीं जितकें सामर्थ्य आहे तितकें त्यांत दुही माजविण्याचेंही आहे. मनुष्यांना प्रशस्त सत्कर्म करण्यास हिनें जितकें प्रवृत्त केलें आहे, तितकेंच साहसी दुष्ट कृत्यें करण्यासही प्रवृत्त केलें आहे. सारांश, हिचें स्वरूप जितकें मनोहारी तितकेंच भीषणही आहे. हिचा प्रभाव जितका कल्याणप्रद तितकाच अहितकारक आहे; आणि हिनें जितकें पुण्याला तितकेंच पापालाही उत्तेजन दिलें आहे ! अशा या विलक्षण धर्म कल्पनेची उत्पत्ति मनुष्यानें मनांत प्रथम

कशी झाली; पुढें तींत कोणते फेरफार कसकसे होत गेले; सांप्रतकाळीं कोणत्या समाजांत तिची कशी स्थिति आहे; व अखेरीस तिला कोणत्या प्रकारचें स्वरूप प्राप्त होणार आहे याची चर्चा करणें हें जितकें मनोरंजक तितकेंच बोधकारकही आहे. ज्या प्रौढ लोकांच्या मनांत विशिष्ट धर्मकल्पना कायम होऊन गेल्या आहेत, व ज्यांचें वर्तन तदनुरोधानें होत आहे, त्यांच्या मनावर असल्या चर्चेंचा विशेष परिणाम होण्याचा संभव नाहीं हें खरें आहे. पण आमचे असले निबंध तसल्या लोकांकरिता लिहिलेलेच नसतात. ज्या तरुण वाचकांच्या धर्मकल्पना दृढ झाल्या नसतील; ज्यांच्या बुद्धींत साधकबाधक प्रमाणांचा प्रवेश होऊन त्यांचा विचार होणें शक्य असेल; व विचारांअंतीं जें खरें दिसेल त्या प्रमाणें आह्मी आपल्या वर्तनांत थोडाबहुत तरी फेरफार करूं अशी ज्यांना उमेद असेल, त्यांच्याकरितांच हे लेख आहेत. असले लेख एकदां लिहून टाकले ह्मणजे आपलें कर्तव्य आटपलें असें कदाचित् मोठमोठ्या तत्वशोधकांस ह्मणतां येईल; कारण ते रात्रंदिवस नवीन तत्वांच्या शोधांत व्यग्र झालेले असतात, पण इतरांनी केलेल्या शोधांचें ज्ञान करून घेऊन त्यांचा लोकांत प्रसार करणें हें ज्या आमच्या सारख्यांचें नम्र कर्तव्य आहे त्यांनीं नवीन नवीन वाचकांच्या फायद्याकरतां असले लेख फिरून फिरून लिहिले पाहिजेत; त्यास कंटाळतां कामा नये ह्मणून आणि शिक्षकाच्या धंद्यांत विशेष फरक नाहीं. नवीन पिढीच्या तरुण लोकांत राजकीय, सामाजिक व धार्मिक

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाल्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

विचारांचा प्रसार करणें आणि प्रत्येक वर्षी नवीन विद्यार्थ्यांस विवक्षित विषयांची माहिती देणें यांत पुष्कळ साम्य आहे. भेद इतकाच कीं शिक्षक आपलें काम तोंडानें करतो; व आमच्यासारख्याला तें टाकानें करावें लागतें, पण एक वेळ सांगितलेले विचार पुनः पुनः सांगणें हें दोघांनाही सुटत नाहीं. बोलणारा किंवा लिहिणारा एकच असला तरी शिकणारे किंवा वाचणारे वेळोवेळीं बदलत असल्यामुळें प्रत्येक नव्या शिष्यसमुदायापुढें किंवा वाचकसमुदायापुढें टरीव पाठांची व विचारांची पुनरुक्ति करणें भाग पडतें; व तसें करीत असतां तिचीही थोडीबहुत पुनरुक्ति होते. पण त्याला इलाज नाहीं. धर्मकल्पनेच्या उत्पत्तीविषयीं आम्ही आज प्रथमच लिहितों आहों असें नाहीं; आजपर्यंत अनेक वेळां लिहिलें आहे. तथापि या विषयावर शेवटला लेख लिहून गेल्यास बरेच दिवस लोटले असल्यामुळें वाचकांस कदाचित् त्याचें विस्मरण होऊं लागलें असेल, आणि तें होऊं न देणें हें तर आमच्या अवतारांचें प्रधान कारण आहे; तेव्हां आमच्या वाचकवृंदांत. या विषयाविषयीं फिरून जागरूकता उत्पन्न करण्यासाठीं त्यास आज फिरून हातीं घेण्याचें जें आम्हीं मनांत आणिलें आहे त्याबद्दल कोणाचीही माफी मागण्याचा गरज नाहीं ! धर्मकल्पना पिशाचकल्पनेपासून उत्पन्न झाली आहे, व ज्याला आपण देव म्हणतों तो पिशाचाचें एका प्रकारचें रूपांतर आहे अशी सर्वांची पक्की खातरी होईतोंपर्यंत असले लेख लिहावे तितके थोडेच आहेत. असो.

" मनुष्य हा सूक्ष्म विश्व आहे " अशी जुन्या ग्रीक लोकांत म्हण होती. हिचें याथार्थ्य कदाचित् सहज लक्षांत येण्यासारखें नसेल. पण " हें भरतखंड लहानशी पृथ्वी आहे " असें म्हटल्यास

तें कोणास कळणार नाहीं असें वाटत नाहीं. सजीव व निर्जीव वस्तूंच्या अनेक भेदांमुळें आमच्या पृथ्वीस जें वैचित्र्य आलें आहे, त्याचें सारें श्रेयहि आमच्या हिंदुस्थानांत पडलें आहे. जो पदार्थ पृथ्वीवर दुसऱ्या ठिकाणीं पैदा होतो, पण हिंदुस्थानांत पैदा होत नाहीं असा पदार्थच नाहीं. अमुक हवा अमक्या ठिकाणींच आहे, आणि तीं दुसऱ्या ठिकाणीं दृष्टीस पडावयाचीच नाहीं, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं; कारण, आमच्या या विलक्षण देशांत पाण्यास थिजवणाऱ्या हवामानापासून त्याला आधण आणणाऱ्या हवामानापर्यंत सर्व प्रतींचीं हवामानें दृष्टीस पडतात. सर्व प्रकारचे खनिज पदार्थ, सर्व प्रकारच्या वनस्पति सर्व प्रकारचे कीटक, पक्षी, श्वापदें आणि जनावरें व सर्व प्रकारचीं माणसें येथें सांपडतात ! अशाच प्रकारची बहुविधता आमच्या आचारविचारांतही दृष्टीस पडते. या अनेकप्रकारक आचारविचारांच्या फक्त एका शाखेचा आह्मांस तूर्त विशेष विस्तारपूर्वक विचार करावयाचा आहे. ती शाखा धर्मशाखा होय. प्रस्तुत निबंधावलींत या शाखेच्या संबंधानें जो विचार करावयाचा आहे तो केवळ तत्वदृष्ट्या करावयाचा आहे. कोणत्याही चालू चळवळीवर किंवा कोणत्याही आधुनिक व्यक्तीच्या किंवा व्यक्तिसमुदायाच्या वर्तनावर टीका करण्याच्या इराद्यानें हा विषय हातीं घेतलेला नाहीं. केवळ तत्वनिर्णय करण्याच्या हेतूनें धर्मसंबंधीं आचारविचारांची मीमांसा करावयास बसलें असतां जे सिद्धांत अत्यंत निरुत्तर असे वाटतात ते

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.
सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ८१० पौंड.
मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.
याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

वाचकांस समजावून सांगावे आणि; असल्या विषयांचा अशी रीतीनें विचार करण्याची प्रवृत्ति त्यांच्या मनांत थोडी बहुत उत्पन्न करावी याशिवाय यो लेखांचा दुसरा उद्देश नाहीं. तेव्हां एखादे प्रसंगीं एखाद्या आचाराविषयीं लिहितांना थोडा विशेष प्रसंग झाला तर तो त्या आचाराची विटंबना करण्याकरतां नव्हे. तर त्याचें खरें स्वरूप वाचकांच्या मनावर ह्मणेजुंच उठविण्यासाठीं होय, असें समजण्याची सर्वांनीं मेहेरबानी केली पाहिजे. मागें एकदां पिशाचयोनीप्रत पावलेल्या पितरांच्या दिनचर्येविषयीं लिहिलेला आमचा लेख वाचून कित्येक सभ्य गृहस्थ आमच्यावर खप्पा झाले असें आमच्या नजरेस आल्या-वरून वरील प्रार्थना आगाऊ करून ठेविली आहे. असो.

येथील धर्मसंबंधीं आचारविचारांत सर्व प्रकारचें वैचित्र्य व बहुविधत्व आहे असें जें वर ह्मटलें आहे तें सिद्ध करण्यास खंडोगणती पुरावा आणीत बसलें पाहिजे असें नाहीं. भिल्ल, कोळी, कैकाडी, वडार वगैरे रानटी किंवा अर्धवट रानटी लोक आणि स्थाईक समाजांतील अगदीं खालच्या प्रतीचे लोक कसल्या देवाची कशा प्रकारें पूजाअर्चा करतात हें ज्याला ठाऊक नाहीं असा कोण सुशिक्षित हिंदू आहे? मोठ्याशा गोट्याला तेल व शेंदूर फासून त्याला देव मानणाऱ्या आणि त्याच्या नैवेद्याकरितां त्याच्यापुढें नानातऱ्हेचीं जनावरें बळी देणाऱ्या प्राथमिक व संस्कारविहीन मनुष्यापासून निर्गुण निराकार परमेश्वरापर्यंत जाऊन ठेपलेल्या, अथवा तेथेंहि समाधान न होऊन जीवात्मा व परमात्मा यांचें 'अहमेव ब्रह्म' या सिद्धांतानें ऐक्य करूं पहाणाऱ्या कुशाग्र बुद्धीच्या वेदांत्यापर्यंत नानातऱ्हेच्या पंथांचा नानाप्रकारांनीं उपासना करणारीं, व नानाप्रकारच्या विचारांस स्वीकारणीय मानून त्यांवर श्रद्धा ठेवणारीं आणि त्यांत गर्क होऊन राहणारीं माणसें

या दृष्टांत बहुधा प्रत्येक ठिकाणीं दृष्टीस पडतात. अशा प्रकारचें विचारांतर व आचारांतर कसकसें होत जातें, आणि अखेरीस तें कोणत्या थराला जाणार आहे, याचें विवेचन हर्बर्ट स्पेन्सर यानें एका लहानशा पुस्तकांत फार उत्तम रीतीनें केलें आहे. पुढील लेखांत प्रधानत्वेंकरून या पुस्तकाचाच आधार घेतला असल्यामुळें त्यांच्या बरोबरीची जबाबदारी त्या तत्ववेत्याकडे आहे; आमच्याकडे बिलकुल नाहीं असें आम्ही साफ सांगतों !

देवार्चा कल्पना प्रथम पिशाचकल्पनेपासून निघाली असावी असें स्पेन्सरसाहेबानें अनेक प्रमाणांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. तीं वेळोवेळीं देण्यांत येतीलच. पण आरंभाला आपण आपल्या घरचेंच एक उदाहरण घेऊं. ब्रह्मा, विष्णु महेश या त्रयींपैकीं नंबर तीनचा देव सर्वांत उग्र आहे असें आपण मानतो; कारण प्राणिमात्रांस उत्पन्न करणें हें ब्रह्म्याचें काम त्यांचें पालन करणें हें विष्णुचें काम; आणि त्यांचा संहार करणें हें महेशाचें किंवा महादेवाचें काम असा आपण त्यांस श्रम विभाग करून दिला आहे. तेव्हां जी वस्तु निर्माण झाली तिचा नाश करणें हें ज्याचें कर्तव्य तो अर्थात् उग्रस्वरूप देव असला च पाहिजे. याचे भक्त यानें निरनिराळ्या तऱ्हेनें वर्णन करितात. कोणी याला बैलावर बसवून **पशुपति** म्हणतो कोणी यानें अर्धांग स्त्री आहे असें मानतो (अर्धांगीच्या कल्पनेचा उद्भव बहुधा येथूनच झाला असावा.) कित्येकांच्या समजुतीप्रमाणें शिवाच्या कपाळावर तिसरा डोळा असल्याम

छोट्या मोठ्यांनें देणें आहेत-फर्ग्युसनकॉलेज (पुणे
यमोर-हनाशीर, मनेंच पाणी सोडविलेले असे.

मॅनेजर--सुधारक पुणे

ते त्याला **भाललोचन** म्हणतात. त्यानें एकदां तीव्र विष प्राशन केल्यामुळें त्याच्या अंगाचा जो दाह झाला तो शमविण्याकरितां त्यानें डोक्यावर गंगा घेतली, गळ्यांत साप घातले. व जटा आणि कपाळ यांच्यामध्यें चंद्राची नेमणूक केली अशी कथा आहे. **नीलकंठ गिरिजारमण, भालचन्द्र** वगैरे नांवें त्याला वरील कृत्यासाठींच बहुधा देण्यांत आलीं असावीं. प्राणिमात्रांचें हनन करणें हें याचें नियुक्त कर्तव्य असतां, निःसीम भक्त याला ' सच दुनिया पालनवाला बैलवाला ' असें म्हणतात, व इतर देवांच्या भक्तांशीं प्रतिस्पर्धा करण्याकरितां याच्या वार्षिक उत्सवांत इतर देवांच्या सुखवाल्यांसारखा एक सुखवटा याच्याही पिंडावर बसवून देऊन, मनुष्यरूपधारी दुसऱ्या देवाप्रमाणें यांवरही मनुष्याचा पेहराव व अलंकार चढवितात. अनार्याप्रमाणें भोळ्या सांभाच्या नित्यरूपाची चिकित्सा करून त्याला बीभत्स किंवा तद्विरुद्ध ठरविण्याची आमची इच्छा नाहीं. तथापि याच्या वर्णनांत जो एक सामान्य भाग आढळून येतो, जो याच्या सर्व भक्तांस मान्य आहे, आणि ज्याचा प्रस्तुत विषयाशीं निकट संबंध आहे तो आमच्यानें येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हा देव प्राणिमात्राचा हंता असल्यामुळें स्मशानभूमि हें याचें विवारस्थान होऊन गेलें आहे इतकेंच नाहीं, तर चितेंतील अर्धांशी शेकत घसणें, जळलेल्या प्रेताची राख अंगाला लावणें, हाडांच्या माळा गळ्यांत घालणें, डोक्याच्या करट्यांचा भांड्याप्रमाणे उपयोग करणें-इत्यादि गोष्टी याला अत्यंत प्रिय झाल्या आहेत. पार्वतीशीला नमन करतांना **नरहंडमालधर** असें विशेषण आम्ही मोठ्या भक्तीनें तों ! तसेंच वेताळ वगैरे प्रमुख पिशाचांस बरोबर घेऊन डमरू वगैरे वाद्यांच्या तालावर जेव्हां याचा नाच होऊं लागतो तेव्हां त्याचें शरीर हत्तीच्या किंवा दुसऱ्या एखाद्या जनावराच्या

ओल्या कातड्यानें आच्छादिलेलें असतें आणि म्हणूनच याला कृत्तिवासा असें म्हणतात. त्याप्रमाणेंच, कोणी मेला आणि त्याची समाधि बांधून तिचर देऊळ बांधावयाचें असें ठरलें, तर त्यांत शिवाची स्थापना करतांना हें सर्वांस ठाऊक आहेच. यावरून काय दिसतें कीं, हलाहल, वासुकी, चंद्र, पार्वती, नंदी इत्यादिकांचा या देवाशीं जो संबंध लावून दिला आहे याचा खुलासा जरा सहज करतां आला नाहीं तरी याच्या वर्णनाचा जो सर्वसाधारण व सर्वसामान्य दुसरा भाग आहे त्यावरून या देवाची कल्पना पिशाचकल्पनेवरून साधली आहे, किंबहुना **महादेव** हा एक **महापिशाचच** आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तात्पर्य, जों जों विचार करावा तों तों आमच्या तिन मोठ्या देवांपैकीं निदान एकाचें तरी जनन पिशाचकल्पनेपासून झालें असावें, अशी खात्री झाल्यावांचून रहात नाहीं.

वर दिगंबर भोलानाथाच्या स्वरूपाचें जें वर्णन दिलें आहे त्यावरून आमच्या-निदान या—देवाचा तरी पिशाचाशीं निकट संबंध आहे हें वाचकांच्या लक्षांत आलें असेल. पण आतां असा प्रश्न आहे कीं ही पिशाचाची कल्पना तरी लोकांच्या मनांत प्रथम कशी आली ? जो मनुष्य मेला आणि ज्याचें प्रेत जाळलें, पुरलें. किंवा गिधाडांनीं खाल्लें त्याचें त्याच्या मागें कांहींएक रहात नाहीं, असा अलीकडील सुधारलेल्या लोकांचा अनुभव व विश्वास असतां पूर्वीच्या लोकांनाच मेलेली

संगीत सुविचार-विजय नाटक.
श्री. एम्. जी. देवधर, बी. ए. कृत.
किं. ८८
सुधारक ऑफीस, पुणें.

माणसें सर्वथैव नाहींशीं होत नाहींत, तर ज्याला आपण मरण म्हणतों तें आल्यानें मनुष्याच्या आत्माचा आणि त्याच्या शरीराचा वियोग होतो येवढेंच कायतें; शरीराचें कांहीं झालें तरी त्यांत वास करणारा आत्मा नाश पावत नाहीं; तें त्याला न राहण्यासारखें झालें म्हणजे तो तें टाकून देतो आणि कांहीं दिवस अशरीर राहून दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो—अशी कल्पना आहे. भगवद्गीतेंत असें म्हटलें आहे:-

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।

तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥

ज्याप्रमाणें मनुष्य जुनीं वस्त्रें टाकून देऊन देऊन नवीं घेतों त्याप्रमाणें आत्मा एक शरीर टाकल्यावर दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो. जे लोक एकच आत्मा एका शरीरांतून निघून दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो असें मानतात त्यांना तो आत्मा कांहीं वेळ शरीरावांचून कोठेंतरी अस्तित्वांत असतों असें कबूल करणें भाग आहे; कारण एका शरीरासकट तो दुसऱ्या शरीरांत शिरतो असें म्हणावें तर शरीरें शरीरांत शिरतांना दृष्टीस पडलीं पाहिजेत. पण तसा प्रकार आपण कोठेंच पहात नाहीं. शिवाय एक शरीर दुसऱ्या शरीरांत शिरूं शकेल असें मानिलें तरी लहान शरीर मोठ्या शरीरांत शिरूं शकेल असें मानतां येत नाहीं. चिल्ल्याचा आत्मा आपल्या पिंजऱ्यासकट एखाद्या डुकराच्या शरीरांत शिरेल कदाचित्! पण हत्तीच्या आत्म्यानें आपल्या प्रचंड देहासकट पोरकिड्याच्या शरिरांत प्रवेश कसा करावा? पण तसें होणें अशक्य असेल तर मोठ्या शरीरांत राहणाऱ्या आत्म्यांना लहान शरीरांत केव्हांही प्रवेश करता

लागत नाहीं; असें मानिलें पाहिजे, परंतु तसेंही मानतां येत नाहीं, कारण आत्म्यास जी देहावस्था प्राप्त होते ती त्याच्या कर्मानुरोधानें होते. एखाद्या हत्तीनें मेल्यावर पोरकिड्याच्या जन्मास जावें असें वर्तन त्याच्याकडून झालें असेल तर त्याला तसेंच करणें भाग आहे. पण हत्तीचें शरीर तर पोरकिड्याच्या शरीरांत शिरूं शकत नाहीं. तेव्हां शरीरांतर करताना आत्म्यास कांहीं वेळ अशरीरी बनावें लागत असेल असें कबूल करणें भाग आहे. तेव्हां पुनर्जन्मावर विश्वास ठेवणाऱ्यांची किंवा पिशाचयोनीचें अस्तित्व मानणाऱ्यांची, प्राण्यांचे आत्मे नेहमींच्या शरीराचा त्याग केल्यावर कसल्याही शरीराच्या आधारावाचून कांहीं वेळ राहूं शकतात, अशी खात्री झाली असली पाहिजे. आत्मा हा कोणत्याही इंद्रियास गोचर न होणारा असा अत्यंत सूक्ष्म परमाणु आहे असें या लोकांचें खरें मत असेल आणि सूक्ष्मत्वास ते अशरीरत्व समजत असतील तर त्यांचें बोलणें थोडेंबहुत ऐकून घेतां येणार आहे; पण अशरीरत्व म्हणजे शरीराचा अत्यंत अभाव अशी म्हणण्याचा त्यांचा आग्रह असेल तर मात्र ते कांहीं तरी बडबड करतात असें म्हणावें लागेल. अशरीरी वस्तु म्हणजे काय ? आत्मा शरीरी मर्त्यांनीं तिची कल्पना कधी करावयाची ? आत्म्याशिवाय एखादी अशरीरी वस्तु आमच्या पाहण्यांत आली आहे काय ? इंद्रियाला किंवा मनाला गोचर अशा वस्तुचें अस्तित्व मानण्यास कोणीही हरकत घेणार नाहीं. इंद्रियें ही मनाचीं द्वारें आहेत. मनांत आडळून येणारी प्रत्येक वस्तु कोणत्या तरी इंद्रियाच्या वाटेनें प्रथम त्यांत

लेखकांस योग्य मोबदला देऊन आत्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

गेलेली असते. किंबहुना इंद्रियविकारावाचून आम्हांस मनाचें अस्तित्व देखील समजणार नाहीं. यावर कोणी असें उत्तर देतील कीं पिशाच किंवा अशरीरी मृतमाता या वस्तु अस्तित्वांत नसतील तर त्या आपल्या मनांत कोठून आल्या ? याचें उत्तर असें आहे कीं, वस्तु दोन प्रकारच्या अहित; एक ज्यांचें प्रतिबिंब इंद्रियद्वारा मनावर पडतें त्या. दुसऱ्या अशा रीतीनें मनावर ज्यांचें प्रतिबिंब पडलें आहे त्यांपासून तर्काच्या साहाय्यानें मनुष्याचें मन ज्या नवीन वस्तु निर्माण करतें त्या. मनानें अशा रीतीनें उत्पन्न केलेल्या वस्तुसमुदायास कधीं कधीं कल्पनासृष्टिही म्हणतात. कैलास, स्वर्ग, वैकुंठ, ताल, यम, यमपुरी, यमयातना वगैरे काल्पनिक वस्तु ज्या अर्थानें अस्तित्वांत आहेत असें म्हणतां येईल त्या अर्थानेंच अशरीरी आत्म्याचें अस्तित्व पाहिजे तर मानितां येईल. मानसिक सृष्टींत बाह्य सृष्टीचीं हुबेहुब प्रतिबिंबें आणि त्यांपासून कल्पनेनें उत्पन्न केलेलें विश्व यांचा अंतर्भाव होतो. म्हणून मानसिक सृष्टींत जी जी वस्तु दृष्टीस पडते ती ती बाह्य सृष्टींतील वस्तुप्रमाणें अस्तित्वांत आहे असें म्हणतां येणार नाहीं. ती कल्पनेनें उत्पन्न केली असल्यामुळें फक्त मनांत आहे. खऱ्या बाह्य विश्वांत नाहीं. अशरीरी आत्म्याच्या कल्पनेंत आणखी एक गोष्ट आहे ती ही कीं, इतर काल्पनिक वस्तुप्रमाणें याचें आम्हांस ढळक काल्पनिक चित्र देखील काढितां येत नाहीं. " अनंत " शब्दाच्या अर्थांत वास्तविकपणें जितकी दुर्बोधता आहे; तितकीच " आत्म " या शब्दांत आहे. निर्गुण निराकार परमेश्वर, अशरीरी मृतात्मा, आणि पिशाच यांच्या स्वरूपांत खरोखर कांहीं भेद नाहीं. अशा प्रकारच्या परमेश्वर, मानलीं केलेली स्तुति ऐकून आम्हांवर प्रसन्न होतो आणि आम्हांस संकटांतून सोडविण्यास किंवा सुख देण्यास प्रवृत्त होतो

असें म्हणणें जितकें गृहणीय आहे तितकेंच वेळचेवेळीं श्राद्धें केल्यानें मृतात्मे संतुष्ट होऊन आमचे साहाय्यकर्ते होतात आणि पिशाचगण गायत्रांचा जप आणि यज्ञोपवीत यांच्या धाकांत रात्रंदिवस असतो असें म्हणणेंही गृहणीय होणार आहे !

पिशाचांचें अस्तित्व जर इतकें शंकास्पद असेल तर प्रत्येक राष्ट्रांत पूर्वकालापासून सर्व प्रकारच्या मनुष्यांच्या मनांत त्याची कल्पना कशी आली, व ती अजून जात कां नाहीं, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. याचें एक उत्तर असें आहे कीं,मनुष्य केवळ सत्याचाच भोक्ता नाहीं. अमुक गोष्ट चुकीची किंवा खोटी आहे असें सिद्ध करून दाखविल्यावरोबर ती सोडून देण्यासारखी त्याची प्रकृति असती तर ज्या सुधारणांकरतां आपण इतके तडफडत आहों त्या कधींच झाल्या असत्या,व आज जे लोक सुधारक म्हणून मोडत आहेत त्यांनीं करण्यासारखें कांहींच राहिलें नसतें! पण मनुष्याची प्रकृति तशी नाहीं. शेंकडा नव्याण्णव माणसें ज्याप्रमाणें आचारांत त्याप्रमाणें विचारांतही हाताला हात लावणारीं असतात. शारीरिक श्रमापेक्षां मानसिक श्रम करण्याचा मनुष्याला जात्याच विशेष कंटाळा आहे. मळलेल्या वाटेनें जाणें येणें ज्याप्रमाणें शरीराला त्याप्रमाणें मनालाही फार सुखावह असतें. तेव्हां नी वाट सोडून देणें त्याला साहसा बरें वाटत नाहीं. तशांत नव्या मार्गी आपणास भलतीकडे घेऊन जाणारा आहे असा त्याचा बोभाटा झाला असेल तर त्याकडे लाखांतला एक इसम सुद्धां ढुंकून पहाणार नाहीं. पिशाचाविषयीं आमच्या विलक्षण कल्पना कायम असण्याचें हें पहिलें कारण होय. त्याचें दुसरें कारण

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ०५

खंडकरंडेय ॲन्ड सन्स् शनवार पेठ, पुणें.

असं आहे कीं त्या नाहींतशा न होऊं देण्यांतच पुष्कळांचा फायदा असल्यामुळें ते आपल्या लेखांनीं, भाषणांनीं, आणि कृत्यांनीं त्या कायम करण्याचा होईल तेवढा प्रयत्न करीत असतात ! हें सर्व या विलक्षण पिशाचकल्पनांनीं आम्हांस अद्यापि कां सोडलें नाहीं याबद्दल झालें. आह्मा मनुष्यांत ही अशरीरी आत्म्याची किंवा पिशाचयोनीची कल्पना प्रथम कशी येते या प्रश्नाकडे आतां वळूं.

लहान मुलें कधीं कधीं झोपेंत एकाएकीं जागीं होतात आणि मोठ्यानें रडूं लागतात, हें पुष्कळांनीं पाहिलें असेल. या रडण्याचें कारण त्यांना विचारलें तर तीं त्यांकडे लक्ष न देतां अधिकच रडत सुटतात. पुढें थोपटाथोपटे करून पोटाशीं धरून मोठ्या प्रयासानें त्यांचें रडणें बंद केलें म्हणजे तीं शुद्धीवर आल्यासारखीं होतात. अशा रीतीनें सावध केलेल्या मुलास बोलतां येत असेल व नजरेपुढें होऊन गेलेली गोष्ट सांगतां येत असेल, तर तो असें म्हणेल कीं, अमका अमका मला मारूं लागला, अथवा अमक्या—अमक्यानें मला बाऊ दाखविला, किंवा फलाणा माझी अमुक वस्तु घेऊन जाऊं लागला म्हणून मी रडलों. थोर माणसें व लहान मुलें झोपेंत जें बरळत असतात त्यावरून, व झोंपेतून दचकून उठतांना त्यांच्या तोंडांतून जे शब्द मोठ्या जोरानें एकाएकीं निघतात त्यांवरून त्यांना कसल्या प्रकारचीं स्वप्नें पडत असावीं, हें सहज समजण्यासारखें असतें. पुष्कळ वेळां हीं स्वप्नें इतक्या व्यवस्थित रीतीनें व स्पष्टपणानें पडतात कीं, चांगल्या सुजाण व प्रौढ मनुष्यास देखील जागें झाल्यावर आपण स्वप्नांत होतों अशी खात्री होण्यास बराच वेळ लागतो ! आंथरूण चापचावें, डोळे चोळावे, हातपाय हलवावे आणि कसला तरी थोडाबहुत उजेड असल्यास डोळे तिरके लागत्र नेऊन न्याहाळून पहावें, तेव्हां

कोठें आपण निजलेल्या ठिकाणींच आहों, आपल्या सभोवतालच्या वस्तु जागच्या जागीं आहेत, आणि आपण कोठें गेलों नाहीं व आपणांकडे कोणी आला नाहीं अशी खात्री होते ! कधीं कधीं स्वप्नांतच हें स्वप्न आहे असें स्पष्टपणें वाटत असतें; पण तें सुखावह असल्यास तसेंच पुढें चालावें अशी इच्छा होते आणि आपण त्याला चालू देण्याचा प्रयत्न करतों; पण कांहीं कारणामुळें त्याचा भंग झाला तर आपणांस क्षणभर फार वाईट वाटतें याचा अनुभव पुष्कळांना असलाच पाहिजे. तात्पर्य, पुढील अनुभवावरून स्वप्नांतील भास जरी मिथ्या आहेत असें दिसून आलें, तरी जोंपर्यंत आपण स्वप्नांत गर्क होऊन गेलेलों असतों तोंपर्यंत ते प्रत्यक्ष अनुभवाप्रमाणें खरे वाटतात यांत संशय नाहीं. तेव्हां या भासाचें खरें कारण समजेपर्यंत मनुष्यांनीं त्यांच्या उत्पत्तीविषयीं नानाप्रकारचे तर्क केले यांत कांहीं आश्चर्य नाहीं. जागृतावस्थेंतील इंद्रियानुभवांत आणि स्वप्नावस्थेंतील भासांत एक मोठा भेद आहे तो हा कीं, पहिल्या स्थितींत इंद्रियांचे आणि अवयवांचे व्यापार चालू असतात; पण दुसरींत ते बंद असतात. स्वप्नांत डोळे मिटले असून दिसतें; चालल्यावांचून अन्य स्थळीं जातां येतें; तोंडांत कांहीं घातल्यावाचून खाल्यासारखें वाटतें; -सारांश, इंद्रियांचे व शरीराचे सर्व व्यापार बंद असतां स्वप्नांतील भास होतात, हें निर्विवाद आहे. पण ज्याला ते होतात तो एकच आहे.

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र

संगीत समाजाभिमुख नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, रुपये किं. १ रुपया.

'संदेश' एजंट, पुणें सिटी.

जागृतावस्थेंतला मी तोच स्वप्नावस्थेंतला मी. एक मी दुसऱ्या मीला पक्कें ओळखीत असतों ! खरा मी कोणता— हा कीं तो—अशी भ्रांति कधींच पडत नाहीं. दोन्हीहीं एकत्र मी आहेत अशी खात्री असते, तथापि ज्या अर्थीं त्या दोघांचे अनुभव अगदीं भिन्न अशा दोन स्थितींत येत असतात, त्या अर्थीं एकाच मीचीं हीं दोन पृथक् स्वरूपें असावीं, असा प्रथमारंभीं मनुष्यांचा स्वाभाविकपणें तर्क होतो; आणि तो होण्यास अनुभवभेदाचें सबळ कारण असल्यामुळें या द्विप्रकारक दोन मींच्या अस्तित्वावरील विश्वास पुष्कळ काळपर्यंत कमी न होतां अधिकच होत जातो. ज्या लोकांत अशा प्रकारच्या दोन मींची कल्पना दृष्टीस पडत नाहीं, त्या लोकांत मरणोत्तर मनुष्याचा आत्मा कायम रहातो अशी कल्पनाही असत नाहीं. पण असे लोक फार थोडे आहेत. बहुतेक लोक प्रत्येक मनुष्याला दोन प्रकारचे मी, आत्मे, किंवा स्वस्वरूपें आहेत, असें मानतात. हस्तपादादि अवयव हलेलनासे झाले असतां व दृष्ट्यादि इंद्रियांचे व्यापार बंद पडले असतां आम्हांस सुखदुःखाचा भास होतो हें कसें ? अर्थात् अवयवांच्या व इंद्रियांच्या अनुषंगावांचून सुखदुःखानुभव घेतां येण्यासारखी आमच्या आत्म्याची किंवा आमच्या मींची दुसरी एखादी स्थिति असली पाहिजे असें अनुमान होणें अगदीं स्वाभाविक आहे, आणि हें मनांत एकदां पक्कें बसून गेलें म्हणजे इंद्रियांच्या व अवयवांच्या मदतीवांचून आपणाला सुखदुःखानुभव कसा घेतां येईल याबद्दल शंकाच येत नाहीं. इंद्रियांचे व अवयवांचे व्यापार बंद असतां मला सुखदुःखानुभव व इतर विकार होतात यांत संशय नाहीं: व ज्या अर्थीं ते त्यांवांचून होतात, त्याअर्थीं ते त्यांवांचून होण्याचें सामर्थ्य माझ्यांत असलें पाहिजे हें उघड्च आलें. तेव्हां

शरीरविकृत म्हणजे शरीरांत असतां ज्याच्यावर विकार घडतात असा आणि **अशरीरविकृत** म्हणजे शरीरांत जखडला नसतां ज्याचेवर विकार होतात असा एकाच **मामेपणांत** भेद असला पाहिजे; आणि म्हणून या दोहोंपैकीं एखादा नाहींसा झाला तर त्याचेबरोबर दुसरा नाहींसा झालाच पाहिजे असें कदापि म्हणतां यैणार नाहीं. एखादे वेळीं दोघांचाही बरोबरच लय होईल; नाहींच असें म्हणवंत नाहीं; पण तसें अनेक वेळां घडत नाहीं. गाढ झोंप लागली असतां आमचे आत्मे शरीरबंधन क्षणभर एकींकडे झुगारून देऊन पाहिजे त्या काळांत किंवा पाहिजे त्या ठिकाणीं प्रवेश करतात आणि जागृतावस्थेंत अत्यंत अलभ्य अशा वस्तूंचाही स्वप्नावस्थेंत यथेच्छ उपभोग घेतात हा तर प्रत्येकाचा अनुभव आहे, आणि बऱ्याच अंशी त्यावर आमच्या अशरीरविकृत आत्म्यांची किंवा भीची कल्पना बसविली आहे. एकदां स्वतः संबंधानेंही द्विप्रकारक मीची कल्पना कायम झाली [आणि नित्याच्या द्विविधात्मक अनुभवामुळें ती तेव्हांच होते] म्हणजे दुसऱ्यालाही असें दोन मी असतील असें वाटणें स्वाभाविक आहे; आणि दुसऱ्यांनीं तसें असल्याबद्दल खात्री दिली म्हणजे हा मह अल्प काळांत पक्का होऊन जातो. व पुढे त्यास अशा प्रकारच्या गोष्टींचा आधार मिळत गेल्यास तो थोड्याच वर्षांत ठाम होऊन बसतो. मूळ लोकांचा असा समज आहे कीं, जे मेलेले पुरुष स्वप्नांत येतात ते सापाच्या किंवा छायेच्या रूपानें येत नाहींतर जिवं-

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.
डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.
पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०५
लाड्हा ऑफीस्स सदाशिव पेठ, पुणें.

तर्णा त्यांचीं जीं शरीरें असतात त्यांजिशींच ते चेतात, आणि आपल्या जातींतील मनुष्यांशीं बोलतात. मात्र जागें झाल्यावर स्वप्न पडणारास असें वाटतें कीं अमकातमका अद्यापि जिवंत असून केवळ त्याची छाया मजकडे आली होती; वस्तुतः तो स्वप्नांत मूळच्या शरीरानें येतो. पाण्यांत पडलेल्या प्रतिबिंबास अंदमान बेटांतील लोक मनुष्याचा एक आत्माच मानितात. स्वप्नांत मनुष्याचा आत्मा नाकपुड्यांतून बाहेर पडून पाहिजे तिकडे वापरतो आणि हव्या त्या क्रिया करतो, असाही या लोकांचा समज आहे. स्वप्नासारखेच दुसरे कांहीं प्रसंग आहेत त्यांनींही याच कल्पनेचें पृष्टीकरण होतें. कोणत्याही कारणामुळें एखाद्या मनुष्यास एखादे वेळीं बेशुद्धी आली तर ती त्याला त्याचा आत्मा कोठें तरी भटकत असल्यामुळें येते. अशीही पुष्कळ लोकांची समजूत आहे. मनुष्याला झोंप लागली असतां किंवा कोणत्याही कारणानें त्याच्या वृत्तीचा लय लागला असतां त्यांचा आत्मा शरीरांतून बाहेर पडून मोकळा होतो. आणि देहबद्ध असतां ज्या गोष्टी त्याला सांगतां किंवा पाहतां येत नाहींत त्या तो सांगूं व पाहूं शकतो, असाही पुष्कळांचा विश्वास आहे हा तादात्म्यदृशा कृत्रिम असली तरी तींत देखील तसाच प्रकार घडतो. अमेरिकेंत एका जातीचे रानटी लोक आहेत ते असली लवावस्था उत्पन्न करण्यासाठीं कडक तमाखूचा काढा करून घेतात. आपल्या लोकांत कांहीं प्रकृतीच्या मनुष्यांस धोतरा चारल्यानें किंवा उद् घातल्यानें अतींद्रियज्ञान प्राप्त होऊन भूतभविष्य विनचूक सांगतां येतें, असा मूर्खपणाचा समज आहे. देवऋषी, पंचाक्षरी वगैरे लबाड लोकांचा धंदा यथास्थित चालण्यास व नरसोबाची वाडी, औदुंबर वगैरे क्षेत्रांचें महात्म्य इतकें वाढण्यास हाच मूर्खपणाचा समज कारण झाला आहे. मेंदूचे विकार अनेक तऱ्हेचे आहेत,

व त्यांपेकीं कांहीं कांहीं जातींच्या तापाप्रमाणें थोड्या दिवसांनीं आपोआप नाहींसे होतात, हें ज्यांना ठाऊक नाहीं आणि पूर्वापार चालत आलेल्या कल्पनांचा आणि विचारांचा मेंदूच्या विरुद्ध स्थितींत मनावर केवढा परिणाम होतो याची ज्यांना अटकळ नाहीं, त्यांनीं चारदोन अनुकूल उदाहरणांवरून दत्ताच्या किंवा दुसऱ्या एखाद्या देवाच्या अथवा मांत्रिकाच्या सामर्थ्याचे पवाडे गावे यांत आश्चर्य तें कोणतें ? कोणत्याहीं कठिण गोष्टीची सामान्य मनुष्यास खरी मीमांसा करतां येईनाशी झाली म्हणजे तो तींवदूल पाहिजे तो ग्रह करून घेण्यास तयार होता. सुधारलेल्या लोकांस प्रतिध्वनि कशानें होतो हें पक्कें ठाऊक झालें आहे. पण रानटी लोकांस तो एक पिशाच आहे असं वाटतें ! मनुष्याच्या सावलीला आत्मा समजणारेंही कांहीं लोक आहेत. फेरें, अपस्मार, वेडा मधुरा व सन्निपात वगैरे रोगांत बायूचे जे झटकें येतात त्यांतही रोग्यांच्या आत्म्यांस असामान्य उन्नतावस्था प्राप्त होऊन भूतभविष्य सांगण्याचें सामर्थ्य येतें असा पुष्कळ अडाणी लोकांचा समज आहे. अशा स्थितींत जर मनुष्याचा आत्मा कांहीं वेळ नाहींसा होऊन पुनः परत येता तर झोंपेशीं व इतर प्रकारच्या बेशुद्धीशीं साम्य पावणारीं जी मृतावस्था ती ज्याला प्राप्त झाली आहे त्याचा आत्माही शरीर सोडून कोठें तरी भटकत कशावरून नसेल व शरीर जपून ठेवलें तर त्यांत तो फिरून कशावरून प्रवेश करणार नाहीं असा रानटी लोकांच्या मनांत सहज प्रश्न उत्पन्न

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

होतो. आणि तो झोंपेप्रमाणेंच मरणालाहि मोठी झोंप समजून तीविषयीं तसलेच तर्क करतात. लघुनिद्रा आणि महानिद्रा यांतील भेद समजण्यास वरेंच शहाणपण लागतें. मेलेल्या मनुष्याचें प्रेत जाळून त्याची राख दहा दिशांला फेंकून टाकली तरी देखील त्याचा आत्मा येथेंच कोठें तरी किंवा अन्य ठिकाणीं निदान कांहीं वेळ जीव धरून असतो अशी ज्यांची समजूत असेल (आणि या देशांत अशा समजुतीचे पुष्कळ लोक आहेत) त्यांनीं आपण मनुष्याच्या प्रथमावस्थेंत किंवा वन्यावस्थेंत आहों असें बेलाशक समजावें ?

आत्मा व पिशाच.

मनुष्याची विचारशक्ति परिपक्व होण्यापूर्वी मरण व झोंप यांतील भेद त्याला कां कळत नाहीं, व तो न कळल्यामुळें आपणास दोन प्रकारचे आत्मे आहेत असा त्याचा विश्वास होण्याला काय कारणें होतात, हें मागें सांगितलें आहे. आतां त्यापुढें धोडें जाऊन या दोन आत्म्यांपैकीं एकाशीं पिशाचकल्पनेचा संबंध येऊन कसा भिडतो हें समजण्याचा प्रयत्न करूं.

मरण हें झोंपेचा अथवा घेरीचाच एक प्रकार आहे असें बाटून, ज्याप्रमाणें झोंपी गेलेला किंवा घेरी आलेला मनुष्य फिरून उठतो व आपलें कामकाज करूं लागतो, त्याप्रमाणें मेलेला मनुष्यहीं पुनः उठेल असें प्रथमावस्थेंतील मनुष्यास वाटतें. आणि मेलेल्याच्या शवास तो मोठ्या काळजीनें जपून

टेवतो. पण मरून बरेच दिवस लोटले असून जर तो उठला नाहीं तर त्याचा आत्मा आतां बहुतकरून परत येत नाहीं अशी त्याची खात्री होऊं लागते. ही खात्री फक्त त्या शरीरांत तुर्त न येण्यापुरतीच होय. प्रेत उठेनासें झालें म्हणून आत्मा नाहींसा झाला, व बरेच दिवस होऊन गेल्यावरही प्रेत उठत नाहीं, म्हणून तें कधींच उठणार नाहीं, असें त्यास वाटत नाहीं. आत्म्यानें शरीर सोडलें तरी तो त्याच्या आसपास कोठें तरी भटकत असेल अशी त्याची कल्पना असते. कित्येक रानटी लोकांचा व सुधारलेल्या देशांतील अडाणी लोकांचा असा समज असतो कीं निकडे तिकडे निजानीज होऊन सर्वत्र सामसूम झालें म्हणजे मेलेल्यांचे आत्मे आपापल्या शरीरांत पुनः प्रवेश करून अन्न मिळविण्यासाठीं रात्रीं इकडे तिकडे फिरतात. प्रत्येक अमावास्येला मध्यरात्रीच्या निबिड अंधकारांत आपल्या समग्र परिवारासह वायुरूपधारी वेताळ महाराजांची स्वारी स्मशानवाटादि भीतिप्रद स्थानीं सहल करण्यास निघते अशी जी आपल्या देशांतील अज्ञ स्त्रीपुरुषांची समजूत आहे तिच्या मुळाशीं तरी वरील कल्पनाच आहे.

आत्म्याला सूक्ष्म व स्थूल अशीं दोन स्वरूपें आहेत अथवा देहबद्ध आणि देहातीत असे त्यांचें दोन प्रकारचें अस्तित्व आहे, अशी एकदां मनुष्याची कल्पना झाली म्हणजे तिच्यापासून अनेक परिणामें घडतात. या परिणामांपैकीं एक असा आहे कीं, मेलेल्यांचे आत्म जिवंतपणीं त्याला ज्या गोष्टी प्रिय असतात त्या त्याला अर्पण करण्याचा परि-

निबंधसंग्रह.
भाग १ ला. किं. १। ६.
मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

पाठ घालतात. उदाहरणार्थ **आंदमान** बेटांतील अपत्यवती स्त्रिया या स्त्रिया मेलेल्या मुलांच्या थडग्यांपाशीं आपल्या स्तनांतील दुधाचीं कटोरीं भरून ठेवतात; **चिपेवा** लोक आपल्या मृतांस अन्न व मांस, मोठ्या आस्थेनें देतात; मेलावरोबर अवश्यक हत्यारें पुरण्याची **चिलुक** लोकांत चाल आहे; मध्यआफ्रिकेंतील **उरुआ** जातीचे लोक आपला समाजाग्रणी मेला असतां त्याच्या थडग्यांत त्याच्या बायका व मुलांस तोडून घालतात; व वास्र लोक नवीन थडग्यापाशीं कित्येक आठवडे भला मोठा परसा जळत ठेवतात. मेलेल्या मुलाचा ताळू भरणें, सवाष्ण स्त्रीच्या प्रेताला नहाण घालून नवीन लुगडें नेसाविणें व कुंकू लावून ओटी भरणें; गाय, शय्या, पिंड वगैरे देणें—सारांश, आमचा सारा प्रेतविधि व श्राद्धविधि याच कल्पनांचा परिणाम आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आम्ही भुताखेतांना जीं द्रव्यें देतो त्यांत आणि मेलेल्यांच्या तृप्तिसाठीं आम्ही जीं श्राद्धें करतों त्यांत वास्तविक पहातां कांहींएक फरक नाहीं. तेव्हां मेलेल्या आत्म्याच्या स्वरूपांतच थोडा फेरबदल करून त्यापासून मनुष्यें पिशाचकल्पना साधतात असें म्हणण्यास काय हरकत आहे ? निरनिराळ्या ठिकाणचीं श्राद्धविधींची जों जों विशेष बारकाईनें मीमांसा करावी तों तों असें स्पष्ट दिसून येतें कीं, जिवंतपणीं मनुष्यास जसले विकार होतात तसलेच मेल्यावरही त्याच्या आत्म्यास किंवा तदुत्पन्न पिशाचास होतात असा विश्वास अप्रबुद्ध लोकांत सर्वत्र आढळून येतो. प्रथमतः हा विश्वास अक्षरशहा बसतो. अमुक दिवशीं, अमुक स्थळीं, अमुक वस्तू नेऊन ठेवल्या म्हणजे भुतें त्या घेऊन जातात असें मानणारे इसम या देशांत अनेक सांपडतील. झलू लोकांत एक इंग्रज प्रवासी फिरत असतां, एका प्रसंगीं ते त्यास असें म्हणाले "काय करावें? आम्हापाशीं खाण्यास कांहीं एक उरलें

नाहीं. मांसाचीं व धान्याचीं भांडीं शिजवून ठेवून आम्हीं स्नानास गेलों तों मागें मेलेल्या वडिलांच्या भुकेलेल्या आत्म्यांनीं त्यांवर हल्ला करून सारें अन्न फस्त केलें !" केवढा विचाऱ्यांचा भोळेपणा! जे लोक झलून थोडे पुढें गेलेले असतात व ज्यांचीं भुतें वरील भुतांहून थोडींशीं कमी जड आणि अधिक वायुरूप असतात त्यांचा असा समज असतो कीं, भुतें केवळ जड धान्य व मांस खाणारीं नाहींत. मांसाच्या व धान्याच्या सारभूत सूक्ष्म अंतरंगाचें सेवन त्यांना चस्त होतें ! निकाराग्वे लोकांत मृताच्या-शरीरास दहनापूर्वी शिवासासुत्री बांधण्याची चाल आहे. पाताललोकांचा मार्ग आक्रमीत असतां आपल्या मृतपितरांना शीतबाधा न व्हावी म्हणून आहुट लोक त्यांना मुठमाती देतांना त्यांच्या थडग्यांत कांबळ्याचीं पट्टीं घालतात!

आपल्या लोकांप्रमाणेंच इतर लोकांतही निरनिराळ्या मुद्दतीचीं श्राद्धें आहेत. कोठें दसऱ्यासारख्या विशेष सणाला मृतग्रामप्रमुखाच्या नांवानें मोठा समारंभ करतात. ज्या लोकांत प्रेतें पुरण्याची चाल आहे त्या लोकांत हा प्रघात फार आढळून येतो. महिन्याच्या किंवा वर्षाच्या नेमलेल्या दिवशीं हे लोक स्मशानांत गोळा होऊन आपापल्या मृत आप्तांच्या किंवा ग्रामाधिकाऱ्यांच्या थडग्यांपुढें नानाप्रकारचीं दानें देतात. गोंड लोक आपल्या प्रसिद्ध पुरुषांच्या आत्म्यांस अनेक वर्षें अशा

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

५०

प्रकारच्या श्राद्धविधींनीं मान देतात. कांहीं लोकांचा असा समज असतो, कीं अमुक दिवशीं, अमुक ठिकाणीं मृतात्म्यांची किंवा पिशाचांची फेरी होते; आणि म्हणून ते त्या ठिकाणीं शिजलेलें अन्न नेऊन टेवतात. कित्येक लोकांचा असा समज आहे कीं, ज्या ठिकाणीं स्वयंपाक होत असतो, किंवा जेथें माणसें जेवायाला बसतात त्या ठिकाणीं वाडवडिलांचे बुभुक्षित आत्मे आपला वांटा घेण्यास गुप्त रूपानें येतात. आपल्या लोकांत वेग्वदेव करून बळीहरण घालण्याची, काव-ळ्यांना बळी देण्याची व जेवायाला बसतांना चित्रावती घाल-ण्याची जी चाल आहे तिचें हेंच मूळ असावें हें उघड दिसतें. बिशप कॅलाव्हेनें कांहीं झुलूंची एक विलक्षण गोष्ट सांगितली आहे ती अशी. एके प्रसंगीं एक झुलू कांहीं प्रश्न केल्यावरून असें म्हणाला:—"हे मेलेले लोक मूर्ख आहेत! मला न सांगतां, माझें मूल अशा रीतीनें मारून त्यांनीं आपणास प्रकट कां केलें? त्यांना मांसच पाहिजे होतें तर तें मीं आनंदानें दिलें असतें. जा, मुलांनों, तो बकरा घेऊन या. यांचें समा-धान अगोदर केलें पाहिजे." यावरून काय दिसतें कीं, जे पशु व जीं आद्यें आली मोठ्या भक्तीनें करतों व जीं न कर-णारांस आली धर्महीन समजतों, तीं सारीं अज्ञानापासून उत्पन्न झालीं आहेत. तीं करण्यांत कोणत्याही प्रकारचें शहा-णपण किंवा पवित्रपणा नाहीं, आज आमचे वडील घेऊन ब्राम्हणमुखद्वारा खीर खाऊन गेले; पुढल्या अष्टमीस आमच्या मानेथी त्याच द्वारानें पिंड घेण्यास येणार आहेत; अशा प्रकारचे उद्गार आमच्यांतील श्रेष्ठ म्हणविणाऱ्या ब्राम्हणांनीं काढण्यापेक्षां कुत्रा, वेदू, चडाल, वेल्हार, गोंड, संताल-असल्या लोकांनीं काढणें अधिक उचित होणार आहे! सध्या जीं श्राद्धें व ज्या प्रेतक्रिया होत आहेत त्या एका बाजूनें गूढ

अज्ञान आणि दुसऱ्या बाजूनें स्वार्थसिद्धीसाठीं अज्ञ लोकांस अज्ञानांतच राहूं देण्याची इच्छा यांची साक्ष देतात.

मृतात्म्यांची दिनचर्या.

मृतात्मा हा षष्ठीतत्पुरुष समास आहे; कर्मधारय समास नाहीं. "मेलेला असा आत्मा" असें झटल्यास अनर्थ होईल! मेलेल्या मनुष्याचा आत्मा म्हणजे देहाव्यतिरिक्त अथवा देहांतीत आत्मा कसा असतो हें समजणें जरी कठिण आहे तरी तो केवळ अकल्पनीय आहे असें नाहीं. अशा प्रकारच्या आत्म्यांच्या अस्तित्वावर पुष्कळांचा विश्वास असतो, आणि याच विश्वासावर समग्र पिशाचकोटीची आणि देवकोटीची कल्पना रचण्यांत आली आहे, निदान अशा प्रकारच्या आत्म्यांच्या कल्पनेंत असंबद्ध असें कांहीं नाहीं. येथपर्यंत मृतात्म्यांच्या दिनचर्येचें अगदीं स्थूल दिग्दर्शन केलें आहे. आतां त्याचसंबंधानें आणखी कांहीं गोष्टी सांगून जमल्यास **मृतात्मे** आणि **पिशाच** व **पिशाच** आणि **देव** हीं नांवें मात्र भिन्न होत; बाकी सांख्यांची मूळप्रकृति एकच आहे, हा सिद्धांत वाचकांच्या माथीस आणून द्यावयाचा विचार आहे.

मुद्रणालयाचें नांव आहेत—फर्ग्युसनकॉलेज (पुणें); **सुमार**—हवाशीर, सर्वत्र पाणी खेळविलेले असे.

मॅनेजर—सुधारक पुणें.

ज्याप्रमाणें मनुष्याला जिवंतपणी कसलें तरी अन्न लागतें त्याप्रमाणें मेल्यानंतरही त्याच्या आत्म्याला कसल्या तरी अन्नाची अवश्यकता आहे असा प्राथमिक लोकांचा स्वाभाविक समज असल्यामुळें, आपल्या नुकत्याच मेलेल्या आप्तांच्या आत्म्यांची भूक भागविण्यासाठीं निरनिराळ्या तऱ्हेच्या लोकांकडून कोणत्या प्रकारच्या व्यवस्था करण्यांत येतात हें थोडक्यांत सांगितलें आहे. आतां ते रहातात कोठें, करतात काय, वागतात कसे-वगैरे गोष्टींचा स्वल्प विचार करूं.

पुष्कळ लोकांचा असा समज असतो कीं, मृतात्मे बहुधा आपल्या निकट आप्तांना, आपल्या जातीला, आपल्या गांवाला, निदान आपल्या देशाला तरी सोडून दूर जात नाहींत ! ज्यांच्याशीं अतिशय संयोग घडला आहे त्यांचे आत्मे मरणोत्तर घराच्या एखाद्या भागांत बाबरत असावे-निदान कधीं कधीं घरीं येऊन सुखाच्यांचा समाचार घेत असावे अशी कल्पना होणें अगदीं साहजिक आहे. त्यांतल्या त्यांत ज्यांचीं मतें जात्या भिन्नीं असतील त्यांना तर यांच्या सांनिध्याचा वारंवार भास झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. कधीं पाऊल वाजलेंसें वाटेल; कधीं शब्द ऐकूं आला असा भास होईल; कधीं डोळ्यांपुढून सारी मुर्ति निघून गेली असा संशय उत्पन्न होईल ! जों जों अधिक दिवस लोटत जातात व मन दुसरीकडे व्यग्र होऊं लागतें, तों तों मृतात्म्याचा विसर पडून त्याच्या आत्म्याची चाहूल कमी झाल्यासारखी वाटते, आणि दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं तो रहावयास गेला असेल अशी कल्पना होते. ही भिन्न्या मनुष्याची गोष्ट होय. जे जात्या धीट असतात ते पहिल्यापासूनच असें समजात कीं, मेलेल्यांचे आत्मे स्मशानाच्या आसमंतात बहुधा फिरत असतात. व गरज पडेल तेव्हां मात्र गांवांत किंवा घरांत येतात. दोन अथवा

अधिक व्यक्तींचा आपआपसांत तंटा लागला किंवा दोन अथवा अधिक राष्ट्रांचें युद्ध होऊं लागलें तर हे आत्मे आपापल्या पक्षाला मिळून शत्रूंचें नुकसान आणि मित्रांची पाठराखण करतात ! अनेक कारणास्तव व्यक्ति व व्यक्तिसमुदाय स्थानांतरें करतात. आर्यलोकांच्या अनेक शाखा मध्यआशियांतून चोहोंकडे पसरल्या अशी कल्पना आहे, व ती खरी असेल तर आमच्या फार प्राचीन पूर्वजांचे आत्मे ॲरॅरॅट पर्वताच्या पायथ्याशीं भटकत असले पाहिजेत असें मानणें अवश्य आहे, व कित्येक लोक असें मानतातही ! लोकसंख्या वाढत जाऊन चरितार्थासाठीं मूळ ठिकाणाहून दूर दूर जावें लागलें व मृतात्मे मागें राहिले तर प्रसंगविशेषीं त्यांनीं आपल्या जिवंत बंधुजनांस साहाय्य करण्यास कसें यावें ? देहातीत आत्म्यांना मोठमोठ्या नद्यांचें, डोंगरांचं, दऱ्यांचें व अरण्यांचें उल्लंघन करतां येत नाहीं असा समज सर्वत्र आढळतो. या अडचणींतून पार पडण्याची एक तोड अशी आहे कीं, या मृतात्म्यांस सुखरूपपणानें प्रवास करतां यावा म्हणून पूल बांधून देतात. हा पूल कशाचा ? तर मृताच्या किंवा लौकरीच्या भाग्याचा ! वायुस्वरूपाप्रत पावलेले प्रेतात्मे संतुरचित सेतुपथानें हव्या तितक्या लांबीचा प्रवास अडथळ्याविांचून करतात ! तात्पर्य, कांहीं मृतात्मे घरच्या घरीं, कांहीं गांवच्या स्मशानांत व इतर जागीं, कांहीं गांवठाणाच्या सीमेवर, कांहीं समुद्राच्या कांठीं, कांहीं अरण्यांत, कांहीं डोंगरांत, व कांहीं दूर असलेल्या मूळ-

---

ब्रह्मी व्याधि-मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणारांस अत्यंत फायदेशीर. दुसरें नाहीं.

डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

च्या देशांत रहातात, असे अनेक लोकांचे अनेक प्रकारचे तर्क आहेत.

आतां हे मृतात्मे रहातात कसे व करतात काय हें पाहूं. ज्या सत्पुरुषांचे आत्मे कैलासाला किंवा वैकुंठाला जातात ते कसे रहातात हें आमच्या वाचकांस पाल्हाळानें सांगण्याची गरज नाहीं. वैकुंठ व कैलास हे आमच्या अनेक स्वर्गांपैकीं दोन स्वर्ग होत. स्वर्ग म्हणजे चैनीचें माहेर अशी आमची सार्वत्रिक कल्पना आहे. जो स्वर्गांत गेला त्याला कोणत्याही वस्तूसाठीं श्रम करण्याची गरज नाहीं. हवा-पाणी, अन्न-येथून तेथून साऱ्या उपभोग्य वस्तु अतिशय मनोहर असून फुकट ! कोणत्याही रोग ठाऊक नाहीं, वार्धक्य यावयाचें नाहीं, व मृत्यूची तर वार्ताच नाहीं ! तरुण स्त्रीपुरुषांच्या जोड्यांनीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत मोठमोठ्या जलाशयांत, उद्यानांत, व इतर रम्यस्थळीं हव्या त्या क्रीडा कराव्या आणि अमृताचें प्राशन करून सर्वकाळ आनंदांत असावें ! कित्येकांना स्वर्गाचें अशा प्रकारचें चित्र सर्वथा पसंत पडत नाहीं. त्यांच्या मतें स्वर्ग झाला म्हणून काय झालें ! तेथेंही थोडें बहुत काम असल्याशिवाय तेथील रहिवाश्यांस सुख व्हावयाचें नाहीं. येथल्यासारखें हाडाचें पीठ पाडणारें काम नव्हे, झाडांचीं कलमें करणें, बागांतील फुलें वेंचणें, रुप्याच्या व सोन्याच्या लहान लहान कळशांनीं फुलझाडांस पाणी घालणें-अशा प्रकारचीं व कांहीं-कांच्या समजुतीप्रमाणें थोडीबहुत जमीन पिकविणें, मासे पाळणें, शिकार करणें असलींही कामें स्वर्गांत कधीं कधीं करावीं लागतात ! अशा प्रकारचा येथला थाट वर उठल्यावर येथल्यासारखेच कांहीं चांगले व कांहीं वाईट आत्मेही तेथें असणार. जेथें अशी स्थिति आहे तेथें एका प्रकारची राज्यव्यवस्था असून ती चालविणारे निरनिराळ्या दर्जाचे अंमलदारही पाहि-

जेत. स्वर्गातील साऱ्या अधिकाऱ्यांपेक्षां न्यायाधिशाचें मोठें माहात्म्य आहे. तेथें दिवाणी व फौजदारी खटले एकाच न्यायाधिशापुढें चालतात. तेथील रहिवाश्यांस जूरीचा हक्क अद्यापि मिळालेला नाहीं, म्हणून थोड्या दिवसांपूर्वी जूरीच्या हक्काचद्दल बगांल्यांत ज्या प्रकारचा तंटा झाला तसल्या प्रकारचा तंटा स्वर्गात आजपर्यंत झाल्याचा दाखला नाहीं ! तथापि न्यायाधिशापासून बेलिफापर्यंत सर्व प्रकारचे अधिकारी तेथें आहेत इतकेंच नाहीं, तर गुन्हे पकडणारे व पुरावा मिळवून गुन्हे शाबीत करणारे हुशार पोलिसही तेथें आहे ! ज्यांनीं खुनासारखे भयंकर गुन्हे केले आहेत त्यांना, व तेथेंही कोणत्याही प्रकारचें निषिद्ध कृत्य करणारांना दंड करण्यासाठीं मोठमोठाले तुरुंग, बिड्या, कडेलोटाच्या जागा, वधस्तंभ, सूळ वगैरे अनेक प्रकारचीं शिक्षोपकरणें आणि न्यायाधिशांच्या हुकमाप्रमाणें अपराध्यांस शिक्षा देणारे अधिकारी तेथें आहेत. तात्पर्य, स्वर्गलोक इहलोकाची बऱ्याच अंशीं हुबेहूब प्रतिमा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं !

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. ट. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

थडगीं व देवळें

ज्याप्रमाणें देवांची उत्पत्ति पिशाचांपासून झाली आहे असें लणणें प्रथम दर्शनीं किंचित् आश्चर्यकारक वाटतें, त्याप्रमाणेंच देवळें थडग्यांपासून झालीं आहेत असें म्हणणेंही वाटतें. पण जितका पिशाचांचा देवांशीं तितकाच थडग्यांचा देवळांशीं निकट संबंध आहे. ज्याप्रमाणें आमचीं देवळें थडग्यांपासून किंवा समाधींपासून निघालीं त्याप्रमाणेंच मुसलमान लोकांच्या मशिदी कबरस्थानांपासून व ख्रिस्ती लोकांचीं चर्चें चर्चयार्डापासून निघालीं. सुधारणेच्या कांहीं अंगांनीं युरोपखंडाचें पाऊल आजमितीस बरेंच पुढें आहे हें निर्विवाद आहे. पण धर्मसंबंधानें ख्रिस्ती लोकांच्या कल्पना इतर लोकांच्या कल्पनांप्रमाणेंच अज्ञानमय आहेत इतकेंच नाहीं, तर या गोष्टींत ते कांहीं लोकांपेक्षां विशेष गूढ आहेत, असेंही सिद्ध करून देतां येईल.

अलीकडे वर्गीच शतकें आम्ही बहुतेक हिंदु लोक आपलीं मनें चितेवर जाळीत असल्यामुळें, देवळांचें थडग्यांशीं जें सूक्ष्म आहे तें झटदिशीं आमच्या लक्षांत येत नाहीं. पण आमच्यांतही अद्यापि जो समाधिप्रचार अंशतः रूढ आहे त्याकडे लक्ष दिल्यास, जसा पिशाचांपासून देवांचा अवतार झाला, त्याप्रमाणेंच थडग्यांतून देवळें अवतरलीं अशी खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. आम्ही आपल्या प्रेतांचें दहन करूं लागल्यामुळें आमच्या प्रेतविधींतील पुष्कळ मौज नाहींशी झाली व त्याला एक प्रकारचा हिडिसपणा आला. उपयुक्ततेच्या दृष्टीनें पहातां दहनाची चाल फार उत्कृष्ट आहे, व तिच्या चांगुलपणामुळें आज नाहीं उद्या, सर्व सुधारलेल्या लोकांस ती

मान्य झालीच पाहिजे याविषयीं आम्हांस शंका नाहीं. पण तूर्त आह्मी समाधि व चिता यांच्या कमी अधिक उपयुक्ततेचा विचार करीत नाहीं; समाधींतून देवालय कसें प्रकट झालें हें पहाण्यांत सध्यां आह्मी गुंतलों आहों. तेव्हां समाधि व त्यांच्या-संबंधाचे विधि हे प्रस्तुत काळीं असावे तितके आमच्यां डोळ्यां-पुढें नसल्यामुळें समाधीपासून देवळाकडे येतांना मन थोडें बुजल्यासारखें होतें! पण वास्तविक पहातां तसें होण्याचें कांहीं कारण नाहीं. हें भरतखंड अनेक तऱ्हेच्या विचित्रपणाचें पूर्ण भांडार आहे. अमुक एक आचार अमुक लोकांत आहे आणि तो येथें नाहीं, असें सहसा ह्मावयाचें नाहीं. जंगम, मानभाव, गोसावी वगैरे हिंदू लोक आपलीं प्रेतें पुरतात आणि तीं पुरतांना मोठा थाटमाट करतात हें बहुते-कांस ठाऊक असेलच. ब्राह्मण लोकांतही संन्याशांस समाधि देण्याची आणि श्रीमंताच्या प्रेतांवर किंवा अस्थींवर समाधि बांधण्याची चाल आहे. अनेक ठिकाणीं शिवाजीराजाच्या पादुकांची स्थापना करून त्यावर देवळें बांधण्यांत आलीं आहेत हें पुष्कळांना ऐकून तरी ठाऊक असेल. अशा देवळांत बहुधा सांचाची स्थापना करतात, आणि इतर देवतांसारखी या देवाचीही पूजाअर्चा होऊं लागते. कोणी एका महंमद्यानें आप-ल्या दांतांवर थडगें बांधलें म्ह्णून आह्मी त्याला वेडा असें ठर-वितों किंवा तो वेडा होता म्हणून त्यानें दातांवर थडगें बांध-

---

कॅलेंडर:-दरसाल डिसेंबर अखेर आम्ह्मी छापतों असतों. ट. ह. करितां ८१ पाठविल्यास कोणासही त्यावेळीं तें फुकट मिळेल.

मॅनेजर.

सुधारक प्रिं. प्रेस, पुणें सिटी.

ण्याचा हुकूम दिला असें म्हणतों; पण कसेंही झालें तरी महमद हा मनुष्य होता, आणि म्हणून त्याच्या दातावर थडगें बांधण्यांत कांहीं अर्थ होता; परंतु कुत्र्याच्या शवावर हें थडगें बांधलें आहे असें ठाऊक असून जर लोक त्याला भक्तिपूर्वक प्रदक्षिणा घालूं लागले, आणि त्याच्या तोंडावरील शिलेंत खोदलेल्या कुत्र्याच्या चित्रास ज्ञानेश्वर समजून नवस करूं लागले तर त्यांच्या मूर्ख भोळेपणास काय म्हणाल? अशा प्रकारचा श्वानसमाधि आणि तिच्या दर्शनास येणारे भाविक लोक आह्मीं स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिले नसते तर असली गोष्ट आम्हास सोलावि थाप वाटली असती! पण प्रत्यक्ष प्रमाणापुढें आम्हासही हात टेंकणें भाग आहे.

खोल खड्डे घेऊन लांकडाच्या पेटींत घातलेलीं प्रेतें त्यांत गाडल्यावर त्यांवर चुनेगच्ची चिरेबंदी थडगीं बांधण्याची व त्यांवर मृताचे नांवगांव खोदलेल्या शिला बसाविण्याची चाल बरीच सुधारणा झाल्यावर पडते. चुन्याचा उपयोग समजून तो तयार करण्याची रीति, दगडावर अक्षरें खोंदण्याची कला, प्रेत कुजूं न देण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारचे मसाले तयार करण्याची विद्या, व थडग्यास नानाप्रकारचे आकार देण्याची हातोटी—या प्राथमिक मनुष्यास साधण्यासारख्या गोष्टी नाहींत. प्रेत झाकलें जाईल इतका खोल खड्डा घेऊन त्यावर भरपूर माती लोटली, व कोल्हाकुत्र्यांनीं ती उकरून आंतील प्रेतास इजा देऊं नये यास्तव त्यावर दहापांच लहान मोठे दगड ठेवले, म्हणजे रानटी लोकांचें अथवा सुधारलेल्या राष्ट्रांतील गरीब लोकांचें थडगें झालें. असल्या थडग्यांस थोडाबहुत हातभार लावणें हें सर्व प्रेत पुरणारे लोक पुण्य कृत्य समजतात. आपल्या हातून दुसरें तिसरें कांहीं झालें नाहीं तरी थडग्यावर एक चिमटीभर माती टाकणें अथवा एखादा खडा इकडचा

तिकडे उचलून देवणें हें आपलें मृताच्या संबंधानें कर्तव्य होय, असें पुष्कळ लोक समजतात. ज्या वाटेच्या बाजूला एखादा प्रसिद्ध मनुष्य पुरला असेल त्या वाटेनें कोणी मोंगल जाऊं लागला तर त्या मनुष्याच्या थडग्यावर एक लहानसा दगड, अथवा चिंधी, अथवा उंटाच्या केंसांचा पुंजका टाकल्याशिवाय पुढें जावयाचा नाहीं. जातां जातां प्रवाशांनीं अशा प्रकारें टाकलेल्या दगडांचें ढीग या देशांतही कित्येक ठिकाणीं दृष्टीस पडतात. येथें चतुःशृंगीच्या वाटेवर जो एक अशा प्रकारचा ढीग आहे तो पुष्कळांच्या पहाण्यांत असेलच. भाविक लोक जातां येतां अजून त्या ढिगावर लहानसा खडा तरी उचलून टाकतात. तात्पर्य, " फूल नाहीं फुलाची पांकळी " या न्यायानें थडगीं करणाऱ्या लोकांत मृताची होईल तेवढी सेवा करण्याचा परिपाठ आहे. अशा रीतीनें कोठें मातीचे, कोठें वेडयावांकडया गोट्यांचे; व कोठें सडकून व टांकी लावून नीटनेटक्या रीतीनें बसविलेल्या दगडांचे जे ढीग करण्यांत येतात त्यांवरच किंवा त्यांचे पुढें मृताम्यासाठीं नानाप्रकारच्या वस्तु आणून ठेवण्याचा व प्रसंगविशेषीं कोंबडीं, व बकरीं व इतर खाद्य जनावरें मारण्याचा प्रघात पडतो. आपण ज्याला स्थंडिल म्हणतों व ज्यावर हवनांचीं द्रव्यें मांडण्यांत येतात किंवा अग्निमुखानें देवांस अर्पिण्यांत येतात त्यांचें मूळ या ढिगांत आहे! याच ढिगांत पुरलेल्या

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

इसमास थंडीवाऱ्यापासून अथवा पावसापासून त्रास होऊं नये म्हणून त्याच्याभोंवतीं चारसहा मेढी रोंवून त्यांवर गवताचें, पाणकणसाचें, किंवा एखाद्या धान्याच्या कांडाचें लहानसें छप्पर टाकून दिलें कीं, प्राथमिक देऊळ झालें ! मुसलमानांच्या मशिदी, ख्रिस्ती लोकांचीं चर्चें, व आमच्या लोकांनीं प्रसिद्ध पुरुषांच्या समाधींवर बांधलेल्या इमारतींस देवालयें म्हणूं नये तर काय म्हणावें ? ख्रिस्ती लोकांच्या व मुसलमान लोकांच्या देवळांत मूर्ति नसतात हें आम्ही कबूल करतों; पण आतांपर्यंत या देवळांविषयीं जें लिहिण्यांत आलें आहे त्यांत मूर्तीचा कोठेंच उल्लेख नाहीं. थडग्यांचें स्थंडिल कसें होतें व त्यांवरील शोपडयांस देवालयाचें रूप कसें प्राप्त होतें, येवढ्याचेंच दिग्दर्शन येथपर्यंत केलें आहे. मृतात्म्याला देवत्व प्राप्त होऊन त्याच्या थडग्यावर त्याच्या प्रतिमा कशा स्थापित होतात, व पुढें त्या प्रतिमांनाच देवांच्या मूर्ति मानण्याचा प्रघात पडून त्यांपुढें पुराणें सांगण्याचा, कीर्तनें करण्याचा, प्रार्थनेस जाण्याचा, नैमाझ पढण्याचा, व सर्मनें (धर्मव्याख्यानें) देण्याचा परिपाठ कसा पडतो हें अद्यापि सांगावयाचें आहे.

मूर्तिपूजेचा उद्भव.

धर्मकल्पना पिशाच कल्पनेपासून आली आहे असें एकदां झटलें म्हणजे पैशाचिक योनिप्रत पावलेल्या मृतात्म्याविषयीं मनुष्यांनीं जे जे तर्क केले आहेत त्या बहुतेकांचा धर्माशीं आणि देवांशीं संबंध जुळवून देतां आला पाहिजे. मृत पिशाचाची कल्पना अशरीरी आत्म्यापासून आली हें अनेक वेळां सांगितलेंच आहे; व या अशरीरी आत्म्याची कल्पना स्वप्नांत जागच्या जागीं नानातेऱ्हेच्या सुखदुःखांचा जो भास होतो त्यापासून उत्पन्न होते ही गोष्ट प्रत्येकाला आपल्या अनुभवानें ठरविता येण्यासारखी आहे. झोंपेतला आत्मा, मृतात्मा, पिशाचात्मा आणि देवात्मा--अशी ही चढती भांजणी आहे ! तसेंच थडगें, थडग्यावर किंवा थडग्यांत ज्या वस्तु घालतात त्या आणि थडग्यावर केलेला मंडप अथवा झोंपडें यापासून स्थंडिल, स्थंडिलावर जी होमद्रव्यें जाळतात तीं आणि देऊळ यांची उत्पत्ति होतें, हें आतांपर्यंत या विषयाच्या संबंधानें जें लिहून गेलें आहे त्यावरून वाचकांची खात्री झालीच असेल. मुंजींत, लग्नांत, आवणीला, किंवा इतर प्रसंगीं मातीचे लहान कुंडे करून त्यावर दहीं, दूध, तूप, भात अथवा समिधा जाळण्याचा जो प्रकार चालतो त्यांत आणखी खऱ्यांत प्रत

संगीत सुविचार-विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.

किं. ०८

सुधारक ऑफीस, पुणें.

पुरून त्यावर लादलेल्या मातीच्या ढिगावर अन्न आणून ठेवण्याचा कोंबडीं किंवा बकरीं मारण्याचा आणि दारूच्या बाटल्या ओतण्याचा जो प्रकार चालतो त्यांत काय भेद आहे ? वास्तविक पाहतां कांहीं नाहीं, फक्त एकाला पूर्वजदान अथवा पिशाचदान आणि दुसऱ्याला देवदान अशी पाहिजे तर निराळीं नांवें देतां येतील तर मग आतां देवळांतच मूर्ति कोठून आल्या, व त्यांत प्रार्थना करण्याचा परिपाठ कोठून पडला ?

धर्माची वंशावळ लावणारानें या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर दिलें पाहिजे. आतांपर्यंत जें ह्मटलें आहे त्यावरून या प्रश्नाचा निकाल होत नाहीं. मृतात्म्याचें पिशाच व पिशाचाचा देव झाला असेल, थडग्यावरील मातींतून स्थंडिल निघालें असेल, व थडग्यांत पुरलेल्या प्रेतास पाऊसवाऱ्याची बाधा होऊं नये ह्मणून त्याचें भोंवतीं चार मेढी पुरून त्यावर घातलेल्या छपरापासूनं देवळाचा अवतार झाला असेल. परंतु अमूर्त मृतांतून मूर्त्युद्भव कसा झाला ? अशरीरी पिशाचाला देवरूपानें देवळांत शरीर कोठून प्राप्त झालें ? व मनुष्यरूपी देवांच्या व देवींच्या मूर्ति जागोजाग कशा दृष्टीस पडूं लागल्या याचा खुलासा होणें जरूर आहे.

बौद्ध, हिंदू, ख्रिस्ती, व महंमदी हे सर्व धर्मांत चार प्रमुख धर्म होत. पैकीं शेवटल्या दोहोंत ह्मणण्यासारखी मूर्तिपूजा नाहीं. बौद्ध लोक फक्त बुद्धमूर्तीची पूजा करतात. इतर देवांस ते जुमानीत नाहींत. आह्मी हिंदू लोक मात्र भले भक्कम मूर्तिपूजक आहों ! आमच्याप्रमाणेंच जुने इजिप्शिअन, ग्रीशन व रोमन लोक मूर्तिपूजारत होते. यावरून काय दिसतें कीं, मूर्तिपूजेला जगा पूर्वीच्या धर्माकडून उदार आश्रय मिळत होता तसा अलीकडील धर्माकडून मिळत नाहीं. आमचा हिंदू धर्म

सध्या अस्तित्वांत आहे तरी तो जुन्या धर्मांप्रमाणें त्यांतही मूर्ति पूजेचें मोठें बंड असावें हें स्वाभाविक आहे. आतां जुन्या धर्मांत मूर्तिपूजेचें एवढें प्रस्थ कां माजलें असावें आणि अलीकडील धर्मांतून तिला आपलें अंग काढून घेणें कां भाग पडलें असावें याचा निर्णय करणें हा अत्यंत बोधपर व मनोरंजक विषय आहे. पण आजच आम्हांस त्यांत पडण्याची गरज नाहीं. मूर्तिपूजा कोठेंही असो, ती तेथें कशी आली हें आम्हांस प्रथम पहावयाचें आहे.

मूर्तिपूजा तीन प्रकारची आहे. जड वस्तूंची पूजा: वनस्पतींची पूजा, व प्राण्याची पूजा. नर्मदेतले दगड, वृंदावनांतली तुळस व गोठ्यांतली गाय—या तिन्हीही वस्तु आपल्या देवता होत। या तीन वस्तूंस तीन प्रकारच्या मूर्तींचे प्रतिनिधि मानून त्याचे तीन वर्ग अथवा गण मानले तरी चालेल. दगडाच्या गणांत किंवा दृषद्दार्द वर्गांत चंद्रसूर्यापासून मातीच । पार्थिवापर्यंत--पाहिजे त्या जड वस्तूंचा समावेश करण्यास हरकत नाहीं. प्राणिगणांत हवेंत उडणाऱ्या, पृथ्वीवर चालणाऱ्या व पाण्यांत पोहणाऱ्या पाहिजे त्या पक्ष्याचा, जनावरांचा अथवा माशाच्या जातीचा अंतर्भाव करतां येईल. वनस्पतिवर्ग तर अमर्याद्च आहे. याचा वैद्यशास्त्राशीं संबंध असल्यामुळें प्रत्येक झाडाला देवपण आलें आहे असें म्हटलें तरी चालेल. अशा रीतीनें विकास पावलेल्या त्रिविधात्मक मूर्तिपूजेचा उगम कोठें आहे हें निश्चयानें समजेल तर मोठी मौज वाटणार नाहीं काय ? अर्थात वाटेल.

समाज-शास्त्रावरील व्याख्यानें.

प्रो. जी. सी. भाटे एम्. ए. कृत. किं. ८८

सुधारक ऑफीस, पुणें.

मूर्तिपूजेचें मूळ मनुष्याच्या स्वभावांतच आहे. जसा लहान मुलाला प्रबुद्ध व अप्रबुद्ध आणि सजीव व निर्जीव यांतला भेद नीटसा कळत नाहीं, त्याप्रमाणेंच प्रथमावस्थेंतील प्रौढ मनुष्यानांहीं तो कळत नाहीं. मांजरें, कुत्रीं, वांसरें वगैरेवर लहान मुलांचें प्रेम किती असतें हें सर्वांना ठाऊक आहेच. त्यांना तीं आपल्या सवंगड्यारखी अथवा कुटुंबांतील इतर माणसा-रखी वाटतात. तसेंच, पायरीवरून पडलें असतां पायरीस मारल्यानें त्याचें समाधान होतें हेही पुष्कळांनीं पाहिलें असेल. या उदाहरणां-वरून आपल्या मनोधर्मासारखे मनोधर्म आपल्या सभोंवतालच्या सजीव व निर्जीव पदार्थांत असावे अशीं तीं सहजगत्या अनु-मानें करतात असें दिसतें. उत्तरोत्तर असलीं अनुमानें चुकीचीं आहेत असा त्यांस प्रत्यय येतो. पण तो येण्यास बराच काळ लागतो, आणि आला तरी कांहीं गोष्टींविषयीं त्यांचे ग्रह त्या अवकाशांत इतके दृढ होऊन जातात कीं पुढें ते कांहीं केल्या तसे नाहींसे होत नाहींत. मूळ वस्तूचे गुण तिच्या प्रतिमेंत उतरतात हा एक अशा प्रकारचा ग्रह होय, व हाच ग्रह प्रधानतः मूर्तिपूजेच्या मुळाशीं आहे. प्रथमावस्थेंतील लोकांना प्रकृति आणि तिची छाया अथवा प्रतिकृति यांतील भेद बरोबर न स-मजल्यामुळें लहान मुलांप्रमाणें एकीचे गुण दुसरींत उतरतात असा त्यांचाही समज असतो, आणि म्हणून त्यांना असें वाटतें कीं जर मृत मनुष्याच्या शरीरावर त्याची प्रतिमा ठेविली तर तींत त्याचें पिशाच शिरेल; कारण त्याला हा आपलाच देह आहे अशी भ्रांति होईल. पुढें मृताचें चित्र शरीरावर असेल किंवा दुसरे कोठेंही असो, त्यांत त्याच्या पिशाचाचा संचार होईल अशी खात्री असते. एकदां अशा प्रकारच्या प्रतिकृतींत मृतांचे आत्मे प्रवेश करतात अशी कल्पना दृढ झाली म्हणजे मृताच्या प्रतींप्रमाणेंच त्यांची सेवा ते करूं लागतात.

आफ्रिकेंत **निआंझा** नांवाचें जें सरोवर आहे त्यांच्या कांठीं रहाणाऱ्या नीग्रो लोकांविषयीं जगप्रसिद्ध प्रवाशी लिव्हिंगस्टन यानें असें ह्मटलें आहे कीं, हे लोक आपल्या मृतांच्या मूर्ती-करून त्यांना आपल्या निरानिराळ्या आतांची नांवें देतात, आणि प्रतिदिवशीं तांदूळ, कणीक, भांग तंबाखू वगैरे वस्तु त्यांपुढें ठेवून त्यांना चिलमी फुकतां याव्या ह्मणून विस्तव तयार करूनही ठेवतात! अशा रीतीनें मृतांची सेवा केली असतां त्यांना मोठा आनंद होतो असा या लोकांचा समज आहे. **सिएराल्योन** येथील एका नीग्रो स्त्रिविषयीं बॅस्टिअन यानें असें सांगितलें आहे कीं तिनें आपल्या खोलींत एकंदर चार मूर्ति करून ठेविल्या होत्या. एक आपल्या मेलेल्या नव-ऱ्याची, एक खुद्द आपली आणि दोन आपल्या दोन मुलांच्या या मूर्तीस ती प्रतिदिवशीं मक्याचे पीठ आणि तोंबरेल यांचें चोपडण करीत असे! अशा प्रकारें ज्या मूर्तीची आराधना कर-ण्यांत येते त्याचे मुळाशीं विरोध साम्य असावें लागत नाहीं. कधीं कधीं तर त्यांत व मुळांत फारच वैषम्य असतें. देवयोनी-प्रत पावलेल्या पितरांच्या प्रतिकृतिस्थानीं **द्‌मारा** लोकांनीं लाकडाच्या दोन तुकड्यांची योजना करून ठेवलेली असते विशेष प्रसंगीं अशा प्रकारच्या प्रतिकृति ते बाहेर काढतात. आपल्या लोकांतील भिल्ल व इतर जातींच्या अडाणी लो-

---

ंदुर:-दरसाल डिसेंबर अखेर आम्ही छापीत असतों.
तां ९१ गाठविल्याग कोणासही त्यावेळीं नें फुकट

मॅनेजर.

सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें सिटी.

कांऱ्या मूर्तिविषयीं येथें विशेष सांगण्याची जरूरी नाहीं. एखादा मोठासा तेडाबागडा दगड पाहून त्यावर अर्धशेर पावशेर शेंदूर अथवा हिंगूळ चोपडला किंवा थोडेसें तेल ओतलें कीं बनला तो हनुमोबा, पिरोबा, खंडोबा अथवा मारुती आणि झाली त्यापुढें अन्नाचे व मांसाचे नैवद्य व बळी देण्याचा सुरुवात! यावरून कायं दिसतें कीं, मेलेल्या मूळच्या मनुष्यांत आणि पुढें त्याच्या नांवानें केलेल्या प्रतिकृतींत कांही साम्य असो अथवा नसो, त्या प्रतिकृतींत मेलेल्यांचे आत्मे संचार करतात, अशा या प्रतिकृती करणाराचा पूर्ण विश्वास असतो: तेव्हां ज्या लोकांत अशा प्रतिकृति दृष्टीस पडत नसतील त्या लोकांत अशा प्रकारचा विश्वास नसला पाहिजे असें अनुमान करणें जरूर आहे, आणि शोधाअंतीं वस्तुस्थितीही तशीच आहे असें दिसून आलें आहे. आफ्रिकेत **बहादों** नांवांचे लोक आहेत, त्यांत असल्या कल्पना मुळींच नाहींत. आसल्या आचरटपणाच्या मूर्तिपूजेचा यत्किंचित् देखील मागमूस त्या लोकांत लागत नाहीं. पण हे सांगतांना त्या लोकांस मृतांविषयीं पूज्यबुद्धिही मुळींच नाहीं हेंही सांगितलें पाहिजे. ते आपल्या मृतांची प्रेतें जंगलात फेंकून देतात, आणि तेथें तीं बहुधा व्याघ्रांच्या अथवा इतर वन्यपशूंच्या भक्ष्यस्थानीं पडतात.

मूर्तिपूजेचा प्रकार.

मागल्या लेखांत मूर्तिपूजेचा उद्भव कसा होतो हें सांगून जडवस्तुपूजा, प्राणिपूजा व वनस्पतिपूजा असे तिचे पुढें तीन प्रकार होतात असें सांगितलें आहे. या प्रकारांविषयीं आज थोड्याशा खुलाशानें लिहून नंतर त्यापासून जीं अनुमानें स्वाभाविकपणें निघतात तीं काढावयाचीं असा इरादा आहे.

आपण झाडें कां पूजतो ? अर्थात् इतर वस्तूंची पूजा करण्यास जीं कारणें असतील तींच झाडांची पूजा करण्यासही असलीं पाहिजेत. जो मनुष्य स्वतः पराक्रमी आहे, किंवा ज्याचा पराक्रमी पुरुषाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध आहे, अथवा ज्यापासून लोकांचें कोणत्याही प्रकारचें मोठें हित होत आहे, अशा प्रकारच्या मनुष्याला बहुधा लोकांत मान मिळतो. हाच मान वाढला म्हणजे त्याला पूजा म्हणतात; व ही पूजा करण्याची बुद्धि आपल्या अंतःकरणांत उत्पन्न झाली म्हणजे आपण तिला पूज्यबुद्धि म्हणतो. वड, पिंपळ, उंबर, आपटा, शमी, तुळस, बेल, वगैरे झाडांविषयीं आमच्या मनांत जी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली आहे ती वर थोडक्यांत सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्या तरी कारणांनीं उद्भवली असावी यांत संशय नाहीं. जिरेनिअम प्रमाणें तुळशींत हवा स्वच्छ करण्याचा गुण प्रकार आहे, म्हणून आम्ही सारे तिचे भक्त बनलों आहों किंवा

श्रमी श्रम-मानसिक आणि शारीरिक श्रम किंवा जागरण करणाऱ्यांस अत्यंत फायदेशीर. हस्तस्पर्श नाहीं.

डॉ. के. व्ही. खरे, लाव्हा ऑफीस, पुणें सिटी.

शर टी. माधवरायांनीं एकदां सुचविल्याप्रमाणें बेल, तुळस, आणि गवती चहा यांचा चहा ऊर्फ गोड काढा रोज सकाळीं घेतल्यास वातपित्तकफाची विशेष बाधा न होतां प्रकृति साफ राहण्यासारखे गुण तींत आहेत, म्हणून आम्हीं तिला देवांच्या पूजेंतील एक अत्यवश्यक द्रव्य केलें आणि सर्व ऋतूंत गायकांना तिच्या भोंवतीं प्रदक्षिणा घालण्यास लाविलें, हें निश्चयानें सांगतां येत नाहीं; तथापि येवढें खरें आहे कीं ह्या झाडांच्या अंगच्या कसल्या तरी चांगल्या गुणाबद्दल त्याला आमच्या घरांत व देवळांत इतकें महत्वाचे स्थान मिळालें असावें ! वड, पिंपळ, उंबर वगैरे मोठ्या गर्द छायेचीं झाडें आहेत, आणि त्यांपासून पांथांस व इतरांस मोठें सुख होतें म्हणून त्यांस देवत्व प्राप्त झालें असावें असें प्रथम दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. पण वास्तविक कारण तसें दिसत नाहीं. तसें असेल तर आंबा, बकुळ, फणस वगैरे दाट छायेचीं झाडें पूज्य कां झालीं नाहींत ? आंबा व फणस छायेला चांगले असून खायलाही कांहीं वाईट नाहींत ! तेव्हां फायद्याच्या दृष्टीनें हीं झाडें विशेष पूज्य व्हायला पाहिजे होतीं. तसेंच, याच दृष्टीनें गुलाब, दवणा, मरवा, जाई, जुई, मोगरा वगैरे सुवासिक पानांचीं व फुलांचीं झाडेंही देवकोटींत जायला पाहिजे होतीं. पण तसेंही झालेलें नाहीं. यावरून वड, पिंपळ वगैरे झाडांस देवपण येण्यास दुसरें कांहीं तरी कारण झालें असावें. आमची कल्पना अशी आहे कीं, आंबा, बकुळ, फणस वगैरे झाडांप्रमाणें हीं झाडें लावण्यास कष्ट पडत नाहींत, तीं आपल्या आपण कोठेंही येतात, व एकदां वाढीस लागलीं म्हणजे प्रचंड विस्तार पावतात. गांवच्या ओढ्याच्या किंवा नदीच्या कांठीं, मोठमोठ्या देवळांजवळच्या पटांगणांत पडक्या विहिरींत, भिंतींत व बुरुजांत, ज्यें पुरुषभराच्या जागा असतील तेथें अशा ठिकाणीं हीं झाडें एकदोंचें बीं तिकडे

आणि तिकडचें वीं इकडे आपोआप पडून उत्पन्न होतात, आणि त्यांची कोणी काळजी घेतल्याशिवाय मोठ्या झपाट्यानें वाढत जातात आणि प्रचंड विस्तार पावतात. कोणत्याही भव्य पदार्थाविषयीं जात्याच एकाप्रकारची आदरबुद्धि उत्पन्न होते. तशांत दुसरें कांहीं कारण झालें म्हणजे तो विशेष आदरणीय होतो. स्मशानांत वाढणाऱ्या पिंपळावर अथवा वडावर स्मशानांत जाळलेल्या किंवा पुरलेल्या स्त्रियांचे व पुरुषांचे आत्मे पिशाच रूपानें येऊन बसत असतील अशी कल्पना एकदां मनांत आली कीं तिनें तुम्हाला घेतलें म्हणून समजा. ज्या गांवांत भुतांचे बसण्याउठण्याचें झाड नाहीं असा गांव बहुधा या देशांत सांपडावयाचा नाहीं. ही कामगिरी बहुधा पिंपळाकडे येते. तथापि कधीं कधीं वायुस्वरूपी प्राण्यांना चिंचेच्या झाडावर देखील संचार करण्यांत मोठी मौज वाटते! तात्पर्य, झाडांस जें देवपण आलें आहे तें पिशाचांचे अथवा देवांचे वसतिस्थान झाल्यामुळें आलें आहे असें दिसतें.

वनस्पतीपूजेचें रहस्य कळल्यावर प्राणिपूजेचें कारण मुळींच कठिण नाहीं. स्मशानांत किंवा ज्या दुसऱ्या ठिकाणीं भूतेंखेतें नेहमीं हिंडतात फिरतात असा विश्वास बसून गेलेला असतो, त्या ठिकाणीं येणारींजाणारीं जनावरें मृतात्म्यांनीं धरलीं जातात असा समज होतो. घुबडें, पाकोळ्या, साप वगैरे प्राण्यांची पूजा कोणी करो अथवा न करो, मेलेल्या स्त्रियांचे व पुरुषांचे आत्मे त्यांत प्रवेश करून आपल्या जुन्या ठिकाणीं वारंवार येतात असें

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

सर्व अडाणी लोक मानतात. विशेषतः साप अशा तऱ्हेनें फार दृष्टीस पडतात असा सार्वजनिक समज आहे. "आमच्या घरचा नाग फार जुना असून त्याचे अंगावर वीत वीत केंस आहेत; रात्रींचा तो जाऊं लागला म्हणजे त्याचेभोंवतीं उजेड पडतो; तो कोणास कधीं त्रास देत नाहीं; लहान मुलाबाळांच्या अंगावरून जातो, पण कधीं कोणाला दंश करावयाचा नाहीं; त्याच्या छायेखालीं आह्मांला कशाचेंही भय वाटत नाहीं: एखादे वेळीं जाण्यायेण्याच्या वाटेवर पडल्यामुळें रस्ता बंद होतो; मग थोडी प्रार्थना केली, आणि कांहीं अपराध झाला असेल तर वडिलांनीं क्षमा केली पाहिजे, असें म्हटलें म्हणजे मुकाट्यानें निघून जातो."—अशा प्रकारच्या या जनावराच्या गोष्टी घरांतील म्हाताऱ्या व म्हतारे सांगतांना पुष्कळांनीं ऐकल्या असतील. सर्परूपानें पिशाचें दंश करतात, व चांगल्या पंचाक्षऱ्याच्या गारांत तीं सांपडलीं असतां बोलूं लागून दंश करण्याचें कारण सांगतात, आणि त्यांचें जें देणें असेल तें दिलें म्हणजे विष उतरून घेऊन चालतीं होतात, असेंही पुष्कळांचें म्हणणें आहे. दंश केलेल्या मनुष्याच्या अंगांत मांत्रिकानें आणिल्यावर तो बोलूं लागला आणि दंश करणारा साप सर्वांसमक्ष फर पटत येऊन व जखमेच्या जागीं आपलें तोंड लावून विष उतरून घेऊन गेला—अशी एका सर्पदंशाची हकीगत आह्मांस एका बी. ए. मामलतदारानें 'मी आपल्या डोळ्यांनीं पाहिली' असें सांगितल्याचें स्मरतें! काय असेल तें असो; बऱ्याचू लोकांत अशा प्रकारचा विश्वास असतो यांत संशय नाहीं. आपण ज्याप्रमाणें नागपंचमीला वैद्यूनीं आणिलेल्या नागांस दूध घालतों, त्याप्रमाणें पोलंडचे लोक एका जातीच्या काळ्या सापाला दूध व अंडीं घालतात. एशिया, युरोप, आफ्रिका, व अमेरिका या चारही खंडांतील बहुतेक देशांत हा विश्वास

आढळतो. आमचे श्रीकृष्ण परमात्मे शेषमंचकावर पहुडले असून श्री लक्ष्मी त्यांचे पादसंवाहन करीत असते हें कोणाही हिंदुला सांगावयास नको. ज्ञानवृक्षाचें फळ खाण्यास मनु ष्यांच्या आद्य मातेला सैतानानें जो भुरळ पाडला तो सर्परूप धारण करून पाडला असा ख्रिस्ती लोकांचा विश्वास आहे. गाय व बैल यांची पूजा येथें रूढ होण्यास त्यांची उपयुक्तता कारण झाली असावी हें उघडच आहे. इतर देशांतही अत्यंत उपयुक्त जनावरांची पूजा करण्याचा परिपाठ असतो. हीं पूज्य जनावरें खाण्याकरतां मारूं नयेत असा निर्बंध सर्वत्र असतो असें नाहीं. पूर्वी आमचे लोक गाईची पूजा करीत असून पाहिपाहुणा आला असतां घरच्या गाईच्या ताज्या गोऱ्ह्याचा अथवा पाडीचा समाचार घेण्यास मागेंपुढें पहात नसत, हें सुप्रसिद्ध आहे. तसेंच धनगरांनीं किंवा आळी ब्राम्हणांनीं बकरीं अगोदर पुजून मग मारून खाल्लीं तरी त्यांत त्यांच्या अथवा आमच्या धर्मबुद्धीला मालिन्य येतें असें श्रद्धावान् धनगरांस व ब्राम्हणांस वाटण्याचा संभव नाहीं ! फ्रेंच लोकांप्रमाणें आमचे लोकही अश्वमेध करीत असत, व महिषमेध अजून करतात ! आपले आप मेल्यावर हरिण होतात असा उत्तरध्रुवाकडील कांहीं लोकांचा समज असल्यामुळें ते हरणाच्या मांसाला स्पर्श करीत नाहींत. मुसलमान लोकांस वराहमांसाची व नांवाची जी इतकी चीड येते ती अशाच प्रकारच्या एखाद्या समजुतीमुळें येऊं लागली असावी. पण

धातुरत्नमाला:—या छोटेखानी पुस्तकांत सप्तधातूंची शुद्धि व मारणक्रिया दिली आहे. किं ८५

केतकर बँच ॲन्ड स्टोर्स शनवार पेठ, पुणें.

इंग्रज लोक याच मांसाला मिष्टान्न समजतात ! जशी इंग्रज लोकांस डुकराच्या मांसाची तशी फ्रेंच लोकांस घोड्याच्या मांसाची प्रतिष्ठा वाटते; व दोघेही एकमेकांच्या रुचिवैचित्र्याचा उपहास करतात ! आपण दिवाभीताला अमंगळ समजतों; जुन्या रोमन लोकांच्या निशाणावर त्याचें चित्र असे ! तात्पर्य, कोण लोक कोणतें जनावर पूज्य मानतील आणि कोणत्या रीतीनें पूजा करतील हें सांगतां येणें कठिण आहे. तथापि झाड-प्रमाणें जनावराची पूजा करण्याकडे मनुष्याच्या अंतःकरणाची एका स्थितींत स्वाभाविक प्रवृत्ति होते हें मात्र निर्विवादपणें सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे.

कांहीं लोकांतील आडनांवांचा या प्राणिपूजेशीं बराच संबंध आहे असें अलीकडे दिसविण्यांत येऊं लागलें आहे. अमुक एक जनावरें पूज्य झालीं म्हणजे त्यांशीं ज्या मनुष्यांचें वास्तविक किंवा काल्पनिक साम्य असेल अशांना त्यांचीं नांवें देण्याचा परिपाठ पडतो. सिंहाप्रमाणें ज्याचा पराक्रम आहे त्याला सिंह म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ज्यांचें आडनांव सिंह अहि अशांच्या कुटुंबांचा मूळ उत्पादक पुरुष प्रत्यक्ष सिंह असला पाहिजे असें नाहीं; सिंहाचे कांहीं गुण त्यांत असले तरी त्याला तें नांव देण्यास पुरे होतात. आमच्या लोकांत सिंह, लांडगा, बैल, घोडा, कुत्रा, मांजर, ससा वगैरे आडनावें पडलेलीं नाहींत. खिस्ती लोकांत तीं चरींच दृष्टीस पडतात; पण आमच्या लोकांत मुळींच नाहींत असें नाहीं. वाघ, रेडे वगैरे आडनांवें पुष्कळांच्या ऐकण्यांत असतील. या कुटुंबांचे मूळ पुरुष वाघ आणि रेडे असतील अशी कल्पना आज करणें जरी केवळ हास्यास्पद होणार आहे, तरी मनुष्यांच्या मनांत अशा कल्पना येऊन त्यांवर त्यांची श्रद्धा बसणें अशक्य नव्हतें असें; मानण्यास पुष्कळ आधार सांपडतो. असल्या आचरट कल्पनांनीं

आपलीं पुराणें तुडुंब भरलीं आहेत. आपापल्या कामवासना तृप्त करण्यासाठीं, आपापलीं वैरें साधण्यासाठीं, अथवा भक्तांचे व मित्रांचें मनोरथ पूर्ण करण्यासाठीं मनुष्यांनीं व देवदानवांनीं ज्या अनेक हिकमती केल्या आहेत व जीं अनेक रूपें घेतलीं आहेत त्यांचे मजेदार मासले आपल्या भारतांत व रामायणांत बरेच सांपडतील अशी आमची पक्की खातरी आहे गर्भधारणाला जेथें द्रोण किंवा घट पुरे होतो तेथें भुंगा, माशी, गुरळ,साप, मासा, डुकर, कुत्रा, गाय, हैस असले प्राणी चाललेच पाहिजेत! त्यांतल्या त्यांत आमचे लोकांना परकायाप्रवेशविद्या पूर्वीपासून माहीत होती हें ध्यानांत ठेवलें म्हणजे पिशाचयोनीप्रत किंवा देवयोनीप्रत पावलेल्या मृतात्म्यांनीं या पृथ्वीवरील कोणत्या वस्तूशीं किंवा जीवाशीं समागम करून काय क्रीडा करावी अथवा कसली सृष्टि निर्माण करावी याविषयीं कोणताही नियम. घालतां येत नाहीं किंवा अजमास करवत नाहीं ! तसेंच, जड वस्तु चैतन्यमय भासूं लागून त्यांशीं मृतात्म्यांचा संबंध होऊं लागला म्हणजे सूर्यचंद्रापर्यंत त्यांच्या गतीस अप्रतिहतत्व येतें. असें झाल्यावर भक्तवत्सल चंद्रानें, सूर्यानें, मारुतानें, अगस्तीनें, नागानें, ध्रुवानें, किंवा खगोलांतील अथवा भूगोलावरील दुसऱ्या कोणत्याही लहान मोठ्या वस्तूनें किंवा तिच्या शक्तीनें मानवी स्त्रीशीं अथवा पुरुषाशीं स्वप्नावस्थेंत किंवा जागृतावस्थेंत समागम करून विलक्षण सृष्टि कधीं

होमिओपाथिक कुटुंब-वैद्यक.

डॉ. कृष्णाजी वासुदेव खरे कृत.

पृष्ठें ४६४ सुंदर कापडी बाइंडिंग, किं. रु. २ व्ही. पी. खर्च ०४

लाल्हा ऑफीस सदाशिव पेठ, पुणें.

५२

कधीं निर्माण केली, जननमरणांच्या सामान्य नियमांचे उल्लंघन केलें, आणि कित्येक कुटुंबांत आपलीं नांवें कायम केली तर त्यांत काय नवल आहे? हामोआ जातींतील अनेक स्त्रियांस अशा रीतीनें स्वभावस्थेंत आपलें गर्भधारण झालें असें सांगून आपला लौकिक वांचवितां येतो असें म्हणतात.

देवोत्पत्तीविषयीं शेवटचे चार शब्द.

आतांपर्यंत या विषयाची बरीच चर्चा झाली आहे; तेव्हां तूर्त त्याची बोळवणी करावी हें बरें दिसतें. "**धर्मकल्पना कोठून आली?**" हा फार विस्तृत विषय आहे. देवोत्पत्ति हा त्याचा फक्त एक भाग आहे. तो महत्त्वाचा भाग आहे हें निर्विवाद आहे. पण महत्त्वाचा असला तरी वर्तमानपत्रांत त्याविषयीं वर्षाच्या वर्षे लिहीत बसतां येत नाहीं. त्यांतील मुख्य विचार सांगून दुसऱ्या भागांकडे वळलें पाहिजे; नाहीं तर वाचकांस तो कंटाळवाणा होऊन ते त्याकडे पाहिनासे होतील. कदाचित् यासंबंधानें अगोदरच तसा प्रकार होऊन गेला असेल. तेव्हां आज त्याबद्दल उपसंहारादाखल चार शब्द लिहून गुंडाळ्या लेखापासून **धर्मकल्पनेच्या** इतर अंगांकडे वळावें हें आम्हांस बरें दिसतें.

कोणाचें म्हणणें कांहींही असो, देवाची कल्पना मनुष्यापासूनच निघाली आहे असें आम्हांस खात्रीपूर्वक वाटतें, जो मनुष्य कोणत्याही प्रकारच्या धर्मकल्पनांनीं जन्मापासून पक्का आंवळून गेला असेल त्याला असल्या गोष्टींविषयीं विचार करतां

येणें किंवा त्या कोणी त्यास समजावून सांगितल्या असतां समजणें अशक्य आहे. तो जसा आला तसाच गेला पाहिजे. धर्मासारख्या जिव्हाळ्याच्या विषयावर निरभिमानानें, शांतपणानें निःपक्षपातानें, व नेमस्थपणानें विचार करण्याची पात्रता पाहिजे ती या स्थितींतल्या प्रत्येक मनुष्याच्या अंगीं असतेंच असें नाहीं. हिंदुस्थानांतल्या किंवा इंग्लंडांतल्या श्रेष्ठ कुटुंबांतील एखादें बुद्धिवान मूल आणि आफ्रिकेंतल्या अस्सल हबशी कुटुंबांतलें एखादें अत्यंत तरतरीत दिसणारें मूल घेऊन त्या दोघांस सर्व प्रकारें सारखें शिक्षण दिलें तरी त्याचा परिणाम निराळा झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. इंग्रजी अथवा हिंदु मुलांस सहज समजण्याच्या कित्येक गोष्टी हबशी पोराचें डोकें फोडलें तरी त्याला समजावयाच्या नाहींत. ज्याप्रमाणें सुधारलेल्या देशांतील आठ वर्षांच्या मुलांस किंवा मुलींस कामशास्त्राचें हल्लत समजावयाचें नाहीं; त्याप्रमाणेंच समाजदृष्टीनें अर्भकावस्थेंत असलेल्या रानटी किंवा अर्धवट रानटी लोकांस सुधारलेल्या लोकांस सहज समजण्याच्या गोष्टी कधींही समजावयाच्या नाहींत. कोणतीही गोष्ट समजणें किंवा न समजणें हें ती समजून घेणाराच्या बुद्धीस प्राप्त झालेल्या संस्कारावर फार अवलंबून असतें. शिवाय अनेकदां असें होतें कीं मूळ बुद्धि जरी बरीच ग्राहक असली तरी आरंभापासून भलत्याच विचारांचें भक्कम दृढपण तीवर पडलें असल्यामुळें दुसऱ्या विचारांचा तींत प्रवेश होऊं

वैद्यकपत्रिका:—हें साप्ताहिक दर गुरुवारीं पुणें मुक्कामीं प्रसिद्ध होत असतें. यांत आर्य, आंग्ल, व युनानी वैद्यकीसंबंधीं माहिती येत असते. वा. व. टपा. हं. सह २ रु.

वैद्यकपत्रिका ऑफीस शनवार, पुणें.

शकत नाहीं सुधारलेल्या देशांतील बहुतेक लोकांच्या बुद्धीची अशीच स्थिति असते. हजारों लोकांप्रमाणें ते जात्या मट्ट असतात असें नाहीं. देशच्या वेळीं त्यांना चांगलें शिक्षण मिळेल व स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय लागेल तर ते पाहिजे तीं गोष्ट समजून घेण्यासारखे असतात. पण तें शिक्षण सर्वांस कोठून मिळणार ? व तसा विचार करण्याची संवय सर्वांस कोठून लागणार ? सध्यां तरी दोन्हीही गोष्टी नडून आणणाऱ्या माणसांचा संघ हा प्रत्येक देशांत वाढत चालला आहे व काहीं करून त्यांचा फायदा सर्वांस मिळेल अशी बळकट उमेद आहे. पण तो मिळूं लागेतोंपर्यंत लाखों लोक धर्मसंबंधानें नानाप्रकारचे तर्क करीत राहतील, भलभलते आचार पाळतील, आणि प्रसंगविशेषीं धर्मबंध मानलें असतां तंटे करून एकमेकांचे गळे कापण्यासही तयार होतील यांत संशय नाहीं ! जगाची सांप्रत स्थिति अशी आहे. तिचा निरास करण्याकरतां ज्याला यासंबंधानें जे विचार योग्य वाटत असतील त्यानें ते आपल्या सामर्थ्यानुरूप लोकांपुढें पुनः पुनः योग्य रीतीनें मांडले पाहिजेत. आम्ही आपल्या शक्त्यनुसार तशा प्रकारचा प्रयत्न करीत आहों. त्याचें कांहीं तरी फळ येईल याबद्दल आम्हांस शंका नाहीं. पण ते सारें लिहिणें याच पिढींत येण्याचा संभव नाहीं हें आम्हीं जाणून आहों, आणि म्हणून त्यें आल्याबद्दल व आम्हांस निराशेचें दुःख होणार नाहीं. आपण हातीं घेतलेलें काम, तें करण्याच आपल्या अंगीं असलेलें सामर्थ्य, आणि तें करतांना येणाऱ्या अडचणी यांची ज्यांना बरोबर अटकळ नसते त्यांनाच निराशा फार बाधा करते. हिंदू समाजाचा विस्तार, त्याचा जरठपणा, ह्यांत दृष्टीस पडणारें विचारवैचित्र्य व आचारवैचित्र्य त्याची असंतोषकारक राजकीय स्थिति, त्याची खेदजनक दारिद्र्यावस्था, त्याला

शिक्षण देण्याच्या साधनांची पराकाष्ठेची न्यूनता--इत्यादि अनेक कारणांमुळें या लोकांच्या मनांत एखादी नवीन कल्पना भरविणें हें किती दुस्तर आहे हें आह्मांस ठाऊक आहे. तेव्हां मधून मधून ज्या नवीन कल्पना आह्मी समाजाच्या 'अंगावर फेंकून देतों त्यांना आमचे लोक बिचकतात आणि आमचा उपहास किंवा द्वेष करण्यास प्रवृत्त होतात याचें आह्मास नवल न वाटतां त्यांचें तें करणें अगदीं स्वाभाविक आहे असेंच वाटतें! ज्याप्रमाणें थोडया वर्षांपूर्वी ब्रिटिश हौस ऑफ कॉमन्सनें ग्लॅडस्टनसाहेबांचें पहिलें होमरूलबिल झपाट्यासरशी फेटाळून टाकलें, पण तेंच होमरूलबिल लिबरल पक्षाच्या लोकांनीं कांहीं वर्षें परिश्रम केल्यावर त्याच सभेनें नुकतेंच कसेंतरी बहुमतानें पास केलें, त्याप्रमाणेंच आम्ही ज्या धर्मकल्पनांची आज चर्चा करीत आहों त्या चालू घटकेला आमच्या लोकांना कितीही हिडिस अथवा असंबद्ध वाटल्या तरी कालांतरानें त्याच प्रशस्त व आदरणीय अहित अशी त्यांची खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं असा आमचा पक्का भरंवसा आहे. तो दिवस लवकर येणें हे ज्या झपाट्यानें व इर्षेने त्यांची चर्चा होत राहील त्यावर अवलंबून राहील. आमच्या व अस्मत्समधर्मी लोकांच्या परिश्रमामुळें पुढल्या पिढींत आमच्या विचारांचे अनेक तरुण लोक निघाले आणि त्यांनीं तोंडांनीं व हातांनीं या विषयाची सारखी टांकी चालविली तर थोडया वर्षांत तुमचे देव मनुष्यापासून व पिशाचापासून निघाले आहेत अशी बहुतेकांची खात्री होऊन जाईल इतकेंच नाहीं, तर तुमच्या धर्माचारांतही भरंव

लिबंधसंग्रह.

भाग १ ला. किं. १। ६.

मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

क्रांति होऊन तुमचें वर्तन पराकाष्ठेचें साधें व फक्त नीतिच्या नियमांनीं चालणारें असें होईल; संध्या, ब्रम्हयज्ञ, आवण्या, साधे यज्ञ, श्राद्धें वगैरे चालू धर्माचार पूर्णपणें लयास जाऊन त्यांचे जागीं अधिक उपयुक्त व समंजसपणाचे आचार प्रचारांत येतील आणि सत्यपरायणता, न्यायरति, परोपकृति आणि शहाणपणा इत्यादि सद्गुणांची वृद्धि होऊन लोकांना आतांपेक्षां शतपट अधिक सुख मिळूं लागेल!

वर आम्ही जें भाकित केलें आहे तें खरें होणार आहे कीं नाहीं हें ज्यांना थोडक्यांत समजून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं आजपर्यंतच आमच्या धर्मकल्पनांत जें अंतर पडलें आहे तें ध्यानांत आणिलें तरी पुरे होणार आहे. इजिप्शिअन, हिब्रयू, ग्रीक, रोमन, व ख्रिस्ती लोकांच्या आणि आमच्या प्राथमिक धर्मकल्पनांत अतिशय साम्य आहे इतकेंच नाहीं, तर पृथ्वीवर सध्या जे रानटी लोक आहेत त्यांच्या कल्पनाही तशाच आहेत. स्वप्नसृष्टी खरी आहे, मेलेल्या मनुष्यांचे आत्मे सूक्ष्म रूपानें मागें राहून झाडांत, दगडांत, अथवा जनावरांत प्रवेश करतात किंवा पिशाचयोनीप्रत पावतात; सचेतन किंवा अचेतन वस्तूंत प्रवेश करणाऱ्या अथवा पिशाचरूप घेणाऱ्या मृतात्म्यांस जिवंत मनुष्याप्रमाणेंच निजण्याबसण्याची, खाण्यापिण्याची, व हिंडण्याफिरण्याची गरज आहे; जिवंत मनुष्याप्रमाणेंच ते रागावतात, कामासक्त होतात, भांडतात, आणि एकमेकांस मारतात; वायनांनीं, प्रार्थनांनीं, व प्रणामांनीं बोलावणाऱ्या जिवंत आप्तांस व बांधवांस ते अनुकूल होऊन ज्यांना लागेल ती मदत करतात आणि श्राद्धें न करणाऱ्या, दोष देणाऱ्या, व अपमान करणाऱ्या शत्रूंचा व इतरांचा छळ करतात—अशा प्रकारच्या कल्पना आणि तदनुरोधानें होणारे आचार हिंदुस्थानांत किंवा आर्यलोकांत दृष्टीस पडतात

काय ? खचित नाहीं. हिमालयाचे पहाड व दऱ्या आल्प्स् पर्वताचीं शिखरें, आंडीस व आलेघानी पर्वतांचे पार्श्वभाग यांपैकीं पाहिजे तो प्रदेश घ्या, त्यांत या कल्पनांचा प्रतिध्वनि होत-आहे असें साफ दिसून येतें. आशिया यूरोप, आफ्रिका, अमेरिका व आस्ट्रेलिया यांपैकीं कोणत्याही खंडांत त्या नाहींत असें म्हणतां येणार नाहीं. दक्षिणध्रुवापासून उत्तरध्रुवापर्यंत व इस्टर्न आर्चिपिलेगोपासून वेस्टर्न आर्चीपिलेगोपर्यंत कोठेंही जा, त्यांची तुमची गांठ पडल्याशिवाय रहावयाची नाहीं. जशा त्या सरळ, कुरळ्या अथवा लोकरवज्या केंसाच्या लोकांत दृष्टीस पडतात तशाच त्या काळ्या तांबड्या, पिवळ्या, व पांढऱ्या रंगाच्या लोकांतही दृष्टीस पडतात. तात्पर्य, त्यांमध्यें इतकें सादृश्य आहे कीं या निरनिराळ्या ठिकाणीं दृष्टीस पडणाऱ्या लोकांचे पूर्वज एके काळीं एकाच भूप्रदेशांत असावे, आणि पुढें प्रचंड भूकंपामुळें किंवा तसल्याच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या महाप्रचंड कारणामुळें पृथ्वीवरील समुद्राचे आणि जमिनीचे विभाग होऊन त्यांची ताडातोड झाली असावी, आणि अशा रीतीनें उत्पन्न झालेला स्थलभेद त्या कल्पनांत जो फरक दृष्टीस पडतो त्यास कारण झाला असावा. असें मोठ्या मोठ्या विद्वानांचें म्हणणें आहे. तेव्हां मनुष्यांच्या सर्व जातींत अशा प्रकारच्या एका जातीच्या

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र
संगीत समाजादर्श नाटक.

ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)

एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, कृत किं. १ रुपया.

' संदेश ' एजंट, पुणें सिटी.

कल्पनांत प्रादुर्भाव होण्यास सर्वसामान्य असें कांहीं तरी नैसर्गिक कारण असावें असें अनुमान करणें प्रशस्त आहे. हें कारण मनुष्याची विशेष प्रकारची शारीरिक व मानसिक रचना होय. दुसरें कांहीं नाहीं. वेद, कुराण, बायबल वगैरे सर्व प्रकारच्या धर्मपुस्तकांत, आणि मनु, महंमद, ख्रिस्ती, कनफ्युशिअस वगैरे सर्व देशांतील धर्मकर्त्यांच्या किंवा धर्मस्थापकांच्या ठायांत ज्या कल्पना आल्या त्या मनुष्याच्या अशा प्रकारच्या प्रकृतीमुळें आल्या, आणि म्हणूनच त्यांत इतकें साम्य आहे. वासरखीच पुराणांची अवस्था आहे. आकाशांतून देव येथें कधीं आले नाहींत, व येथून परत कधीं गेले नाहींत. आम्हींच त्यांना येथल्या येथें निर्माण करतों, त्यांच्या गुणांचे पवाडे गातों; आणि चाहील तेव्हां त्यांस नाहींसें करतों. जो जो बुद्धीचा विकास होत जाऊन कार्यकारणांचा संबंध चांगला कळूं लागतो तों तों प्राथमिक व पौराणिक कल्पना मिथ्या भासूं लागून भूत पिशाच देवदानव वगैरे शुद्ध कल्पनेनें उत्पन्न केलेल्या शक्तींचा असत्यता प्रत्ययास येते, पूजेस व प्रार्थनेस ओहोटी लागते, आणि कांहीं वेळ सर्व ब्रह्मांडास उत्पन्न करून त्याचें परिपालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो. पण पुढें वेदांतविचाराच्या कुंडांत घेतलेल्या अग्नींत हें द्वैतही खाक होऊन जातें आणि अहं ब्रह्मास्मि येवढा अनिर्वचनीय विचार मागें रहातो ! व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या धर्मविचारांचा हा कळस आहे. येथपर्यंत ज्याची मजल आली त्याठायां सर्व धर्म तुच्छ आहेत !

हिंदुस्थानची तिजोरी

आणि

घातल असलेला अन्याय.

"ईश्वरानें हिंदुस्थानावर आमचें जें वर्चस्व स्थापिलें आहे तें त्या देशाच्या कल्याणाकरितांच आहे व तेथील लोकांस स्वतःच्या पायांवर उभें रहातां येऊं लागलें म्हणजे त्यांचा सर्व कारभार त्यांच्या स्वाधीन करून आम्ही मोक्ष्या संतोषानें स्वदेशाचा रस्ता सुधारूं," असें जे अनेक उदारधी इंग्रजांनीं वेळोवेळीं उद्गार काढले आहेत, त्यांच्यावर आमचा दृढ विश्वास आहे. व एकंदर सुधारणेचा ओघ पाहिला म्हणजे ह्या उद्गारांनुरूप कृति घडून येण्याचा कालही फार लांब नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. परंतु या उदारधींच्या इच्छेप्रमाणें हिंदुस्थान स्वातंत्र्यसुखाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊं लागण्यापूर्वी आपल्या लोकांच्या स्वार्थप्रवृत्तीस कांहींसा आळा घालण्यास त्यांच्याकडून कसोशीनें प्रयत्न झाले पाहिजेत व ते त्यांच्याकडून लवकर होण्यास आम्हींही आपली शिकस्त केली पाहिजे. इंग्लंड व हिंदुस्थान यांचा संयोग घडून आल्यापासून हिंदुस्थानचें कांहींच कल्याण झालें नाहीं, किंवा हिंदुस्थानच्या लोकांस

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र नांवाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ८१० पौंड.

मोरोक्को कॉफी ८१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारचा माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं.

ज्यावं हें प्रथमदर्शनीं कोणासही आश्चर्यकारक दिसणार आहे. पण वर ज्या स्वार्थप्रवृत्तीचा उल्लेख केला आहे, ती मनांत आणली म्हणजे सरकारच्या वर्तनाची वेगळी मीमांसा करण्यास नको. इंडियासरकारच्या मनांतून हा अपवाद करावयाचा नव्हता. परंतु स्टेटसेक्रेटरीपुढें त्यांचें कांहीं चाललें नसावें असें मि. वेस्टलंड यांच्या भाषणांतील पुढील वाक्यावरून ध्वनित होतें. ते म्हणाले कीं, "जकातीचें मान प्रारंभींच शेंकडा ५ हून अधिक नसावें हें इंडियासरकारचें मत इंग्लिशसरकारासही सयुक्तिक दिसलें; परंतु जकातीस पात्र अशा वस्तूंत कापसाच्या कापडाचा आजच समावेश करावा या गोष्टीस संमति देण्याची त्या सरकाराची तयारी नाहीं. ठीकच आहे ! कशाला असेल त्या सरकारची तयारी ? त्यांनीं हिंदुस्थानच्या तिजोरीचा चिंता वहावी कीं, लँकेशायरच्या लोकांची चिंता वहावी ? हिंदुस्थानावर वाटेल तसा जुलूम केला, तथापि बेर्थाल लोकांच्या हातून इंग्रज सरकारचें काय वांकडें होणार ? पण लँकेशायरची भीति बाळगली नाहीं तर उद्यां सरकारचीं ६०-७० मतें बुडालींच म्हणून समजावें. तेव्हां अशाच स्थितींत हिंदुस्थानच्या तिजोरीचे वारा वाजलेले इंग्लिश सरकारास दिसूं नये व कापडावर कर बसाविल्यास लँकेशायरकडून जी ओरड होणार ती आधींच त्यांच्या कर्णरंध्रांत शिरावी यांत नवल तें काय !

खरें; हल्लीं सरकारानें जेवढ्या आयात मालावर जकात बसाविण्याचें ठरविलें आहे, तेवढ्यानें सारी तूट भरून येती तर कदाचित् या पांक्तिप्रपंचाचें त्यांस वेड्यावांकड्या रीतीनें तरी मंडन करतां आलें असतें. पण तसाही प्रकार नाहीं. तुटीचा अदमास नर ३॥ कोटींचा आहे व या जकातीपासून काय तें सुमारें १॥ कोटींचेच उत्पन्न होण्याची आशा आहे. बाकीच्या

दोन कोटींची कशी वासलात लावावयाची हा अद्याप प्रश्न आहेच. मग उठलेल्या वंदतेप्रमाणें त्याच्या भरपाईकरितां इनकम-टॅक्स वाढविण्याचा तर सरकारचा हेतु नाहींना ? मि. वेस्टलंड यांनीं आपल्या भाषणांत या वदंतेसंबंधानें चकारशब्दही काढलेला नाहीं, यावरून त्यांत कांहीं तथ्य आहे कीं काय अशीही भीति उत्पन्न होत आहे. सरकारच्या मनांतून खरोखरच हा घातक विचार अमलांत आणावयाचा असेल तर तसें करण्यापूर्वी त्यांनीं त्रिवार विचार करावा अशी आमची त्यांस विनंति आहे. आजमित्तिस १००० हून कमी उत्पन्न असणारा-सही इनकम-टॅक्स द्यावा लागतो हाच मुळीं अन्याय आहे; व तो दूर व्हावा म्हणून कॉंग्रेस इतक्या दिवस टाहो फोडीत आहे. असें असून तो कमी करण्याचें सोडून देऊन उलट तो वाढविण्याच्या दुष्ट उद्योगास सरकार लागेल तर सरकारच्या प्रजावात्सल्याची कमाल झाली असें म्हटलें पाहिजे ! परचक्रा-सारखा एखादा अनिष्ट प्रसंग सरकारावर येऊन मग त्यांनीं तो वाढविला असता तर गोष्ट निराळी होती. पण आधींच निष्कांचन होऊन गेलेल्या प्रजेस पिळून त्या पैशानें, पिशाच्यांच्या पिशाच्या पगार उकळणाऱ्या आपल्या लाडक्या गोऱ्या नोकरांस सरकारानें भत्ता चारावा, हा गोष्ट अत्यंत लज्जास्पद होय. रुपयाची किंमत उतरल्यामुळें हिंदुस्थानच्या कंगाल रयतेस प्रतिवर्षी जो लाखो रुपयांचा कर इंग्लंडास भरावा लागत आहे त्यापुढें वा गोऱ्या

विद्वानांनीं, प्रमुख वृत्तपत्रांनीं व मासिकांनीं वाखाणलेली
विद्यार्थ्यांनीं वाचण्यास योग्य.
बाल-शिक्षणमाला.
वर्षाच्या १२ अंकांची किंमत रु. १।-
१८७ शुक्रवार पेठ, पुणें.

नोकरांच्या नुकसानीची कथा काय ? आणि असें असून त्यांची नुकसानी भरून देण्याकरितां सरकारानें आधींच दिवाळें काढूं पहाणाऱ्या हिंदुस्थानच्या तिजोरीस आणखी एक कोटींचा चट्टा बसवावा आणि तो निस्तरण्याच्या वेळीं फिरून सरकारचें आंतडें लँकेशायरकडे ओढावें या सरकारच्या वर्तनास काय नांव द्यावें तें आम्हांस समजत नाहीं.

दुसरें, परदेशाहून येणाऱ्या कापडावर जकात बसविण्यास इंग्रज सरकारास आपलें अप्रतिबंध व्यापाराचें तत्व सोडावें लागत आहे असेंही नाहीं. हिंदुस्थानांत ज्या गिरण्या चालू आहेत, त्यांमध्यें मँचेस्टरसारखें सफाईदार बारीक कापड मुळींच निघत नाहीं. तेव्हां बाहेरून येणाऱ्या कापडावर जकात बसविल्यानें मँचेस्टरास मुंबईशीं चढाओढ करण्यास कठीण पडेल असेंही म्हणतां येत नाहीं. फार झालें तर जाडेंभरडें कापड येथील गिरण्यांत उत्पन्न होतें त्याच्याशीं चढाओढ करण्यास मँचेस्टरास जड जाऊं नये म्हणून पाहिजे तर तशा कापडावरील जकात माफ करावी. परंतु असा कांहीं सामोपचाराचा प्रकार न करितां केवळ मँचेस्टरच्या लोकांची इतराजी होऊं नये म्हणून बाहेरून येणाऱ्या कापडावरील जकात अजीबातच माफ करणें म्हणजे धडधडीत अन्याय होय, यांत संशय नाहीं.

सध्यां आयात मालावरील जकातीसंबंधानें जो कायदा सुचविण्यांत आला आहे त्यांत लँकेशायरचें दुहेरी हित साधण्याचा प्रयत्न होत आहे. ज्या मालावर जकात घेण्याचा विचार आहे, त्यांमध्यें यंत्रसामुग्री व दगडी कोळसा यांचाही अंतर्भाव झालेला आहे. आतां आमचे गिरणीवाले यंत्रांकरितां व कोळशाकरितां परदेशावरच अवलंबून असल्या-

मुळें त्यांस मात्र हा कर भरावा लागणार व बाहेरील मालाशीं चढाओढ करण्याच्या कामीं त्यांस ही एक नवीनच अडचण उत्पन्न होणार. लँकेशायरला यंत्रें व कोळसा यांकरितांही कर भरावयास नको व त्यांच्या कापडावर जकातही नाहीं. तेव्हां अशा प्रकारें मँचेस्टरचें दुहेरी हित साधून हिंदुस्थानच्या गिरणीवाल्यांच्या मार्गांत नवीन अडचणी आणण्यापेक्षां बाहेरील कापडावर जकात बसवून कोळशावरील जकात माफ करणें हेंच हिंदुस्थानच्या तिजोरीच्या व व्यापाराच्या अशा दोन्हीं दृष्टींनीं हिंदुस्थानास हितावह आहे. याकरितां मुंबईप्रेसिडेन्सी-असोसिएशननें वरील अर्थाची जी सूचना केली आहे तिचा, प्रस्तुत कायद्याच्या मसुद्याचा विचार करण्याकरितां नेमलेल्या सिलेक्ट कमिटीनें अवश्य विचार करावा अशी आमची सूचना आहे. केरोसीनवर शेंकडा १० जकात ठेवण्याचा जो विचार आहे, तोही मुंबईप्रेसिडेन्सीअसोसिएशननें सुचविल्याप्रमाणें वाजवी नाहीं. या तेलाचा गोरगरीबांकडून फार उपयोग होत असतो, व त्यांच्यावर या कराचें अप्रत्यक्ष रीतीनें ओझें पडावें हें सर्वथा दूषणीय आहे.

असो; वर दर्शविल्याप्रमाणें ह्या कायद्याचा मसुदा हल्लीं सिलेक्ट कमिटीपुढें विचाराकरतां गेला आहे; व त्यांत फेरफार होईल अशी अशा बाळगण्यास अद्याप जागा आहे. त्याच्या

प्रयोगानें लोकप्रिय झालेलें सचित्र
संगीत समाजादर्श नाटक.
ब. चिं. घारपुरे, एल्. सी. पी. एस्. (कलकत्ता.)
एम्. आर. सॅन्. आय. (लंडन) इत्यादि, रुपये किं. १ रुपाया.
'संदेश' एजंट, पुणें सिटी.

पूर्वीच लँकेशायरचें डेप्युटेशन लॉर्ड किंबरलेकडे जाऊन आयात कापडावर जकात बसविण्याचा इंडियासरकारचा तुर्त विचार नाहीं असें लॉर्ड मजकुरांकडून त्यांस आश्वासन देण्यांत आलें आहे हें कांहीं खोटें नाहीं; परंतु 'पायोनिअर' व 'इंग्लिशमन' सारख्या पत्रांनींही या घाटत असलेल्या अन्यायावद्दल सरकारचा कडक शब्दांनीं निषेध केला आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली व हिंदुस्थानसरकारानेंही स्टेटसेक्रेटरींच्या दपटशामुळें हा अपवाद केला आहे हें मनांत आणलें म्हणजे या प्रसंगीं लोकमतास अगदींच मान मिळणार नाहीं असें वाटत नाहीं. निदान खटपट करणें हें तरी आपलें काम आहे. याकरितां निरनिराळ्या सभा व मंडळ्यांकडून व लोकांच्या जाहीरसभांकडून आपापलें म्हणणें सरकारापुढें ठेवण्यास यत्किंचितही आळस होणार नाहीं अशी आम्हीं आशा करतों.

पुजारी व पंचाक्षरी.

देवोत्पत्तीविषयीं एव्हांपर्यंत जें लिहिण्यांत आलें आहे तें ज्या वाचकांना समजलें असेल व रुचलें असेल त्यांना

परित्राणाय साधूनाम् । विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

असल्या कविकृत अजागळ प्रलापांत बिलकुल अर्थ नाहीं असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. आपल्या देवांत आणि इतरांच्या देवांत किंवा आपल्या धर्मांत आणि इतरांच्या धर्मांत म्हणण्यासारखा कांहीं एक फरक नाहीं. आपल्या धर्माचें इतर धर्मांशीं

जें साम्य आहे त्याच्या पोटींच सामान्य मनुष्याच्या नजरेस न येणारें असें कल्पनातीत वैषम्य आहे, आणि म्हणून आमचा धर्म इतर धर्मांहून श्रेष्ठ आहे, व त्याचें रहस्य स्पष्टपणें कोणास कधींहि कळावयाचें नाहीं असें म्हणणें म्हणजे कित्येक अशक्य गोष्टी कबूल करण्यासारखे आहे. सर्व दृश्य विश्वाचें जें आदि-कारण; काल आणि स्थल यांनीं मर्यादित होत नाहीं म्हणून ज्याला अनादि व अनंत असें म्हणतात; आपली प्रचंड सूर्य मालासुद्धां ज्याच्या अचिंत्य सामर्थ्याचें अत्यंत सूक्ष्म निदर्शन आहे असें झटलें तरी चालेल--अशा सर्वव्यापी परब्रह्मानें मत्स्य-कुर्म--वराह--नारसिंहादि दशावताराच्या फेऱ्यांत सांपडून युगेंच्या युगें भ्रमण करतां करतां एकदां आमच्या कल्याणासाठीं गोकुळांतील एका गवळणीच्या पोटीं यावें, शुद्ध शैशवास्थेंत पूत-नेसारख्या प्रचंड राक्षसिणिचें, स्तनपानाच्या मिषानें, चैतन्य शोषण करावें, चालतां बोलतां येऊं लागलें नाहीं तों लोकांच्या दुभत्यावर दरोडे घालण्यास आरंभ करून आपल्या सहकाऱ्यांस यथेच्छ गोरस चारावे, आणि त्यांसह रानांत गुरें घेऊन जाऊन तेथें पोरकटपणास शोभणारे असे खेळ खेळावे; पुढें तारुण्याचा प्रादुर्भाव झाला नाहीं तों कामवासना प्रज्वलित होऊन कधीं मुरलीच्या मधुर स्वरानें वृंदावनांतील तरुणांगनांस वेड्या करून आपापल्या घरांतून काढून आणाव्या आणि त्यांबरोबर रासादि क्रीडा कराव्या किंवा यमुनेंत त्या स्नानास उतरल्या असतां त्यांची वस्त्रें कळंबाच्या झाडावर पळवून नेऊन तेथून त्यांशीं बीभत्स

निबंधसंग्रह.
भाग १ ला. किं. १। ७.
मॅनेजर-सुधारक ऑफीस, पुणें.

विनोद करावा; नंतर सोळा सोळासहस्र गोपींचें पातित्व पत्करून फक्त दोघींसच पट्टराणीत्व द्यावें, पण त्यांतल्या त्यांतही पक्षपात केल्याशिवाय राहूं नये; पराक्रमाचे दिवस आले असतां स्वतः शस्त्र हातीं न धरतां दुस-यांचें सारथ्य स्वीकारून प्रसंगविशेषीं सल्लामसलत मात्र द्यावी, व घरच्या घरीं यादवी माजून राहून कुलक्षय होण्याचा प्रसंग आला असतांही, ब्रम्हज्ञानाचा उपदेश करण्याच्या मिषानें युद्ध करण्यास उत्तेजन द्यावें-हें सारें शक्य, संभवनीय, व विश्वसनीय आहे असें मानिलें पाहिजे. पृथ्वीवरील इतर देशांप्रमाणें या देशांतही अशा प्रकारच्या गोष्टींवर श्रद्धा ठेवणारे भाविक लोक आहेत हें आम्ही कबूल करतों. पण या लोकांस जें विश्वसनीय वाटतें तेंच विश्वासनीय कशासाठीं मानावें; आमच्यासारख्यांचे विचारच विश्वसनीय कां नाहींत? आमचे विचार बरोबर नसतील तर तुमचें परब्रम्ह आम्हांस आपण होऊन चकवितें आणि ज्या गोष्टी तुह्मांस रुचतात त्या आम्हांस रुचूं देत नाहींत, असें झटलें पाहिजे! पण असा पक्षपात तरी त्यानें कशासाठीं करावा? आह्मी सत्याचा छडा काढण्यासाठीं रात्रंदिवस झटत असून आम्हांस भलत्या दिशेला नेण्याची बुद्धि कां व्हावी? आम्हां सत्यशोधकांस निरंतर दुर्गति प्राप्त व्हावी म्हणून जगदादिकारण असें करीत असेल असें म्हणण्यास तुम्ही तयार आहां काय? ते तुह्मी असा किंवा नसा; एक गोष्ट आतां पक्की ठरून गेली तीं ही कीं, वेदांत व पुराणांत देवांच्या ज्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे तें स्वरूप तुह्मांस अद्वेय वाटत असेल तर धर्मसंबंधानें तुमचे आमचे विचार कधींहीं पटावयाचे नाहींत. इतरांच्या देवतांप्रमाणें आमच्या देवताही पिशाच्यापासून निर्माण झाल्या व देव आणि पिशाचें यांच्या प्रकृतीविषयीं मनुष्यांनीं ज्या कल्पना केल्या आहेत त्या त्यांनीं आपल्याच प्रकृतींत कमी

अधिक फेरफार करून केल्या आहेत असें आह्मी समजतों; आणि जें असे समजतील त्यांसच धार्मिक संस्थांची उत्पत्ति आणि अभिवृद्धि कशी झाली हें नीट समजणार आहे, असें आह्मांस वाटतें.

देवरुषी, पंचाक्षरी, मांत्रिक, भटजी, पुजारी, वैदिक, उपाध्याय, धर्माधिकारी वगैरे पुरुषांचा पार्थिवेतर जंतूशीं संबंध असल्यामुळें एके काळीं ते सारे एकाच वर्गांत मोडत असत, व असें होणें स्वाभाविक होतें; कारण देव काय, भुतें काय, समंध काय-अशा प्रकारच्या साऱ्या प्रकृतींचें अस्तित्व या भूगोलावर जन्मास येणाऱ्या प्राणिमात्राच्या अस्तित्वाहून अगदीं निराळ्या तऱ्हेचें मानलें असल्यामुळें त्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवणाऱ्या पुरुषांचा प्राथमिक लोक एकाच वर्गांत अंतर्भाव करीत यांत कांहीं नवल नाहीं, वाईट पिशाचाला शिक्षा करणें व चांगल्याची मर्जी सुप्रसन्न करून त्याकडून एखादें चांगलें काम करून घेणें यांत, आणि एखादा देव नवसाला न पावला तर त्यावर रागावून त्याचा थोडाबहुत समाचार घेणें, अथवा तो भाळला असतां त्याचा बेडजाव करणें यांत फारसें अंतर आहे असें नाहीं. देव व पिशाच यांचीं अस्तित्वें एकाच प्रकारचीं असल्यामुळें त्यांशीं व्यवहार

कॅलेंडर:-दरसाल डिसेंबर अखेर आम्ही छापवीत असतों. ट. ह. करितां ८१ पाठविल्यास कोणासही त्यावेळीं तें फुकट मिळेल.

मॅनेजर.

सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें सिटी.

ठेवणारे इसम सामान्य लोकांच्या दृष्टीनें एकसारखे दिसावे, हें स्वाभाविक आहे. तथापि ज्याप्रमाणें सामान्य सांसारिक गोष्टींत श्रमविभाग होत जाऊन त्याच्या निरनिराळ्या शाखेंत निरनिराळ्या इसमांची योजना होते, त्याप्रमाणें पुजारी व पंचाक्षरी यांचीं कामेंही वाटलीं जाऊन त्यांचे दोन स्वतंत्र वर्ग बनतात. सामान्य मनुष्याच्या परिस्थितीचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं, त्याची निर-निराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या प्रकारच्या लोकांशीं गांठ पडून निरनिराळ्या तऱ्हेनें त्याला त्यांशीं वागावें लागतें. आईबाप बाहेणभावंडें, आप्तमित्र वगैरेपासून त्यानें म-मतेचाच अनुभव घेतलेला असतो. तेव्हां अर्थात तो उपकृत होऊन त्याशीं उलट ममतेनें वागतो. आपल्याहून जे श्रेष्ठ अ-सतील त्यांशीं त्याला नम्रपणानें वागावें लागते. जे आपल्याहून खालीं असतील त्यांशीं तो अर्थात ऐटीनें वागतो. त्याला इजा करणारा इसम लुच्चा न असला तर त्याचा तो लागलीच समा-चार घेतो. पण तोच जबरदस्त असला तर वेळ साधून त्या-चा सूड घेणें त्याला अवश्य होतें. त्याचा शत्रु फारच प्रबळ असला तर त्यानें दिलेला ताप त्याला निमूटपणें सहावा ला-गतो. अशा प्रकारें आसमंतानुरोधानें मनुष्याचें वर्तन अनेक-विध होतें. हे सर्वांस ठाऊक आहेच. आतां देव आणि भुतें यांचे स्वभाव मनुष्यांनीं आपल्या स्वभावासारखेच मानिले आ-हेत हें आजपर्यंत दिलेल्या पुराव्यावरून निर्विवाद ठरतें. तेव्हां अशा प्रकारच्या देवांशीं व भूतांशीं ज्यांचा संबंध घडतो त्यांचेही त्या अस्तित्वांच्या प्रकृतिभेदाप्रमाणें दोन वर्ग होतात.एक चांगल्या देवांशीं व पिशाचांशीं संबंध ठेवणारांचा वर्ग. व दुसरा वाईट देवांशीं व पिशाचांशीं संबंध ठेवणारांचा वर्ग या दोन वर्गांतील इसमांचें वर्तन जगतीं निराळ्या प्रकारचें असतें. आ-

ईवपें बहुधा ममता करणारीं असतात; तेव्हां मरणोत्तर त्यांचें तर्पण व पूजन करण्याचें काम मनुष्य आपल्याकडे ठेवतो किंवा आपल्या उपाध्यायाला सांगतो. त्याप्रमाणेंच देवांच्या पूजेचें कामही जो तो आपलें आपण करतो अथवा घरच्या उपाध्याला किंवा गांवांतल्या एखाद्या चांगल्याच्याशा वैदिकाला अथवा आचारसंपन्न ब्राह्मणाला सांगतो. पण खंडोबा, म्हसोबा, भेलाई वगैरे देवतांची आणि हडळ, खवीस, म्हावसट वगैरे पिशाचांची तशी गोष्ट नाहीं. त्यांची खोड दुसऱ्याच प्रकारच्या लोकांकडून मोडावी लागते. पंचाक्षरी, देवरुषी, मांत्रिक वगैरे लोकांचे हें काम आहे. जशा प्रकारच्या अस्तित्वाशीं यांचा संबंध तशाच प्रकारचें यांचें त्यांशीं वर्तनही असतें. देवांचे वाढदिवस, पितरांची श्राद्धें, संन्याश्यांच्या पुण्यतिथि वगैरे गोष्टींस कालेंकरून उत्सवता प्राप्त होते आणि अशा प्रकारच्या उत्सवांपासून सर्वांस आनंद, करमणूक व सुखोत्पत्ति होते. पंचाक्षरी वगैरे लोकांचा अगदीं उलट प्रकार आहे. शेंदूर, बुक्का, विड्याचीं पानें, लिंबें, कुंकू, दहीभात, नारळ, अंडीं, बकरीं-हीं यांचीं पूजाद्रव्यें; मडकीं, परळ, डोक्याच्या करट्या, हातापायांचीं हाडें-हीं यांचीं पात्रें. अशा प्रकारच्या उपकरणांनीं पूजन केल्यावर यांचीं दैवतें प्रसन्न झालीं तर बरें; नाहीं तर कित्येकांच्या अंगावर थंड पाण्याचा वर्षाव करावा लागतो; वेताच्या काठ्यांनीं अथवा कान-

दि रिलायन्स ट्रेडिंग कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्वत्र गावाजलेलें लज्जतदार टी मिक्श्चर ⁄१० पौंड.

मोरोक्को कॉफी ⁄१२ पौंड.

याशिवाय हरएक प्रकारच्या माल आम्ही माफक कमिशनवर पाठवूं

ड्याच्या चाचकांनीं कित्येकांच्या पाठी फोडाव्या लागतात; कित्येकांस मिरच्यांची अथवा उदाची धुरी घालावी लागते. सारांश, देवतांचा मगदूर पाहून अशीं अनेक प्रकारचीं कोवडीं करावीं लागतात. तात्पर्य काय कीं, मनुष्याच्या मनांत भुतांच्या व देवांच्या कल्पना येऊं लागल्या ह्मणजे त्यांना दंड करणारे व वश करणारे असे पुरुष निर्माण होतात. प्रथम अशा प्रकारचीं कामें एकाच इसमाकडून होत असतात. पण पुढें इतर कामांप्रमाणें यांतही श्रमविभाग होऊं लागून **पुजारी व पंचाक्षरी** असे दोन वर्ग अस्तित्वांत येतात. आपण ज्यांना धर्माधिकारी म्हणतो त्यांचा मूळपीठिका अशी आहे.

पहिले पुजारी मृतांचे आप्त.

देवांच्या अथवा भुतांच्या दोन जाती आहेत; एक भल्याची व दुसरी द्वाडांची. तेव्हां भल्याची खुशामत करून त्यांना सुप्रसन्न ठेवणारांचा एक वर्ग होतो, आणि द्वाडांची खोडकी मोडून त्यांना वश करणारांचा दुसरा वर्ग होतो. व या दोन वर्गांस आपण पुजारी व पंचाक्षरी अशीं नावें देतों हें जें मागल्या लेखांत सांगितलें आहे तें वाचकांच्या ध्यानांत असेलच. आज येवढेंच दाखवावयाचें आहे कीं हा जो वर्गभेद समाजाच्या विशिष्ट स्थितींत दृष्टीस पडूं लागतो तो त्यांत पहिल्यापासून नसतो; तो अनेक कारणांमुळें हळू हळू उत्पन्न होत जातो. पुजाऱ्याचें व पंचाक्षऱ्याचे काम प्रथम घरच्या घरींच होत असतें,

कोणते पाहिजे ते नवे किंवा जुने सुधारलेले लोक घ्या, त्यांत दोन प्रकारचा पूजाविधी वहिवाटींत असतो असें तुह्मांस दिसून येईल. उदाहरणार्थ आमचे लोक घेतले तरी चालतील. काशीसारखें देवळांनीं गजबजलेलें क्षेत्र घेतलें तरी तुह्मांस असें दिसून येईल कीं, आमचे लोकांना सार्वजनिक देवळांत केलेल्या पूजेपासून किंवा प्रार्थनेपासून तृप्ति होत नाहीं. ज्याप्रमाणें कांहीं विशेष प्रकृतीच्या पुरुषांना दुसऱ्याच्या घरचें अन्न कितीही चांगलें असलें तरी त्यापासून त्यांचें समाधान होत नाहीं. तर तें होण्यास त्यांना आपल्या घरीं येऊन बायकोच्या हातचा घासभर भात किंवा आईच्या हातची चतकोर दशमी खावी लागते, त्याप्रमाणें **तुळशीवागेंतील** रामापुढें कितीही नमस्कार घातले किंवा **बेलबागेंतील** विष्णूला कितीही प्रदक्षिणा घातल्या तरी घरीं येऊन घरच्या देवाची आर्ती धुपार्ती केल्याशिवाय आणि रोज सकाळीं त्यांची यथासांग पूजा केल्याशिवाय कित्येकांस चैन पडावयाचे नाहीं ! जुन्या ग्रीक व रोमन लोकांत असाच प्रकार असे. ज्याप्रमाणें आमच्या घरीं त्याप्रमाणेंच त्यांच्या घरींही देव्हारे असतात; व या देव्हाऱ्यांतील देवांची घरच्या मनुष्यांनीं नित्य पूजा करावी अशी चाल असे.मिसर देशांतील लोकांतही कुटुंबदेवतें आणि ग्रामदैवतें असा भेद असे व त्यांनाहीं घरच्या देवांचा पूजा रोज करावी लागे. हे घरचे देव घरच्या घरींच उत्पन्न होतात हें आतां फिरून सांगण्याची गरज नाहीं. देवांची उत्पत्ति पिशाचांपासून झाली आहे ही गोष्ट ज्यांच्या मनांत बिंबली असेल त्यांना गृहपूजा आस्ति-

---

लेखकांस योग्य मोबदला देऊन आह्मीं ग्रंथ—प्रकाशनाचें काम करितों.

मॅनेजर, सुधारक प्रिं. ब्यूरो, पुणें.

त्वांत कशी आली असावी, हें सहज समजण्यासारखे आहे. प्रत्येक दिवशीं ज्याच्या त्यांच्या गांवांत व देशांत शेंकडों माणसें मरतात. पण कोणालाही आपल्या निकट आप्तांच्या पिशाचाशिवाय इतरांच्या पिशाचाची भीति बहुधा वाटत नाहीं. घरच्या घरीं जीं अगदीं जवळचीं मोठीं माणसें मरतात त्यांची भीति मागच्यांना फार वाटते, आणि अशाच माणसांच्या श्राद्धादि क्रिया न केल्यास मेलेल्यांना दुर्गति प्राप्त होईल किंवा ते पिशाच होऊन आपणांस त्रास देतील अशा शंकेनें अथवा भीतीनें नानाप्रकारची दानें देण्याचा आणि चऱ्याबाईट क्रिया करण्याचा प्रघात पडला आहे. ज्याच्या पिंडांस कावळा लवकर शिवत नाहीं त्यांच्या वासना अतृप्त राहिल्या आहेत असें जें आपण समजतों, त्यापासूनच मनुष्याच्या देहावसानाबरोबर त्याचा आत्मा पंचत्वाप्रत पावत नाहीं, तर तो सूक्ष्मरूपानें मागें राहतो, अशी जी आपली कल्पना आहे ती स्पष्टपणें व्यक्त होते. प्राणोत्क्रमण व देहावसान यांबरोबर सारें आटपलें अशी आपली पक्की समजूत असती तर भुतांची कल्पना आपणांस मुळींच मान्य झाली नसती, व नानाप्रकारचे और्ध्वदेहिक संस्कार करण्याच्या भरीस आपण मुळींच पडलों नसतों. पण आपली समजूत याच्या अगदीं उलट आहे. मेलेल्या निकट आप्तांचे प्रेतविधि नीट केले नाहींत तर आपणांवर त्यांचा क्षोभ होईल आणि ते आपला छळ करतील असें भय पुष्कळांस वाटत असतें. ज्यांना तें वाटत नाहीं त दुसऱ्या एका महापिशाचाला भीत असल्यामुळें सामान्य लोकांप्रमाणें तेही पाहिजे ते संस्कार निमूटपणें करण्यास तयार होतात. तें महापिशाच कोणतें म्हणाल तर लोकमत ! सूज्ञ व सद्य आईबापें आणि सासूसासरे आपलें हृदय पाषाणाहून कठिण करून आपल्या लाडक्या लेकींच्या आणि सुनांच्या तोंवरट्याकडे यत्किंचित् लक्ष न देतां त्यांचे केशकलाप उतरण्यास,

त्यांचे कुंकुमतिलक पुसून टाकण्यास, आणि त्यांच्या कांकणां-च्या कांचा करण्यास जे तयार होतात ते याच महापिशाचाच्या भीतिमुळें होय ! धर्मसंबंधीं कोणत्याही प्रकारची भीति ज्यांना राहिली नाहीं असें लोक स्मशानांत क्षौर करून घेण्यास किंवा डोकीवर गळती घागर घेऊन चितेभोंवतीं प्रदक्षिणा करण्यास जे राजी होतात तेंही याच महापिशाचाच्या भीतीमुळें होय यांत संशय नाहीं ! तात्पर्य, कोणी श्रद्धा आहे म्हणून, कोणी लोकांनीं आपणास न हसावें म्हणून व कोणी त्यांनीं आपणास धर्मनिष्ठ म्हणावें म्हणून-स्वतःला मान्य व अमान्य असलेले चांगले पार्इट प्रेतविधि करीत असल्यामुळें त्यांचा अंमल सर्व ठिकाणीं अद्यापि दृष्टीस पडत आहे. तथापि अशा स्थितींतही एक गोष्ट निर्विवाद आहे ती ही, कीं कोणी कितीही श्रद्धालू असला किंवा लोकमतास मान देणारा असला तरी तो आपल्या शेजाऱ्याच्या बापाचें अथवा आपल्या खापरपणज्याचें श्राद्ध करण्याच्या खटपटींत पडत नाहीं. देवभोळेपणाला, भाविकपणा-ला, व मूर्ख समजुतीलाही मर्यादा आहेच. शंदोनशें वर्षांपूर्वी आपले जे पूर्वज होऊन गेले त्यांच्या आत्म्यांची काय दशा झाली असेल व श्राद्धान्नांचून त्यांचा चरितार्थ कसा होत असेल यांची शंका कोणासच येत नाहीं ! नाहीं म्हणायाला ब्राह्मणांनीं पितृतर्पण ऊर्फ ब्रह्मयज्ञ म्हणून जो नित्यविधि निर्माण केला आहे तो बऱ्याच अंशीं व्यापक आहे असें म्हण-

---

संगीत सुविचार--विजय नाटक.

श्री. एस्. जी. देवधर, बी. ए. कृत.

किं. ४८

सुधारक ऑफीस, पुणें.

५४

प्रयास हरकत नाहीं. यांत अमुक एकाकरतां कांहींच खपड केलेली नाहीं असें बहुधा दाखवितां येणार नाहीं ! असोत बिचारे सुखी असोत ! या पृथ्वीतलावर जन्मास येऊन देहावसान झालेल्या यच्चावत् प्राण्यांचे आत्मे आम्हा ब्राम्हणांनीं सोडलेल्या पाण्याच्या शितोड्यांचें यथेच्छ प्राशन करून कालांतापर्यंत सुखी असोत ! आमच्या लोकांतील व पृथ्वीवरील इतर सर्व लोकांतील बाकी सारे प्रेतसंस्कार व प्रेतविधि लयास जाऊन त्या सर्वांचेबदल एवढा ब्रम्हयज्ञ राहील तर किती नामी होणार आहे बरें ? पण तसें एकाएकीं कोठून होणार ? तसें होण्यास हजारों वर्षें लोटलीं पाहिजेत. तथापि या विधींचें व संस्कारांचें बंड हळूं हळूं कमी होत जाणार याबद्दल आम्हांस मुळींच शंका नाहीं. ज्यांना तें कसकसें कमी होत चाललें आहे हें पहावयाचें असेल त्यांनीं आपल्या विधींची, सुधारणेंत आमच्या पाठीमागें बऱ्याच अंतरावर असलेल्या दुसऱ्या लोकांच्या विधींशीं तुलना वारंवार करीत असावें म्हणजे तें त्यांच्या लक्षांत तेव्हांच येईल. ज्या खोलींत किंवा ज्या खोपटांत बाप किंवा आजा मेला असेल त्यांत त्याचें प्रेत पुरल्यावर महिना दोन महिने तें खोंपट अजीबात सोडून जाणारे लोक न्यूझिटनांत आहेत ! त्यांची समजूत अशी आहे कीं मेलेल्याचा आत्मा अशा घरांत कांहीं दिवस रेंगाळत रहातो आणि मागें राहिलेल्या माणसांस क्षणोक्षणीं त्रास देतो. पण तीं त्यांस सोडून गेला आणि त्रास द्यावयाला त्याला कोणी मिळेनासें झालें म्हणजे कंटाळा येऊन तो तेथून निघून जातो. असें झाल्यावर पुनः त्या खोपटांत परत येऊन रहाण्यास कांहीं हरकत नाहीं ! तात्पर्य काय कीं, थडग्यावर, चितेवर, स्मशानांत, चवाठ्यावर, घरांत, नदीच्या काठीं अथवा डोंगराच्या पायथ्याशीं--ज्याच्या त्याच्या समजुतीप्रमाणें न सोडू-

णें मेलेल्या आप्तांच्या आत्म्यास देणीं देऊन व प्रार्थना करून संतुष्ट राखणें व जेणेंकरून जर्मानजुमल्यावर व मुलाबाळांवर त्यांचा डोळा राहून त्यांचेकडून हरअंडचणीच्या प्रसंगाला सहाय्य मिळेल अशा रीतीनें त्यांची वरदास्त ठेवणें हें मृताच्या निकट आप्तांचें व विशेषतः त्याच्या मुलांचें मुख्य कर्तव्य होऊन बसलें आहे. समाजाच्या प्रथमावस्थेंत देवाची व पूजकाची कल्पना यापुढें गेलेली नसते. देव म्हणजे पिशाचयोनीप्रत पावलेला मनुष्य आणि त्याचा पूजक म्हणजे त्याला योग्य द्रव्यें देणार त्याचा जवळचा नातलग होय. विठोबा आणि त्याचे बडवे अस्तित्वांत येण्यास समाजाच्या आचारविचारांत चेरंग अंतर पडावें लागलें.

ग्रंथालय कार्ये
3454

विद्वानांनीं, प्रमुख वृत्तपत्रांनीं व मासिकांनीं वाखाणलेली
विद्यार्थ्यांनीं वाचण्यास योग्य.
बाल-शिक्षणमाला.
वर्षाच्या १२ अंकांची किंमत रु. १।-
१८३ शुक्रवार पेठ, पुणें.

डोंगरीच्या तुरुंगांतील

१०१ दिवस !

लवकरच प्रसिद्ध होईल.

REFBK-0003555

मुद्रारक्षक, पुणे.